अज्ञाताचा शोध व बोध



BookGanga

आत्मानंद

अज्ञाताचा शोध व बोध

* * *

लेखक

आत्मानंद

* * *

Rs 2.50

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ हौदाजवळ, पुणे ३०

प्रकाशक :
अनंत सदाशिव वैद्य
यशवंत प्रकाशन,
सदाशिव पेठ, हौदाजवळ, पुणे ३०.

- प्रथमावृत्ती : ऑक्टोबर १९७१
- द्वीतीयावृत्ति —१५ ऑगस्ट ७६

- महाराष्ट्र राज्य कागद वाटप समितीने या पुस्तकांस सवलत दराने कागद दिल्याबद्दल अत्यंत आभारी आहे. —प्रकाशक.

Rs 250

मुद्रक :
रा. शं. जोरी
इंदिरा प्रिंटिंग प्रेस,
१००५ सदाशिव, पुणे ३०.

अर्पण-पत्रिका

—ज्यांनी सतत ४५ वर्षे माझ्या पाठीशी राहून मार्गदर्शन केले; वेळोवेळी संकटांचा इशारा देऊन किंवा चुकत असल्यास योग्य मार्गदर्शन करून मला सन्मार्गावर ठेवले, व हे सर्व कोणत्याही अपेक्षेवाचून ! माझ्या तिन्ही पुस्तकांतील महत्त्वाच्या व कठीण भागातील मार्गदर्शन त्यांचेच ! इतके असून त्यांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा योग मला अद्याप आलेला नाही—त्या माझ्या पूज्य सद्गुरूंचे चरणी ही माझी कृती समर्पण—

—आत्मानंद

वाचकांस विनंती

सर्व पुस्तक वाचून झाल्यावर कृपा करून वाचकांनी त्यासंबंधी आपले मत कळवावे. शासनातर्फे चालविल्या जाणाऱ्या साहित्य-संस्कृति मंडळाच्या मते हा ग्रंथ अनुदानास पात्र नाही. तसे मला कळविण्यात आले आहे. त्यांच्याकडून अनुदान मिळाले असते तर ग्रंथाची किंमत बरीच कमी ठेवता आली असती, कारण यात मी नफ्याची कधीही अपेक्षा केलेली नाही व करीत नाही. बहुतांश वाचकांचे त्याचप्रमाणे मत असले तर निष्कारण आणखी काही लिहून वाचकांचा वेळ व पैसा फुकट घालविणे योग्य होणार नाही. निदान मग लेखनात घालवावा लागणारा वेळ साधनेत घालविता येईल याकरता ही विनंती.

२२२, पाईपलाईन
कुर्ला–मुंबई–३०

आपला
आत्मानंद

Rs 250=-

— आभार —

अज्ञाताचा शोध व बोध—वैतरणेच्या ऐलतीरी—अमृततुषार ही तिन्ही पुस्तके वाचकांना अत्यंत आवडली. सदर पुस्तके दुर्मिळ होती. ही नवीन आवृत्ति प्रकाशित करण्यास श्री. आत्मानंद व गायत्रि प्रकाशनाचे श्री. सुदर्शन आठवले यांनी अनुमती दिल्याबद्दल या उभयतांचा अत्यंत आभारी आहे.

अनंत सदाशिव वैद्य
यशवंत प्रकाशन

‘आवश्यक तेवढेच’

‘अज्ञाताचा शोध व बोध’ हा श्री. आत्मानंद यांचा ‘गायत्री प्रकाशनाच्या वतीने प्रसिद्ध होणारा तिसरा ग्रंथ. गायत्री प्रकाशनाचे हे पाचवे प्रकाशन.

‘अज्ञाताचा शोध व बोध’ या ग्रंथात, प्लँचेटपासून पुनर्जन्मापर्यंत अनेक गूढ गोष्टींची डोळस चर्चा केलेली आढळून येईल. विज्ञाननिष्ठ—निराग्रही दृष्टीतून लिहिलेला अशा प्रकारचा ग्रंथ मराठीतील हा पहिलाच ठरावा—असेच त्याचे अपूर्व स्वरूप व अंतरंग आहे.

श्री. ‘आत्मानंद’ यांनी आपल्या वयाच्या बहात्तराव्या वर्षीं हे संशोधनपूर्ण लेखन करून एक मोठा विक्रम तर केलाच आहे, पण अशा विषयासंबंधी असणारे अपसमज दूर करून भारतीय व पाश्चात्य गूढ विद्यांवर प्रखर प्रकाश टाकून त्यांनी एक नवीन दृष्टी या ग्रंथाद्वारे समाजाला दिली आहे. हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

श्री ‘आत्मानंद’ हे पदवीधर (एम्. ए., एलएल बी.) आहेत—सँसारी आहेत. त्याबरोबर ते एक साधक—निष्ठावान घोखंदळ अभ्यासक व डोळस संशोधक आहेत, फलज्योतिष, मंत्रशास्त्र, वैद्यक आणि रसविद्या या सर्व विषयांत त्यांची उत्कृष्ट गती आहे. त्यांचा दृष्टिकोन विज्ञाननिष्ठ—प्रगत—आणि निराग्रही आहे याची प्रचीती वाचकांना ठायी ठायी येईलच.

यापूर्वी दोन वेळा त्यांना मृत्यूने जीवदान (extension) दिले होते; आणि आताही नुकतीच—आणखी एकदा मृत्यूने त्यांच्यावर कृपा केली आहे. हा ग्रंथ ही आपली शेवटचीच कृती ठरेल असे समजून श्री ‘आत्मानंद’ यांनी ती पूर्ण केली. ती शेवटची ठरो वा न ठरो, पण ती ‘चिरंजीव’ ठरणार आहे एवढे आश्वासन या ग्रंथाचा कोणीही वाचक सहज देऊ शकेल.

माझा व श्री. आत्मानंद यांचा परिचय व स्नेह हा एक सुखद योगायोग असे मी मानतो. त्यांच्यामुळे मला पुष्कळच शिकावयास सापडले. उपदेशकाची व सद्गुरूची भूमिका न घेताही त्यांनी ते कार्य कौशल्याने व अतीव सौजन्याने पार पाडले आहे. त्यांच्या प्रेरणेनेच व प्रत्यक्ष हातभारानेच ‘गायत्री—प्रकाशन’ ही संस्था चालू झाली. ही संस्था द्रव्योत्पादन हा हेतू ठेवून चालू केली गेली नाही. उलट ज्या प्रकारचे ग्रंथ ही संस्था प्रकाशित करते तशा ग्रंथांना ग्राहक फार थोडे व निवडकच लाभतात. असे असूनही एक विशिष्ट हेतू पुढे ठेवून अध्यात्म व विज्ञान यांची हातमिळवणी करण्यास साह्यभूत व्हावे या धोरणाने आतापर्यंत पाच प्रकाशने आम्ही सादर केली आहेत.

आमच्या ग्रंथांचे हळूहळू पण निश्चित उत्तम स्वागत होत आहे हे सांगण्यास

आनंद व थोडा अभिमानही वाटतो. 'अज्ञाताचा शोध व बोध' समाजाला उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

श्री 'आत्मानंद' हे साहित्यिक नाहीत. यामुळे ते गुण त्यांच्या लेखनात न आढळणे स्वाभाविकच आहे. त्यांच्या पहिल्या दोन्ही ग्रंथांच्या प्रकाशनाच्या वेळी मी त्यांवर संपादकीय संस्कार करण्याचे धाडस केले होते. पण असे करताना कधी कधी लेखकावर अन्याय होतो व त्याची हृद्गते मूळ स्वरूपात पुढे येण्यास अडचण होते; हे माझ्या ध्यानी आल्यामुळे या वेळी त्यांच्या मूळ लिखितात मी कसलीही ढवळाढवळ केली नाही.

श्री 'आत्मानंद' यांच्या ग्रंथाची मूळ प्रत सुवाच्य लिहून काढणे, त्यावरून मुद्रणप्रत तयार करणे ही कामे महत्त्वाची होती. सौ. सुशीला येळगावकर यांनी श्री 'आत्मानंदा'चे अक्षर अबोध असते तरीही एवढ्या मोठ्या ग्रंथाची सुवाच्य प्रत तयार करण्यात मोलाचे साह्य केले याबद्दल त्या प्रशंसेस पात्र आहेत. श्री. आबासाहेब सरदेशपांडे यांनी मुद्रण प्रत व मुद्रिते याबाबतीत आम्हास निश्चिंत ठेवले. त्यांचें काम नेहमीच निर्दोष व नियमबद्ध असते. या ग्रंथाच्या प्रकाशनात त्यांचा वाटा मोठा आहे.

आनंद मुद्रणालयाचे व माझे संबंध जिव्हाळ्याचे आहेत म्हणूनच पूर्वीच्या चारी ग्रंथांप्रमाणेच या ग्रंथाचे कामही सुबक, सुंदर होऊ शकले. आमच्या कामां श्री. जोशी बंधू जे मोलाचे सहकार्य देतात ती आमची मोठी शक्ती आहे, या शक्ति देवतेला नमन! चित्रकार श्री. सुधाकर खासगीवाले, श्री. सालकर व माझे मित्र आंबेकर यांचे साह्य अकृत्रिम होते. त्याबद्दल या सर्वांचा मी कृतज्ञ आहे. 'कलाभुवन' या संस्थेने उत्तम ठसे करून दिले त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

आनंद मुद्रणालयातील सेवकवर्गाने दिलेल्या सहकार्याबद्दलही मी मनापासून आभारी आहे.

ज्या वाचकांनी यापूर्वीची आमची प्रकाशने वाचून आम्हांला पत्रद्वारे वा समक्ष द्रव्यद्वारे व सहानुभूतीने प्रोत्साहित केले त्या सर्वांचे ऋणही या प्रकाशनामागे उभे आहे व त्याबद्दल आमच्या हितचिंतक—वाचक—स्नेह्यांचे मी आभार मानतो.

श्री 'आत्मानंद' यांना परमेश्वराने निकोप आरोग्य व दीर्घायुष्य द्यावे व हा ग्रंथ त्यांचा शेवटचाच न ठरावा अशी प्रार्थना करतो.

श्रीगणेशचतुर्थी
२४।८।७१

वाचकांचा नम्र
शान्ताराम आठवले

अनुक्रमणिका

अनुक्रम	विषय	पान
१	प्राक्कथन	१
२	भगवा शर्विलक	३
३	अंतारिचे	७
४	हे आहे तरी काय ?	१८
५	मृत्यू व नंतर	३१
६	भविष्यकालीन घटना व त्यांचे ज्ञान	६७
७	प्लँचेट	१०३
८	मध्यस्थ	१०७
९	दिव्यदृष्टी Clairvoyance	१२१
१०	दिव्यश्रवण Clairaudience	१३७
११	Psychometry	१४०
१२	आत्मप्रक्षेपण	१५३
१३	टेलेपथी Telepathy	१७१
१४	उदकशोध Daswsing Water-finding	१७६
१५	Phrenology	१७९
१६	व्याधिविमोचन (Healing)	१८७
१७	योगशास्त्र	२६३
१८	मंत्रतंत्र व यंत्र	२८८
१९	उडत्या तबकड्या	३११
२०	सत्यसृष्टीतील अनाकलनीय हकीकती	३३२
२१	स्पिरिट-गाईड्स	३७०
२२	उपसंहार	३७९
२३	पुरवणी	३९३
२४	संदर्भसाहित्य	३९८
	सूची	४०३

* * *



डॉ. चेपमन व डॉ. लँग

CamScanner



दिव्यसृष्टीसाठी स्फटिक



प्लँचेट

CamScanner

सहस्रदलकमल अथवा ब्रम्हरंध्र


विसर्ग पवम शिव
पूर्णचंद्र



अंतराळयान व देऊळ

SELF ESTEEM
VENERATION
CONTINUITY
APPROBATIVENESS
CONSCIENTIOUSNESS
HOPE
SUBLIMITY
IDEALITY
CAUTIOUSNESS
INHABITIVENESS
FRIENDSHIP
SECRETIVENESS
ACQUISITIVENESS
TIME
MEMORY
TUNE
COMBATIVENESS
DESTRUCTIVENESS
ALIMENTIVENESS
CONJUGAL LOVE
PHILOPROGENITIVENESS
VITATIVENESS
AMATIVENESS
20
16
21
19
18
17
15
25
14
29
30
23
24
13
6
27
26
31
12
33
22
11
12
5
4
35
41
9
8
36
10
3
7
2
1

मानवाच्या मस्तकाची चित्रे



सहस्त्रदलपद्म
शून्यचक्र
द्विदलपद्म
आज्ञाख्यचक्र
षोडशदलपद्म
विशुद्धाख्यचक्र
द्वादशदलपद्म
अनाहतचक्र
दशदलपद्म
मणिपूरकचक्र
षट्दलपद्म
स्वाधिष्ठानचक्र
चतुर्दलपद्म
आधारचक्र

चक्रदर्शन



वँ
अष्टकोण शूल
लँकार बीज पृथिवि
अष्टकोण शूल
ब्रह्मा
डाकिनी
त्रिकोणयंत्र
कुंडलिनी
महाप्रकृति
स्वयंभूलिंग
ऐरावतहस्ती
सँ
शँ
कुन्तला
लालस्वामिनी
षँ

मूलाधार चक्र


वँ
लँ
भँ
रँ
मँ
यँ
बँकार बीज वरुण
विष्णु
राकिणीदेवी
मकर
इवन्तिका

स्वाधिष्ठान चक्र


तारा
तारका
अतीता
माधवी
तारा
तारका
डँ
ढँ
णँ
तँ
थँ
दँ
धँ
नँ
पँ
फँ
रँकार बीज अग्नि
स्वस्तिक
लाकिनी
रुद्र
शुक्रा
शुक्ता
विजोलिका

मणिपूर चक्र


आज्ञाचक्र
(अर्थात्)
द्विदलपद्म
MEDULLA.
१ सुषुम्ना
२ वज्री
३ चित्रिणी
४ ब्रम्हनाडी
१
२
३
४
१
२
३
४
अनाटमी के अनुसार चक्र का स्थान
अर्धचंद्र
अर्धांगशिव
हाकिनी
लिङ्ग
इतराख्य
ॐ कार प्रणव
हं
क्षं
गांधारी
हस्तिजिंव्ह

			ध्यानफल
नाम - आज्ञाचक्र स्थान - भूमध्य दल - द्विदल वर्ण - श्वेत	दलों के अक्षर - ह, क्ष नामतत्त्व - महत्तत्त्व तत्त्वबीन - ॐ बीजकावाहन - नाद	देव - लिङ्ग देवशक्ति - हाकिनी यंत्र - लिङ्गाकार लोक - तपः	वाक्य सिद्धिप्राप्त होती है। अंग्रेजीनाम इन नाडियोंके संमूह का जो इन चक्रों से सम्बन्ध रखती है। MEDULLA.

आज्ञाचक्र


कँ
खँ
गँ
घँ
ङँ
चँ
छँ
जँ
झँ
ञँ
टँ
ठँ
षट्कोणयन्त्र
मृग
वृंदा
शारदा
नीला
पीता

अनाहतचक्र


अ
आ
इ
ई
उ
ऊ
ऋ
ॠ
ऌ
ॡ
ए
ऐ
ओ
औ
अं
अः
हँकारबीज
आकाश
पूर्णचन्द्र
सदाशिव
शाकिनी
हस्ती
कुमारिका
एशमारिका
मात्रिका
तित्का
बाला
सरस्वती
अमृता
श्रीरवती
शिवा
सीता

विशुद्धीचक्र

१. प्राक्कथन

यापूर्वी ‘अमृत–तुषार’ व ‘वैतरणेच्या ऐलतिरी’ अशा दोन ग्रंथांचे लिखाण प्रस्तुत लेखकाने केले आहे. त्याचे वाचक वर्गाने केलेले स्वागत पाहून या नवीन विषयावर लिहावे असे ठरविले.

‘वैतरणेच्या ऐलतिरी’ या ग्रंथात साधारणपणे मानवी ज्ञानाच्या मर्यादा कोठपर्यंत आहेत व त्या मर्यादेच्या आत त्यातल्या त्यात अध्यात्म क्षेत्रात वैज्ञानिक मर्यादा सांभाळून सर्वसाधारणपणे सर्व धर्म व पंथांच्या मंडळींना पटेल व त्यांच्या बुद्धीस फारसा ताण न देता सर्व विषय सहज आकलन होईल या पद्धतीने विषयाची मांडणी केलेली आहे.

‘वैतरणेच्या ऐलतिरी’ या पुस्तकात, अध्यात्म क्षेत्रात साधारणपणे सामान्य जनास आकलन होईल असे अद्यापपर्यंत आपण किती व काय संपादन केले आहे व त्याच्यापलीकडे ज्ञानसागर सर्वत्र पसरलेला असूनही मानवास शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यापेक्षा पलीकडील ज्ञानसंपादन करण्याचे साधनच नसल्याने, त्यासंबंधी ज्ञानसंपादन करण्यास आपण कसे असमर्थ आहोत, इतकेच नाही तर ज्या क्षेत्रात ज्ञानसंपादन करण्याची आपणास पात्रता व शक्यता आहे त्यातही त्या मानाने आपण अद्याप किती अल्प प्रगती केली आहे याचे दिग्दर्शन केलेले आहे.

आपल्या दैनंदिन व्यवहारात आपल्या अनुभवास येणाऱ्या गोष्टींपेक्षा निराळ्याच अशा ज्या कित्येक गोष्टी कधी कधी दृष्टोत्पत्तीस येतात, अनुभवास येतात, परंतु त्या कशा झाल्या असाव्यात, अगर त्या कशा घडत असाव्यात याचे आपणास पुष्कळ विचार केल्यानंतरही आकलन होत नाही; पुष्कळ प्रयत्न करूनही निदान आजपर्यंत आकलन झालेले नाही. परंतु त्याचे आकलन होऊन, त्याचे वैज्ञानिक स्पष्टीकरण मिळाले तर मानव जातीच्या कल्याणाच्या दृष्टीने पाऊल पुष्कळ पुढे पडेल अशा बाबींचा उल्लेख या ग्रंथात केलेला आहे. या सर्व बाबी आजच्या मानवी ज्ञानाच्या कक्षेबाहेरील आहेत. परंतु कक्षेबाहेर असल्या तरी त्या ज्ञात बाबींच्या फारशा दूर नसून, पुष्कळ वेळा अज्ञात क्षेत्रातून ज्ञात क्षेत्रात प्रवेश करून आपले अस्तित्व मानवास जाणवून देतात व त्यामुळे मानवाची त्याविषयीची उत्सुकता जागृत होते. हे अज्ञात काय व कसे असावे व मानवी प्रयत्नाने ते घडवून आणण्याचा प्रयत्न केला तर तसे होऊ शकेल काय, व प्रत्यक्षात अशा गोष्टी घडवून आणता येतील की कसे, याबद्दल विचार मनात येऊ लागतात. जगाच्या काही भागात तत्संबंधी यापूर्वीच प्रयत्न सुरू झालेले आहेत. दुर्दैवाने हे सर्व विषय आपल्या देशात निदान अद्याप तरी अज्ञातच आहेत; मग प्रयत्न तर लांबच राहिले. हे सर्व विषय मानवी ज्ञानकक्षेच्या थोडे पलीकडील असल्याने, त्यांचे वैज्ञानिक स्पष्टीकरण अद्याप होऊ शकले नसले तरी ते त्या कक्षेच्या फारसे अंतरावर

नसल्याने तसे स्पष्टीकरण मिळू शकणारच नाही असे नाही. तरी तत्पूर्वी अशा बाबी कोणकोणत्या आहेत; तत्संबंधी आपणास काय काय अनुभव आले आहेत व त्यांचे स्पष्टीकरण काय असावे अगर असण्याचा संभव आहे, याचे विवेचन या ग्रंथात करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ग्रंथकाराने केलेले स्पष्टीकरण बरोबरच असेल असा त्याचा दावा नाही. त्यास याबद्दल काय वाटते, व त्या दिशेने विचार करून खरे स्पष्टीकरण मिळवण्यास फक्त थोडे मार्गदर्शन एवढाच या विवेचनाचा उपयोग समजावा. ते लेखकाचे अंतिम मत नव्हे व खरे व विज्ञानास पटेल असे स्पष्टीकरण तर नव्हेच नव्हे. अनेक स्पष्टीकरणांपैकी एक संभाव्य स्पष्टीकरण इतकीच किंमत देऊन प्रत्येक वाचकाने स्वतंत्र विचार करावा व Reasonning ला पटणारे व वैज्ञानिक क्षेत्रात बसणारे असे स्पष्टीकरण सापडल्यास त्यास जरूर प्रसिद्धी दिल्यास मानवी ज्ञानप्रगतीस हातभार लावण्याचे श्रेय मिळेल.

याचप्रमाणे अज्ञाताचा शोध घेताना जर असे काही आढळले की त्यापासून मानवास उपसर्ग अथवा त्रास पोचत आहे, तर तो निवारण्याकरता काय केले पाहिजे अथवा त्यापासून मानवाच्या ज्ञानात भर पडून बहुजनसमाजाचे कल्याण होण्यासारखे असेल तर जास्तीत जास्त फायदा कसा करून घेता येईल हेही सांगण्याचा लेखकाने यथामती प्रयत्न केला आहे. असा काही प्रयत्न न करता, निव्वळ काय काय आहे अगर असावे असे निवेदन केले तर, फार तर वाचकांच्या ज्ञानात थोडीशी भर पडेल इतकेच. त्याचा प्रत्यक्ष फायदा असा काहीच होणार नाही. याकरता ‘ बोध ’ हा शब्द ग्रंथाच्या नावात सामील केला आहे. बोध याचा अर्थ एवढाच की, त्या शोधात जे मानवास हानिकारक किंवा त्रासदायक असे आढळेल ते टाळावयाचे कसे व जे उपयुक्त असेल त्याचा जास्तीत जास्त उपयोग योग्य रीतीने कसा करून घ्यावयाचा याबद्दलच्या विचारांना योग्य दिशा मिळविणे.

卐 卐 卐

२. भगवा शर्विलक

वरील शीर्षक वाचून वाचकांस साहजिकच असे वाटेल की, निदान भगवा हा शब्द माझ्या कपड्यांस अनुलक्षून आहे. असा गैरसमज होऊ नये. लेखक म्हणून माझे टोपण नाव आत्मानंद असले, तरी मी कोणी साधू संन्यासी नसून एक साधा संसारी साधक आहे हे मी यापूर्वीच स्पष्ट केले आहे व आता पण करीत आहे. माझे कपडे इतर सांसरिक व्यक्तींप्रमाणेच आहेत.

भगवा हा रंग व शब्दसुद्धा पावित्र्य व त्याग याचा निदर्शक आहे व शर्विलक याचा अर्थ प्रसिद्धच आहे. या दोहोंचा समन्वय जरा चमत्कारिक व परस्परविरोधी दिसतो. असे असले तरी ही वस्तुस्थिती असून हा समन्वय अन्वर्थक आहे.

याबाबत तपशिलात शिरण्यापूर्वी यास समर्थक अशी एक सत्य घटना माझ्या स्मरणांत आली आहे, तिचा निर्देश करावासा वाटतो.

विशिष्टाद्वैताचे प्रवर्तक श्रीमत् रामानुजाचार्य यांनी बालपणापासून स्वतः अध्यात्म्यास वाहून घेतले होते; किंवा त्यांची मूळ प्रवृत्तीच आध्यात्मिक होती, हे म्हणणे जास्त संयुक्तिक होईल. त्यांचे वय सुमारे सोळा सतरा वर्षांचे असेल, त्यावेळी त्यांची एका महान् साक्षात्कारी पुरुषाशी गाठ पडली व त्यांना असे कळले की, त्या महात्म्याजवळ एक प्रत्यक्ष सिद्ध असा महामंत्र आहे. परंतु तो मंत्र त्यांच्या सर्व परीक्षांस जो कोणी उतरेल अशासच ते देतात. श्री रामानुचार्य हे योग्यच होते परंतु अद्याप त्यांच्या परीक्षेस पुरते उतरले नव्हते. त्या महात्म्याने तो मंत्र आपल्यास प्रदान करावा म्हणून त्यांनी पुष्कळ प्रयत्न केला. त्या सद्‌गुरूंनी पण कठिणात कठीण अशा पुष्कळ परीक्षा घेतल्या व त्या सर्वांत उत्तीर्ण झाल्यावर, व हा काही झाले तरी आपला पिच्छा सोडीत नाही असे पाहिल्यावर, त्याची तळमळ, चिकाटी व योग्यता पाहून एका शुभ मुहूर्तावर त्या महामंत्राची दीक्षा घेण्यास त्याला बोलाविले. दीक्षा देताना गुरूंनी त्याच्याकडून अशी शपथ घेवविली की, ते हा मंत्र अत्यंत गुप्त ठेवतील व त्याची कोठेही वाच्यता करणार नाहीत. इतकेही करून जर त्यांनी कधी काळी ही शपथ मोडली तर त्यांना अनंतकाळ नरकयातना भोगाव्या लागतील. या सर्व गोष्टी मान्य करून व त्याप्रमाणे शपथ घेऊन त्यांनी तो मंत्र ग्रहण केला. ते स्वतः अधिकारी पुरुषच असल्याने थोड्याच काळात त्या मंत्राच्या प्रभावाचा त्याना अनुभव आला.

असला जगदोद्धारक महामंत्र सामान्य जनतेपासून—तिला त्याचे लाभापासून वंचित ठेवून—गुप्त ठेवणे त्यांच्या जन्मजात प्रवृत्तीस मानवण्यासारखे नव्हते. म्हणून त्यांनी शहरातून रस्तोरस्ती हिंडून घोषणा केल्या की—“ सज्जनहो, मला असा एक महामंत्र मिळाला आहे की ज्याच्या विधियुक्त जपाने इह-परलोकी तर कल्याण होतेच

CS CamScanner

परंतु सर्व प्रापंचिक व शारीरिक संकटे दूर होऊन संसार सुखाचा होतो व मरणोत्तर माणूस विष्णुलोकी जातो. तरी उद्या सकाळी गावाजवळील मैदानात जे हजर राहतील त्या सर्वांना त्याची माहिती करून देण्यात येईल.'' त्यांच्यावर सर्व शहरवासीयांचा फार विश्वास असल्याने दुसऱ्या दिवशी नियोजित ठिकाणी हजारोंच्या संख्येने लोक जमले व त्या सर्वांत रामानुजाचार्यांनी तो महामंत्र व त्याचे विधान सविस्तर निवेदन केले. त्या मंत्राचे ग्रहण करून सर्व लोक त्यांचा जयजयकार करीत घरोघर निघून गेले.

लवकरच त्यांच्या सद्‌गुरूंना ती हकीगत कळली व त्यांना फार राग आला. त्यांनी श्री रामानुजाचार्यांना बोलावून त्याचा जाब विचारला. त्यावर त्यांनी उत्तर केले की, मी शपथ मोडली ही गोष्ट शंभर टक्के खरी आहे. परंतु त्यायोगे जर हजारो लोक विष्णुलोकी जाण्यास पात्र होणार असतील, तर शपथ मोडल्याचा परिणाम म्हणून मला अनंतकाळपर्यंत नरकयातना भोगावी लागली किंवा यापेक्षाही मोठी शिक्षा भोगावी लागणार असली तरी त्यास माझी तयारी आहे. माझी जर अशा प्रकारची तयारी आहे तर मग सद्‌गुरूंस माझ्यावर रागवण्याचे काय कारण आहे, ते मला कळत नाही.'' हे ऐकताच त्या सद्‌गुरूंस त्यांचा उमज पडला व त्यांनी शिष्यास मोठ्या प्रेमाने मिठी मारली व नंतर त्यांच्या चरणी लागून सांगितले की, आजपासून तुम्ही माझे सद्‌गुरू व मी तुमचा शिष्य.

ही घटना मी केवळ दृष्टांतादाखल घेतली आहे. त्या महान व्यक्तीशी तुलना करून घेण्याचा माझा यत्किंचितही प्रयत्न असल्याचा गैरसमज कोणी करून घेऊ नये. केवळ थोडा सारखेपणा म्हणून लिहिले आहे. त्यांच्या चरणरजांची जरी मला पात्रता लाभली तरी मी स्वतःस धन्य समजेन.

अगदी अल्पांशाने का होईना परंतु थोडेसे या ग्रंथाच्या बाबतीत अपरिहार्यपणे वरील घटनेप्रमाणे होत आहे, या ग्रंथातील कोणतीही हकीकत, घटना अगर गोष्ट ही माझ्यासमोर घडलेली नाही व माझ्या प्रत्यक्ष माहितीतील नाही. वेळोवेळी इंग्रजी मासिके, वर्तमानपत्रे यातून आलेल्या व तद्विषयक ग्रंथातून ज्या अत्यंत विश्वासार्ह व सत्यसृष्टीत घडलेल्या आहेत अशा गोष्टी माझ्या बुद्धीस पटल्या त्यांचे संकलन करून या ग्रंथांतील विषयास धरून जे जे काही मला योग्य वाटले त्याचाच यात उल्लेख केलेला आहे. आमच्या देशातही अशा घटना रोज कित्येक ठिकाणी घडत आहेत; परंतु त्यातील काही अपवादात्मक अशा सुद्धा हकीकती कोणी विश्वासार्ह व्यक्तींनी प्रत्यक्ष जाऊन पाहून घटनास्थळी हजर असलेल्या व्यक्तींच्या सह्या वगैरे घेऊन संकलन करून ठेवलेल्या आढळत नाहींत. मग पुस्तकरूपाने तर नावच नको त्यामुळे या पुस्तकातील सर्व वर्णने, घटना, हकीकती वगैरे मला पाश्चात्य किंवा अमेरिकन मासिके पुस्तके आदीमधून घ्यावी लागणे अपरिहार्य झाले आहे. असे करताना कदाचित ती प्रसिद्ध करणाराची अथवा मासिकांच्या संपादकांची वगैरे परवानगी आवश्यक असेल

तर तशी मी घेतलेली नाही. कारण तसे करण्यास एक तर वेळ व पैसा खूप झाला असता, व इतके करूनही एकाद्याने परवानगी नाकारली असती अगर खूप मोठा मोबदला मागितला असता तर तो देणे मला शक्य झाले नसते, व ज्ञानास मराठी वाचकवर्ग मुकला असता. मला माहीत आहे की त्यांनी सुद्धा त्या घटना किंवा हकीगती स्वतः पाहिलेल्या अथवा अनुभवलेल्या नाहीत. त्यांनीही माझ्यासारखेच संकलन केलेले आहे असे असूनही काही कायदेशीर जबाबदारी माझ्यावर पडलीच तर ती पत्करावयाचे ठरवून, मी हे मराठी वाङ्मयात आजवर प्रसिद्ध न झालेले असे ज्ञान व माहिती मराठी वाचक वर्गास सुपूर्त करीत आहे. मात्र, याचा कोणी असा अर्थ घेऊ नये की मी वाङ्मयचौर्य केले आहे. तत्त्वविचार व तात्त्विक चर्चा हा जो अत्यंत महत्त्वाचा भाग आहे तो कोणत्याही पुस्तकातून अथवा मासिकातून घेतलेला नाही. फक्त त्यास पुष्ट्यर्थ अशी उदाहरणे व हकीकती, की ज्यासंबंधी संकलने आपल्याकडे झालेली नाहीत ती मला इतर पुस्तकांतून घ्यावी लागली आहेत, व त्याबद्दल कोणी काही करू शकेल, असे वाटत नाही. या माहितीचा वाचकांनी सदुपयोग करून निदान या विषयास योग्य अशी चालना दिली तरी मी जे काही करीत आहे त्याचा उद्देश सफल झाला असे समजेन. कदाचित् हक्कभंगाची कारवाई कोणी करण्याचे ठरवलेच तर त्यास माझ्या हल्लीच्या वयाचा व प्रकृतीचा विचार करावा लागेल. बहुतकरून नोटीस लकडीपुल किंवा ओंकारेश्वर या पत्त्यावरच काढावी लागेल. नुकसान भरपाईचा प्रश्नच उदभवत नाही. कारण मी यातून स्वतःकरता असे उत्पन्न काहीच घेत नाही. असे करण्यात मी कदाचित कायद्याचे उल्लंघन करीत असलो तर ते स्वार्थाकरता नसून सद्हेतूने व माझ्या स्वतःचे संपूर्ण जबाबदारीवर करीत आहे व त्यात मी काही वाईट करीत आहे असे मला वाटत नाही. ही एकप्रकारची शर्विलकीच आहे, हे मला मान्य आहे. परंतु त्यात माझा उद्देश पैसा किंवा कीर्ती मिळवण्याचा नाही याची जाणीव ठेवून, वाचकवर्ग या विषयास चालना देऊन माझा उद्देश सिद्धीस नेईल अशी अपेक्षा करतो; व तसे काही अंशी जरी प्रत्यक्षात घडले तरी मी पत्करलेल्या जबाबदारीचे श्रेय मला मिळाले असे मी समजेन.

या संदर्भात मला आणखी एक गोष्ट सांगून ठेवणे इष्ट वाटते व ती ही की ग्रंथात पहिल्या प्रकरणापासून अखेरपर्यंत ज्या ज्या काही घटना, हकीकती, वर्णने गोष्टी, प्रसंग वगैरे नमूद केलेले आहेत ते कितीही अविश्वसनीय वाटले तरी ते सत्यसृष्टीत घडलेले आहेत व त्या प्रत्येकाबद्दल मज जवळ अत्यंत विश्वसनीय असा पुरावा आहे व तो कोणासही केव्हाही पडताळून पाहता येईल. तरी त्या घटना वाचून झाल्यावर हे कसे शक्य आहे, ही घटना घडलीच नसेल वगैरेवर विचार करण्यात वेळ न घालविता, घडली आहे. हे गृहीत धरून ती कशी व कोणत्या कारणांनी घडली असावी, त्यास वैज्ञानिक बुद्धीस व विचारपरंपरेस (Reasoning) पटेल असे काही सुचविता येईल की कसे याबद्दल खोल विचार करून त्यावर काही विज्ञानमय

असा प्रकाश पाडता येईल की कसे याचा बिचार करावा व शक्य झाले तर तसे प्रसिद्ध करावे. नाहीतर अज्ञात म्हणून म्हटले आहेच. या हकीकती, घटना, यांच्या संबंधात मी काही ठिकाणी, त्यासंबंधी मला काय वाटते ते नमूद केले आहे. परंतु ते सुद्धा अखेरचे समजू नये, कारण काही झाले तरी हा अज्ञाताचाच शोध आहे. थोडेसे अंधागत चाचपणे असेच आहे. त्यात काही बरोबर असेल तर काही चुकीचे पण असेल, चुकीचेच असण्याचा संभव जास्त; तरी पण त्याचा उपयोग विचार करण्याची एक दिशा असा केला तरी चालेल.

आणखी एक सांगावयाचे म्हणजे या ग्रंथाचा वाचकवर्ग बहुतेक इंग्रजी जाणणारा असेल असे मी गृहीत धरून चालतो. म्हणून इंग्रजी शब्दांचे मराठीत भाषांतर वगैरे न करता ते जसेच्या तसेच वापरले आहेत. कारण पुष्कळ वेळा तद्विषयक शब्द मराठी भाषेतच नाहीत. त्यामुळे तसा प्रयत्न केला तर ते जास्त दुर्बोध होईल असे वाटल्यावरून हा निर्णय घेतला आहे. तरी शक्य तेथे मराठी प्रतिशब्द देण्याचा प्रयत्न केला आहे.

आणखी एक विनंती आहे की हे पुस्तक निव्वळ करमणुकीकरता म्हणून वाचू नये. यातील प्रत्येक हकीकत, घटना या सर्वांवर ‘स्वतंत्र’ बुद्धीने विचार करून त्याबद्दल काही तर्क-सुसंगत असे काही कारण अथवा कारणपरंपरा सांगता येते की कसे ते पाहावे व त्या किंवा तसल्या घटनांपासून व्यक्ती अगर समाज यांच्या हिताकरता काय करता येईल, याचाही विचार करावा. निव्वळ फुरसदीचे वेळी करमणूक म्हणून वाचून टाकून दिले असे होऊ नये.

* * *

३. अंतरीचे

माझ्या काही सन्मित्रांच्या प्रोत्साहनाने व सहाय्याने मी ‘ अमृत–तुषार ’ व ‘ वैतरणेच्या ऐलतिरी ’ असे दोन ग्रंथ लिहून प्रसिद्ध करू शकलो. त्याचे वाचकवर्गाने केलेले स्वागत पाहून आणि मी आणखी काही मौलिक असे लिहावे असे बऱ्याच सुहृद स्नेही–वाचक वर्गाकडून प्रोत्साहन मिळाल्यावरून शक्य झाले तर आणखी एखादा ग्रंथ लिहावा असे योजिले. वयमानाकडे (७० पूर्ण) पाहता हा ग्रंथ पूर्ण होऊ शकेल असे वाटत नव्हते. परंतु भगवदेच्छा असली तर ग्रंथ पूर्ण होऊ शकेल अशी अपेक्षा करून प्रयत्न करून पाहण्यास हरकत नाहीं असे ठरवून लेखनास सुरुवात केली.

‘ वैतरणेच्या ऐलतिरी ’ या ग्रंथात मानवी जीवनात बाल्यापासून वृद्धावस्थेपर्यंत आयुष्यात साधारणपणे कोणत्या वयात काय काय अडचणी येतात, कशाकशास तोंड द्यावे लागते व त्याकरता प्रथमपासून कशी काळजी घेतली तर त्यातून पार पडून सुखी जीवन कसे जगता येईल यासंबंधी सर्वसाधारण चर्चा प्रथम भागात केली आहे. दुसऱ्या भागात शरीराच्या, तसेच मानवी मनाच्या व ज्ञानाच्या मर्यादा कोठपर्यंत आहेत व असू शकतील याचे विवेचन केले आहे, विशेषतः अध्यात्मक्षेत्रात मानवाने आजपर्यंत किती व कशी प्रगती केली आहे व कोणत्या मर्यादेपर्यंत तो ती करू शकेल याचेविवेचन केले आहे. ईश्वरी तत्व मानवी मनास किती अगम्य आहे, त्या मानाने मानव व मानवी ज्ञान किती तोकडे आहे याचे विवेचन सापडेल. त्याच्या पलीकडे खाली वर सर्व बाजूंस अत्यंत विस्तीर्ण व मानवी मनास व कल्पनेस सदैव अगम्य अशा अनेक शाखा उपशाखांनी अनंत कोटी अज्ञात विश्वे पसरली आहेत. ईश्वरेच्छेने मानवास मिणमिणती अशी लहानशी ज्ञानशलाका उपलब्ध झालेली आहे व तिच्या प्रकाशात आपणास प्रत्यक्ष अगर ज्ञानचक्षूने दिसू शकते, तेवढेच आपले ज्ञान. त्यापलीकडे–निदान आपणापुरते–सर्व दशादिशांस अनंत असा अज्ञानाचा अंधारच अंधार ! शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध ही पाचच आपणास ज्ञान उपलब्ध करून देणारी साधने आहेत. आपला लहानसा मेंदू या साधनाद्वारे जे काही ग्रहण करू शकेल त्याचेच फक्त ज्ञान आपणास होऊ शकते व शकेल. एवढ्या लहानशा क्षेत्रात सुद्धा आपण फारच थोडी प्रगती केली असून, ज्ञानसाधनेस त्यात अजून कितीतरी प्रचंड वाव आहे. या पाचांनी जे काय ज्ञान उपलब्ध होऊ शकेल त्याच्या लक्षांशानेही आपण अद्याप प्राप्त करून घेतलेले नाही. या पाचाखेरीच लाखो, कोट्यवधी प्रकारच्या ज्ञानाच्या शाखा-उपशाखा अस्तित्वात असू शकतील. परंतु त्यासंबंधी ज्ञान उपलब्ध करून घेण्याची साधनेच आपल्यापाशी नसल्याने त्या बाबतीत आपण काहीच करू शकत नाही. वारुळातील मुंगीस अथवा कूपातील मंडुकास ते त्यात आहेत तोपर्यंत बाहेरील जगाचे काहीच ज्ञान होणे शक्य नसते. ता. २२ जुलै १९६९रोजी नील आर्म-

स्ट्राँग याने चंद्रावर पदार्पण केले. त्यावेळी-कल्पना करू या की अनंत अवकाशातील एखाद्या ताऱ्यावरील एखादा असाच प्रवासी त्यास भेटला व त्याने तुम्ही कोण कोठून आला वगैरे चौकशी केली तर साहाजिकच आपल्या पृथ्वीवरील मानव नील सांगेल की, "मी पृथ्वी नावाच्या ग्रहावरून येथे आलो असून तो येथून दोन लक्ष चाळीस हजार मैल लांब आहे. आमची पृथ्वी वीस कोटी चौरस मैलांचा असा एक प्रचंड गोल असून पाचशे कोटी वर्षांपासून अस्तित्वात आहे. त्यावर महान समुद्र, नद्या, पर्वत, वगैरे असून ज्ञानक्षेत्रात अत्यंत प्रगत अशा मानवाची त्यावर वस्ती आहे. आजपर्यंत अलेक्झांडर, सीझर, नेपोलियन, हिटलरसारखे झुंजार योद्धे, तसेच त्यावर बुद्ध, ख्रिस्त, कृष्ण, राम, महंमद असे अनेक ज्ञानसंपन्न पुरुष होऊन गेले व होत आहेत. तीवर अमेरिका, रशिया, भारत, चीन आदि अनेक प्रगत देश असून मी त्याचाच एक नागरिक आहे. त्या देशाने शास्त्रीय ज्ञानात सर्वांवर आघाडी मारली असून त्याचाच एक नागरिक असा मी आज चंद्रावर पाय ठेवीत आहे. आजपर्यंत लागलेल्या महान शोधातील प्रगती-त्याचा अगदी शेवटचा टप्पा आज आम्ही गाठला असून, लवकरच इतर ग्रह व तारे यावर जाण्याचा विचार करीत आहोत." साहाजिकच चकित होऊन त्या दुसऱ्या प्रवाशाने म्हटले, "हे सर्व ठीक आहे; परंतु तू एवढे करतोस ती तुझी पृथ्वी व तुझा देश कोठे आहे ते दाखव." त्यावर तो अमेरिकन वैमानिक बाहेर डोकावून डोक्यावरील विस्तृत तारांगणाकडे पाहून पृथ्वीचा शोध घेऊ लागला. त्यावेळी त्यास एका टेनिस चेंडूपेक्षा थोडा मोठा असा एक गोल दिसला व तो पहा आमचा पृथ्वी नावाचा ग्रह म्हणून त्यास दाखवू लागला. अर्थात त्यावर त्यास त्याचा अमेरिका देश दाखविणे शक्यच नव्हते. साहजिकच तो तारांगणांतील प्रवासी हसला, व म्हणाला की, "हीच काय तुझी ती महान विस्तृत अशी पृथ्वी ? अरे हे तर केवळ दोन लक्षच मैलांचे अंतर आहे. कोट्यावधी मैलावरून याचे आस्तित्व तरी कळू शकेल काय ?" आमच्या एवढ्या प्रचंड समजल्या जाणाऱ्या पृथ्वीचीच जेथे ही दशा तेथे क्षुद्र अशा मानवाची काय थोरवी ! हे सर्व सांगण्यांत माझा उद्देश अमेरिकन वैज्ञानिकांनीं लावलेल्या शोधांचा अगर त्यांच्या वैमानिकांनी केलेल्या अप्रतिम साहसाचा, त्यागाचा अगर त्यांच्या ज्ञानाचा कमीपणा लेखण्याचा नाही. ते केव्हाही अत्यंत गौरवास पात्र आहेत व त्यांच्याशी आमच्या नुसत्या लेखणी बहाद्दरांची कोणत्याही प्रकारे तुलना करणे हास्यास्पद ठरेल फक्त उपलब्ध ज्ञान किती तोकडे व तुलनेने अल्प आहे हे दाखवण्याचा माझा उद्देश आहे.

आपणास ज्ञान मिळवण्याचे व साठवण्याचे साधन म्हणजे आपला मेंदू. पूर्ण वाढ झालेल्या वानराचा मेंदू व नवजात बालकाचा मेंदू हे सारखेच असतात. मानव हा उत्क्रांति सोपानावर वानराच्यावर फक्त एक पायरी आहे. त्यामुळे लहान मूल प्रौढ झाले म्हणजे त्याची ज्ञान मिळवण्याची शक्ती पण त्याच्या मानाने वाढेल. अनंतपटीने नाही. वानरापेक्षा मुलांची बुद्धी थोडी अधिक आहे. परंतु आमची दृष्टीच आकुंचित म्हणून

आपणास हे अंतर फार मोठे वाटते. परंतु जे मिळविले आहे ते, जे मिळविणे आहे त्याच्या तुलनेने अत्यंत क्षुद्र व उपेक्षणीय आहे इतकेच.

ज्यावेळी मानवी ज्ञानाची परिसीमा होते व बुद्धीची गती खुंटते त्यावेळी अशा काही घटना अनुभवास येतात की त्या मानवी ज्ञानाच्या अगर बुद्धीच्या कक्षेत येत नाहीत. त्यांची कारणपरंपरा पुष्कळ विचार करूनही लक्षात येत नाही. घटना तर घडत असतात. अनुभवास येत असतात. अशावेळी साहजिकच प्रश्न पडतो की हे काय व कसे असावे, कसे घडत असावे. त्या घटना उपद्रवकारक नसून उपकारक असल्या तर त्या आपणास मानवी प्रयत्नाने घडवून आणता येतील काय ? त्या तशा घडवून आणणे आपणास शक्य होईल की कसे याचा विचार पडतो. कारण निदान आज तरी त्या कशा घडून येतात वगैरेचे सम्यक् ज्ञान मानवास नसते, व प्रयत्न करूनही त्यांची कारणपरंपरा मानव सांगू शकत नाही. अशा शेकडो हजारो घटना घडलेल्या आहेत, घडत आहेत व घडत राहणार आहेत. त्या काय मानवी ज्ञानास सदैव अगम्यच राहतील काय हा मानवी मनास पडलेला पेच आहे.

अगदी किट्ट काळोखात आपण एक पेटवलेली मेणबत्ती नेऊन ठेवली तर तिच्या प्रकाशात जेवढे आपणास दिसू शकेल त्याचे फक्त ज्ञान आपणास होऊ शकेल. बाकी सर्व कितीही असले तरी ते सर्व, निदान आपणापुरते संपूर्ण अंधारात म्हणजे अज्ञात. अगदी त्याचप्रमाणे ईश्वराने मानवास या ज्ञानमहोदधीतील काही अल्पसा भाग आपल्या दृष्टिपथात यावा म्हणून एक क्षीण प्रकाशकिरण (ज्ञानशलाका) प्रदान केला आहे. त्यातून आपणास जे काही दृष्टिपथात येईल अगर येऊ शकेल तेंच आपले ज्ञानक्षेत्र. बाकीचे सर्व अज्ञात

या ठिकाणी थोडा अतिव्याप्तीचा दोष पत्करून सुद्धा सांगावेसे वाटते की, मानवाच्या प्रगतीत जी काही वेळोवेळी भर पडत गेली आहे, तिच्यातील बहुतांश भाग मानवाच्या स्वतःच्या ज्ञानकक्षेपलीकडील बाहेरून मिळालेल्या मदतीनेच पडत गेली आहे. कोणत्याही क्रांतिकारक विज्ञानाविषयक शोधाचा इतिहास पाहिला तर असे आढळून येईल की त्यासंबंधी त्याच वेळी त्या प्रकारच्या ज्ञानक्षेत्रांत प्रगत असलेल्या निरनिराळ्या व्यक्तींच्या डोक्यात त्यासंबंधीच विचारप्रवाह सुरू होते एकाच वेळी त्यांनी स्वतंत्रपणे एकमेकाशी यत्किंचितही संपर्क नसताही निरनिराळी टिपणें केली होती व ती एकमेकांचे टिपणाशी मिळती जुळती होती. ते एकमेकांपासून शेकडो मैल अंतरावर असूनही त्यांच्या विचारप्रवाहात विलक्षण साम्य नजरेस येत गेले. ते इतके की त्रयस्थ माणसास ते नक्कीच एकाजवळून दुसऱ्याने घेतले पाहिजे, असा संशय यावा. यासंबंधी पुष्कळ उदाहरणे ‘ Living Past ’ या पुस्तकांत तपशीलवार दिलेली आहेत. ती वाचकांनी मुळातूनच पाहावीत. यावरून या अनुमानास बळकटी येते की तत्संबंधी त्या त्या काळी कोणीतरी अन्य ग्रह अगर

ताऱ्यावरील वैज्ञानिक पृथ्वीवरील वातावरणांत तद्विषयक विचारप्रवाह सोडून दिले व पृथ्वीवरील वैज्ञानिकांनी ज्यांचा त्या विषयावर अभ्यास होता अगर त्याबद्दल जे प्रयोग करीत होते अगर विचार करीत होते व त्यात ज्यांनी विशेष प्रगती केली होती, त्यांनी ते अज्ञात विचारप्रवाह ग्रहण केले व नंतर सुसंगत अशी मांडणी करून जगापुढे ठेवली. त्यांत ज्याने ते सर्वांअगोदर विशेष सुसंगत व परिणामकारक रीतीने सप्रयोग जगापुढे मांडले त्यास त्याचा संशोधक म्हणून श्रेय मिळाले व त्याच्या नावावर शोध नमूद झाला व बाकीचे मागे पडले व अज्ञात राहिले. याचा उघड अर्थ असा की, तथाकथित व्यक्तीकडून ते शोध लागलेले नसून त्यांच्याकडून ते लावले गेले व त्यास ही मंडळी फक्त कारणीभूत (Instrument) झाली इतकेच. अगदी छापण्याची कला, न्युटनचा सिद्धांत, गॅलिलीओ, कोपर्निकस-आइन्स्टीन-डार्विन आदि वैज्ञानिकांचे शोध, तसेच उत्क्रांतिवाद-रुधिराभिसरण, वायरलेस, ॲटम इत्यादि सर्व शोधांच्या बाबतीत अगदी आढळून येते.

याहीपुढे जाऊन काही शास्त्रज्ञांचे असे म्हणणे आहे की, आपल्या पृथ्वीवरील सर्व संस्कृती व तिची प्रगती ही परग्रह अथवा अंतराळातील ताऱ्यावरून येथे वेळोवेळी येऊन गेलेल्या व्यक्तींकडून अथवा त्यांच्या प्रेरणेने झालेली आहे व होत आहे. आमची पृथ्वी ही सूर्याबरोबर इतर ग्रहमालेसह आकाशगंगेत सतत परिभ्रमण करीत आहे; त्यावेळी तिच्या आसपास असलेल्या काही ताऱ्यांवरून अगर ईश्वरी प्रेरणेने अन्य गोलांवरून अत्यंत प्रगत अशा काही व्यक्ती वेळोवेळी आपल्या पृथ्वीवर येऊन गेल्या व त्यांनी आपणांस सांस्कृतिक व वैज्ञानिक मार्गदर्शन केले व त्यास अनुसरून आजही आपला प्रगतिपथ सुरू आहे. त्यांच्या भेटीचा काळ कदाचित दर ५००० किंवा २५००० वर्षांचा सुद्धा असू शकेल; तो आपणास फार वाटला तरी पृथ्वीच्या आजवरच्या ५०० कोटी वर्षांच्या अस्तित्वाच्या मानाने हा काळ काहीच नाही. आपली ज्ञात संस्कृती ही गेल्या पाच सात हजार वर्षांतलीच असल्याने असे केव्हातरी घडले असेल याची कल्पनाही आपणास नाही. परंतु अलीकडे दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या Flying Saucers किंवा अशा काही घटनांनी असे काही घडलेले असणे शक्य आहे असे वाटू लागते. Flying Saucers चा एकंदर इतिहास पाहिला तर माझे तरी असे अनुमान आहे की, ही परक्या गोलावरील मंडळी आपली प्रगती खरोखरच योग्य मार्गाने चालू आहे की कसें याची पाहणी करीत असावी, या अनुमानास बळकटी येण्याचे कारण म्हणजे या उडत्या तबकड्या पृथ्वीवर ॲटमबॉम्बचा प्रयोग झाल्यानंतर जास्त जास्त दिसू लागल्या आहेत. त्यांच्या पाहणीत जर असे आले की मानवापैकी काही विशिष्ट गट आपल्या विज्ञानाचा फायदा घेऊन दुसऱ्या गटास अगर त्याच्या जोरावर त्यावर आपला ताबा ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे, तर कदाचित ही मंडळी अशा मानवांनी काहीं अखेरचा उपाय हाती घेण्यापूर्वी त्यांचा व तत्सम सर्वांचा निकाल लावून टाकणे अशक्य नाही. कारण

निरनिराळ्या देशांच्या सरकारांनी कितीही गौप्य ठेवण्याचा प्रयत्न केला तरी जनतेला हे नक्की कळून चुकले आहे. की या उडत्या तबकड्यास काही इंधन लागत नाही, त्यांच्यावर कोणत्याही शस्त्रांचा परिणाम होत नाही. त्याना गती यावयास वेळ लागत नाही, इतकेच नाही तर त्यांनी गती घेतल्यानंतर काही सेकंदांतच त्या अदृश्य होतात. यावरून त्यांना Dematerialize होऊन कोठेही Rematerialize होऊन प्रकट होण्याची कला साधली आहे. त्यामुळे काल व अवकाश यांचे बंधन राहू शकत नाही. ते कोणत्याही क्षणी कोठेही Dematerialize होऊन इच्छित ठिकाणी काही क्षणांतच Rematerialize होत असले पाहिजेत. यासंबंधी पुष्कळ माहिती उपलब्ध झाली आहे व होत आहे. परंतु ती सविस्तर देण्याचे हे स्थळ नव्हे. म्हणून त्यासंबंधी अगदी थोडक्यात असा निर्देश केला की, ज्यावरून काय चालले आहे त्याची वाचकास कल्पना यावी. आपणच म्हणजे सर्व काही नसून आपणापेक्षा कोणी श्रेष्ठ आहेत व आपण चुकीच्या मार्गाने जाऊ लागलो तर ते आपले नियमन करू शकतील किंवा आपणा सर्वांस नष्ट पण करू शकतील.

एक रशियन वैज्ञानिक—V. Zaitsar यांनी सर्व जगावर फिरून परलोकावरून पृथ्वीवर आणल्या गेलेल्या संस्कृतीसंबंधी बरेच संशोधन करून आपले निष्कर्ष पुराव्यासहित सादर केले आहेत त्यातील भारतीय संस्कृतीच्या वाढीस अनुलक्षून जे काही दृष्टोत्पत्तीस येत आहे त्याचा थोडक्यात परामर्श घेत आहे.

बऱ्याच अज्ञात काळात कोण किती वेळ येऊन गेले व त्यांनी काय काय केले याचा काहीच पुरावा उपलब्ध नाही. पण सुमारे पाच तें दहा हजार वर्षांपूर्वी अंतराळातून काही व्यक्ती पृथ्वीवर येऊन त्यांनी संस्कृती व विज्ञान यांच्या प्रगतीबाबत मार्गदर्शन केले असावे असे निश्चित वाटते.

वेदकाली म्हणजे सुमारे पाच ते दहा हजार वर्षांपूर्वी आपणाकडे भारतात यज्ञसंस्था अस्तित्वांत होती व त्या वेळी इंद्र, चंद्र, वरुण आदि देवतांची पूजा होत असे. त्याचप्रमाणे ब्रह्मा, विष्णु, महेश ही दैवते पण मानली जात होती व त्यांची यज्ञहवनादिकांनी पूजा वगैरे होत असल्याचे आढळून येते. परंतु आजच्या काळांत आहेत. तशी देवळातून मूर्तिस्थापना वगैरे करून पूजाअर्चा होत असल्याचा पुरावा मिळत नाही. त्यावेळी राम कृष्ण आदि अवतार झालेच नव्हते; त्यांची देवळे असण्याचा प्रश्नच नव्हता. फक्त श्रीरामांनी रामेश्वर येथे शिवलिंगाची स्थापना केल्याचा, तसाच श्रीकृष्णकाळी रुक्मिणी देवीच्या देवळात गेली होती असा उल्लेख आढळतो. यावरून वेदकाळ व श्रीरामकृष्णांचे अस्तित्वकाल या दरम्यान केव्हातरी देवळांची कल्पना प्रसृत होऊन ती होऊ लागली होती असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. वेदकाली ती होती असे दिसत नाही. यासंबंधी येथे ऊहापोह करण्याचे कारण असे की, वेदकाल व श्रीरामकृष्णादिकांचा काल या दरम्यान अंतराळातील काही प्रभावी व्यक्ती पृथ्वीवर येऊन त्यांनी मानवास सांस्कृतिक व वैज्ञानिक मार्गदर्शन केले असावे व त्याचा पुरावा

म्हणजे आपली देवळे, सर्वांत जुन्या संस्कृती म्हणजे भारतीय–चिनी, ग्रीक–रोमन, इजिप्शियन–बॅबिलोनियन. असीरीयन–मायन, (मेक्सिकन). यातील चीन व भारत याखेरीज इतर संस्कृती आज स्मृतिशेष झाल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या थोड्या अवशेषांवरून त्यासंबंधी अनुमान करण्यास आपणास काही साधन नाही. आजच्या अवशिष्ट संस्कृतीत भारतीय संस्कृती व संस्कृत भाषा ही सर्वांत प्राचीन आहेत हे वादातीत आहे.

पृथ्वीवरील कोणत्याही देशात प्राचीन अथवा अर्वाचीन घरे बांधण्याची प्रथा पाहिली तर असे आढळून येते की कोणतीही इमारत मग ती राहण्याकरता, कारखान्याकरता अथवा इतर कोणत्याही कारणाकरता असो, एक मजली वा अनेकमजली यापैकी कोणतीही इमारत आकाशाकडे निमुळती होत गेल्याचे आढळणार नाही. परंतु सर्व देशांतील मंदिरे, चर्चेस, मशिदी, स्तूप, वगैरे सर्व धार्मिक, इमारती आकाशाकडे निमुळत्या होत गेल्या आहेत असे आपणास आढळून येईल.

इतर कोणत्याही इमारती आकाशाकडे निमुळत्या होत गेल्याचे कोठेही कोणत्याही काळी दृष्टोत्पत्तीस येत नाही. मग प्रश्न असा येतो की देवळे, चर्चेस किंवा मशिदीसारख्या धार्मिक इमारतीच आकाशाकडे निमुळत्या होत गेलेल्या अशा का असाव्यात ?

गेल्या एक दोन दशकांत प्रचार पावलेल्या रॉकेटस आदि वाहनावरून व त्यातहि प्रवास करणाऱ्या अवकाश–वीरांच्या पोशाखावरून काही कल्पना उद्‌भवतात व त्याबाबत सांगोपांग अभ्यास केल्यावर खात्रीच पटते की हे काय व कसे असावे ?

आपण पूर्वी पाहिलेच आहे की, कोणताही नवीन क्रांतिकारी शोध तत्कालीन प्रवाहित असलेल्या विचारप्रवाहातून लागलेला आहे. ती कोणा एकाच मानवाची निर्मिती नसून, त्याने इतरांपेक्षा अगोदर अधिक सुसंगत रीतीने तो विचारप्रवाह आत्मसात करून घेतला व तो जगापुढे मांडला. असे झाले आहे याची खरोखर त्यासही कल्पना नसते. यापेक्षा थोडे पुढे जाऊन काही वैज्ञानिकांचे म्हणणे असे आहे की, वेळोवेळी अंतराळातून काही अत्यंत प्रगत व्यक्ती आकाशयानातून पृथ्वीवर येऊन त्यांनी मानवास संस्कृती व विज्ञान यांचे प्रागतिक मार्गदर्शन केले. रॉकेट्स व रॉकेटमधील व्यक्तींचे पेहेराव यावरून या अनुमानास बळकटी येते. परिशिष्टात रॉकेटस व वैमानिक यांची चित्रें दिली आहेत. त्याचप्रमाणें आपल्या व इतर देशांतील देवळे, स्तूप, मशिदी, चर्चेस तसेच आपल्या देवदेवता यांचे फोटो व चित्रे पाहिली की, त्यात विशेष साम्य आढळून येते, रॉकेट ज्याप्रमाणे आकाशाकडे निमुळते होत गेलेले असते, त्याचप्रमाणे सर्व देवळे, चर्चेस, मशिदीचे मनोरे, स्तूप ही सर्व आकाशाकडे निमुळती होत गेलेली असतात, असे आपणास आढळून येईल. आपल्या धार्मिक इमारतींच्या बाबतीतच असे वैचित्र्य का आढळून यावे असा प्रश्न पडतो. त्याचा उकल खालील निवरणाने सुसंगत व बुद्धीस पटेल असा होऊ शकतो.

CS CamScanner

अशी एक शक्यता आहे की अगदी अलीकडील काळात म्हणजे सुमारे पाच ते दहा हजार वर्षांपूर्वी अंतराळातील एखाद्या गोलावरून काही महाबुद्धिमान व्यक्ती ईश्वरी प्रेरणेने म्हणा की,अंतःस्फूर्तीने म्हणा रॉकेटसारख्या काही अंतरिक्षप्रवासास उपयुक्त अशा साधनांनी पृथ्वीवर आल्या व त्यांनी तेथे वस्ती करून असलेल्या मानवास संस्कृती, विज्ञान या क्षेत्रांत मार्गदर्शन केले व आल्या वाटेने ते निघून गेले मानवी मनाचा गुणधर्मच असा आहे की,थोडा चमत्कार पाहिला की तें लागलीच तिकडे आकर्षिले जाते.आजसुद्धा कोणी तथाकथित कुंकू अगर रक्षा काढणारा दिसला की चांगले सुशिक्षित म्हणविणारे लोक सुद्धा हजारोंच्या संख्येने त्याच्या मागे लागतात. साहजिकच पाच दहा हजार वर्षांपूर्वी रॉकेटसारख्या यानाच्या सहाय्याने कोणी पृथ्वीवर आले असतील तर त्याबद्दल अखिल मानव जातीस कुतूहल व जिज्ञासा वाटली असली तर त्यात काही नवल नाही. त्या काळी रॉकेटसारख्या यानाच्या सहाय्याने अंतराळातील कोट्यवधी मैलांचे अंतर ओलांडून पृथ्वीतलावर पोचण्याची ज्यांची प्रगती झाली होती, ते ज्ञानविज्ञानाच्या इतर क्षेत्रांतही निश्चितच विशेष प्रगत असले पाहिजेत. नुसते चंद्रावर जावयाचे म्हटले तरी विज्ञानक्षेत्रांत किती प्रगती करावी लागते हे त्या क्षेत्रात कार्य करून यश मिळवणारांनाच विचारावयास हवे. ज्याप्रमाणे चंद्रावर जातांना यानातील व्यक्तींना सर्व परिस्थितीस पोषक होईल असा पेहेराव करावा लागतो, व तो सर्वसामान्यांपेक्षा पुष्कळ निराळा व विशिष्ट असा असतो, (परिशिष्ट पाहा) अगदी त्याचप्रमाणे अंतराळातील जी मंडळी पृथ्वीवर आली, त्यांचाही पोषाख विशिष्टच परंतु निराळा असला पाहिजे व त्या व्यक्तीसुद्धा आपणाप्रमाणेच दोन हात दोन पायांच्या नसून कदाचित एक किंवा आधिक डोकी, चार किंवा आधिक हात असे असणारे नसतीलच असे काही म्हणवत नाही असे काही असले तर कुतूहल आधिकच वाटेल यात संशय नाही. त्यांनी पृथ्वीवर येऊन स्थानिक भाषा व संस्कृती यांचा अभ्यास करून येथील मानवसमूहास सांस्कृतिक व वैज्ञानिक मार्गदर्शन केले असावे. अर्थात त्यास बराच काळ लागला असेल. आजचा आपला अंतराळवीर ज्याप्रमाणे आवश्यकतेनुरूप तोंडावर व अंगावर निरनिराळ्या प्रकारची आच्छादने घालतो, त्याचप्रमाणे आवश्यकतेनुरूप तेही करीत असले पाहिजेत. माणसाच्या कल्पनेतही नसलेल्या विद्या व ज्ञान त्यांनी केवळ त्यागबुद्धीने व मानवी कल्याणाच्या बुद्धीने, त्यास प्रयत्न करून शिकविल्या म्हणून साहजिकच मानवास वाटले की, ते कोणीतरी श्रेष्ठ योनीतील किंवा देव योनीतील असावेत. ही मंडळी दिवसा यानाबाहेर येऊन ज्ञानविज्ञानाचे धडे देऊन अपरिचित व बाहेरील त्यांच्या शरीरास न मानवण्यासारख्या परिस्थितीमुळे ती रात्री विश्रांतीकरिता आपल्या यानात परत जात असावीत, म्हणून असा समाज झाला की ही देवमंडळी रात्रीं आपल्या निवासस्थानी जाऊन विश्रांती घेतात. त्यांच्या अंगातील विचित्र पोषाखामुळे ते किरीट कवच कुंडले वापरीत असावेत अशी समजूत मानवांनी करून घेतली व त्यांची रॉकेटसदृश निवासस्थाने म्हणजे देवांची मंदिरे समजली जाऊ लागली. त्यामुळे

देवमंडळी आपापल्या मंदिरात जाऊन विश्रांती घेतात असे ठरविण्यात आले व म्हणून त्यांनी पहाटे लवकर उठून त्यांचे ज्ञानदानाचे कार्य सुरू करावे; म्हणून मोठ्या पहाटेस काकडआरती, घंटानाद, प्रार्थना असे प्रयोग सुरू झाले. त्यांनी योजलेले कार्य संपल्याबरोबर ते आपल्या यानांतून उडून आकाशात अदृश्य झाले. यावरून देव आकाशात राहतात; जरूर त्यावेळी मानवास मदत करण्यासाठी पृथ्वीवर येतात व ते कार्य संपले की ते आकाशात परत जातात, असा समज झाला. ते परत गेल्यावर त्यांची कृतज्ञतापूर्वक केलेली स्मारके म्हणजे रॉकेटसदृश आकाशाकडे निमुळती होत गेलेली देवळे व किरिट-कवच-कुंडलेयुक्त त्यांच्या त्यातील मूर्ती. पूर्वी फक्त विष्णु शंकरादि देवतांची देवळे होती. नंतर श्रीराम, कृष्ण देवत्व पावल्यानंतर त्यांचीही देवळे वगैरे होऊ लागली.

अलीकडे म्हणजे निदान पाच हजार वर्षांत अशी एखादी घटना घडल्याचे इतिहासात नमूद नाही. तरीसुद्धा चर्चेस, मशिदी इत्यादि की ज्यांचा उगम १५०० ते २००० वर्षांपूर्वीचा नाही, त्यासुद्धा आकाशाकडे निमुळत्या अशाच बांधणीच्या दिसतात, याचा अर्थ इतकाच की—त्यांचे धर्म अस्तित्वात आले त्यावेळी पूर्वीची धार्मिक मंदिरे ज्या धर्तीची बांधलेली आढळली, त्यात थोडा फरक करून आपलीही धर्ममंदिरे असावीत असा त्यांनी निर्णय घेतला असावा. जावा, सुमात्रा, चीन आदि करून सर्व देशात ज्या ज्या ठिकाणी कोणत्याही धर्मांची मंदिरे असोत त्यास नावे कांहीही असोत, ती सर्व आकाशाकडे निमुळती होत गेलेली अशीच आढळतात.

बायबलमधील सोडोम व गोमोरा ही शहरे व आर्यावर्तातील दंडकारण्यासारखा प्रदेश ही एकदम नाश पावली. त्याचप्रमाणे १९०६ साली सैबेरियात तथाकथित झालेल्या अशनिपाताने झालेला नाश यासंबंधी आजच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे कोणी तरी अंतराळातील एखाद्या गोलावरील व्यक्तींनी येथे येऊन त्यावेळी केलेले न्युक्लर एक्स्प्लोजन (ॲटम किंवा हैड्रोंजनबॉंबचा हल्ला) होते, असेच आधुनिक शास्त्रज्ञांचे मत आहे. संस्कृतमधे २५० श्लोकांचे 'समरांगण सूत्र' म्हणून एका ग्रंथातील प्रकरण आहे. त्यात आकाशयानाचीच नव्हे तर अवकाशयानांचीसुद्धा माहिती दिलेली असून ते चंद्र व इतर ग्रहच काय परंतु सूर्य व त्यापलीकडील अवकाश प्रांगणात सुद्धा विहार करीत असत असे दिलेले आहे. कदाचित हे वर्णन काल्पनिकही असू शकेल; परंतु त्यांना अशी कल्पना सुचवावयास काही परगोलावरील व्यक्तींची पृथ्वीस काही काळ भेट हे कारण असू शकेल, असे वाटते. (दुर्दैवाने हे सूत्र प्रयत्न करूनही लेखकास मुळातून पाहावयास अद्याप मिळालेले नाही.) रामायणातील पुष्पक विमानाचे वर्णन या दृष्टीने मुळातून वाचण्यासारखे आहे, ते काल्पनिक असले तरी कल्पना किती शास्त्रशुद्ध आहे, हे विशेष विचार करण्यासारखे आहे.

या बाबतीत आणखी एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे की, जगातील काही विशिष्ट ठिकाणीच—की ज्या ज्या ठिकाणी त्या अवकाशातील व्यक्तींनी भेटी दिल्या व ज्या ठिकाणी त्यांची देवळें अथवा अन्य रीतीने स्मारके झाली—जगातील

तेवढाच भाग ज्ञानविज्ञानात पुढारलेला म्हणून पुढे आला. आफ्रिकेचा बहुतेक भाग ऑस्ट्रेलिया, अमेरिका उत्तर व दक्षिण दोन्ही, हीं सर्व ज्यावेळी भारत, इजिप्त, रोम चीन ही आपल्या ज्ञानाने जगात तळपत होती, त्यावेळीच काय परंतु अगदी अलीकडेपर्यंत अज्ञानांधकारांत खितपत होती व अजून त्या त्या देशांचा बराचसा भाग त्याच स्थितीत आहे.

या सर्व अज्ञात महोदधीतून आपण जे काही ओंजळभर घेऊ शकू तेवढेच आपले त्यातच काय आहे काय नाही ते आपण पाहू शकू. समजू शकू. आपली म्हणजे मानवाची ओंजळ ज्या मानाने कमीजास्त लहान-मोठी असेल त्या मानानेच तीत थोडे अथवा अधिक सामावू शकेल. परंतु ओंजळ ती ओंजळच. त्या महान महोदधीच्या मानाने ती काय होय ? लहान मुलास आपण एक प्राथमिक धडा शिकवितो व तो त्याचा चांगला गिरवून झाला म्हणजे त्यास पुढील धड्याचा पाठ देतो, काही अंशी हल्ली आपले पण तसेच चालले आहे. ५०० कोटी वर्षांच्या आपल्या पृथ्वीचे आयुर्मान जर आपण १०० वर्षांचे धरले तर मानवाची उत्पत्ती होऊन केवळ तीन दिवस झाले (५ लक्ष वर्षे), आहेत व आज जो काही वैज्ञानिक, सामाजिक, आध्यात्मिक वगैरे क्षेत्रांतील ज्ञानाचा विकास दिसत आहे तो केवळ तीन मिनिटांतील आहे (५००० वर्षे). कल्पना करा, तीन दिवसांचे बालक तीन मिनिटांतच काय व किती आकलन करू शकेल ? अगोदर आपली पृथ्वी म्हणजे म्हणजे अनंत कोटी ताऱ्यांनीं युक्त अशा विश्वातील एक लहानसा उपेक्षणीय बिंदू; व तीवरील मानव म्हणजे एक क्षुद्र जीव की जो केवळ तीन मिनिटांपासून आपला विकास करण्याचा प्रयत्न करीत आहे. यावरून आपणास काय व किती साध्य झाले आहे त्याची कल्पनाच केलेली बरी.

अशा रीतीने या अफाट ज्ञानमहोदधीतील काही भाग दृश्यमान होऊन तो आपणांस उपलब्ध व्हावा म्हणून एक लहानसा प्रकाश किरण आपणांस प्रदान करण्यात आला आहे. त्याच्या क्षीण प्रकाशात जे काही आपणांस स्पष्ट दिसू शकेल व त्यातील जे काही आपण ग्रहण करू शकू तेच आपले ज्ञान. बाकी सर्व खालीवर दशदिशांस सर्वत्र ज्ञानभांडार भरलेले असून, प्रकाशाच्या अभावी ते सर्व आपणास अज्ञातच अज्ञात-की ज्यातून आपणांस प्रकाश व योग्य साधनांच्या अभावी काहीही उपलब्ध करून घेता येत नाही. अगदी अथांग असा ज्ञानमहोदधी सर्वत्र पसरलेला आहे की ज्यात ज्ञानविज्ञानाच्या कोट्यवधी शाखा भरलेल्या आहेत. परंतु दुर्दैवाने त्यातील अगदी अल्पसा भाग वगळला तर बाकी साधनांच्या अभावी सर्व अज्ञात व म्हणूनच अनुपलब्ध. परिस्थिती अत्यंत निराशजनक आहे, ही गोष्ट खरी आहे. परंतु ती वस्तुस्थिती आहे. तीस डावलून चालणार नाही. उगीच घमेंडखोर व भ्रामक समजुतीत न राहता सत्य परिस्थितीची पूर्ण जाणीव करून घेऊन त्यातल्या त्यात काय करता येणे शक्य आहे ते शोधून काढणे व त्यातून जे काहीं हस्तगत करता येण्यासारखे वाटेल ते मिळवण्याकरता प्रयत्न करीत राहणे हितावह ठरेल.

या संदर्भात आणखी एक विचार करण्यासारखी बाब आहे. अगदी किट्ट अंधारात एखादी लहानशी मेणबत्ती पेटवून ठेवली तर तिच्या आजूबाजूच्या थोड्या भागावर प्रकाश पडून त्यात सर्व काही स्पष्ट दिसू शकते. त्याच्या थोडे पलीकडे सर्व बाजूस छायाच असते. थोडे संधिप्रकाशासारखे असते. त्यात थोडे प्रयासाने काही अस्पष्ट का होईना पण दिसू शकते. त्याच्यापलीकडे अस्पष्ट होत होत शेवटी अगदी काळोख असल्याचे अनुभवास येते. हा स्पष्ट दिसणारा भाग व त्यापलीकडील अस्पष्ट असा दिसणारा भाग, एकंदर चोहोबाजूस पसरलेल्या अंधाराच्या मानाने अगदी अल्पच असतो; तरी पण जे काही आपणास स्पष्ट दिसते त्याबद्दल आपण सांगू शकतो. जे अस्पष्ट दिसते ते सुद्धा प्रयत्नाने थोडे फार सांगू शकतो. त्यापुढे जास्त जास्त अस्पष्ट होत जाते; परंतु ज्याचा आपणांस अनुभव येत असतो त्याबद्दल नुसते अनुमानच करावे लागते. ते धड दिसत असते व नसतेही. तथापि त्याच्या अस्तित्वाची जाणीव होत असते अनुभव पण येत असतो. परंतु ज्ञानचक्षूस संपूर्ण दृगोच्चर मात्र होऊ शकत नसतो. म्हणून त्याबद्दल अनुमानच करावे लागते. ‘वैतरणेच्या ऐलतिरी’ या ग्रंथात अध्यात्म क्षेत्रात असलेल्या मेणबत्तीच्या प्रत्यक्ष उजेडात आपली प्रगती कोठपर्यंत झाली आहे व होणे शक्य आहे त्याचे विवेचन केले आहे. या ग्रंथात त्याच्या थोडे पलीकडे जे काही थोड्या अस्पष्ट अशा छायेत अज्ञात आहे ते काय आहे कसे आहे व यासंबंधी काही क्षेत्रातील निरनिराळे अनुभव, त्यांची संभाव्यपरंपरा यासंबंधी आपणांस विचार करावयाचा आहे. अर्थात अज्ञात ते अज्ञातच. त्यासंबंधी मी अगर आणखी कोणीही त्याच्या कारण परंपरेसंबधी केलेली विधाने केवळ अनुमानेच असणार. फार तर शास्त्रीय भूमिकेवरून केलेली असतील. तरी ती अनुमानेच. ती सर्व जर बरोबरच असतील तर त्यास अज्ञात न म्हणता ज्ञातच म्हणावे लागेल. अनुमान, मग मी केलेले असो अथवा कोणीही. ते बरोबर असेल अगर चुकीचेही असेल. विशेषतः संधिप्रकाशात चाचपणे असल्याकारणाने चुकीचेच असण्याचा संभव जास्त. फार तर थोडे मार्गदर्शन या पलीकडे त्यास महत्त्व देऊ नये, स्वतंत्र बुद्धीने विचार करून निर्णयाप्रत यावे हा उत्तम मार्ग. या ग्रंथात काही ठिकाणी मी माझी स्वतःची मते मांडलेली आहेत तसेच त्यावर इतर तज्ज्ञांची मते काय आहेत तीही दिलेली आढळतील. ती माझ्या मतांशी अगर परस्पराशी विसंगत अशी पण आढळतील. म्हणून याचा अर्थ मी परस्परविरुद्ध अशी विधाने करीत आहे, असा करू नये. कारण मी पक्षपात-विरहित बुद्धीने सर्व प्रकारची मते स्पष्टपणे वाचकांच्या मार्गदर्शनास उपयुक्त व्हावी म्हणून मांडीत आहे; त्यावरून वाचकांस पूर्ण विचार करून स्वतःच्या बुद्धीने निर्णयात्मक असे मत बनविणे सुलभ होईल.

अध्यात्म क्षेत्रात प्रत्यक्ष ज्ञात असलेल्या सर्व बाजूंनी अज्ञात म्हणून समजल्या जाणाऱ्या, परंतु ज्याची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जाणीव होत आहे अशा काही अज्ञात ज्ञानाच्या शाखा-उपशाखांचा या ग्रंथात ऊहापोह करण्याचे ठरवले आहे.

आपलेकडे तेलंगण, कोकण, बंगाल इत्यादि भागात भुतेखेते, जादूटोणे इत्यादींचा फार प्रकार आढळतो व भारतातील सर्व क्षेत्रातील जनतेस यांचे अनुभव नेहमी येत असतात. परंतु एक तर आपणाकडे अतिशयोक्ती करून सांगण्याचा फार प्रघात असतो व दुसरे म्हणजे कोणी भरवसा ठेवण्यालायक माणसे सर्व पुराव्यासहित संकलन करून नमूद करून ठेवण्याची प्रवृत्तीच आपणाकडे नाही. त्यामुळे आपणास जे काही कळते ते केवळ सांगोवांगीपलीकडे नसते. किंवा काही असेल तर ते अविश्वसनीय अतिशयोक्तीने भरलेले असे असते. म्हणून त्यावर विश्वास ठेवून त्यांचा ग्रंथांत निर्देश करणे चुकीचे ठरेल. पाश्चिमात्य देशात व अमेरिकेत पुष्कळ Psychic Research संस्था आहेत. त्या पूर्ण काळजी घेऊन विश्वसनीय अशा व्यक्तींकडून पुराव्यासहित पद्धतशीर रीतीने माहिती गोळा करून तिचे संकलन करीत असतात व व हे सर्व त्यागबुद्धीने, केवळ मानवी ज्ञानात भर पडावी व अज्ञातात खरोखर काय चालले आहे याची सामान्य जनतेस माहिती व्हावी या उद्देशाने. अशा रीतीने माहिती गोळा करून, संकलित करून तिचे तारीखवार रेकॉर्ड ठेवण्यात येते. स्थळ, काळ, व्यक्ती व घटना इत्यादींचा विस्तारपूर्वक उल्लेख असतो. या कारणाने मी या ग्रंथातील गोष्टी, हकीगती, घटना, वर्णने वगैरे सर्व पाश्चात्य देशातील अथवा अमेरिकेतील घेतले आहेत हे येथे नमूद करून ठेवणे आवश्यक वाटते. आपल्याकडे अशा सुसंगत रीतीने विश्वसनीय माहिती गोळा करण्यास प्रारंभ होईल तो सुदिन.

प्रत्येक प्रकरणात जी तात्त्विक चर्चा व विश्लेषण आहे त्यातील जो भाग वाचकांच्या हृदयास भिडेल व त्यांच्या ज्ञानात मोलाची भर टाकणारा वाटेल तो सर्व मी श्रीसद्गुरु प्रेरणेने लिहिलेला असून त्याचे सर्व श्रेय त्यांच्याकडे आहे. यातील जो भाग टाकाऊ अथवा चुकीचा वाटेल तो माझा असे समजावे. त्याचा सर्व दोष माझ्याकडे व त्याचे कारण म्हणजे श्री सद्गुरूंच्या प्रेरणांच्या संवेदना मला स्पष्ट रीतीने ग्रहण करता आल्या नाहीत. त्यामुळे त्यासंबंधी मी केलेली चुकीची विधाने व त्यात माझ्या स्वतःच्या कल्पना व विचार यांची झालेली भेसळ ही होय.

ज्ञा 卐 卐

४. हे आहे तरी काय ?

रोजच्याप्रमाणे आजही सूर्य उगवला होता. नद्या वाहात होत्या. वृक्षांच्या फांद्या-फांद्यांवरून सूर्यकिरणे ओघळत होती. घराघरातून दैनंदिन कामे सुरू झाली होती. इतर दिवसापेक्षा नवीन किंवा निराळे असे त्या दिवसात काही नव्हते. तरीपण एका घरातील सर्व कुटुंबियांच्या मुद्रांवरील आनंद ओसंडून चालला होता. आज बरीच वर्षे त्या कुटुंबात मूल असे जन्मास आलेच नव्हते. पुष्कळ नवस-सायास करून आज पुत्रजन्मोत्सव साजरा होत होता. त्याचे रुदनामृताने सर्वांची अंतःकरणे व कान आनंदित, तृप्त होऊन ओसंडून जात होते. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद इतका फुलला होता की, त्याचे वर्णन करणे शक्य नव्हते.

असेच आणखी काही दिवस दिवस गेले. सर्वसाधारण दिवसांप्रमाणे तोही दिवस मावळतीकडे झुकत होता. सर्व जग आपल्याला दैनंदिन कार्यक्रमात पूर्ण रमलेले होते. अशावेळी त्याच कुटुंबातील लहान थोर मंडळी दुःखातिशयाने शब्दोच्चारसुद्धा करू शकत नव्हती. एकमेकांकडे पाहून दुःखपूर्ण सुस्कारे सारखे सोडीत होती. त्या दिवशी त्या कुटुंबातील कुटुंबप्रमुख, जो सर्व कुटुंबाकरिता जिवापाड मेहनत करून सर्वास सुखी ठेवण्याचा प्रयत्न करीत होता, लहान थोर सर्वांवर प्रेमाची पाखर घालीत होता, त्यांच्याशी सौहार्दानें वागून सर्वांची मने संतुष्ट ठेवीत होता, अशा त्या व्यक्तीवर काळाने झडप घातली होती, तो त्यांच्यातून कायमचा निघून गेला होता अगदी कायमचा, कधीही न परतण्याकरिता असा गेला होता. सर्वांची तोंडे मलूल झाली होती व त्यांच्या दुःखास पारावार राहिला नव्हता.

असेच आणखी काही दिवस आले व गेले. शिशु आता मोठा झाला होता. त्याचे कोडकौतुक संपले होते, व परलोकी गेलेल्या व्यक्तीची आठवण फक्त श्राद्धासारख्या प्रसंगीच येत होती. काल हा सर्वांवर उत्तम इलाज आहे. दैनंदिन रहाटगाडगे सुरू होते व त्यात खालीवर होऊन सर्व आपापले पार्ट करीत होते.

शेकडा ९९ च काय परंतु हजारी ९९९ व्यक्ती व कुटुंबे यांत हाच अनुभव येत असतो. कालचक्र फिरत असते, बालके जन्मास येत असतात, मोठी होत असतात, शिक्षणक्रम वगैरे करून, यौवनात प्रवेश करून, जीवनयात्रेत सामील होऊन मार्गक्रमण करू लागतात. ज्याची पाळी येते तो सर्व तेथेच सोडून सर्वांमधून निघून जात असतो. शेकडा अगदी शंभर कुटुंबांत हाच प्रकार सुरू असतो. सकाळ झाली की महिलावर्ग चहापाणी, फराळ वगैरेच्या तयारीस लागतो. पुरुषवर्ग प्रातर्विधी, स्नान वगैरे आटोपून कोणी शाळेत तर कोणी नोकरीवर, दुकानात, कारखान्यात तर कोणी शेतावर जाण्याच्या तयारीस लागतात काम आटपो वा न आटपो सायंकाळी घरी परत येतात. विश्रांती

घेतात व सकाळी पुन्हा त्याच कामास जुंपतात. एखाद्याच्या बाबतीत कित्येक वर्षांनी काही निराळे व विशेष महत्त्वाचे असे घडून येत असले तरी दैनंदिन रहाटगाडगे सुरू असते; त्यात प्रत्येक जण गुंतलेला असतो. त्यातून डोके वर काढून आजूबाजूस काय चालले आहे ते पाहावयास कोणास सवडच नसते; आणि असली तरी तो किंवा ती चकाट्या पिटण्यात, पत्ते खेळण्यात, नाटक-सिनेमा-तमाशा पाहण्यात अथवा तत्सम अशा कार्यक्रमात घालवीत असतात दिवसामागून दिवस, महिने, वर्षे उलटतात. ज्याचे वर वर्णन केले आहे ते शिशू वृद्धत्व पावून परलोकास गेलेले असतात. किंवा मध्येच गळतात. त्यांचा हिशेबच नाही असे वर्षानुवर्षे काय परंतु युगानुयुगे चाललेले आहे. फक्त आपल्या घरात एखादा मृत्यू झाला की क्वचित त्यापैकी एखाद्यास उपरती येते; हे चालले आहे तरी काय असे तो स्वतःस विचारण्याचा प्रयत्न करतो. त्याचे उत्तर त्यासच काय परंतु कोणासच माहीत नसते. अशी थोडीफार उपरती झाली तरी ती टिकते मात्र स्मशानातून घरी परत येऊन स्नान वगैरे करून कुटुंबियांत मिसळेपर्यंतच. स्नानाबरोबरच ते विचार धुऊन जातात. हा आपला परत त्या रहाटगाडग्यास जुंपला जातो व चक्रात फेरे मारू लागतो. शिवाय हल्लीचा काळही असाच आहे की त्याचाही इलाज नसतो. आठ तास काबाडकष्ट करून कुटुंबाची दोन्ही तोंडे मिळवण्यापुरती तरतूद करणेसुद्धा सर्वसाधारण माणसास शक्य होत नाही. त्यामुळे आज तर पार पडला. परंतु उद्याचें काय हा प्रश्न त्यास सारखा भेडसावीत असतो. त्यामुळे त्यास यापेक्षा जास्त विचार करणेच शक्य होत नाही व त्याची मनस्थिती पण त्यास अनुकूल नसते. सर्वसाधारणपणेसुद्धा उद्याचा विचार करणारे फारच थोडे. बहुतेक तर म्हणतात आजचा दिवस तर निभावला उद्याचे पाहू उद्या.

आपल्या समाजातील दैनंदिन जीवनाचे विश्लेषण करू म्हटले तर आपणास काय आढळते ? घरची परिस्थिती अनुकूल असली तर निदान वयाची पहिली पंचवीस वर्षे शिक्षणक्रम पूर्ण करण्यातच निघून जातात व ज्यांना हे अनुकूल नसते, ते त्याच्या अगोदर प्रपंचाच्या गाड्यास जुंपले जातात. याच सुमारास लग्न वगैरे होऊन माणूस धकाधकीच्या जीवनात प्रवेश करतो. या नवीन जीवनात त्यास वातावरण अगदी भिन्न आढळते व प्रत्येक पावलास ठेचा खात त्यास पुढील मार्गक्रमण करावे लागत असते. घरातील प्रपंचाचा व्याप व व्यवसायातील संकटे (मग ती नोकरी, धंदा, शेती काही असो) यांना तोंड देत, ठेचाळत तो मार्गक्रमण करीत असतो. साधारणपणे वयाच्या तीसच्या सुमारास तो आपल्या आयुष्यक्रमात स्थिरावला तर ती एक मोठी नशिबाची गोष्ट समजली जाते. अशा धकाधकीत दहा वर्षे गेली की त्यास चाळिशीची झुळूक लागते. डोळ्यास चष्मा लागतो. दात आपले ठिकाण सोडू लागतात. कानावरील केस पांढरे होऊ लागतात. दैनंदिन जीवन तो पुढे रेटीत नेतच असतो. वयाच्या पंचेचाळीस वर्षांपासून शरीरातील शक्ती कमी कमी होऊ लागते व वयाच्या पन्नासच्या आत असे आढळून येते की निदान शेकडा ८० मंडळीस ब्लड प्रेशर, कॅन्सर, दमा, मधुमेह

असे काही तरी घर करून बसलेले असते व शेवटपर्यंत साथ करणारे असते व त्याचा बहुतेक वेळ डॉक्टरांचे औषधपाणी, सतत प्रकृतीची तक्रार, कुटुंबातील मतभेदांचे निरसन यातच जाऊ लागतो. हे मी एक अतिशयोक्तिपूर्ण असे चित्र चितारलेले नसून अगदी सर्वत्र सर्वसाधारणपणे आढळून येणारे असे आहे; नसेल तर अपवाद समजावयाचा.

पूर्ण आयुर्मान जगण्यास मिळाले तर आपले आयुष्य ७० वर्षांचे. बहुतेक मंडळी त्याच्या आतच कोठे तरी गळतात. विचार करा, पृथ्वी आज ५०० कोटी वर्षांची आहे त्यांत ही सत्तर वर्षे कोठे बसतात. त्यातही कर्तृत्वाची अशी फार तर तीस ते चाळीस, फार तर पंचेचाळीस अशी दहा ते पंधरा वर्षे असतात. त्यात माणसाने मनात आणले तरी या काळात त्याला इतके व्याप व भानगडींस तोंड द्यावे लागत असते की, त्यास त्या चक्राबाहेर नुसते पाहणेसुद्धा जमत नाही. मग काही करणे तर दूरच. महिलांच्या बाबतीत तर विचारावयासच नको. त्या साधारणपणे पुरुषाच्या अगोदर दहा वर्षे थकतात, व सर्वसाधारणपणे त्यांना त्याच्या दैनंदिन प्रपंचापेक्षा कसलाही गंध सुद्धा नसतो. सासू सुना, नणंदा, जावा, भावजया वगैरेशी संघर्षास तोंड देता देताच त्या आयुष्याची अखेर गाठतात. अशा रीतीने सर्वसाधारपणे मनुष्य जन्मास येऊन त्याच्या वाटेस जे काही असे यंत्रसदृश जिणे येईल ते जगून तो परलोकाची वाट धरतो. एकंदर परिस्थिती पाहता त्यात त्याची काही चूक असते असे पण नसते. कारण प्रत्येक मनुष्य साधारणपणे प्राप्त परिस्थितीच्या चक्रात सापडलेला असून, त्यातच भरडून निघत असतो व कालाबरोबर वाहात असतो, त्यास इतर काही सुचतच नाही. यदाकदाचित काही प्रसंगाने सुचलेच तर वेळेवर योग्य मार्गदर्शनाच्या अभावी त्यातच शेवटपर्यंत रमावे लागते.

वर लिहिलेली परिस्थिती सर्वांच्या परिचयाची व अनुभवाची आहे. असे असले तरी त्याची जाणीव फार थोड्यांस असते. अगोदर पूर्णायू म्हणजे वयाचे सत्तरपर्यंत शेकडा दहासुद्धा पोचू शकत नाहीत. त्या दहांनासुद्धा कर्तृत्वास अनुकूल अशी फार तर १०–१५ वर्षेच असतात. या कर्तृत्वाच्या कालात त्यांचे ध्येय काय असते तर आपण स्वतःस जगाचा मध्यबिंदू आहोत असे ते समजत असतात सर्वप्रथम मी, नंतर माझे अशी प्रवृत्ती असते. सगळ्यांनी माझ्या तंत्राने वागले पाहिजे. मी सांगेन ते व करीन ते सर्वस्वी बरोबर असते. म्हणून त्यास सर्वांनी मान तुकवीलीच पाहिजे, अशी त्याची भावना होऊन बसलेली असते. खरोखरीच कोणास काहीच कळलेले नाही व म्हणून कळत नसते; कळण्याची शक्यता व पात्रता पण नसते. परंतु तारुण्य, सत्ता व पैसा यांच्या जोरावर त्यास सगळे जग तुच्छ वाटत असते. त्याच्या भोवतीचे वर्तुळ जसे जसे लहानमोठे असेल त्याप्रमाणे त्यात तो सर्वंकष अशी सत्ता गाजविण्याच्या प्रयत्नात असतो. कोणी विरोध केलेला त्यास सहन होत नाही. स्वतःस तो अगदी अमर व सर्वसत्ताधीश असे समजुन चालत असतो. “ मा कुरु

CS CamScanner

जन-धन-यौवनगर्वम् " हे तत्त्व त्याच्या खिजगणतीतही नसते. नंतर प्रश्न येतो अभिमानाचा. प्रथम कुलाभिमान, भाषाभिमान, प्रांताभिमान व नंतर जमले तर देशाभिमान या सर्वांच्या पलीकडे मानवता व तिचा काही अभिमान असू शकतो याची त्यास कल्पनाच नसते. माझे कुळ फार मोठे, मी मोठा उच्चकुलोत्पन्न. मग तो अगदी एखाद्या झोपडीतील आदिवासी वा अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजातील का असेना ! सर्वांनी मला मान दिलाच पाहिजे. मग मी हिंदू—त्यात ब्राह्मण, क्षत्रिय वगैरे ! ख्रिश्चन, ज्यू, मुस्लीम वगैरे सर्वच श्रेष्ठ. कनिष्ठ कोणी नाही, मग भाषा ! मी बोलतो ती भाषा सर्वश्रेष्ठ. मी राहतो तो प्रांत सर्व जगात फार महत्त्वाचा व श्रेष्ठ यातून काही उरलेच तर मी भारतीय हा अभिमान. मराठी, कानडी, मल्याळी वगैरे भाषाभेदाने आपसात भांडतात. तेव्हा हे विसरतात की आपण प्रथम भारतीय आहोत. तसेच वैष्णव, शैव. लिंगायत वगैरे आपसात भांडून मारामाऱ्या करतील त्यावेळी हे विसरतील की आपण प्रथम वैदिक धर्मीय हिंदू आहोत म्हणून. सर्वांत मोठे आश्चर्य म्हणजे मी मानव आहे व मानवता हाच सर्वांत श्रेष्ठ धर्म आहे असे निदान अद्याप तरी कोणी मानावयाला तयार नाही. नंतर प्रश्न येतो श्रीमंत, गरीब, लहानमोठे सत्ताधारी यांचा. यांचा एक स्वतंत्र वर्ग आहे व त्यांच्यात सतत संघर्ष सुरू असतो. श्रीमंतास वाटते की मी एकटाच श्रीमंत असावे व इतरांनी गरिबीत दिवस काढावेत. सर्वच श्रीमंत झाले तर त्याची प्रतिष्ठा काय राहिली. जी गोष्ट श्रीमंताची तीच सत्ताधाऱ्याची. त्यांना सतत असे वाटत असते की सर्व सत्ता माझ्या एकट्याच्या हातात केंद्रित असावी व बाकी माझ्या हुकूमाचे ताबेदार असावेत. केवळ नाइलाज म्हणून इतरास जवळ करून सत्तेचा काही भाग ते देतात किंवा दुसऱ्याच्या सत्तेला मान तुकवितात. परंतु असे करतांना आम जनतेचे ते किती नुकसान करीत असतात याची कधी जाणीवसुद्धा ठेवीत नाहीत. त्यात मुख्य गंमत अशी आहे की प्रत्येकाचे कार्यक्षेत्र किती वर्षांचे ? पंधरा, फार तर वीस; या काळात त्याला अमरत्व व सार्वभौमत्व मिळवावयाचे असते- आपणास मरावयाचे आहे ही गोष्ट त्याच्या खिजगणतीतही नसत. आपण अमर आहोत व जगातील सर्व संपत्ती व सत्ता आपणास कशी मिळवता येईल याची त्यास सदैव चिंता असते. बहुतेकांचे वर्तुळच लहान असते. त्यामानाने त्यासारखेच विचार तो करीत असतो. शिकंदराने जग जिंकले; पण बिचारा परत घरापर्यंत सुद्धा पोचू शकला नाही. पांडवांनी सर्व कौरव ठार मारून, आपल्या स्वकीयांची सुद्धा सर्वस्वी आहुती देऊन मिळवले काय ? तर ३६ वर्षांचे पुत्र पौत्रविरहित असे लहानसे राज्य. जर्मनीने जगावर दोन महायुद्धें लादली. दुसऱ्या महायुद्धात तर दोन कोटी कुटुंबे व अनेक देश उद्ध्वस्त झाले, व ते करणारे हिटलर, स्टॅलिन, आयसेनहोअर, चार्चिल हे सगळे मरून गेले, व सर्व देश (म्हणजे पृथ्वीचा तो तो भाग) जसे होते तसेच आजही आहेत. हे चौघे अपरिमित नुकसानीस कारणीभूत झाले हे मात्र खरे. हेच चौघे जर एकत्र येऊन जगाच्या कल्याणाचा मार्ग काढण्यास

सर्व शक्ती एकवटून प्रयत्न करते, तर निदान जग आहे त्याच्यापुढे एखादे शतक सहज पुढे गेले असते. आज तरी काय चालले आहे ? इतिहास जगास धडे शिकवितो असे म्हणतात. परंतु या अतिरेकी महत्त्वाकांक्षी लोकांपुढे इतिहास तोकडा पडतो व त्याची वारंवार पुनरावृत्ती होत राहाते. असो.

हे सर्व खरे; परंतु त्यास इलाज काय ? इलाज आहे व तो होणार आहे. त्याची वाटचाल सुरू आहे. आपण मानवांनी जाणूनबुजून मनावर घेण्याचे टाळले तर निसर्ग काही झोपलेला नाही. त्याचे कार्य तो करीत आहे व करीत राहणार. तो आपणापैकीच कोणास तरी निमित्तमात्र करून योग्य वेळी योग्य त्या गोष्टी घडवून आणीलच. भूत काळात आणीत आला आहेच व भविष्यकाळीसुद्धा आणील. मी खाली लिहीत आहे ती गोष्ट माझी नाही. माझ्याकडे योग्य मार्गाने चालत आली आहे. त्यामुळे ती खरी झाली तरी त्याचे श्रेय मला नाही, व खोटी झाली तर त्याचा दोष मजकडे नाही. परंतु मला शंभर टक्के वाटते की ती गोष्ट नक्कीच घडून घेईल. आज रावण, कुंभकर्ण व इंद्रजित—अमेरिका; रशिया, चीन हे सर्व सत्ता व भयानक अशी गुप्त अस्त्रे बळकावून बसले आहेत व त्याच्या बळावर त्यांना सर्व जगावर ताबा मिळवावयाचा आहे. त्यांची आपसांत स्पर्धा आहे म्हणून ठीक आहे. नाहीतर त्यांच्यापैकी कोणीही आजपर्यंत सर्व जगावर एकछत्री अम्मल बसविला असता जर सन १९७० ते ८० या काळात या राक्षसांनी एकत्र येऊन किंवा आपसात यादवी करून जग नाहीसे केले नाही; तर सन १९९० च्या पुढे लवकरच एक चांगला आशेचा किरण आहे. जग हे कोणाकडून नाहीसे होण्याकरता उत्पन्न झालेले नाही. काल कालाचें काम करीत असतो. व फार जुलूम झाला की कालमानाप्रमाणे विभूती उत्पन्न होत असतात. अगदी अलीकडील उदाहरणे म्हणजे श्री शिवाजी महाराज व महात्मा गांधी यांची देता येतील. ‘ कालेन परिपच्यंते ’. कोणतीही गोष्ट कालानेच परिपक्व होत असते. आज अमेरिका, रशिया, चीन यांच्या खालोखाल फ्रान्स, इंग्लंड ही अण्वस्त्रांचा मक्ता घेऊन बसली आहेत व त्यांचा आग्रह असा आहे की यापुढे आम्हासच ती निर्माण करण्याचा हक्क रहावा व इतर कोणी निर्माण करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये.

आज विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अशी मागणी करण्याचे धाष्टर्य व्हावे याचे मात्र आश्चर्य वाटल्याखेरीज राहात नाही. आम्ही चार राष्ट्रे veto (विटो) वापरू व इतरांनी त्यास मान तुकविली पाहिजे, असे ते जागतिक संघटनेस सांगू शकतात. आणि जगास त्यास मान तुकवावी लागते. आम्ही फोर्मोसा हाच चीन समजू, अशा मानवता व भौगोलिक वस्तुस्थितीस आव्हान देणाऱ्या गोष्टी मान्य कराव्या लागत आहेत. यासच Brute Force अमलात आणणे अशी संज्ञा आहे. वस्तुस्थिती अशी आहे की जगास ते मान्य करावे लागत आहे. कारण जगातील बहुतेक देशांपैकी काही नुकतेच पाशवी गुलामगिरीतून मुक्त झाले आहेत, व होत आहेत. असे काही असले तरी काळ काही

स्वस्थ बसलेला नाही. त्याचे महाबलवान चक्र सुरू आहे. काळाने अहमदनगर, गोवळकोंडा विजापूर व दिल्लीतील अत्यंत प्रबळ अशी औरंगशाही यांना पुष्कळसे स्वकीय सुद्धा विरोध करीत असताना केवळ मूठभर अशिक्षित अशा मावळ्यांच्या सहाय्याने यशस्वी तोंड देऊन स्वातंत्र्य स्थापन करणारे श्री शिवाजी महाराज कोणी निर्माण केले ? सर्व देशभर मुसलमानांचा जुलूम व नंगानाच सुरू होता व त्यांच्याशी तोंड देऊ शकेल अशी शक्तीच उरली नव्हती. शिवाजी महाराजांचा अवतार हा एक निसर्गाचा महान चमत्कार आहे. ज्यावेळी सहा इंचापेक्षा मोठा चाकू जवळ ठेवणे हा जन्मठेपेचा गुन्हा होता, थोडे सरकारविरुद्ध बोलणे दोन जन्मठेपेच्या शिक्षेस पात्र ठरत होते, ज्यावेळी साम्राज्यावर सूर्य मावळत नाही अशा प्रबळ इंग्रजांचे राज्य होते, त्यावेळी हिंदुस्थान कधी स्वतंत्र होऊ शकेल अशी कल्पनाही करता येत नव्हती. त्यावेळी केवळ बुद्धाशीच तुलना करता येईल असा महात्मा काळाने निर्माण केला, व त्याने केवळ अहिंसेने शस्त्रावाचून क्रांती घडवून आणली व इंग्रजांना मायदेशी परत जाणे भाग पाडले.

या मुद्यावर कदाचित् माझे काही देशबांधव आक्षेप घेतील याची मला कल्पना आहे. परंतु सर्व देश संघटित करून प्रबळ अशा इंग्रजी शक्तीविरुद्ध सामान्य जनतेस उभे करण्यात मुख्य वाटा त्या महात्म्याचा होता हे अमान्य करण्यात त्या महापुरुषावर अन्याय केल्यासारखे होईल परंतु या वादविवादाचे हे स्थळ नव्हे. माझे म्हणणे असे की काल परिपक्व झाला की तो कोणास तरी हाताशी धरून त्याचे निमित्त करून आपले कार्य करून घेत असतो. अत्यंत प्रबळ असे रोमन साम्राज्य की जेथे ‘ All streets meet in Rome ’ अशी म्हण पडली होती, ज्यांनी तत्कालीन सर्व सर्व जग जिंकून आपल्या सत्तेखाली आणले होते व आता आम्हाला विरोध करावयास कोणी शिल्लकच नाही, त्यामुळे आपले साम्राज्य हे जगाच्या अंतापर्यंत असेच राहणार असे गृहीत धरून चालले होते. त्याना अगदी अशिक्षित व शस्त्रास्त्राच्या वापरासुद्धा अपरिचित अशा हूण लोकांनी पराभव करून नामशेष केले.

निसर्गाचा नियम असा आहे की, कोणाचेही, मग ती व्यक्ती असो वा राष्ट्र, “ त्याच्या उत्कर्षातच त्याच्या नाशाचे बीज सामावलेले असते.” माझे म्हणणे असे की काल परिपक्व झाला की त्यास अनुरूप अशी शक्ती निर्माण होते व परिस्थिती कितीही प्रतिकूल असो; ती शक्ती एकाद्या सामान्य व्यक्तीकडून सुद्धा आपले कार्य करवून घेते. याच न्यायाने या रावणादिकांविरुद्ध कालाने आपले कार्य सुरू केले आहे. परंतु ते परिपक्व होण्यास अद्याप थोडा अवधी आहे. तो काल १९८० ते १९९० च्या दरम्यान आहे. तोपर्यंत जर या राक्षसांनी मानवजात नष्ट केली नाही (नष्ट होणार नाही हे निश्चित) तर या दशकात म्हणजे १९८० ते १९९० या कालात निश्चित अशी एक प्रकट होणार आहे. ती कोणामार्फत तरी या शक्तींना यशस्वी रीतीने तोंड देईल व त्यांची महा भयानक अस्त्रे त्यांच्याजवळच निष्प्रभ करून टाकील. माझ्या समजुतीने ही शक्ती जपानमध्ये वाढीस लागली आहे कृष्णजन्म व त्याची वाढ ही

सर्व प्रयत्न करूनही, ज्याप्रमाणे कंस थोपवू शकला नाही त्याप्रमाणेच या शक्तीची वाढ थोपविण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरतील हे निश्चित. पण ज्याप्रमाणे देवकीला सात मुले झाली, परंतु जगास श्रीकृष्ण जन्माकरिता आठव्या गर्भापर्यंत वाट पाहावी लागली. व तोपर्यंत कंसाचा सर्व जुलूम सहन करावा लागला अगदी त्याप्रपाणे काही शास्त्रज्ञ, विशेषतः जपानमधील वैज्ञानिक अशा काही संशोधनात व्यग्र आहेत. की ते सिद्ध झाले तर या सर्वांची अस्त्रे पडल्या पडल्याच निष्प्रभ ठरतील. आज अणुसिद्धीकरिता युरेनियम, थोरियम, प्युटोनियमसारखी दुर्मिळ द्रव्ये लागतात व त्यावर अत्यंत खर्चिक व क्लिष्ट व कालावधी लागणाऱ्या अशा प्रक्रिया करून त्यातील सुप्त शक्ती प्रकट करून उपयोगात आणता येते व असे करताना किरणोत्सर्जनाचा धोका असतो तो निराळाच.

मला सद्‌गुरुकृपेने जे काही कळते आहे त्यावरून मला असे वाटते की, सन १९८० ते १९९० च्या दरम्यान कदाचित् त्याच्या पूर्वी सुद्धा काही शास्त्रज्ञ (प्रामुख्याने जपानमधील) असा एखादा शोध लावतील की, त्यायोगे त्यांना युरेनियम वगैरे कशाचीही गरज न लागता साध्या कोळशाच्या अगर रेतीच्या कणातून सुद्धा फारशा प्रक्रिया न कराव्या लागता त्यातील सुप्त शक्ती मोकळी करता येईल व या क्रियेने सर्वसाधारण वैज्ञानिकानासुद्धा अपायकारक किरणोत्सर्गाविरहित कोणत्याही अणूचे विभाजन करता येऊन आतील प्रचंड शक्ती घरोघरी उपयोगात आणता येईल. डायनामोचा प्लँट बसवून ज्याप्रमाणे कोठेही वीज उत्पन्न करता येते तसे, अणुविघटन करण्याचे लहान लहान प्लँटस घरोघर उपयोगात आणता येऊन प्रत्येकाला आपले घरी वीज, एअर कुलर, इस्त्री, पाणी तापविण्यापासून लहानमोठी यंत्रे चालविणे यासारखी कामे करवून घेता येतील. अशा रीतीने आज जी अगदी थोड्या राष्ट्रांची अणुविभाजनाच्या प्रक्रियांची मक्तेदारी आहे ती आपोआपच नाहीशी होईल.

या संदर्भात एक लहानशी चूक होण्याचा संभव असतो. पुष्कळ वेळा येणारी प्रेरणा स्पष्ट नसते. त्यामुळे तिचा अन्वयार्थ लावण्यात थोडी चूक होण्याचा संभव असतो. कारण ती धुरकट दिसत असते. अर्थात त्यात प्रेरकाची चूक नसते. तर त्या संदर्भात स्वीकारण्याची शक्ती कमी पडतें व म्हणून त्यांचा अगदी स्पष्ट असा अन्वयार्थ (Intepretation) लावता येत नाही. शिवाय असे आहे की खगोलात काही इ. स. अगर शक संवत नाहीत. दिवस, महिने, वर्ष या संज्ञा सुद्धा सापेक्ष आहेत; पृथ्वीवरील दिवस चोवीस तासांचा तर चंद्रावरील १५ दिवसांचा व गुरूवरील ९ तासांचा, अर्थात हे तास सुद्धा आपलेच. याप्रमाणे कालमापन सुद्धां सापेक्षच असते व प्रेरणेच्या अनुरोधाने ते अंदाजताना चूक होते—होण्याचा संभव असतो. काल हा अनंत असल्याने मापनीय नाही व त्यामुळे कालाबद्दल अंदाज करण्यात थोडीफार चूक होणे शक्य असते. पुष्कळ प्रज्ञावंत भविष्यवाद्यांच्या बाबतीत मला असे आढळून आले आहे की, त्यांनी सांगितलेल्या घटना निश्चित घडून येतात. मात्र त्यासंबंधी सांगितलेला काल

चुकीचा ठरतो. त्याचे कारण हेच. परंतु यासंबंधात कालमानसुद्धा चूक होईल असे वाटत नाही. कदाचित त्याचा काही भाग या दशकात सुद्धा अनुभवास येईल. हे प्रकरण लिहिण्याचा उद्देश मी आतापर्यंत जे सांगितले आहे त्यापेक्षा थोडा निराळा आहे.

आजपासून साधारण ५० वर्षांनंतर भौतिक प्रगतीची मानवी कल्पनेप्रमाणे परिसीमा गाठली जाईल त्या वेळी किंवा त्याच्या थोडे अगोदरपासूनच मानवास त्या सर्वांत काही तरी उणीव आहे असे भासू लागेल व तो आध्यात्मिक तत्त्वात विज्ञान पाहू लागेल, त्यात शोध घेऊ लागेल व आज आपणास जे केवळ अतर्क्य व असंभवनीय असे वाटते ते विज्ञानाच्या कक्षेत आणून त्यापासून मानवी जीवन आणखी सुखी व संपन्न कसे करता येईल, त्याच्या प्रयत्नास लागेल. पन्नास वर्षांचा काल म्हणजे काही फार नाही. परंतु त्या वेळी अशा प्रकारच्या वैज्ञानिक क्रांतीस सुरुवात होईल व मागील अनुभव व तोपर्यंत झालेली विज्ञानाची प्रगती यामुळे शास्त्रज्ञ या क्षेत्रात पण लवकर प्रगती करून जगास थक्क करतील.

अगदी अलीकडील काळात एक महान वैज्ञानिक ऋषी होऊन गेला. त्याचे नाव आइनस्टीन. त्याने सिद्ध करून दिले की जड व चेतन हे काही एकमेकापासून भिन्न नाहीत. कोणतीही वस्तू, मग ती किती का भिन्न असेना त्यात चेतनाचा भाग असतोच असतो. लोखंडाची महान यंत्रसामुग्री सतत चोवीस तास काम करून थकते म्हणजे Fatigue पावते व इतर सर्व दृष्टींनी कार्यक्षम दिसत असूनही कामाचा उतारा कमी देते. तेच थोडी विश्रांती मिळाली की पुन्हा पूर्वीइतकीच कार्यक्षमता दाखवू लागते. यात तीत बिघाड झालेल्याचा समावेश नाही. त्याचप्रमाणे चेतनाचे. मनाच्या अत्यंत खोल कप्प्यात लहानसा विचार उद्भवला तरी त्याची स्पंदने सुरू होतात व ती दुसरी योग्य अशी व्यक्ती Telepathy किंवा तत्सम साधनाने ग्रहण करू शकते; हाच त्यातील जडाचा भाग समजावा. याप्रमाणे सर्व ब्रह्मांडात अणुरेणूपासून अनंत विश्वापर्यंत एकच एक तत्त्व विराजमान झालेले आहे. हा सिद्धांत त्याने प्रस्थापित केला. त्याने मानवी बुद्धीस अतर्क्य असे अनेक सिद्धांत प्रस्थापित केले आहेत. परंतु या प्रकरणाच्या संदर्भात येवढेच पुरे.

असे असले तरी आपणास माहीत आहे की पाणी म्हणजे दोन भाग हायड्रोजन व एक भाग ऑक्सिजन. म्हणजे दोन्ही निव्वळ वायूच होत. या वायूंखेरीज पाण्यात काहीच नाही. हे खरे असले तरी पाण्याचे काम वायू करीत नाही. किंवा वायूचे काम पाणी करू शकत नाही. त्याचप्रमाणे जरी जड व चेतन अभिन्न असले तरी तो वेळपर्यंत झालेल्या जडाच्या संशोधनाव्यतिरिक्त त्यांना चेतनाच्या बाबतीत देखील संशोधनाची व तीसुद्धा विज्ञानमय शास्त्रीय संशोधनाची आवश्यकता वाटू लागेल. त्यावाचून झालेली प्रगती ही अत्यंत तोकडी आहे, अशी त्यांची खात्री पटेल व ते सर्व पूर्वज्ञान व इतर सामुग्रीसह त्याच्यामागे लागतील. ते संशोधन किती काळ चालेल हे जरी मी आज सांगू शकत नसलो तरी त्यांतील काही महत्त्वाचे शोध ते थोड्याच वर्षांच्य

अवधीत आत्मसात करतील. कारण तत्संबंधी सर्व पार्श्वभूमी आज तयार आहे. ब्रह्मास्त्राचे वर्णन जर आपण वाचले तर त्यात अणुविस्फोटाशिवाय दुसरे काही असेल असे वाटत नाही. अथर्व वेदात असे अनेक प्रयोग दिलेले आहेत.

परंतु आज उपलब्ध असलेल्या वैज्ञानिक प्रगतीमुळे जे आपण सहज समजू शकतो ते त्यावेळी शक्य होत नव्हते. आपले ऋषी द्रष्टे होते. त्यांना स्वतःला त्यासंबंधी पूर्ण ज्ञान होते. परंतु बाहेरील जगात त्यावेळी वैज्ञानिक अशी प्रगती काहीच झालेली नव्हती. त्यामुळे त्यासंबंधी परिभाषा तयार नव्हती; व त्यासंबंधी उपकरणे व इतर साधने नसल्याने ती तयार कशी करावी, ते न सांगता त्यांनी तयार अशी सामग्री दिली. आजच्या वैज्ञानिक प्रगतीमुळे आपण निदान त्यातील तत्त्वे समजू शकतो व त्याआधारे प्रयोग पण करू शकतो. उदाहरणार्थ, काही ठिकाणी असे सांगितलेले आढळते की गायत्री मंत्र उलट म्हटला की तोच ब्रह्मास्त्राचा मंत्र तयार होतो व योग्य रीतीने सिद्ध केला की ब्रह्मास्त्र म्हणून उपयोगात आणता येते. ते कदाचित खरे असेल वा नसेल. (कारण अथर्व वेदात निराळे मंत्र दिलेले आढळतात.) परंतु एक गोष्ट खरी की उलटे म्हणावयाचे म्हणजे खरोखरी काय त्याचीच आपणास कल्पना नसते. आपण १ ते १० अक म्हणतो व त्याचे उलट म्हणावयाचे म्हणजे साहजिकच दहा नऊ आठ सात असे म्हणू-परंतु ते तसे नाही. दहा आकडे एका कागदावर लिहून आरशासमोर धरा ते १०-९-८-७ असे दिसणार नाहीत तेही खरे उलटे नाहीतच. अक्षरातून घ्यावयाचे म्हटले तर दहा नऊ आठ सात असे नसून हे हाद-ऊन-ठआ तसा असे किंवा यापेक्षाही भिन्न येतील, की ज्याची आज आपणास कल्पनाही नाही. कारण त्यातील आ ह द वगैरे सुलटच आहेत. खरोखरी उच्चार काय आहेत ते गुरूकडूनच शिकावयास हवेत असो. आपण थोडे बाजूस वाहवलो हे खरे, परंतु माहिती या दृष्टीने हे जरूर होते.

अणु विस्फोट करून त्यातील अमाप शक्ती उपयोगात आणणे काही अपवादात्मक प्रकारांनी का होईना आज साध्य झाले आहे. दहा वीस वर्षांत असा काळ येईल की कोणीही सामान्य वैज्ञानिक किंवा खाजगी कंपन्या ते व्यापारी दृष्टीने करू शकतील. अणुविस्फोट किरणोत्सर्गविरहित असे प्लॅन्टस मध्यम वर्गास सुद्धा परवडतील असे मिळू लागले तर आश्चर्य वाटावयास नको व त्याचा उपयोग घरोघरी होऊ शकेल. कोणताही शोध कधीही कोणाची मक्तेदारी होऊ शकत नाही. ही गोष्ट सर्वांनी लक्षात ठेवावी. आम्ही शोध लावला हा गर्व खोटा असतो. निसर्ग तो आपणापैकी कोणाकडून करवून घेत असतो व त्याच वेळी त्या विषयातील तज्ञ वैज्ञानिकांच्या डोक्यात तेच विचार घोळत असतात. त्यामुळे तत्संबंधी कोणाचीही मक्तेदारी राहू शकत नाही असो. नंतर ते जडाकडून चेतनाकडे वळतील. योगशास्त्रातील षट्चक्रे व त्यातील दले त्यासंबंधी जे विवेचन आहे त्यांचा नीट अभ्यास केला, तर त्यातील दलात ज पासून क्ष पर्यंत सर्व अक्षरे आहेत व त्या प्रत्येकांत काही समाविष्ट बीजे आहेत.

असे दिसते. त्यातील काही बीजे निवडून काढून, अनुभवून ॐ ह्रीं नमः, ॐ ऐं क्लीं नमः असे बरेच प्रभावी बीजमंत्र पूर्वाचार्यांनी तयार करून मानवी उपयोगाकरिता प्रचारात आणले व त्यांचा निश्चितपणे अनुभव येत आहे.

असे असले तरी बीज म्हणजे काय व अशा अक्षरांना बीज असे का संबोधले आहे ? बीज या शब्दाचे विद्वानांनी निरनिराळे अर्थ सुचविले आहेत. पण आपण सामान्य जन आहोत व विशेष खोलात न पडता त्याचा सहज पचणारा असा अर्थ घेऊ या. बीज म्हणजे बी अ पासून क्ष पर्यंत प्रत्येक अक्षर हे बीज आहे. त्या प्रत्येकात निरनिराळ्या शक्ती व सिद्धी सुप्तावस्थेत आहेत. या योगमार्गाने विकसित कशा करावयाच्या यासंबंधी मी योगशास्त्र या प्रकरणात विवेचन करणार आहे. त्याअगोदर थोडा सर्वसाधारण विचार करूं. आपणास माहीत आहे की वडाचे बीं फक्त मोहरीएवढे असते; परंतु त्यात प्रचंड असा वटवृक्ष सामावलेला असतो. अर्थात ते बीज विकसित करून त्यास वृक्षाच्या स्वरूपात कसे आणावयाचे याची माहीती हवी. त्यास योग्य ठिकाणी पेरून वेळच्या वेळी खतपाणी घालून ते अंकुरित झाल्यावर त्याचे जनावरे व इतर संकटापासून संरक्षण करून योग्य प्रकारे वाढ होईल अशी व्यवस्था केली तर योग्य काळात त्याचा प्रचंड असा वटवृक्ष निश्चित होईल. याशिवाय हेही ध्यानात ठेवले पाहिजे की वडाच्या बीजापासून वटवृक्षच उत्पन्न होईल; इतर नाही. याकरता कोणते बीज कसले आहे व त्या प्रत्येकाची जोपासना कशी करावयाची याची माहितीसुद्धा करून घेतली पाहिजे. नाहीतर वडाच्या बीपासून आंब्याची अपेक्षा करावयाची व तसे झाले नाही म्हणजे निराशा पदरी यावयाची, असे होऊ नये. तसेच प्रत्येक बीज विकसित होण्याचा काळ पण निराळा असू शकतो. याची पण जाणीव ठेवावी. हा एक प्रकार झाला.

दुसरा म्हणजे त्या बीजाचा अणूप्रमाणे विस्फोट करवून त्याचे Energy या स्वरूपात रूपांतर करावयाचे व तिचा उपयोग करून घ्यावयाचा. या दोन्ही क्रियांत व त्यांच्या परिणामात पुष्कळ फरक आहे. पहिल्या प्रकारात त्या बीजाचा प्रचंड वटवृक्ष तयार होऊन त्याची छाया, औषधी उपयोग वगैरे करून घेता येतील. दुसऱ्या प्रकारांत त्यातील सर्व अणूंचें विघटन होऊन त्याचे Energy शक्ती या स्वरूपात रूपांतर होऊन त्याचा परिमितच परंतु वाटेल तो उपयोग करून घेता येईल, त्यास पहिल्यासारखी मर्यादा नाही. तिचे शास्त्रीय रूपांतर होऊन एका कोणत्याही अणूच्या विघटनांपासून जे उपयोग करून घेता येतात ते सर्व करून घेता येतील. यातील जास्त उपयुक्त कोणते ते फक्त अनुभवानेच ठरू शकेल. ज्याप्रमाणे या जड बीजांचे त्याचप्रमाणे अ ते क्ष या अथवा अन्य ह्रीं, क्लीं, ऐं वगैरेसारख्या चेतन बीजांचे समजावे. निदान आज तरी आपणास या चेतन बीजांचे विघटन करून त्यातील सुप्त शक्तींचा कसा उपयोग करून घ्यावयाचा याचे ज्ञान व साधी कल्पनासुद्धा नाही.

पहिल्या प्रकाराबाबत निदान थोडी रूपरेषा माहीत आहे. कोणतेही बी पेरले

म्हणजे त्यास ज्याप्रमाणे खत पाणी यांचा पुरवठा करून काळजी घ्यावी लागते म्हणजे ठराविक काळात फलनिष्पत्ती होऊन आपल्या हाती येते, अगदी त्याचप्रमाणे कोणतेही बीज मग ते ऱ्हीं ॐ असे एकटे असो वा ॐ ह्रीं क्लीं ऐं असे सामूहिक असो, त्याची जपसंख्या ठरलेली असते व जपकालात आचरावयाचे काही नियमही असतात. ती जपसंख्या नुसती पूर्ण करून भागत नाही. प्रथम तो बीजमंत्र हृदयाकाशात स्थापन करावयाचा असतो व नंतर ठरलेल्या विधीप्रमाणे परा किंवा पश्यंतीत त्याची जपसंख्या पूर्ण करावयाची असते. त्यास वासनांचे खत-पाणी करून त्यास त्याच जपमंत्राचा शिडकावा करीत राहावयाचे असते-थोडेसे Auto Vaccine सारखे समजा. जप जर परा पश्यंतीत नसला तर त्याची पेरच होऊ शकत नाही व त्याची स्पंदने पण परिणामकारी होऊ शकत नाहीत. मग तो कितीही कोटींनी करा. तो वरचेवर वाहून जातो. एखाद्या पितळी भांड्यावर हातोड्याने ठोकीत राहिले तर प्रत्येक ठोक्यागणिक त्यावर कायम स्वरूपाचा ठसा उमटतो, काही ठराविक ठोके प्रमाणशीर त्यावर उमटले की ते भांडे वापरावयास योग्य असे तयार होते. अन्यथा नाही. त्याकरिता आपण करीत असलेल्या जपांची स्पंदने परिणामकारी होत राहतील याची काळजी घेतली पाहिजे. हे काही विशेष क्लिष्ट आहे असे नाही. थोड्या प्रयत्नाने ते साध्य होते. असे झाले म्हणजे प्रत्येक स्पंदनागणिक ते बीज अंकुरित होऊन वाढीस लागते. त्याकरिता नियोजित असलेली जपसंख्या पूर्ण होण्याच्या सुमारास ते पूर्ण परिणामकारी होऊन त्याचे संकल्पित व अपेक्षित फळ दृष्टोपत्तीस येऊ लागते व तो जप तसाच चालू ठेवला तर ते टिकते पण. मी पूर्वी सांगितले आहे की कित्येक भक्तिभावनेने म्हणा की फलाकांक्षेने म्हणा कोटींनी जप करतात; परंतु त्याचे काहीच फळ मिळू शकत नाही. याचे कारण एकच की त्याचे तंत्र म्हणा की त्यातील रहस्य म्हणा समजले जात नाही; त्यामुळे श्रम व वेळ फुकट जातात. यासोबत शुद्ध चारित्र्य व पवित्र आहाराची पण आवश्यकता असते. याचीही जाणीव ठेवावी लागते, अन्यथा सर्व व्यर्थ समजावे. हे झाले आपले चालू पद्धतीविषयी.

आता थोडा निराळा विचार करू; तो म्हणजे त्या बीजाचे विघटन करून त्यातील शक्ती (Energy) बाहेर काढून तिचा सर्व कार्यास उपयोग करून घेणे. वरील पद्धतीत प्रत्येक बीजाचा विविक्षित कार्याकरिताच उपयोग करून घ्यावयाचा असतो; यात तसे नाही. एकदा शक्ती सुटी करता आली किंवा तिचे रूपांतर करता आले तर तिचा हव्या त्या कार्यास उपयोग करून घेता येईल. आपण पाहतो की प्रत्येक बीजाच्या शेवटी अर्ध मकार असतो. ॐ ऱ्हीं क्लीं ऐं वगैरे कोणतेही बीज पाहा—ते अर्धमकारांत असते. आजपासून साधारणपणे पन्नास वर्षांच्या कालावधीत अगर त्याच्या थोडे मागेपुढे सर्व बीजांचे खरे महत्त्व पटून त्यातील शक्ती (Energy) मानवी उपयोगाकरता मोकळी करण्याचे प्रयत्न निश्चित केले जातील. योग व त्यातील षट्चक्रे यांच्याकडे आताशी लक्ष वेधू लागले आहे व त्याचे महत्त्वही पटू लागले आहे.

वेदकाली किंवा तत्पूर्वी आज सामान्यपणे अनुभवास येत असलेली वैज्ञानिक प्रगती झालेली नव्हती, तरी पण ऋषिमुनींना त्यांच्या असीम तपःसामर्थ्याने—जरी त्यांना अणुविघटनावादींची सशास्त्र माहिती नव्हती, तरी पण त्यांना ब्रह्मास्त्र, अग्न्यस्त्र वाय्वास्त्र—इतकेच काय पण संमोहनास्त्र वगैरेची पूर्ण माहिती होती. ती त्यांना अणुविघटनात्मक ज्ञान-विज्ञानाने मिळालेली नव्हती तर आयती फलस्वरूप मिळालेली होती व ती त्यांनी त्या वेळी इतर बहुजन समाजाची वैज्ञानिक पार्श्वभूमी तयार नसल्याने जशीच्या तशीच आत्मसात करून ते शिष्यवर्गास शिकवीत गेले. त्यांना अणुविघटन करण्याची सशास्त्र माहिती नसली तरी तपश्चर्येच्या योगाने काय व कसे केले असता अणुविघटित अशी अस्त्रे तयार होतील याचे ज्ञान त्यांना होते. त्यामुळे अणुविघटनात्मक अशी शक्ती अतर्क्य अशी कामे करू शकते याचे त्यांना निश्चित ज्ञान होते व ते फलस्वरूप म्हणजे ब्रह्मास्त्र, वाय्वास्त्र वगैरे अशा स्वरूपात ते शिष्यास प्रदान करीत गेले. मुनींना त्यांच्या अतींद्रिय ज्ञानाने सर्व माहिती व ज्ञान असले तरी त्यावेळचा समाज वैज्ञानिक दृष्टीने फार मागे होता म्हणून त्यांनी समाजास नंतरच्या काळात जाणीव आली तर कार्य करता यावे अशी योजना करून ठेवली. त्यांना नक्की माहीत होते की मंत्रातील बीज इतर सामान्य नियमाप्रमाणे अंकुरित करून त्याचे नियोजित फल पदरात पाडून घेता येते. म्हणून त्यासंबंधी समग्र माहिती त्यांनी समाजास दिली. म्हणजे जप व त्यांची संख्या, नियम, विधी वगैरे. परंतु त्यातील अणू विघटित करून त्यातील अमाप शक्तीचा फायदा घेता घेईल यासंबंधी त्यांनी त्यासोबतच योजना करून ठेवलेली आहे.

खरे म्हणजे अ ते क्ष हे प्रत्येक अक्षर बीज आहे परंतु कोणताही बीजमंत्र अर्धमकारातच आढळतो. ॐ ह्रीम्, क्लीम् वगैरे. या ठिकाणी मी पूर्वी निर्देश केलेल्या उलट्या जपाची आठवण करून देत आहे. उदाहरणार्थ, ह्रीं याचा उच्चार ह्रीम् असा होईल. याचाच उलटा उच्चार करणे झाले तर म् नंतर र व नंतर ई व नंतर ह असा होईल. तो उच्चार कसा होईल याची कल्पना व प्रात्यक्षिक सद्गुरू देऊ शकतील किंवा विज्ञान तेथपर्यंत जाऊन पोचले म्हणजे ते शक्य होईल. म्हणजे ध्यान करीत असताना अर्ध्या म मधून प्रवेश करून त्या बीजाच्या अंतरंगात शिरावयाचे व ध्यानाने प्रयत्न करून त्याच्या आत शिरून फोडून विघटन करावयाचे व त्यातील अमाप शक्ती (Energy) मानवास उपलब्ध करून द्यावयाची ही शक्ती अर्थात शक्तीप्रमाणे कार्य करण्यास समर्थ असली तरी बीजातील कमीजास्त अणु-समुच्चयाप्रमाणे शक्तीचे परिणामही कमीजास्त प्रमाणात राहतील. आपणास माहीत आहे की काही जड अणूंत दोनच Atom असतात, तर काहीत शेकड्यांनी असतात, त्याप्रमाणे काही बीजांच्या बाबतीत समजावे.

वाचक वर्गास वरील वर्णन म्हणजे कदाचित कल्पिताहून अद्भूत वाटेल व हेही खरे आहे की मला जे काही वाटते ते संपूर्णपणे व्यवस्थित व्यक्त करण्यास एक तर

माझ्याजवळ शब्दसमुच्चय अपुरा आहे किंवा आहे त्यातून मला मांडणी नीट करता येत नाही व नीट मांडणी करण्याच्या प्रयत्नात पुनरावृत्ती होऊन कंटाळवाणी मात्र होते. त्यास माझा इलाज नाही. शंभर वर्षांपूर्वी कुणी रेडिओ टेलिव्हिजन समग्र वर्णन केले असते तर त्यास लोकांनी निश्चित वेड्यात काढले असते. माझ्या समजुतीप्रमाणे पन्नास वर्षांनंतरच्या काळात जर कोणी हा मजकूर वाचील तर त्या वेळी विज्ञान याच्या पुष्कळ पुढे गेलेले असल्याने त्यास हे केवळ प्राथमिक स्वरूपाचे ज्ञान तरी वाटेल की नाही याची शंकाच आहे.

असो. अज्ञाताकडील वाटचालीची आगामी पन्नास वर्षांची किंवा थोडी त्यानंतरची मी माझ्या समजुतीप्रमाणे साधारण कल्पना दिली आहे. असे असले तरी पण त्याने आजचा प्रश्न सुटत नाही. शिशू जन्मास येतो म्हणजे काय होते, त्यापूर्वी तो कोठे, कोणत्या स्वरूपात असतो. शिशू होऊन येताना त्याने प्रगतीचा एखादा टप्पा गाठलेला असतो की कसे याची आज कोणास काहीच माहिती नाही. त्याप्रमाणे आज अनेक वर्षे सहवासात असलेली व्यक्ती एकाएकी मृत्युमुळे आपणातून कायमची निघून जाते. ती जाते म्हणजे काय होते, पुढे तिची स्थित्यंतरे काय, कशी व किती होतात त्याचीही आपणास काहीच माहिती नाही. जी काय थोडीफार माहिती आहे, ती या लोकात वास्तव्य करून राहिलेल्या अल्पकालीन जीवनाची. अलीकडे स्पिरिट, त्यांचे वास्तव्य यावर बरीच माहिती उपलब्ध झाली आहे व होत आहे. परंतु या सर्वांत आधारभूत असे शरीर जर येथेच राहाते व नाश पावते व त्यानंतर स्पिरिट जीवन जरी काही असले तरी ते अल्पकालीनच. त्यानंतर पुढे काय हा प्रश्न राहतोच. इकडे पाहावे तर जन्मापूर्वी मी कोण होतो हे अज्ञात. जन्मास आलेला काही कालाने मृत्यु पावणार हे निश्चित. मग मृत्यू नंतर काय होणार आहे हेही अज्ञात. नासते विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।। हे तर चिरंतन सत्य आहे. काही असले तरी मी किंवा कोणीही जन्मापूर्वी काय, कसा व कोठे होता, होता किंवा नाही याची आजच्या विज्ञानास काही माहिती नाही व मिळण्याचे साधन पण उपलब्ध नाही. तसेच मृत्यू म्हणजे काय व त्यानंतर काय होते यासंबंधी थोडीफार माहिती आज उपलब्ध होत असली तरी त्याच्यापुढे काय हा प्रश्न राहातोच व म्हणून हे आहे तरी काय हा प्रश्न निदान आज तरी पूर्ण अनुत्तरितच आहे.

卐 卐 卐

५. मृत्यू व नंतर

मनुष्य कितीही सुशिक्षित असो वा अशिक्षित-त्यास मृत्यूबद्दल काहीतरी विशेष गूढ असे वाटत असते व शक्यतोवर तो त्यासंबंधी विचार करावयाचे टाळीत असतो. स्वतःच्या मनाशी त्याबद्दल पूर्ण विचार करून काही ठरवीत असणारी माणसे अपवादात्मकच. शेकडा ९९ किंवा त्याहून अधिक सतत विचारप्रवाहात वाहात जात असतात. अशा रीतीने वाहताना जे काही घडत जाईल अगर होईल ते होईल; मग त्यास दैव वगैरे सारखी नावे देऊन मोकळे होण्याकडे मानवी मनाची प्रवृत्ती असते. विचारप्रवाहात आपणास हवे तसे वळण लावून आयुष्याचा काल क्रमणारी माणसे विरळाच त्यातल्या त्यात मृत्यूबद्दल तर बहुतेकांनी धसकाच घेतलेला असतो. व स्वतःच्या मनाशी सुद्धा त्याबद्दल विचार करण्याचे ते टाळीत असतात. काही झाले तरी मृत्यू हा अटळ आहे व जी गोष्ट कितीही प्रयत्नाने टाळता येण्यासारखी नाही, तिला भिऊन तीपासून दूर राहण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा तिच्या स्वागतास तयार असलेले बरे असते. निदान त्यायोगे होणारा मनस्ताप तरी टाळता येतो.

कोणतीही रेषा केव्हाही सरळ असू शकत नाही. मग ती कितीही लहान अगर मोठी असो. ती एका फार मोठ्या वर्तुळाचा भाग असते. या गोष्टीवर कदाचित आपला विश्वास बसणार नाही. परंतु ही सत्य परिस्थिती असून विज्ञानाने सिद्ध झालेली आहे. पृथ्वीचा कोणताही पृष्ठभाग अथवा सागराचा क्षितिजापर्यंतचा प्रदेश आपणास सपाट दिसतो. परंतु तो तसा नसून एका मोठ्या वर्तुळाचा भाग आहे ही गोष्ट जगमान्य आहे. सूर्याचे किरण सुद्धा सरळ रेषेत येत नसून ते सुद्धा वक्र (curved) असतात ही गोष्ट प्रसिद्धच आहे. सुप्रसिद्ध महान वैज्ञानिक श्री. आइन्स्टीन यांनी हीच गोष्ट प्रामुख्याने सिद्ध केली आहे. याचा अर्थ या विश्वात कोणतीही वस्तू सरळ रेषेत असू शकत नाही. तर ती फार मोठ्या वर्तुळाचा लहानसा भाग असते. जी गोष्ट अवकाशाची तीच गोष्ट त्याच प्रमाणात काळाची. 'वैतरणेच्या ऐलतिरी' या ग्रंथात आपण पाहिले आहेच की आकाशाखेरीज काल व कालाखेरीज अवकाश यांना अस्तित्वच नाही. ती दोन्ही एकमेकात् संपूर्णपणे सामावून घेऊन मार्गक्रमण करीत असतात. त्यामुळे त्याचा तो मार्ग वर्तुळाकारच असला पाहिजे हे ओघानेच आले. आपल्या प्रचंड विश्वसंस्थेचे थोडे निरीक्षण केले तर असे आढळून येईल की, दरक्षणी हजारो सूर्य उत्पन्न होत आहेत व हजारो स्फोट होऊन विरळ विरळ होत जाऊन नाहीसे होत आहेत. त्यातूनच नवीन नवीन सूर्यांची उत्पत्ती होत आहे. हे अनंत कालापासून सुरू असून अनंत काळ चालू राहणार आहे. विलय अथवा मृत्यू ही जीवन व त्यानंतरची एखादी अवस्था यातील एक विशिष्ट घटना आहे ही गोष्ट उघड

आहे. मात्र याचा अर्थ असा नाही की, मृत्यू अगर विलयानंतर तीच व्यक्ती किंवा वस्तू पुन्हा उत्पन्न होत असते. याचा अर्थ इतकाच होतो की, त्या वस्तूचे अथवा व्यक्तीचे चिदाकाशात विलीनीकरण होऊन निराळ्या स्वरूपात रूपांतर झाले आहे किंवा होत आहे. पाण्याने भरलेल्या बादलीतून एक वाटीभर पाणी काढून घेऊन तींत पुन्हा तितकेच टाकले व पुन्हा तितकेच काढून घेतले तर तेच पाणी येईल असे नाही. त्यात शाश्वत तत्त्व इतकेच की “नासते विद्यते भावो नाभावो विद्यते सतः। ” असलेले काही नाहीसे होत नाही व नसलेले कधी उत्पन्न होत नाही हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

उत्पत्ती, स्थिती व लय हा सृष्टीचा क्रम आहे व त्यात एक तत्त्व आहे की अखिल विश्वातील शक्ती (Energy) ही ठराविक असते. त्यातून जग जगते व त्यास आनुषंगिक विचार, मनादि उत्पन्न होत असतात. काही काल अस्तित्वात राहून उलट-क्रमाने त्याचे त्याच विश्वशक्तीत (Cosmic energy) रूपांतर पावून विलीन होत असतात. अशा प्रकारे त्या अनंत विश्वशक्तींतून उत्पत्ती, स्थिती व लय ही सतत होत आहेत व होत राहणार, त्याकरता उत्पत्ती, म्हणजे पूर्वी कधीही नसलेले नवीन असे काही नव्हे. की लय म्हणजे त्याचा कायम शेवट नव्हे; तर ती दोन्ही विशिष्ट मालिकेतील घटक होत. प्रवाहात बुडबुडे उत्पन्न होतात, काही काळ राहतात व नाहीसे होतात व पुन्हा उत्पन्न होतात म्हणून त्या प्रवाहातील पाण्यात काही कमी-जास्त होते असे नव्हे, प्रवाह तोच व तेवढाच राहतो. बुडबुडा हा पाण्याचाच एक भाग असतो, त्यास थोडा वेळ आकार येतो.

आपण पाहिलेच आहे की, अवकाश ही त्या परम पुरुषाची प्रकृती होय. याखेरीज त्यात अनंत गोष्टी सामावलेल्या आहेत की ज्यांची आपणास साधी कल्पनाही नाही व येऊ शकणार नाही. कारण आपणांस आपल्या पंचज्ञानेंद्रियांमार्फत शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यांचेच फक्त ज्ञान होऊ शकते व ते सुद्धा अगदी अल्प प्रमाणात. याखेरीज अनंतकोटी विश्वात असलेली अनंत प्रकारची ज्ञानसंपत्ती आपणांस अज्ञात आहे. व अज्ञातच राहील. कारण तिचे ज्ञान करून घेण्याची साधनेच आपणापाशी नाहीत. असे असले तरी ज्ञात असलेल्या एका महत्त्वाच्या तत्त्वाकडे आपले दुर्लक्ष होत असते.

सत्, चित् आणि आनंद. आपण नेहमी म्हणतो की, परमेश्वर सच्चिदानंद स्वरूप आहे. परंतु म्हणजे काय याचा आपण कधी फारसा विचार करीत नाही. सत् म्हणजे कालावकाशात उत्पन्न होऊन काही काळ स्थिर राहून त्यातच विलय पावत असलेली स्थिरचरादिसह जड व चैतन्यमय अशी अनंत कोटी व अनंत प्रकारची विश्वे होत. त्यात किडा, मुंगी आदीपासून पाषाण, पर्वत, समुद्र नद्या यांनी युक्त पृथ्वीपासून चंद्र, सूर्य, तारे आदींनी युक्त अशी अनेक विश्वे आली. चित् म्हणजे या सर्वांस उत्पत्ती कारण असून त्यांना काही काल अस्तित्वात ठेवून स्वतःच त्या सर्वांचा विलय करीत राहून हे विश्वचक्र अखंड चालू ठेवणारी जी शक्ती तेच चित्. तीस

CS CamScanner

आपण God's will चित्शक्ती किंवा Cosmic energy असे म्हणूया. ही अनंत विश्वे सतत गतिमान ठेवण्यात होणारा जो चित्शक्तीचा विलास तोच आनंद. कल्पना करा की एंजिन आहे, वीज किंवा वाफ आहे परंतु ते चालू करावयास कोणी नाही; तर काय होइल, की सर्व असून सुद्धा ते जडवत् पडून राहील व ते असून नसून सारखेच. या करता कालावकाशातील आवर्तांचा, अनंत विश्वाचा विलास गतिमानता चालू ठेवण्यास चितशक्तीची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे तिच्या संचलनाची पण आवश्यकता असते. हेच थोडे दुसऱ्या प्रकारे निवेदन केले तर मला वाटते, लवकर उमज पडेल.

जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक आइस्स्टीन यांनी एक सिद्धांत प्रस्थापित केला आहे की जगातील यच्चयावत सर्व वस्तू या शक्तीची स्वरूपे आहेत. दगड घेतला तरी तो दगड नसून (Solidified) घनत्व पावलेलीं चित्शक्तीच आहे. जगातील अद्ययावत वस्तूंचे अंतिम स्वरूप Energy च आहे. चित्शक्ती स्वतः घन Solid होऊन स्थिरचरादि बनते. तीच त्या सर्वांस काही काल स्थिर ठेवते व तीच तिच्या स्वतःच्या रूपात विलीनीकरण करून घेत असते. वस्तू घडवणारी तीच; वस्तू बनणारी तीच. काही काल स्थिर टेवणारी तीच व नंतर काही क्रिया करून आत्मस्वरूपात विलीन करून घेणारी तीच ती चित्शक्ती. या सर्वांत तिच्याशिवाय काही नाही. विश्वरूपाने तीच नटते. तीच त्यास काही काल अस्तित्वात ठेवते व तीच त्यास स्वरूपी विलीन करून घेते. एकूण काय तर या विश्वसंसारात तीच ती सर्वत्र, सर्व स्वरूपात व क्रियांत नटलेली आहे. विषय थोडा क्लिष्ट आहे. म्हणून वारंवार पुनरावृत्ती करुन लिहावे लागते. कारण यावर पुढील बराच भाग आधारित आहे हेच थोडे निराळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे समजा, एक साधा विचार आहे. तो ' विचार ' हे स्वरूप कसे धारण करतो याचा आपण कधी विचार केला आहे काय ? विचार तयार होताना ती चित्शक्ती वापरली जाते किंवा तीच विचारांचे स्वरूप धारण करते. दगड ज्याप्रमाणे Solidified form energy आहे, तसाच विचार. पण तो मनात प्रवेश करतो. त्यावेळी ज्या शक्तीचा व्यय होतो ती हीच. ज्याप्रमाणे मन त्यानंतर त्या विचारांचे आघात मेंदूवर करून स्पंदने उत्पन्न करते. त्यात चित्शक्ती कार्य करीत असते. कारण स्पंदने उत्पन्न करण्यात काही शक्तीचा व्यय होतच असतो. पुढे मेंदू शरीरास हुकूम करून तो अमलात आणतो. तसे करतानाही हीच चित् शक्ती काम करीत असते पुढे शरीर तो हुकूम अमलात आणताना सुद्धा काहीतरी शक्तीचा व्यय होतांच. मग तो हात उचलून दुसऱ्या ठिकाणी ठेवण्याचा प्रत्यक्ष असो, वा हृदयाचे स्पंदन अथवा रुधिराभिसरण असा अप्रत्यक्ष असो. मी म्हणतो मुंगीने एक विचार केला. थोडेसे चालत गेली. तिच्या हृदयाचे स्पंदन झाले. या सर्वांत काही तरी शक्तींचा व्यय झालाच. तिने ती कोठून आणली व ती शक्ती तरी कोणती ? तर हीच चित्शक्ती या कालावकाशातील. सर्व अनंतकोटी विश्वात सर्वत्र सर्वकाळ

अखंड भरलेली आहे. तीतील काहींचा उत्पत्ती, स्थिती, लयादि मध्ये विनियोग होतो व त्या सर्वांस पुरून ती उरलेली असते. व ही विनियोग पावणारी शक्तीसुद्धा अन्यरूपाने कालांतराने या मूळ शक्तीतच येऊन समाविष्ट होते व ती चित्‌शक्ती अंतर्बाह्य तितकीच कायम राहाते. कारण कोणत्याही स्वरूपात मग ते जड असो वा चेतन (Matter or spirit) त्याची घटना, गतिमानता अस्तित्व व विलय या सर्वांत तीच ती निरनिराळी स्वरूपे घेऊन काम करीत असते. आपल्या अध्यात्म ग्रंथांत ब्रह्माचे जे वर्णन केले आहे ते यास बहुतांशी लागू पडते. ब्रह्माची समजावणी बऱ्याच क्लिष्ट व तांत्रिक भाषेत देण्याचा प्रयत्न केला गेल्यामुळे, ते सामान्य जनास कधीही न सुटलेले एक गूढ असे कोडेच राहिले. परंतु या चितशक्ती (Cosmic energy)चे तसे नाही. ही एक विज्ञानाने सिद्ध झालेली व रोजच्या व्यवहारात प्रत्यक्ष घडणारी व अनुभवाला येणारी गोष्ट आहे. विचार आहे, मन आहे, मेंदू आहे, शरीर आहे, सर्व काही आहे; परंतु विचारांना स्पंदनच नाही. त्यामुळे विचार मनावर काही परिणाम करू शकणार नाही. मन मेंदूवर व मेंदू शरीरावर काही करू शकणार नाही, त्यामुळे ही सर्व असून नसून सारखीच होतील. त्यामुळे विचारांच्या ठिकाणी चैतन्यशक्ती हवीच, त्याचप्रमाणे ती मन व मेंदू व शरीरातील सर्व अणुरेणूंच्या ठिकाणीसुद्धा असणे आवश्यक आहे. इतकेच काय परंतु विचारात विचारत्व येण्यास, मनास मनत्व व शरीरास शरीरत्व येण्यास चित् शक्तीचेच कार्य अपरिहार्य असते. मी म्हटलेच आहे की, विषय थोडा क्लिष्ट आहे. परंतु मोठ्या विचाराने तो नीट ध्यानी येईल.

मातेच्या उदरात वीर्यबिंदू पडला की, त्याची वाढ सुरू होते. तो वीर्यबिंदू आपल्या वाढीस आवश्यक असलेली चित्‌शक्ती त्या विश्वशक्तीतून घेऊन कार्यप्रवण होत असतो. बिंदू वाढीस लागला म्हणजे हळूहळू त्याची वाढ होत जाईल तसतसे त्याचे मन पण सुप्तावस्थेतून हळूहळू विकास पावत असते हें सर्व होत असताना शक्तीचा काहीतरी व्यय होत असतोच. मेंदू आहे, हात आहे, पाय आहे, सर्व काही आहे. मेंदूने हातापायास हलचाल करण्याचा हुकूम दिला; परंतु त्यात चलनवलन करण्याची शक्तीच नाही; तर हालचाल कोठून होणार ? विचार-मनादी उत्पन्न होण्यापासून ते शरीर, त्यातील सर्व अवयवांसह कार्यप्रवण होण्यास व पाहण्यास काहीतरी शक्तीचा व्यय होत राहाणारच. पण मुळात त्याच्या ठिकाणी ती शक्तीच नसली तर तिचा व्यय तरी कसा होणार ? याकरिता विचार, मन, मेंदू सर्व अवयवयुक्त शरीर ही जसजशी उत्पन्न होऊन वाढत जातात तसतसे ते या महान विश्वशक्तीतून (Cosmic energy) आपले अस्तित्व कायम व गतिमान ठेवण्यात आवश्यक असलेली चित्‌शक्ती आपणात सामावून घेतात व काम पडेल तसा तसा तिचा व्यय करतात. हा व्यय होत असताना आवश्यक ती भरपाईसुद्धा करून घेण्याची क्रिया पण सुरू असते. याप्रमाणे हाताची हातास, पायाची पायास, हृदयाची हृदयास, मनाची मनास, विचारांची विचारात अशी चित्‌शक्ती ज्याची त्यात सामावून घेतलेली असते, तसे नसते तर ते

किंवा त्यांचा कोणताही भाग गतिमान राहूच शकला नसता. शरीर, मन व विचार यातील कण न् कण त्या महान चितशक्तीतून आवश्यक तितकी हमेशा अवगाहन करून स्वतःचे अस्तित्व व गतिमानता कायम ठेवीत असतात. या कारणाने त्यांच्याभोवती या शक्तीचे एक प्रकारचे आवरणच तयार झालेले असते व त्याचा आकार पण शरीरासारखाच असतो. बादलीतून तांब्याभर पाणी घेतले तर ते तांब्यातच आहे, तोपर्यंत त्यास तांब्याच्या अंतर्भागाप्रमाणे आकार येईल. तसे हे आवरण शरीर-मनादि कायम आहेत तोपर्यंत कायम राहते व काही कारणाने शरीर मृत झाले म्हणजे ते शरीरापासून सुटे होते. त्यास Astral body किंवा Spirit body अथवा मराठीत लिंगदेह अथवा वासना देह अशी संज्ञा आहे. खरोखर ही चारही नावे अन्वर्थक नाहीत. एकानेही सत्यस्वरूपाचा बोध होत नाही. तरी पण वासनादेह हे नाव काहीसे बरे आहे व या ग्रंथातील संदर्भात पुष्कळ उपयोगी आहे. म्हणून त्यास वासनादेह या नावानेच संबोधू या. आपले शरीर अस्तित्वात असते तोपर्यंत या Spirit body अथवा वासनादेहाचे शरीराभोवती अंतर्बाह्य आवेष्टन असते. शरीर मृत झाले म्हणजे हे चितशक्तीचे आवरण शरीराकडून कसलेही काम करून घेण्यास असमर्थ ठरते. म्हणून ते सुटे होऊन काही काल स्वतंत्र रीतीने वावरत असते. मृत शरीर जर जाळून न टाकता तसेच राहू दिले तर कोणत्या तरी स्थितीत वर्षानुवर्षे राहू शकेल. ते अगोदर सडेल, त्यावरील त्वचा, मांस वगैरे नाहीसे होईल व हळू हळू हाडे पण नाहीशी होतील. त्यास कित्येक वर्षांचा काळ लागेल. त्याचप्रमाणे शरीरापासून सुटा झालेला वासनादेह वासनांच्या तीव्रतेप्रमाणे कमीअधिक काळ टिकतो व हळूहळू त्या चितशक्तीत विलीन पावतो. मनुष्य किंवा कोणताही प्राणी जन्मास आला की,त्याची Spirit body सुद्धा लगोलग तयार होऊ लागते व त्याच्या इच्छा आकांक्षा, वासना जसजशा वाढत जातात तसतशी ती दृढ व दृढतर होत जाते. आपल्या शास्त्रांत म्हटले आहे की ‘ अंते मति सा गतिः ’ हे तत्त्वार्थाने अगदी बरोबर आहे. कल्पना करा, आपण आज सकाळी काय जेवलो असे विचारले तर आपण सहज सांगू शकू. तसेच, इतक्यात काय वाचले ते पण सांगू शकू. परंतु कोणी विचारले की आपण आठ दिवसापूर्वी काय जेवलो अगर काय वाचले तर आपणास आठवण करूनही फारसे सांगता येणार नाही. अगदी त्याचप्रमाणे वासनादेह शरीरापासून सुटा झाला की मृत्युसमयी ज्या वासना, इच्छा, आकांक्षा, अगदी तीव्र, तीव्र-तरतम असतील त्या मानाने त्याचे वासनादेहाचे अस्तित्व कमी जास्त टिकते. एखादा मनुष्य लढाईत किंवा अपघाताने अकस्मात वारला तर त्याच्या सर्व वासना, सूडादि भावना तीव्र स्वरूपात असतात व वासनादेह सुटा होतो व त्याच भावनांचा विचार करीत तो फिरत राहातो. याउलट एखादा मनुष्य बरेच महिने आजारी पडून मरण पावला तर शेवटी शेवटी आपणास आता हा देह सोडून जाणे भाग आहे, याची कल्पना त्यास आलेली असते व देहाप्रमाणे मन पण थकलेले असते. त्यामुळे मृत्यूनंतर

त्याच्या वासना इतक्या तीव्र राहात नाहीत व त्यास वासनादेहातून लवकर सुटका होण्याचा संभव असतो.

आपले विचार व मन हे बहुतांशी आपले डोके व मेंदूच्या आधारे वास करीत असतात. म्हणून त्या व्यक्तीचे विचार व मन ज्यामानाने प्रगल्भ व विकास पावलेले असते त्यामानाने लहानमोठे असे चित्शक्तीचे प्रकाशवलय तयार होत असते व ते संत महात्मा, रामकृष्णासारखे ईश्वरावतार यांच्या डोक्याभोवती दाखविण्यात येते. त्यास इंग्रजीत Aura असे म्हणतात. ते वलय ज्यांची अध्यात्मात विशेष प्रगती झाली आहे त्यांना दिसू पण शकते. ज्याप्रमाणे डोक्याभोवती, त्याचप्रमाणे शरीराभोवती अंतर्बाह्य या चित्शक्तीचा वास असतो व ती त्याच आकाराने वास करून असते व तीच मृत्यू नंतर वासनादेहरूपाने सुटी होऊन काही काल कार्यक्षम राहाते यावरून लक्षात येईल की मृत्यु म्हणजे आपण समजतो त्याप्रमाणे त्या व्यक्तीपुरता सुद्धा सर्व बाबतीत शेवट असे नाही. तर फक्त त्याच्या शरीराच्या सर्व क्रियांचा शेवट इतके मात्र खरे. मृत्यु-नंतर सुद्धा वासनादेह संस्कारानुरूप व वासनांच्या तीव्रतेप्रमाणे कार्य करीत राहतो. त्यामुळे मृत्यु म्हणजे जडशरीर व वासनादेह यामधील एक टप्पा किंवा दुवा असे म्हणता येईल.

या ठिकाणी एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. शरीराची मानसिक अथवा शारीरिक कोणतीही क्रिया असो ती मनामार्फत होत असते. मन हे काय आहे, कशाचे बनले आहे वगैरेंची अद्याप कोणासही काहीच कल्पना नाही. ज्याप्रमाणे आज वीजविषयक ज्ञान पुष्कळच प्रगत असून तिच्याकडून मानवाच्या उपयोगी अशी पुष्कळच कार्ये करवून घेतली जात आहेत व असे असले तरी वीज म्हणजे काय याचा अद्याप कोणासही शोध लागलेला नाही, फक्त ती काय करू शकते, तिच्याकडून काय करून घेणे शक्य आहे, ती कशी उत्पन्न करावयाची वगैरेंची आपणास काहीशी माहिती आहे; त्याप्रमाणे मन हें काय आहे, ते कशाचे बनलें आहे याची कोणास काहीच कल्पना नाही. तरा पण मनाच्या कोणकोणत्या क्षेत्रात काय काय क्रिया होत असतात, त्यांच्या अथवा कोणकोणत्या, अथवा त्यांच्याकडून काय काय करवून घेता येते अथवा येईल याची अल्पशी माहिती मात्र आपणास उपलब्ध आहे. अगदी स्थूल मानाने विचार केला तर व्यक्तिगत मन हे त्या व्यक्तीच्या विचारांचा प्रचंड साठा आहे. एखाद्या तलावातील पाण्याप्रमाणे त्यातील बहुतांश विचार हे सुप्तावस्थेत असतात, तर त्यातील काही पृष्ठभागावर येऊन तरंगरूपाने कार्य करीत असतात. विचारांखेरीज मन म्हणजे काय याची आपण कल्पनाच करू शकत नाही. पाण्यावाचून तळे असूच शकत नाही. हे खरे असले तरी पाणी म्हणजे तळे नव्हे. त्याचप्रमाणे विचारावाचून मनास अस्तित्व नाही हे खरे असले तरी विचार म्हणजे मन नव्हे व मन म्हणजे सुद्धा विचार नव्हे. विचार कसे तयार होतात, कसे कार्य करतात ? भाषा कोणतीही असली तरी विचार तेच

असतात, ते भाषांतरित कसे होतात, भाषाविरहित विचार कसे असतात, हा अगदी निराळा विषय असून तो या ग्रंथाच्या कक्षेबाहेरील आहे. आपला संबंध इतकाच की विचार मनामार्फत मेंदू व त्याच्या भागावर हुकूम सोडून कार्य करवून येत असतात;— मग ते कार्य हातपाय हालविण्यासारखे प्रत्यक्ष असो किंवा रुधिराभिसरण, अन्नपचन यांसारखे अप्रत्यक्ष असो.—ती सर्व कार्ये मनाच्या हुकमतीखालीच चाललेली असतात. मनात विचार नसले तर ते मनच नव्हे. काही ना काही विचार सर्वदा प्रवाहीत असतात मग आपण जागे असो वा नसो, काही विचार सुप्तावस्थेत असतात व योग्य वेळी मनःपृष्ठभागावर येतात. आपण विचार करतो म्हणण्यापेक्षा विचारप्रवाहाबरोबर वाहात असतो हे म्हणणे जास्त संयुक्तिक होईल. लाखातील एखादाच खरोखरी विचारावर ताबा ठेवून विचारांना विचार करावयास लावतो. मन हे विचारांच्या साहाय्याने मेंदूवर तरंगाचे आघात करीत असते व त्या आघातांनी मेंदूचा विशिष्ट भाग कार्यप्रवण होऊन शरीरामार्फत कामे करवून घेत असतो. कधी कधी मन वेडासारख्या व्याधीने विकृत असते-अगर शरीर अर्धांगासारख्या विकारांनी हुकूम अमलात आणण्यास असमर्थ असते ती गोष्ट निराळी. विचारामार्फत मन व मनामार्फत शरीर ही कार्यप्रवण होत असतात. हे खरे असले तरी शरीर म्हणजे मन किंवा विचार नव्हे. ते एक साधन आहे. एक गोष्ट मात्र निश्चित की विचार व मन ही स्वतंत्र असली तरी मेंदू व शरीर ही असल्याखेरीज ती काही कार्य करू शकत नाहीत. विचार व मन यांना मेंदूचे व मेंदूस शरीराचे साधन आवश्यक असते तसे नसले तर ही सर्व असूनही निरर्थक होतील. याचा अर्थ असा होईल की, शरीर मृत झाले की मन व विचार ही स्वतंत्र असूनही अकार्यक्षम अशी होतील. वेड किंवा अर्धांगासारखा विकार झाला तर विचार व मन ही दोन्ही असूनही काही कार्य करू शकत नाहीत. मग जर सर्व शरीरच अकार्यक्षम झाले तर विचार व मन ही असली काय अगर नसली काय, ती काय व कसे करू शकणार असा प्रश्न उभा राहील व तो सकृत्दर्शनी योग्य पण वाटतो. कारण मन व विचार यांचे आविष्कार करणारे शरीरच नाहीसे झाले तर ते काय करू शकणार ? मग मरणोत्तर अस्तित्व वा पुनर्जन्म वगैरे प्रश्नच उद्भवत नाहीत.

याबाबत तात्त्विक भूमिका थोडी निराळी व खोल अशी आहे. शरीर, मन, विचार ही सर्व आहेत; परंतु विचारास विचारत्व, मनास मनत्व कोणी दिले वा कसे आले ? विचारांपैकी काही सुप्तावस्थेत ठेवून त्यांपैकी योग्य वेळी पृष्ठभागावर आणून त्याचे मेंदूवर आघात करावयास लावण्याची क्रिया कोण व कशी करतो, त्याचप्रमाणे मन, शरीर, अवयव, वगैरे सर्व आहेत, परंतु चलन-वलन करण्याची शक्तीच नाही. तर ती निरनिराळ्या प्रसंगी निरनिराळ्या स्वरूपात योग्य प्रमाणांत कशी पुरविली जाते व ती कोठून येते, ही सर्व योजना कशी व कोण करीत असतो हा फार महत्वाचा प्रश्न आहे. कारण विचार मनादि आहेत तशीच शक्ती (Energy) पण

आहे. परंतु तिची योग्य ठिकाणी योग्य वेळी अंमलबजावणी झाली पाहिजे. तरच हें सर्व विश्व चालू राहू शकेल. या ठिकाणी मात्र अज्ञाताचा प्रदेश सुरू होतो.

विचारास आकार, रंग, रूप वगैरे सर्व असतात व एकाचे विचार दुसऱ्यास समजू शकतात. सांगून तर समजतातच, परंतु न सांगताही (Telepathy) सारख्या साधनांनी समजू शकतात याचा अर्थ ते तयार होण्यास रंग, रूप धारण करण्यास—तसेच एका मनातून दुसऱ्या मनात संक्रमण करण्यास काही शक्ती लागत असलीच पाहिजे. तसेच, समजा मला दूध हवे आहे, तर मी म्हणेन की 'मला दूध हवे'. गुजराथी म्हणेल की 'म्हने दूध जोइये'. इंग्रज म्हणेल की, 'I want milk.' विचार एकच परंतु शब्दप्रयोग निरनिराळे व ते सुद्धा एकमेकांस न समजण्यासारखे, ही भाषांतराची क्रिया कशी होते ! त्यातही काही शक्तीचा व्यय होतोच. तसेच नुसते मन आहे परंतु त्याच्या मनपणाची जाणीव केव्हा होईल की ते जेव्हा काही कार्यप्रवण होईल तेव्हाच. म्हणजे सतत येत राहणाऱ्या विचारांतून निवड करून त्यांची सुसंगत मांडणी करून, त्यातील तात्कालिक उपयोगी असे जे नसतील त्यांस सुप्तावस्थेत ठेवून व जरूर त्यांना पृष्ठभागावर आणून, त्यांच्याकडून मेंदूच्या विवक्षित भागावर आघात करून शरीर कार्यप्रवण ठेवणे, या सर्वांस सुद्धा पुष्कळ शक्तीच्या संचय व्ययाची आवश्यकता असते. आपण नेहमी मन, विचार, शरीर व त्यांच्या क्रिया यांची एकत्र गल्लत करीत असतो. परंतु विचार व मन ही शरीरापासून स्वतंत्र आहेत हे आपण मागे पाहिलेच आहे व ते शरीराच्या मृत्यूनंतर स्वतंत्र होऊन काही काल Spirit अथवा वासनादेहाने अस्तित्वात राहतात हेही आपण पाहिलेच आहे. मृत्यूनंतर जे काही राहते व भासमान होते त्यास काही ठिकाणी मृतात्मा असे संबोधले जाते. परंतु हा शब्दप्रयोग चुकीचा आहे. कारण एक तर हा आत्मा नसतो व असला तरी त्यास मृत म्हणणे चुकीचे आहे. मृताचा आत्मा असे सुद्धा म्हणता येणार नाही. कारण मृत्यू ही एक फक्त मधली स्थिती आहे. पुढील क्रिया सुरूच असतात.

आपल्या मनात विचारांचा प्रवाह सदैव सुरू असतो. काही विचार मनाच्या पृष्ठभागावर असतात तर काहीं सुप्तावस्थेत तळाशी राहून कारणपरत्वे वर येऊन आपले कार्य करून परत सुप्तावस्थेत जातात. काम, क्रोध, लोभ, मद, मोहादि सर्व विकार—आप्तस्वकीयाबद्दलचे प्रेम, शत्रुवर्गाबद्दलचा द्वेष, स्वतःसंबंधी सत्ता; कीर्ती; द्रव्य, प्रॉपर्टी इत्यादींबद्दलच्या इच्छा, आकांक्षा वगैरे सर्व मंडळी आपणांस कळत वा न कळत मनात दृढ घर करून मनाच्या अगदी तळाशी जाऊन पडलेली असतात व यापैकी कित्येक तर कित्येक वर्षांच्या निकट सहवासाने केवळ मनोमनच किंवा मनाचा भागच बनलेली असतात. शरीर मृत्यु पावते त्यावेळी Spirit body बरोबर मन या सर्व वासनांसहीत बाहेर पडते व ही पृथक झालेली Spirit body प्रामुख्याने वासनांचीच बनलेली असते. म्हणून त्यास आपण वासनादेह ही संज्ञा दिली आहे. परंतु Spirit body ही वासनादेह व त्यापेक्षा काही अधिक अशी असते. ते चित्

शक्तीचे शरीर व मन यास अंतर्बाह्य व्यापून असलेले आवरण असते हे आपण पाहिलेच आहे. त्यामुळें वासना अधिक चित्शक्ती असे Spirit body चे स्वरूप असते. तरी पण तिचा बहुतांश भाग वासनामयच असतो. काही पाश्चात्य विद्वानांचे असे मत दिसते की ही Spirit body अमर असते व ती प्रगत होत होत निर्वाण स्वरूपांत जाते. खरोखरी तशी वस्तुस्थिती नाही. ज्या वस्तूस जन्म आहे तिला स्थिती, काल हा आहेच. तिचा त्याच क्रमाने विलय पण झालाच पाहिजे. हा सृष्टिक्रम आहे. त्यात अपवाद नाहीं; एवढे मात्र खरे की मृत्यूसमयी जर काही वासना, आशा, आकांक्षा अत्यंत तीव्र स्वरूपात मनात वास करीत असतील तर त्यांचा उपशम होऊन सर्व Spirit body विलय पावण्यास फार कालावधी लागतो. याकरता मृत्युसमयी कोणत्याही वासना नसलेल्याच बऱ्या. कदाचित राहिल्याच तर त्या अत्यंत सौम्य स्वरूपात असाव्यात याची काळजी घ्यावी.

कोणी राजा असो वा रंक. मोठा महात्मा असो वा महापापी. त्याच्या शरीराचा मृत्यू झाला म्हणजे त्याच्या मरणकाळच्या वासना व संस्कारानुरूप त्यास वासनादेह प्राप्त होतो अशी आपली धार्मिक कल्पना आहे. तसे नसून, तो तशा प्रकारचा वासनादेह सुटा होऊन संचार करू लागतो, ही वस्तुस्थिती आहे. वासनांचा बरेवाईटपणा व तीव्रतेप्रमाणे हा वासना देह त्या महान शक्तीत विलीन होईपर्यंत अस्तित्वात राहातो व वासना व संस्कारांप्रमाणे सतत त्यातच रममाण होऊन भटकत असतो. मरणकाळी जितका व्याप अधिक तितक्या यातना अधिक व त्या देहातून मुक्त होण्याचा कालही अधिक. त्या मानाने समान्य लोक पुष्कळ बरे. पृथ्वीवर शरीरधारी असताना कोणी राजा असतो, कोणी सेनापती, कोणी पंतप्रधान, तर कोणी राष्ट्रपती, कोणी उद्योगपती, कोणी गर्भश्रीमंत—सतत मोटारगाड्या व आराम यात लोळणारा. कोणी चोर दरवडेखोर, कोणी महान विद्वान, सतत आपल्याच विद्वत्तेच्या घमेंडीत असणारा. असा प्रत्येकजण आपापल्या परीने स्वतःस काहीतरी समजत असतो. ते सर्व मृत्यूनंतर एकदम एकाच मालिकेत येऊन पडतात. पुष्कळ वेळा आपण मृत्यू पावलो आहोत हेच त्यांस खरे वाटत नाही. तो आपल्याच तोऱ्यात व गुर्मीत असतो. परंतु लवकरच त्यास जाणीव होऊ लागते की सतत मागे मागे असणारे व थुंकी झेलीत असलेले त्याच्याभोवती कोणीच आढळत नाही, त्याची नोकरचाकर मंडळी समोर असूनही कोणी त्याच्याकडे ढुंकून पहात नाही. मोटार गाड्या, गाद्या—गिरद्या सर्व समोर असतात. उत्तम अन्नाचा त्याची आप्तमंडळी आस्वाद घेत असतात व याला इच्छा असूनही त्यापैकी कशाचाही उपभोग घेता येत नाही. त्यास सुरुवातीस कळतच नाही की हे काय होत आहे. पुढे हळूहळू त्यास जाणीव होऊ लागते व तो जास्तीच त्रस्त होतो. सर्व मंडळी चैन करताहेत व स्वतःला काहीच करता येत नाही याचा त्यास हेवा वाटून तो अधिकच दुःखी होतो. त्यास मग जाणीव होते की तो आता अगदी एकटा-एकटा आहे. त्याच्यावर प्रेम करणारे, त्यास मदत करणारे असे कोणी नाही.

जे काही करायचे, ते आपणच व भोगावयाचे तेही आपणच. आपणाकडे कोणी ढुंकून सुद्धा पाहात नाही. दिवस-रात्र सतत चोवीस तास तेच ते ! स्वर्ग किंवा नरक असतील वा नसतील; परंतु हा प्रत्यक्ष नरकवास असतो व यातून काही केल्या सुटका होऊ शकत नाही. समोर सर्व दिसत असते; परंतु काही करता येत नाही. कशात भाग घेता येत नाही. काय बरे-वाईट चालले असले तरी त्यासंबंधी काही करता येत नाही. नुसते पाहात बसावे लागते. एवढेच नाही तर ज्या काही बऱ्या-वाईट वासना जोपासल्या असतील त्या त्याच्या सोबत आलेल्या असतात. त्या जितक्या तीव्र त्या मानाने हालअपेष्टा अधिक. वासना असतात परंतु तृप्त करून घेण्याचे साधन जवळ नसते. त्या वासना त्यामुळे त्यास सतत जाळीत राहातात व हा सर्व कार्यक्रम चालतो तो या सर्व वासना आशा-आकांक्षा कमी कमी होत जाऊन त्या निर्मळ होईपर्यंत. परिस्थितीने तो असहाय बनतो. रात्रंदिवस एकच एक विचार त्यास सतत सतावीत राहातो. पुढे हळूहळू परिस्थितीची जाणीव होऊ लागते व आपण अगदी एकाकी आहोत व काही करू शकत नाही हे त्यास समजू लागते. भाग्यवशात एखाद्या Spirit guide ची गाठ पडली तर तो त्यास सर्व परिस्थिती समजावून सांगतो व या नरकवासातून कशी सुटका करून घ्यावी याचे मार्गदर्शन करतो. परंतु हे अपवादात्मक. शरीर जिवंत असता जे जे काही केले असेल त्याची सर्व भरपाई करावीच लागते. मग ती व्यक्ती कोणीही असो. याकरता सत्ताधारी, गर्भश्रीमंत इत्यादी मंडळींनी प्रथमपासूनच पुढे काय होणार आहे ते समजावून घेऊन त्यास तोंड कसे देता येईल याची तयारी ठेवावी खरे म्हणजे हे सर्वांकरताच आहे परंतु वरच्या थराच्या लोकांकरिता अधिक. या योनीत राजा हा राजा राहात नाही. ना मंत्री ना सेनापती. धन, दौलत, श्रीमंती यापैकी काहीही बरोबर येत नाही. येतो फक्त वासनादेह. मूळ देहापासून सुटा होऊन अंगावरील चिंधी सुद्धा येत नाही. येथे सर्व एकाच पातळीवर येतात. विषमता दूर होते व हेच सर्व दुःखाचे मूळ असते. परंतु हे फार उशिरा लक्षात येते. मात्र आता त्यास काही इलाज राहिलेला नसतो. प्राप्त परिस्थितीस तोंड देत सर्व सहन करीत काळ कंठावा लागतो.

त्याचप्रमाणे पुष्कळांची अशी कल्पना असते की पुष्कळ दानधर्म केला, ईश्वरचिंतन केले, धार्मिक आचरण ठेवले, तळमळीने समाजकार्य केले, खरीखुरी देशभक्ती केली की झाले. मृत्यूनंतर आपणास निश्चित चांगले स्थान मिळणार. ही कल्पना फारशी चुकीची नसली तरी फारशी बरोबर पण नाही. कारण मृत्यूनंतर दानधर्म करण्याची इच्छा असते. परंतु त्यास काही करता येत नाही असंख्य अज्ञानी जीव तळमळत पडलेले तो पाहात असतो. परंतु आता त्याच्याकरिता काही करण्याचे साधन उरलेले नसते. त्यास कळत नाही की कालपर्यंत मी व्यासपीठ गाजवीत होतो; हजारो लोक माझा जयजयकार करीत होते; मी काहीतरी सांगावे व त्यांनी करावे म्हणून सारखे पुढे पुढे करीत होते. मी शाळा, दवाखाने, धार्मिक संस्था सर्व चालवीत होतो.

गरीबगुरिबांसाठी अन्नछत्रे उघडून त्यांचा दुवा घेत होतो. आज काय ? मी सर्व काही पाहात आहे, इच्छा आहे की काही तरी करावे. जीव तळमळत असतो, परंतु काही करता येत नाही. गंधफूल वाहून ईश्वरचिंतन करावे म्हणतो तर ते सुद्धा करता येत नाही. त्यामुळे त्यास सतत दुःख होत असते. एवढेच की वाईट वासना सतत जाळीत असतात, तसे त्याच्या बाबतीत नसते. यांना लवकर उमज पडतो की आपले जीवितकार्य संपले आहे. आता दुसरे काय करतात ते त्यांना करू द्या. त्यांना Spirit guides लवकर भेटून त्यांची समजूत पाडून या तळमळीतून मुक्त करतात. याकरता वाईट वासना जशा मृत्यूनंतर त्रासदायक तशाच चांगल्या पण; जरा तपशिलात फरक असतो, इतकेच. चांगल्या वासना सुद्धा बंधनकारकच असतात, परंतु त्या फारशा त्रासदायक न राहता, सुखदायक राहतात त्यांना लवकर समाधान प्राप्त होते. थोडक्यांत काय तर मृत्यूनंतर माणसाच्या चांगल्यावाईट वासना ज्या मानाने तीव्रतर–तम असतील त्या मानाने त्यास त्या भोगयोनीत कमीअधिक काळ कंठावा लागतो. वर निर्देश केला आहे की चांगल्या-वाईट वासना दोन्ही बंधनाला कारणीभूत होतात. कारण चांगल्या जरी असल्या तरी त्या वासनाच व त्यामुळे त्यांचा परिणाम एकच. याकरता श्रीज्ञानेश्वर महाराज यांच्या अमृतानुभव या ग्रंथात सांगितले आहे की अज्ञान ज्याप्रमाणे बंधनकारक असते तसेच ज्ञानही. याकरिता दोहोंचा क्षय झाल्याखेरीज मोक्ष नाही. याप्रमाणे विचार केला असता मृत्यूनंतर कोणत्यातरी स्वरूपात आपणास अस्तित्व असते हे निश्चित. त्या अस्तित्वकालात आपणास सुखी जीवन कसे जगता येईल, याची अगोदर तजवीज करून ठेवावयास नको काय ?

परंतु प्रश्न असा आहे की तजवीज करायची म्हणजे करावयाचे तरी काय ? आपणास मृत्यू आहे; मृत्यूनंतर वासनादेहाने अस्तित्व आहे, याची जाणीव असली तरी त्या वासनादेहाच्या अस्तित्वात आपण असू तोपर्यंत आपणास त्रास न होता, ते जीवन सुखदायक व्हावे याकरता काय केले पाहिजे, याची खरोखरीच कल्पना नसते. आपण मागे पाहिलेच आहे, Spirit जीवनात सर्वत्र साम्यवाद आहे. तेथे कोणी मोठा नाही, कोणी लहान नाही. जो तो आपापल्या वासनेप्रमाणे तळमळत व तडफडत काळ कंठीत असतो. ते सुधारण्याकरिता त्यास आता काहीच करता येणे शक्य नसते. कारण ही निव्वळ भोगयोनी असते. आता फार उशीर झालेला असतो. शरीर जिवंत असतानाच काही तरी करावयास पाहिजे होते. त्याची तयारी अगोदरच करावयास हवी असते. ती तयारी म्हणजे काय ते आपण पाहू या. त्यासंबंधी थोडे दिग्दर्शन ‘ वैतरणेच्या ऐलतिरी ’ या ग्रंथात ‘ ६० आणि नंतर ’ या प्रकरणात संक्षेपाने केलेले आहे.

विचार करा, आपणास अगदी एक दिवसाकरता जरी कोठे जाणे असेल तर आपण पुष्कळ गोष्टी अगोदर ठरवितो. निघावयाचे केव्हा, कोणत्या रस्त्याने जावयाचे, केव्हा पोचावयाचे–तेथे गेल्यावर कोठे रहायचे, खायचे, प्यायचे ? कोणते नियोजित

काम केव्हा करावयाचे व परत केव्हा निघायचे या सर्वांचा सांगोपांग विचार करून आपण घराबाहेर पाऊल टाकतो. प्रत्येकास जाणीव असते की आज म्हणा वा काही वर्षांनी आपणास मृत्यू हा निश्चित येणार आहे. परंतु बरीचशी मंडळी त्यासंबधी नुसता विचारही करावयास घाबरतात. जे काही थोडे विचारवंत आहेत, ते या दृष्टीने विचार करतात; परंतु नक्की काय करावयास पाहिजे याची त्यांस कल्पना नसते. आपण विचार करा वा न करा, मृत्यू हा अटळ आहे. मात्र, त्यानंतर कोणत्या का स्वरूपात म्हणा ना आपणास अस्तित्व आहे. ते किती काळ आहे याची आपणास कल्पना नसते, व ती येऊ शकत नाही. हाही एक प्रवासच आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंतचा व मृत्यूनंतर वासनादेहाचा हा प्रवास एका अज्ञात प्रदेशाकडे आहे, की जेथे आपणास कोणत्या स्थितीत किती काळ राहावे लागणार आहे, याची काहीच कल्पना नाही. मात्र तयारी न करता गेलेल्यांचे जीवन तेथे कसे काय असते ते आपण पाहिले आहे; तसे न होता, ते सुखकारक व्हावे अशी इच्छा असेल तर ते तसे व्हावे याची तयारी आतापासून हा आपला देह आहे तोपर्यंत पूर्ण केली पाहिजे. कारण मृत्यूनंतरच्या वास्तव्यात भोगण्याशिवाय काहीच करता येत नाही. तर तयारी तरी काय व कशी करावयाची ते आपण पाहूया. मृत्यूनंतरचे अस्तित्व म्हणजे आपले Spirit body चे किंवा वासनादेहाचे. मृत्युसमयी वासना, आशा, आकांक्षा जितक्या संख्येने जास्त व जितक्या अधिक तीव्र तितका तेथील वास अधिक काळ व अधिक त्रासदायक. त्रास म्हणजे असा तसा नाही तर सतत चोवीस तास. तेथे कोणी ना मदत करावयास ना सांत्वन करावयास. तळमळत तडफडत कालक्रमणा करावी लागते व ती सुद्धा अनिश्चित कालपर्यंत. काही शतकांपूर्वीची Spirits सुद्धा अद्याप वावरताना दिसतात. याकरता आपण हयात आहोत तोपर्यंतच या सर्व वासना, आशा, आंकाक्षा मग त्या चांगल्या असोत वा वाईट—यांचे निर्मूलन करून टाकले पाहिजे. खरोखर म्हणजे मरणोत्तर ज्यांना सुखी जीवन हवे असेल त्या सर्वांनी त्याकरता सतत प्रयत्न करावयास हवेत. परंतु त्यातल्या त्यात ज्यांची साठी उलटलेली आहे व ज्यांचा मृत्यू नक्की जवळ आहे अशांनी तर एक क्षणही न दवडता त्या प्रयत्नास लागले पाहिजे ज्यांची साठी उलटलेली असते व जे थोडे विचारवंत असतात त्यांना आपल्या आयुष्यातील वैफल्याची नक्की जाणीव झालेली असते. साठ वर्षे सतत प्रयत्न करून आपण काय मिळवले असा आढावा घेतला तर त्याचे उत्तर शून्य असेच येईल. बुद्ध, कृष्ण, खिस्त, यासारख्यांचा जेथे पाड लागला नाही तेथे आपण करू शकणार ? जग चालले आहे तसेच चालत राहणार आहे. त्यात आपल्या असण्या नसण्याने काहीही फरक पडू शकत नाही. याकरता निदान मृत्यूनंतरचे आयुष्य तरी सुखात जावे याकरता एक क्षणही न घालविता प्रयत्नास लागण्याची त्यास आवश्यकता वाटू लागते परंतु त्यासाठी तयारी करावयाची म्हणजे नक्की काय करावयाचे याची जाणीव

त्यास नसते. त्याकरिता त्यास त्यासंबंधी थोडी कल्पना यावी, ती कशी, किती असावी याचा विचार करू.

मृत्युनंतरचे जीवन म्हणजे Spirit body किंवा वासनादेहातील आपला वास. आपण आपल्या हयातीत ज्या काही इच्छा–आकांक्षा–वासना वगैरे जोपासून ठेवतो, त्या सर्व Spirit body बरोबर शरीरातून बाहेर पडून इतस्ततः भटकत राहतात. तेथे त्यास ना कोणाची मदत ना सहानुभूती. त्याच त्या वासना त्यास सतत जाळीत राहतात व कालगतीने त्याची तीव्रता कमी कमी होत जाऊन त्यांच्या मूळ तीव्रतेप्रमाणे काही दिवसांत, महिन्यांत, वर्षांत वा शतकांत त्या चित्‌शक्तीत विलीन पावतात. वासनांच्या कमीअधिक तीव्रतेवर हा काल अवलंबून असतो, हे आपण पाहिले आहे. याकरता आपले शरीर जिवंत आहे तोपर्यंत या सर्व आशाआकांक्षा, वासना प्रयत्न करून जर नाहीशा करून टाकता आल्या तर मग त्यांस मरणोत्तर काही त्रासच शिल्लक राहात नाही, हे अगदी उघड आहे.

इच्छा–आकांक्षा वासना नाहीशा करणे म्हणजे सोपे काम नाही. कामक्रोध-लोभादि वासना या सततच्या साहचर्याने केवळ शरीराचा एक भाग बनून राहिलेल्या असतात. त्यांना निर्मूळ करणे म्हणजे कर्णाने आपली कवचकुंडले शरीर सोलून काढून दिली त्यापेक्षाही कठीण आहे. कारण या आपल्या अंतर्मनात दबा धरून दृढमूल होऊन बसलेल्या असतात. कार्य कठीण असले तरी अशक्य नाही, व एखादा दृढ निश्चय करून ते करावयाचेच म्हटले तर केवळ सहा महिन्यांत तुमची विलक्षण प्रगती होऊन मृत्युनंतर काय व्हावयाचे असेल ते होईल; परंतु तुम्हास याच हयातीत अत्यंत सुख व समाधान मिळत असल्याचे अनुभवास येईल.

आपण जन्मतो त्यावेळी आपणाजवळ काहीही नसते. वस्त्र-प्रावरणे नसतात; तसेच दृग्गोचर असे मनोव्यापार पण नसतात. संचय करण्याची बुद्धी व हव्यास नसतो. हळूहळू आपण मोठे होतो तसतसे आपण त्यांचा संचय करू लागतो. वाढत्या वयाबरोबर लोभ वाढत जातो, दृढमूल होत जातो इतका की त्याच्याशी आपण अगदी एकजीव होऊन जातो. साधारणपणे वय वर्षे ५० नंतर शरीर थकू लागते. परंतु दृढमूल झालेल्या आशाआकांक्षा कधीच थकत नाहीत. त्या उलट वाढत जातात. हळू हळू आपल्या भोवतीचे पाश व आवरणे कमी कमी करावयास लागले पाहिजे. आजपर्यंत आपल्या आयुष्यात पुष्कळशी आवरणे आपण स्वतः होऊन लादून घेतलेली असतात. त्या सर्वांतून एकदम मुक्त होणे शक्य नसते. तसा प्रयत्न करू नका. त्यात तुम्हास अपयश येईल. लक्षात ठेवा, शत्रू अनेक आहेत; तुम्ही एकटे आहात. तर ही सर्व आवरणे कोणत्या क्रमाने व कमी कमी करून कशी नाहीशी करावी हे ज्याचे त्याने ठरवलेले बरे.

काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर हेच षड्रिपू म्हणून प्रसिद्ध आहेत. हे सर्व किंवा त्यांच्यापैकी काही यांनी आपणावर ताबा मिळवलेला असतो, तो इतका की

त्यांनी आपणावर ताबा मिळवला आहे याची आपणास कल्पनाच नसते. त्यांचे अस्तित्व आपणास क्वचितच जाणवते ते आपल्या शरीराशी अगदी तद्रूप होऊन मनाच्या अगदी तळाशी जाऊन बसलेले असतात व कारणपरत्वे पृष्ठभागावर येऊन आपले कार्य करून परत तळाशी जातात. त्यामुळे ते व आपण लावून घेतलेल्या सवयी आपणाशी इतक्या एकरूप होऊन बसलेल्या असतात की त्यांचे आस्तित्वच आपणास जाणवत नाही. त्याची जळमटे आपणावर वर्षानुवर्षे सतत चढत गेलेली असल्याने आपले मन अत्यंत विकृत व कोणतीही अध्यात्मसाधना करण्यास अपात्र झालेले असते. याशिवाय आपणास आणखी एक सवय जडलेली असते की मी नेहमी जे जे काही करतो ते सर्व अगदी न्याय्य व बरोबर असेच करीत असतो; इतर सर्व लोक ढोंगी व लबाड असून माझ्या चांगुलपणाचा फायदा घेत असतात. ही व अशा प्रकारची आत्मवंचना करण्याची सवय जोपर्यंत निर्मूल होत नाही तोपर्यंत निश्चित समजा की तुमच्यात काहीही सुधारणा होणे केवळ अशक्य आहे. मानवच काय परंतु देवादिक सुद्धा चुकीस पात्र असतात वा चुका करतात; त्यास मी एकटा अपवाद कसा असू शकेन, असा विचार करावा.

याकरिता निदान पाच ते दहा मिनिटे साक्षी भावाने म्हणजे केवळ त्रयस्थ म्हणून स्वतःकडे पाहात आत्मनिरीक्षण करण्याची सवय ठेवा. त्यास एक गमक आहे, ते हे की मी जे काही केले आहे, करीत आहे अगर करण्याचे ठरवीत आहे ते मला दुसऱ्या कोणी केलेले चालेल काय ? चालणार नसेल तर तुमचे वागणे चुकीचे आहे असे समजून त्याचा त्याग करा व पुन्हा तसे न करण्याचा निश्चय करा व त्याप्रमाणे रोज निदान पाच मिनिटे तरी आत्मसंशोधन करीत जा. आपण काल काय केले, आज काय करीत आहोत व उद्या काय करावयाचे ठरविले आहे, ते बरोबर आहे की कसे–चुकले असल्यास, चुकले तर ते करू नकाच; परंतु पुढे तसे होणार नाही याची दक्षता घ्या व या सर्वांची नोंद ठेवीत जा. दुसऱ्या दिवशी आत्मसंशोधनास बसण्यापूर्वी कालची नोंद वाचा व नीट आत्मसंशोधन करा. आठवड्यातून एक दिवस व महिन्यातील एक दिवस असा ठेवावा की त्या दिवशी आठवड्यातील व महिन्यातलि नोंदी काळजीपूर्वक वाचून काढाव्यात व त्यावर काळजीपूर्वक मनन करावे. दोन तीन महिन्यांतच तुम्हास असे आढळून येईल की, तुमच्यात निश्चित सुधारणा होत आहे. तुमच्या वासना व विशिष्ट प्रवृत्ती यांची तीव्रता हळू हळू कमी कमी होत आहे व त्यातल्या काही तर नाहीशा होण्याच्या मार्गावर आहेत.

मात्र आत्मसंशोधन अगदी शुद्ध व सडेतोड भावनेने होत असावे. हा मी व तो परका असा पक्षपात नसावा. वेळात वेळ काढून निदान पाच मिनिटे त्राटक करा. त्याची तुम्हास फार मदत होईल. त्राटक करताना एक गोष्ट जरूर करीत जा; त्या वेळी जे विचार मनात येत असतील त्यावर लक्ष ठेवीत जा व ते असे की एकही विचार तुमच्या ध्यानातून निसटून जाऊ नये. प्रथम प्रथम असे होईल की, आपले

विचारावरील लक्ष सुटून विचारप्रवाहात आपण केव्हा सापडलो हे कळणार सुद्धा नाही. असे झाले की ताबडतोब पुन्हा त्यावर बुद्धिपुरस्सर लक्ष ठेवावयास सुरवात करा. विचार थांबविण्याचा किंवा त्यावर ताबा मिळवण्याचा मुळीच प्रयत्न करू नका, त्यात तुम्हास अपयश येईल. कारण सर्व चित्तवृत्तिनिरोध हे योगाचे अखेरचे साध्य आहे. ते तुम्हास काहीच न करता कसे जमेल ? त्याकरता तो प्रयत्न करू नका. फक्त कोणकोणते विचार येतात त्यावर सतत नजर ठेवा व ती अशी की एकही विचार आपल्या नजरेतून सुटू नये. पुष्कळ वेळा अपयश येईल. पुष्कळ वेळा असे विचार माझ्या मनात येऊच कसे शकतात, याचे तुम्हास आश्चर्य वाटेल. परंतु निश्चयाने ठराविक वेळी व ठराविक ठिकाणी शक्यतो रात्री ९ च्या पुढे असे त्राटक केवळ ५ ते १० मिनिटे करीत गेलात तर तुम्हास असे आढळून येईल की, सतत धो धो वाहणारे विचारप्रवाह कमी होत आहेत व हळू हळू पण निश्चितपणे विचाराने व पर्यायाने मनावर आपला ताबा बसत आहे. असे झाले म्हणजे आपल्या वासना-सवयींतून हलकीशी विडी पान सारखी सवय निवडून तिच्यावर कटाक्षाने विजय मिळवा. प्रथम थोडे जड जाईल; परंतु थोड्या प्रयत्नाने यश येईल. मग त्यापेक्षा थोडी जास्त महत्त्वाची सवय हाती घ्या व तिचे निर्मूलन करा, मात्र एक गोष्ट सतत कायमची लक्षात ठेवा की, आत्मचिंतनास बसल्या वेळी सर्वांचे प्रथम समालोचन करावे की मिळविले आहे काय व मिळविणे आहे काय ? यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही कारणाने अपवाद होऊ देऊ नका. एकदा अपवाद केलात की मग ती सवय उसळी मारून वर येऊन अपवाद पचवून अपवाद होत जातील व आतापर्यंत केले ते सर्व वाया जाईल. याकरिता अपवाद करायची लहर आलीच तर ती निग्रहाने दाबून टाका व इतकेही करून कदाचित झालाच तर उद्‌वत्तीने हातास एक चटका द्या म्हणजे पुन्हा असे होऊ देऊ नये याची जाणीव राहील. ज्या ज्या सवयी अगर वासना तुम्ही प्रयत्नाने निर्मूल केल्या असतील त्या सर्वांच्या बाबतीत हा नियम अगदी कटाक्षाने पाळा. एखाद्या वासनेवर अगदी पूर्ण विजय मिळाला आहे अशी खात्री झाली म्हणजे दुसरी हाती घ्या. पुढील विजय उत्तरोत्तर सोपे जात आहेत असे तुम्हास आढळून येईल. विजयाने विजयाची परंपरा लागते व इतर विजय सुकर होऊन मन त्या सर्वांपासून मुक्त होऊन निर्मल होते. काही झाले तरी आता चिंतनाची प्रथा चालू ठेवा व आपण कोठे घसरत तर नाही ना यावर सतत लक्ष ठेवा. मन फार फसवे असते. त्यावर भरंवसा ठेवू नका. ते तुम्हास केव्हा फसवील व खड्डयात नेऊन टाकील याचा नेम नसतो. आता काय मी विजय मिळवला आहे व केव्हाही मिळवू शकेन. एकदा अपवाद केला तर काय झाले हे वाटू लागते. लक्षात ठेवा हीच तुमची घसरगुंडीची सुरवात होईल व अधःपात-ही निसर्गाचीच प्रवृत्ती आहे. पाणी उताराकडेच धावते. एकदा घसरगुंडीस सुरवात झाली की तुम्हास ती आवरणार नाही व केव्हा पूर्ववत तळाशी ठेपलात ते तुम्हालाच कळणार नाही व असे झाले की पुन्हा वर येणे केवळ अशक्यच. तुमचा हा जन्म

फुकट गेला म्हणून समजा. काही वेळा असे अनुभवास येते की, इतक्या प्रयत्नाने ज्यावर आपण विजय मिळवीत आलो ती सर्व मंडळी पुन्हा उसळी मारून वर येतील व इतका गोंधळ करतील की तुम्हास विचार सुद्धा करणे अशक्य करून सोडतील व इतके दिवस केलेल्या श्रमावर पाणी पडत आहे असे पाहून तुम्ही निराश व्हाल. परंतु असे करू नका. त्याने खचून जाऊ नका. थोडा धीर धरा. ते आपोआप शांत होत आहेत असे तुम्हास आढळून येईल. प्रयत्न चालू ठेवा. थोड्या प्रयत्नाने ते सर्व दबत आहेत असे तुम्हास आढळून येईल. असे भरती-ओहोटीचे प्रसंग येत राहातील त्यास तोंड देत राहा.

तीन ते सहा महिन्यांच्या सतत प्रयत्नाने मन अंतर्बाह्य निर्मळ करण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. मात्र सदैव पवित्र आहार, विहार व विचार यांची जोड असू द्या. ती अवश्य आहे याचा विसर पडू देऊ नका. आपण व्यवहारी व प्रापंचिक माणसे आहोत. प्रसंगी आपणास राग, मोह वगैरेचा अवलंब करावा लागतो. तो कामापुरता व वरवरचा असावा. कारण संपताच तो मनाबाहेर गेला पाहिजे. सज्जनांचा राग हा पाण्याचा डाग—तेलाचा नव्हे. आपण चोवीस तास प्रपंचात रममाण असतो. आपण इतके केले तरी व्यवहार चालू असतात. नवीन नवीन आघात होत असतात. त्यांच्यावरसुद्धा लक्ष असू द्यावे व त्यापैकी कोणी घर करून बसणार नाहीत यावर लक्ष ठेवणे. नाहीतर पुन्हा येरे माझ्या मागल्या. षड्रिपूंपैकीं एकेक कमी करीत आणला तरी काम व क्रोध हे दोघे असे आहेत की ते लवकर दाद देत नाहीत. विश्वामित्र, पराशर, दुर्वासासारखे सुद्धा प्रसंगविशेषी त्यांच्या आहारी गेलेले आहेत; मग आपणासारख्याची काय कथा ? वर लिहिलेल्या प्रयत्नांनी त्यांना नामशेष करण्याचा प्रयत्न तर करावाच. पण पुष्कळ वेळा या दोहोकरता विशिष्ट उपासनेची जरूरी असते; ती याचा उल्लेख करून, ‘ प्रार्थना व उपासना ’ या प्रकरणात मी देईन. आपण त्यांना सहज जिंकू शकू अशा भ्रामक समजुतीत राहू नये. मनावर ताबा ठेवणारी अशी पान—तंबाखू सारखी किरकोळ सवय सुद्धा नाहीशी करावी. अन्न व पेय यासंबंधी सुद्धा आसक्ती नसावी. केवळ शरीर जगविण्याकरिता ते आवश्यक असते म्हणून जरूरीपुरते व साधे असे असावे व ते जिव्हालौल्य न ठेवता, सेवन करीत असावे मृत्यूनंतर या किरकोळ सवयीसुद्धा फार त्रासदायक ठरतात.

ह्या मोठ्या शत्रूंच्या उच्चाटनाचा क्रम सुरू असता थोड्या इतर महत्त्वाच्या बाबींकडे सुद्धा लक्ष दिले पाहिजे. त्या म्हणजे आपण व्यवहारात वावरत असता काही गोष्टी आपणास अनाहूत येऊन चिकटतात. अथवा आपण त्यांना चिकटवून घेतो व मग त्यातून सुटका करून घेणे अशक्य होऊन बसते. त्यातील पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रतिष्ठा व सत्ता, आपण तारुण्यात पदार्पण करून एका विशिष्ट जागेवर अथवा स्थानी स्थिर झालो म्हणजे थोडीफार तरी सत्ता व प्रतिष्ठा मिळालेली असते. त्यातल्या त्यात कुटुंबातील कर्तेपण असले तर तो कुटुंबातील सर्वसत्ताधारी बनतो. बाहेरसुद्धा त्याच्या

समाजातील स्थानाप्रमाणे त्यास प्रतिष्ठा व सत्ता मिळत जाते, वाढत जाते, मी कोणी विशेष आहे, मला सर्व कळते, सर्वांनी माझे ऐकावे, माझ्या तंत्राने चालावे अशी भावना होऊन बसते, मग ती व्यक्ती स्त्री असो वा पुरुष ! काही नसले तरी वयाने मोठेपण येतच असते. मग ती व्यक्ती कितीही सामान्य असो. आपापल्या क्षेत्रात सत्ता गाजविण्यात ते इतके गढून गेलेले असतात कीं, सत्तेशिवाय जीवन म्हणजे त्यांना अकल्पनीय वाटत असते. त्यांना जाणीव नसते की वाढत्या वयाबरोबर त्यांच्या क्षेत्रात, मग ती क्षेत्रे कोणतीही असोत.——त्यांना प्रतिस्पर्धी उत्पन्न झालेले असतात. त्यांना त्यांची अडगळ वाटू लागते व ती केव्हा दूर होईल याची ते वाट पाहात असतात. कुटुंब असले तर मुली, सुना सत्तेवर यावयाची वाट पहात असतात. नोकरी असली तर हाताखालील तरुण मंडळी अथवा इतर कोणत्याही क्षेत्रात हीच परिस्थिती आढळून येते. याकरिता एक निश्चित वेळ ठरवावी व ती फार लांबची नसावी की त्यावेळी सत्तात्याग करावयाचा, व ती वेळ येईपर्यंत आपले मन व इतर तयारी त्यादृष्टीने करीत असावी. ती वेळ आली की निश्चयपूर्वक, निग्रहाने सर्व प्रकारची सत्ता आपणहून सोडून द्यावी. जसे आपण सरकारी जागेवरून वय झाले की निवृत्त होतो किंवा व्हावे लागते तसे आदल्या दिवशी सेनापती असून निवृत्तीच्या दुसऱ्या क्षणी त्याच्या हाताखालील लाखो सैनिकांवरील सत्ता जाऊन तो एक सामान्य नागरिक बनतो. किंवा पूर्वी राजे लोक मुलास गादीवर बसवून वानप्रस्थाश्रम स्वीकारीत असत.

सुरवातीला जरा जड वाटेल; परंतु परिणामी असे आढळून येईल की तुमच्या डोक्यावरील एक मोठे ओझे कमी झाले असून पुष्कळ सुख-शांतीचा लाभ होत आहे. नाही तरी मृत्युसमयी सर्व प्रकारची सत्ता सोडून द्यावीच लागत असते. मग तुमची इच्छा असो वा नसो. मग ते आपणहून अगोदरच केलेले काय वाईट ! निदान त्याने मृत्यूनंतर होणार त्रास व तगमग वाचेल. अगदी घरातलि सत्तासुद्धा कुटुंबातील तरुण मंडळीवर संपूर्णपणे सोपवा व ते कुटुंब कसे चालवितात ते पाहात राहा. ते चुका करतील; नुकसान करतील, करू द्या ! तुम्ही केलेल्या नाहीत का ? पुन्हा करणार नाही कशावरून ? प्रत्यक्ष अनुभव आल्याशिवाय निव्वळ सांगीवांगीने किंवा तथाकथित मार्गदर्शनाने शहाणपण येत नाही. मात्र असे करताना एक दक्षता जरूर घ्या की तुम्ही व हयात असल्यास तुमची पत्नी यांना निदान जीवनावश्यक गरजा जिवंत आहे तोपर्यंत भागविता येतील, एवढा द्रव्यसंग्रह कटाक्षाने बाजूस ठेवा. नाही तर तुम्हास—तुम्ही कोणाकरता कितीही व काहीही केलेले असले तरी अपमानास्पद जीवन जगावे लागेल, याची जाणीव ठेवा. पुष्कळ वेळा द्रव्य नुसते जवळ असावे लागते. ते खर्चसुद्धा करावे लागत नाही. एक गोष्ट सांगतात की एका गृहस्थाने कुटुंबातील मुलेबाळे शिकून—सवरून समाजात चांगले स्थान मिळवून सुखी जीवन जगता यावे म्हणून जवळ होते नव्हते ते सर्व—पत्नीच्या अंगावरील दागिनेसुद्धा मोडून सर्वांना सुखी व समृद्ध केले व स्वतः कफल्लक झाला. मुलावर अवलंबून राहण्याचा प्रसंग आला. परिणामी त्या सर्वांनी, मीच का करावे

इतरांनी का करू नये, अशी चालढकल करून, त्यांना पश्चात्तापात व अवमानित जीवन जगण्याची पाळी आली. हा सर्वसाधारण नियम आहे. अपवाद नव्हे. कोणी चांगले वागविले तर अपवाद समजा. असे झाले की त्यास इलाज राहात नाही. दुसरे असे एक गृहस्थ होते. त्यांची स्थिती होती तीच. परंतु त्यांना एक उपाय सुचला. त्यांनी एक जड लोखंडी पेटी भक्कम कुलूप लावून आपल्या जवळ ठेवली होती. त्यात काही नाणी, काही नोटा अशा असून रोज रात्र झाल्यावर दार लावून मोजीत बसत. त्यांची मुले व सुना फटीतून पाहात व आवाज पण ऐकत. त्यामुळे या म्हाताऱ्याजवळ पुष्कळ मोठे डबोले आहे या समजुतीवर त्याची सेवा–चाकरी करण्यात कुटुंबियात स्पर्धा लागत असे. योग्य वेळ आली व त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर सर्वांनी ती पेटी उघडून पाहिली, तर काही नाणी, थोड्या नोटा व इतर सर्व दगड–गोटे ! ही निव्वळ गोष्ट असेल, परंतु सत्य परिस्थिती यापेक्षा निराळी नसते. याकरिता अगदी कटाक्षाने आपणा उभयतांस निदान अत्यंत आवश्यक गरजास पुरेल इतका द्रव्यसंग्रह अगदी कटाक्षाने आपणाजवळ असावा. असो. हे थोडे विषयांतर झाले. परंतु एक अत्यंत महत्त्वाची बाब म्हणून निर्देश केला एवढेच. सत्तेचा लोभ मृत्यूनंतर फार त्रासदायक ठरतो.

सत्ता त्यागात तुम्ही यशस्वी झालात की मग नाव अथवा कीर्तीकडे वळा. श्री विवेकानंदांनी म्हटले आहे की, पुष्कळशा अध्यात्म मार्गातील व्यक्ती कनक व कामिनीवर विजय मिळवितात. परंतु अनवधानाने कीर्तीच्या खड्डयात पडून वाया जातात. स्तुती कोणास प्रिय नाही, देवादिकांना सुद्धा ती आवडते व म्हणून तर प्रार्थना, स्तोत्रे वगैरे प्रचारास आली आहेत. श्रीसमर्थांसारख्यांनी सुद्धा म्हटले आहे की—मरावे परी कीर्तिरूपे उरावे. व्यावहारिक दृष्ट्या हे बरोबर असेल. परंतु मृत्युनंतर जितकी इहलोकी कीर्ती मान-मान्यता जास्त तितका त्रास व त्यातून सुटका होण्यास विलंब जास्त. त्यास सतत वाटत राहाते की मी इतका मोठा–कालपर्यंत हजारो लोक माझा जयजयकार करीत होते. मला खांद्यावर घेऊन नाचत होते व आजच असे काय झाले की मला कोणीच विचारीत नाही. सर्व ओळखीचे मला पाहाताच आदराने उभे राहून लवून नमस्कार करणारे माझ्या अवतीभवती फिरत असत. आता माझ्याकडे कोणी ढुंकूनसुद्धा पाहात नाहीत. त्यास परिस्थितीची जाणीव व्हावयास फार वेळ लागतो व झाली तरी त्याचे त्यास अत्यंत दुःख होते. पूर्वीची परिस्थिती आपणास केव्हा तरी प्राप्त होईल या आशेवर टांगून, तो सतत वाट पाहात असतो. ती वेळ कधीच येत नाही. कीर्तीच्या आहारी गेलेली मंडळी काय करतील व काय नाही व त्यांची मजल कोठपर्यंत जाईल याची कल्पनाही करवत नाही. ही मंडळी आपले तथाकथित नावाभोवती एक किंवा अनेक वलये उत्पन्न करतात व ती मोठमोठी करीत जाऊन त्याकडे कौतुकाने पाहात बसण्यात त्यांना आनंद व धन्यता वाटते. माझ्या चांगल्या माहितीचे एक महात्मे आहेत. त्यांची तपश्चर्या, त्यांची विद्वत्ता, त्यांचा त्याग ही अपूर्व आहेत. ते बोलू लागले की सरस्वती त्यांच्या जिव्हाग्री खेळत असते. श्रुती-

स्मृतीतील दृष्टांत, उतारे मुखोद्गत. कित्येक संस्था—लाखांनी उलाढाल होणाऱ्या लोकोपयोगी संस्था त्यांच्या मार्गदर्शनाखाली चाललेल्या आहेत. त्यांनी दशकानी अध्यात्मिक पुस्तके लिहिली असून शेकड्यांनी प्रसिद्ध केली आहेत व इतके करून एक पैशाचाही स्वतःकरिता लोभ नाही. सतत अत्यंत तळमळीने जनता शिक्षणाचे कार्य करीत असतात. त्यांनी संन्यास घेताना अनेक नावांपैकी एक पसंत केले. किंवा त्यांच्या गुरूने त्यांना दिले समजा ते चिदानंद असे आहे. त्यांनी वर वर्णन केलेली सर्व कार्ये त्या नावाभोवती गुंफली आहेत. चिदानंद धर्मशाळा, चिदानंद आध्यात्मिक भुवन, चिदानंद प्रकाशन इत्यादि सर्व केवळ चिदानंदमय. त्याखेरीज काही नाही. कोणतेही लहान मोठे कार्य असो, त्यात चिदानंद आलेच पाहिजे. व्याख्यानमाला ठेवली तर सोनेरी अक्षराने ' स्वामी चिदानंद व्याख्यान माला ' असा सुवर्ण अक्षरात फलक हवाच. अशा रीतीने सर्व चिदानंदमय. समजा त्यांचे नाव ब्रह्मानंद ठेवले असते तर सर्व ब्रह्मानंदमय. नावात काय आहे याची त्यांना जाणीव नसेल असे नाही. परंतु एखादा मनुष्य कशाच्या तरी आहारी गेला की त्यातून सुटण्याचा नुसता विचारही करणे त्यास दुरापास्त होते. याकरता प्रथमपासूनच काळजी घ्यावयास हवी. त्यांचे एक गुरुबंधू मला श्री उत्तर काशी येथे भेटले होते. त्यांनी याचा उल्लेख केला व खेद प्रकट केला. ते आपले स्वतःचे नाव सुद्धा सांगायला तयार नसतात. लोक मला अशा नावाने हाका मारतात, असे सांगतात. अर्थात त्यामुळे जनतेचे काहीच बिघडले नाही, परंतु त्यांचे स्वतःचे किती बिघडते याचा त्यांना बोध होत नाही. लहानमोठ्या प्रमाणात आपणा सर्वांतच हा दोष असतो.

हे कीर्तीचे वलय मृत्यूनंतर मोठे त्रासदायक होते. आपण असंतुष्ट व दुःखी अशा अवस्थेत सतत फिरत राहातो. लोकांनी चांगले म्हटले म्हणून आपले काही सुधारत नाही, व वाईट म्हटले म्हणून काही बिघडत नाही. मन व सदसद्विवेक बुद्धी मात्र शुद्ध व निर्मळ अशी असावीत म्हणजे झाले. त्यांनी चांगले म्हणावे म्हणून तुमचा इतका आटापिटा का ? तुमचे कर्तव्य विवेकबुद्धिपूर्वक करीत राहा व संपले की विसरून जा. तुम्ही कितीही चांगले केले तरी तुम्हाला वाईट म्हणून विरोध करणारे राहणारच. कृष्ण, बुद्ध, ख्रिस्त यासारख्यांना हे चुकले नाही तेथे आपला काय पाड ! गांधी, नेहरू, केनेडी गेले, त्यांना आता कोणी चांगले वा वाईट म्हटले तरी त्याचे त्यांना काय ? याकरिता विचारपूर्वक नाव कीर्तीपासून अलिप्त राहा व असे काही आपणाजवळ आहे अथवा असावे याचा विचारसुद्धा मनातून काढून टाका. या दोन गोष्टींवर विजय मिळवणे शक्य झाले तर फार मोठे काम झाले आहे म्हणून समजा. त्यानंतर पाळी येते स्थावर, जंगम, द्रव्य आदिवरची आपली आसक्ती कमी करण्याची. मृत्युनंतर आपण प्रयत्न करूनही यापैकी काहीही बरोबर नेऊ शकत नाही व मृत्यू काही फार लांब नाही. असे असता जी गोष्ट कोणत्याही प्रयत्नाने आपण करूच शकत नाही तीबद्दल तसे करणे आपणास भाग पाडण्यापेक्षा आपणहून वेळीच

केलेली काय वाईट ? कृपण लोक मृत्यूनंतर धनावर नाग होऊन बसतात असे म्हणतात. ते काही अर्थाने खरे आहे. ज्यांची धनसंपत्तीवर अत्यंत आसक्ती आहे त्यांची मृत्यूनंतर स्थिती मोठी केविलवाणी होते. त्यांना धन, घरे, शेती वगैरे सर्व दिसत असते. परंतु ते नुसते पाहात बसण्यापलीकडे काही करू शकत नाहीत. जिवंत असताना नुसती वाकडी मान करून पाहण्याची ज्यांची शक्ती नव्हती ते आज त्यांच्या समक्ष बिनदिक्कत त्यांना न विचारतापुसता त्या सर्वांचा उपभोग घेताना पाहून त्यांस फक्त दुःख होत असते, व संपत्ती वा इस्टेटीचा त्यांच्या मताप्रमाणे अनाठायी व्यय पाहून तर त्यांचा सारखा तिळपापड होत असतो. परंतु त्याला काही इलाज नसतो व नुसते पाहात राहून जळत राहण्यापलीकडे त्यास काही करता येत नाही. त्यातल्या त्यात ज्यांच्या याबाबतच्या वासना अत्यंत तीव्र असतात ते त्यांची Spirit body, Evil spirits म्हणून वावरत राहतात. Haunted Houses--properties वगैरे सर्व अशा Spirits चेच वास्तव्याचे प्रकार होत. ते स्वतः तर त्रासात असतातच, परंतु सतत दुसऱ्यास पण त्रास देत राहतात. काही काही जागा पाच पांचशे वर्षे झपाटलेल्या असल्याचे आढळून आले आहे.

ही आपत्ती टाळणे असेल तर जिवंत असतानाच जीवनावश्यक वस्तू व द्रव्य याखेरीज सर्वांचा त्याग करा व ते तुमच्या पुत्रपौत्रादिकांच्या स्वाधीन करून ते त्याचा कसा विनियोग करतात ते फक्त निरपेक्ष वृत्तीने पाहात राहा; कोणी विचारतील तर मार्गदर्शन करा, नाहीतर त्यांचे त्यांना पाहू द्या. नाही तर यापूर्वीच तुमचा मृत्यु झाला असता तर तुम्ही काय केले असते ? जवळ ठेवाल त्याबद्दलसुद्धा आसक्ती नसावी तर कोणावर अवलंबून राहण्याचा प्रसंग येऊ नये म्हणूनच जवळ ठेवावे. जिव्हालौल्य तर मुळीच नसावे. ज्यांना जिव्हेचे चोचले करावयाची सवय असते, त्यांना मृत्युनंतर सर्व प्रकारची पक्वान्ने दिसत असतात. खमंग वास येत असतो; परंतु कशाचाही आस्वाद घेता येत नाही. कल्पना करा की अत्यंत भूक लागली आहे, पक्वान्नांच्या राशी समोर पडल्या आहेत, खाण्याची इच्छा आहे. परंतु घशाचा कॅन्सर झाल्यामुळे काही खाता येत नाही ! असो. यानंतर पाळी येते आपली पत्नी, आपली कन्या, पुत्र, इष्टमित्र यांच्यावरील ममतेची. त्यांचा जन्मभर सहवास झालेला असतो व सहवासाने प्रेम उत्पन्न झालेले असते व ते आपण जोपाशीत असतो, वाढवीत असतो-नंतर ते आपले मन व शरीर यात भिनून एकजीव होऊन जाते. त्यात काही गैर असते असे नाही, परंतु वियोगाचे दुःख फार कठीण असते व ते पुष्कळ वेळा सहन करण्याच्या पलीकडचे असते. पुष्कळ वेळा आपणास त्याची जाणीवही नसते इतके ते आपणात भिनलेले असते. त्यामुळेच त्यांचा वियोग जाणवतो. श्री विवेकानंदांनी एके ठिकाणी त्यांची स्वतःची हकीकत सांगितली आहे. त्यांचे एक शिष्य त्यांच्याजवळ बराच काल होते. पुढे त्यांना काही कारणाने विवेकानंदांना सोडून जाण्याचा प्रसंग आला त्यावेळी त्यांना वाटले की स्वामीजींची काही तरी खूण आपल्या जवळ असावी. म्हणून त्यांनी काय केले की स्वामीजी नेहमी

हातात जो दण्डा वापरीत असत, त्यासारखाच परंतु त्यापेक्षा चांगला असा एक दण्डा त्यांना आणून दिला व त्याच्या बदल्यात त्यांची एक आठवण म्हणून ते वापरीत असलेला दण्डा देण्याची विनंती केली. त्यात गैर असे काहीच नव्हते. पण त्यांना जाणीव झाली की ते तो दण्डा दहा वर्षांपेक्षा अधिक काळ वापरीत होते व त्याबद्दल त्यांच्या मनात प्रेम व आसक्ती उत्पन्न झाली होती. म्हणून त्यांनी एक-दोन मिनिटे विचार केला. त्यांचे त्यांनाच आश्चर्य वाटले व निग्रह करून त्यांनी तो देऊन टाकला. श्री विवेकानंदांसारख्यांची जेथे ही हकीगत तेथे आपला काय पाड ! आपण वेळीच सावध व्हावे व सर्व स्थावर, जंगम, आप्त इष्ट मित्र यावरील प्रेम व आसक्ती कमी करावी. त्यांना सोडून जावे असे नाही किंवा प्रेम कमी करावे, म्हणजे त्यांचा द्वेष करावा असेही नाही. त्यांच्यात राहावे, त्यांच्याकरिता सर्व काही करीत राहावे, परंतु त्यांच्यावरील आसक्ती निर्मूल करावी; हा अभ्यास जरा कठीण आहे. अंतर्मुख होऊन आत्मचिंतन करताना निर्लेप होण्याचा प्रयत्न करावा परंतु तो कितपत यशस्वी झाला आहे ते पाहण्याकरिता महिने दोन महिने गावी किंवा क्षेत्रास जावे व त्यांची कितपत आठवण येते ते पाहात असावे. फार प्रबळ आठवण येते व त्यांच्याकरिता लवकर परत जावे असे वाटू लागले, तर समजा आपला अभ्यास फार कच्चा आहे. पुन्हा प्रयत्न करा. बायकामुलांवरील आसक्ती मरणानंतर फार यातना देते. निरनिराळ्या कारणांकरिता पिंडास कावळा शिवत नाही व ती कारणे त्यांना शोधीत बसावी लागतात. तसे कारणच ठेवू नका. एकदा मृत्यूकडे आपण मोर्चा नेला की कशाकरिताही मागे फिरून पाहण्याची वेळ येऊ नये. तसे काही ठेवूच नये. स्वच्छ, निर्मळ, आसक्तिविरहित मनाने मृत्यूस सामोरे जा. यात सर्व आले.

इतके सर्व झाल्यावर राहिले आपले शरीर. खरोखर म्हणजे आपले शरीर हा या सर्वांचा मध्यबिंदू आहे. आपली कल्पना व वागणूक अशी असते की मी म्हणजे माझे शरीर, हे सर्व विश्वाचा मध्यबिंदू असून सर्व विश्व त्याभोवती फिरत आहे. या विश्वात सर्वांत महत्त्वाचा एक घटक जर कोणता असेल तर तो म्हणजे मी व माझे शरीर. मी आहे तर सर्व जग आहे. माझेकरिताच सर्व आप्त–इष्ट, मित्र, संतती, संपत्ती आदि आहेत. मी नाही तर काही नाही ! याकरता प्रथम एक गोष्ट करा की मी व जगातील तीनशे कोटी लोक अशी भावना न ठेवता, मी तीनशे कोटींपैकी एक आहे एवढे खऱ्या अर्थाने मानता आले तरी पुष्कळ काम झाले. इतके झाले म्हणजे निदान माझ्या इतक्याच महत्त्वाच्या अशा तीनशे कोटी व्यक्ती जगात आहेत व आपण म्हणजे फार तर १।३०० कोटयंश आहोत, हे पटेल. खरोखर आहोत यापेक्षाही फार कमी; कारण आपली सूर्यासह सर्व ग्रहमाला विश्वाच्या मानाने एक कणही नाही. मग पृथ्वी कोठे व मानव कोठे इतका विचार करण्याची जरूर नाही. आपले सर्व विचार-आचार- व्यवहार शरीराकरताच होत असल्याने त्यास निश्चित महत्त्व आहे व त्यावरील ममता कमी करणे सोपे नाही. परंतु त्यावरील ममता कमी करणे याचा अर्थ

त्याची आबाळ करा असा नाही. जोपर्यंत आपण जिवंत आहोत तोपर्यंत त्यास आरोग्यसंपन्न ठेवण्याची अगदी अवश्य काळजी घ्या. तसे केले नाही व शरीर एकदा का व्याधिग्रस्त झाले तर तुम्हास शरीरानेच काय पण मनाने सुद्धा काहीच करता येणार नाही. याकरिता शरीराची काळजी अवश्य घ्या. फक्त त्याचे लाड करू नका. त्यावर आसक्ती ठेवू नका त्यास बऱ्यावाईट सवयी लागू देऊ नका. केवळ काही विशिष्ट कारणाकरता शरीर जगवावयाचे हे ध्यानात असू द्या व त्याप्रमाणे वागा. मृत्यू आला म्हणजे आपली इच्छा असो वा नसो आपणास ते सोडावे लागणारच आहे याची जाणीव ठेवा. आपणावर अशी पाळी येण्यापूर्वीच आपणच त्यास सामोरे जाण्याची तयारी ठेवा; याचा अर्थ असा नाही की आत्महत्या करा; परंतु असे वागा व शरीरावर इतकेच प्रेम ठेवा की ' हो मृत्यु आजीच घडो युगांती ' त्याची आपणास खंत वाटू नये. आपल्या समाजात मृत्यूनंतर शरीर जाळून टाकतात, ही एक फार चांगली प्रथा आहे. त्यामुळे Spirit Boby ला अत्यंत वाईट वाटत असते, तरी लवकरच त्याला त्याचा विसर पडतो. विचार करून काही फायदा नाही याची जाणीव होते. परंतु ज्यांच्यामध्ये पुरण्याची चाल आहे, त्यांच्या Spirit Body ची मोठी केविलवाणी स्थिती होते. ते सतत त्या थडग्याभोवती फिरत राहतात. इतकेच नाही तर थडग्यात शिरून प्रेताची उलथापालथ सुद्धा करतात अशी काही उदाहरणे घडली आहेत, घडत आहेत. सगळ्यांनाच असे करणे जमत नाही. पण ज्यांना शक्य होते ते करतातच. त्या सर्वांना असे वाटत असते की ज्या अर्थी देह शिल्लक आहे त्या अर्थी त्यात आपणास प्रवेश नक्कीच मिळेल. थोडे आश्चर्य म्हणजे काही धर्मांत सुद्धा असे सांगितले आहे की Dooms-day चे दिवशी थडग्यातील आत्म्यांचे पुनरुत्थान होऊन त्यांच्या पापपुण्याचा निवाडा केला जाईल. निदान Spirits या खोट्या आशेने सारखे वर्षानुवर्षे घोटाळत राहून यातना पावत असतात. याकरिता जिवंत आहा तोपर्यंतच देहाची आसक्ती व त्यावरील प्रेम ही नाहीशी करा. त्यास जिवंत ठेवा, त्यांचे लाड करू नका. चांगले चांगले खाणे, चांगले कपडे पेहेरणे, चांगल्या वाहनातून मिरवणे या सर्व त्याचे लाड करीत असल्याच्या खुणा आहेत. त्यांचे हाल करू नका, पण फार कौतुक सुद्धा करू नका.

अशा रीतीने सर्व वासना, आशा—आकांक्षा जिवंतपणीच नाहीशा करून टाका. म्हणजे तुम्ही मुक्तच आहात. वासनाच नाही तर वासनादेह कुठून; परंतु याचा अर्थ असा मात्र नाही—मृत्युनंतर तुम्ही लगेच Spirit Body त जाता, एकदम महान चित्शक्तीत विलीन होता. शरीरवाढीवर Spirit Body तयार होत गेली, त्याचे अस्तित्वकालात त्याच्यात सामावून राहिली, त्यामुळे शरीर मृत होताच ती वासना असो वा नसो तिला शरीरातून बाहेर पडून Spirit Body म्हणून काही काल अस्तित्वात राहावेच लागते. मात्र इतकेच की तिच्या भोवती वासनांचे कसल्याही प्रकारचे आवरण नसल्याने ती अत्यंत हलकी व कोणत्याही बोजाव्यतिरिक्त असेल. चित्शक्तीत निसर्ग-

क्रमाने विलीन होईपर्यंत तिला त्या स्वरूपात काल काढावा लागतो. परंतु तिचे काल कंठणे तिला कंटाळवाणे होत नाही. आपण पाहिलेच आहे की Spirit Body ही मृत्यूनंतर भोगयोनी म्हणून राहते (या स्पिरीट बॉडीस भेगसुद्धा असतात.) व तीस भोग भोगीत राहण्यापलीकडे काही करता येत नाही. या वासनाविरहित Spirit Body स मोठी गम्मत पाहावयास मिळते हजारो लाखो Spirit Bodies तिचे आवतीभोवती फिरत असतात. जो तो आपापल्या फिकिरीत असतो. कोणी सत्तेकरिता, कोणी संपत्तीकरिता, कोणी कशाकरता तर कोणी कशाकरता तरी सारखे चोवीस तास तळमळत असतात. सत्ताधाऱ्यांना परत सत्ता हवी असते. राजकारणी लोक तेथेही राजकारण कसे करता यईल याच चिंतेत असतात. तर श्रीमंत लोक त्यांच्या श्रीमंतीच्या तोऱ्यात फिरत असतात या ठिकाणी राजा, सेनापती, पंतप्रधान, कामकरी, गुन्हेगार सर्व एकाच पातळीवर असतात. कोणी कोणाची पर्वा न करता आपापल्या काळजीत चूर असतात, दिवस नाही रात्र नाही, सतत चोवीस तास व वर्षानुवर्षे. त्यास मोठे वैषम्य वाटत असते, की काल मी कोण होतो व आज एकदम असे काय झाले की मला कोणीच विचारीत नाही. सारखा हाच विचार; हीच तळमळ व तीसुद्धा वर्षानुवर्षे ! या वासनारहित Spirit Body ला त्याची गंमत वाटत असते. तीच त्याची करमणूक ! प्रत्येक Spirit Body, तिचा इतिहास व तळमळ त्यास दिसत असते. या तळमळीचा काही उपयोग होत नाही, हे त्यास कळत असते; परंतु तोसुद्धा काही करू शकत नाही. त्यामुळे नुसती गंमत पाहात व करमणूक करून घेत जो काही थोडा काळ त्यास विलीन होईपर्यंत काढावयाचा असतो जितका काढीत असतो. याशिवाय आणखी एक थोडा मुद्दा विचार करण्यासारखा आहे. जन्मतो त्यावेळी आपणाजवळ काही नसते. मन, विचार हे सुप्तावस्थेत असतात, तर वासना नसतातच. सत्ता, कीर्ती, प्रेम, आसक्ती वगैरेचे नाव नसते. प्रयत्न करून आपण वासनारहित होणे म्हणजे जवळ जवळ आपण जन्मतो त्यान्त्र अवस्थेत मृत्यू पावणे असा होतो. त्यात थोडा फरक आहे. आपण जन्मतो त्यावेळी १० इंच असतो. तर आयुष्यात वाढून पाच साडेपाच फूट तरी बनतो. वासना कमी कमी करीत नाहीशा करीत आणल्या तरी आपण ज्याप्रमाणे मृत्युसमयी काहीही प्रयत्न करून ९–१० इंचांचे शरीर करू शकत नाही, त्याचप्रमाणे आपण Spirit Body भोवती जमविलेली ती वासनादि वलये संपूर्ण नाहीशी करू शकत नाही. काही तरी अंश शिल्लक राहतातच. त्या Spirit Body बरोबरच त्याचे अत्यंत सूक्ष्म असे का होईना आवरण राहतेच, व ते नाहीसे होण्यास त्यामानाने थोडा का होईना पण वेळ लागतोच.

Spirit योनीत काय काय व कसे कसे होत असते व त्या योनीत कोणास कसे व काय करता येते हा निराळा विषय आहे व त्याची वर्णने मला फारशी विश्वसनीय, बुद्धीस पटणारी वाटली नाहीत; म्हणून त्याबद्दल विवेचन करीत नाही.

तुम्ही हिंदू , मुसलमान, ख्रिस्ती, बौद्ध, जैन कोणत्याही धर्माचे असा. तुमच्या धर्मात काहीही सांगितलेले असो. तुम्ही पुनर्जन्म माना वा न माना—ईश्वराचे अस्तित्व सुद्धा मानीत असा वा नसा; मी एक गोष्ट तुम्हास निश्चित सांगतो की मृत्युनंतर तुम्हास Spirit Body अगर वासनादेहाच्या स्वरूपात अस्तित्व आहे—अगदी आहेच आहे. ही गोष्ट विज्ञानाने व अनुभवाने सिद्ध झालेली आहे. ते नाकारून चालणार नाही. तो विश्वासाचा प्रश्न राहिला नसून निश्चित असे अस्तित्व असते असे शाबीत झालेले आहे व होत आहे. तो अस्तित्वकाल नुसत्या भोगयोनीसारखा असून अनिश्चित काल टिकणारा आहे. त्याकरिता जिवंतपणी योग्य खबरदारी घेऊन काही केले नाही तर मृत्यूनंतर अनिश्चित कालपर्यंत एकाकी तळमळत दुःखपूर्ण जीवन काढण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून खूप विचाराने काय व कसे करावयास हवे त्याचा वर निर्देश केला आहे. ते सोपे असो वा कठीण, तुम्ही त्याप्रमाणे केले तरच तुम्हाला या योनीत सुखपूर्वक काळ कंठता येईल, याची जाणीव ठेवा. आप मर गये दुनिया डुब गयी या धारणेत राहू नका. दुनिया डुबत नाही. तुम्ही जे काही योग्य—अयोग्य केले असेल त्याचा मोबदला तुम्हास मिळणार आहे. अर्थात या ठिकाणी योग्य व अयोग्य याच्या व्याख्या निराळ्या आहेत व त्या कशा आहेत याचा निर्देश मी वर केलेला आहे. करता कृपया काळजीपूर्वक वारंवार वाचून योग्य वेळी योग्य ते करावयास लागा व तेच तुमच्या हिताचे होईल.

तुम्ही म्हणाल की मी वेळोवेळी Spirit Body बद्दल विवेचन केले आहे व तीबद्दल विवेचनात इतकी पाने खर्ची घातली आहेत; तरी हे खरे कशावरून ? का आपला मी म्हणतो म्हणूनच ! तसे नाही. त्यास भरपूर पुरावा आहे व त्यापैकी काही खाली देत आहे.

—१—

सन १८७८ मध्ये ल्यूरेन्सी नावाच्या तेरा वर्षांच्या मुलीस फिट्स येऊ लागल्या. अशा वेळी ती थोड्या Trance च्या अवस्थेत जावयाची आणि असंबद्ध बोलू लागायची. त्यावेळी तिच्यामधे काही संचार व्हावयाचा. त्यावेळी एका स्पिरिट डॉक्टरने सांगितले की हिला एखाद्या चांगल्या स्पिरिटच्या ताब्यात दिले तर ती स्पिरिट्सच्या त्रासातून मुक्त होईल. एक मेरी रॉक नावाचे स्पिरिट मदत करावयास तयार झाले. ही मुलगी बारा वर्षांपूर्वी १८ वर्षांची होऊन वारली होती. त्यावेळी ल्यूरेन्सी केवळ १५ महिन्यांची होती. तिने त्या मुलीचा ताबा घेतला. त्यासरशी ल्युरेन्सी स्वतःविषयी सर्व काही विसरून गेली. व केवळ मेरी रॉकमय होऊन गेली. मेरी रॉकच्या पूर्व स्मृतीने तिचा संपूर्णपणे ताबा घेतला. त्यायोगे व्हेनाम कुटुंबातील मंडळी अस्वस्थ होऊन त्यांनी तिला मेरी रॉकच्या कुटुंबात नेऊन ठेवले. त्या घरातील सर्व वस्तु व मंडळी तिच्या पूर्ण

परिचयाची आहेत असे आढळून आले. त्या घरातील सर्व मंडळींना ती नावाने हाका मारू लागली. मेरीच्या आयुष्यात घडलेल्या सर्व गोष्टी तिला पूर्ण आठवणीत होत्या. मेरी रॉक हिने सुमारे तीन महिने ल्युरेन्सीच्या शरीराचा ताबा घेतला होता. त्या दरम्यान तिची एक बहीण मिसेस हडसन तेथे आली असता तिने तिला ओळखून एकदम मिठी मारली व नव्हीं म्हणून हाक मारली. नव्हीं हे तिचे लाडके नाव होते व हल्ली कोणी त्याचा वापर करीत नव्हते. मेरी जिवंत असताना त्यांचा एक कुत्रा मेला होता. त्यास पुरण्याची जागा तिने बरोबर दाखवून दिली. तिने इतक्या बारीकसारीक गोष्टी सांगितल्या की त्यांची खात्री झाली की ही मेरीच आहे. फक्त तिचा देहच बदलला आहे. पुढे ल्युरेन्सी बरी झाली व मेरीने त्या देहाचा ताबा सोडला. तरी पण मेरीचे वडील भेटत त्यावेळीं ल्युरेन्सीचा परत ताबा घेऊन, त्यांच्याशी ती बोलत असे.

—२—

सन १८६० ते ६३ पर्यंत जॉली हाऊस नावाच्या वास्तूत जॉली कुटुंब राहात असे. जॉली हे एक वकील होते व तोपर्यंत ते घर इतर सामान्य घरांप्रमाणेच होते. १८६० मध्ये एका रात्री त्यांची नोकर झोपलेली असताना तिच्या पलंगास जोरजोराने धक्के बसू लागले व आवाज येऊ लागले. ती अत्यंत घाबरली व तिने श्री. जॉली यांना ती हकीकत सांगितली. त्यांनी तिची थट्टा केली व पुन्हा अशा गोष्टी सांगू नकोस म्हणून ताकीद दिली काही दिवसांनी दारावर Rappings, धक्के जोरजोराने बसू लागले व जॉली यांचे कुटुंब भयभीत झाले लवकरच त्यांना त्यांच्या एका नातेवाईकाच्या मृत्यूची खबर मिळाली. जून १८६१ मध्ये ही गडबड आणखी वाढली. ती इतकी की त्यांचा एक मुलगा बेशुद्ध झाला व शुद्धीवर आल्यावर त्याने एक अस्पष्ट व्यक्ती समक्ष पाहिल्याचे सांगितले. ती व्यक्ती धुक्याने आच्छादल्यासारखी दिसत होती. स्त्री नोकर शेवटी कंटाळून नोकरी सोडून निघून गेली व गडबड शांत झाली. त्यामुळे त्यांना वाटले की या स्त्रीमुळेच ही गडबड होत असावी. परंतु ऑगस्ट १८६३ मध्ये हे आवाज जास्त स्पष्ट व जोरात ऐकू येऊ लागले. त्यावेळी जॉली पति-पत्नी बाहेरगावी गेली होती. त्रास व आवाज इतका वाढला की मुलांना घर सोडून जावे लागले. जॉली परत आल्यावर ते आवाज त्यांच्या मागे लागले. ते ज्या ज्या खोलीत जात तेथे तेथे आवाज ऐकू येऊ लागले. त्रास वाढू लागला म्हणून त्यांनी धर्मोपदेशकास बोलावले. त्याने प्रार्थना वगैरे सर्व काही केले. परंतु त्रास कमी होईना. म्हणून त्यांनी पोलिसांकडे ती बाब सोपविली. पोलिसांनी जॉली कुटुंबास घर सोडून थोडे दिवस बाहेर राहण्यास सांगून ते स्वतः तेथे मुक्काम ठोकून बसले. परंतु ते सहा दिवस तेथे राहिले तरी त्यांना कसलाही अनुभव आला नाही. जॉली कुटुंब परत येताच त्रास इतका वाढला की दैनंदिन काम करणे अशक्य होऊ लागले. शेवटी सन १८६३ मध्ये त्यांनी ते घर कायमचे सोडले व दुसऱ्यास भाड्याने दिले. त्यानंतर तो त्रास

CamScanner

कायमचा थांबला. अशा स्पिरिटला Poltergeist असे म्हणतात. या हकीकतीवर ९० पानांचे एक पुस्तक प्रसिद्ध झाले आहे.

—३—

सन १७९२ साली फ्रान्समध्ये जी राज्यक्रांती झाली तिच्यात पुष्कळसे सरदार, अधिकारी वगैरे मेले. गव्हर्नर मॉरिस हे अशा एका सरदाराच्या घराचे मालक झाले. त्यात त्या सरदाराची अगणित संपत्ती-जवाहिर, कापड-चोपड बहुमोल पेंटिंग्स वगैरे होती. सन १८१६ त वयाच्या ६४ वे वर्षी ते मरण पावले, त्यावेळी त्यांचा मुलगा कांही महिने वयाचा होता. १८१७ च्या नाताळात मिसेस ॲनि मॉरिस ही आपल्या मुलास घेऊन बसली होती. त्यावेळी तिला आठवले की तिच्या नवऱ्याने सांगितले होते की तिचा मुलगा सर्व संपत्तीचा मालक होईल.

जणू काय यास उत्तर म्हणूनच घोड्याच्या टापांचा आवाज ऐकू येऊ लागला. व लवकरच दरवाज्यावर थापा पडू लागल्या व लवकरच दार उघडून आमच्या पुतण्याचे वारसपत्र स्वाधीन कर नाही तर दार मोडून आत येऊ म्हणून धमकीचे भाषण तिला ऐकू आले. ती फार घावरली व मुलाचे संरक्षण कसे करता येईल याचा विचार करू लागली. तिला खरोखरी ते मृत्यूपत्र किंवा ती संपत्ती कोठे आहे याची काहीच माहिती नव्हती व तिने मनात आणले असते तरी तिला काहीच करता आले नसते. ती असा विचार करते आहे तोच तिला धुक्यासारखे काही तरी दिसू लागले. खोलीतील चित्रे हलू लागली व त्यातील व्यक्ती चिलखतासुद्धा बाहेर पडत आहेत व गव्हर्नर मॉरिस यांना आव्हान देत आहेत असे दिसले, तीस प्रथम हा स्वप्नाचा काही प्रकार असावा असे वाटले. परंतु लवकरच तिला वस्तुस्थितीची जाणीव झाली व आपल्या खोलीत कोणीतरी आहे असे जाणवले. दरवाजास धक्के देणारे आले तसे घाईघाईने निघून गेलेले तिने पाहिले. तिने नंतर मागे वळून पाहिले तर तिला गव्हर्नर मॉरिस उभे असलेले दिसले. त्यांचा पोषाख, सरंजाम वगैरे सर्व हयात असताना होता, तसाच होता. त्यांनी तिला आपल्या मागून येण्याची खूण केली. त्यांनी गुप्त दालने उघडून तिला सर्व संपत्ती, जवाहीर, गुप्त कागदपत्रे व बहुमोल कपडे, पेंटिंग्ज वगैरे सर्व दाखविले. त्यावेळी तिला खरी कल्पना आली की, तिची खरी संपत्ती किती होती. ती कंटाळून खुर्चीत बसली त्यावेळी गव्हर्नर मॉरिस वाकून तिचे चुंबन घेणार इतक्यात नवीन वर्षाचा घड्याळातील एकच ठोका पडला व ते जसे त्यांच्या पेंटिंगमधून बाहेर पडले होते तसे हळू हळू आत गेले व अदृश्य झाले.

—४—

पश्चिम ऑस्ट्रेलियात श्री. हॅक (Hack) यांचे एक फार्म (शेतजमीन) होते. अगदी प्रथम म्हणजे ता. १७ मे १९५५ रोजी रात्री दहा वाजता कोठून तरी एका-

एकी तेथे दगड येऊन पडू लागले. ते कोठून व कसे येतात याचा काहीच पत्ता लागेना. फार्मवरील नेटिव्ह नोकर घाबरून धावत, मालकाकडे गेला. त्यानें सांगितले की एक गोल चेंडू दारातून आत आला व इतस्ततः फिरू लागला. नंतर एक लोखंडी कांब छपरावर येऊन आदळली व दगड येऊन पडू लागले. त्यांचा फारसा विश्वास बसला नाही. तरी पण त्यांनी त्याच्या सोबतीस काही माणसे पाठवली. लागोपाठ तीन रात्री या घटना घडत गेल्या, व मग त्यांना जाणीव झाली की त्यांच्या फार्मवर काही विलक्षण घडत आहे. नंतर परिस्थिती जास्त बिघडली. आता दगड भर दिवसा पडू लागले. दिवसरात्र असे तीन दिवस सारखे घडत गेले. श्री. हॅक तेथे गेले. त्यांना काही आढळले नाही. परंतु शेजाऱ्यांनी काही भयंकर आवाज ऐकू आल्याचे सांगितले. सप्टेंबरमध्ये एका रात्री तीन मोठाले दगड येऊन पडले. त्यानंतर थोडी विश्रांती मिळाली.

१५ मे १९५६ रोजी पुन्हा दगडवर्षावास सुरवात झाली व तो हिवाळाभर सुरू राहिला. ता. २८–८–१९५६ रोजी सायंकाळी ५–३० ला एक मोठी वीट छपरावर येऊन पडली. ती त्यांनी परत फेकली तर त्यास उत्तर म्हणून दोन किलो वजनाचा एक दगड येऊन पडला. असे पंचवीस वेळा घडले. त्यानंतर एका मुलाचा बूट त्यांना येऊन लागला. व एक साबूची वडी पाठीवर आदळली. ती टेबलावर नेऊन ठेवली तो तीच पुन्हा पाठीवर येऊन आदळली. नंतर काटे, चमचे, सुरे, कांदे, बटाटे वगैरे सारखी फेकली जाऊ लागली. तें एक पितळी पत्रा जमिनीवर ठेवून मोटारीकडे जाऊ लागले, तोच तो पाठीवर येऊन आदळला. आजूबाजूस निदान दहा फूट अंतरावर कोणी नव्हते. अशी समजूत आहे की बॉन थॉर्न नावाचा एक कामगार अपघाताने मेला, व त्यानंतर लवकरच असे दगड येऊ लागले. कामगारांनी एक नेटिव्ह मांत्रिक आणून काही उपचार केले, व त्यानंतर हे सर्व प्रकार थांबले.

—५—

माणसाप्रमाणेच काही इतर प्राण्यांचे पण स्पिरिट असू शकतात. मात्र हा प्रकार क्वचित् आढळून येतो व तो बहुतांशी कुत्र्यांमधे असतो. त्याच्या खालोखाल मांजरांमध्ये.

१. इंग्लंडमधील लीडफोर्ड येथे घोडा गाडीतून काही इसम चालले होते. लवकरच कोचमनने आतील मंडळींचे लक्ष वेधले. एक भयंकर दिसणारा काळा कुत्रा वेगाने पाठलाग करीत येत होता. त्याने चाबूक मारून वेग वाढविला. त्याबरोबर कुत्र्याने पण आपला वेग वाढवला. तो कोठून व कसा आला ते काही कळेना. एका ठराविक जागेपर्यंत त्याने पाठलाग केला व तेथे आल्यावर तो थांबला.

२. लॅंकेशायरमध्ये एक इसम गल्लीतून आपल्या घराकडे चालला होता. इतक्यात एक भयंकर लाल डोळे असलेला काळा कुत्रा कुंपणावरून उडी मारून समोर

CamScanner

उभा राहिला. त्यास क्षणभर वाटले हा आता अंगावर उडी मारून गळा धरणार. परंतु तो थोडा वेळ स्तब्ध उभा राहिला व परत कुंपणावरून उडी मारून नाहीसा झाला. हा अनुभव बऱ्याच लोकांस येत असे. मात्र तो फक्त रात्रीच

३. एकदा एक स्त्री दारे खिडक्या लावून विणकाम करीत बसली होती. तिला असे दिसले की एक काळा कुत्रा तिच्याजवळ येण्याचा प्रयत्न करीत आहे. दारे वगैरे बंद असता हा आत कसा आला याचा ती विचार करीत आहे तोच तो नाहीसा झाला. तिने तिच्या आईस ती हकीगत सांगितली. त्यावर ती म्हणाली की तुला भास झाला असेल. तू खोलीत जा; मी बाहेर उभी राहते व तो दिसला की मला खूण कर. त्याप्रमाणे ती आत गेली व तिला तो कुत्रा दिसताच तिने खूण केली. परंतु आई यावयाच्या आतच तो नाहीसा झाला. लवकरच तिची आई आजारी पडली व मरण पावली.

४. पूर्व अंजेलिया मधील एक कुत्रा ' काळा शक ' यास एकच डोळा आहे व तो त्यातून अग्निवर्षाव करीत आहे असे वाटते. तो पुष्कळ वेळा गल्लीबोळातून वावरताना दिसतो. परंतु त्याचा आवाज होत नाही किंवा पावलांचे ठसे उमटत नाहीत. मात्र भुंकू लागला की इतका भयंकर भुंकतो की चांगल्या धीराच्या माणसाचा थरकाप होईल. परिणामी तो ज्याला दिसे त्याचे आप्तातील कोणी लवकरच मृत्युमुखी पडे.

५. १८२५ मध्ये मॅन्चेस्टरचे रस्त्यातून एक डोके नसलेला काळा कुत्रा हिंडताना दिसे. त्याचप्रमाणे एका पुलाजवळ सुद्धां असाच एक डोके नसलेला काळा कुत्रा पुष्कळ वेळा दिसत असे.

६. इंग्लंडमधील एका गृहस्थाची हकीकत आहे. त्यांचे एक आवडते मांजर युद्धकाळात मारले गेले. त्यानंतर ते एके ठिकाणी पार्टीकरता गेले असता त्यांचा मित्र म्हणाला की, तुमचे मांजर फारच चांगले आहे. त्यास काही खाऊ घालू काय ? त्यावर त्यांनी ते कसे आहे म्हणून विचारले असता त्यांनी त्याचे वर्णन केले व विशेषत: त्याच्या डोक्यावरील पांढऱ्या रंगाचे वर्णन केले. त्यावरून त्यांची खात्री झाली की त्यांचे आवडते मांजर Spirit होऊन येऊन गेले.

—६—

१. रॉबर्ट ग्रँट नावाचा मुंबई इलाख्याचा गव्हर्नर १८३८ साली पुणे येथे गव्हर्मेंट हाऊसमध्ये वारला त्याच दिवशी सायंकाळी सूर्यास्तानंतर गव्हर्मेंट हाऊसच्या मुख्य दरवाजातून एक काळे मांजर बाहेर पडले. ते त्या ग्रँट साहेबाचे भूत असावे असा इतर अधिकाऱ्यांचा समज झाला. कारण ते ग्रँट साहेब बाहेर पडत त्याच वेळी साधारण बाहेर पडून ते ज्या रस्त्याने फिरून परत येत अगदी त्याचप्रमाणे हे मांजर करीत असे. म्हणून त्यांनी असा हुकूम काढला की सूर्यास्तानंतर असे मांजर त्या

दरवाज्यातून बाहेर पडले की तेथे असलेल्या संत्र्यांनी त्याला ग्रँट साहेबाला ज्याप्रमाणे सलामी देण्यात येत असे, त्याचप्रमाणे देत जावी. हा क्रम तो वारल्यानंतर पंचवीस वर्षेपर्यंत चालू होता.

२. सन १८७५ मध्ये फ्रान्समधील ट्युमान शहरात हेन्री बॅरिंजर नावाच्या इसमाजवळ एक अद्भुत मांजर असल्याचा त्यांचा दावा होता. ते त्याच्याशी निरनिराळ्या विषयांवर मानवी भाषेत बोलत असे. ते सर्व संभाषण लक्षपूर्वक ऐकत असे व त्यात काही न उलगडण्यारखे वाटले तर त्या मांजरास विचारण्यात येई व त्याचे समर्पक उत्तर ते मानवी भाषेत देई. त्यास ज्या वेळी जे खावेसे वाटे ते मानवी भाषेत स्पष्ट मागत असे व त्याप्रमाणे त्यास मिळू शकले नाही तर अत्यंत गलिच्छ अशी शिवीगाळ करीत असे. ते कित्येक महिने गुप्त होत असे. ते त्याप्रमाणे सांगून जाई. त्याचे गुप्त होण्याच्या काळात ते आपल्या मूळच्या मानवी स्वरूपात हिंडत असावे असे त्यांना वाटत असे.

—७—

मिल लॅन्ज (Mill Lange) नावाची एका टॅक्स-कलेक्टरची अनैतिक संबंधापासून झालेली मुलगी व्हँकुव्हरहून पॅरिस येथे आली. ती अत्यंत रूपवान असल्याने लवकर प्रसिद्धी पावली व एका जुगार घरात तिची नेमणूक झाली. तिला ते येजीन म्हणत. ती एका सायंकाळी बागेत फिरत असता तिच्यापुढे जणू आकाशातूनच असा एक तरुण मनुष्य येऊन उभा राहिला व ती त्यासंबंधी तपास करणार तोच तिला लवून अभिवादन करून म्हणाला, ‘ तुम्ही फ्रान्समधील फर्स्ट लेडी झाल्यावर माझी आठवण ठेवाल काय ? ’ इतके बोलून तो आला तसाच नाहीसा झाला. त्यावेळी तिला आठवले, त्यावेळची फर्स्ट लेडी पाँपेदूर ही अशीच अनैतिक संबंधापासून झालेली होती. त्यानंतर इतिहास सांगतो की ती भराभर यशाच्या पायऱ्या चढत चढत तेथील राजा पंधरावा लुई याच्या सेक्रेटरीच्या नजरेत भरली. लवकरच ती काऊंट डी बारीशी लग्न करून काऊंटेस झाली. पुढे लवकरच लुईचे हृदय पण तिने जिंकले. त्यावेळी ती भविष्यवाणी विसरली होती. अशाप्रकारे ऐश्वर्य व मौजमजेत दिवस जात असता व्हर्सेलिसला परत येत असता तिला तिचे भविष्य सांगणारी व्यक्ती एकाएकी एका भिंतीस टेकून उभी असलेली दिसली. त्याने तिला पाहून आपला हात स्वतःच्या तोंड भोवती फिरवून दर्शविले की त्याचे म्हणणे खरे झाले आहे. ही हकीगत तिने आपल्या मैत्रिणीस सांगितली. त्यावरून त्या मैत्रिणीने पोलिसप्रमुखास त्या माणसास हुडकून काढण्यास सांगितले. हे कळल्यावर तिने आपली नापसंती व्यक्त केली. कारण त्याने तिला काहीच त्रास दिला नव्हता. त्या पोलिसप्रमुखाने इंच न् इंच जागा तपासली; परंतु त्यास काहीच तपास लागला नाही. ब्लड हाऊंड सुद्धा उपयोगात आणले; परंतु उपयोग झाला नाही.

नंतर एके दिवशी बागेत फिरताना तो इसम फाटकाजवळ दिसला. तेथील एका संगमरमरी बाकावर एक पाकीट ठेवून तो दिसेनासा झाला. त्यात असा मजकूर होता की तुमच्या सांगण्यावरून पोलिस माझा तपास करीत आहेत, हे मला माहीत आहे. परंतु त्यांना सांगा की माझा तपास लागावयास हवा असेल तर तुम्हास स्वर्गातच यावे लागेल. मी तुम्हांस सांगितलेले भविष्य किती खरे ठरले ते तुम्ही पाहातच आहात; यापुढील तुमचे भविष्य म्हणजे या सर्वांच्या विरुद्ध असे समजा व त्याची तयारी ठेवा.

पुढे सन १७७४ मध्ये राजा लुई याला देवी आल्या व त्यास हॉस्पिटलमध्ये नेत असताना हिचा कोच पण पाठोपाठ हळूहळू येत होता. त्या वेळी तिला त्या माणसाचे दर्शन झाले व खात्री झाली की आपला चांगला काल आता संपला असून, कमनशिबास तोंड देण्याची तयारी ठेवावी. राजाची प्रकृती थोडी सुधारली; परंतु काही दिवसांनी पुन्हा बिघडली व त्यातच त्याचा अंत झाला. त्यानंतर तिचे नशीब फिरले. तिला एका कॉन्व्हेन्टमध्ये पाठवण्यात आले. तिचे सर्व कर्ज वारून तिला पेन्शन पण मंजूर केले. सन १७९१ त इंग्लंडमध्ये जाऊन तिला आपले जवाहिर विकावे लागले. पुढे बंडाच्या धामधुमीत तिला राजाचे इतर सरदार, मानकऱ्यांबरोबर पकडण्यात येऊन फाशी दिले गेले व अशा रीतीने नशिबाने आपले चक्र पुरे केले.

—८—

श्री. Uxkul हे एकदा रशियात असताना त्यांना न्युमोनिया झाला. म्हणून हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले. अखेरची वेळ म्हणून त्यांना ऑक्सिजनवर ठेवण्यात आले व त्यांची शुद्ध गेली. परंतु लगेच त्यांना असे आढळून आले की ते हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांबरोबर उभे असून कर्मचारी वाकून त्यांच्या देहाकडे पाहात आहेत. त्यांनी डॉक्टरास स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना ते कळले नाही. त्यांनी आपले दोन्ही हात एकमेकात अडकविण्याचा प्रयत्न केला तर ते एकमेकातून आरपार गेले. हे सर्व होत असताना ते कॉटवरील स्वतःच्या शरीराकडे पाहात होते. त्यांनी बोलावयाचा प्रयत्न केला. परंतु ते जमले नाही. डॉक्टरांनी ते मेल्याचे निदान केले व ते त्यांस समजले. जवळच्या रशियन नर्सने प्रार्थना म्हटली. त्यांचे शरीर प्रेतागाराकडे नेऊ लागले. त्यावेळी त्यांस आठवलें की दोन स्पिरिट देवदूतांनी त्यांस हात धरून बाहेर नेले. बर्फ पडत होते परंतु थंडी वाजत नव्हती. ते त्यांना उंच आकाशात घेऊन गेले. तेथे त्याना ओळखीचे असे पुष्कळच मृतात्मे आढळले. त्याना आणखी वर नेण्यात आले. तेथें उज्ज्वल व धवल असा प्रकाश होता. तेथे त्यांस एक आवाज ऐकू आला की “ अजून तयारी झालेली नाही. ” त्यांची पुन्हा शुद्ध गेली व त्यांस परत प्रेतागारात आणले गेले, तेथे त्यांची बहीण अजून रडत बसलेली

होती. तेथे त्यांचे शरीर झाकून ठेवलेले होते. त्यांची पुन्हा शुद्ध गेली व पुन्हा शुद्धीवर आले त्या वेळी त्यांना फार थंड वाटले व ते शरीरात शिरून पुन्हा जिवंत झाले. त्यांच्या भोवती हॉस्पिटलमधील कर्मचारी व ते मरण पावले म्हणून सांगणारा सर्जन पण होता.

—९—

मिसेस डॉर्थी नार्डन व मिस ॲग्नेस या सहल करावयास म्हणून डिपे या फ्रान्समधील ठिकाणाजवळील एका खेड्यात गेल्या होत्या. ता. ४ ऑगस्ट १९५१ रोजी ॲग्नेस सकाळी ४|२० ला उठून खोलीबाहेर गेली व परत आल्यावर म्हणू लागली की, डॉर्थी, तुला काही आवाज ऐकू येत आहे काय ? मी उठून पाहाते तो समुद्रावर जणू काही तुफान उफाळले असून मोटमोठ्या आरोळ्या, तोफा डागल्याचें आवाज वगैरे ऐकू येत होते जखमी लोकांचे विव्हळणे, तोफा-बंदुकांचे आवाज वगैरे-सारखी धुमश्चक्री चाललेली दिसत होती. आम्ही गच्चीवर गेलो त्यावेळी समुद्रकिनारा दिसत होता. अंधार असल्याने फारसे दिसत नव्हते तरी आवाज स्पष्ट ऐकू येत होते. पुढे ते आवाज वाढत गेले व बंदुका, तोफा, बॉंबिंग वगैरे स्पष्ट ऐकू येऊ लागले. सकाळी ४-५० ला सर्व एकदम थांबले. सकाळी ५–५० ला पुन्हा सुरू झाले. परंतु फार वेळ चालले नाही त्या वेळी विमानांची घरघर, त्यांनी टाकलेले बॉंब वगैरेंचे सुद्धा आवाज ऐकू आले. परंतु ते टिकले नाहीत, या स्त्रियांनी जे काही ऐकले व पाहिले तें ता. १९|८|१९४२ रोजी इंग्लंडने डिपे (Depis) येथे जर्मनांवर केलेल्या हल्ल्याचे वेळी घडलेल्या हकीकतीशी समरूप होते. जणू काही कोणी त्याच हल्ल्याची पुनरावृत्ती केली होती. खरोखरी तो हल्ला ता १९|८|१९४२ ला सकाळी ३–४७ ला सुरू झाला व तो सकाळी ६–५५ पर्यंत सुरू होता.

—१०—

सन १९४३ साली बार्बेडास या बेटावर काही अनपेक्षित गोष्टी घडल्या.

सर इव्हान ग्रेगर हे १८४१ मध्ये मरण पावले व त्यांची शवपेटी त्यांच्या कौटुंबिक शवगृहात ठेवण्यात आली. तिकडे अशी पद्धत होती की स्मशानभूमीत एका कुटुंबाकरता म्हणून तळघरासारखे बांधकाम करून त्यात वेळ पडेल त्याप्रमाणे त्या कुटुंबातील मृत व्यक्तींच्या शवपेट्या ठेवण्यात येत. त्याप्रमाणे १९४३ साली ग्रेगर यांचे शव ज्या शवगृहात ठेवण्यात आले होते ते उघडण्याचा प्रसंग आला. फ्री मेसन या संस्थेचे संस्थापक अलेक्झांडर आयर्विन यांची पण शवपेटी त्याच शवगृहात ठेवलेली होती. म्हणून ते अनायासे उघडले जात होते म्हणून बरेचसे लोक फ्री मेसन यांचे शवपेटीस अभिवादन करण्याकरता जमले होते. ता. १४|८|४३ रोजी ते

उकरून उघडण्यात आले. स्लॅब काढल्यानंतर आतील वाईट हवा निघून जावी म्हणून काही वेळ थांबून आत जाण्यासाठी जागा मोकळी करून आत प्रवेश करताच त्यांना असे आढळून आले की, गव्हर्नर ग्रगेर यांची धातूची सुमारे शंभर वर्षांपूर्वीची शवपेटी दरवाज्याजवळील भिंतीस टेकून उभ्या स्थितीत आढळली. विटा वगैरे बाजूस करून हळूच ती पेटी जमिनीवर व्यवस्थित ठेवली. ते शवगृह बंद केल्यानंतर कोणत्यातरी अज्ञात शक्तीने ती अत्यंत जड अशी पेटी हलवून उभ्या स्थितीत ठेवली होती. त्यानंतर फ्री मेसन मंडळी त्यांचे ग्रँड मास्टर आर्विन यांची शवपेटी पाहू लागले तर ती अजीबात गायब झालेली आढळली. त्या शवगृहास दुसरी कोणतीही वाट नव्हती. जे एक दार होते ते विटा, चुना, दगड यांनी पक्के केले होते व मध्यरात्रीच्या काळात त्या भागात भूकंप वगैरे झाल्याचीसुद्धा नोंद नव्हती. ही घटना कशी घडली याची आजतागायत कोणासही कल्पना नाही.

या घटनेमुळे त्याच बेटावरील सन १८१७ ते १८२० मध्ये यासारख्याच घडलेल्या घटना उजेडात आल्या.

चेस कुटुंबाचे असेच एक शवघर होते व त्यात त्या कुटुंबातील मृत व्यक्तींच्या शवपेट्या ठेवण्यात येत. सन १८१२ मध्ये ते प्रथम उघडण्यात आले. त्यावेळी त्यांतील दोन पेट्या हाललेल्या दिसल्या. ही गोष्ट त्यांनी चर्च व स्मशान अधिकारी यांच्या कानावर घातली. त्यावरून त्यांनी स्वतःच्या देखरेखीखाली ते शवघर बंद करून त्यावर आपले सील केले. चार वर्षांनंतर एका मुलास पुरण्याकरता ते उघडावयाचा प्रसंग आला. त्यावेळी ते अधिकारी हजर होते. त्यांनीं सील वगैरे तपासून पाहिले व ते बरोबर होते. दरवाजा पक्का बंद होता. परंतु आत जाऊन पाहातात तो सर्व पेट्या अस्ताव्यस्त स्थितीत हालविलेल्या दिसल्या. त्या पुन्हा व्ययास्थित ठेवून नवीन पेटी त्यात ठेवून दरवाजा बंद केला व विटा, सिमेंट वगैरेंनी स्लॅब टाकून बंद केले व त्यावर पक्के सील केले. दोन महिन्यानंतर प्रसंग आला म्हणून, सर्वांसमक्ष सील दगड, माती, विटा इ० काढून उघडण्यात आले तो कोणी अज्ञात शक्तीने सर्व पेटया विस्कळीत करून टाकल्या होत्या. तीन वर्षांनंतर पुन्हा प्रसंग आला म्हणून उघडण्यात आले. त्यावेळी तोच प्रकार आढळून आला. म्हणून ती हकीकत त्यावेळचे गव्हर्नर लॉर्ड कांबरमीयर यांना कळविण्यात आली. त्यावरून ते स्वतः आले व त्यांच्या समक्ष त्या पेटया व्यवस्थित ठेवण्यात आल्या; व सर्व जमिनीवर बारीक पांढरी वाळु टाकण्यात आली—कोणी काही प्रयत्न केलाच तर त्यांची पावले त्यावर उमटावी. नंतर काळजीपूर्वक सर्व बाजूंनी बंदोबस्ताने सर्व दगड माती, चुना यांनी पक्के बंद केले. व ओल्या सिमेंटमध्ये गव्हर्नर यांनी स्वतःचे व इतर कर्मचाऱ्यांनी आपापली सिले केली. त्यानंतर नऊ महिन्यांनी ता. २० एप्रिल १८२० रोजी गव्हर्नरांच्या समक्ष ते पुन्हा उघडले. त्यापूर्वी त्यांनी व त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांनी आपापली सिले तपासून पाहिली व ती बरोबर आहेत असे पाहून उकरण्यास सांगितले. सिमेंट वगैरे काढून झाल्यावर स्लॅब

काढताना त्यांना वाजवीपेक्षा बराच जड असा अडथळा वाटला. पुष्कळ प्रयत्न करूनही हलेना. मग सर्वांनी मिळून नेट लावून तो थोडा सरकवला. त्या फटीतून आतील अंधारामुळे काही दिसेना म्हणून प्रयत्न करून ती फट मोठी केली. तीतून पाहिले असता त्यांना आढळले की, एक अत्यंत जड पेटी दरवाज्यास टेकवून उभी केली गेली होती म्हणून दरवाजा उघडत नव्हता. ती पेटी इतकी जड होती की, सात आठ माणसांखेरीज ती हालणे देखील शक्य नव्हते, मग ती उचलून अशा स्थितीत इतक्या उंचावर आणून ठेवणे दूरच. इतकी जड पेटी सहज उचलून दरवाजाच्या मधोमध पायऱ्यांवर ठेवली गेली होती. इतके होऊनही वाळू जशीच्या तशीच होती. त्यावर साधा ओरखडा सुद्धा नव्हता. एका लहान मुलाची पेटी तर इतक्या जोराने फेकली गेली होती की, तिच्या धक्क्याने विटांच्या भिंतीस एक खड्डा पडला होता. चेस कुटुंबाने मग त्या सर्व शवपेट्या तेथून हलवून दुसरे ठिकाणी नेऊन ठेवल्या व मग हा प्रकार थांबला. ती मोकळी जागा प्रवाशांस अजून दाखविण्यात येते.

—१—

फ्रान्सच्या दक्षिण भागात कोहोर्स नावाचे एक गाव होते. मध्ययुगीन काळात त्या भागात सर्वत्र लुटालूट, रक्तपात वगैरे चालावयाचे, निरनिराळे सरदार आपापल्या किल्ल्यात राहून अनुयायांच्या मदतीने आपापसांत लढाया, रक्तपात, लुटालूट वगैरे सर्रास करीत असत. त्यामुळे रयतेस कसलीच शाश्वती वाटत नसे. यावरून तेथील बिशपने परमेश्वराच्या नावाने एक फतवा काढला की, शुक्रवार, शनिवार, रविवार या दिवशी कोणी भांडणतंटा करावयाचा नाही व सर्वांनी संपूर्ण शांततेने वागावयाचे. ते सर्वांनी मान्य केले. त्याप्रमाणे काही दिवस चालले, परंतु लवकरच एक सरदार बंडखोर निघाला व त्याने तो फतवा धुडकावून लावून दंगा करण्यास सुरवात केली. त्यास पुष्कळ वेळा बजावून सुद्धा त्याने मानले नाही. त्यामुळे बिशप फार रागावला. पुढे तो सरदार एका लढाईत मारला गेला व त्याचे प्रेत चर्चमध्ये न्यावयाची त्याच्या अनुयायांनी तयारी केली. परंतु बिशपने त्यास हरकत घेतली, त्यावरून त्याचे अनुयायी हत्यारबंद होऊन बळजबरीने चर्चमध्ये घुसले व त्यांनी सरदाराची शवपेटी योग्य ठिकाणी ठेवून व्यवस्थित बंद करून ते परत आले. दुसऱ्या दिवशी सकाळी लोकांस एक चमत्कार पहावयास मिळाला की त्याचे प्रेत अस्ताव्यस्त चौकात पडले होते अनुयायांना राग आला व बिशपचेच हे कृत्य असावे असे समजून पुन्हा प्रेत घेऊन ते चर्चमध्ये गेले. उघडून पाहाता, शवपेटी तशीच असून आतील शवास गुंडाळलेले कापडसुद्धा तसेच होते. त्यांनी त्या पेटीत ते शव पुन्हा ठेवून दगड, माती, चुना यांनी बंद करून त्यावर व सबंध चर्चवर पहारा ठेवला. परंतु दुसऱ्या दिवशी पुन्हा तोच प्रकार आढळला. या वेळी ते शव जास्त अस्ताव्यस्त स्थितीत

होते. असेच पुन्हा दोन वेळा घडले. मग ते घाबरले व त्यांनी ते शव रानात कोठे तरी खोल खड्डा करून पुरले. मग ते पुन्हा परत आले नाही व इतर सरदारांनी त्यावरून धडा घेतला.

—१२—

क्रीट बेटावर मे महिन्याच्या अखेरीस व जूनच्या सुरवातीस हजारो लोकांनी पाहिलेली घटना आहे. सूर्योदयापूर्वी थोडा वेळ व सूर्यास्तानंतर थोडा वेळ अशी घटना दिसत असे. सायंटिस्ट, तत्त्वज्ञ, संशयवादी सर्व प्रकारच्या लोकांनी प्रत्यक्ष ही घटना पाहून खात्री करून घेतली होती. मृगजळासारखे काही आहे काय म्हणून शंका काढली; परंतु त्यांनीच नंतर ते नाही म्हणून कबूल केले. सर अर्नेस्ट बेनेट यांनी सांगितले की, क्रीट बेटावर समुद्रकिनारी कँपिंग करीत असताना त्यांनी पाहिले की, पूर्वकालीन हजारो सैनिक जुनी चिलखते घालून तरवारी, भाले, ढाली इत्यादि आयुधांनी सज्ज होऊन रांगा करून चालत जात असताना दिसत होते. परंतु आवाज मात्र ऐकू येत नव्हता. ही घटना त्यांनी सूर्यास्तानंतर काही वेळाने पाहिली.

—१३—

काश्मीर सरहद्दीवर खंबा फोर्ट म्हणून एक किल्ला आहे. तेथे गुरखा हवालदार याचे भूत सतत वावरत असते. कोणी पहारेकरी कामावर असताना झोपी गेला किंवा पेंगू लागला तर त्यास जागे करून कर्तव्यप्रवण करीत असते सन १९४८ मधे हिंदुस्थान पाकिस्तानच्या काश्मीर सरहद्दीवर झालेल्या चकमकीत त्याने भाग घेतला होता. खिशात ग्रेनेड्स व हातात कुकरी घेऊन किल्ल्यातील पाकिस्तानी गाफील आहेत असे पाहून त्याने एकट्यानेच हल्ला चढविला. किल्ल्याचा ताबा घेऊन तो हिंदुस्थानी सैनिकांच्या हवाली केला. त्यावेळी झालेल्या जखमांनी तो मरण पावला; परंतु त्यानंतर तो सतत त्या भागात वावरत असतो. कोणी पहारेकरी पेंगताना दिसला तर ओरडून जागे करतो. एकदा तर एक पहारेकरी झोपला होता; त्याच्या इतक्या जोराने गालात मारली की तो आवाज पुष्कळांनी ऐकला. त्याचा गाल पण बराच वेळ लाल होता. तेथील सर्व सैनिक त्यास आपला मित्र व संरक्षक मानतात. सर्व पहारेकऱ्यांना हे भूत कर्तव्यतत्पर ठेवते.

—१४—

इंग्लंडचा राजा चार्लस व पार्लमेंटचे सैन्य यामध्ये २३–१०–१६४२ रोजी एज हिल येथे लढाई झाली व तीत चार्लसचा पराभव झाला. त्यात पार्लमेंटच्या सैन्याचे नेतृत्व अर्ल ऑफ ससेक्सकडे होते.

या घटनेनंतर सुमारे दोन महिन्यांनी एक चमत्कार दिसू लागला. एका गुराख्याने एका सायंकाळी गावातील लोकांस बोलावून आकाशात काय चालले आहे ते पाहण्यास सांगितले. त्या ठिकाणी भुतांची घनघोर लढाई चालली होती. आकाशात सैन्याची जमवाजमव चालली असून सैन्याची हालचाल सुरू झाली होती. शिपायांचे बिगुल-ड्रमचे आवाज व अधिकाऱ्यांचे हुकूम वगैरे सर्व ऐकू येत होते. दोन्ही सैन्ये एकमेकांवर चालून गेली. व घनघोर लढाई सुरू झाली तोफा-बंदुकांचे आवाज व सैनिकांच्या आरोळ्या यांनी आकाश दुमदुमून गेले. दोन महिन्यापूर्वी ज्याप्रमाणे ही लढाई प्रत्यक्ष घडली होती अगदी तिचीच पुनरावृत्ती त्यांना पाहावयास मिळाली. जणू काही कोणी कॅमेरामनने त्या लढाईची फिल्म घेऊन आकाशाच्या पडद्यावर ती पुन्हा दाखविली. सकाळी तीन वाजेपर्यंत ही लढाई चालू होती. तीत राजाचा पराभव होऊन सर्व थांबले. गावकऱ्यांनी तेथील जस्टिस ऑफ पीस वुलियम वूड यांच्याकडे जाऊन त्यांना ही हकीकत सांगितली, व प्रत्यक्ष येऊन पाहण्यास भाग पाडले. त्यावर ते म्हणाले, 'प्रत्यक्ष पाहात आहे तरीसुद्धा यावर माझा विश्वास बसत नाही.' हा प्रकार जवळ जवळ रोजच होऊ लागला. हळू हळू चार्लसच्या कानावर ही हकीगत गेली. त्यावर तो रागावून म्हणाला की, माझा पराभव झाला त्याची ही कुचेष्टा चालली आहे असे दिसते. त्याने त्याच्या अधिकाऱ्यांस सांगितले की, जाऊन गावकऱ्यांस सांगा की अशा अफवा पसरवाल तर त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागतील. त्याप्रमाणे तीन मिलिटरी अधिकारी तेथे गेले व त्यांनी गावकऱ्यांस दमदाटी केली. परंतु त्यांनी सांगितले का, हे नाटक रोजच सुरू आहे. तुम्ही प्रत्यक्ष पाहा. त्यावरून ते तिघे त्या ठिकाणी गेले. त्यातील कर्नल कर्क याने त्या युद्धात प्रत्यक्ष भाग घेतला होता. त्या सर्वांना ते युद्ध पुन्हा पाहावयास मिळाले. त्यांत त्यांच्या ओळखीचे कित्येक सैनिक व अधिकारी होते व हल्ला करताना घायाळ होऊन पडताना दिसत होते. त्यात कर्क स्वतः युद्ध करीत असताना पाहात होता. हे चालू असता त्याने सर एडवर्ड व्हार्नें यांना ढगाआडून येताना पाहिले. त्यावर तो कर्नल म्हणाला की, याला मी धोक्याची सूचना देणार आहे व तरी तो पुढे जाऊन मरणार आहे. पाहा मी त्याच्या मागे असून त्यास सूचना देत आहे. त्यात त्याचे कित्येक मित्र भाग घेत असताना तो पाहात होता. आता आश्चर्य करण्याची पाळी त्यांची होती. त्यांनी गावकऱ्यांची माफी मागून सर्व वृत्तांत चार्लसला निवेदन केला. हा सीन कित्येक आठवडेपर्यंत रोज दिसत होता. पुढे हळूहळू दिसणे बंद झाले.

—१५—

सन १८९० मध्ये मार्लबरो नावाच्या एका तीन शिडे असलेल्या जहाजातून काही खलाशी व काही प्रवासी—त्यात एक स्त्री—असे ऑस्ट्रेलियातून इंग्लंडमध्ये जाण्या-

करिता निघाले. ते जहाज मजबूत होते व त्यावरील अधिकारी खलाशीवर्ग जाणकार होता व लवकरच इंग्लंडला जाण्याची त्यांची अपेक्षा होती. त्यानंतर ते जहाज बेपत्ता झाले. त्याचा पुष्कळ शोध करूनही त्याचा तपास तपास लागू शकला नाही. पुढे सन १९१३ साली दक्षिण अमेरिकेकडून एक जहाज चालले होते. त्यावरील कॅप्टनने दूर क्षितिजावर एक जहाज पाहिले. पुष्कळ संदेश देऊनही उत्तर मिळेना म्हणून ते जहाजाजवळ गेले, तरीही काही हालचाल दिसेना म्हणून ते जहाजावर चढून पाहतात तो त्यांना एक आश्चर्य दिसले एक तर ते चोवीस वर्षे बेपत्ता असलेले मार्लबरो जहाज होते व त्यावर कपडे घातलेले परंतु त्याच्या आत हाडाचे सापळे असलेले खलाशी सुकाणूवर व इतर ठिकाणी पोझिशनमध्ये दिसत होते डेकवर, त्याचप्रमाणे इंजिनरूममध्ये कपडे कायम असलेले माणसाचे सांगाडे दिसत होते.

अगदी अनपेक्षित गोष्ट घडून ती बोट बुडाली असावी व दिसणारी बोट तिचे भूत असावे. किंवा ती बोट त्या मृत खलाशांकडून चालविली जात होती असे दिसते. त्यानंतर सरकारकडून पुष्कळ तपास झाला. परंतु ते कोडे कधीच सुटले नाही.

* * *

६. भविष्यकालीन घटना व त्यांचे ज्ञान (Prophecy)

आपण यापूर्वीच्या प्रकरणात पाहिले आहेच की आपणास कोणत्याही वस्तूचे अथवा घटनेचे ज्ञान पंच ज्ञानेंद्रिये, मन व मेंदू यांच्यामार्फत होत असते. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध; तसेच विचार व मनामार्फत जड अथवा चेतन, शास्त्रीय, अध्यात्मिक, वैज्ञानिक वगैरे कोणत्याही क्षेत्रातील ज्ञान होत असते. आपण एखादा जिन्नस पहातो, त्याच्यापासून निघालेले किरण डोळ्यांपर्यंत आपल्या मेंदूवर आघात करतात व ती अमुक वस्तू आहे असे ज्ञान आपणांस होते. मेंदूतही अनेक स्वतंत्र दालने आहेत व त्यासंबंधी ऊहापोह phrenology या शास्त्रात केलेला सापडेल. समजा, त्यांपैकी ज्या भागावर आयात होऊन मेंदू संवेदित होऊन डोळ्यांनी पाहण्याचे ज्ञान होते तो भाग जर काही कारणाने अकार्यक्षम झाला असला तर आपणास डोळे असूनही दिसणे शक्य होणार नाही. त्या वस्तूची स्पंदने त्या भागावर पडून सुद्धा काही उपयोग होणार नाही. हीच हकीगत इतर भागांबद्दलचीही असते; इतकेच नाही तर, मनामार्फत मेंदूच्या ज्या भागावर कंपने आदींनी आघात करून विचार अथवा मन कार्य करू शकते, तो भाग जर काही कारणाने अकार्यक्षम झाला तर आपण सुसंगत असा विचारसुद्धा करू शकणार नाही. अमली पदार्थांच्या सेवनानंतर अथवा वेड लागल्याने किंवा अन्य काही कारणाने बेशुद्ध झाल्याने अशा प्रकारचे अनुभव येतात. अर्धांगाने पीडित मनुष्य केवळ मेंदूतील विशिष्ट भाग अकार्यक्षम झाल्याने हात-पाय कार्यक्षम असूनही हालचालसुद्धा करू शकत नाही. याचा अर्थ मेंदूचा सर्व भाग, तसेच शरीराचा सर्व भाग कार्यक्षम असला तरच त्याच्या भागाची सर्व कामे विचारादिकांच्या स्पंदनांनी सुरळित होऊ शकतात, अन्यथा नाही.

एखादी गोष्ट किंवा घटना काल अथवा शतकापूर्वी होऊन गेली आहे असे समजा. अर्थात ही घटना घडली त्या वेळी त्या घटनेची स्पंदने अवकाशात तयार झाली असलीच पाहिजेत. ती ज्यांनी पाहिली अगर ऐकली, त्यांना त्या घटनेचे प्रत्यक्ष ज्ञान झाले. त्या वेळी कोणी तेथे नसतील अगर त्या घटनेस काही वर्षे होऊन गेली असतील तरी, एक गोष्ट निश्चित की, तिची स्पंदने उत्पन्न झाली असतील व ती अनंतत्वात विलीन होण्यापूर्वी, या जगात किंवा त्या ठिकाणाजवळ वावरत असतील. त्यांना अनंतत्वात विलीनीकरण होण्यास किती वेळ लागतो हे आपणांस माहीत नाही. त्या घटना तरंग किंवा स्पंदनरूपाने अस्तित्वात राहतात, हे खरे. त्यामुळे आध्यात्मिक साधनेने म्हणा किंवा आध्यात्मिक सिद्धी मिळाली म्हणून म्हणा, Spiritual Medium मध्यस्थामार्फत असे तरंग व त्यांची स्पंदने ग्रहण करून त्यांचे मेंदूवर आघात होऊन त्या त्या घटनांचे ज्ञान मानवास होऊ शकते हे Psychometry य.

ज्ञानाच्या एका शाखेवरून सिद्ध होते. काही जणास अशी एखादी शक्ती, एखादी सिद्धी असते की त्यांना कोणी एखादी वापरलेली वस्तू दिली तर त्या व्यक्तीचेच काय, परंतु वस्तू देते वेळी तो काय करीत होता, त्याच्या अंगावर कपडे कोणते होते वगैरे समग्र वर्णन करू शकतात. एकदा एकाने अशा व्यक्तीस एका जुन्या थडग्याच्या चुन्याचा एक भाग आणून दिला. ते थडगे सुमारे आठशे वर्षांपूर्वीचे होते त्याने त्याचे समग्र वर्णन तर केलेच; परंतु त्या काळी त्याच्या आसपास काय काय घटना घडत होत्या व घडल्या होत्या त्याचेही समग्र वर्णन केले व ते सर्व तंतोतंत खरे होते. याचा अर्थ त्या त्या घटनांचे तरंग व स्पंदने त्याच्या हातात दिल्या गेलेल्या वस्तूजवळ वावरत होती व ती त्या व्यक्तीस त्यास असलेल्या सिद्धीमुळे ग्रहण करता आली. त्या स्पंदनांनी त्याच्या मेंदूवर आघात केले व नंतर तो त्या त्या घटनांचे यथातथ्य वर्णन करू शकला. फोनोग्राफच्या प्लेटमध्ये गाणी किंवा भाषणे यांची स्पंदने सुप्तावस्थेत असतात. ती प्लेट शाबूत असेपर्यंत आपण त्यातील स्पंदनांचे आघात करवून तीच ती गाणी किंवा भाषणे पुनःपुन्हा कितीही वेळा ऐकू शकतो. हीच हकीगत भूतकालीन घटनासंबंधींची समजावी. काही विवक्षित काल पर्यंत यांची स्पंदने त्या घटनास्थळी अगर त्याच्या जवळपास वावरत असतात व तत्संबंधी सिद्धी असलेल्या व्यक्तींना त्यावरून त्या घटनांचे ज्ञान करून घेता येते. मात्र यावरून एक गोष्ट स्पष्ट होते व ती ही की आपणास कशाचेही ज्ञान होणे असेल, मग ते जड, चेतन, स्थिरचर काही का असेना त्याची स्पंदने मेंदूच्या विवक्षित भागावर आघात करून संवेदना उत्पन्न करतील अगर होतील त्याच वेळी तत्संबंधीचे ज्ञान आपणांस होऊ शकते; अन्यथा नाही. मग ते ज्ञान वर्तमानकालीन घटना अगर वस्तूसंबंधी असो अगर भूतकालीन.

आता प्रश्न असा आहे की भविष्यकालीन घटना ठरलेल्या असतात की कसे हे विवाद्य आहे. त्या ठरलेल्या असतात असे क्षणभर धरले तरी एखादी घटना अद्याप घडलेलीच नसल्याने, तत्संबंधी तरंग अथवा स्पंदने उत्पन्नच झालेली नसतात. मग त्याचे आघात मेंदूवर कसे होणार व त्यांचे ज्ञान तरी आपणांस कसे होणार ? लाटच नाही तर पाण्यावर तरंग अथवा लहरी कोठून ? लाट आली म्हणजे त्या आपोआप उत्पन्न होतील. तोपर्यंत सर्व तळे शांत व त्यावरील तरंगही सुप्तावस्थेत ! त्यामुळे त्यांचे ज्ञान होणेही अशक्य. ज्या वस्तूत अद्याप अस्तित्वच नाही तिचे ज्ञान होणार कसे ?

यासंबंधी विचार करता दोन प्रकारचे प्रश्न उद्‌भवतात. प्रथम एखादी घटना अमुक वेळी अमुक ठिकाणी घडणार आहे हे ठरलेले असते काय किंवा स्थळकालमानाने या घटना अनाहूतपणे न ठरविताच घडून येतात ? काही भविष्यकालीन घटना वर्तमानकालीन घटनांच्या परिणाम स्वरूप असतात. वरून एक दगड टाकला तर थोड्या वेळाने तो कोठेतरी येऊन पडणारच. या अशा प्रकारच्या घटना भविष्-

कालीन म्हणणे मोठेसे संयुक्तिक होणार नाही. परंतु काही घटना अशा असतात की, त्यांचा वर्तमानकाळाशी काहीच संबंध नसतो. एखादा मनुष्य दोन वर्षांनी आजारी पडून मृत्युमुखी पडणार आहे किंवा तीन वर्षांनी एखाद्या विमानास अपघात होऊन त्यात सत्तर माणसे मृत्युमुखी पडणार आहेत, असे भविष्य कोणी केले व ते खरे झाले तर त्या घटना या प्रकारात पडत नाहीत. कदाचित विमान अद्याप तयारही झाले नसेल अथवा त्या दुर्घटनेतील एखादी व्यक्ती अद्याप जन्मास पण आलेली नसेल. अशा घटनांसंबंधी त्या ठरलेल्या होत्या असे गृहीत धरले तरी आजच्या घटकेस त्यासंबंधी कोणतेही तरंग अथवा स्पंदने उत्पन्न झालेली असणे शक्य नाही; कारण ती घटनाच घडलेली नाही. मग त्यांचा आघात मेंदूवर होऊन त्यासंबंधी ज्ञान होणे दूरच. तत्त्वतः ही विचारसरणी बरोबर असली तरी काही व्यक्तींनी अगदी कल्पनेतसुद्धा नसलेल्या घटना काही शतकांपूर्वी सांगितल्या आहेत. (Nosterdomus व Kayce) त्या खऱ्या झालेल्या आहेत. व आजही काही व्यक्ती अशा आहेत की (Jean Dixon) त्यांनी सांगितलेली भविष्ये तंतोतंत खरी झाली आहेस व होत आहेत.

आंब्याची कोय पेरली व तिला वेळच्या वेळी खत-पाणी केले तर पाच-सात वर्षांनी त्याचे झाड होऊन आंबे लागतील हे सांगावयास कोणी ज्योतिषी नको. परंतु आजपासून अमुक एका विवक्षित स्थळी व विवक्षित वेळी एक ४०–४५ वर्षांची व्यक्ती झाडाखाली बसलेली असेल व त्या झाडावर वीज पडून त्या व्यक्तीचा मृत्यू होईल असे कोणी भविष्य केले व ते तंतोतंत खरे झाले तर त्यास काही निव्वळ योगायोग म्हणता येणार नाही. असे म्हणणे म्हणजे त्या प्रश्नास बगल देण्यासारखे होईल. अशा शंभर वर्तविलेल्या भविष्यांपैकी केवळ दहा जरी तंतोतंत खऱ्या ठरल्या तरी असे म्हणणे भाग आहे की, काही घटना ठरलेल्या असतात व त्या काही व्यक्तीस पुष्कळ अगोदर समजू शकतात. भूतकालीन घटना घडून गेलेल्या असतात. त्यामुळे त्यात काही फेरफार होणे शक्य नसते. ज्यास आपण वर्तमानकालीन घटना म्हणतो त्या खरोखरीच भूतकालीन अशाच असतात. कारण त्या आपणांस कळतात तोपर्यंत त्या भूतकालीन होऊन जातात. खरोखर वर्तमानकाळ म्हणजे भूत व भविष्यकाल यांमधील अत्यंत झिरझिरीत असा पडदा आहे. त्यात भविष्यकालीन घटना शिरून त्या लागलीच भूतकालात प्रविष्ठ होत असतात. त्यामुळे कोणतीही घटना एक तर भूतकालीन असते अथवा भविष्यकालीन. वर्तमानकाल हा निव्वळ भास असतो. आपण पाहिलेच आहे की, भूतकालीन घटना घडलेल्या असल्याने त्यात काही फेरफार होणे शक्य नसते. त्यांचे तरंग स्पंदने ही तयार होऊन गेलेली असतात व ती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तित्वात असतात. भविष्यकालीन घटना म्हणजे विणल्या जाणाऱ्या गोफासारख्या असतात. एक इकडून तर एक दुसरीकडून अशा निरनिराळ्या ठिकाणांहून, निरनिराळ्या वेळी एकत्र येऊन त्या बनत असतात. त्यामुळे त्या अमुकच स्वरूपाच्या असतील असे अगोदर सांगणे शक्य नसते. समजा,

लग्नाचा एक स्वागत-समारंभ आहे. त्यात सत्तावीस जणांकडून भेटी येऊन २५० रु. च्या भेटी आल्या. समारंभ संपला म्हणजे ही घटना कायम झाली. त्यात फेरफार होणे शक्य नसते. परंतु समारंभ चालू असता असे काही घडू शकते की, दोघांना इच्छा असूनही काही कारणांनी वेळेवर पोहोचणे शक्य झाले नाही किंवा ज्यांना पत्रिका मिळाली परंतु विसर पडला अशा तीन जणांना वेळेवर आठवण येऊन ते हजर राहिले व त्यांनी भेटी दिल्या निरनिराळ्या ठिकाणच्या निरनिराळ्या व्यक्ती निरनिराळ्या ठिकाणांहून निरनिराळ्या जिनसा घेऊन एका विवक्षित ठिकाणी एकत्र होत असतात. अशा रीतीने हा गोफ विणला जात असतो व त्यामुळे तो विणला जाऊन पूर्ण होईपर्यंत त्यासंबंधी अनिश्चितता असते. म्हणून त्याबद्दल निश्चित सांगणेच काय पण साधारण अनुमान करणे सुद्धा चुकीचे व अशास्त्रीय ठरेल. परंतु एकदा गोफ तयार झाला म्हणजे ती घटना भूतकालीन होऊन बसते; मग तीत काहीही फेरफार होणे अशक्य होते. त्यामुळे अतींद्रिय शक्तिसंपन्न व्यक्तीने माहीत नसलेली एखादी भूतकालीन घटना तंतोतंत बरोबर सांगितली तर त्यात अशास्त्रीय असे काहीच नाही. परंतु भविष्यकालीन घटनांच्या बाबतीत तसे नसते. तो गोफ अद्याप विणला जावयाचा असतो; व तो कसा तयार होईल याचा तो प्रत्यक्ष तयार होईपर्यंत कल्पना येणे शक्य नसते. कारण तो कसा तयार होईल त्याचा नियम नसतो. त्यात काहीही फेरफार होण्याची शक्यता असते. त्यासंबंधी तरंग किंवा स्पंदने उत्पन्न झालेलीच नसल्याने त्यांचा मेंदूवर आघात होणे शक्य नसते व म्हणून मेंदू त्यासंबंधी काहीच कार्य करणे पण शक्य नसते. त्यामुळे सकृत्दर्शनी असे वाटते की, भविष्यकालीन घटना कोणाही व्यक्तीस केव्हाही सांगता येणे शक्य होणार नाही. कारण एक तर भविष्यकालीन घटना ठरलेल्या असतात की कसे याबद्दल निश्चिती नसते व दुसरे म्हणजे, समजा, काही घटना ठरलेल्या असल्या तरी वर लिहिलेल्या कारणाने त्यांचे ज्ञान मानवास होणे शक्य नसते.

शास्त्रीयदृष्ट्या हे विवरण बरोबर असले तरी निदान काही भविष्यकालीन घटना ठरलेल्या असतात व त्यांपैकी काहींचे ज्ञान काही विवक्षित व्यक्तींस होत आलेले आहे व होत आहे ही सत्य परिस्थिती आहे. Nosterdomus व Kayce यांनी बऱ्याच वर्षांपूर्वी करून ठेवलेली भविष्ये खरी ठरलेली आहेत. Jean Dixon Pendragon यांसारख्यांची भविष्ये आजही अनुभवास येत आहेत. हे खरे आहे की त्यांनी सांगितलेली सर्वच भविष्ये खरी ठरलेली नाहीत व ठरत नाहीत निदान काही तंतोतंत खरी ठरली आहेत, व ठरतात. यांना केवळ योगायोग म्हणता येणार नाही. याचा अर्थ त्या घटना त्यांना अगोदर कळू शकल्या व त्यांनी निवेदन केल्या. प्रश्न पुन्हा असा आहे की, काही तरी का चुकाव्यात. त्यावर त्यांचे म्हणणे असे आहे की, सर्वच घटना काही एखादे चित्र पाहावे तशा स्पष्ट दिसत नाहीत. काही दूरवरची एखादी जिन्नस पाहावी तशा अस्पष्ट दिसतात त्याबद्दल अनुमान करावे लागते व त्या चुकतात.

सुद्धा. परंतु अकल्पित अशी एखादीही घटना जरी तंतोतंत सांगता आली व ती बरोबर ठरली तर असे कबूल करावे लागेल की भविष्यकालीन घटना सर्व नाही तरी निदान काही ठरलेल्या असतात व त्यांपैकी काहींचे ज्ञान ती सिद्धी असलेल्या व्यक्तीस होऊ शकते. एक पांढरा कावळा पाहावयास मिळाला तर निदान सर्व कावळे काळे नसतात असे म्हणता येईल. अशा भविष्यकालीन घटना शेकड्यांनी सांगितल्या गेल्या आहेत व त्यांपैकी पुष्कळांचा पडताळा आला आहे. हे जर खरे आहे, तर ते कसे घडत असावे असा साहजिकच प्रश्न पडतो. याच्या उत्तराकरता आपणांस उलट प्रोसेसने जावे लागणार आहे. म्हणजे न घडलेल्या घटना अगोदर सांगितल्या गेल्या व त्या अनुभवास पण आल्या व येत आहेत, त्याअर्थी त्या कोणीतरी अगोदर ठरवून ठेविल्या व त्याप्रमाणे हे घडत गेले हे ओघानेच आले. त्या कोणी व कशा ठरविल्या व त्यांचे ज्ञान मानवास कसे होते ? आपणाकडे सुद्धा दक्षिणेत काही नाडी ग्रंथ असे आहेत, की त्यांत शेकडो वर्षांपूर्वी काही घटना नमूद केलेल्या आहेत. त्यांतील बऱ्याच अनुभवास आल्या असून, काही अद्याप येत आहेत. एक गोष्ट मात्र सांगून ठेवणे इष्ट वाटते की बहुतेक मंडळी—जे आपणांजवळ नाडी ग्रंथ आहेत असा दावा करून प्रत्येकी ५०-१०० रुपये उकळतात, त्यांच्याजवळ असा कोणताही ग्रंथ नसतो. ते निव्वळ लोकांस फसवून पैसे उकळण्याचा धंदा करतात. अस्सल नाडीग्रंथात काही काही विवक्षित कालमर्यादेपर्यंतच्या घटना दिलेल्या असतात व त्यासुद्धा काही मर्यादित व्यक्तीपुरत्याच. दुर्दैवाने मी प्रयत्न करूनही मला असा विश्वसनीय ग्रंथ पाहावयास मिळाला नाही. मात्र विश्वसनीय व्यक्तीकडून माहिती मिळाली ती मी नमूद केली आहे. याबद्दल मी माझ्या ‘ अमृत-तुषार या ग्रंथात सविस्तर लिहिले आहे. ते कृपया पाहावे.

याविषयी विवेचन करताना पुनर्जन्म व ज्योतिषशास्त्र (तथाकथित) व अशाच आनुषंगिक बाबींचा विचार झाला नाही तर विवेचन अपूर्ण राहील. या दोन्ही विषयांबद्दल मी माझ्या ‘ अमृत—तुषार ’ व वैतरणेच्या ऐलतिरी ’ या पुस्तकांत सविस्तर विवेचन केलेले असल्याने, येथे थोडा त्रोटकच उल्लेख करून आपल्या मूळ विषयाकडे वळू. यापैकी ज्योतिषासंबंधी सांगावयाचे म्हटले तर ते शास्त्र खोटे आहे असे म्हणण्यापेक्षा ते शास्त्रच नाही असे म्हणणेच जास्त सयुक्तिक होईल. ज्योतिषाची अंगोपांगे व शाखा—उपशाखा सायन-निरयन वाद इत्यादि एकमेकांशी इतके विसंगत आहेत की त्यांचे निर्णय पुष्कळ वेळा परस्परविरोधी असतात. तरी त्या प्रत्येकाचा दावा असा असतो की त्यांनी जे काही प्रतिपादन केले आहे तेच फक्त खरे असू शकेल व असते.

खरे पाहू गेले तर कोणाचाही पूर्णच काय परंतु पन्नास टक्केसुद्धा पडताळा येत नाही. या तपशिलात शिरणे येथे जरी संयुक्तिक व चालू विषयास धरून नसले तरी असे म्हणणे भाग आहे, की या तथाकथित शास्त्रास मुळात कसलाच पाया नाही.

नऊ ग्रह, राशी व कुंडलीतील बारा स्थाने यावर हे आधारित आहे. मुख्यतः नवग्रहावर म्हटले तर फारसे चुकणार नाही. याचा मूळ पायाच चुकीच्या व परस्परविरोधी गोष्टींवर आधारलेला आहे. कारण आपली समजूत अशी आहे की आपल्या पूर्वकर्मानुसार आपणांस जन्म मिळतो व त्याच्या परिपाकस्वरूपी फले आपणांस या जन्मी मिळत असतात. असे आहे तर कोणत्याही ग्रहास काहीं करावयाचे उरलेच कोठे? फार तर असे म्हणा की, त्याच्यामुळे कोणते फल कसे व केव्हा मिळणार ते कळते. त्यांना कर्तृत्वशक्ती अशी काही नाही. परंतु या शास्त्राचा दावा तसा नाही. त्याचे म्हणणे असे आहे की हे ग्रह निरनिराळ्या राशींतून व कुंडलीतील घरातून फिरत असतात; तसतशी त्याची फळे बदलत जातात व प्रत्येक व्यक्तीचे त्या त्या राशीतील व ग्रहातील वास्तव्याप्रमाणे बरे-वाईट करीत असतात. त्यात पुन्हा दशा, विदशा वगैरे पुष्कळ भानगडी आहेत. त्या तूर्त सोडून देऊ या. पहिला प्रश्न असा आहे की चंद्र, रवी, मंगळ हे सर्व आपल्या पृथ्वीप्रमाणेच जड व सारखे फिरत राहणारे प्रचंड गोल आहेत. त्यांना स्वतःला अशी कर्तृत्वशक्ती काहीच नाही. असे असता, त्यांनी प्रत्येक व्यक्तीचे एखाद्या ठिकाणाहून बरे करावे व तेथून थोडे पुढे किंवा मागे सरकले की लागलीच फलादेशात फरक व तो फक्त मानवाच्याच बाबतीत! उदाहरणार्थ, आपण सूर्यच घेऊया. ग्रहांच्या अपेक्षेने तो स्थिर असून बुध-शुक्रादि सर्व ग्रह त्याच्याभोवती फिरत असतात याप्रमाणे फिरत असता जसजशी त्यांची जागा बदलत जाईल तसतसे सूर्याचे आकाशातील ठिकाण पण बदललेले दिसते आपण आगगाडीत बसून जात असलो म्हणजे एक झाड पुष्कळ पुढे आहे असे दिसते. थोड्या वेळाने ते समोर दिसेल व लागलीच मागे गेल्यासारखे दिसेल. खरे म्हणजे झाड असते त्याच ठिकाणी. परंतु आपल्या गतीमुळे ते निरनिराळ्या ठिकाणी दिसते. त्याचप्रमाणे सूर्य ज्या ठिकाणी असतो, त्याच ठिकाणी तो राहतो. आपल्या गतीमुळे तो निरनिराळ्या ठिकाणी जात आहे असे दिसते. वस्तुस्थिती तशी नसते. असे असले तरी त्याने खरोखरीच निरनिराळ्या राशीत अथवा ग्रहांत प्रवेश केला आहे असे गृहीत धरण्यात येऊन त्यासंबंधी निरनिराळे फलादेश सांगण्यात येतात. मेषेत रवी उच्च असून तो फार चांगली फळे उत्पन्न करतो. तर वृषभेत तो शत्रुस्थानी गेल्याने वाईट फळे उत्पन्न करतो व प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत निरनिराळी फळे मिळतात.

मी म्हणतो, आपणांस मृगजळाचे पाणी दिसते. त्यातील पाणी आकंठ पिऊन आपली तहान का भागू नये? जे सूर्याच्या बाबतीत तेच इतर ग्रहांच्या बाबतीत. दुसरे मी असेही म्हणतो की, या जगातील प्रत्येक व्यक्तीने त्या शनी अथवा मंगळाचे काय अनिष्ट केले आहे की त्यांनी नेहमी त्या व्यक्तीचे अनिष्टच करीत असावे व बुध गुरूंनी चांगले करीत असावे. त्यांनी आमच्यापैकी प्रत्येक व्यक्तीचे बरे-वाईट का करावे याचा काही कार्यकारण भाव आहे काय? रस्त्याने चालताना आपणांस कोणी उगीच एक चापट मारली तर त्यास आपण काय म्हणू? त्याच्या विरुद्ध काही करता येण्यासारखे

नसले तरी निदान त्यास मूर्खांत किंवा वेड्यात तरी काढू. यापेक्षा जास्त विवेचन येथे करणे म्हणजे उगीच विस्तार वाढविण्यासारखा होईल. थोडक्यात म्हणजे हे सर्वच अगदी अशास्त्रीय व पायाविरहित आहे व म्हणून त्यावरून काही अनुमान काढणे शहाणपणाचे ठरणार नाही. या तथाकथित शास्त्राधारे भविष्यकालीन घटना शोधून काढण्याचा प्रयत्न केला जातो; म्हणून त्या संदर्भात इतके विवेचन करावे लागले. सर्वसाधारण जनतेस पुढे काय वाढून ठेवले आहे ते कळण्याची सतत जिज्ञासा असते. म्हणून दहा वेळा चुकले तरी अकराव्यांदा तरी ते एखाद्या ज्योतिष्याकडे जातीलच व नंतर पुन्हा सांगतील की त्याने सांगितलेले सर्व चुकले ! मुळात काही शास्त्रच नाही तर अल्पांशाने का होईना खरे कोठून होईल ?

असो. आता दुसरा मुद्दा पुनर्जन्माचा. कारण त्यावर सुद्धा पुष्कळ भविष्यकालीन घटना अवलंबून असतात, असे मानण्यात येते. म्हणून त्याचा सुद्धा येथे थोडक्यात परामर्श घेणे आवश्यक वाटते. त्यासंबंधी ‘ वैतरणेच्या ऐलतिरी ’ या पुस्तकात विस्तारपूर्वक विवेचन केले आहे ते जिज्ञासूंनी मुळातूनच पाहावे.

पुनर्जन्माचा पाया म्हणजे पूर्वकर्म. ते जसे चांगले अगर वाईट असेल तसा त्यास जन्म मिळत असतो व त्या जन्मातील घटनांसुद्धा या पूर्वकर्मानुसारच ठरलेल्या असतात, असे मानले जाते. म्हणजे प्रत्येक व्यक्तीच्या सर्व जन्मांतील घटना त्याच्या पूर्वकर्मानुसारच ठरलेल्या असतात. त्यात त्याच्या भविष्यकालीन घटनांचाही समावेश होतो. म्हणून त्यासंबंधी त्रोटक का होईना पण येथे विवेचन करणे भाग आहे. चांगले व वाईट हे दोन्ही शब्द सापेक्ष आहेत. कोणतेही कर्म अगदीच चांगले अगर वाईट असू शकत नाही. शिवाय देशकालमानाप्रमाणे चांगल्या-वाईटाच्या व्याख्या निरनिराळ्या असतात व बदलत पण जातात. शंभर वर्षांपूर्वी दुर्गेस मानवांचा बळी देणे किंवा गुलाम विकत घेऊन त्यास सक्तीने काम करावयास लावणे यात काही वाईट आहे असे समजण्यात येत नसे, आज त्या गोष्टी मोठ्या गुन्ह्याच्या स्वरूपात मोडतात. आजही ब्राह्मणाने गाय मारली तर ते महापाप होते व तीच एखाद्या मुसलमान खाटकाने मारली तर पुण्यकृत्य होते. चांगली व वाईट कर्मे यांच्या व्याख्या नेहमी इतक्या लवचिक असल्याने कोणते कर्म चांगले व कोणते वाईट हे ठरविणेच शक्य नाही. त्यास काही मापच नसल्याने त्याच्या आधारावर एखाद्यास गुन्हेगार धरणे किंवा एखाद्यास बक्षिसास पात्र धरणे केव्हाही संयुक्तिक होणार नाही. यातील बारीकसारीक तपशिलाच्या बाबी सोडून दिल्या (त्याचे विवेचन ‘ वैतरणेच्या ऐलतिरी ’ या पुस्तकात सापडेल) तर, एकदोन उदाहरणांवरून आपणास असे आढळून येईल की, या बाबीलासुद्धा पायाच नाही. कारण कोणते चांगले व कोणते वाईट हे ठरविता येत नाही; म्हणून पापपुण्य पण ठरविता येत नाही. मग पुनर्जन्मास आधार काय राहिला ? चालू जन्मात एखादा सतत कष्ट व दुःख भोगीत असताना आपण पाहतो. तेव्हा म्हणतो की त्याने मागील जन्मी फार पाप केले असेल व जर कोणी सुख ऐश्वर्याने

लोळत पडलेला दिसला तर मागील जन्मी फार पुण्य केले असले पाहिजे, असे आपण विधान करतो. पुनर्जन्माच्या सिद्धांतास धरून ते बरोबर असावे असे पण वाटते. अगोदर पुनर्जन्म कोणास व का याची निश्चिती नाही व त्या सर्वांच्या पाप-पुण्याचा हिशेब ठेवून त्याच्या कोणत्या कृत्याबद्दल त्याच्या आयुष्यातील कोणत्या वेळी, कोणती घटना त्यास भोगावयास लावायची व असे जगातील यच्चयावत् प्रत्येक व्यक्तींच्या बाबतीत दर क्षणास कोण व कोणत्या तत्त्वावर ठरवितो ? मानवेतर अब्जावधी प्राणी दर क्षणी उत्पन्न होऊत मृत्यू पावत असतात त्यांच्याबाबत ह्या नियम का नसावा ? निसर्गाच्या संदर्भात मानव हाही एक प्राणीच आहे. त्यास निराळे असे स्थान नाही. असो.

श्रीराम हे तर अवतारी पुरुष होते की ज्यांच्या नुसत्या नामस्मरणाने आजही कोट्यवधी मानव उद्धरून जात आहेत. त्यांची पत्नी श्रीमती सीता ही महान साध्वी व प्रातःस्मरणीय. शिवाय श्रीरामासारख्या महापुरुषाची पत्नी होण्याचे भाग्य तिला मिळाले होते. लक्ष्मणासारखा आदर्श बंधू आजपर्यंत झाला नाही. श्रीरामाच्या सेवेत त्याने चौदाच्या चौदा वर्षे अन्न, झोप यावाचून ब्रह्मचर्याने काढली. ज्याच्या नुसत्या नामस्मरणाने मानव तरून जातात, त्याची आजन्म सेवा करण्याची संधी त्याला मिळाली होती; ती त्याने मनोभावाने कारणी लावली. परिणाम काय तर प्रत्यक्ष श्रीरामांना चौदा वर्षे खडतर वनवास, पत्नीवियोग व पूज्य पित्याचा तळमळत महान दुःखात स्वर्गवास ! आणि शेवट तरी काय तर पत्नीवियोगाने तळमळत जवळ जवळ आत्महत्या ! सीतेससुद्धा काय मिळाले ? तर वनवासात वनवास म्हणजे रावणासारख्याच्या कैदेत राहावे लागले. लक्ष्मणास तरी दुसरे काय मिळाले ? त्यास सुद्धा शेवटी आत्महत्या करणेच भाग पडले ! सीतेस एका वनवासाने भागले नाही तर गरोदर असता एकटीने रानावनात पडून एका झोपडीत शेवटची पंधरा वर्षे तरी काढावी लागली व शेवटी तिलाही धरणीमातेच्या पोटात आश्रय घ्यावा लागला ! याचा पुनर्जन्माच्या सिद्धान्ताने निष्कर्ष असा निघतो की या सर्वांनी या नाही तरी पूर्वजन्मी तरी काही तरी महान पापे केली पाहिजेत, की ज्याची फळे त्यांना या जन्मभर भोगावी लागली.

उलट रावणाचे पाहा. तो महापापी असेल, कसाही असेल; परंतु महान वेदवेत्ता, त्रैलोक्यावर अखेरच्या क्षणापर्यंत राज्य करणारा व युद्धात वीरमरणाने मृत्यू पावलेला असा तो महापुरुष होऊन गेला, अर्थात त्याने पूर्वजन्मी इतके अपार पुण्य केले असले पाहिजे की ज्यास त्रिभुवनात तोड नाही व इतकी पापे केली तरी अखेरपर्यंत दुःखाचा लवलेश नाही ! जी गोष्ट श्रीरामाची तीच थोड्याफार फरकाने श्रीकृष्ण व पांडवांचीही. अर्जुन श्रीकृष्णाचा सखा तर द्रौपदी त्याची भगिनी. पांडवांचा जन्मच जवळ जवळ अज्ञातवासात झाला. लहानपणापासूनच कष्ट व वनवास ! थोडे दिवस सुखाचे येतात तो बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास ! द्रौपद्रीच्या बाबतीत तर एवढ्यानेही भागले नाही. भर सभेत नग्न होण्याचा व कीचकाकडून बलात्कार होण्याचा प्रसंग.

बरे इतकेही करून व युद्ध जिंकून मिळविले काय ? तर सर्व आप्तेष्टरहित राज्य. कारण पांडवांची सर्व मुले गेली होती. सर्वांचे शिव्याशाप, त्यांची प्रत्यक्ष आई कुंती, जी श्रीकृष्णाची आत्या व पूर्व साध्वी पुण्यवान व पांडवांसारख्यांची माता तिला सर्व जन्म दुःखातच काढावा लागला; इतकेच नाही तर ज्याच्या पुत्रामुळे भयंकर असा संग्राम झाला, त्याच्याबरोबरच तिने राहणे पत्करले व त्याच्याबरोबरच रानात जळून गेली व पांडवांनी तरी काय केले, की शेवटी हिमालयात जाऊन आत्महत्या ! श्रीकृष्णाच्या बाबतीत सुद्धा काय—त्याचा जन्मच मुळी कारावासात ! त्याचे प्रत्यक्ष जन्मदाते आईबाप त्याच्या जन्माच्या कित्येक वर्षे अगोदरपासून खडतर कैदेत. श्रीकृष्णाचासुद्धा शेवट काय तर त्याचे सर्व पुत्रपौत्र, आप्तइष्ट त्याच्या समोर दारू पिऊन आपसात लढून मेले व काहींना त्यांनी आपल्या हातांनी मारले व या दुःखात असतानाच बाण लागून मृत्यू आला. मृत्युनंतर सुद्धा या पुरुषोत्तमाच्या स्त्रिया गवळ्यांनी पळवून नेल्या व काही स्वखुशीनेच गेल्या, असे वर्णन आहे. यावरून असे म्हणावयाचे आहे काय की या सर्वांनी पूर्वजन्मात महान पापे केली होती; म्हणून त्याचे प्रायश्चित त्यांना या जन्मी इतक्या खडतर रीतीने भोगावे लागले ?

आता याउलट कौरवश्रेष्ठ दुर्योधनाच्या बाबतीत पाहा; तो जन्मतः राजपुत्र होता. त्याचा सार्वभौम राजा झाला. त्यास भीष्म, द्रोण कर्ण आदींचे सहाय्य अखेरपर्यंत होते. पांडवांच्या दीडपट सैन्य आपल्या बाजूस त्यास जमा करता आले व अखेरच्या क्षणापर्यंत तो मूर्धाभिषिक्त राजा होता व रणांगणावर लढता लढता कपटाने का होईना परंतु वीरमरणाने मेला. रणात मेल्यावर स्वर्ग मिळतो असे श्रीकृष्णाचे वचन आहे. याचा अर्थ सर्व कौरवांनी पूर्वजन्मी महान पुण्यकर्मे केली होती व त्याचे फलस्वरूप त्याना या जन्मी जन्मभर राज्य व सुखोपभोग मिळाले. द्रोणास आपल्या मुलास दूध पाजावयास मिळाले नव्हते. म्हणून पाण्यात पीठ कालवून द्यावे लागत असे. तर प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णास खाण्याकरता, कण्यांपेक्षा दुसरे काही विदुरास देता आले नाही. सुदामा जो श्रीकृष्णाचा बालमित्र त्यास तर भेटीस जाताना पोहे उसने मागून न्यावे लागले ! श्री ज्ञानेश्वरादिकांस पुष्कळ वेळा दोन वेळचेही अन्न पुरे मिळत नसे व त्यास जवळ जवळ सर्व आयुष्य संकटातच काढावे लागले. ते तसे मानोत वा न मानोत; ती गोष्ट निराळी. श्री तुकाराम महाराजांचे स्त्री पुत्र तर दुष्काळात अन्न अन्न करून मेले. रामकृष्ण परमहंस यांस कॅन्सर व श्री विवेकानंद यांना मधुमेहाने ग्रस्त करून निजधामास नेले. याचा अर्थ असा करावयाचा काय की त्या सर्वांना पूर्वजन्मी महान पापे केली होती !

वाचकहो, तुम्ही या विधानांशी सहमत आहात काय ? नसाल तर मग असे म्हणावे लागेल की पुनर्जन्मवादाचासुद्धा पायाच अगदी खिळखिळा असून भरंवसा ठेवण्यालायक नाही. त्यामुळे मूळ प्रश्न शिल्लकच राहिला की भविष्यकालीन घटना ठरलेल्या असतात काय व ठरलेल्या असल्या तर त्या ठरविताना काही तत्त्व विचारात

घेतले जात असते की कसे ? तत्त्व-या दृष्टीने आपण पाहिले की ज्योतिष व पुनर्जन्म ही दोन्ही उपयोगी पडत नाहीत; आपला अनुभव तर असा आहे की निदान काही भविष्यकालीन घटना ठरलेल्या असतात व त्यांपैकी काहींचे ज्ञान काही विशिष्ट सिद्धी असलेल्या व्यक्तीस होऊ शकते. अशा परिस्थितीमुळे केवळ अनुमान करण्यापलीकडे आपण काही करू शकत नाही. हे खरे असले तरीसुद्धा ते अनुमान तर्कसंमत असले तरच त्याचा काही उपयोग. मी म्हणतो की, चंद्र सूर्य निर्माण केले गेले किंवा झाले; त्यांना गती दिल्या व ते सर्व अंतरिक्षात परिभ्रमण करू लागले. यास कारण त्यांची पूर्वजन्मीची कर्मे होती ? चित्‌शक्तीला वाटले—आपण तिला नियती असे म्हणू या—सूर्य, चंद्र, तारे निर्माण करावे; तिने केले. तिला वाटले की मानव निर्माण करावा. तसे केले. तिने काय करावे, कसे करावे. व का करावे हे ठरविणारे आपण कोण ? आपण सर्व नियतीच्या हातातील केवळ खेळणी आहोत. सर्व विश्वच आहे. तेथे आपला काय पाड ? नियतीने ठरविले की मानवाने उत्पन्न व्हावे—काही काल विशिष्ट पद्धतीने अवनीतलावर वास करावा व मग नाहीसे व्हावे. त्यास आपण काही हरकत करू शकू काय ? ते तर मानव उत्पन्न झाला त्यावेळीच ठरले गेले आहे. जेथे इतक्या दूरच्या टप्प्यावरील गोष्टी इतक्या अगोदरच ठरल्या गेल्या आहेत त्यात मानवी जीवनातील किंवा आपल्या पृथ्वीस्वरूप गोलासंबंधी काही घटना पूर्वीच ठरविल्या गेल्या असतील तर त्याची आपणास काय माहिती असणार ? आपला जन्म व मरण ही सुद्धा आपणाविरहित कोणी तरी ठरविली. त्यांनीच आपल्या जीवनातील सर्व अगर काही महत्त्वाच्या घटना ठरविल्या असल्या तर त्यात नवल करण्यासारखे किंवा विश्वास न ठेवण्यासारखे काय आहे ते मला कळत नाही. एखाद्या महान ठिकाणी मोठा ज्वालामुखीचा उद्रेक होणे—समुद्रात मोठी भरती येणे——एखाद्या ठिकाणी धरणीकंप होणे, या अगर अशाच घटना पृथ्वी उत्पन्न झाली त्याच वेळी ठरल्या नसतील कशावरून ? त्याचप्रमाणे एखादा मानव जन्माला आल्यानंतर तो एखादा महान तत्त्वज्ञ होईल किंवा एखादा महान गुन्हेगार होईल—त्यास मोठा अपघात होईल, अशा काही घटना त्याच्या जन्मकाळीच ठरविल्या गेल्या असतील तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काय आहे ? जन्म आणि मृत्यु कोणी तरी ठरवू शकते. वाटले तर त्यास नियती म्हणा. मग जीवनामधील घटना तीच नियती ठरवू शकत नाही, असे आपणास कसे म्हणता येईल !

असे जर आहे तर आपण विचार करतो त्यावेळी काही ठरलेल्या घटना घडून गेलेल्या असतील, तर काही अद्याप घडावयाच्या असतील. त्या कोणी ठरविल्या, का ठरविल्या, त्या ठरविताना कोणते तत्त्व वापरले गेले याची दुर्दैवाने आपणास अद्याप काहीच माहिती नाही व ज्योतिष व पुनर्जन्म ही दोन्ही हेच कोडे सोडविण्याच्या प्रयत्नात जन्मास आली आहेत. परंतु आपण पाहिले आहे की तत्संबंधी खुलासा करण्यास ती दोन्ही अगदीच तोटकी पडली असून, तो प्रश्न आहे तसाच अद्याप मानवी मनास कोडे स्वरूप आहे. श्रीराम असो वा श्रीकृष्ण, त्या चित्‌शक्तीस

CS CamScanner

योग्य वाटले की त्यांच्या जीवनातील बहुतेक भाग दुःखात काढावा व त्याप्रमाणे त्यांना काढावा लागला. त्यात बुद्धीस पटणारे कारण काही असलेच पाहिजे असे ठरविणारे आपण कोण ? त्यास तसे काही कारण असेलही; पण ते समजून घेण्याची आपली अद्याप पात्रता नाही. चंद्र, बुध, शुक्रासारखे महान गोल आज हवापाण्याविरहित अगदी निष्क्रिय व निष्पंद अवस्थेत आहेत. त्यांना असे ठेवण्यात नियतीचा काय हेतू असावा, त्याचप्रमाणे पृथ्वी गोल उत्पन्न करून ती सुजलां, सुफलां, जीव, जंतू, पशू, पक्षी, मनुष्य आदींनी युक्त करून तरी नियतीने काय साधले ? तर सर्वत्र ‘ जीवो जीवस्य जीवनं ’ हा कायदा अमलात आणून दुःख व असमाधान यांचे साम्राज्य पसरवून ठेवले आहे. वस्तुस्थितीकडे पाहा; भावनेस महत्त्व देऊ नका; ही अगदी सत्य परिस्थिती आहे. अस करण्यात नियतीस काय मिळाले ? या सर्व गोष्टींस ज्याप्रमाणे आपणास समर्पक अशी कारणपरंपरा सापडत नाही, त्याचप्रमाणे आपल्या दैनंदिन जीवनासंबंधी सुद्धा समजावयास काय हरकत आहे ? एखादी अगम्य अशी घटना घडली म्हणजे त्याच्या मागे काही कारणपरंपरा असली पाहिजे असे आपण गृहीत धरतो. मी म्हणतो येथपर्यंत ठीक आहे पण नंतर, ती कारणपरंपरा अमुक असावी असे निरनिराळ्या व्यक्ती आपापल्या निरनिराळ्या मताप्रमाणे शोधून काढतात व त्या परस्परविरोधी असल्या तरी खऱ्या आहेत. असा हट्टाग्रह धरतात ! त्यामागे काही गोष्टी गृहीत धरतात व ती गृहीत गोष्ट सिद्ध करण्याकरता दुसरी एखादी गृहीत धरतात व मग अशा गृहीत गोष्टींची परंपराच लागते व त्यांपैकी एकही सत्यपरिस्थितीस धरून नसते. एखाद्यास दुःखाचा प्रसंग आला की त्याने केव्हा तरी पाप केले असले पाहिजे; त्याचाच हा परिणाम असला पाहिजे मग पाप म्हणजे काय व ते केव्हा केले गेले असले पाहिजे याचा विचार आलाच. अशी कधीही न संपणारी, न पटणारी परंपरा सुरू होते. मात्र याविषयी ते सांगणाराचीच खात्री पटलेली नसते. मी म्हणतो की, अशा रीतीने एका आंधळ्याने दुसऱ्या आंधळ्याला मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा हे स्पष्ट सांगितलेले बरे नाही का की बुवा मी आंधळा आहे, मला मार्ग माहीत नाही. दुसऱ्या कोणास विचार अथवा तूच शोधून काढ. कोणतीही गोष्ट गृहीत म्हणून कोणाचे माथी मारली की तो तीत काही चूक असेल असे न मानता त्याप्रमाणे वागावयास सुरवात करतो. त्यापेक्षा जर असे सांगितले की ही गोष्ट अद्याप अज्ञात आहे. योग्य व्यक्तींनी ती उलगडण्याचा प्रयत्न करावा. असे म्हटले तर निदान ज्ञानप्राप्तीचा मार्ग मोकळा राहतो; गृहीत धरण्याने तो बंद होतो. आपणास नेहमी जाणीव असावी की, या अनंत ज्ञानमहोदधीतील एका कणाचेही ज्ञान आपणास अद्याप नाही. सर्वच अज्ञात त्यात हेही एक. उगीच काही तरी खरे-खोटे गृहीत धरून ज्ञानाचा पुढील मार्ग तरी का रोखून धरावा ? ज्योतिष व पुनर्जन्म या गोष्टी असतील अगर नसतील. परंतु भविष्यकालीन घटना समजून घेण्याच्या दृष्टीने त्या निरुपयोगी आहेत इतके मात्र खरे. भविष्यकालीन घटनासंबंधी आपण पाहिले आहे की त्या दोन प्रकारच्या असतात.

परिणामस्वरूप, घटनासंबंधी विचार करण्याचे कारण नाही. प्रश्न आहे कल्पनातील घटन संबंधी. म्हणजे ज्यांचा भूत अगर वर्तमान काळाशी कसलाही संबंध नाही, परंतु ज्या ठरलेल्या आहेत, त्यासंबंधीसुद्धा दोन प्रकारचे प्रश्न आहेत. ते म्हणजे अशा घटना खरोखरी ठरलेल्या आहेत काय ? व असल्या तर त्या आपणास कळू शकतील की कसे ?

साहजिकच प्रश्न असा उद्‌भवतो की अशा भविष्यकालीन घटना जर ठरलेल्या असतील तर त्या कोण ठरवितो व कोणत्या तत्त्वावर ? त्या ठरलेल्या जरी असल्या तरी त्यांची स्पंदनेच उत्पन्न झालेली नसल्याने आपणास त्या कशा कळू शकतील ? प्रश्न अगदी योग्य आहे व त्याचे उत्तरही सोपे नाही. सूर्याची निर्मिती झाली; त्यास गुरुत्वाकर्षण व गती देऊन ठेवली. त्याने त्याचप्रमाणे फिरते राहून कोट्यवधी वर्षे कार्य करीत राहावे हे कोणी ठरविले ? कोणी तरी ठरविले खरे व सूर्य त्याप्रमाणे वर्तत आला. चित्‌शक्ती या निरनिराळ्या स्वरूपात नटत आहे व विश्वनिर्माण व विलयाचे कार्य करीत आहे परंतु तिने तसे करताना झाड व्हावे की पर्वत, पशू वा पक्षी, चंद्र वा सूर्य हे कोण ठरवितो ? चित्‌शक्तीखेरीज इतर काही अस्तित्वातच नसल्याने फार तर आंतरचित्‌शक्ती हे ठरविण्याचे काम करीत असली पाहिजे. तीसच आपण नियती असे म्हणूया. या महान चित्‌शक्तीलासुद्धा कोणाच्या तरी नेतृत्वाखालीच आपले कार्य करीत राहावे लागत असले पाहिजे. ही नियती केवळ भूत व वर्तमान काळात तिने काय करावे हे ठरवूनच थांबते असे नसून, भविष्यकालीसुद्धा तिने कसे वर्तावे हे ठरवीत असते. तिने असे करताना कोणत्या तत्त्वाचा अवलंब केला आहे अगर करीत आहे याचे आपणास काहीच ज्ञान नाही. परंतु असे काहीतरी होत आहे ही गोष्ट खरी. नियतीने ठरवून दिले आहे की, पृथ्वीने सूर्याभोवती फिरावे व सूर्याने सर्व ग्रहांस बरोबर घेऊन आकाशगंगेत रोज दोन कोटी मैलांचा प्रवास करावा. त्याप्रमाणे चालले आहे व चालत राहणार आहे. नियतीचा आपणावर ताबा आहे; आपला नियतीवर नाही. आपण पाहिलेच आहे की, सर्व ब्रह्मांडाची उत्पत्ती, स्थिती, लय कालावकाशात होत असतो. उत्पत्ती होत असताना नियतीने ठरविले की, आज अमुक सूर्याने कोठे राहावे, उद्या कोठे,–ते थेट त्याचे अनंतात विलीनीकरण होईपर्यंत कसे कसे होत राहावे. त्याप्रमाणे काही लहानसहान घटनासुद्धा नियतीने काही कालापूर्वीच ठरवून ठेवल्या असतील की, त्या कालावकाशातील परिभ्रमणात अमुक एका स्थळी अमुक एका काळी एखादी विवक्षित घटना घडून यावी. स्थळ ठरलेले असते; परंतु तो विवक्षित काल अद्याप यावयाचा असतो. त्याप्रमाणे गतिमान असे कालचक्र, स्थलाच्या त्या टप्प्यावर आले की ती घटना त्या ठरलेल्या ठिकाणी घडून येते ती अशी का घडून आली त्यास समर्पक असे कारण सापडत नाही. ज्याप्रमाणे अमुक एका विवक्षित काळी, विवक्षित स्थळी एखादा सूर्य उत्पन्न व्हावा किंवा विलीन व्हावा म्हणून ठरविले जाते व त्याप्रमाणे घडून येते; तसेच, परंतु त्यामानाने अगदी लहान अशा घटनासुद्धा नियती ठरवून

ठेवीत असावी व त्याप्रमाणे घटना घडून येत असतात. तिने असे का ठरविले ते आपणास माहीत नाही व माहीत होणार पण नसेल. परंतु असा अनुभव आहे की, अशा भविष्यकालात होणाऱ्या निदान काही घटना ठरलेल्या असतात व त्या त्या वेळी त्या घडून येतात. समजा, एक घटना अशी आहे; एखाद्या ठरलेल्या ठिकाणी एखाद्या विवक्षित विमानास, की ज्यात विवक्षित संख्येने माणसे बसलेली आहेत त्यास विवक्षित वेळी अपघात होऊन त्यातील १०० पैकी ८८ माणसे मरावीत व बारा जगावीत. कदाचित ही घटना ठरविली गेली त्या वेळी विमान–विद्याही अस्तित्वात नसेल व त्यातील बहुसंख्य माणसे जन्मालासुद्धा आलेली नसतील. असे असले तरी असा अनुभव आहे की अशा घटना ठरलेल्या असतात व त्या त्या वेळी घडून येतात. समजा, शंभर वर्षांपूर्वी असे कोणी भविष्य वर्तवून ठेवले व ती घटना त्याप्रमाणे तंतोतंत अनुभवास आली तर त्यास काही निव्वळ योगायोग म्हणता येणार नाही. अशा बऱ्याच घटना Nosterdomus याने काही शतकापूर्वी लिहून ठेवल्या होत्या व त्या अनुभवास आल्या आहेत व येत आहेत. आजसुद्धा Pendragon, Jean Dixon अशा व्यक्तींनी बऱ्याच वर्षांपूर्वी करून ठेवलेली, निदान काही भविष्ये तंतोतंत अनुभवास येत आहेत. यावरून असे कबूल करणे भाग पडते की नियतीने अशा काही घटना, व्यक्ती, राष्ट्र त्याचप्रमाणे पृथ्वीबद्दल सुद्धा ठरवून ठेवल्या आहेत. त्यांपैकी काही विशिष्ट व्यक्तींना–ज्यांना त्याबाबत सिद्धी आहे त्यांना–त्यांपैकी काहींचे ज्ञान होऊ शकते. अशा शेकडोंनी घटना पूर्वीच लिहून ठेवल्या अथवा सांगून ठेवलेल्या आहेत. त्यांपैकी काहींचा निर्देश मी या लेखाच्या शेवटी करणार आहे.

आता दुसरा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, समजा, एखादी घटना ठरलेली आहे व ती पुष्कळ वर्षांनी घडणार आहे हे जरी खरे असले तरी ती अद्याप प्रत्यक्ष घडलेली नसल्याने, तिच्यापासून तरंग किंवा स्पंदने उत्पन्न होणेच शक्य नसते. म्हणून त्यांचे मेंदूवर आघात नाहीत; व म्हणून त्यांचे ज्ञान पण होणे शक्य नाही. असे आहे तर या घटनांचे ज्ञान मानवास होण्याचे साधन काय व ते कसे होत असावे?

Psychometry किंवा Telepathy मध्ये काय होत असते? Psychometry त एखाद्या वस्तूशी अथवा व्यक्तीशी संबंधित असा एखादा जिन्नस असतो. ती वस्तू किंवा ती व्यक्ती त्या वेळचे, त्या भोवतीचे वस्तुस्थितीचें तरंग किंवा स्पंदने या मिळालेल्या जिनसेच्या द्वारा सुप्तावस्थेतून प्रकट स्वरूपात करून घेण्याची सिद्धी ज्यांना Psychometry साध्य आहे, त्यांना असते; मग ती प्रकटीकरण क्रिया प्रत्यक्ष असो वा अप्रत्यक्ष. माझ्या समजुतीने ती क्रिया अप्रत्यक्ष असते. त्याचप्रमाणे Telepathy च्या बाबतीत आपल्या मनातील अप्रकट सुप्त विचार प्रकट होऊन त्या व्यक्तीस त्याचे ज्ञान होते. आपल्या जवळील रुमाल हिरव्या रंगाचा आहे किंवा आपल्या जवळ रु. २१ आहेत याचे कदाचित आपणास विस्मरण पडले असेल; परंतु ते तो अचूक सांगू शकतो. याचा अर्थ एवढाच की मनातील सुप्त विचार प्रकट करून त्यांचे तरंग

अथवा स्पदंने तो आपल्या स्वतःच्या मेंदूमार्फत ग्रहण करून त्यासंबंधी अचूक असे आपणास सांगू शकतो.

भविष्यकालीन घटनांच्या बाबतीत अगदी हेच परंतु थोडे निराळ्या स्वरूपात घडत असते. आपण पाहिले आहे की चित्‌शक्ती म्हणा वा नियती काहीतरी उद्देशाने, ज्यांची आपणास माहिती नाही, अशा काही भविष्यकालीन घटना ठरवून ठेवीत असते. आपणास हेही माहीत आहे की, या विश्वातील यच्चयावत घटना कालावकाशात घडत असतात. या अशा भविष्यकालीन घटनासुद्धा कालावकाशातील असतात. फक्त त्या पुढे केव्हा तरी घडून यावयाच्या असतात. खरे पाहिले असता कालावकाशातील या प्रचंड ब्रह्मांडात खाली वर, आजूबाजूस असे काहीच नसते. सर्व काही वर्तुळात असल्याने आपले तोंड ज्या बाजूस असेल त्याच्या सापेक्षतेने आपण ठरवीत असतो; वस्तुस्थिती तशी नसते. जे माझ्या पुढे आहे ते दुसऱ्याच्या मागे असेल. जे माझ्या उजव्या बाजूस आहे ते दुसऱ्याच्या डाव्या बाजूस असेल. वस्तुस्थिती म्हणजे ते जेथे असते तेथेच असते. कालासंबंधी सुद्धा हेच म्हणता येईल. त्यात भूत, भविष्य, वर्तमान असे काहीही नाही. ते सुद्धा सापेक्ष आहे. आपल्या येथे शिवाजी होऊन गेल्यास तीनशे वर्षे होऊन गेली. ज्या ताऱ्यावरून प्रकाश यावयास तीनशेपन्नास वर्षे लागतात, त्यांना शिवाजी जन्मास येतो आहे असे दिसेल व त्याहून लांबच्या ताऱ्यावरून पाहिले तर तेथे शिवाजी जन्मास यावयास काही वर्षे अवकाश आहे असे दिसेल व ते ती प्रत्यक्ष पाहात असल्याने वस्तुस्थिती काही निराळी असेल असे मानण्याचे त्यांना कारण नाही. परंतु प्रत्यक्षात वस्तुस्थिती काय आहे ते आपण जाणतोच. काल हे सुद्धा चक्रच आहे, त्यामुळे त्यात सुद्धा काल, आज, उद्या असे काही नाही. आपण सापेक्षतेने ते ठरवीत असतो की ही घटना मागील आहे व ही पुढील आहे.

हा तात्त्विक वाद जरी तूर्त बाजूस ठेवला व आपण समजतो त्याप्रमाणे भविष्यकालीन घटना या भविष्यकालीनच आहेत असे आपण गृहीत धरले तरी अनुभव असा आहे की भविष्यकालीन समजल्या जाणाऱ्यांपैकी पुष्कळ घटना अगोदरच ठरलेल्या असतात व त्यांपैकी काहींचे तत्संबंधी सिद्धी असलेल्या व्यक्तींना ज्ञान होते. याचे कारण भविष्यकालीन घटना म्हणजे आतापासून एका क्षणाने किंवा १००० किंवा अधिक वर्षांनी घडून येणारी एखादी घटना—चित्‌शक्ती म्हणा की नियती म्हणा, ज्यावेळी एखादी भविष्यकालीन घटना ठरविते त्यावेळी अर्थात तिचे काल व अवकाश यातील स्थानही निश्चित केलेले असणार व कालावकाशातील त्या ठिकाणी ती घटना सुप्तरूपाने स्थापित केलेली असते. अवकाशातील स्थळ व ती घटना प्रकट होऊन ती घडून येण्याची निश्चित वेळही पण ठरलेली असते. कालचक्र ज्यावेळी आपल्या गतीने त्या टप्प्यापर्यंत येते त्यावेळी ती घटना प्रत्यक्ष रूपाने प्रकट होऊन घटना घडली असे आपणास ज्ञान होते. खरोखरी ती घटना कालावकाशातील त्या विवक्षित स्थळी, सुप्तरूपाने अगोदरपासूनच वास करीत असते. एक प्रकारे त्यासही भूतकालच म्हणावा

लागेल. कारण घटना ठरविली गेली व सुप्तरूपाने स्थापित केली गेली. तो काल अगोदरच भूतकालात जमा झालेला असतो. फक्त आपल्या दृष्टीने ती घटना अद्याप प्रत्यक्षात घडून यावयाची असते. म्हणून त्यास भविष्यकालीन घटना म्हणावयाचे इतकेच.

psychometry किंवा Telepathy मध्ये ज्याप्रमाणे सुप्तावस्थेतील घटनांचे तरंग व स्पंदने प्रकट करून त्याचे ज्ञान करून घेता येते. त्याचप्रमाणे भविष्यकालीन घटनांच्या बाबतीतसुद्धा तत्संबंधी सुप्त तरंग व स्पंदने प्रकट होऊन, त्या व्यक्तीस ती ग्रहण करून विशद करण्याची पात्रता असते, त्यास त्याचे ज्ञान होऊन त्यासंबंधी ते जगास सांगू शकतात. असे सांगताना अनुभव असा आहे की, घटनांचे ज्ञान बरेचसे अस्पष्ट स्वरूपात होत असल्याने, त्या घटना जरी बरोबर सांगता आल्या तरी त्यांच्या वेळचे मोजमाप बरोबर न होऊ शकल्याने, पुष्कळ वेळा त्यासंबंधी सांगण्यात चूक होते. तेथे काही इंग्रजी, मराठी सन वा शक नाहीत किंवा दिवस, महिने, वर्षे हे सुद्धा कालमापनात सापेक्षच आहेत. मी अगोदरच सांगितले आहे की, या प्रचंड ब्रह्मांडांत मागे-पुढे, खालीवर असे काही नसते. त्याचप्रमाणे भूत भविष्य वर्तमान असेही काही नसते. तरी पण अगदी वाच्यार्थानेच पाहावयाचे म्हटले तरी ज्यावेळी ती घटना ठरविली गेली व सुप्तावस्थेत स्थापित केली गेली त्यावेळींच अप्रत्यक्ष रीतीने ती घडली फक्त तिचे ज्ञान आपणास घडावयाचे बाकी राहिले. मात्र ती खरोखरीच घडलेली असते. याकरता तीस भूतकालीनच म्हणावी लागेल. एखाद्या ठिकाणी टाइम बॉंब ठेवला व त्यात जर अन्य काही घटना आड न आल्या तर ठराविक वेळी त्याचा स्फोट होणारच. हे जसे ठरलेले असते, थोड्याफार प्रमाणात तसेच, निदान ती घटना सुप्तावस्थेत तरी घडलेली असते हे मान्य करावे लागेल. ज्याप्रमाणे Psychometry किंवा Telepathy मध्ये सुप्तावस्थेतील घटना प्रकट करून घेता येतात किंवा होतात, त्याचप्रमाणे या सुप्त घटना देखील ती सिद्धी असणाऱ्या व्यक्तींना प्रकट करून घेता येतात, किंवा त्यांच्या ठिकाणी त्या प्रकट होतात. मात्र असे होताना ज्याप्रमाणे दूरच्या जिनसा आपणास अस्पष्ट दिसतात व अनुमानाने त्या काय व कशा असाव्यात ते ठरवावे लागते; त्याचप्रमाणे या घटनांबाबतही होते व पुष्कळ वेळा त्याचे Interpretation अथवा अनुमान चुकते किंवा थोड्याफार फरकाने त्यांचे प्रकटीकरण होत असते. त्यामुळे वळ व घटनेचा तपशील यात थोडाफार फरक पडू शकतो. परंतु शंभरात एक घटना जरी सर्व बारीकसारीक तपशील व तंतोतंत वेळ यांनी युक्त अशी सांगता आली व त्याप्रमाणे शंभर टक्के अनुभवास आली तर काहीं तो केवळ अपघात Accident असे म्हणता येणार नाही. यापेक्षा जास्त प्रमाणात सांगता आल्या तर प्रश्नच नाही. मग असे निश्चित सांगता येईल की भविष्यकालीन घटना निदान काही तरी ठरलेल्या असतात व तत्संबंधी सिद्धी असलेल्या व्यक्तींना त्यांचे ज्ञान होऊ शकते.

भविष्यकालीन घटना ठरलेल्या असतात. त्या काही विवक्षित व्यक्तीस कळू शकतात, हे मान्य; परंतु पुढे काय ? एक तर त्या विवक्षित व्यक्तीसच कळतात त्यामुळे सर्वसामान्य जनतेस त्याचा काहीच उपयोग नाही; व शिवाय अशा काही घटना कळल्या व त्या जर टाळता येण्यासारख्या नसल्या तर त्या कळून तरी काय फायदा ? असा अनुभव आहे की काही भविष्यकालीन घटना अगदी अटळ असतात, तर काही मी यापूर्वी वर्णन केल्याप्रमाणे गोफात गुंफत गुंफत जाऊन विवक्षित वेळी व विवक्षित ठिकाणी पूर्ण होतात. नियतीने अशी योजना करून ठेवली आहे की या दुसऱ्या वर्गातील घटता जर अगोदर कळल्या तर काही दैनिक वा अन्य प्रयत्नांनी त्यात अनुकूल असा फेरफार घडवून आणता येतो. समजा, एखाद्या ठिकाणी अमुक वेळी भूकंप किंवा ज्वालामुखीचा महान उद्रेक होणार आहे, हे अगोदर कळले तर भूकंप किंवा उद्रेक तर आपण काही टाळू शकणार नाही; किंवा त्या ठिकाणी असलेल्या इमारती हलवू शकणार नाही. असे असले तरी तेथील सर्व मानवी वस्ती व घरातील सामानसुमान अगोदर सुरक्षित ठिकाणी हलविता येईल व संभाव्य नुकसान बऱ्याच प्रमाणात टाळता येईल. यावर असा आक्षेप घेता येईल की, त्या माणसांचा भूकंपात किंवा ज्वालामुखीत मृत्यू होणार ही घटना ठरलेलीच नसली पाहिजे. ठरलेली असती तर त्यांना ती टाळता आली नसती. खरे म्हणजे निसर्गप्रेरित मृत्यूपूर्वी काही अपमृत्यू संभवत असतात, व ते टाळता येतात मानवाचे साधारणपणे पूर्ण आयुर्मान सत्तर वर्षांचे. त्या वयात आजाराने मृत्यू आला तर तो अटळच असतो; परंतु सर्वकाळ नाही. सत्तर वर्षांपूर्वी येणारा मृत्यू हा अपमृत्यू समजावयास हरकत नाही व त्याची अगोदर जाणीव झाली तर प्रयत्नाने तो टाळता येतो. ही सुद्धा नियतीचीच योजना आहे. हे म्हणजे नुसत्या मृत्यूच्याच बाबतीत नसून, इतर पुष्कळ भविष्यकालीन घटनांबद्दल असे म्हणता येईल तसे नसतं तर त्या कळून न कळून सारख्याच. एकदा Jean Dixon ने आपल्या पतीस विमानप्रवासाचे तिकीट रद्द करून आगगाडीने जाणे भाग पाडले. परिणामी त्या विमानास अपघात होऊन त्यातील सर्व इसम दगावले व हिचा पती सुखरूप राहिला. असो. हा विषय बराच विवाद्य आहे व याबद्दल दोन्ही बाजूंनी पुष्कळ साधकबाधक प्रमाणे सांगता येतील हे मान्य आहे. परंतु त्या सर्वांचा या लहानशा पुस्तकात समावेश करणे शक्य नाही व इष्टही नाही. कारण या सर्वांचा चालू विषयाशी फारसा संबंध पोचत नाही. असे असले तरी एक गोष्ट मान्य केली पाहिजे की मुळात हा विषय अजून अज्ञात या सदरात आहे. म्हणून दोन्ही बाजूंची प्रमाणे चुकीची असण्याचा संभव काही दृष्टीआड करता येणार नाही. याकरता तो संपूर्ण ज्ञात या सदरात येईपर्यंत त्याचा मानवाच्या हिताकरता उपयोग करून घेता येत असेल तर तसे का करू नये ? कोणी म्हणेल की भविष्यकालीन घटना ठरलेल्या असतात व त्या अटळ असतात. अर्थात हा विषय अज्ञात असल्याने १०० टक्के असे काहीच सांगता येणार नाही. तरी पण अटळ म्हणून काही प्रयत्न न करता

निष्क्रिय राहून स्वस्थ वाट पाहात बसून त्यास शरण जाण्यापेक्षा प्रयत्नाने नुकसान टाळता येणे शक्य आहे असे गृहीत धरून प्रयत्नशील राहणे योग्य होणार नाही काय ? अटळ आहे की कसे ते माहीत नाही. मग तीच गोष्ट गृहीत धरून तीस खाली मान घालून सामोरे जाण्यापेक्षा प्रयत्न करून निदान जितके टाळता येईल तितके टाळण्याचा प्रयत्न करणे योग्य नाही काय ? अटळच असेल तर होईलच होईल. परंतु तसे नसले तर असे होऊ नये की प्रयत्न करून ते टाळता येणे शक्य असून, आपण योग्य तो प्रयत्न केला तर फायदा होण्याची शक्यता आहे. निदान नुकसान तरी काही नाही. याकरता प्रयत्नशील राहणे केव्हाही इष्टच.

आता राहिला एक महत्त्वाचा प्रश्न की, अशी सिद्धी सर्वसामान्य अशा कोणासही प्रयत्नाने मिळवता येईल काय ? यास उत्तर 'होय' असे आहे. जी गोष्ट एक मनुष्य मिळवू शकतो, ती प्रयत्नाने दुसराही मिळवू शकेलच. काही लोकांना प्रयत्न जरा विशेष करावे लागतील इतकेच. काही सिद्धी जन्मतःच प्राप्त झालेल्या असतात. तर काही विशिष्ट कारणाने परंतु अनाहूत मिळतात असे दिसून आले आहे. एक इसम तीस फूट उंचीवरून पडला व शुद्धीवर आला तेव्हा त्यास असे आढळून आले की, त्यास X Ray दृष्टी प्राप्त झाली आहे. एक मुलगी दुखण्यातून मरता मरता वाचली. बरे झाल्यावर तिला अतींद्रिय दृष्टी आली आहे असे आढळून आले. याखेरीज ज्यांना प्रयत्नाने अशा काही सिद्धी प्राप्त करून घेणे आहेत त्यांना सुद्धा काही मार्ग आहेत. परंतु त्यांचा परामर्श या प्रकरणात न घेता त्याकरिता एक स्वतंत्र प्रकरण देण्याचे योजिले आहे.

त्याचप्रमाणे या विषयाच्या अंतर्भूत Psychometry, Telepathy, Crystal gazing, Spiritual mediumship असे विषय येतात. परंतु त्यांचा संबंध इतर पुष्कळ प्रकरणांशी सुद्धा येत असल्याने त्यांचाही स्वतंत्र रीतीने परामर्श घेण्याचे योजीत आहे.

आता भविष्यसिद्धीबद्दलची काही प्रत्यक्ष घडलेली उदाहरणे नमूद करून या प्रकणाचा समारोप करू.

—१—

Borths Strydom नावाच्या एका स्त्रीकडे Dr. Forsythe नावाच्या एका इसमाने काही माणसे आणली. त्यांना त्या बाईने सांगितले की, तुम्ही यांना माझी परीक्षा पाहण्याकरता आणले आहे. त्यांपैकी एकाने तिच्या अंगास स्पर्श केला. त्यावरून तिने त्यासंबंधी सांगण्यास सुरवात केली, की या माणसाचे नाव Robert Backman असे असून त्यास Bobby बॉबी असेही म्हणतात. त्यासंबंधी थोडे भविष्य सांगते. लवकरच एक मोठी लढाई होईल. त्यात हा मनुष्य वाळवंटापलीकडे जाऊन

लढेल. त्या ठिकाणी फार नासधूस होऊन नुकसान होईल. मला असे दिसते की, हा मनुष्य छातीत गोळी लागून जमिनीकडे तोंड करून वाळूत पडेल. ही हकीकत १९३८ साली सांगितली त्याप्रमाणे सर्व घटना घडून हा मनुष्य रोमच्या विरुद्ध लढताना वाळवंटात मरण पावला. भविष्य अगदी तंतोतंत खरे ठरले.

१९२० पर्यंत म्हणजे वयाच्या २२ व्या वर्षापर्यन्त ही स्त्री इतर सर्वसाधारण स्त्रियांसारखीच होती. त्या वर्षी ती मॅनिंजायटिसने आजारी पडली. म्हणून तिला एका हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले. सहा दिवस ती आसन्नमरण स्थितीत पडून होती. पुढे ती सुधारू लागली. नंतर लवकरच तिने तिच्या नर्सला सांगितले की तू आजारी आहेस. व तुला मदत मिळाली नाही तर तू मरशील, नर्स म्हणाली, की तूच आजारी आहेस मी नाही. त्या स्त्रीने नर्सला तीन वेळा बजावले. परंतु तिने लक्ष दिले नाही. त्याच रात्री नर्सला १०३° ताप आला व दोन दिवसांनी ती मेली. याचा अर्थ असा आहे की, आजारीपणात तिच्या मेंदूमधील एखादा विवक्षित भाग जागृत झाला व तिला ती सिद्धी प्राप्त झाली. तो कोणता भाग असावा हे शोधून काढणे व तो जागृत कसा करवयाचा हेही शोधून काढले, तर ही सिद्धी सर्वसाधारण माणसास सुद्धा प्राप्त करून घेणे शक्य होईल. या स्त्रीस साधारणपणे भविष्यकालीन कळणाऱ्या घटना मृत्यूबद्दलच्याच असत. एकदा एक Maid कर्मचारी तिच्या बाजूने गेली. तिला असे दिसले की एक मुलगी एका गल्लीत जमिनीवर मरून पडली असून एक मनुष्य तेरा पायऱ्या चढून फासाकडे जात आहे. सुमारे सहा वर्षांनी म्हणजे सन १९३१ साली त्याच स्त्रीच्या (Maid) बाबतीत ती घटना घडून आली व मारेकरी फाशी गेला.

—२—

मिसेस हाफसन नावाची एक स्त्री होती. तिला अशा प्रकारची भविष्यासिद्धी होती. तिने वर्तविलेली व त्याप्रमाणे घडून आलेली एक घटना पुढीलप्रमाणे. ती म्हणाली :

“मला फार विचित्र दिसत आहे. एका माणसाची बंदुकीच्या गोळ्यांनी चाळण झालेली असून दुसरा एक व्यापारीसुद्धा गोळी लागून मरण पावला आहे. एक मनुष्य युनिफॉर्ममध्ये असून त्याच्या पायात काळे बूट आहेत. ही घटना येत्या रविवारी घडणार आहे. ती वेळ रात्रीची असेल; पण घटनास्थळ मात्र नक्की सांगता येत नाही.” ही हकीकत त्या स्त्रीने ज्या पोलीस ऑफिसरला सांगितली ती त्याने जशीच्या तशीच आपल्या वरिष्ठास सांगितली. वरिष्ठाने त्याची चेष्टा केली व विचारले की, तू पिऊन आला आहेस काय ? तुझ्यासारख्या हुशार व पोलिस खात्यातील मनुष्याने असा भाकड कथांवर व भविष्यावर विश्वास ठेवावा काय ?

परंतु सोमवारी सकाळीच त्या ऑफिसरने त्या पोलिसास बोलावून सांगितले की, तू त्या दिवशी जे काही सांगितलेस त्याप्रमाणे काल म्हणजे रविवारी रात्री अगदी

तंतोतंत घडले आहे. त्यांनी सांगितले की काल कॅलिफोर्निया थिएटरमध्ये रात्री ११–४५ वाजता थिएटरचा मॅनेजर मॅलोय हा तिजोरी उघडावयास जात असताना एका दरोडेखोराने त्यास गोळ्या घालून ठार मारले. दरोडेखोरास पकडण्याच्या प्रयत्नात एक व्यापारी कॉमरएक हा पण मारला गेला व याप्रमाणे त्या स्त्रीने सांगितलेले भविष्य तंतोतंत खरे झाले.

—३—

ता. ८ मार्च १९४६ रोजी जार्ज गॉडले यानी स्वप्नात एक वर्तमानपत्र वाचले. त्यावर तारीख दुसऱ्या दिवशीच्या सायंकाळची आवृत्ती म्हणून होती. त्या स्वप्नात त्यांनी विंडाल व जुलाईन नावाच्या घोड्यांनी रेस जिंकली असे वाचले. दुसऱ्या दिवशीच्या सकाळच्या पेपरमध्ये हे दोन्ही घोडे रेसमध्ये धावणार असे होते. त्याने त्याच्या मित्रांना स्वप्नाची हकीकत सांगितली. त्यांचा फारसा विश्वास बसला नाही. तरी पण त्या सर्वांनी त्या दोन्ही घोड्यांवर थोडी थोडी रक्कम लावली व आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते दोन्ही घोडे जिंकले होते. ता. ४।४।१९४६ ला त्यास दुसरे स्वप्न पडले. त्यात Tubermove या नावाचा घोडा जिंकल्याचे त्याने पाहिले. परंतु दुसऱ्या दिवशीच्या पेपरमध्ये Tuberisc या नावाचा घोडा धावणार असे होते. नावात साम्य असल्याने त्यावर पैसे लावले व ६२ पौंड मिळवले. ता. ११-६-६६ ला त्यास असेच स्वप्न पडले त्यात त्यास Bogic नावाचा घोडा आल्याचे दिसले. परंतु दुसऱ्या दिवशी यादीत ते नाव नसून Borgue असे नाव त्यांनी पाहिले. नामसादृश्यावरून त्याने ते नाव पक्के केले व त्याने ते नाव लिहून एक पाकीट बंद केले. त्यावर साक्ष घालून सील केले व त्या बंद-पाकिटावर पोस्टाचा शिक्का मारून घेतला नंतर त्याने लंडन डेली मेल व मिरर या दोन्ही पत्र-संचालकाना फोन करून या हकीकतीची नोंद घेऊन ठेवण्यास सांगितले. रेसमध्ये तो घोडा पहिला आला व गॉडले यास रेसमधील पैसे तर मिळालेच, परंतु गोष्टीबद्दलही पैसे मिळाले.

—४—

ता. ४-७-१८९१ रोजी विनाकिल स्कॉट नावाच्या इसमास एक स्वप्न पडले. त्यावेळी त्याने खाणीत बराच पैसा गुंतविला असून तो बऱ्याच नुकसानीत येऊन फिकिरीत होता. त्यास बरेच कर्ज पण झाले होते. अशा विवंचनेत असता त्यास एक स्वप्न पडले. त्यात त्याने पाहिले की, जवळच असलेल्या Batle mountain मधील रेड रॉक या भागात खोदकाम करीत असून तेथे त्यास विपुल सोने सापडत आहे. ते स्वप्न इतके स्पष्ट होते की ते त्याने त्याच्या भागीदारास झोपेतून उठवून सांगितले. त्यावर तो हसला व म्हणाला की तुला वेड लागले आहे काय ? त्या भागाची भूगर्भ-

खात्याने १८७४ सालीच पाहणी केली असून तेथे सोन्याचा कणही नाही, असा त्यांनी रिपोर्ट केला आहे. परंतु त्याने स्कॉटचे समाधान झाले नाही व त्याने जवळ जवळ मनाविरुद्ध भागीदारास त्या ठिकाणी नेले व खोदकाम सुरू केले. आश्चर्य हे की त्याने स्वप्नात पाहिलेल्या ठिकाणी खोदकाम सुरू करताच त्यास सोने आढळू लागले व ती खाण जगातील नंबर दोनची ठरली.

—५—

ता. १८-११-१९१७ रोजी पॅरिसमधील एक प्रोफेसर सुटी घालविण्यासाठी लंडनमधील आपल्या एका मित्राकडे राहावयास गेला होता. त्यास असे स्वप्न पडले की त्याचा तो मित्र एका चांगल्या सुशोभित अशा खोलीत निजला असून त्या खोलीचा दरवाजा उघडून एक मनुष्य आत शिरला व सुऱ्याने भोसकून त्याने त्या मित्राचा खून केला. स्वप्न इतके स्पष्ट होते की ते त्याने त्या मित्रास सांगून सावध राहण्यास सांगितले. त्यावर तो हंसून म्हणाला की, मला असा कोणी शत्रूच नाही की जो माझा खून करील. त्यावर त्या प्रोफेसराने जाऊन त्याची निजण्याची खोली पाहिली. ती त्याने पूर्वी कधीच पाहिलेली नव्हती. त्यास आश्चर्य वाटले की—ती त्याने स्वप्नात पाहिली अगदी तशीच ती होती. काही वेळाने त्या मित्राचा बागकाम करणारा माळी पाहिला व त्यास आश्चर्याचा धक्काच बसला. हाच मनुष्य त्याने स्वप्नात पाहिला होता. त्यावरून पुन्हा त्याने ती सर्व हकीकत सांगितली. त्यावर तो मित्र म्हणाला, “ हा माळी तर माझा वीस वर्षांपासूनचा अत्यंत विश्वासू नोकर आहे. तो असे कधीच करणार नाही.” ही हकीकत झाल्यावर रजा संपल्यानंतर तो प्रोफेसर पॅरिस येथे परत गेला. त्यानंतर काही दिवसांनी त्यास कळले की, त्याच्या त्या मित्राचा, त्यास स्वप्न पडले होते त्याच रीतीने खून झाला होता. त्याचे कारण असे घडले होते की, हा पॅरिस येथे परत गेल्यानंतर काही दिवसांनी काही कारणाने त्याच्या मित्राने त्या माळ्यास कामावरून कमी केले होते. माळ्याने त्यावरून संधी साधून प्रोफेसरास दिसले होते त्याच पद्धतीने रात्रीच्या वेळीच हा खून केला.

—६—

इ. स. १७५० मध्ये मॉरिस नावाच्या इसमास स्वप्न पडले की, दुसऱ्या दिवशी एका जहाजाच्या कप्तानाने त्याच्या सन्मानार्थ एक समारंभ आयोजित केला होता. त्यावेळी त्याच्या सन्मानार्थ काही तोफा डागल्या जावयाच्या होत्या. त्यात काही अपघात होऊन त्यातील काही भाग त्याच्या अंगावर पडून त्याचा मृत्यू ओढवला आहे. तो स्वप्नावर फारसा विश्वास ठेवणारा मनुष्य नव्हता. तरी पण ते स्वप्न इतके स्पष्ट होते की त्याने त्या समारंभास न जाण्याचे ठरविले व त्या कप्तानास कळविले.

त्यावर त्या कप्तानाने कळविले की असे करण्याने सर्वांचा फार विरस होईल. आम्ही आपल्या सन्मानार्थ डागल्या जाणाऱ्या तोफांचा प्रोग्रॅम रद्द करू. या आश्वासनावर श्री. मॉरिस जहाजावर गेले. तोफा डागणाऱ्या खलाशांत त्याच्या कामाबद्दल काही बक्षिसी मिळत असे. ती बुडत असल्याचे पाहून ते नाराज झाले. त्यावरून त्या कप्तानाने असे ठरविले की, त्या तोफा जहाजावरून न डागता समुद्रातून कोठून तरी बोट जेथून टप्प्यात येणार नाही, अशा ठिकाणी डागाव्या. त्यावेळी श्री. मॉरिस यांनी तळातील केबिनमध्ये सुरक्षित ठिकाणी बसून असावे. ही सर्व व्यवस्था झाल्यावर कॅप्टन खूण करतील त्यावेळी तोफा डागण्यात याव्यात असे ठरले. त्याप्रमाणे व्यवस्था चालू असता सर्व व्यवस्थित होते आहे, हे कॅप्टन व मॉरिस पाहत होते. त्यावेळी कॅप्टनच्या नाकावर एक माशी बसली. त्याने नाकावरून हात फिरविला. ती खूण समजून खलाशांनी तोफा डागल्या. अचानक स्फोट होऊन एक जड असा तप्त लोखंडाचा भाग श्री. मॉरिस यांच्या अंगावर येऊन पडला व त्यात त्यांचा मृत्यू झाला.

—७—

सन १९२४ मध्ये एका रात्री हॅरिस नावाचा एक इसम झोपेतून ओरडत उठला. त्याने स्वप्नात पाहिले की खाणीवरील नं. ३ चा लिफ्ट तुटला असून त्यातील २९ माणसांचे प्राण धोक्यात आहेत. त्याने स्वप्नात त्या अपघाताचा आवाज स्पष्ट ऐकला व तो लिफ्टही पाहिला. तो ताबडतोब सुपरिंटेंडेंट बॉबशिप याच्याकडे गेला. त्यावेळी नं. ३ चा लिफ्ट खाली सुटण्याच्या तयारीत होता व त्यात पंचवीस माणसे होती. त्याने सुपरिंटेंडेंट यांना स्वप्नातील हकीकत सांगून त्या लिफ्टला संरक्षक साखळ्या जोडण्याविषयी सांगितले. तेव्हा त्या वेळात त्या लिफ्टमधे चार अधिक माणसे शिरली व २९ संख्या पूर्ण झाली. त्याची विनंती ऐकून त्या सुपरिंटेंडेंटने त्याप्रमाणे साखळ्या लावल्या व लिफ्ट २९ माणसांसह खाली सोडला. एक मोठा आवाज होऊन त्या लिफ्टच्या मुख्य साखळ्या तुटल्याचे आढळले, परंतु या नवीन संरक्षणात्मक साखळ्यांवर तो लोंबकळत राहिला; नाहीतर सर्वच्या सर्व २९ इसम प्राणास मुकले असते. याप्रमाणे त्याचे स्वप्न खरे होऊन २९ माणसांचे प्राण वाचले. सुपरिंटेंडेंटला हॅरिस म्हणाला की ईश्वराची दया ! ही सर्व माणसे वाचली व आपण माझ्या विनंतीला मान दिला. त्यावर माझा विश्वास बसला नाही. तू सांगितल्यावर त्याचे प्रत्यंतर यावे म्हणून मी त्या साखळ्या लावल्या.

—८—

Haivy Igaus यास अगदी लहानपणापासून भविष्यसिद्धी होती. एकदा त्याने सांगितले की उद्यापासून सारखा तीन दिवस पाऊस पडणार आहे. आईने

त्याकडे लक्ष दिले नाही. पावसास सुरुवात होऊन तो सारखा तीन दिवस पडत होता. परंतु आईने बाहेर घातलेले कपडे वेळेवर घरात न आणल्याने सर्व भिजले होते. एकदा त्याने अशी घटना सांगितली की, एक मोठा विमान–अपघात होणार आहे. त्यात गव्हर्नर विल्यम्स हा असेल. परंतु त्यास काही इजा होणार नाही. सुमारे एक आठवड्यानंतर ही घटना घडून आली. त्यातील गव्हर्नर मात्र अगदी सुरक्षित राहिला.

—९—

नेपोलियनच्या हाताखालील एका ऑफिसरने आपले एक मृत्युपत्र तयार केले व ते नेपोलियनच्या स्वाधीन करून सांगितले की उद्याच्या लढाईत मी घोड्यावरून एका मोठ्या योद्धयाच्या (Croat) अंगावर चाल करून जाईन व त्यावर तलवारीचा वार करीन. तो त्याच्या चिलखतावरून खरचटून जाईल. त्यानंतर तो माझ्यावर एक मोठा वार करील व त्याने माझा मृत्यू होईल. दुसऱ्या दिवसाच्या लढाईत अगदी त्याचप्रमाणे हकीकत घडून येऊन त्याचा मृत्यू झाला.

—१०—

मेरी ॲन ग्लीन हिने १९२७ साली एक भविष्य सांगितले की, दोन ज्वालामुखी Puna आणि Kilanea याचा उद्रेक होऊन अमुक एक दिशेने लाव्हा रस बाहेर पडून अतोनात नुकसान होईल. काही लोकांनी त्यावर विश्वास ठेवला व ते गाव सोडून निघून गेले त्यावेळी खरे म्हणजे तशी काहीच चिन्हे दिसत नव्हती. परंतु पुढे तिने सांगितल्य वेळी दोन्ही ज्वालामुखींचा उद्रेक होऊन जवळपासची खेडी नाश पावली. त्याचप्रमाणे तिने एकदा मोठ्या समुद्रलाटेचे Tidal Wave चे भविष्य करून त्याबद्दलची तारीख व वेळ पण सांगितली होती. आणि काठावरच्या लोकांस सावध राहण्याबद्दल सुचविले होते. अगदी नक्की त्याच दिवशी व त्याच वेळी मोठे तुफान होऊन अशी लाट आली की किनाऱ्याजवळील सर्व धुऊन नेले. त्यात कित्येक होड्या, गावे व माणसे पण होती.

त्याचप्रमाणे १९६० मध्ये ज्वालामुखीचा उद्रेक होऊन गेल्यावर सुद्धा मोठमोठे आवाज व स्फोट होत होते व त्याकारणाने लोक अस्वस्थ व भयभीत होते. त्यावेळी तिला दोन खेचरस्थ (Spirits) भेटले व त्यांनी सांगितले की निसर्गास प्रतिबंध करण्याकरता बांध बांधावयाचे जे काम लोकांनी सुरू केले आहे ते त्यांनी थांबविले नाही तर त्यांना हा त्रास सतत होत राहणार. तिने ही हकीकत त्या लोकांना सांगितली. त्यांनी बांध बांधावयाचे बंद केले व आवाज पण बंद झाले ते कायमचेच.

एकदा काही शेजारी तिच्याकडे काही जिन्नस परत करावयास आले असता ती गुडघे टेकून प्रार्थना करताना आढळली. परंतु त्यावेळी ती हवेत तीन फूट उंचीवर तरंगत होती असे त्यांना दिसून आले.

—११—

५ मे १८२१ रोजी सम्राट नेपोलियन मरणासन्न होता. त्याच्या थोडे दिवस अगोदर त्याने त्याच्याकरता नेमलेल्या डॉ. Arrol यांना बोलावून सतत स्वतःजवळ ठेवलेले एक पुस्तक दिले. त्या पुस्तकाचे नाव Lives De Propgiries by Nocl Ciivavious असे होते. हे पुस्तक नेपोलियन प्रासिद्धीस येण्यापूर्वी २६२ वर्षे छापलेले होते. ते १८०४ मध्ये जेव्हा त्याने स्वतःस सम्राट म्हणून राज्याभिषेक करवून घेतला त्यावेळी त्याने त्याची राणी जोसेफाइन हिला थोड्या उपहासानेच दाखविले होते व त्यानंतर ते सतत त्याच्या जवळच होते. परंतु त्याला त्यावेळी कल्पना नव्हती की त्याचे अदृष्ट काय खेळ खेळत होते. त्यातील त्याच्या संबंधी सर्व भविष्ये खरी व्हावयाची होती. त्यास प्रामुख्याने नेपोलियनविषयी खालील गोष्टी होत्या :

इटली एक महान मानव पाहील व तो समुद्रवेष्टित अशा प्रदेशात (Corsica बेट) जन्मास येईल. तो Caltro Gauls (France) ची भाषा व चालीरीती शिकेल व अनुसरील. तरुणपणी त्यास अनेक अडथळे व संकटे भोगावी लागतील. तरी पण त्याचा आयुष्यक्रम उत्कृष्ट ठरून तो एक मोठा सैन्याधिकारी (Commander) होईल. नंतर त्यास खूपच श्रम करावे लागतील व संकटास तोंड द्यावे लागेल. त्यास नेहमी लढाया करीत राहावे लागेल. तो जर्मन लोकांना फायदा देईल व फ्रान्समधील बंडाळी मोडून शांतता व सुबत्ता स्थापन करील. त्यानंतर स्वतःस चक्रवर्ती राजाधिराज असे म्हणवून घेईल. त्याच्या कारकीर्दीत तो फार मोठमोठ्या गोष्टी करील. मोटमोठे राजवाडे, नद्यांस धरणे, कालवे, तलाव वगैरे लोककल्याणाची कामे करील.

लढाया करताना तो अक्षांश रेखांश ५५ डिग्रीवर ज्या ठिकाणी छेदतात त्या ठिकाणापर्यंत जाईल (रशिया—मॉस्को) तेथे शत्रू एका शहरास आग लावून देतील. हा त्या शहरात शिरेल व परत येईल. त्याच्या सैन्यास अन्नपाण्यावाचून राहावे लागेल व त्यातील बहुसंख्य थंडीने काकडून मरतील.

(रशियात १८१२ साली याप्रमाणे घडले.)

शेवटी या थोर पुरुषास त्याचे मित्र व सहकारी सोडून जातील व त्यास पराभव खाऊन राजधानीत परत यावे लागेल. यानंतर त्यास त्याचे जन्मभूमीजवळील एका बेटावर (Elba) ठेवण्यात येईल. तेथे तो अकरा महिने राहील व मग आपल्या राजधानीस परत येईल.

त्यानंतर लवकरच त्यास तीन राष्ट्रांच्या सैन्यास तोंड द्यावे लागेल. त्यात त्याचा पराभव होऊन पूर्वीच्या राजास राज्य देऊन टाकावे लागेल.

ही सर्व हकीकत, तो जगास नेपोलियन म्हणून प्रसिद्ध होण्यापूर्वी २६२ वर्षे लिहिली गेली होती. यावरून कर्तृत्व व दैव याबद्दल विचार करण्यासारखे काहीतरी निश्चित आहे.

—१२—

मार्गन रॉबर्टसन नावाच्या इसमाने सन १८९८ साली एक कादंबरी प्रसिद्ध केली. तिचे नाव होते Wreck of Titan. त्यात त्याने टिटन नावाचे एक अत्यंत मजबूत व कसलेही सामुद्रीय तुफान वगैरेस दाद न देणारे व कधीही अपघात होऊ न शकणारे अशा खात्रीचे जहाज घेऊन आपल्या पहिल्या सफरीवर निघाले असता त्यास पहिल्याच प्रवासात कसा अपघात झाला व त्यात प्राणहानीं वगैरे किती झाली याचे वर्णन केले होते. त्या वर्णनात त्याने लिहिले होते की फाजील आत्मविश्वासामुळे त्यांनी पुरेशा लाईफ बोटी सुद्धा घेतल्या नव्हत्या. ती बोट पहिल्याच सफरीत एका हिमपर्वतावर आपटून फुटली व त्यात अमित प्राणहानी झाली. असे वर्णन त्याने १८९८ साली लिहिलेल्या कादंबरीत केले होते. त्या कादंबरीत हा अपघात एप्रिल महिन्यात झाला असे वर्णन केले होते. पुढे नक्की चौदा वर्षांनी म्हणजे सन १९१२ साली Titanic नावाची बोट अगदी याच पद्धतीने अपघात होऊन बुडाली हे आपणास माहीत आहे. कादंबरीतिल व चौदा वर्षांनंतर घडलेल्या अपघातातील पुष्कळशा घटनात अगदी तंतोतंत साम्य पाहून आश्चर्य वाटते.

कादंबरीतील बोटीत ३००० माणसे तर या बोटीत २७००; त्या बोटीचे नाव Titan असे होते तर ही बोट Titanic नावाची होती. फाजील आत्मविश्वासामुळे कादंबरीतील मंडळीनी २३ लाइफ बोटी घेतल्या होत्या व Titanic मध्ये २० च होत्या. दोहोंमधील अपघात एप्रिल महिन्यातच झाला. दोहोत १५०० माणसे दगावली. दोहोत अपघात बर्फाच्या पर्वतावर आपटुन झाला. कादंबरीतील जहाजाचे वजन ७५००० टन होते. तर Titanic चे ६६००० टन होते. त्यातील जहाजाची लांबी ८०० फूट होती. तर Titanic ची ८८२ फूट होती. दोहोसही तीन तीन प्रॉपेलर्स होते.

१८९८ साली लिहिलेल्या कादंबरीतील घटना इतक्या तंतोतंत रीतीने १९१२ साली घडलेल्या अपघातात जमून याव्यात हा काही निव्वळ योगायोग वाटत नाही. कादंबरीकारात Premonition निदान या अपघाताबद्दल असावी असे वाटते

कॅनन मिडलटन नावाच्या इसमाने टिटॅनिक बोटीचे तिकीट २३-३-१९१२ रोजी काढले होते व ती सफर १०-४-१२ ला निघणार होती. त्याला स्वप्न पडले की बोट तरंगत असून तिच्या आजूबाजूस शेकडो माणसे समुद्रात जीव वाचवण्याकरता धडपडत आहेत. हेच स्वप्न त्याला दुसऱ्या दिवशी पडले. त्यांयोगे तो फार अस्वस्थ झाला व त्याने आपले तिकीट रद्द करवून घेतले. त्यानंतर बोट निघण्यापूर्वीच त्याने

ही हकीगत घरच्या मंडळीस व मित्रास सांगितली व त्यास स्वप्नात दिसल्याप्रमाणे ती बोट ता. १०-४-१९१२ रोजी बुडाली.

ता. १०-४-१९१२ च्या पुष्कळ दिवस अगोदर जॅक मार्शल व त्याची पत्नी ही आपल्या घराच्या गच्चीवर उभे राहून सायंशोभा पाहात होती. एकाएकी सौ. मार्शल आपल्या पतींस बिलगल्यां व ओरडू लागल्या की, Tiranic ही बोट अमेरिकेला पोचू शकणार नाही. त्याच्या आतच बुडणार आहे. तिच्या पतीने तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला व सांगितले की ती बोट अशी आहे की ती बुडणेच शक्य नाही. तू शांत हो. त्यानंतर ती ओरडून म्हणाली की. मूर्खांनो पाहता काय, मी शेकडो माणसे पाण्यात बुडताना पाहात आहे, काही तरी करा व त्यांना वाचवा. तुम्ही त्यांना मरू देणार काय ? त्यानंतर तिने काही गडबड करू नये म्हणून टिटॅनिकबद्दल पाच दिवस घरात काही गोष्टच काढली नाही. तरी पण हा सर्व काळ ती बाई संत्रस्त दिसत होती. शेवटी ती बोट अपघात होऊन बुडाल्याचे समजल्यावर तिच्या म्हणण्याचा प्रत्यय सर्वांना आला.

या व अशाच प्रकारची या बोटीच्या अपघातासंबंधी भविष्यसूचक अशी दहा उदाहरणे योग्य पुराव्यानिशी रेकॉर्डवर आहेत. यापैकी सहांना सुमारे सहा महिने किंवा त्यापूर्वीच सूचना मिळाली होती व चारांना दहा किंवा त्यापेक्षा थोडे दिवसापासून सूचना मिळाल्या होत्या. या उदाहरणावरून अमेरिकेत त्यावेळेपासूनच या विषयास चालना मिळाली व जागृती दिसू लागली.

—१३—

Croites (क्रोइट्स्) नावाच्या इसमास एक विशेष सिद्धी आहे. तो एखाद्या हॉल अगर थिएटरमध्ये एखाद्या विवक्षित खुर्चीवर एखाद्या विवक्षित दिवशी व विवक्षित वेळी कोण बसेल त्याचे अचूक वर्णन व त्याच्या आयुष्यातील घडलेल्या घटना तो अचूक सांगू शकतो. तो ज्यावेळी हे वर्णन करतो त्यावेळी त्या हॉल अगर थिएटरमधील प्रोग्रॅमसुद्धा ठरलेला नसे मग कोण कोठे बसणार हे ठरण्याचे लांबच राहिले. त्याची दोन उदाहरणे वाचकांकरिता खाली देत आहे.

१. जून १९५३ मध्ये त्यास सांगण्यात आले की तेथून तीस मैलांवर असलेल्या एका शहरात तीन हायस्कूले आहेत. त्यातील एकात सायंकाळी एक समारंभ आहे. त्यावेळी नं. ७३ चे खुर्चीवर बसणार असलेल्या व्यक्तींचे वर्णन कर. ता. ३|६|५३ रोजी दुपारी २ वाजता श्री. क्रोइट्स् व दोन मानसतज्ज्ञ एक टेपरेकॉर्डर घेऊन बसले व त्यास वर्णन करावयास सांगितले.

त्या दिवशी सायंकाळी होणाऱ्या समारंभात खुर्ची नं. ७३ मध्ये बसणाऱ्या इसमाचे वर्णन त्याने खालीलप्रमाणे केले :

त्या खुर्चीत मला सुमारे २० वर्षे वयाची स्त्री दिसत आहे. तिने अंगोरा वूलचा वेस्ट घातलेला असून, ब्लाऊजचा रंग पांढरा आहे. तिच्याबरोबर एक मनुष्य दिसत असून तो सिनेॲक्टर असावा. तो चर्चिलसारखा दिसत असून त्याने 'प्रायव्हेट सेक्रेटरी' या फिल्म मध्ये काम केलेले आहे. ती एका लाल रंगाच्या इमारतीत राहात असून तिच्यासमोर साधारण पडिक स्थितीत असलेली व पुष्कळ खांब असलेली एक इमारत आहे. तिच्या उजव्या पायास जखम झालेली दिसत आहे. तिच्याजवळ एक निळ्या रंगाची सिगारेट केस आहे व तिच्याकडे ती वारंवार पाहात आहे.

हे ठिकाण त्यांनी टेपरेकॉर्डिंग केले तेथून सुमारे तीस मैलांवर असून तिघांपैकी एकानेही ते यापूर्वी पाहिलेले सुद्धा नव्हते. समारंभ सुरू झाल्यावर सुमारे एक तासाने ते तेथे जाऊन पोहोचले. त्यावेळी त्या समारंभास आलेल्या व्यक्तींस यासंबंधी काहीही माहिती नव्हती. या समारंभास सुमारे २५० इसम हजर असलेले आढळून आले. नंबर वेळेवर घालण्यात आले. खुर्च्या, बाके वगैरेची मांडणी वेळेवर करण्यात आली होती. त्यावेळी त्यांना असे आढळून आले की अगदी याच वर्णनाची स्त्री तेथे होती; परंतु ती दोन खुर्च्या पलीकडे होती. कदाचित नवीन मांडामांडीमुळे नंबरात फरक झाला असावा. तपास करता असे आढळून आले की त्या स्त्रीचे वय ३२ वर्षांचे होते. तिने निघताना गरम कपडा असावा म्हणून अंगोरा वूलचा वेस्ट घ्यावा असा विचार केला होता. तिच्या पायाच्या अंगठ्यास काही दिवसांपूर्वी जखम झाली होती. बरोबर असलेल्या माणसाचे वर्णन बरोबर असलेल्या माणसाचे वर्णन बरोबर होते व त्याने हिला ती हिरवी सिगारेट केस दिलेली होती.

२. या प्रयोगात थोडी गडबड झाली म्हणून त्यांनी ज्याबद्दल कसलीही शंका राहणार नाही अशा रीतीने दुसरा एक प्रयोग करण्याचे ठरविले. ता. ६ जानेवारी १९५७ रोजी क्रोइट्स यास सांगण्यात आले की येथून १६ मैलांवर असलेल्या हेग या ठिकाणी स्त्रीच्या येथे ता. १।२।१९५७ रोजी काही समारंभ रात्री ८–३० ला आहे. तेथील हॉलमधील प्लॅन मि. क्रोइट्स यांना दाखविण्यात आला व त्यास सांगितले की या हॉलमध्ये ता. १।२।१९५७ रोजी म्हणजे सुमारे २१ दिवसांनंतर होणाऱ्या समारंभास हजर राहणाऱ्या व्यक्तींपैकी ९ क्रमांकाच्या खुर्चीवर जी व्यक्ती बसेल, तिचे वर्णन कर. असे सांगून ता. ६–१–१९५७ रोजी दुपारी २–३० ला ते त्याच्या समोर टेपरेकॉर्डर घेऊन बसले. क्रोइट्स यांनी खालीलप्रमाणे वर्णन केले—

मला नं. ९ चे खुर्चीत एक मध्यम वयीन स्त्री बसलेली दिसत आहे. तिला मुलांची फार आवड आहे. तिने १९२० ते ३० सर्कसमध्ये काम केलेले असावे. ती लहान असताना एक मोठी आग लागून तीत बरेच प्राणी मरण पावलेले तिने पाहिलेले आहेत. ती हिंदुस्थानातील महाराजा अगर तत्सम अशा एखाद्या माणसाच्या तसबिरीकडे पाहात असते. त्याच्या डोक्यावर पगडी असून त्यात एक रत्न आहे. तिने लहानपणी सिंहाच्या पिंजऱ्यात एक रुमाल टाकला व तो त्याने फाडून टाकला. तिला अलीकडे एक

मजबूत व उंच अशी स्त्री भेटली. तिने हिच्याशी सेक्सबद्दल बरीच चर्चा केली व सल्ला पण दिला. तिने त्या स्त्रीस एखाद्या मानसतज्ञाकडे जावयास सांगितले.

Falls start या ऑपेराबद्दल तिला फार आकर्षण आहे. तिच्या वडिलांस त्याने केलेल्या काही बहुमोल कामगिरीतील एक सुवर्णपदक मिळालेले आहे, तिने एका लहान मुलीस दंतवैद्याकडे नेले होते व त्याबद्दल बरीच चर्चा झाली असावी. मात्र ही शेवटची घटना ता. १–२–१९५७ ची म्हणजे त्या दिवसानंतर २१ दिवसांची आहे.

याप्रमाणे Croites याने त्या ९ नंबरच्या खुर्चीतील व्यक्तीसंबंधी सुमारे १२ हकीकती सांगितल्या व त्या सर्व त्याच वेळी टेप केल्या गेल्या. त्यानंतर त्यांनी दुसरे दिवशी ही टेप केल्याची हकीकत एका प्रोफेसरास सांगितली मात्र आतील मजकुराबद्दल काहीही वाच्यता केली नाही. यानंतर त्यांनी कसलीही वाच्यता न करता, त्या स्त्रीस तिचे येथे १–२–५७ रोजी होणाऱ्या समारंभाची आमंत्रणे पाठविण्यास सांगितले. पुढे ता. ३१–१–५७ रोजी ते दोघे मानसतज्ञ त्या ठिकाणी जाऊन त्यांनी समारंभाची जागा पाहिली. त्यापूर्वी त्यांनी टेप केलेल्या हकीकतीच्या चाळीस कॉपीज काढून ठेवल्या होत्या. दुसऱ्या दिवशी म्हणजे ता. १–२–५७ रोजी सायंकाळी मंडळी जमू लागली. तसे त्यांनी खालील हॉलमध्ये एकत्र बसण्यास सांगितले. नंतर वेळ होण्याच्या सुमारास एकेकास सभागृहात सोडण्यात आले व प्रत्येकास न पहाता हातात येईल तो एकेक नंबर देण्यात आला. त्यांच्या नंबराखेरीज इतर कोणत्याही खुर्चीस न शिवता आपापल्या जागांवर जाऊन बसण्यास सांगितले. त्यांना काय प्रयोग सुरू आहे त्याची कल्पना देण्यात आली. प्रत्येकाजवळ टेप केलेल्या मजकुराचा एकेक कॉपी देण्यात आली व त्यातील मजकूर ज्या व्यक्तीस जितका लागू पडेल, त्यावर उजव्या बाजूस रिकामी जागा आहे तेथे, खूण करण्यास सांगितले. त्यावर खुर्ची क्र. ९ वरील स्त्रीने सांगितले की मला यातील बहुतेक वर्णन लागू पडत आहे, व बाकी २९ जणांनी सांगितले की त्याना यापैकी काहीच लागू पडत नाही. यासंबंधी जास्त विस्तारपूर्वक लिहिणे या ठिकाणी अप्रस्तुत होईल. परंतु त्या स्त्रीने सांगितले की १२ पैकी ९ तर ठीक जमतात व तीनमध्ये थोडा फरक आहे विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिने त्याच दिवशी सकाळीच तिच्या मुलीस दंतवैद्याकडे नेले होते. तिला फार त्रास झाला व असे न्यावे लागेल याची कल्पना तिला सुद्धा आदल्या दिवसापर्यंत नव्हती.

—१४—

जीन डिक्सन ही अमेरिकेतील एक प्रसिद्ध भविष्यवेत्ती आहे. आजपर्यंत तिची पुष्कळशी भविष्ये प्रत्ययास आली आहेत व येत आहेत. त्यात प्रेसिडेंट रूझवेल्ट यांचा मृत्यू, प्रे. केनेडी यांचा खून वगैरेंचा समावेश आहे. त्यातल्या त्यास प्रेसिडेंट

केनेडी यांच्याबद्दल तीन वर्षांपूर्वीच तिने एका प्रसिद्ध वर्तमानपत्रातून प्रसिद्ध केले होते व ज्या दिवशी ते डल्लेसला जावयास निघाले—जेथे त्यांचा खून झाला—त्यादिवशी त्यांनी तेथे जाऊ नये म्हणून त्यांना निरोप देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु नियती अशी की तिचा निरोप त्यांच्यापर्यंत जाऊन पोचूच शकला नाही. तिने हिंदुस्थानसंबंधी काही भविष्ये केली होती. त्यांचा थोडक्यात परामर्श येऊ.

एकदा १९४६ साली श्री. गिरिजाशंकर वाजपेयी हे हिंदुस्थान सरकारतर्फे अमेरिकेत एजंट जनरल म्हणून असताना एका समारंभाच्या वेळी श्रीमती वाजपेयी यांनी हिंदुस्थानबद्दल तिला विचारले. तिने त्या पतिपत्नींना तिच्या ऑफिसमध्ये दुसऱ्या दिवशी बोलाविले. तिचे भविष्य पाहण्याचे माध्यम कुंडली वगैरे नसून क्रिस्टल बॉल (यासंबंधी वर्णन पुढे येणार आहे.) मध्ये पाहून ती सांगत असते त्याप्रमाणे त्यात पाहून सांगितले की पुढील दोन वर्षांत हिंदुस्थानची दोन शकले होणार आहेत व लवकरच त्यासंबंधी घोषणा होईल हे ऐकताच वाजपेयी म्हणाले की नाही-नाही; हे केवळ अशक्य आहे. त्यावर ती पुन्हा म्हणाली, केवळ शक्य आहे, एवढेच नव्हे तर त्यासंबंधीची घोषणा ता. २०।२।१९४७ रोजी होणार आहे. तुम्ही दुसऱ्या बाजूस सामील व्हाल व तेथे तुमचा उत्तरोत्तर उत्कर्ष होईल. त्यावर ते म्हणाले, हे केवळ अशक्य आहे. ता. २०।२।१९४७ रोजी वर्तमानपत्रात यासंबंधी काही आले नाही, त्यावरून श्री. वाजपेयी यांनी फोन करून सांगितले की तुमचे भविष्य खोटे ठरले आहे. त्यावर ती म्हणाली की, अजून ता. २० संपलेली नाही. जरा वाट पाहा. दुसऱ्या दिवशी ठळक हेडिंगमध्ये ती घोषणा प्रसिद्ध झाली. अर्थात त्याबद्दलचा निर्णय आदल्या दिवशी घेतला गेला होता. त्यानंतर श्री. वाजपेयी हिंदुस्थानात परत गेले व फाळणीनंतर पाकिस्तानात जाऊन तेथे उत्तरोत्तर त्यांचा उत्कर्ष होत गेला. या घटनेबद्दल सर्वांस अत्यंत आश्चर्य वाटले; कारण की ता. १८।२।१९४७ ला पार्लमेंट अशा फाळणीस मान्यता देणार नाही, असे ठरले होते. असे असताना तिला १९४६ मध्ये नक्की तारीख कशी सांगता आली व ती बरोबर कशी आली ?

एकदा मेजर इस्माइलनी तिला विचारले की, काश्मीरसंबंधी काय होणार आहे ? त्यावर तिने सांगितले की, त्यात फार भानगडी उत्पन्न होऊन त्यावरून लढाईसुद्धा होईल व तो प्रश्न अनेक वर्षे तसाच चिघळत पडेल.

एकदा लायकअली यांनी विचारले की हैदराबादचे काय होईल ? त्यावर तिने सांगितले की, ते हिंदुस्थानकडे जाईल. मात्र त्यापूर्वी तुम्ही त्याचे पहिले व शेवटचे पंतप्रधान व्हाल त्यावर लायकअली म्हणाले की, हे शक्य नाही. हैदराबादला पंतप्रधानपदच नाही. त्यावर ती म्हणाली की, तुम्ही पंतप्रधान व्हाल इतकेच नाही, परंतु त्यानंतर तुम्हास काही काळ कैदेत राहावे लागेल. परंतु तुमची लौकरच सुटका होईल. लायकअलीनी स्वतः क्रिस्टलमध्ये पाहून असे कबूल केले की, मी पण हीच घटना पाहिली व तिला तुमच्याकडून दुजोरा मिळाला आहे.

—१५—

एकदा १९४७ च्या जून-जुलैमध्ये डॅनियस नावाचे एक गृहस्थ जीन डिक्सनकडे आले. त्यांनी पूर्वेकडील दौरा काढण्याचा विचार केला होता, त्यासंबंधी विचाराचयास सुरुवात केली. त्यासंबंधात नवी दिल्ली असे नाव आले, त्याबरोबर ती एकदम म्हणाली की, आजपासून सहा महिन्यांच्या आत महात्मा गांधींचा खून होणार आहे. हा महात्मा, ज्याची केवळ ख्राइस्टशीच तुलना करता येईल—याचा खून होईल व तो देखील ज्याच्याबद्दल कधीही संशय येणार नाही, अशा एखाद्या व्यक्तीकडून. ता. ३०।१।४८ ला त्यांची श्री. गोडसे यांच्याकडून हत्या झाली, हे प्रसिद्धच आहे.

इंग्लंड-अमेरिकेत अशी कमीत कमी दहा हजार उदाहरणे आहे की ज्यांच्या सत्यतेबद्दल तिळमात्रही संशय घेता येणार नाही. अशी उदाहरणे गोळा करून ठेवण्यात आली आहेत.

Jean Dixon, Pendragon, Edgar Kayce वगैरे अनेक इसमांनी याबाबतीत संशोधन केलेले असून, त्यावर दशकांनी पुस्तके लिहिलेली आहेत. Nosterdomus ने तर काही शतकांपूर्वी पुष्कळ जागतिक भविष्ये वर्तवून ठेवलेली आहेत व त्यातील पुष्कळशी बरोबर आलेली असून, काही अजूनही येत आहेत. त्यांच्याकडे संशोधन चालू आहे व दिवसेदिवस ज्ञानात नवनवीन भर पडत आहे. आपल्याकडे मात्र सर्व अंधार. माझे म्हणणे असे नाही की, त्यांनी वर्तविलेली सर्वच भविष्ये बरोबर असतात. मात्र भूकंप, ज्वालामुखी, तुफान, राष्ट्राराष्ट्रातील क्रांत्या, यासंबंधीची भविष्ये पुष्कळ वेळा अनुभवास येत नाहीत. त्यातल्या त्यात, त्यांनी दिलेला काळ तर बराच वेळा चुकतो आणि त्याचे कारण म्हणजे त्यांना ही सर्व भविष्ये प्रत्यक्ष दिसतात, असे नव्हे. पुष्कळ वेळा त्यांना दिसणारे दृश्य Symbolic असते. त्यामुळे त्यांना त्याबद्दल केवळ अनुमानच करावे लागते. त्याचप्रमाणे मी पूर्वी सांगितलेच आहे की भविष्यकालीन घटना या गोफाप्रमाणे पुष्कळ गोष्टी एकत्र येऊन घडत असतात ती त्याची क्रिया होत असताना त्यात काही कारणाने थोडा फार बदलही होणे शक्य असते. एखादा आजार प्रार्थनेने बरा होऊ शकतो. म्हणजे होऊ घातलेल्या वा ठरलेल्या गोष्टी सुद्धा, काही विशेष प्रक्रियेने बऱ्याचशा बदलू शकतात व तीसुद्धा नियतीचीच एक क्रिया असते. शिवाय सर्वच भविष्ये बरोबर येऊ लागली याचा अर्थ सर्वच जर अगोदरच नियतीने ठरवलेले असते, तर माणसाने करावयाचे तरी काय ? ते काहीही असले तरी निदान भविष्यांत घडून येणाऱ्या काही गोष्टी, अगोदर ठरलेल्या असतात, हे निश्चित, हे आपण मागील उदाहरणांवरून पाहिले आहे. त्याचे ज्ञान काही लोकांस होऊ शकते. यावरून ते इतरांसही होऊ शकेल, निदान शंभरांत एकास तरी निश्चित होऊ शकेल. परंतु त्यासाठी प्रयत्न कोणी व कसा करावयाचा, याचा आपण कधीच विचार केलेला नाही व करत पण नाही. आतापर्यंत ज्या काही

व्यक्तींनी भविष्यकालीन घटना अचूक सांगितल्या आहेत. त्यांच्या बाबतीत त्यांना ती एक तर मुळातच अगदी लहानपणापासून सिद्धी होती किंवा काही आकस्मिक कारणांनी त्यांना ती मिळाली होती. असे आढळून येते की, त्यांनी ती काही स्वप्रयत्नाने मिळविली नव्हती मी हा लेख लिहिला त्याचा उद्देश एकच आहे की, वाचकांनी तो नुसता करमणूक म्हणून वाचून टाकू नये; तर जर काही व्यक्तींना अशी सिद्धी असू शकते व जर निदान काही घटना नक्की ठरलेल्या असतात; तर प्रयत्न करून त्यांचे ज्ञान आपणांस करवून का घेता येऊ नये ? याचे उत्तर मात्र पाश्चात्य संस्कृतीत मिळणार नाही.

आमच्याकडे पुष्कळ संत, साधू, महात्मे होऊन गेले, आजही आहेत. त्यांनी अशा सिद्धी स्वप्रयत्नाने मिळविल्या आहेत. श्री समर्थ रामदासस्वामी, अक्कलकोटचे महाराज, श्री नरसिंह सरस्वती, माणिकप्रभू, माधवनाथ महाराज, गोंदवलेकर महाराज मिटकर, आंबेकर, वगैरे बरेच संत महात्मे होऊन गेले आहेत व अजून आहेत की, ज्यांनी हीच काय, परंतु अशा अनेक सिद्धी स्वप्रयत्नांनी मिळवून जनतेस त्याचा अनुभव व फायदा मिळवून दिला परंतु आपल्याकडे बुवाबाजीचे प्रस्थ फार असल्याने अशा प्रश्नांकडे शास्त्रीय दृष्टिकोनांतून न पाहता आपण कोणत्याही कारणाने का असेना, कोणाच्याही नादी लागतो. त्यांचे प्रस्थ व महिमा कसा वाढविता येईल. या दृष्टीने आपापल्या सद्गुरूंनी केलेले वा न केलेले चमत्कार रसाळ वाणीने व अगदी अधिकारवाणीने जणू काही त्यांनी ते सर्व स्वतः पाहिले अशा थाटात शिष्य सांगतात. काही पोटभरू प्रकाशक, मासिके, दैनिके त्यांना प्रसिद्धी देऊन अशा कार्यास मदत करतात. आपल्या येथील दीपलक्ष्मी या मासिकाने जणू काही अशा तथाकथित महात्म्यांच्यावर खास अंक काढून, त्यांना उजेडात आणण्याचा विडाच उचलला आहे. याने होते काय की तो खरोखरीच जरी महात्मा असला तरी अशा अतिशयोक्तिपूर्ण प्रसिद्धीमुळे, त्यांच्याबद्दल लोकांच्या मनात आदरभाव असला तरी तो नाहीसा होऊन, ते ढोंगी, लबाड व ठग या सदरात जाऊन पडतात. या सर्वास कारण तथाकथित शिष्यगण. अतिशयोक्तिपूर्ण व खोट्या चमत्कारवर्णनाने व ते त्यांच्या गुरूची सेवा करीत नसून उलट त्याची निंदानालस्तीच करीत असतात. यामुळे त्यातील काही चमत्कार जरी खरे असले तरी कोणते खरे व कोणते खोटे हे कळणे शक्य नसल्यामुळे ते सर्वच खोटे आहेत असे मानण्याकडे प्रवृत्ती होते व त्यात काही चूकही नसते. महाराज म्हटला की, त्याच्या सोबत काही चमत्कार आलेच. मग ते जास्तीत जास्त विशेष अविश्वसनीय असे कोण सांगतो, याची अहमहमिका सुरू होते, व ते सर्वच खोटे व ढोंगी या सदरात जमा होतात. ह्याचे एक अगदी ठळक उदाहरण देण्यासारखे आहे. श्री समर्थ रामदास स्वामी हे एक अद्वितीय आणि सामर्थ्यसंपन्न सत्पुरुष होऊन गेले ही गोष्ट वादातीत आहे. त्यांचे ग्रंथ म्हणजे आमच्या राष्ट्राचा एक अमोलिक ठेवा आहे. हे खरे असले तरी श्री शिवाजी

महाराजांना ते समकालीन होते. याचा फायदा घेऊन स्वराज्यप्राप्तीसाठी जे काही केले ते स्वामिनीच केले व शिवाजी महाराज केवळ निमित्त म्हणून त्यांना पुढे केले असे सिद्ध करण्याचा काही उपटसुंभांनी प्रयत्न केला. मग त्यास कारणे काही असोत. (त्या वादात मला पडावयाचे नाही.) त्याचा परिणाम असा झाला की, सत्यशोधक समाज उदयास आला व त्यांनी स्वामींची अत्यंत गलिच्छ अशी निंदानालस्ती केली. खरे म्हणजे स्वामींचे कार्य निराळे तर श्रीशिवाजी महाराजांचे अगदीच निराळे. कार्यक्षेत्रेच निराळी असल्याने तुलनेस काही वावच नसतांना तसा प्रयत्न न करता शिवाजी महाराजांना कमी लेखण्याचा प्रयत्न झाला म्हणून त्यांना निंदानालस्ती मेल्यावर का होईना सहन करावी लागली. हा सर्व दोष त्यांचा नसून त्यांच्या शिष्यांचा होय. या रीतीने आपल्याकडे साधुसंतांनी केलेल्या चमत्कारांची शास्त्रीय दृष्टीने छाननी होण्याऐवजी त्यात अशास्त्रीय अशीच भर पडत गेली त्यामुळे त्यांतील खरेखोटे निवडून त्यातील एखादेसुद्धा उदाहरण अगदीच सत्य म्हणून वाचकांच्या पुढे मांडणे दुरापास्त झाले आहे आपल्याकडे सुद्धा अशा सिद्धी असणारी मंडळी पुष्कळ आहेत. त्यात साधुसंत तर पुष्कळ होते व आहेत परंतु अजून आपल्या मंडळीची शास्त्रीय दृष्टीकोन ठेवून अशा घटना संग्रहित करण्याची प्रवृत्तीच नाही. त्यामुळे त्यातून काही उदाहरणे देणे कदाचित वाजवी ठरणार नाही. एक लहानसे आपणाकडील उदाहरण देतो.

पुण्यास बऱ्याच वर्षांपूर्वी माळीबाबा म्हणून एक संत होते. त्यांच्या शिष्यपरिवारात नामदार खापर्डे, रावसाहेब पटवर्धन C. V. अशी मंडळी होती. एकदा रावसाहेबांची बदली एडन येथे झाली. त्यांच्या मनातून जावयाचे नव्हते. ते श्री माळी बाबांकडे गेले व त्यांनी आपली व्यथा निवेदन केली. त्यावर ते म्हणाले की, काही काळजी करू नकोस; तुला जावे लागणार नाही. या गोष्टीस बराच काळ लोटला व त्यांची एडन येथे हजर होण्याची तारीख जवळ आली. तशी जाण्याची सर्व तयारी करून श्री बाबांचा निरोप घेण्यासाठी म्हणून ते त्यांच्या दर्शनास गेले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, अजून काही हुकूम आला नाही, तेव्हा मला जाणे भाग आहे व मी जात आहे. यावर माळीबाबा म्हणाले की, अगोदर घरी जा मग पुढचे पाहू ते घरी जाऊन पाहतात तो त्यांची बदली रद्द केल्याची तार येऊन पडली होती.

त्यानंतर काही दिवसांनी त्यांना पुन्हा एडन येथेच रुजू होण्याचा हुकूम आला. माळीबाबांनी सांगितले की, आता मात्र जावे लागेल. गेल्यावर अमुक वर्णनाचे घर राहावयास मिळेल, वगैरे तपशील सांगितला व त्याचप्रमाणे झाले.

या श्री माळीबाबांचे शिष्य मिस्त्री म्हणून होते. त्यांच्यासंबंधीसुद्धा बऱ्याच गोष्टी सांगण्यात येतात व त्यांचे शिष्य श्री आंबेकर हे तर परवापर्यंत होते; त्यांनी पण बरेच चमत्कार केल्याचे नमूद आहे. परंतु त्या कशाचेही शास्त्रीय पद्धतीने संकलन झालेले नसल्याने, त्यासंबंधी लिहिणे म्हणजे दिशाभूल करण्यासारखे होईल.

वाचकांनी या सर्व लेखांवर काळजीपूर्वक विचार करावा व अशा घटना सर्वसाधारण कोणाही व्यक्तीस समजून याव्यात, यासाठी त्याने काय व कसे केले असता; तसे कळणे शक्य होईल, याबाबत परिश्रम, मनन व चिंतन करून त्याचा परिणाम जनताजनार्दनाच्या सेवेस रुजू करावा. असे कोणी केले तर मी हा लेख लिहिल्याचे सार्थक झाले असे समजेन.

हा सर्व अज्ञाताचाच शोध आहे. त्याचा परिणाम कदाचित बरोबर असेल; कदाचित चुकीचा असेल. तो कसाही असला तरी, इतरांस निदान मार्गदर्शक म्हणून तरी त्याचा निश्चित उपयोग होईल.

पुढील एका प्रकरणात हे साध्य करून घेण्यासाठी कोणत्या दृष्टीने व काय परिश्रम केले पाहिजेत. याचे विवेचन मी करणार आहे. परंतु ते बरोबर असेल असे गृहीत न धरता केवळ मार्गदर्शनासाठी थोडे उपयुक्त होईल, इतकीच त्याची किंमत मानावी

आतापर्यंत आपण पाहिले की निदान काही भविष्यकालीन घटना ठरलेल्या असतात. त्या विवक्षित वेळी व विवक्षित स्थळी घडणार असतात. मग त्या व्यक्ती, राष्ट्र, पृथ्वी या कसल्याही संबंधात असोत अशा घटनांपैकी काही, विवक्षित व्यक्तीस, ज्यास त्यासंबंधी जन्मतःच सिद्धी असते, अथवा काही आकस्मिक कारणाने (अपघाताने) मिळते अथवा जे प्रयत्न करून मिळवितात, अशांना कळू शकते. (या तिसऱ्या प्रकाराबाबत एका निराळ्या प्रकरणात विचार करू.) यापूर्वी एका गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे. ती म्हणजे भविष्यकालीन घटनांपैकी निदान काही ठरलेल्या घटना काही व्यक्तींस आधी कळू शकतात. असे आहे तर त्या आपणास का कळू नयेत ? निदान आपणा स्वतःस तसे कळणे शक्य नसेल तर आपल्या समजुतीप्रमाणे ज्यास थोडेफार कळू शकते त्याकडे आपण साहजिकच लक्ष देतो. प्रत्येक व्यक्तीस माझे उद्या किंवा नजीकच्या भविष्यात काय होणार आहे. ते जाणून घेण्याची उत्कंठा असते व ती तृप्त करता यावी म्हणून पुष्कळ तथाकथित शास्त्रे अस्तित्वात आली आहेत. त्यांची माहिती करून घेऊन जिज्ञासू व गरजू व्यक्तींना भुरळ घालून त्यांच्याकडून पैसे उकळण्याचा काहीजण धंदा करत असतात. तर काही खरोखरीच त्या तथाकथित शास्त्रांचा अभ्यास करून त्यात गती मिळवून, त्यांना जे काही कळेल ते सांगतात. भविष्यकालीन घटना कळून घेण्यासाठी जी काही अनेक तथाकथित शास्त्रे जन्मास आली आहेत, त्यातील प्रमुख शास्त्रांचा परामर्श घेतला नाही तर, हा लेख अपूर्ण राहील–यासाठी त्यातील काही प्रमुख शास्त्रांचा परामर्ष घेऊ या.

या सर्वांत म्हणजे ग्रहविज्ञान किंवा कुंडलीविज्ञान (Astrology), त्यात सायननिरयन, दशापद्धती, वर्षकुंडल्या वगैरे आले. या सर्वांबद्दल मी माझ्या अमृत–तुषार या ग्रंथात व या लेखाच्या पूर्वार्धात पुष्कळ ऊहापोह केलेला असल्याने आता येथे पुनरुक्ती करून जास्त पाने अडवीत नाही. नंतर नंबर लागतो हस्तमुद्रिकाचा

हे एक असेच वेड आहे. विशेष म्हणजे ही दोन्ही अगदी बिनबुडाची, कसलाही युक्तिवादाचा (Reasoning) आधार नसलेली तथाकथित शास्त्रे आहेत. Palmitstry किंवा हस्तसामुद्रिक हे सुद्धा काही अंशाने नवग्रहावर व प्रामुख्याने हाताच्या तळव्यावर असलेल्या रेषांवर अवलंबून असते. हाताच्या बोटाखालील उंचवट्यास व बोटांस ग्रहांची नावे दिलेली असतात. हातावरील काही प्रमुख रेषा व इतर रेखांनी बनलेले काही कल्पित आकार जसे मत्स्य, धनुष्य, मंदिर, पताका वगैरे—यावरून भविष्य वर्तविण्यात येते. पौर्वात्य व पाश्चिमात्य पद्धतीत रेषांची नावे व गुणधर्मसुद्धा भिन्न असतात. एकाची आयुष्य रेषा एक तर दुसऱ्याची दुसरीच. असे असले तरी दोहोंचा दावा असा की त्या प्रत्येकाने त्यावरून सांगितलेले भविष्य तंतोतंत बरोबर असते. प्रत्यक्षात पाहता हातावरील काही प्रमुख रेषा सोडल्या तर इतर सर्व सारख्या बदलत असतात कोणती रेषा केव्हा बदलून कशी होईल याचा काहीच अंदाज नसल्याने त्यावरून, म्हणजे त्यावेळी अस्तित्वात नसलेल्या रेषांवरून भविष्य सांगणे कसे जमते ते तेच जाणोत. याशिवाय आपण पाहतोच की माकडाच्या हातावरसुद्धा अगदी हुबेहूब आपणासारख्याच रेषा असतात व त्यांच्या जन्मकाळावरून त्यांच्यासुद्धा जन्मकुंडल्या असू शकतात. मग ही शास्त्रे त्यांनाही लागू आहेत, असे म्हणावयाचे आहे काय ? एखाद्या माकडाच्या हाताचा ठसा घेतला तर तोही हुबेहूब माणसाच्या हाताप्रमाणेच असेल.

या दोनही तथाकथित शास्त्रांतील प्रत्यक्ष अनुभवाविषयी जर आकडेवारी गोळी केली तर त्यात शेकडा शून्याच्यावर खरे अनुभव असल्याची सरासरी मिळणार नाही. मी सुद्धा ज्या ज्या कोणास यातील त्यांच्या अनुभवासंबंधी विचारले ते सर्वच्या सर्व भविष्ये चुकली असे सांगतात. परंतु यापूर्वी पन्नास ज्योतिष्यांकडे गेले असले तर एकावन्नावा आला आहे असे कळले तर त्याच्याकडे धाव घेतलीच म्हणून समजा ! मला वाटते भविष्य जाणण्याचे कुतूहल मानवास मानवजातीचा जन्म होऊन त्यास समजू लागल्यापासूनचेच असले पाहिजे. त्यामुळे काही अनुभवास येत नाही याची जाणीव असूनसुद्धा जगातील सर्व देशांत व सर्व भाषांत या विषयावर लहानमोठे ग्रंथ आहेत. त्याचा अभ्यास करणारी आणि भविष्य सांगणारी मंडळी आहेत. जग सारखे त्याच्या मधे धावत आहे. शंभरातून एखादे खरे आले तर त्याला योगायोग म्हणता येईल. तो काही नियम नव्हे. मी तर म्हणतो की शंभरापैकी शंभर जरी बरोबर आली, व त्यास जर तात्त्विक अधिष्ठान नसले तर ते शास्त्र या संज्ञेस पात्र होऊ शकत नाही. पण मग निदान असे तरी म्हणता येईल की, शास्त्र नसेल तर नसेना का, आम्हांस अनुभव तर येतो आहे ! परंतु तेही नाही. त्यास आणखी एक कारण आहे. मोठमोठे राजकारणधुरंधर—नेपोलियन, हिटलर, चर्चिलसारखे लोक या शास्त्राच्या नादी लागलेले दिसतात. त्यामुळे सामान्य लोकांची जास्त दिशाभूल होते. परंतु त्यांना ही जाणीव नसते की राजकारणी-पुरुष झाले तरी, ती माणसेच असतात; त्यांच्यातही मानवी

प्रवृत्ती वास करत असतात. उलट त्यांचे दैनेदिन जीवन अत्यंत क्लिष्ट व गुंतागुंतीचे असल्यामुळे त्यांची भविष्य जाणून घेण्याची उत्कंठा लोकांपेक्षा तीव्र असते व त्यांनी या विषयाच्या तत्त्वासंबंधी कधी विचार तर केलेला नसतोच व तसे करण्यास त्यांत वेळही नसतो. म्हणून इतर सामान्य-जनांवर त्यांचा विपरीत परिणाम होतो. राष्ट्रपतींनी किंवा प्रधानमंत्र्यांनी एखाद्या ज्योतिष्यास सहज म्हणून जरी काही विचारले की लगेच त्याचा भाव वाढतो. वास्तविक यामुळे त्यास महत्त्व यावयाचे काही कारण नसते. यासंबंधी एक योग्य धोक्याचा इषारा द्यावासा वाटतो की, काही व्यक्तीस Black magic किंवा काळ्या विद्यांच्या साह्याने अथवा Mind-Reading ने पुष्कळ वेळा मागील गोष्टी अगदी तंतोतंत सांगता येतात. परंतु त्यांचा भविष्यकालीन घटनांशी सुतराम संबंध नसतो. कारण त्या घटना घडून गेलेल्या असतात व या घडावयाच्या असतात. त्यामुळे होते काय की, कोणी मागील गोष्टी साधारण जरी बरोबर सांगितल्या तरी मनुष्य चकित होऊन त्याच्या नादी लागतो व पैसा व वेळ फुकट घालवून बसतो. त्यापेक्षा त्यास विचारले की त्याने यापूर्वी भविष्य कोणाकोणास सांगितले आहे, त्यातील काही व्यक्ती जर खात्रीलायक वाटल्या तर त्यांना विचारावे. ते नक्कीच सांगतील की मागील बऱ्याच घटना पटल्या. परंतु भविष्य म्हणून जे काही सांगितले ते सर्व चुकले. असे असले तरी काही व्यक्तींना भविष्यकालीन घटना कळू शकतात, हे आपण पाहिलेच आहे. परंतु त्यांची गोष्टच निराळी. त्यांचा या तथाकथित शास्त्राशी कधीच संबंध आलेला नसतो. त्याबद्दल जास्त विवेचन पुढे येईल.

याचप्रमाणे भविष्य पाहावयाचे आणखी काही प्रकार आहेत. त्यात चहाचे पत्तीवरून भविष्य पाहणे. [Tea leaf Reading] फासे–डॉमियो पत्ते वगैरे प्रामुख्याने येतात. त्यातील टी लीफ रीडिंग म्हणजे ज्याचे भविष्य पाहावयाचे असेल, त्याने जरा मोठा व सपाट बुंध्याचा असा कप घ्यावयाचा व त्यात चहाचे किटलीतून न गाळता चहा कपात ओतावयाचा. म्हणजे काही चहाची पाने व भुकटी आपोआपच कपात ओतली जाईल. त्यानंतर त्याने चहा प्यावयाचा व पिताना थोडा उरू द्यावयाचा. त्यानंतर तो कप हातात धरून गोल अशी गती देऊन तीन वेळा फिरवावयाचा. म्हणजे चहाची सर्व पत्ती व भुकटी नुसती तळाशी न राहता सर्व बाजूंस विखुरली जाते असे झाल्यावर तो कप टेबलावर ठेवून त्याच्या योगाने कोणत्या आकृत्या तयार झाल्या आहेत हे पाहावयाचे. त्यापैकी अगदी कडेला ज्या असतील त्यावरून अगदी दोन चार दिवसांत काय होणार हे कळून घ्यावयाचे असते. त्याच्या थोड्या पलीकडील भागातील आकृतीवरून साधारण पुढील भविष्यकालीन घटना व तळाशी असलेल्या आकृतीवरून साधारणतः त्याच्या पुढील दूरच्या भविष्यकालीन घटना समजावून घ्यावयाच्या असतात. खरोखर प्रत्यक्ष आकृत्या अशा काही होत नाहीत. परंतु जे काही दिसेल त्यावरून अनुमानाने आकृत्या तयार झालेल्या आहेत असे समजावयाचे असते. अगदी स्पष्ट अशी आकृती तयार झाली तर ती मोठी भाग्याची गोष्ट समजली

जाते. हातावर रेषा पाहताना ज्याप्रमाणे मत्स्य–मंदिर–पताका वगैरेंची कल्पना केली जाते त्याप्रमाणे यातही आकृती पशु-पक्षी, झाड, तलाव, गाडी अथवा कसलीही असू शकते व त्या प्रत्येकींवरून निरनिराळे भविष्य दर्शविले जाते असे मानण्यात येते. आकृत्यांऐवजी किंवा मोघम आकडे दिसल्यावरून घटनांची वेळ दर्शविली जाते. अक्षरे दिसली तर मित्र–नातेवाईक वगैरेसंबंधी घटना दर्शविल्या जातात टिंबे प्रवास दर्शवितात तर मोठी टिंबे पैसा दर्शवितात. केवळ करमणूक म्हणून एक वेळ हे ठीक आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात याचा काही उपयोग नाही. कारण एक तर आकृती अमुक आहे अशी निव्वळ कल्पना करावयाची असते. मला त्यात हत्ती दिसेल, तर दुसऱ्यास तोच बोका दिसेल. शिवाय प्रत्येक वेळी निरनिराळ्या आकृत्या येणार व त्यांचे फलादेशही निरनिराळे असणार ! या आकृतींचा फलादेश अमुक हे तरी कोण व कशाच्या आधारावर सांगणार ? प्रत्येक आकृतीबद्दल निरनिराळ्या पुस्तकांतून वा देशांतून निरनिराळे फलादेश आढळतात मग त्यात खरे कोणते मानावयाचे आणि मुख्य म्हणजे अमुक आकृतीचा अमुक फलादेश हे कोणी व कशाच्या आधारावर ठरविले ? ज्याला शास्त्रीय बैठक नाही, किंवा जे युक्तिवादास संमत नाही (Reasoning) ते मग कितीही बरोबर असले तरी त्यास किंमत नाही. कारण आज बरोबर येईल तर उद्या चुकेल. त्याचप्रमाणे जुगारातील फासे किंवा आपण त्यास रमल असे संबोधतो, त्यावरही बरेच वाङ्मय उपलब्ध आहे त्यातही पुष्कळांनी आपापल्या मताप्रमाणे परस्परविरुद्ध विधाने केलेली आढळतात. एक वेळ फासे टाकून अमुक एक टिंबे आली तर दुसऱ्या वेळी निराळीच येतील व त्यांचा भविष्यकालीन घटनांशी संबंध काय याचा उलगडा कोणीच करत नाही. त्यामुळे हे सुद्धा अविश्वसनीय व अनुभवास न पटणारे आहे.

आणखी एक मोठे खूळ म्हणजे संख्या-शास्त्र. ती एक चांगली करमणूक आहे. परंतु अनुभवाच्या दृष्टीने उपयोग शून्य. त्यात अनेक गमती जमती असतात. प्रथम-प्रथम जन्मसंख्या दहाच्या आत काढावयाची असते. म्हणजे समजा, एखाद्याचा जन्म ५-१२ १९४२ साली झाला तर त्याची जन्मसंख्या (Birth Number) ५ + १ + २ + १ + ९ + ४ + २ = २४ = २ + ४ = ६ ही संख्या नेहमी जमेस धरावयाची असते. मग येतो नावाचा नंबर. त्याचे नाव John F Kenedy असे असे आहे तर John F Kenedy=४४=४+=८ यात जन्मसंख्या मिळवावयाची म्हणजे झाली ८+६=१४=१+४=५ मग पहावयाचा; तुमचे ज्या तारखेस काम असेल तिचा सन महिन्यासुद्धा नंबर. अशा रीतीने नंतर दहाच्या आतील संख्या मिळाली म्हणजे तो दिवस कसा जाईल; काम होईल की कसे ते त्याखालील टेबलमध्ये पाहावयाचे याच्या पुष्कळ निरनिराळ्या पद्धती आहेत. त्यातील फक्त एकच मी साधारण दिली आहे. यात एक तर कोणतीही पद्धत दुसरीशी जुळत नाही आणि शिवाय माझी जन्मसंख्या तारखेने जी येईल तीच काही तिथि-शास्त्राने येणार नाही.

जी इंग्लिशवरून येईल तीच फ्रेंच, जर्मन, मराठी, उर्दू यावरून येणार नाही व त्यामुळे कशाचाच कशाला ताळमेळ बसत नाही व विशेष म्हणजे यातील कोणत्याही पद्धतीने समाधानकारक आणि अनुभवास येईल असे उत्तर मिळत नाही.

त्याचप्रमाणे खेळातील पत्ते-कवड्या, निरनिराळी संख्याविषयक चक्रे—अंगावरील तीळ यांवरून भविष्य सांगण्याच्या पद्धती आहेत. त्या सर्वांबद्दल सविस्तर लिहीन म्हटले तर त्यावरच दोन-चार ग्रंथ होतील. त्याचा प्रत्यक्ष व्यवहारात अथवा अनुभवांच्या दृष्टीने काहीच फायदा नाही, म्हणून जास्त देत नाही. थोडा जरी उपयोग असता तर निदान तात्पुरती व नित्योपयोगापुरती माहिती दिली असती. त्याचप्रमाणे आमच्याकडेच प्रचलित असलेले असेच एक तथाकथित शास्त्र म्हणजे स्वरोदय-शास्त्र ! यावर तर संस्कृतात पुष्कळ ग्रंथ आढळतात. त्यांसही प्रत्यक्ष व्यवहारात महत्त्व देणाऱ्या काही व्यक्ती मी पाहिल्या आहेत. यात दिवसाचे प्रहरांनी भाग करून कोणत्या वारी, कोणत्या प्रहरी, कोणत्या नाकपुडीतून श्वास चालतो ते पाहावयाचे असते. साधारण कोणत्या वारी, सूर्योदयी नाकपुडीतून श्वास वाहणे शुभ व अशुभ ते सांगितलेले असते. त्यावरून तो दिवस चांगला किंवा वाईट जाणार ते ठरविले जाते. त्याच प्रत्येक वारास, कोणत्या प्रहरी, कोणता स्वर शुभ अथवा अशुभ तेही ठरविले जाते. अशुभ स्वर असेल तर त्या दिवशी कोणतेही महत्त्वाचे काम करू नये. त्याचप्रमाणे कोणत्याही महत्त्वाच्या कामास जावयाचे म्हणजे शुभ-स्वर पाहून मगच घराच्या बाहेर पडावयाचे. तसेच जसा स्वर असेल, त्या मानाने ठरलेल्या दिशेकडे जावयाचे व सूर चालू असेल तेच पाऊल प्रथम पुढे टाकावयाचे. इतकेच नाही तर, निजून उठताना जो सूर चालू असेल तोच पाय प्रथम बिछान्याच्या बाहेर टाकावयाचा. असा पुष्कळच तपशील असून त्यावर अनेक भिन्न-भिन्न प्रणालीचे ग्रंथ पाहावयास मिळतात. त्यातल्या त्यात ‘ शिवस्वरोदय ’ हा ग्रंथ प्रमाण मानण्यात येतो. परंतु खरे सांगावयाचे म्हणजे कशाचाही कधीही अनुभव येत नाही. कारण एक तर यापैकी कशासही शास्त्रीय बैठक नाही. अथवा युक्तिवादा (Reasoning) चा आधार नाही. मी म्हणतो निदान ६० टक्के खरोखरी अनुभवास येत असते, मग त्यास वरप्रमाणे काही आधार असो वा नसो, त्यासंबंधी विचार करण्यास व अभ्यास करण्यास कसलीही हरकत नाही. परंतु दोन्ही नाहीत, मग त्यात विनाकारण वेळ, पैसा व श्रम घालवून निराशा पदरात घेण्यात काय अर्थ ? यापैकी एकही शास्त्र या संज्ञेत पात्र नाही व अनुभवासही येत नाही, मग नादी लागून पैसा, वेळ उगीच खर्च होऊ नये यासाठी इतके लिहावे लागले. यावरून वाचकांनी योग्य तो बोध घ्यावा. याशिवाय भविष्यकालीन घटना समजावून घेण्याच्या दृष्टीने खालील शास्त्रांचा उपयोग करून घेण्यात घेतो, परंतु त्यात भविष्याखेरीज अन्य गोष्टींचाही संबंध येतो. म्हणून त्याचा स्वतंत्र प्रकरणातच विचार करू या.

* * *

७. प्लँचेट (Planchette)

मृतात्मा किंवा एखादे Spirit यांना आवाहन करून त्यांच्याकडून भूत-भविष्य-वर्तमान यांची माहिती करून घेण्याचे काही प्रकार आहेत. त्यात वरील प्रकाराचा समावेश आहे. अगदी सुरुवातीस माध्यम किंवा आपण ज्यास साधारणपणे अंगात येणे हा प्रकार म्हणतो, त्याच्या मार्फत असलेल्या स्पिरिट्स्कडून माहिती मिळविण्याचा प्रयोग सुरू झाला. त्यात सुधारणा होत-होत ते आता एक स्वतंत्र शास्त्र झाले असून, इंग्लंड व अमेरिकेत यासंबंधीचे प्रयोग गावोगाव, खेडोपाडी चालू आहेत. त्याच्याबद्दल नंतर विवेचन करू. माध्यम सर्व व्यक्तींना होता येत नाही. काही विवक्षित व्यक्तींनाच त्यासंबंधी सिद्धी असते व त्याच व्यक्ती माध्यम म्हणून कार्य करू शकतात. प्लँचेटचे तसे नाही. त्याच्या मार्फत कोणाही दोन व्यक्तींस स्पिरिटशी संपर्क साधता येतो. पुष्कळ वेळा तर एक व्यक्तीसुद्धा ते कार्य करू शकते. प्लँचेटची कल्पना सुचण्यापूर्वी अगदी सुरुवातीस एक लहान-मोठी तिपायी घेऊन, थोडा अंधार करून तिच्यावर दोन्ही हात ठेवून दोन वा अधिक व्यक्ती बसत. थोडा वेळ गेला म्हणजे ती तिपायी आपोआप हलू लागे. याचा अर्थ स्पिरिट संचार झाला असे मानण्यात येई. मग त्यास अनेक प्रश्न विचारण्यात येत; ते बहुतेक होय नाही या स्वरूपात असत व त्यास सांगण्यात येई की, उत्तर होय असेल तर एक ठोका द्यावा किंवा नाही असे उत्तर असेल तर दोन ठोके द्यावेत. त्यावर ती तिपायी आपला एक पाय उचलून त्याप्रमाणे ठोके देई किंवा अजूनही कोणी हा प्रयोग करून पाहिला तर याप्रमाणे उत्तर येऊ शकेल. मात्र यास थोडा धीर हवा. अगदी बसल्याबरोबर त्याच बैठकीत याप्रमाणे उत्तर मिळेल असे गृहीत धरू नये. एक दोन बैठकी झाल्या म्हणजे निश्चित उत्तर येऊ लागते. पण हा प्रकार कंटाळवाणा व वेळघेऊ असतो. होय किंवा नाही याखेरीज अन्य उत्तर हवे असेल तर त्याला अक्षराइतके ठोके मारावयास सांगावे लागते. जसे A ला एक तर B ला दोन ठोके — याप्रमाणे. परंतु या पद्धतीने वेळ फार लागून मनाप्रमाणे उत्तर मिळू शकत नाही. पुष्कळ वेळा त्यावर हात टेवणाऱ्या व्यक्तींना किंवा प्रेक्षकांना कोणीतरी हालवीत असावे असे वाटते, कारण अशी निर्जीव तिपायी आपोआप हालेल, यावर त्यांचा विश्वास नसतो. परंतु तसे नसते. तिपायी हालते व ठोके देते हे निश्चित. मग तुम्हास मिळालेले उत्तर बरोबर असो वा चूक.

ही पद्धती अत्यंत कंटाळवाणी असून त्यात कोण आहे किंवा आपणांस विवक्षित व्यक्तीकडून माहिती हवी तर तशी मिळत आहे की कसे ते कळावयास मार्ग नव्हता.

त्यानंतर एक नवीन पद्धती शोधून काढण्यात आली. एका मोठ्या लाकडी तक्त्यावर A पासून Z पर्यंत अक्षरे व १ ते १० आकडे रंगाने काढावयाचे व

त्याच्या बाजूस दोन व्यक्ती बसून त्यावर एक साधारण सहज फिरू शकेल, असा एखादा पदार्थ ठेवावयाचा. मग तो आगपेटीचे खोके असो, लहान गुळगुळीत लाकडाचा चौकोन असो वा एका बाजूस टोक असलेला तुकडा असो. त्यावर दोन व्यक्तींनी हात टेकून प्रश्न विचारावयाचे. थोड्या वेळाने तो तुकडा हलू लागतो व त्या अक्षरांवरून व आकड्यांवरून फिरून आपल्या प्रश्नांची उत्तरे देतो. समजा, त्यास विचारले की, तुझे नाव काय व ते नाव नारायण असे असले तर तुकडा प्रथम N जवळ थांबेल मग A जवळ मग R जवळ नंतर पुन्हा A जवळ अशा रीतीने NARAYAN नाव पुरे करून मग थांबेल. या पद्धतीने सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील. पुढे पुढे सवयीने त्या बोर्डावर एक व्यक्ती बसून, प्रयोग केला तरी उत्तरे मिळू लागतील. या पद्धतीने तुकडा आपोआप हालतो व उत्तरे येतात. ही गोष्ट १०० टक्के खरी असते. मात्र ती आलेली उत्तरे खरी व बरोबर असतीलच याची शाश्वती नसते.

परंतु ही पद्धती बरीच त्रासदायक व कंटाळवाणी वाटू लागली, म्हणून एक नवीन उपकरण शोधून काढण्यात आले; त्याचे नाव प्लँचेट. हा एक त्रिकोणी किंवा बदामी आकाराचा ७–८ इंच लांब व ४–५ इंच रुंद असा पॉलिश केलेला लाकडाचा तुकडा असून, त्याच्या पुढील बाजूस साधारणपणे शिसपेन्सिल आत जाऊन घट्ट बसेल अशा आकाराचे छिद्र असते व मागच्या बाजूस रिव्हिट करून बॉल बेअरिंगवर दोन हस्तीदंती अथवा शिंपल्यांची लहान चाके बसविलेली असतात. ती अशा रीतीने की त्याची हालचाल कोणत्याही दिशेने होऊ शकेल. त्या चाकात समांतर अशी, त्यापुढील छिद्रातून पेन्सिल अडकवून. त्यासुद्धा त्यास एका कोऱ्या कागदावर ठेवून, त्यावर कोणीही दोन व्यक्तींनी हात ठेवून बसावयाचे. पहिल्याच दिवशी ते हालू लागेलच असे नाही. सुमारे पंधरा मिनिटे बसावे व मग सोडून द्यावे मग दुसऱ्या दिवशी पुन्हा बसावे. होता होईतो वेळ रात्रीची शांत असावी– त्या जागी फार माणसांची गर्दी नसावी व शक्यतोवर न चुकता ठराविक वेळी प्रयोग करण्यास बसावे. २–३ दिवसांतच ते आपोआप हालू लागेल. प्रथम–प्रथम असे वाटते, परंतु तसे नसते. सुरुवातीस ते नुसत्या सरळ किंवा गोलगोल रेघोट्या ओढील व कंटाळवाणे वाटेल. परंतु एक आठवड्याच्या आत ते अक्षरे लिहू लागेल.

अक्षरे लिहू लागल्यानंतर त्यास विचारावे की, तुम्ही कोण आहात व तुम्हांस काय हवे आहे ? त्यावर त्याचे नाव लिहून येईल व क्वचित पत्ता पण येईल मात्र तो बरोबर असेल वा नसेल. मात्र यात एक गोष्ट निश्चित खरी असते की, आपल्या हातांमार्फत लिहिणारी व्यक्ती ही एखाद्या मृत व्यक्तीचे स्पिरिट असते व ते आपले माध्यम करून लिहित असते. आपले अंतर्मन व मेंदू यांच्या मार्फत त्यास कागदावर लिहिण्याचे कार्य करावे लागते. ही पद्धतीसुद्धा पुष्कळ अशी करमणूक म्हणून ठीक असते. परंतु अनुभव देण्याच्या दृष्टीने तिचा उपयोग फार थोडा असतो. मात्र नसतोच असे नाही. असा अनुभव आहे की, बऱ्याच वेळा त्यात लिहून आलेली माहिती तंतोतंत

खरी असते. मृत व्यक्तींनी ठेवलेल्या परंतु इतरांस अज्ञात असलेल्या वस्तू-मृत्युपत्रे-काही वेळेला गुन्ह्यांचा तपास वगैरे सुद्धा अनुभव आलेले आहेत. घरातील माहिती सर्व बरोबर देते; परंतु भविष्यकालीन घटना कळण्याच्या दृष्टीने याचा उपयोग शून्य. या पद्धतीत काही गोष्टी ध्यानात ठेवल्या तर निराशेचे प्रसंग येत नाहीत.

(१) अगदी प्रथम लक्षात ठेवावयाचे की, स्पिरिट म्हणजे एखादी व्यक्ती मृत झाल्यावर, त्याचे त्यापुढील स्पिरिट शरीरातील अस्तित्व. या अवस्थेत नवीन असे काही शिकत नाही. तर जिवंत असताना त्यास जे काही येत असेल व त्यातल्या त्यात मरणकाळी ज्या गोष्टी प्रामुख्याने त्याच्या नजरे-समोर अगर सान्निध्यात-अध्ययनात असतील तेवढेच त्याचे ज्ञान. त्यापेक्षा त्याच्याकडून जास्त अपेक्षा करणे ही आपली चूक. आपली एक मुख्य समज असते की, स्पिरिट म्हटले म्हणजे ते सर्वज्ञ असते व त्यास भूत, भविष्य, वर्तमान सर्व काही कळत असते. त्यास जिवंत असताना जे काही कळत होते त्यापेक्षा रेसभरही अधिक कळत नसते व म्हणून त्याच्याकडून भविष्यासंबंधी काही अचूक माहिती कळण्याची अपेक्षा करणे म्हणजे आपलीच चूक समजावी. त्यास तसे काही कळत नसते; मात्र विचारणा केली की आपण सर्वज्ञ आहोत असे समजून स्पिरिट काही जबाब देतात; परंतु ते हमखास चुकीचे असतात.

(२) प्लँचेटवर माहिती देण्यास येणाऱ्या स्पीरिटस्ना अंतर्मन व मेंदूमार्फत काम करावयाचे असते व म्हणून आपण अंतर्मनाच्या प्रेरणेनुसार हालचाल करीत असतो. तरी पण आपण प्रत्यक्ष हालचाल करीत असतो याची आपणास जाणीव होत नाही. परंतु त्यात एक गोष्ट अंतर्भूत असते व ती म्हणजे ही की, आपल्या अंतर्मनात व मेंदूत अगोदरच काही विचार भरलेले असतात. त्यातल्या त्यात जे काही आपण विचारतो यासंबंधी काही विचार आपल्या मनात असतात. त्यांचा प्रादुर्भाव त्या स्पिरिटच्या क्रियेवर पडतो व पुष्कळ वेळा आपल्या मनातील विचारच प्रामुख्याने कागदावर लिहिले जातात. याकरिता ज्यासंबंधी आपणास काही माहिती नाही; परंतु तपास केल्यावर मिळू शकेल, असे काही विचारावे. मात्र ते भविष्यकालीन घटनांविषयी नसावे; कारण आपणास जिवंत असताना जर भविष्वकालीन घटना कशा जाणून घ्याव्यात हे कळत नसले तर मेल्यावर कोठून कळणार ? ती निव्वळ भोगयोनी आहे. नवीन शिकण्याचा किंवा शिकवण्याचा तेथे वर्ग नाही.

(३) हजारो लाखो माणसे मरण पावलेली आहेत. त्यांची स्पिरिटस् वातावरणात सतत वावरत असतात. त्यापैकी आमच्या वाट्यास येणारे स्पिरिट कोण असेल याची आपणास कल्पना नसते. त्यामुळे ते जे नाव सांगेल ते खरे आहे असे मानण्यावाचून आपणास गत्यंतर नसते. आपण आपल्या नातेवाइकास भेटीकरिता बोलाविले पण त्यावेळी तो जवळपास नसेल तर जो कोणी असेल तो आपणास प्रवेश करून मी तोच आहे असा सांगतो व त्यास तू तो नाहीस असे सांगणे आपणांस कसे शक्य व्हावे ?

मेलेल्या लोकातही आपणांस सर्व काही कळते असे समजणारे पुष्कळ असतात व ते या परिस्थितीचा फायदा घेतात. कोण पाहिजे ? टिळक काय ? होय ! मी बळवतराव टिळक. थोडे थांबा, मी सुपारी खाऊन येतो असे सांगणारा भेटतो व तो कोणीही असू शकतो. तो टिळकांच्या नावावर वाटेल त्या थापा मारतो व आपणांस त्या खऱ्या वाटतात. सध्या जसे आपणांत सत्तर टक्के अक्षरशत्रू व अज्ञानी आहेत तसेच ते मेल्यावरही राहतात. परंतु प्लँचेटवर ते आले की, त्यांना भाव येतो व सर्वज्ञाप्रमाणे ते सर्व काही सांगू लागतात व त्यात पुन्हा आपल्या पूर्वग्रहांची भर पडते. त्यामुळे हाती काहीच येत नाही. क्वचित असे होते, कोणी खरे ज्ञानी सुशिक्षित, परोपकारी स्पिरिट फिरता–फिरता येते व ते मात्र पुष्कळ गोष्टींवर चांगला प्रकाश टाकते; परंतु असे फार क्वचित होते. सर्वसाधारणपणे अशी माणसे फारच थोडी असतात व त्यापैकी कोणी ठरल्यावेळी आपल्या वाट्यास यावे हाही योगायोगच. परंतु सतत प्रयोग करीत राहिले तर अशी एखादी व्यक्ती आपल्या वाट्यास येते व आपले समाधान होते. आपल्या अवती–भोवती नेहमी स्पिरिटम् असतातच. त्यामुळे आपण प्रयोगाला बसू त्यावेळी जवळपास कोणी असेल तेच आपल्या वाट्यास येईल. मात्र आपण हट्टच धरला की आम्हांस अमुकच पाहिजे व ते जवळपास नसले तर ते मीच तो म्हणून सांगावयास कमी करीत नाही.

हे व अशाप्रकारचे बरेचसे धोके या माध्यमात नेहमी असतात. ते गृहीत धरून प्रयोग करीत गेले तर कधी-कधी चांगले व खरे अनुभव पण अवश्य येतात. मात्र भविष्याविषयी अनुभव कधीही येत नाहीत हे ध्यानात ठेवावे; पण सर्वसाधारणपणे ज्ञानाकरिता नाही तर भविष्य जाणण्याच्या इराद्यानेच सर्वसाधारण मंडळी याच्या नादी लागतात व बरेच दिवस प्रयोग करून थकतात; मग त्यात काही अर्थ नाही म्हणून सोडून देतात. प्रस्तुत लेखकाच्या प्रयोगात त्यास पुष्कळ आश्चर्यकारक अनुभव आले आहेत, हे येथे नमूद करून ठेवावेसे वाटते. मात्र त्यापैकी एकही भविष्यकालीन घटनांबद्दल नव्हता हेही येथे स्पष्टपणे नमूद करून ठेवतो. भविष्याबाबत माझी अगदी शंभर टक्के निराशा झाली. आणि म्हणून भविष्याकरता प्लँचेटचे प्रयोग कोणी करू नयेत असे माझे स्पष्ट मत आहे. या प्रयोगात त्याचा पैसा, वेळ व श्रम वाया जाऊन शंभर टक्के निराशा पदरी पडेल हे निश्चित. एक ज्ञानसाधना व संशोधन या दृष्टीने हे प्रयोग ठीक आहेत. निरनिराळ्या प्रकारच्या व अनेक स्वभावांच्या स्पिरिटम्च्या गाठी पडून, अनुभव, ज्ञान यात पुष्कळ भर पडू शकते, या दृष्टीने प्लँचेट निःसंशय उपयुक्त आहे. प्लँचेट कसे असते याचे चित्र परिशिष्टात पहावे. कोणीही सुतार ते करून देईल.

* * *

८. मध्यस्थ (Medium)

या ठिकाणी मध्यस्थ याचा अर्थ, मनुष्य व स्पिरिट (जीवात्मा) यातील दुवा असा घ्यावयाचा. जिवात्मे सर्व ठिकाणी सर्व काळ वावरत असतात. परंतु त्यांना कोणत्याही रीतीने त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देणे असेल अगर स्वतः होऊन काही करणे असेल तर, प्लँचेटच्या बाबतीत ज्याप्रमाणे अंतर्मन व मेंदू यांची गरज असते, त्याचप्रमाणे जीवात्म्यास काही प्रत्यक्ष करणे असेल तर, मानवी शरीराचे साह्य घ्यावे लागते. मानवी शरीरातून त्यांना हवी असलेली शक्ती खेचून घेऊन, तिच्या साहाय्याने ते नंतरच स्वतःला हवे असेल ते करू शकतात; स्वतंत्रपणे ते काही करू शकत नाहीत. आपल्याच शरीरातील शक्ती खेचून घेऊन ते आपणास त्रास देऊ शकतील किंवा आपले नुकसानही करू शकतील. याप्रमाणे घडल्याची अनेक उदाहरणें आहेत.

एखादे ओसाड घर अगर जुनाट वाडा असतो. जुनाट अशा वडा-पिंपळावर किंवा स्मशानात भुतांची वस्ती असल्याची वदंता असते. पुष्कळ अंशी ती खरीही असते. परंतु भुतांच्या नुसत्या अस्तित्वाने काही होऊ शकत नाही. ती काही करू शकत नाहीत. त्या ठिकाणी कोणी गेले म्हणजे त्याच्यातील शक्ती खेचून त्याच्याविरुद्ध अगर अन्य कार्यात ती त्या देहाचा उपयोग करू शकतात. त्यामुळे अशा जुनाट वाड्यात अगर ओसाड वास्तूत स्पिरिटचा (जीवात्म्यांचा) वास असला तरी ते काही करू शकतील असे नाही. परंतु, तेथे तात्पुरते का होईना—कोणी राहावयास आले की, तेथील जीवात्म्यांस काही बरे-वाईट करण्याची शक्ती प्राप्त होते व त्याप्रमाणे कृती घडल्याची उदाहरणे पण आढळतात.

मध्यस्थ इसम यापैकीच एक असला तरी सर्वसामान्य माणसापेक्षा थोडा निराळा असतो. सर्वच माणसे मध्यस्थ म्हणून काम करू शकत नाहीत. जिच्यात स्पिरिटचा संचार होऊ शकेल अशा व्यक्ती थोड्या असतात; त्यांना इतर मानवांपेक्षा थोडी निराळी अशी देणगी असते. इतरांपेक्षा अतींद्रिय ज्ञान ग्रहण करण्याची त्यांची शक्ती अधिक असते. ती आहे की नाही हे त्याला स्वतःला किंवा निकटच्या व्यक्तीला माहीत असते. अशी शक्ती एक तर जन्मतःच असते, अगर काही कारणाने तिचा आकस्मिक प्रादुर्भाव होतो. काही व्यक्ती प्रयत्न करून अशी शक्ती मिळवू शकतात. प्रयत्न करून ती शक्ती कशी मिळविता येते, याचा उल्लेख पुढील एका प्रकरणात येईल. अशी शक्ती ज्यास निदान थोडी फार आहे—मग ती कोणत्या का कारणाने मिळालेली असेना—त्यांनाच मध्यस्थ (Medium) होण्याची पात्रता असते. त्य

मध्यस्थास शक्ती प्रकट करून जीवात्म्यास आवाहन करून त्याच्यांकडून माहिती मिळविणे किंवा काही कामे करवून घेणे शक्य होते.

मध्यस्थामार्फत जीवात्म्यांशी संपर्क साधण्याच्या बऱ्याचशा पद्धती आहेत. त्यांपैकी प्रमुख व सर्वसाधारण प्रचलित अशी पद्धत खालीलप्रमाणे आहे :

साधारपणे या विषयावर विश्वास असणारे किंवा या विषयाविषयी जिज्ञासू असे १० ते २० इसम एकत्र यावेत. या कामाकरिता हॉलसारखी एखादी स्वतंत्र जागा असावी व त्याच्या मध्यभागी १० ते २० माणसांस आरामाने बसता येईल असे एक मोठे टेबल असावे की, ज्याच्या तीनही बाजूंस थोडी जागा सोडून १५ ते २० खुर्च्या आरामात ठेवता येतील. प्रयोगाकरिता काही वेळा निश्चित करण्यात याव्यात. मात्र आठवड्यातून एक वेळ तरी नियमाने बैठक ठेवावी. जो वार किंवा वेळ ठरविण्यात येईल त्या त्या दिवशी नक्की त्याच वेळी प्रयोगास बसण्याची दक्षता घ्यावी. म्हणजे जीवात्म्यास कळते की, येथे यावेळी आपण हजर असलो तर आपणास संपर्क साधता येतो. अशा प्रकारे तयारी झाली म्हणजे कमीत कमी आठ ते दहा व जास्तीजास्त वीस अशा इसमांनी त्यात भाग घ्यावा. काही प्रेक्षक असले तरी बिघडणार नाही. मात्र उगीच जास्त गर्दीही होऊ नये. भाग घेणाऱ्या व्यक्ती सुस्वभावी, शुद्ध आचरणाच्या व प्रयोगावर विश्वास ठेवणाऱ्या अशा असाव्यात त्या हॉलमध्ये कसलाही गोंगाट नसावा. इतकेच नाही तर शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून रेडिओ आदींचा अगर रस्त्यावरील वाहनांच्या आवाजाचा त्रास नसावा. हॉलमध्ये शिरल्यावरोबर धूप-उदबत्ती वगैरेंनी आतील वातावरण प्रसन्न व सुगंधी ठेवावे. फ्लॉवरपॉटस्मध्ये वासाची ताजी फुले आणून ठेवावीत. खोलीत उगीच एखादा बेडलँप तेवत असावा. जवळ जवळ अंधारच असावा. केवळ एकमेकांची तोंडे दिसत राहतील इतकाच उजेड ठेवावा व सर्वांची मने प्रसन्न असतील अशीच वेळ असावी. कोणाच्या मागे भाऊगर्दी, मला काम आहे, लवकर आटोपून गेले पाहिजे अशी लगबग नसावी. त्याचप्रमाणे घरी कोणी अत्यंत आजारी आहे अगर काही मोठे आत्यंतिक संकट आले आहे व त्यात चित्त व्यग्र आहे अशा व्यक्तींनी सुद्धा त्या काळात ह्या प्रयोगात भाग घेऊ नये. टेबलाच्या तीन बाजूंस खुर्च्यांवर साधारण १० ते १५ इसमांनी आपले दोन हात टेबलावर पालथे ठेवून बसावे व एका बाजूस मध्यस्थाने एकट्यानेच त्याप्रमाणे बसावे. युरोप-अमेरिकेत असे मध्यस्थ बहुतांशी स्त्रियाच असतात. परंतु स्त्रियाच असल्या पाहिजेत असा नियम मात्र नाही. लवकर संपर्क साधता यावा म्हणून काही ठिकाणी प्रत्येकजण आपापल्या हातांचे तळवे जवळच्या इसमाच्या हातावर ठेवतात व शेजारील दोन्ही व्यक्तींच्या हातावर मध्यस्थ आपले तळवे ठेवतो. वातावरण गंभीर व शांत असावे आणि प्रत्येकाने आपले मन मध्यस्थावर केंद्रित करावे. एकमेकांचे हातावर हात असले तर आपापली सुप्त शक्ती मध्यस्थापर्यंत पोहोचून जीवात्म्यास आवाहन करण्याचे काम सुलभ होते. बैठक निदान एक तास असावी. कदाचित्

सुरवातीस दोन तीन वेळा यश येणार नाही; पण नंतर निश्चित येईल. बहुतांशी पहिल्याच बैठकीत यश येते; मात्र त्या कामातील मध्यस्थांनी पूर्वी थोडातरी अनुभव घेतलेला असला पाहिजे हा प्रयोग चालू नसेल त्यावेळी ती जगा बंद असावी-तीत नोकरचाकरांचा प्रवेश सुद्धा ती झाडून वगैरे स्वच्छ ठेवण्यापुरताच असावा. तीत इतर कोणाचा प्रवेश नसावा. इतर कसल्याही कामाकरिता त्या जागेचा उपयोग करण्यात येऊ नये. ठराविक दिवशी, ठराविक वेळी बैठकी होत राहतील याची दक्षता घ्यावी. याकरिता यादीवर साधारण २० माणसांची नावे असावीत. म्हणजे वेळेपूर्वी निदान आठदहा हजर राहातील व बैठक निर्विघ्नपणे पार पडू शकेल. मध्यस्थ मात्र एकच असावा व त्याची प्रकृती बरी नसेल किंवा काही कारणाने त्याचे मन प्रसन्न नसेल तर बैठक रद्द करावी. तरी पण हॉल उघडून हजर असलेल्या सर्वांनी तेथे थोडा वेळ बसून मग बैठक रद्द केल्याचा निर्णय घ्यावा. मात्र असे घडोघडी होणार नाही याची दक्षता घ्यावी. कदाचित् पहिल्या दोन तीन बैठकीत काही अनुभव येणार नाही. परंतु पुढे तो अवश्य येऊ लागेल.

बैठक सुरू झाली म्हणजे मध्यस्थात हळूहळू संचार होऊ लागतो. मध्यस्थाच्या अंगात त्या वेळी तेथे हजर असलेल्या स्पिरिटचा संचार होतो. ते स्पिरिट मध्यस्थाच्या शरीराचा व मनाचा ताबा घेऊन त्याच्या मुखाने बोलू लागते. पुष्कळ वेळा ते आपले नाव, मृत्यूची वेळ, गाव वगैरे सर्व माहिती पुरविते. स्पिरिट हे वायुरूप असल्याने त्याचा संचार सर्वत्र होऊ शकतो. त्यास दारे, खिडक्या इत्यादींचा अडथळा येऊ शकत नाही. जगातील कोणत्याही विद्यमान परिस्थितीविषयी माहिती मिळवून ते सांगू शकते. परंतु असे आढळून येते की, हे जीवात्मे अथवा स्पिरिट्स आपल्या ठराविक कक्षेबाहेर जात नाहीत. त्यामुळे ते असतील ते ठिकाण त्याच्या आजूबाजूची थोडी माहिती इतकीच ते सांगत असतात. जीवात्मा स्वभावाने चांगला असेल आणि त्यास आपल्या ओळखीचे स्पिरिट पाठवून देण्यास सांगितले तर ते तसे करू शकतात. सातत्याने ठराविक वेळी प्रयोग करीत राहिल्यास निरनिराळे जीवात्मे येऊन आपआपल्या हकीकती किंवा निरोप सांगू लागतात. एखादा विवक्षित जीवात्मा आपणास हवा असेल व त्यास आवाहन करीत गेले तर तेही येऊ लागतात. काही वेळेला असेही होते की काही दुष्ट स्वभावाचे लबाड जीवात्मे मीच तो आहे असे सांगून फसविण्याचा प्रयत्न करतात. याकरिता ज्या व्यक्तीच्या जीवात्म्यास आपण आवाहन केले असेल त्या व्यक्तीचे काही व्यक्तिगत गुण व माहिती—की जी इतर कोणास फारशी माहीत नाही ती विचारावी, अशा रीतीने आपणास हवा असलेला जीवात्मा बोलावून त्याच्याकडून आपणास हवी असलेली माहिती काढून घेता येते व त्याच्याशी संपर्क ठेवता येतो. अशा रीतीने मरणसमयी कोणास सांगता न आलेली माहिती मिळविता येते. महत्त्वाचे कागदपत्र, मृत्युपत्रे, गुप्तधन वगैरेंचा तपास लागल्याची उदाहरणे आहेत. त्यांना कोठेही परिभ्रमण करता येणे शक्य

असल्याने आपणांस माहीत नसलेल्या इतर ठिकाणांची माहिती ते आणू शकतात. मात्र असे फार क्वचित घडल्याचे आढळून येते. त्याबाबत त्याच्यावर काही बंधने असतात की कसे याची कल्पना नाही. विशेषतः मरणकाळी जी काही त्यांना प्रकर्षाने जाणीव होती ती ते विशेष तपशीलवार सांगू शकतात. पुष्कळ वेळा असे आढळून येते की, मध्यस्थास ज्या भाषेचा गंधही नसतो त्या भाषेत ते संचारावस्थेत असताना अगदी अस्खलित व व्याकरणशुद्ध बोलू शकतात. आमच्या इकडे काही स्त्रियांच्या अंगात येते. त्याही अशाच रीतीने बोलू शकत असल्याचा अनुभव आहे. तरी पण एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी की, ज्याप्रमाणे आपणांस भविष्याबद्दल काही कळत नाही, त्याचप्रमाणे कोणत्याही जीवात्म्यास भविष्याबद्दल काही सिद्धी नसते व त्यांना विचारले की, ज्ञातेपणाचा आव आणून ते बरेचसे आपण सांगू शकत असल्याचा आव आणून, आपणास साधारण बरे वाटेल असे सांगतात व ते हटकून चुकते. त्यायोगे आपली निराशा होते व विश्वास पण कमी होतो. भविष्य जाणण्याच्या दृष्टीने या मंडळींचा काहीही उपयोग नाही व त्याकरिता म्हणून जर कोणी या नादात पडणार असेल तर त्यांनी यात मुळीच पडू नये आणि आपले श्रम व पैसा फुकट घालवू नये. शेकडा ९९ केवळ करमणूक म्हणून किंवा काही अंशी ज्ञान—साधना म्हणून यासंबंधी प्रयोग करावेत अन्यथा नकोत.

जीवात्मा अथवा स्पिरिट हे काय असते ते मी यापूर्वी सांगितलेले आहे. गर्भाशयात गर्भाची वाढ सुरू होताच स्पिरिटची सुद्धा त्याबरोबर व त्यासारखीच वाढ सुरू होते व आपल्या शरीराच्या आकाराच्याच अशा महान चित्‌शक्तीतून एक स्पिरिट शरीर तयार होत असते व ते शरीरास अंतर्बाह्य व्यापून मृत्यूपर्यंत शरीर, मन इत्यादींच्या कार्यास मदत करीत राहते. शरीराचा मृत्यू होताच ते त्यापासून अलग होऊन स्पिरिट शरीर या स्वरूपाने त्याचे अस्तित्व काही काळ राहते हे आपण यापूर्वी पाहिले आहे. मात्र वायुस्वरूप असल्याने ते मानवी दृष्टीस दृगोचर नसते. परंतु निरनिराळ्या प्रकारांनी त्यांचे अस्तित्व भासमान राहते. आपणाभोवती ज्याप्रमाणे हवा अदृश्य स्वरूपात सतत असते त्याचप्रमाणे अनंत जीवात्मे आपणाभोवती नेहमी वावरत असतात; परंतु ते वायुस्वरूप असल्याने आपणांस दिसत नाहीत. तरीपण त्यांना एखादा मध्यस्थ मिळाला की, त्यांच्यापासून हवी ती, हवी तितकी शक्ती खेचून घेऊन ते स्वतःस प्रत्यक्ष मूळ स्वरूपात भासमान करू शकतात. अशा रीतीने ही गोष्ट झाली तरी, त्याची गती पूर्वीप्रमाणेच अप्रतिहत चालू रहाते. अशा रीतीने प्रकट व्हावयास त्यांना नेहमीच मध्यस्थ हवा असतो असे नाही; मध्यस्थ असला तर त्यास सोपे जाते इतकेच. त्यांना जरूर वाटली तर कोणत्याही व्यक्तीतून शक्ती खेचून ते प्रकट होऊ शकतात. त्यांना प्रकट व्हावयास मानवी सान्निध्य आवश्यक असते ही गोष्ट खरी. मध्यस्थांच्या साह्याने अगर त्यांच्या विरहित सुद्धा स्पिरिटस् काय काय करू शकतात ते थोड्या घडलेल्या उदाहरणांवरून आपण पाहू या.

या बाबतीत, साक्षी पुराव्यानिशी ज्यांची नोंद ठेवली गेली आहे अशा, प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींची जंत्री पाचसात पुस्तके सहज भरतील इतकी मोटी आहे परंतु वाचकांच्या करमणुकीपलीकडे त्यांतून काही साधणार नाही. म्हणून काही वेचक उदाहरणे मी खाली देत आहे. याची जनतेस माहिती असली म्हणजे, त्यांना त्यांच्या आयुष्यात असे काही अनुभव आले तरी विशेष वाटणार नाही; व त्यावर इलाज पण त्यांना करता येतील.

—१—

ता. २८।१२।१९५७ रोजी सायंकाळी फ्रँक व मेरियम कूपर नावाचे एक जोडपे आपल्या मोटारीतून बाल्टिमोरमधील एका उपनगराहून निघून आपल्या घरी चालले होते. वेळ सायंकाळी पाचची होती. ढगांमुळे चांगलेच अंधारून आले होते. काही मैल गेल्यानंतर त्यांच्या मोटारीत काही दोष उत्पन्न झाला व तो काढून टाकण्याकरता त्यांना, मोटार रस्त्याच्या बाजूस घ्यावी लागली. पाहता पाहता अंधार पडू लागला व त्यांना काही दिसेनासे झाले. गाडीतून टॉर्च बाहेर काढण्यास त्यांनी पत्नीस सांगितले. परंतु टॉर्च गाडीत सापडला नाही; तो ती आपल्या मैत्रिणीकडे विसरली होती. प्रसंग बिकट होता. रस्त्यावर रहदारी नव्हती. अंधार वाढत होता. बर्फ पडू लागण्याची चिन्हे दिसू लागली होती. अशा वेळी त्यांना भीती वाटू लागली की सर्व रात्र रस्त्यातच थंडी, वारा व बर्फातच काढावी लागणार ! कारण अंधारात दुरुस्तीचे काम करता येणे शक्य नव्हते व सकाळपर्यंत कोठूनही मदत येण्याची शक्यता नव्हती. अशा विमनस्क स्थितीत असताना दुरून कोणीतरी कंदील घेऊन येत असल्याचे त्यांना दिसू लागले. हळूहळू उजेड जवळ येऊ लागला. एक म्हातारा हातात कंदील घेऊन येत होता. थोडा वेळ उजेड दाखविण्याची विनंती कूपरने केली. त्याने कंदील धरून ठेवला. त्या उजेडात मिस्टर फ्रँक कूपर याने आपली गाडी दुरुस्त करून चालू करण्याच्या उद्देशाने गाडीत बसू लागले फ्रँकला साहजिकच वाटले की, अगदी ऐनवेळी मदत केली, म्हणून त्या म्हाताऱ्याचे आभार मानावेत; इतक्यात त्याची पत्नी आश्चर्याने ओरडली की, तो म्हातारा पाहता पाहता कंदिलासह गुप्त झाला होता. कंदील धरून तो उभा असताना सुद्धा त्यांनी त्यांस पुष्कळ प्रश्न विचारले पण तो एक अक्षरही बोलला नव्हता. या सर्व घटनेचे त्यांना अत्यंत वाईट वाटले. येथून काही मैलांवर असलेल्या पेट्रोल पंपावर ते गेले, तेव्हा तेथे त्यांनी ही हकीकत सांगितली. त्यांवर तेथील लोक म्हणाले की, काही वर्षांपूर्वी त्याच जागेच्या आसपास एक म्हातारा ॲक्सिडेंटने मारला गेला. त्या वेळेपासूनच ज्या ज्या वेळी कोणास गरज भासते त्या त्या वेळी तो कंदील घेऊन त्यांना मदत करतो आणि मदत संपताच नाहीसा होतो. त्यांपैकीच आजचा हा एक प्रकार होता.

—२—

ता. १४।२।१९६४ रोजीं टेरसा हार्डी या नावाची एक अठरा वर्षांची मुलगी चिंतायुक्त मुद्रेने बसली होती. तिला कोर्टाकडून घर खाली करून देण्याचा हुकूम झाला होता आणि बाल्टिमोरमधून आपल्या घरातून सामान हलवून ३८ मैलांवरील वाशिंग्टन येथील आपल्या काकाच्या घरी न्यावयाचे होते. तिची आई नुकतीच काही दिवसांपूर्वी वारली होती. तिला मदत करणारा कोणीही नव्हता. तिचा भाऊ व्हिएटनाममध्ये युद्धासाठी गेला होता. त्याच्याकडून काहीच खबर नव्हती व सर्व सामान आवरून बांधून एखादी ट्रक भाड्याने आणून, त्या ट्रकमध्ये सामान भरून वॉशिंग्टनला जाणे तिला केवळ अशक्य होते. म्हणून ती असहाय्यपणे रडू लागली. इतक्यात दारावर टकटक वाजले. दार उघडून पाहते तो तिचा भाऊ आलेला होता. तिने त्याला कडकडून मिठी मारली व ती काय परिस्थितीत आहे हे तिने त्याला समजावून सांगितले. त्याने तिला सर्व सामान-सुमान बांधून बाहेर काढण्यास मदत केली. सर्व तयारी झाल्यावर एक दोन ठिकाणी फोन करून एक भाड्याचा ट्रक बोलाविला. त्यात सर्व सामान पॅक करून कोठे जावयाचे ते सांगितले व नंतर तो बहिणीस म्हणाला की, मला तुझ्याबरोबर येता येणार नाही. मला परत गेले पाहिजे. असे म्हणून तो निघून गेला. तिला जरा आश्चर्य वाटले. ट्रकवाल्याने तो बरोबर का येत नाही म्हणून विचारले परंतु तिला काहीच सांगता आले नाही. मात्र जाताना तो तिला सांगून गेला होता की, तुला ज्या ज्या वेळी माझी गरज वाटेल, त्या त्या वेळी माझी आठवण कर; मी येऊन तुला लागेल ती मदत करीत जाईन. ती वॉशिंग्टन येथे राहावयास गेल्यावर तिला जुन्या पत्त्यावर सरकारकडून ता. १० मार्च १९६४ रोजी आलेली तार मिळाली की, तिचा भाऊ त्याच दिवशी म्हणजे ता. १४।२।१९६४ रोजी युद्धात मारला गेला होता. त्यानंतर त्याने त्याच्या बहिणीकडे येऊन तिला मदत केली व ही सर्व हकीकत तिच्याखेरीज आणखी तीन लोकांनी प्रत्यक्ष पाहिली.

—३—

ता. ५-२-१९६६ रोजी मिस्टर आणि मिसेस हॅमिल्टन हे दोघे सायंकाळी खाली जाण्याकरितां एका इमारतीतील लिफ्टजवळ आले. त्यांना अठराव्या मजल्यावरून खाली जावयाचे होते. ते लिफ्टजवळ आले. त्यांना आढळले की; स्वच्छ पांढरा पोशाख केलेला मनुष्य दार अडवून उभा होता. त्याने सांगितले की मला लिफ्टची तपासणी करावयाची असल्याने तुम्हाला या लिफ्टमधून जाता येणार नाही. असे बोलून त्याने दार लावून घेतले, व त्याना आत येऊ दिले नाही. ही हकीकत घडल्यानंतर एक दोन क्षणांतच तो लिफ्ट भयंकर आवाज करीत अठराव्या मजल्या-

वरून खाली कोसळला. हॅमिल्टन जोडप्याची खात्रीच झाली की त्यांनी जर त्या लिफ्टमधून जावयाचा प्रयत्न केला असता तर त्यांचा मृत्यू नक्कीच ओढवला असता. तरी पण त्यांना वाटले की आतल्या माणसाचे काय झाले असेल, म्हणून त्यांनी सुपरिंटेंडेंटला जाऊन सर्व हकीकत सांगितली. तो व काही मंडळी घटनास्थळी आली. त्या सर्वांची खात्रीच होती की, त्याचा अगदी चेंदामेंदा झाला असेल. परंतु ते लिफ्टमधून बाहेर आले व त्यांनी आश्चर्याने सांगितले की आत कोणी नाही. त्यावरून त्या सुपरिंटेंडेंटने विचारले की तुम्ही नक्की त्यास पाहिले होते काय ? त्यांनी सांगितले की नुसतेच पाहिले नव्हते तर त्याच्याशी बोललो पण होतो. त्यांनी स्वत: जाऊन पाहणी केली, तर खरोखरच तेथे कोणी नव्हते. यावरून त्यांची खात्री झाली, की कोणीतरी उपकारकर्त्या स्पिरिटने त्यांचे प्राण वाचविले होते.

——४——

१. सन १८५६ मध्ये एकदा लॉर्ड लिंडसे त्या वेळचा प्रासिद्ध मध्यस्थ होम यांचे मार्फत चाललेल्या एका Seances बैठकीस हजर होते. त्या बैठकीस त्यांच्यासह बरीच सुशिक्षित मंडळी हजर होती. हॉलमध्ये संपूर्ण उजेड होता. ते बसले असता त्यांच्या समोरील एक जड टेबल-की जे उचलावयास कमीत कमी तीन चार मजबूत माणसे लागली असती ते, आपोआप चार फूट उंच उचलले गेले व हवेत इकडे तिकडे थोडा वेळ संचार करीत हळूच परत खाली येऊन जमिनीवर टेकले. हे कसे घडले म्हणून त्यांनी चहूबाजूंस पाहिले परंतु कोणीही दिसले नाही. त्याच्या आदल्या दिवशीची हकीकत अशी आहे की लॉर्ड लिंडसे यांचे मेव्हणे रॉबर्ट लिंडसे अशीच एक बैठक आटोपून चहा पीत बसले होते; त्यावेळी त्या हॉलच्या कोपऱ्यात असलेले संगमरवरी स्लॅबसुद्धा एकाएकी तीन फूट वर उचलले गेले व त्याचप्रकारे खाली आले. मात्र त्यावर असलेली स्लॅब कागद पेन्सिलही न पडता तशीच राहिली. त्यांनी त्यानंतर काही प्रश्न विचारले व होय यास तीन ठोके व नाही याला एक याप्रमाणे ठोके देऊन उत्तरे दिली. त्यानंतर रॉबर्टने ते टेबल मूळच्या ठिकाणी ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न केला तेव्हा अतिशय श्रमाने ते तसे करू शकले.

२. ता. १७|३|१९१७ रोजी एका वैमानिकाची बहीण आपल्या मुलास घेऊन बसली होती. तिला वळून पाहावे अशी इच्छा झाली व ती पाहाते तो तिला लढाईवर गेलेला तिचा भाऊ दिसला. तिला वाटले तिचा भाऊ भेटण्यासाठी हिंदुस्थानात आला; म्हणून मुलास सुरक्षित ठिकाणी ठेवून आनंदाने ती भावास भेटण्यासाठी बाहेर आली, परंतु पाहाते तो, तिला तो दिसेना; थट्टा वाटून त्यास हाका मारल्या व सगळीकडे धुंडाळले परंतु तो परत दिसू शकला नाही. तिला अत्यंत भीती वाटली, व मनोमन वाटले की तो मरण पावला असावा. ता. १०.३|१९१७ रोजी

तो मारला गेला होता; परंतु पुढे दोन आठवडेपर्यंत त्याचा तपास लागला नव्हता.

३. कॅप्टन-टाऊन्स सिडनेमध्ये वारले होते. सहा आठवड्यानंतर त्यांच्या घरी त्यांच्या खोलीत कॅप्टनची आकृती उभी असलेली घरातील लोकांना दिसली. त्यांना आश्चर्य वाटले. तितक्यात कॅप्टनची मुलगी आली व म्हणाली, 'बाबा, तुम्ही परत आलात ?' त्यानंतर त्यांच्या घरातील तीन नोकरांनी त्यांना पाहून आनंद व्यक्त केला. त्यांनी ती आनंदाची बातमी त्यांच्या पत्नीस सांगितली. ती आल्यावर त्यांना पाहून मिठी मारण्यासाठी हात पुढे करून गेली; तेव्हा ते हात त्या आकृतीतून आरपार गेले; त्यानंतर त्यांची आकृती हळूहळू नाहीशी झाली.

४. रायडर हॅगर्ड पतिपत्नींना एक स्वप्न पडले की त्यांचा आवडता कुत्रा बॉब भुंकून भुंकून आपण मरणान्त स्थितीत असल्याचे सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांना स्पष्ट जाणीव झाली व कल्पना आली की आपला आवडता कुत्रा कोठेतरी संकटात आहे. तीन दिवसानंतर त्याचे प्रेत रेल्वे पुलाखाली पाहावयास सापडले. तो रेल्वे ॲक्सिडेटमध्ये सापडला असावा. मरताना त्याने स्वप्नात जाऊन आपल्या धन्यास सूचना दिली होती.

५. आयर्लंड मधील श्रीमती बटलर यांना नेहमी एक स्वप्न पडावयाचे व त्यात तिला एक अत्यंत सुंदर असे घर दिसावयाचे. त्याचे वर्णन ती आपल्या घरच्या मंडळीस सांगावयाची. शेवटी घरातील सर्व मंडळींचा तो एक हसण्याचा व थट्टेचा विषय होऊन बसला.

त्यानंतर काही दिवसांनी श्री. व श्रीमती बटलर हे इंग्लंडमध्ये गेले व स्वत:स राहण्यासाठी म्हणून लंडन शहराच्या परिसरात घर पाहू लागले. त्यांनी पुष्कळ घरे पाहिली, परंतु त्यांना पटेल असे घर आढळून आले नाही. एके दिवशी ते हॅमशायर-मधील एक वास्तू पाहावयास गेले. तिच्या दाराशी जाताच श्रीमती बटलर म्हणाल्या की, माझ्या स्वप्नात रोज येत ते हेच घर ! त्यानंतर तिने त्या घराचे संपूर्ण वर्णन केले. त्यातील स्वयंपाकघर, लायब्ररी–रूम, बेडरूम इत्यादी सर्वांचे तिने यथातथ्य वर्णन केले व आत जाऊन पाहता, बरोबर अगदी त्याचप्रमाणे वस्तुस्थिती होती. त्यावर त्यांनी ते घर विकत घेण्याचा निश्चय केला. त्याची किंमत मालकाने वाजवीपेक्षा फारच कमी सांगितली. ते एजन्टाकडे गेले. त्यांनी प्रवेश करताच तो खुर्चीत उठून बसला व आश्चर्याने पाहू लागला. ते घर झपाटलेले म्हणून समजले जात होते, व म्हणून तेथे कोणी राहावयास तयार नव्हते किंवा तें विकत पण कोणी घेत नव्हते. परंतु तो एजंट म्हणाला, असे काही असले तरी तुम्ही काही एक काळजी करण्याचे कारण नाही; कारण तसे वारंवार दिसणारे भूत दुसरे तिसरे कोणी नसून श्रीमती बटलर याच होत्या. श्रीमती बटलरना घराचे भूत दिसत होते तर त्या घरातील राहणारांना श्रीमती बटलरचे भूत दिसत असे. श्रीमती बटलर यापूर्वी केव्हाही या भागात आल्या नव्हत्या.

—५—

सन १९१४ ची रशियामधील घटना आहे. हल्लीचे लेनिन-ग्रॅड व त्यावेळचे पेट्रोग्रॅडमध्ये व्हिक्टोरिया ब्लाक नावाची मुलगी राहात होती. तिचे वय २२ वर्षांचे होते व तिचे नवीनच लग्न झालेले होते.

ता. ९ जुलै १९१४ च्या सायंकाळी डोके दुखते म्हणून ती खोलीत जाऊन झोपली. ती झोपेतच मोठमोठ्याने ओरडू व किंचाळू लागली, म्हणून डॉक्टरला बोलावण्यात आले. ती एका निराळ्याच भाषेत काही बडबडत होती म्हणून डॉक्टर-सुद्धा गोंधळले व त्यांनी त्यावेळच्या झारच्या डॉक्टरना बोलावले. ही मुलगी जुन्या इटालियन भाषेत ओरडत होती की मूर्खांनो पाहता काय, मी कौंटेस नेव्हारा आहे. माझे कपडे, नोकर-चाकर कोठे आहेत, मला माझ्या नवऱ्याकडे परत जावयाचे आहे. मला तेथे पोचवून द्या. तुम्हांला चांगले इनाम देववीन. नंतर थोडी शांत झाल्यावर ती सांगू लागली की ती १३५६ साली पोटातील तीव्र दुखण्याने आजारी पडली होती. त्यानंतरचे तिला आठवते ते म्हणजे ती खोलीत शुद्धीवर आली. ती आता १९१४ सालात असून सर्व सभोवतीचे वातावरण तिला चमत्कारिक दिसत होते. झारला या गोष्टीचे आश्चर्य वाटले व त्याने आपले गुप्त पोलीस या गोष्टीचा संपूर्ण तपास करण्यासाठी पाठविले.

मध्यंतरी ती थोडेफार रशियन शिकली व डॉक्टरांना सांगू लागली, मी आता तरुण झाले असून मला तरुण नवरा आहे, याचा फार आनंद वाटत आहे. माझा नवरा काउंट हा म्हातारा, लठ्ठ व कुरूप होता. ती त्या वेळी कोठे राहत होती, भोवती कोण लोक होते, आजूबाजूच्या जागा व स्थळे कशी होती याचे सर्व वर्णन तिने केले.

काही दिवसांनी तपासास गेलेले गुप्त पोलीस परत आले व त्यांनी सांगितलेली हकीकत या स्त्रीने सांगितलेल्या हकीकतीशी तंतोतंत जुळणारी होती. त्यांनी माहिती आणली की सन १३५६ च्या उन्हाळ्यापर्यंत तिची प्रकृती उत्तम होती. त्या वेळी ती असेच काही असंबद्ध बडबडू लागली. त्यामुळे लोकांचा समज झाला की तिला झपाटले आहे म्हणून तिला एका हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले होते.

तिला काउंटेस व्हिक्टोरिया ब्लाक असे संबोधण्यात येऊ लागले व रशियन क्रांतीत ते जोडपे चीनमध्ये स्थलांतर करून राहिले. ती स्त्री १९२७ साली चीन-मध्येच वारली.

जन्मल्यापासूनच व्हिक्टोरिया ब्लाकने असे केले असते तर काउंटेस नेव्हार हिने पुनर्जन्म घेतला असे संबोधण्यात आले असते. परंतु ही घटना १९१४ साली तिच्या वयाच्या २२ व्या वर्षी घडल्याने तसे काही म्हणता आले नाही. फक्त तिच्या शरीराचा कबजा नेव्हाराने घेतला असे संबोधण्यात आले. तथाकथित पुनर्जन्माच्या

कथा याच स्वरूपाच्या असतात. फरक इतकाच की, या केसमध्ये व्हिक्टोरियाच्या शरीराचा ताबा नेव्हाराचे स्पिरिटने तिच्या वयाच्या बाविसाव्या वर्षी घेतला व इतर केसीसमध्ये अगदी लहानपणी एखादे स्पिरीट ताबा घेते व त्याचा पुनर्जन्माची केस असा गाजावाजा करण्यात येतो. अशा उदाहरणावरून पुनर्जन्म सिद्ध करणे शुद्ध वेडेपणा आहे. प्रथम त्यास काही शास्त्रीय बैठक आहे की कसे ते पाहिले पाहिजे व शिवाय तो Reasoning युक्तिवादाने शाबीत करता आला पाहिजे. नुसत्या उदाहरणावरून एखादा सिद्धांत सिद्ध करण्याचा हा प्रयत्न अशास्त्रीय आहे. विज्ञान व युक्तिवाद यांनी प्रथम सिद्ध करून त्याच्या पुष्ट्यर्थ उदाहरणे द्यावयाची असतात.

—६—

ता. ४ डिसेंबर १८९० रोजी फिलाडेल्फियामधील डॉ. मिचेल रात्रीचे कपडे करून आपल्या बेडरूममध्ये जाऊन नुकतेच पडले होते. बाहेर बर्फ पडत होते, व थंडीही बरीच होती. थोड्याच वेळाने दाराची घंटा वाजू लागली, म्हणून त्यांनी दार उघडून बाहेर पाहिले, तो एक अशक्त व थंडीने काकडलेली अशी मुलगी दारात उभी असलेली त्यांनी पाहिली. ती म्हणाली की, ‘ माझी आई फार आजारी आहे व तुम्ही आल्यास फार उपकार होतील ’ ते म्हणाले, ‘ बाळ, मी आता कपडेसुद्धा काढून ठेवले आहेत. तू रात्रीचे काम करणाऱ्या एखाद्या डॉक्टरकडे जा, ’ त्यावर ती म्हणाली ‘ माझ्या आईचा तुमच्यावर फार विश्वास आहे. तुम्हीच आलात तर बरे होईल. ’ त्यांना तिची दया आली व पुन्हा ड्रेस करून ते तिच्याबरोबर गेले. त्या मुलीने आईची खोली दाखवून आत जाऊन तिची प्रकृती पाहण्यास सांगितले. डॉक्टरांनी जाऊन तपासले. तिला न्यूमोनिया झाला होता. त्यांनी तिची काळजीपूर्वक तपासणी करून औषधी योजना तयार केली व नंतर परत जावयाच्या वेळी म्हणाले, ‘ खरोखरीच तुझे नशीब चांगले आहे. आज तुझी मुलगी मला येथे घेऊन आली नसती तर तू सकाळपर्यंत काही वाचत नव्हतीस. ’ त्यावर ती आई आश्चर्याने म्हणाली, ‘ काय माझी मुलगी कशी येईल ? ती एक वर्षापूर्वीच वारली आहे ! ’ त्यावर डॉक्टर म्हणाले, ‘ हे केवळ अशक्य ! तसे नसते तर मी येथवर कसा येऊ शकलो असतो ? ’ असे सांगून त्यांनी त्या मुलीचे एकंदर वर्णन केले ते अगदी तंतोतंत तिच्याच मयत मुलीचे होते. मुलीच्या स्पिरिटने येऊन आईचे प्राण वाचविले होते.

डॉ. मिचेल हे प्रेसिडेंटचे डॉक्टर होते, व अमेरिकेतील अत्युच्च वर्तुळात त्यांना मान होता. त्यांनी ही गोष्ट त्यानंतर त्यांच्या मित्रमंडळीस वारंवार सांगितली होती.

—७—

ता. ८ सप्टेंबर १९६३ रोजी न्यू जर्सीमधील एका हॉस्पिटलमध्ये सायंकाळी श्रीमती स्टीन आपल्या टेबलावर बसल्या होत्या. त्यांच्याकडे तेवीस रोग्यांची देखभाल

करण्याचे काम होते. सुमारे रात्री ११-३० ला श्रीमती आर्मस्टेड या नेहमीप्रमाणे गरम कॉफी घेऊन आल्या. त्या कॉफी घेण्यास सुरुवात करणार इतक्यात निळ्या पोषाखातील एक स्त्री त्यांच्याकडे येताना त्यांनी पाहिले. ती स्त्री कधी, कोठून कशी आली ते त्यांना कळेना, कारण त्यांनी सर्व बाजूंनी पाहणी केली होती, व नंतर दरवाजा बंद करण्यात आला होता परके कोणीही आढळले नव्हते व दुसरा दरवाजा नव्हता. त्या या गोष्टीचे आश्चर्य करीत आहेत, तितक्यात ती स्त्री त्यांच्यापासून सुमारे १५ फुटांवर थांबली व म्हणाली की एडमंडला तुमच्या मदतीची गरज आहे. त्याने आत्महत्या करावी असे मला वाटत नाही. हे सांगून झाल्यावर ती स्त्री त्यांच्या देखतच हवेत विरली. (Dematerilized) एडमंड नावाचा एक रोगी होता व त्याच्याकडे त्या दोन्ही नर्सेस धावल्या. त्यांना आढळले की खरोखरीच त्याचे काही विशेष बिघडले आहे. त्याने आपल्या हातात एक बाटली गच्च धरून ठेवल्याचे आढळले. ती उघडून पाहता त्यांना आढळले की त्याने झोपेच्या पुष्कळशा गोळ्या गिळल्या होत्या. लगलीच डॉक्टरना बोलावून स्टमक पंपाने पोटातून त्या काढल्या. तो बरा झाल्यावर त्यास ही हकीकत सांगितल्यावर त्याच्या आश्चर्यास पारावार राहिला नाही. तो म्हणाला की ती त्याची पत्नी होती व ती पाच वर्षापूर्वीच मरण पावलेली होती.

—८—

ता. ४ जुलै १९५९ रोजी श्रीमती हर्न्यान्डेस या आपला मुलगा जीझस व दोन मुली बरोबर घेऊन लायुना बीचवर आरामात बसल्या होत्या. श्रीमती आपल्या मुलीबरोबर पत्ते खेळत होत्या व आठ वर्षाचा जीझस समुद्रात खेळत होता. आम्ही काही वेळाने पाहिले तर जझिस कोठेच दिसेना. त्यावरून तो समुद्रात दूर वाहत गेला असावा या कल्पनेने त्या बाई घाबरल्या व लाईफ गार्डना बोलावू लागल्या सगळी शोधा शोध केली. परंतु तो कोठेच दिसेना. थोड्या वेळाने लाईफ गार्डच्या मनोऱ्यावरून एक मनुष्य धावत आला व म्हणाला की एक मनुष्य एका मुलास घेऊन पोहत येत आहे, त्या तशाच त्या दिशेकडे धावल्या व त्यांनी जीझसला किनाऱ्यावर टाकलेला व मलूल अशा स्थितीत बसलेला पाहिला. त्याच्या बाजूस समुद्रातील वाळूत काही पावले उलट दिशेने दिसली. जीझसला विचारले की, 'तुला कोणी आणले ?' त्याच्या वडिलांनी आणल्याचे त्याने सांगितले. तो म्हणाला, "मी वडिलांस पहताच 'मला आई, बहिणी वगैरे कोठे दिसत नाहीत व मी परतही जाऊ शकत नाही' असे मी त्यास सांगितले. ते हसले व म्हणाले की, 'काही घाबरू नकोस, मी तुला घेऊन जाईन.' त्याप्रमाणे त्यांनी मला येथे आणून सोडले व परत गेले."

वस्तुस्थिती अशी होती की, त्याचे वडील दोन वर्षापूर्वीच वारलेले होते. इतर लोक हे ऐकून हसले. परंतु लाइफ गार्ड न हसता त्या पावलांचा मागोवा घेत समुद्रातील

वाळूत चालत गेला. एकाएकी तो माग नाहीसा झालेला त्याला आढळला. त्या ठिकाणी त्याने क्रॉस करून आणि गुडघे टेकून हात जोडले मुलाच्या मेलेल्या वडिलांनी त्यास वाचविले होते !

—९—

यॉर्कशायर (इंग्लंड) मधील शाळेत एलिन जेम म्हणून एक सोळा वर्षांची मुलगी होती. स्वच्छ ऊन पडले होते व मुली खेळाच्या पटांगणात जमल्या होत्या. त्या मुलीस दुसऱ्या एका मुलीने काही शंका विचारली. तिचे वाक्य अर्धवट तोंडातच राहिले व सर्व ३८ मुली आश्चर्याने पाहात राहिल्या. वारा नव्हता; स्वच्छ ऊन पडलेले होते व बोलता बोलता जेम सर्वांच्या डोक्यावर ३० फूट हवेत उंच उचलली गेली व तशीच वरून ती फरशीवर खाली जोराने फेकली गेली. तिला झालेल्या जखमांमुळे ती थोड्याच वेळात मरण पावली. सरकार व पोलिस यांनी कसून तपास केला. परंतु ही घटना कशी घडली याचा कधीच तपास लागला नाही !

—१०—

१९५७ च्या मार्चमधील एका रात्री लंडन टॉवर वरील दोन पहारेकऱ्यांनी चमत्कारिक आरोळ्या ऐकल्या. म्हणून ते तिकडे धावले. धडाविरहित एक पांढरी व्यक्ती त्यांच्या समोरून जाताना त्यांना दिसली व पाहता पाहता अदृश्य झाली. लेडी ग्रे म्हणून एका स्त्रीचा तेथे शिरच्छेद करण्यात आला होता. तिचे भूत तेथे वावरत असे, असे म्हणतात.

आठव्या हेन्रीची पत्नी ॲन बुलीन हिचा १५३६ साली हेन्रीच्या आज्ञेवरून शिरच्छेद करण्यात आला होता. तिचे शिरविरहित भूत त्या भागात वावरत होते अशी वदंता होती. ता. १७ फेब्रुवारी १९३३ च्या रात्री एका संत्र्याच्या समोर ती एकदम प्रकट झाली. तो घाबरून पळून गेला.

याच्या आधी काही वर्षें, ते शिरविरहित भूत, अशाच प्रकारें एका संत्र्याने पाहिले होते. परंतु त्याने न घाबरता, ‘ तू कोण आहेस ’ असा सवाल केला व उत्तर आले नाही म्हणून त्याने त्याच्यावर संगिनीने हल्ला चढविला; परंतु ती संगीन हवेत जावी त्याप्रमाणे आरपार गेली. तो संत्री बेशुद्ध होऊन पडला. कर्तव्यात गाफील राहिला म्हणून त्याच्यावर नंतर खटला भरण्यात आला होता. परंतु ही घटना पुष्कळांस माहीत असल्याने त्यास निर्दोषी म्हणून सोडून दिले.

—११—

ता. २९ जुलै १९२८ रोजी इटलीतील पार्लमेंटचे एक माजी मेयर, आपल्या खोलीत इतर दहा सहकाऱ्यांसह स्पिरिट-आवाहनाकरता (Segnces) भरविलेल्या

बैठकीत बसलेले होते. बैठक चालू असता मार्क्विस म्हणाले, ‘ माझे पाय गेल्यासारखे मला वाटतात. ’ तर त्याच बैठकीतील फॅब्रिन रोझी ही स्त्री म्हणाली की, मला फार चमत्कारिक वाटते, काही तरी अनपेक्षित घडत आहे असे वाटते. त्यांनी दिवे लावले व पाहतात तो मार्क्विस हे त्यांच्या खुर्चीतून गायब झालेले आढळले त्या बैठकींतील दहा मंडळी व नोकर चाकर या सर्वांनी एकदम जारीने शोध सुरू केला. बऱ्याच वेळाने ते त्यांच्या गोठ्यात गवतावर गाढ झोपलेले सापडले. त्या गोठ्याचा दरवाजा बाहेरून कुलूप लावून बंद केलेला होता. त्या रात्री ११–३० वाजता मार्क्विस यांना त्यांच्या बंद असलेल्या खोलीतून, त्यांच्या ६० यार्डावर असलेल्या बंद गोठ्यात विलक्षण रीतीने नेण्यात आले होते. हे कसे घडले याचा कधीच खुलासा होऊ शकला नाही.

—१२—

१. लंडन सायकिक रीसर्चचे सेक्रेटरी हॅरी प्राईस हे स्पिरिटयुक्त Seances (बैठकी) करीत असत. १९२७ साली एकदा एक बैठक चालू असता, हवेत त्यांना नुसता एक हात दिसू लागला. आपणास हा केवळ भ्रम तर झाला नाही ना, असे वाटून त्यांनी एक हातरुमाल टेबलावर ठेवला व तो आपल्या बोटात धरून त्या हाताने उचलून दाखविला.

२. याचप्रमाणे एकदा बैठक सुरू असता ११२ पौंड वजनाचे एक टेबल छतापर्यंत आपोआप उचलले गेले. त्या बैठकीतील सर्व मंडळींनी ते खाली आणण्याचा प्रयत्न करूनही ते खाली आणता आले नाही. त्यांचे सर्व प्रयत्न थकल्यानंतर ते आपोआप खाली येऊन आदळले व मोडून पडले.

—१३—

इ. स. १८१४ मध्ये एकदा नेपोलियन आपल्या अत्यंत खाजगी अशा खोलीत विचार करीत बसला होता. त्याचा असा सक्त हुकूम होता की, त्या खोलीत कोणासही त्याच्या लेखी परवानगीशिवाय सोडावयाचे नाही. त्याकरिता मॅथ्यू मोलन नावाचे एक उच्च दर्जाचे अधिकारी, दरवाजाजवळच नेमलेले होते. नेपोलियन या वेळी त्या खोलीत विचारमग्न असता, एकाएकी जणू काही आकाशातून लाल पोषाख केलेला उंचापुरा धिप्पाड मनुष्य मोलन याच्यापुढे येऊन उभा राहिला व मला आत्ताच्या आत्ता नेपोलियनला भेटावयाचे आहे असे सांगू लागला. त्यास तसे करता येणे शक्य होणार नाही म्हणून मोलनने सांगितले. त्यावर रागावून तो म्हणाला की, ‘ लाल पोषाखातील मनुष्य तुम्हांस आत्ताच भेटावयास मागतो आहे, नेपोलियनला सांगा ’ एकंदर परि-

स्थिती पाहून, त्याने भीतभीतच दरवाजावर टिचक्यां मारल्या व नेपोलियनला तो निरोप सांगितला. आश्चर्य म्हणजे, त्यास आत पाठवून देण्याबद्दल नेपोलियनने सांगितले.

तो आत गेल्यावर साहाजिकच कुतूहलाने आत काय चालले आहे हे मोल न पाहू लागला. लाल पोषाखवाला नेपोलियनला म्हणाला की, "ही मी तुला तिसऱ्यांदा भेट देत आहे. इजिप्तमधील पिरॅमिडच्या लढाईच्या वेळी तुला प्रथम भेटलो होतो. वॅग्रामला तू असताना दुसऱ्यांदा भेटलो होतो. त्य वेळी तुला बजावले होते की, 'सर्व युरोप चार वर्षांच्या आत पादाक्रांत कर किंवा त्यांच्याशी तह करून शांतता प्रस्थापित कर. तसे केले नाहीस तर माझे तुझ्यावरील असलेले संरक्षण मी काढून घेईन.' आता मी तुझ्याकडे तिसऱ्यांदा आलो आहे व माझी येण्याची ही शेवटचीच वेळ आहे. तुला जे काय करावयाचे असेल ते यापुढील तीन महिन्यांत करून आटोपते घे, किंवा तह कर. याप्रमाणे केले नाहीस तर तुझा सर्वनाश होईल हे ध्यानात ठेव."

मोलनला आश्चर्य वाटले की, नेपोलियन सारखा लाचारीने मुदत वाढवून देण्याविषयी त्याची विनंती करीत होता. परंतु तो म्हणाला की, 'मी सांगितले ते कायम आहे; त्यात काहीही फेरफार होऊ शकणार नाही, हे ध्यानात ठेव.' असे सांगून तो बाहेर पडला व पाहता पाहता अदृश्य झाला.

यापुढे काय झाले ते इतिहासात आहेच. अदृश्य लोकांतील ही व्यक्ती त्यास साहाय्य करून, संरक्षण देणारी होती असा लोकांचा अंदाज आहे.

* * *

९. दिव्यदृष्टी (Clairvoyance)

Read not to contradict or refute nor to accept and take for granted, but to search and find out the truth for the benefit of Humanity.

याचा सरळ अर्थ स्पष्ट पाहणे. परंतु या ठिकाणी मात्र याचा अर्थ सर्वसाधारणपणे चर्मचक्षू अगर मनश्चक्षूस सर्वसाधारण मानवास न दिसू शकणारे अथवा जाणीव होऊ न शकणारे असे दिसणे, किंवा जाणीव होणे असा होतो. पूर्वजांनी या विषयावर पुष्कळ संशोधन केले असून अद्याप करीत आहेत. याचा अर्थ आपल्या पूर्वजांनी याबाबत काही केले नाही असा नाही. त्यांनी पुष्कळ केले आहे. पाश्चात्यांनी आजपर्यंत संशोधन करून काही मिळविले आहे व सांगितले पण आहे. परंतु ते सर्व काही शतकापूर्वी सांगितले असल्याने, कालमानाप्रमाणे अत्यंत गूढ भाषेत सांगितले गेले आहे. त्यानंतर अनेक कारणांनी त्यावर आजपर्यंत कधीच हात फिरविला गेला नाही. त्यामुळे त्यात संशोधन व प्रगती मुळीच होऊ शकली नाही. तसेच सुसंगत अशी त्याची मांडणी पण होऊ शकली नाही. आमच्यात अजूनही या विषयाची संपूर्ण उपेक्षाच दिसून येते. याच कारणास्तव पाश्चात्यांचा अवलंब करून सांगावे लागत आहे. यात आपणास काही कमीपणा आहे असे मला वाटत नाही. ‘ बालादपि सुभाषितम् ग्राह्यम् ’ या उक्तीप्रमाणे ज्ञान हे कणाकणाने मिळेल तेथून घ्यावे; त्यात कमीपणा अथवा ज्यांच्याकडून घ्यावयाचे त्यांच्या उच्चनीचतेचा प्रश्न कधीही नसावा.

पाश्चात्यांचे या बाबतीतील परिशीलन व प्रयत्न खरोखरीच स्तुत्य आहेत. त्यांची चिकाटी पण प्रशंसनीय आहे. परंतु ते अभ्यासीत असताना त्यांच्या व आपल्या आध्यात्मिक भूमिकेत, घडणमांडणीत बराच फरक असल्याने कधीकधी थोडा घोटाळा उत्पन्न होतो. त्यांचे वाङ्मय वाचताना Mind व Soul हे शब्द पुष्कळ वेळा समानार्थी वापरलेले आढळतात. हीच स्थिती Ego, Soul Spirit यासंबंधीच्या विवरणात सुद्धा आढळते. Ego किंवा देहात्मा आपण समजू शकतो. जीवात्म्यास सर्व साधारणपणे Spirit म्हटले तरी चालेल. Soul हा शब्द सर्वव्यापी असा जो आत्मा त्यास लावता येईल. परंतु पाश्चात्यांत Soul हा शब्द पुष्कळ वेळा सर्व अर्थाने वापरला गेल्याचे दिसते. इतकेच नाही तर त्यात कधी कधी Mind चाही अंतर्भाव केलेला आढळतो. त्यामुळे कधी कधी गोंधळ उत्पन्न होतो. तो टाळण्याचा मी प्रयत्न केला आहे. सर्वव्यापी विभू असा जो कोणी त्यास केवळ आत्मा या शब्दाने संबोधणे योग्य होईल परंतु त्याचा या ग्रंथाच्या संदर्भात फारसा संबंध येत नाही. राहिले देहात्मा व जीवात्मा. या दोहोंबद्दल सरळ व सहज समजण्यासारख्या भाषेत सांगावयाचे म्हणजे जो देहास देहत्व देऊन त्यास जीवनाच्या अखेरी-

पर्यंत सांभाळतो किंवा सोबत करतो व देहाबरोबरच नाहीसा होतो तो देहात्मा (Ego) हा देह जिवंत आहे तोपर्यंत देहाबरोबर राहतो परंतु शरीर मृत झाले म्हणजे जो सुटा होऊन काही काळ आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून असतो तो जीवात्मा किंवा Spirit body मधील तत्त्व किंवा Spirit होय. या संज्ञा स्पष्टपणे ध्यानात राहिल्या म्हणजे पुढील लेख वाचताना वाचकांच्या मनात काही गोंधळ उत्पन्न होणार नाही.

यापूर्वीच्या प्रकरणात आलेच आहे की अगदी गर्भात असल्यापासून शरीराच्या वाढीबरोबरच Spirit body पण वाढत असते, तोपर्यंत ही Spirit body शरीराबरोबरच राहून कार्य करीत असते. पुष्कळ वेळा स्वप्नसृष्टीत तिचे अस्तित्व जाणवते व ज्यांना Astral projection or Astral travel ची देणगी असते त्यांना ती प्रकर्षाने जाणवते. पुष्कळांचा समज असा आहे की स्वप्नसृष्टीत आपले सुप्त मनच (Sub-conscious mind) काम करीत असते. पुष्कळ अंशी हे खरे असले तरी सर्वांशी नाही. स्वप्नात पुष्कळ वेळा भविष्यकालीन घटना दिसतात. मेलेल्या माणसांनी ठेवलेल्या वस्तू किंवा माहीत नसलेल्या परक्या ठिकाणच्या हकीगती दिसतात व त्याची सत्यता अनुभवास येते. अशा घटना सुप्तमनाने केल्या असे म्हणणे बरोबर होणार नाही. कारण त्याला त्याची कधीच माहिती नव्हती. ते कळण्यास आपल्या मनाखेरीज इतर कशाचे तरी सहाय्य झालेले असते हे निश्चित. आपले स्पिरिट (Spirit body) आपण झोपलो असता शरीराशी संपर्क कायम ठेवून शरीराबाहेर जाऊन कार्य करू शकत असते. ती इतर Spirit बरोबर संपर्क साधून किंवा अन्यमार्गाने स्वतः काही काने करू शकत असते व करतेही. काही व्यक्तींना जन्मतःच ही Self-projection ची देणगी असते; की जिच्या योगाने ते Spirit जगताशी कळत वा नकळत संपर्क ठेवू शकतात व त्यांच्याकडून त्यांना माहिती मिळत राहते, किंवा त्यांची Spirit body बाहेर जाऊन हवी असलेली माहिती मिळवू शकते. काहींना ही देणगी जन्मतःच असते तर ती अवचित काही अपघातादी कारणांनी मिळते. तर काहींना प्रयत्न करून मिळवावी लागते. प्रयत्न करून सर्वांनाच ती मिळते असे मात्र नाही. तत्संबंधी मुळात काही ग्रहणशीलता (Sensitivity) असली तरच ती वाढवून काही प्राप्त करून घेणे शक्य असते. बीज असेल तर वाढून वृक्ष होऊ शकेल. परंतु मुळातच काही नसेल तर प्रयत्न करूनही काही होऊ शकणार नाही. आडातच काही नसेल तर पोहऱ्यात कोठून येणार ? यामुळे काहींना सहज सिद्धी मिळते; काहींना थोडाफार प्रयत्न करून मिळते; तर काहींना करूनही काहीच साध्य होत नाही. प्रयत्नाने सर्व साध्य होते हे बरोबर नाही. कितीही प्रयत्न केले तरी सर्वच काही नेपोलियन, सीझर, कृष्ण, आद्य शंकराचार्य, ज्ञानेश्वर किंवा सँडो, झिस्को होऊ शकणार नाहीत. कोणा प्रयत्नवादी व्यक्तीस नाउमेद करावे असा माझा उद्देश नाही. परंतु वस्तुस्थितीची जाणीव असावी म्हणून लिहिले आहे. तरी पण सर्वसाधारणपणे नाउमेद

व्हावयाचे कारण नाही. कारण तीन व्यक्तींत निदान एकास तरी ही देणगी असतेच असते असा अनुभव आहे. मात्र ती ज्या कमी-जास्त प्रमाणात असेल त्या मानाने कमी-जास्त वेळात कमी-जास्त प्रमाणात सिद्धी मिळते.

ज्यांना ही सिद्धी थोड्याफार प्रमाणात का होईना, परंतु प्रकट स्वरूपात असते, म्हणजे ज्यांना विशेष प्रयत्न न करता किंवा पुष्कळ वेळा प्रयत्न न करताही असे अनुभव येत असतात, त्यांच्या मार्फत Spirits ना त्यांचा माध्यम म्हणून उपयोग करून जीवित व्यक्तींशी संपर्क साधणे सुकर जाते व त्याप्रमाणे ते करतात सुद्धा.

परंतु ज्यांना या शक्ती सुप्त स्वरूपात असताम, पण त्यांची जाणीव नसते, त्यांना या क्षेत्रात काही कार्य करावेसे वाटते. त्यांनी खालील प्रयोग करून पाहावेत. ज्यांना ज्या प्रमाणात या शक्ती सुप्त स्वरूपात का होईना पण असतात, त्यांना थोड्या प्रयत्नाने त्या प्रमाणात शक्ती जागृत करून त्याचा उपयोग करून घेणे शक्य होते. यास Positive Method असे म्हणतात.

इंग्लंड, अमेरिका व कधीकधी मुंबईत सुद्धा क्रिस्टल बॉल (काचेचा गोळा) मिळतात. खरे क्रिस्टल बॉल्स हे दोषरहित व पारदर्शक अशा स्फटिकापासून तयार करतात. अलीकडे काचेला काही प्रक्रिया करून तितकेच चांगले तयार करतात. हे बहुतकरून स्वच्छ व अगदी निर्मळ, दोषरहित पांढरी किंवा किंचित निळी अथवा जांभळी छटा असलेल्या स्वरूपात मिळतात. रंगीत क्रिस्टल्सची किंमत पांढऱ्यापेक्षा जास्त असते. शिवाय हा जितका मोठा तितकी त्याची किंमत जास्त असते. मुंबईत साधारणपणे चांगला क्रिस्टल ५० ते ५०० रुपयांपर्यंत मिळू शकतो, तो कसा असेल हे पाहायचे असेल तर मुंबईत पायधुणी पोलिस स्टेशनसमोर ऑल इंडिया करियाणा स्टोअर म्हणून एक काष्ठौषधीचे दुकान आहे. त्याच्या दक्षिणेकडील बाजूस त्याच्या लगतच एक हकिमाचे काष्ठौषधीचे दुकान आहे. त्याने काचेच्या शोकेसमध्ये दोन पांढरे क्रिस्टल्स ठेवले आहेत. परंतु तो विकत द्यावयास नाकारतो. फक्त तो कसा असतो हे पाहावयास मिळाल्याने एखाद्याकडून विकत घेताना फसवणूक होणार नाही. एक मजजवळ पण आहे, पण सध्या मुंबईत तरी कोठे मिळाला नाही. (जानेवारी १९७०).

अशा प्रकारच्या क्रिस्टलमध्ये पाहून स्पिरिट-वर्गाशी संपर्क साधणे याला एक विशिष्ट संज्ञा आहे. तीस Scrying असे म्हणतात. याचा अर्थ असा आहे की अशा एखाद्या क्रिस्टलमध्ये किंवा पाण्याने भरलेल्या ग्लासमध्ये, अथवा कोणत्याही खूप काळे पॉलिश केलेल्या वस्तूत-(ट्रे, बूट अथवा इतर काही) विशिष्ट पद्धतीने पाहून भूत, वर्तमान, भविष्य अथवा यांपैकी कोणत्याही घटनेचे ज्ञान करून घेणे यास Scrying असे म्हणतात. सामान्यतः याकरिता क्रिस्टलच वापरण्याची प्रथा प्रचारात आहे. हा आपल्याकडील त्राटकाचाच एक प्रकार आहे. परंतु थोडा निराळा. या प्रयोगात सिद्धी हमखास मिळविण्याकरिता निदान तीन महिने रोज पंधरा मिनिटे तरी त्राटकाचा

अभ्यास करावा. त्राटक करून जर या प्रयोगास सुरुवात केली तर यश मिळण्याचा संभव बऱ्याच प्रमाणात असतो. इतकेच नाही तर मुळात सुप्त सिद्धी पुष्कळ कमी प्रमाणात असली तरी ती सुद्धा पुष्कळ अधिक प्रमाणात वाढलेली आढळते. मात्र या प्रयोगास सुरुवात करण्यापूर्वी त्राटक केलेच पाहिजे असे नाही. त्यावाचूनही प्रयोगास सुरुवात केली व थोड्या प्रमाणात का होईना त्या व्यक्तीत सुप्त शक्ती असली तर त्यास थोड्या उशिरा का होईना अनुभव येऊ लागतात. ज्यांना (क्रिस्टल गेझिंग Crystal Gazing) क्रिस्टलमध्ये पाहून भूत, भविष्य जाणण्याचे प्रयोग करावयाचे असतील, त्यांनी त्या क्रिस्टलकरिता आतून जांभळ्या अगर काळ्या, रेशमी किंवा मखमली कापडाने मढविलेली, क्रिस्टल सहज मावू शकेल पण हलणार नाही अशी, पुठ्याची पेटी तयार करावी. तीत अशाप्रकारची खोबण असावी की जीत तो क्रिस्टल सहज मावेल परंतु हलणार नाही त्याबरोबरच त्यास एक वरील प्रमाणेच मढविलेला स्टँड तयार करावा. मात्र तो असा असावा की; त्याच्या खोबणीत क्रिस्टल ठेवला असता त्याच्या कडा क्रिस्टलच्या बाहेर येऊ नयेत. त्याचप्रमाणे त्या क्रिस्टलच्या मागील बाजूच्या भिंतीलासुद्धा काळ्या कापडाचा पडदा लावलेला असावा. समोर एखादे स्टूल ठेवून त्यावर तो स्टँड ठेवावा. त्यावर तो क्रिस्टल अशा प्रकारे ठेवावा की, तो आपल्या डोळ्यांसमोर येईल. थोडा खाली आला तरी चालेल; परंतु वर येऊ नये. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी प्रयोग करण्यास बसावयाचे असेल, त्या ठिकाणी इतर कोणास सहसा प्रवेश नसावा. निदान प्रयोगाच्या प्रथमावस्थेत तरी पूर्ण एकांत असावा. तेथे इतर आवाजसुद्धा येऊ नयेत.

प्रयोगाची वेळ साधारणतः रात्रीची असावी. दिवसाची सुद्धा चालू शकेल, मात्र कोणतीही वेळ असली तरी जेथे प्रयोग करावयाचा असेल तेथे साधारण काळोखच असावा. मात्र क्रिस्टल स्पष्ट दिसावा. त्यावर दिव्याचा अथवा कोणताही प्रकाश डायरेक्ट (प्रत्यक्ष) पडू नये. प्रकाशाची तिरीपही त्यावर पडणार नाही याची दक्षता घ्यावी प्रयोगाची वेळ व जागा ठराविक असावी. नियमितपणास फार महत्त्व आहे, याची जाणीव ठेवावी. रोज १५ मिनिटांपेक्षा अधिक बसू नये. सकाळ संध्याकाळ बसले तरी चालेल. परंतु नियमितपणा असावा. भूक लागली असता, किंवा जेवण झाल्यावर लागलीच किंवा झोप येत असताना प्रयोगास कधीही बसू नये. त्याचप्रमाणे प्रयोगाच्या वेळात तंद्री किंवा निद्रा येणार नाही याची दक्षता घ्यावी. आपली बैठक संपली की, तो क्रिस्टल त्याच खोक्यात ठेवून ते खोके ट्रंकेत, कपाटात किंवा तिजोरीत ठेवावे, उजेडात ठेवू नये. हातातून खाली पडणार नाही व त्यावर प्रखर प्रकाश पडणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यामुळे त्यास खड्डे किंवा चट्टे पडतात व पाहण्यास अडथळा उत्पन्न होतो.

आपण याप्रमाणे त्यात नियमितपणे पाहण्यास सुरुवात केली की, हळूहळू त्यात आत्मशक्ती प्रतीत होऊ लागते. सामावू लागते व कालांतराने आपले प्रयोग यशस्वी

होऊ लागतात. प्रयोगावस्थेत आपणाखेरीज इतर कोणास प्रयोगाकरिता क्रिस्टल देऊ नये. त्यामुळे आपण त्यात सामावीत असलेल्या आत्मशक्तीत व्यत्यय उत्पन्न होऊन कोणाचेच, कोणतेच कार्य होत नाही प्रयोगास बसताना आपण ताठ बसून आपल्या डोळ्यांसमोर समांतर अगर थोडा खाली क्रिस्टल असावा. प्रथम आपले प्रतिबिंब त्यात दिसू लागते. याकरिता अगदी मध्यावर दृष्टी ठेवावी, म्हणजे त्रास होणार नाही; त्या जागी एका कोपऱ्यात मंद दिवा तेवत असावा व उदबत्तीचा सुवास पण असावा. मन प्रसन्न असेल अशी दक्षता घ्यावी. मात्र मन व्यग्र असले तरी नियमित वेळ चुकवू नये. त्याच्या अगदी अंतर्भागात डोळ्यांच्या पापण्या न मिटता पाहात असावे. प्रथम प्रथम डोळ्यांत पाणी आले तरी तसेच पाहात बसावे. कालांतराने पाणी येणे बंद होऊन क्रिस्टलभोवती निरनिराळ्या रंगांची वलये दिसू लागतील. कधी कधी सबंध क्रिस्टलच अदृश्य झाल्यासारखा दिसेल. परंतु काही क्षणांतच पुन्हा दिसू लागेल साधारणतः एखादा आठवडा यापेक्षा काहीच अधिक प्रगती प्रत्ययास येणार नाही. तरी कंटाळू नये व चिकाटी पण सोडू नये. सुरुवातीस प्लँचेट चालविताना ज्याप्रमाणे नुसत्या रेघोट्याच येतात, त्याचप्रमाणे या प्रयोगात सुद्धा सुरुवातीस होते याची जाणीव ठेवावी.

इतकी तयारी झाली म्हणजे प्रयोगात सुरुवात करावी. प्रथम एखाद्या फुलाकडे अगर चित्राकडे संपूर्णपणे निरखून पाहावे व त्यास सांगोपांग हृदयात साठवून घ्यावे. नंतर क्रिस्टलमध्ये ते Project करण्याचा प्रयत्न करावा जर तुमच्यात ती स्थिती सुप्तावस्थेत असेल तर लवकरच ते फूल किंवा चित्र क्रिस्टलमध्ये पाहावयास मिळेल व पुष्कळ वेळा असे आढळून येईल की तुम्हास त्या फुलात किंवा चित्रात काही गोष्टी पाहण्याच्या राहून गेल्या होत्या, त्या पण स्पष्टपणे दृग्गोचर होतील. फूल किंवा चित्र हे सुरुवातीस त्याचे रंग, आकार आदी विविध प्रकारांमुळे विशेष कठीण वाटले तर एक साधा लाकडी चौकोनी ठोकळा घेऊन त्यावर लक्ष केंद्रित करून तो क्रिस्टलमध्ये प्रोजेक्ट करण्याचा प्रयत्न करावा. हे सर्व करताना एक गोष्ट नीट लक्षात ठेवावी, की कोणत्याही नवीन उपक्रमात प्रारंभिक अडचणी फार असतात व त्यांनाच तुम्ही कंटाळलात तर तुमच्याकडून पुढे काहीच होणार नाही. जी गोष्ट शेकडो लोकांच्या अनुभवास येत आहे ती तुमच्या का येऊ नये याचा विचार करा. कदाचित चार आठ दिवस तुम्हास मुळीच अनुभव येणार नाही; पण पुढे पुढे येऊ लागतील तसतसा तुमचा उत्साह व प्रयोग करण्याची चिकाटीसुद्धा वाढत जाईल. याकरिता सुरुवातीस काही अनुभव आला नाही तरी निरुत्साही होऊ नका, प्रयोग करीत राहा—चिकाटीने, नियमित वेळी, नियमित ठिकाणी करीत राहा. यश हळूहळू जरूर येईल.

हा प्रयोग करीत असताना प्रयोगकर्त्यावर दोन क्षेत्रांतून प्रयोग होत असतो. त्यांची एकमेकात भेसळ होऊन गोंधळ उत्पन्न होतो व काही कळेनासे होते. ते कसे होते हे सांगतो; परंतु तसे झाले तरी प्रयोग चालूच ठेवा. वातावरण निवळत जाऊन

दोन्ही क्षेत्रे हळूहळू विलय पावतील व दोहोंतील निष्कर्ष स्वतंत्रपणे वेगवेगळे तुमचे तुम्हास कळू लागतील. गोंधळ नाहीसा होऊन तुमचा मार्ग स्वच्छ व स्पष्ट होईल.

या प्रयोगात आपण स्वतः एक प्रकारचे मध्यस्थ बनलेले असतो व आपणांमार्फत त्या क्रिस्टलमध्ये स्पिरिट संपर्क साधून प्रकट होण्याचा किंवा कार्य करण्याचा वा करून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. त्याचप्रमाणे आपल्या डोक्यातही सतत काही विचार घोळत असतात. तेसुद्धा आकार घेऊन क्रिस्टलमध्ये स्वतःचा अविष्कार करण्याचा प्रयत्न करीत असतात. प्रत्येक विचाराला काही आकार असतो; त्याची आपणांस कल्पना नसते. समोर एक आंबा पडला आहे. मी म्हणेन—एक आंबा आहे, तर दुसरा कोणी म्हणेल की There is a mango. मी काय म्हणतो हे त्यास कळणार नाही व तो काय म्हणतो हे मला कळणार नाही. परंतु समोर आंबा पाहून दोघांस अर्थबोध एकच होईल. मग भाषा कोणतीही का असेना

अशा प्रकारे भाषेरहित विचार जाणण्याची शक्ती आल्यावर त्याला पटेल की प्रत्येक विचारास आकार असतो व त्याचे वर्णन आपण आपल्या भाषेतून करीत असतो. असो. तर असे आपल्या मनात वावरणारे विचारसुद्धा आपण क्रिस्टलमध्ये पाहू लागलो म्हणजे त्यात प्रकट होण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारे जीवात्म्यांचे (Spirits) व आपले विचार एकमेकांत मिसळून आपल्यामार्फत क्रिस्टलमधून संपर्क साधण्याचा प्रयत्न करू लागतात. त्यामुळे एकमेकात मिसळलेली व परस्परांशी काही संबंध नसलेली अशी दृश्ये दिसू लागतात व गोंधळ निर्माण होतो. परंतु सतत व नियमित अभ्यासाने हा गोंधळ निवळत जाऊन प्रयोगाचा स्पष्ट असा बोध होऊ लागतो. त्यास लागणारा काळ हा आपणांस ही शक्ती सुप्त स्वरूपात का होईना परंतु किती प्रमाणात आहे यावर अवलंबून राहील. साधुवृत्तीच्या व्यक्ती की ज्यांनी मन, विचार आदींवर ताबा मिळविला आहे, अशांना या गोष्टी सहज व सुलभतेने प्राप्त होऊ शकतात. मात्र इतरांच्या बाबतीत तसे नसल्यामुळे कमीअधिक वेळ लागतो, त्यामुळे प्रथम प्रथम जे काही दिसते त्यात काही अर्थ नसेल व तसे का दिसते याचा काही बोधही होणार नाही.

आपणास ज्याप्रमाणे पुष्कळ वेळा अर्थशून्य स्वप्ने पडतात, त्यापैकीच हे प्रकार असतात. त्यास एक प्रकारचे दिवास्वप्न म्हटले तर फारसे चुकणार नाही. कारण दोहोत क्रिया एकच असते. जीवात्म्यास संपर्क साधावयाचा असला तरी त्यांना तो प्रयोग करणाऱ्याच्या मेंदूमार्फतच करावयाचा असतो व जोपर्यंत मेंदूत तत्संबंधी ग्रहणशक्ती तयार होत नाही तोपर्यंत क्रिस्टलमध्ये पांढऱ्या पुंजक्यासारखे असे धुरकट काहीतरी दिसू लागते. ज्या व्यक्तींची शक्ती तितकीच परिमित असते, त्यांची यापेक्षा अधिक प्रगती होऊ शकत नाही, असे दिसून येते. परंतु सहसा असे होत नाही. चिकाटीने प्रयोग सुरू ठेवले तर निश्चयाने प्रगती होतेच होते. मेंदूची ग्रहणशक्ती हळूहळू वाढू लागते. तत्संबंधीची ग्रहणशक्ती अगोदरच असते. परंतु ती सुप्त असते. ती

प्रकट व्हावयास वेळ लागतो. याशिवाय सतत प्रयोग करीत राहिले तर ती हळूहळू वाढत आहे असे पण अनुभवास येते. फारच क्वचित असे होते की, ती वाढतच नाही. ग्रहणशक्ती वाढू लागली की, क्रिस्टलमध्ये पांढरे व धुरकट दिसणारे पुंजके हळूहळू विरळ होत जाऊन त्यात अक्षरे व आकार दिसू लागतात. आणखी काही दिवसांनी अगर महिन्यांनी नुसती अक्षरे अगर आकार दिसू लागतात. या सर्वांची तारीखवार नोंद ठेवावी म्हणजे प्रगती कशी व कोणत्या वेगाने होते आहे ते कळू शकते.

हा प्रयोग सुरू असताना पुष्कळ वेळा चमत्कारिक स्वप्ने पडू लागतात की ज्यात आपण आपले शरीर सोडून बाहेर भटकत आहोत असा भास होतो. यास Astral Projection असे म्हणतात. तो एक स्वतंत्र अभ्यास आहे व त्यासंबंधी विवरण पुढे येणार आहे. त्याचा प्राथमिक अनुभव हा प्रयोग चालू असताना कधी कधी येतो. कारण हा प्रयोग म्हणजेसुद्धा आमचे किंवा जीवात्म्याचे आपल्यामार्फत होणारे विचाराचे क्रिस्टलमध्ये होणारे Projection च होय म्हणजे हाही एक प्रकारचा Self Projection चाच प्रकार आहे. कधी कधी प्रकाशबिंदू अथवा पुंजके दिसू लागतात. तर कधी कधी अत्यंत डोके दुखू लागते. अशावेळी प्रयोग बंद करून हात, पाय व तोंड थंड पाण्याने स्वच्छ धुऊन थोडी विश्रांती घ्यावी व मग पुन्हा प्रयोगास बसावे. कांही वेळा निद्रानाशाचा अनुभव येऊ लागतो. असे होऊ लागले म्हणजे काही दिवस प्रयोग बंद ठेवून संपूर्ण विश्रांती घ्यावी.

हे प्रयोग सुरू असताना आपल्याभोवती असणाऱ्या व क्वचित नसणाऱ्या पण जिवंत व्यक्तींचे विचार व भावना यांचा आपणावर परिणाम होत असतो. त्याचप्रमाणे जीवात्म्यांचे (Spirits) सुद्धा विचार व भावना आपल्यामार्फत प्रकट होऊ लागतात. ज्याप्रमाणे प्लँचेटचे प्रयोग चालू असताना जीवात्मे आपल्याभोवती स्वतःचा अविष्कार करण्यासाठी जमू लागतात, त्याचप्रमाणे हे प्रयोग चालू असतानाही ते आपणाभोवती गर्दी करू लागतात. कारण क्रिस्टलमधून त्यांचा अविष्कार जास्त स्पष्ट व सुलभतेने होऊ शकतो. ही गोष्ट खरी आहे की, त्यांच्या अपेक्षेप्रमाणे यांचा खरोखरीच चांगला अविष्कार होऊ लागतो. मात्र यात घाबरण्यासारखे काही नाही. त्यांचे सान्निध्य पुष्कळ वेळा फार उपयुक्त ठरते. बऱ्याच वेळा ते भूतकालीन, त्याचप्रमाणे चालू घटनांबद्दल सूचना देतातच; परंतु त्यांना समजेल त्याप्रमाणे ते भविष्यकालीन घटनांबद्दलही सूचना देऊ शकतात, व देतात. गुप्तधन, न सापडणारी मृत्युपत्रे, आपले आजारी नातलग, काही अज्ञात ठिकाणच्या चालू व महत्त्वाच्या घटना यांची माहिती करून देऊ शकतात व देतातही. त्यांना जड शरीर नसते. त्यामुळे त्यांचा प्रवेश केव्हाही व कोठेही होऊ शकतो. त्यांना आपल्या जड शरीरांप्रमाणे प्रवास करण्यास वेळ लागत नाही. ते वायुरूप असल्याने अत्यंत थोड्या वेळात आपणांस हवी असलेली माहिती पुरवू शकतात. परंतु हे सर्व ग्रहण करून त्यास मूर्त स्वरूप क्रिस्टल-

CS CamScanner

मध्ये का होईना, पण देण्याची शक्ती थोड्या व्यक्तीत असते. त्यामुळे साधन असूनही त्यांचा नीट उपयोग करून घेता येत नाही. ज्यांना कांही योगक्रिया अवगत आहेत, त्यांना हे लवकर जमू शकते. Solar Plexus किंवा योगात आपण ज्यास नाभीजवळील मणिपूरचक्र असे म्हणतो ते जागृत झाले म्हणजे या किंवा अशा प्रकारच्या सिद्धी आपोआप मिळतात काही व्यक्तीत ते जन्मतःच काही अंशी जागृत असते. त्यामुळे त्यांना त्यासंबंधी सिद्धी जन्मतःच असतात. तर काहीत पुढील आयुष्यात कायमचे अनाहूत पण प्रयत्न न करता जागृत होते त्यांना तत्संबंधी काही सिद्धी जन्मतःच अगर तदनंतर जागृती होते त्यावेळी दिसून येतात. जसे भविष्यसिद्धी (X-Ray Sight) काही लोक त्वचेतून ऐकू शकतात, बाटांनी वाचू शकतात, क्रिस्टलमधून त्यांना पाहता येते. दिव्यदृष्टी अथवा दिव्यश्रवण (Crystal Hearing) या किंवा अशा सिद्धी त्यांना प्राप्त होतात. त्यासुद्धा पूर्णांशाने असतात असे मात्र नाही. ज्यामानाने त्या चक्रापैकी ज्या भागाची जागृती झाली असेल त्यामानाने व त्या सिद्धी त्यास प्रात होत असतात व त्यांचा अनुभव त्या त्या प्रमाणात प्रयोग करणाऱ्यास येतो परंतु प्रत्यक्ष प्रयोग करून मणिपूर चक्र ज्याने संपूर्ण जागृत केले आहे त्यास या सर्व सिद्धी संपूर्णपणे व कायमच्या अनायासे प्राप्त होत असतात. ते जागृत कसे करावयाचे हा भाग योगशास्त्राचा आहे व त्यावरील विवेचनात त्याचे विवेचन येईल.

क्रिस्टलमध्ये सुरुवातीस फक्त आपले स्वतःचे अथवा जीवात्म्याचे विचार प्रतीकात्मक स्वरूपात अविष्कार पावलेले दिसतात. परंतु आपणांस हवे ते दिसेलच असे नसते. सतत प्रयोग करीत राहिल्याने जीवात्म्याशी आपला अधिकाधिक निकट संबंध येऊ लागतो व कदाचित त्यातील एखादा जीवात्मा आपला स्पिरिट गाईड बनून वेळोवेळी आपणांस योग्य ते मार्गदर्शन करू लागतो. किंवा हवी असलेली माहिती प्राप्त करून देतो. काही दिवसांनी आपल्या मनात असलेल्या किंवा दुसऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिसू लागतात मात्र त्यातील भविष्यकालीन घटनासंबंधी उल्लेख बरोबरच असतील असे समजू नये. ते स्पिरिट गाईडच्या शक्तीवर अवलंबून असते.

या प्रयोगात सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे क्रिस्टलमध्ये आपणांस जे काही दिसते, त्यापैकी निदान ९० टक्के भाग प्रतीकात्मक (Symbolic) असतो त्याचा खरा व वास्तविक अर्थ काय हे केवळ अनुभवाने व तर्कानेच जाणावयाचे असते. एका बाबतीत जे प्रतीक (Symbol) दिसेल तशाच दुसऱ्या एखाद्या बाबतीत त्याच प्रकारचे प्रतीक दिसेल असे नसते. त्यामुळे केवळ संदर्भाने व कौशल्याने त्या प्रतीकाचे अर्थ समजावून घ्यावयाचे असतात व त्यात चूक झाली तर केलेले श्रम वाया जातात. समजा, कोणी आपल्या एखाद्या संबंधिताच्या आजाराबद्दल विचारले तर असे दिसू शकेल की एका झाडाच्या मुळ्या बारीक बारीक होत आजूबाजूस सर्वत्र पसरलेल्या आहेत. याचा अर्थ ज्याप्रमाणे त्याचा आजार (Cancer) कॅन्सर आहे असा होऊ शकतो, त्याच-

प्रमाणे त्यास फुफ्फुसाचा क्षय झाला आहे असाही होतो. यातून खरा कोणता याचा निष्कर्ष काढणे कठीण काम असते व ते केवळ पुष्कळ अनुभवानेच जमते. प्रयोगाचा अनुभव निराळा असतो व त्यात दिसणारी प्रतीके पण निरनिराळी असतात. त्यामुळे एकाचा अनुभव दुसऱ्यास उपयोगी पडेलच असे नाही. एकदा एकाच्या आडनावा-संबंधी प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी त्यास क्रिस्टलमध्ये मांजर दिसले. यावरून काय अनुमान करणार ? मांजर यास इंग्रजीत कॅट (cat) म्हणतात तर त्याचे आडनाव होते Katt. या अशा कारणाने असल्या Symbolic प्रतीकांचे स्पष्टीकरण सत्य स्वरूपात करता येणे फार किचकट व कठीण काम असते. याकरिता एक इलाज आहे. तो करून पाहावा. दिवसा जी काही आपणांस अशी प्रतीके दिसतील ती लक्षात ठेवावी व त्यांचे स्पष्टीकरण शोधण्याचा प्रयत्न करूच नये. ती आहे त्या स्वरूपातच लक्षात ठेवून रात्री निजताना प्रार्थना करून ईश्वरास किंवा आपले स्पिरीट गाईड यास विनंती करून, निद्राधीन व्हावे. मन जर पूर्वग्रहदूषित नसेल तर दुसऱ्या दिवशी सकाळी त्या प्रतीकांचे वास्तविक व सत्य असे स्पष्टीकरण डोक्यात येईल. याप्रमाणे करीत गेल्यास त्यास प्रत्येक प्रतीकाचा खुलासा आपोआप होऊ लागेल व त्यात चूक होणार नाही. पुढे पुढे सवय होईल व अनुभव येत जाईल त्याप्रमाणे ताबडतोब प्रतीकाचा खुलासा होऊ लागेल. त्यांचा निवाडा तुमचें अंतर्मनच Intuition—Sub conscious mind च करू लागेल. किंवा एका काचेच्या प्लेटमध्ये अगदीं बारीक वाळू काठाकाठे पसरून ठेवावी व त्याच्याजवळ व्हायोलिन वाजवावे. त्या वाळूवर त्या व्हायोलिनवर वाजविण्यात येणाऱ्या गतींची चित्रे उमटतात. त्याचप्रमाणे आपल्या विचारांचे Vibraitions अदृश्य अशा ईथरवर आकृती स्वरूपात उमटतात व त्याची प्रतीके क्रिस्टलमध्ये केंद्रित होत असतात. ज्यांनी क्रिस्टल गेझिंगमध्ये प्रावीण्य मिळविले असेल त्यांनी, प्रथम स्वतःवर ताबा मिळवून भीती व भावना यापासून मुक्त असले पाहिजे. असे झाले म्हणजे क्रिस्टलमध्ये प्रतीके दिसताना येणारे व्यत्यय व गोंधळ यास परिणामकारक रीतीने दूर करता येते.

काही व्यक्तींना मात्र स्पष्ट अक्षरे, त्याचप्रमाणे चेहरे, चित्रे व नकाशे वगैरे दिसतात व त्यांना त्यामुळे अशा काही अडचणी येत नाहीत. परंतु अशा व्यक्ती फार थोड्या. एक तर निदान आपणाकडे असे काही प्रयोग असतात याची सुशिक्षित वर्गासुद्धा माहिती नसते. ज्यांना असते त्यास प्रयोग करावेत अशी जिज्ञासा क्वचित कोणास असते. शिवाय दैनंदिन जीवनाच्या कटकटींमुळे असे प्रयोग करावयास वेळ पण नसतो; कदाचित कोणी वेळ काढलाच तर त्याला सिद्धी असतेच असे नाही. ती थोडीफार असली तरी चिकाटीच्या अभावी प्रयोग यशस्वी होत नाही. त्यामुळे आपणाकडे असे विषय उपेक्षितच आढळतात. निव्वळ प्रयोगाकरता प्रयोग असे करण्याची प्रवृत्तीच आपल्याकडे कमी. मानवी स्वभाव सर्वत्र सारखाच असतो. हे जरी

खरे असले तरी पाश्चात्यांत या विषयाकडे लक्ष घालणारांचे प्रमाण आपल्यापेक्षा निश्चितच अधिक आहे व फलाची आशा न धरता निव्वळ प्रयोगाकरता प्रयोग करणारेही त्यांच्यात पुष्कळ आढळतात. वास्तविक क्रिस्टल गेझिंग Crystal Gazing हे काही निव्वळ भविष्य जाणण्याचे साधन नाही. तर त्यापासून भूत, वर्तमान व भविष्य ही सर्वच ज्ञात करून घ्यावयाची असतात व अशा प्रयोग करणाऱ्यांत ज्यांना मुळात भविष्य जाणून घेण्याची सिद्धी असते, त्यांना क्रिस्टलमध्ये सुद्धा भविष्यघटना काही प्रमाणात कळू शकतात; इतरांस नाही. तरी पण क्रिस्टल पाहणारात व त्यांना प्रश्न विचारणारात शे. ९९ भविष्याबद्दलच विचारीत असतात.

भविष्य या प्रकरणात या विषयाचे सविस्तर वर्णन आपण केलेले असल्याने त्याबद्दल येथे विवेचन करीत नाही. त्यात सांगितल्या गेलेल्या भविष्यकालीन घटना पुष्कळ अंशी चुकीच्या निघाल्यामुळे त्यावरील विश्वास कमी होतो. परंतु अशी अपेक्षाच करणे चुकीचे असते, याचा कोणी विचारच करीत नाही. सध्या अमेरिकेत जीन डिक्सन म्हणून एक प्रसिद्ध भविष्यवेत्ती आहे. तिचे भविष्य बहुतेक क्रिस्टलमध्ये दिसून येणाऱ्या घटनांवरच आधारलेले असते. त्याचप्रमाणे Cayce Pendragon वगैरे भविष्यवेत्ते होऊन गेले आहेत. ते पण कधी कधी Crystal चा उपयोग करीत असत. Pendragon हे हल्ली हयात आहेत. यावरून निष्कर्ष निघतो तो असा की, प्रयोगाकरता प्रयोग किंवा ज्ञानाकरता प्रयोग म्हणून नाही, तर काही तरी फायद्याचे पडावे, या उद्देशानेच अशा विषयाकडे वळण्याची प्रवृत्ती जास्त. यापैकी Jean Dixon हिला मुळातच भविष्य सिद्धी असल्याने तिची भविष्ये जरी क्रिस्टलवर आधारित असली तरी त्यात अनुभवास येणाऱ्या भविष्यकालीन घटनांचे प्रमाण जास्त. तरी पण तिची अथवा Pendragon, Kayce अथवा Nostradamus यांची भविष्ये चुकली नाहीत असे नाही. अगदी ठोकळ ठोकळ सुद्धा चुकलेली आहेत. तरी पण अगदी कल्पना नसताना काही थोडी का म्हणाना, तंतोतंत बरोबर आली व येत आहेत हे कौतुकास्पद आहे.

उपयुक्तता या दृष्टीने या विषयाचा विचार केला तर थोडी निराशाच पदरी येते. कारण एक तर या विषयाची माहिती फारच थोड्यांना असते, शिवाय क्रिस्टल आपल्या देशात मिळणे शक्य होत नाही. त्याची किंमत फार असते व या सर्वांवर मात करून कोणी म्हणजे शंभरात एक या प्रमाणात जरी प्रयोग करावयास सुरुवात केली व त्यास दिसलेच तर शे. ९९ प्रतीकात्मच दिसते व त्याचे स्पष्टीकरण करणे कठीण असते. शिवाय ज्ञानाकरता ज्ञान, प्रयोगाकरता प्रयोग करण्याची प्रवृत्तीच आपणाकडे कमी असल्याने, प्रयोग करूनही तादृश फळ मिळाले नाही तर निराशा पदरी पडून व चिकाटीचे अभावी प्रयत्न सोडून देण्यात येतो. खरोखरी म्हणजे ज्यांना भविष्यघटना समजावून घेण्याची अपेक्षा नसेल त्यांना यासंबंधीचे प्रयोग खरोखरीच त्यांच्या ज्ञानात भर टाकणारे व व्यावहारिक बाबतीत उपयुक्त सुद्धा ठरतील. निदान पत्ते, बिझिक,

रमीपेक्षा ज्ञानात भर टाकणारी करमणूक म्हणून तर ते विशेष महत्त्वाचे आहेत. ज्यांना त्यापासून भविष्यकालीन घटना समजण्याची अपेक्षा असेल त्यांच्या पदरी मात्र निराशाच पडेल. त्यांनी या भानगडीत पडून आपला वेळ फुकट घालवू नये हे उत्तम. अज्ञाताच्या अनेक शाखांपैकी ही एक प्रत्यक्ष ज्ञान देणारी शाखा म्हणून निश्चितच उपयुक्त आहे.

दिव्य दृष्टीचा जो प्रकार आतापर्यंत वर्णन केला आहे तो प्रामुख्याने पाश्चात्य पद्धतीचा व अलीकडील आहे. आपल्याकडे फार प्राचीन कालापासून यासंबंधी प्रयोग होत आले आहेत व होत आहेत. योगाने मिळणाऱ्या दिव्यदृष्टीखेरीज आपणाकडे इतर पुष्कळ प्रकार प्रचारात होते व अद्यापही आहेत गमावलेला मनुष्य अथवा पशूचा तपास लावणे, गुप्त धन कोठे आहे हे पाहाणे, चालू व्यवहारात काय केव्हा कोठे होईल याची माहिती करून घेणे, आजाऱ्यासंबंधी पूसतपास, गावी गेलेला माणसासंबंधी विचारणा वगैरे पुष्कळ बाबीसंबंधी माहिती मिळविण्याकरता प्रयोग केले जात असत व आहेत. पाश्चात्यात ज्याप्रमाणे क्रिस्टल बॉलमध्ये पाहण्याची पद्धत आहे, त्याचप्रमाणे आपणाकडे सुद्धा त्रिकालदर्शी अंगठ्या, निरनिराळ्या प्रकारची अंजने, काजळी वगैरे प्रकार आहेत. यापैकी अंजने व काजळी यावर विशेष लक्ष दिलेले दिसते. पाश्चात्यांत धन पुरून ठेवण्याची प्रथा फारच कमी आपणाकडे सुमारे हजार वर्षांचाकाल सारखा धामधुमीचाच गेला. त्यामुळे जीवित व वित्त यांची लोकांस शाश्वती वाटत नसे.

जीवित शाश्वतीकरिता गावास कोट बांधणे, गावातील सर्व लोक शस्त्रास्त्र विद्येत पारंगत असणे वगैरे गोष्टी करीत असत. परंतु वित्त शाश्वतीकरिता, ते कोणास माहीत होणार नाही अशा ठिकाणी पुरून ठेवण्याची प्रथा होती पुढे कालांतराने त्या घरातील माणसे कोणास न सांगता निघून गेली, लढाईत किंवा पेंढारी वगैरेसारख्या लोकांशी झालेल्या चकमकीत मारली गेली तर ते पुरलेले धन जमिनीत अथवा इतर गुप्त ठिकाणी तसेच राहात असे व कालांतराने कोणास खणताना अथवा नांगरताना सापडत असे. त्याचप्रमाणे राजेरजवाडे, सरदार आपल्या राजवाड्यात अगर वाड्यात सुरक्षिततेकरिता म्हणून धन, सोने-नाणे वगैरे पुरून ठेवीत असत व त्याची माहिती एखाद्याच व्यक्तीस असे. त्याचप्रमाणे किल्लेदार किल्ल्यात व शेतकरी रानावनात खुणा ठेवून द्रव्य पुरून ठेवीत. नंतर काही कारणाने मोठमोठ्या लढाया झाल्या, लुटालूट होऊन प्राणहानी झाली किंवा अन्य कारणाने वस्ती हलविली गेली म्हणजे ते धन तसेच पुरलेल्या स्थितीत राहात असे. यासंबंधी कदाचित कागदपत्र, चर्मपट किंवा इतर खुणा ठेवलेल्या असत व त्या पण सांकेतिक असत. एके ठिकाणी सांगतात की घरातील मुलांना एक लेख सापडला की मार्गशीर्ष शु. १५ ला रात्री १२ वाजता गावाबाहेरील मंदिराचा कळस फोडून पहा-दशसहस्र सुवर्णमुद्रा मिळतील. त्यांना फार हर्ष झाला व त्यांनी त्या मितीची वाट पाहून बरोबर त्याच वेळी जाऊन तो कळस

फोडला परंतु त्यात दगड मातीपेक्षा काही जास्त निघाले नाही. त्यांना आश्चर्य वाटले व त्यांनी गावातील एका वयोवृद्ध गृहस्थास यासंबंधी विचारले. त्यांनी विचार करून सांगितले की प्रथम तो कळस पूर्वी होता तसा करा. मग पाहू. त्याप्रमाणे त्यांनी केले. मग मार्गशीर्ष शु. १५ ला रात्री १२ वाजता त्या देवळाची छाया ज्या ठिकाणी पडली होती, त्यापैकी ज्या ठिकाणी कळसाची छाया होती तेथे खणले तर तेथे त्यांना नमूद केलेले धन मिळाले.

अशी वदंता आहे की, एका ग्वाल्हेर अधिपतीने यमुनेचा प्रवाह काही काळ वळवून तिच्या पाण्यात सतत पाण्याच्या धारेखाली राहील अशा ठिकाणी कोट्यवधी रुपयांचे जडजवाहिर पुरून ठेवले आहे की ज्याचा तपास लागू शकत नाही. अशा पुष्कळ गोष्टी आहेत. तरी पण एक गोष्ट मात्र निश्चित की, बऱ्याचशा किल्ल्यात, जुन्या वाड्यात, राजवाड्यांत अद्याप पुष्कळ धन पुरलेले आहे आपणाकडील पुणे, हैद्राबाद, पैठण, जुन्नर, पुरंदर, सातारा, कोल्हापूर, दिल्ली, लखनौ, विजापूर, नगर, अशा ठिकाणी अद्याप पुष्कळ अशोधित असे धन पुरलेले आहे, आणि त्याचा कोणास तपास लागलेला नाही. विजयानगरसारखे ठिकाण! तेथील वीसलाख लोकांची वस्ती पराभव होताच एका रात्रीत उठून गेली. अशा ठिकाणी निश्चितच अद्याप पुष्कळ धन असण्याची शक्यता आहे. आता प्रश्न पडतो की ते शोधून कसे काढावयाचे? यासंबंधी पुष्कळ अपसमजही प्रचलित आहेत की धन ज्याच्या नशिबात नसते त्यास समजले तरी त्याचे कोळसे होतात. त्यावर नाग संरक्षक म्हणून असतात. त्याचप्रमाणे त्यावर दुष्ट जीवात्मे नजर ठेवून असतात व जो धन काढावयास जाईल त्यास ते भीती दाखवून धन काढू देत नाहीत वगैरे.

हे सर्व काही अंशी खरे असून खोटे पण आहे. कारण पूर्वी रांजणात वगैरे धन ठेवून ते पुरताना त्यातील नाण्यास गंज वगैरे लागून खराब होऊ नये किंवा कोणास सहजासहजी दृष्टोत्पत्तीस आले तर त्यांची दिशाभूल व्हावी म्हणून त्यात सभोवार व वरचा थर कोळशाचा टाकून मग ते रांजण बंद करण्याचा व पुरण्याचा प्रघात होता व ते घर किंवा वस्ती सोडण्याचा प्रसंग आला म्हणजे त्यातील धन काढून घेऊन ते रांजण कोळशासुद्धा तसेच राहात असत त्यामुळे मागाहून जेव्हा त्याचा आढळ होई त्यावेळी त्यात नुसते कोळसेच सापडत. त्यामुळे असा समज प्रचलित झाला की त्याच्या नशिबात नव्हते म्हणून त्या धनाचे कोळसे झाले. परंतु तसे नुसते कोळसे होते, धन नव्हतेच. तसेच धन पुरताना थोडी पोकळ जागा राहून गेली म्हणजे तेथें बिळे करून नाग, साप राहू शकतात. असे नाग, साप दृष्टीस पडले म्हणजे ते धनाचे संरक्षक आहेत असा समज प्रचलित झाला.

तिसरा समज जीवात्म्यासंबंधी. पुष्कळ अंशी हाही समज खोटा असतो. परंतु क्वचित प्रसंगी ज्याचे धन असते त्याचा काही कारणाने अकस्मात मृत्यु झाला म्हणजे त्याची त्या धनाबद्दल इच्छा-आकांक्षा शिल्लक राहत असते. मग तो स्पिरिट योनीत

गेला तरी त्या इच्छा त्याचा पाठलाग करीत असतात. त्यामुळे त्याच्या वारसाखेरीज कोणी इतर ते धन काढावयास गेला तर त्यास त्याच्यामार्फत त्रास पोचण्याचा संभव नसतोच असे नाही. यामुळे आपल्या प्राचीन ग्रंथात ज्या ज्या ठिकाणी धन काढण्याबद्दल उल्लेख आले आहेत, त्या त्या ठिकाणी काही बळी देऊन, त्या जीवात्म्यास तृप्त करून अथवा अघोर मंत्र जपून त्याचे भय नाहीसे करून मग भूमिगत द्रव्य काढण्यास प्रवृत्त व्हावे असे उल्लेख आढळतात.

यासंबंधी इतके विस्तारपूर्वक लिहिण्याचे कारण म्हणजे आपल्याकडील दिव्यदृष्टीकरता साधने म्हणून जी साधने प्रचलित आहेत ती बहुतेक धनसंशोधनासाठीच असून, त्या मार्गात इतर जे काही पाहण्यात येते ते निव्वळ दुय्यम म्हणून. शिवाय भूमिगत द्रव्यसंशोधन हा देखील एक अज्ञाताचा शोध आहे व त्यात जर काही उपयुक्त असे लिहिले जाऊन कोणाचा प्रत्यक्ष फायदा झाला तर माझ्या लिहिण्याचे सार्थक झाले असे मी समजेन.

याबाबत आपणाकडे प्रचलित पद्धती दोनच मुख्यतः आहेत. त्या म्हणजे अंजन व काजळी. याशिवाय त्रिकाळदर्शी आरसा, अंगठी वगैरे प्रकार म्हणजे क्रिस्टल बॉलची नक्कल होत. याकरता काजळी व अंजन यांबद्दल काय सांगितले आहे ते प्रथम पाहून भूमिगत धन कोठे आहे; ते कसे समजावे, त्याच्यासंबंधी काय उल्लेख आहेत ते पाहू.

कज्जली करण्याचे प्रकार सोपे आहेत. त्यातल्या त्यात महत्त्वाचा म्हणजे—

(१) अंकोल तेलाचा दिवा लावून त्याने येणारी कज्जली धरून बाटलीत भरून ठेवणे. (२) पांढऱ्या रुईच्या मुळीस देवकापसाने लपेटावे व त्यास तुपात बुडवून पेटवून त्याची कज्जली धरावी. किंवा (३) साधा कापूर आणि एक काचेची किंवा पांढऱ्या प्लॅस्टिकची डबी घ्यावी व तिच्या पारदर्शक झाकणाच्या आतील बाजूस सर्व बाजूंनी कज्जल लागेल असे भरावे व डबी बद करून ठेवावी. म्हणजे वरचा भाग काळा दिसेल; परंतु हातास लागणार नाही. प्रयोग करते वेळी त्या डबीच्या झाकणाच्या वरील भागास उत्तर लावावे. म्हणजे त्यात आपले तोंड दिसू लागेल त्यात क्रिस्टल बॉलमध्ये पाहतात त्याच पद्धतीने पाहावे. साधारणपणे अशी पद्धत आहे की, कज्जली एका डबीत भरून त्यात थोडे अत्तर टाकून घट्ट मलमासारखे होईल असे करावे व गरज पडेल त्या वेळी अंगठ्याच्या नखास लावून त्यात पाहावे. फार घट्ट झाले असेल तर काजळ अंगठ्यास लावल्यानंतर एक थेंब अत्तर वर टाकावे होता होईतो उजव्या हाताचा अंगठा असावा. पायाळू इसमास आणि लहान मुलास—त्यातल्या त्यात लहान मुलीस लवकर दिसते असा अनुभव आहे. पाहण्याची पद्धत क्रिस्टलप्रमाणेच आहे. त्यात सुद्धा त्याप्रमाणेच भूत, भविष्य, वर्तमान दिसू लागते. मात्र पाहणाऱ्या इसमास ती Sensitivity (ग्रहणशक्ती) असली पाहिजे.

अंजन :

अंजनें पुष्कळ प्रकाराची सांगितली आहेत; ती डोळ्यांत आंजून मग पाहावयाचे असते. यातसुद्धा पायाळू इसम किंवा वरीलप्रमाणे ग्रहणशक्ती असलेला इसमच उपयोगी ठरतो. याचा उपयोग मुख्यतः जमिनींतील धन, पाणी वगैरे पाहण्याकडे होतो. मात्र कोणतेही अंजन आंजण्यापूर्वी–त्यातल्या त्यात धन पाहण्याच्या उद्देशाने–अघोर मंत्राचा निदान दहा हजार जप केलेला असावा. म्हणजे जर त्या धनावर भूत, प्रेत, पिशाच्च वगैरे असेल तर त्यांचा त्रास होत नाही व त्या धनातसुद्धा काही शाप वगैरे दोष असतील तर त्याची निवृत्ती होते. त्यासंबंधी काही संस्कृत श्लोक आहेत. ते येथे उद्धृत करतो. अर्थ समजावयास अगदी सोपा आहे म्हणून अर्थ देऊन पाने अडवीत नाही.

सप्तधा पद्मसूत्राणि । भावयेत् इक्षुजै रसैः
तत्वार्थी जालयेत दीपं कुली तैलसंयुतम् ।
ग्राह्याम कृष्णचतुर्दश्याम कज्जलं निधिदर्शकम् ॥ १ ॥
रक्तांगस्त्यस्य मूलेन । धात्रीमूलं (आवळे) सुपेशितम् ।
कर्पूरेणयुतं चाज्यं । सिद्धं सर्वांजनम् परम् ॥ २ ॥
राजावर्त च कर्पूरं । रक्तचंदनमूलिकम् ।
रोचनं मधुसंयुक्तम् । भवेत् सर्वांजनम् परम् ॥ ३ ॥
पारदम् मधुकर्पूरं । काकमाची फलं यथा ।
इमं पिष्ट्वा भवेत सिद्धम् । सर्वांजनं परम् ॥ ४ ॥
पुष्यार्के मुनि (अगस्ती) वृक्षस्य । मूलमुधृत्य वारिणा ।
संघृष्य मधुना सार्धं । अजंयते् लोचनद्वयं ॥ ५ ॥
हरितालं वचा (वेखंड) लोध्रं । रेणुका चांजनम् तथा ।
कृष्णपक्षें चतुर्दश्याम् । चूर्णीकृत्य विनिक्षिपेत् ।
संपुटे ताम्रजे तत्र । अधोरेणाय मंत्रयेत् ।
अंजिताक्षे नरः पश्येत् निधि । नानाविधान् भुवि ॥ ६ ॥
हंसपादो जटामासी । कर्पूरंच मनःशिला ।
तेन चांजितनेत्रस्तु । निधिं पश्याति भूमिगं ॥ ७ ॥
तुलसीमूलिका पुष्ये । शनिवारे समुद्धरेत् ।
निघृष्टं कांतिके नाथ । मधुनायुत आंजयेत् ।
पादजातं कुमारी वा । कन्यका यांजतोनिधी ।
दृश्यते नात्र संदेहो । पातालांतर्गतम् अपि ॥ ८ ॥

धन काढण्यापूर्वी अघोरमंत्र जप दहा हजार अवश्य करावा. संकटे येणार नाहीत.

निधिस्थान लक्षणं :

धन साधारणतः हमखास कोठे असते त्याचा एक दुर्मिळ संस्कृत उतारा पुढे दिला आहे. वाचकांस त्याचा काही उपयोग झाल्यास याचे सार्थक झाले असे समजेन.

पद्मगंधा भवेत् यत्र मृत्तिका तत्र जायते ।
निधिः शाबरमंत्रेण बलिना साधयेत् बुधः ॥ १ ॥
श्येन काक बकाचाश्च तथान्ये बहुपक्षिणः ।
सततं यत्र तिष्ठन्ति निधिस्तत्र न संशयः ॥ २ ॥
यस्मिन् स्थाने प्रकुर्वन्ति काका मैथुनमादरात् ।
सिंहस्थितिर्भवेद्यत्र निधिस्तत्र न संशयः ॥ ३ ॥
बहूनाम् यत्र वृक्षाणाम् एकोस्मिन् सकला खगाः ।
वसन्ति सकले काले निधानं तत्र लभ्यते ॥ ४ ॥
जीर्णोद्यानतडागेषु शून्यग्राम-वनेषुच ।
मातरो यत्र तिष्ठन्ति तत्र वित्तं न संशयः ॥ ५ ॥
कोमलः शामलो रम्ये दृश्यते तृणसंचयः ।
गोकुलैर्बुहुधा लुब्धैर्खाद्यमानोपि नित्यशः ।
पुनश्च तादृशो भूयो निधानं तत्र दृश्यते ॥ ६ ॥
शरद् हेमंत वर्षासु पवित्रा पत्र-संयुता ।
भवन्ति भूरुहा ग्रीष्मे तत्र स्थाने ध्रुवं निधि ॥ ७ ॥
एकशीर्षेषु वृक्षेषु यदि शाखाद्वयं भवेत् ।
तत्र वित्तं भवेत् एवं नासत्यं शाबरं वचः ॥ ८ ॥
विपरीत फलोपेता दृश्यते यत्र भूरुहा ।
अवश्यं तत्र वित्तस्यात् साधयेत् बलिना बुधः ॥ ९ ॥
करिहस्तं समाकारें प्ररोहो दृश्यते वरे ।
रक्तं स्रवति भिन्नश्च तप्र वित्तं न संशयः ॥ १० ॥
ध्वजमनिसमाकारो प्ररोहो दृश्यते वरे ।
शतसाहस्रकम् वित्तं तदद्य लभ्यते ध्रुवम् ॥ ११ ॥
अनारोहेषु वृक्षेषु यदा धारौहि दृश्यते ।
निधानं लक्षयेत् तत्र लभ्यं भाग्यवताम् नृणाम् ॥ १२ ॥

ग्रीष्म-सूर्यांशुभिर्दग्धा शोषं नायाति या महि ।
दावानलेन दग्धा वा तोयसंपर्कवर्जितः ॥ १३ ॥
प्रदेश कुत्राचित्तस्या पन्नगै सेवितो यदि ।
अजनानांच सर्वेषाम् मंत्रं साध्यं अघोरकं ।
विना घोरेण मंत्राश्च नाशयन्ति पदे पदे ॥ १४ ॥

अघोर मंत्र येथे उद्धृत केला असता; परंतु त्याचा विधियुक्त जप करावयाचा असतो. तो एखाद्या विश्वसनीय माहितगाराकडून सविस्तर समजावून घेऊन मग करावा; अन्यथा त्याचा उपयोग होत नाही.

यापैकी कोणताही प्रयोग मी स्वतः केलेला नाही, व मला करावयाचा नाही. योग्य व विश्वसनीय ठिकाणाहून माहिती मिळाली आहे. तिचा याचकांस उपयोग व्हावा म्हणून येथें ती दिली आहे.

* * *

१०. दिव्यश्रवण (Clairaudience)

दिव्यदृष्टीप्रमाणेच हा एक प्रकार आहे की इतर कोणासही ऐकू येत नाही. काही विशिष्ट व्यक्तींना ते Trance (गुंगी) मध्ये असताना व ती विशिष्ट ग्रहणशक्ती असणारांना ऐकू येते. परंतु हा प्रकार अद्याप फारसा प्रचारात नसल्याने यावर विश्वसनीय असे फारसे लिखाण उपलब्ध नाही; तरीपण जी काही माहिती उपलब्ध आहे तीवर विवेचन करू या.

जीवात्मे ज्याप्रमाणे आकार घेऊन काही कार्य करू शकतात, किंवा आकार न घेताही आपले अस्तित्व जाणवू शकतात त्याप्रमाणे ते आवाज उत्पन्न करून मध्यस्थास किंवा प्रयोग करणारास काही सांगू पण शकतात. पुष्कळ वेळा असे होते की, प्रयोग करणारा प्रयोगावस्थेत असताना त्याचे अंतर्मनही बोलत असते त्यासंबंधात सुक्ष्म आवाज ऐकल्यासारखे त्यास वाढते. त्यामुळे आतील आवाज कोणता व जीवात्म्याकडून आलेला कोणता यासंबंधी घोटाळा उत्पन्न होतो. बराच अनुभव आल्याशिवाय त्यातील कोणता आवाज कोठील हे ओळखणे कठिण असते. मात्र ज्यांना या बाबतीत थोडीफार सिद्धी आहे त्यांनी खालील प्रयोग करून पाहावा. (सिद्धी आहे किंवा कसे हे सुद्धा बरेच दिवस प्रयोग केल्याशिवाय कळणारे नसते.) रोजची बसण्याची जागा व वेळ ठरवून एकांतात ध्यानस्थ बसावे. ध्यानस्थ याचा अर्थ केवळ ईश्वरचिंतन नव्हे; तर आपणांस जे काही करण्याची इच्छा असेल त्यासंबंधी एकाग्रतेने विचार करणे होय होता होईतो अन्य विचार मनात यऊ देऊ नयेत. आले तर त्यावर लक्ष ठेवून, त्यांना घालवून परत त्याच विचारावर केंद्रित व्हावे. सुमारे आठदहा दिवसांत तुम्हाला असे आढळून येईल की, तुम्ही मन केंद्रित करू शकता. एक गोष्ट मात्र अवश्य करावी.

चांगल्या तुपात थोडा कापूस भिजत ठेवावा. नंतर तो तुपातून काढून चांगला पिळून घ्यावा. नंतर त्याचे दोन भाग करावे व प्रत्येक भाग दोन्ही कानांत घट्ट बसवावा. म्हणजे त्यास आपल्या कानाचा आकार येईल. यास गुड्या म्हणतात. त्या अशा असाव्यात की, कालांतराने वाळल्या तरी कानात घट्ट बसाव्यात; बाहेरील आवाज आत येऊ नये. अशा रीतीने गुड्या तयार झाल्या म्हणजे ध्यानात (प्रयोगास) बसताना त्या कानात घट्ट बसवाव्यात. अशा रीतीने ध्यानास विवक्षित विचारावर मन केंद्रित करून बसले म्हणजे आतून विविध आवाज ऐकू येतील. प्रथम प्रथम ते शब्द स्वरूपात नसतील. नुसतेच निरनिराळ्या प्रकारचे असतील. बरीच प्रॅक्टिस झाली म्हणजे आवाजाबरोबर शब्द ऐकू येत आहेत, असा भास उत्पन्न होईल. खरोखर ते शब्द नसतीलही. परंतु तुम्हाला त्यातून तुमच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील. ती बरोबर वा चूक असतील पण उत्तरे असतील. पुष्कळ वेळा आपल्या भोवती जीवात्मे फिरत असतात. त्यांच्याकडूनही उत्तर आले असेल. काही वेळेला इतका स्पष्ट

CS CamScanner

आवाज येतो की, तो जवळपास असणारांनासुद्धा ऐकू येतो. या बाबतीत अनुभव असा आहे की जीवात्म्यांना सुद्धा असे आवाज काढता येतात व ते प्रयोग करणारासच काय परंतु इतरांस सुद्धा ऐकू येतात. मात्र अट इतकीच की त्यावेळी कोणीतरी प्रयोग करीत असले पाहिजे.

जुलै १९१४ मध्ये एका डॉक्टराने इंग्लंडमध्ये प्रयोग केला होता त्या वेळी त्यास असा अनुभव आला की, एक वायुस्वरूप पारदर्शक असे स्पिरिट त्याच्यासमोर उभे राहून बोलू लागले. ते पारदर्शक असल्याने त्याच्या घशातील हालचाल स्पष्ट दिसत होती व त्यातून स्पष्ट असा आवाज बाहेर येत होता. हा अनुभव त्याला एकट्याला एकच वेळा आला असे नसून तो इतरांना पण आल्याच्या नोंदी आहेत.

ॲडमिरल मूर व डेनिस ब्रॅडले यांनी या विषयावर पुस्तके लिहिली आहेत. परंतु त्यात या घटना कशा घडून येतात, याचा उल्लेख नाही. मूर यांनी उल्लेख केला आहे की, पुष्कळ वेळा त्यांना त्यांची स्पिरीट गाईड आयोला (Iola) ही दिसत असे. परंतु त्याच वेळी ती मिडियम सुद्धा इतरांना अदृश्य असे. ती त्याच्याशी बोलत असे व ते त्याच्याखेरीज इतरास पण ऐकू येत असे. परंतु पुष्कळ वेळा हे बोलणे अशा भाषेत असे की, त्याचे ज्ञान तेथे हजर असणारांपैकी कोणासही होत नसे. यासंबंधी बैठकी Seance सुद्धा अंधारातच होत असतात त्यामुळे व पुष्कळ वेळा तेथे हजर असणाऱ्यांच्या वैचारिक स्पंदनामुळे ऐकू येणारे आवाज हे खरोखरीच स्पिरिटकडून येत आहेत की, आपल्या विचारांचाच प्रतिसाद आहे हे कळणे मुष्किल होऊन बसते तरी पण पुष्कळ वेळा असे अनुभव येतात की, त्यांनी सांगितलेली माहिती पुष्कळ वर्षांपूर्वी घडलेली असते व ती फक्त प्रश्नकर्त्यासच माहीत असते. त्यामुळे हे आलेले संदेश व त्यांच्या मार्फत ऐकू आलेले आवाज हे खरोखरीच स्पिरिटमार्फतच आल्याबद्दलची खात्री पटते. एकदा एका बैठकीस चिनी तत्त्वज्ञ कन्फ्यूशियस आला होता. त्याची भाषा तीन हजार वर्षांपूर्वीची चिनी असल्याने त्यासंबंधी कोणास काहीच बोध होईना. फक्त कन्फ्यूशिअस हे नाव व ते सुद्धा निरनिराळ्या उच्चारात (Toning) ऐकू येऊ लागले. त्यामुळे सर्वजण बुचकळ्यात पडले. त्यांनी तीन वेळा विचारले की, तू कोण आहेस ? तर तिन्ही वेळेला कन्फ्यूशिअस असे स्पष्ट ऐकू आले. तेथे बसणारांनी, कन्फ्यूशियसच्या समजल्या गेलेल्या चिनी भाषेतील एका उताऱ्यातील चूक कोणती म्हणून त्यास विचारणा केली असता, त्याने सर्व उताराच घडाघड म्हणून दाखविला व तो खरोखरीच कशा रीतीने वाचावा हे मग स्पष्ट रीतीने त्या वेळच्या आरोहअवरोहांसकट म्हणून दाखविला व सर्वांना चकित करून सोडले. त्यांनी त्यांच्या त्या वेळच्या ग्रामोफोन रेकॉर्डस्वर ते सर्व रेकॉर्ड करून घेतले होते. इतकेच नाही तर इतरही काही असे स्पिरिटकडून ऐकले गेलेले शब्द व वाक्ये रेकॉर्ड करून ठेवली आहेत.

अध्यात्म-ज्ञानाची एक शाखा म्हणून याचाही निश्चित उपयोग आहे. परंतु

अद्यापपर्यंत नुसते प्रयोग करून आवाज ऐकू आले म्हणजे आश्चर्य करण्यापलीकडे काहीच केले जात नाही. (आमच्या देशात तर यांपैकी काहीच नाही ती गोष्ट अलाहिदा.) या सर्वांतून एक प्रयत्न हमेशा असा झाला पाहिजे की, असे आवाज अथवा अशी दृश्ये ऐकू येतात वा दिसतात ही गोष्ट शंभर टक्के खरी. परंतु अद्याप आपणांस हवी ती व्यक्ती किंवा स्पिरिट क्रिस्टलमध्ये आणणे अथवा अमुकच एखाद्या स्पिरिटला बोलावून तो काय म्हणतो ते ऐकणे शक्य झाले नाही, तर प्रयोग करीत बसावयाचे व त्यावेळी अनायासे जे काय होईल ते पाहात बसून त्याची नोंद करावयाची; यापलीकडे निदान अजून तरी काहीच केले जात नाही. या गोष्टीसुद्धा मानवी बुद्धीस आश्चर्यचकित करणाऱ्या आहेत व त्यांचेही ज्ञान आपणांस हवे हे निर्विवाद. असे प्रयोग करण्याकरताच त्यास उपयुक्त असे वळण लागण्याची शक्यता आहे हेही खरे. परंतु आज जरी या सर्व बाबी प्रयोगावस्थेत असल्या तरी त्यापासून मानवजातीस उपयुक्त असे काही तरी करता येईल, यासंबंधी प्रयत्न का केले जाऊ नयेत ? आज हे प्रयोग चालले असता आपली भूमिका केवळ प्रेक्षकाची असते. त्यापेक्षा त्यात आपणास कार्यकर्त्यांची भूमिका घेऊन विवक्षित जीवात्माच येऊन त्याने अमुक एक काम करावे असे हक्काने सांगून, त्याच्याकडून ते करून घेण्याचा प्रयत्न का केला जाऊ नये ? आपल्याकडे ज्यास काळी विद्या (Black Magic) असे म्हणतात त्यात भूत, प्रेत, पिशाच्च, सिद्धी वगैरेंकरता पुष्कळ प्रयोग, मंत्र, तंत्र, साधना वगैरे दिलेल्या असतात. त्यात सिद्धी मिळवलेले काही इसम माझ्या पाहण्यात आहेत. परंतु त्यांच्या बाबतीत अनुभव असा की तात्पुरते जरी ते भूत किंवा पिशाच्च त्यांच्या स्वाधीन आहे असे दिसले तरी खरोखर तसे नसते. ती जरी त्याची काही कामे तात्पुरती करून देत असली तरी या मंडळींचा शेवट अत्यंत वाईट होतो. असा अनुभव आहे व तसे होणार याची त्यांना पण जाणीव असते. म्हणून अशी विद्या कोणीही आपल्या मुलांबाळास शिकवीत नाहीत. कारण शेवटी ते भूत वा पिशाच्च त्याचा ताबा घेऊन त्याचा अंत भयानक रीतीने घडवून आणते, व पुढे स्पिरिट जगतात त्याचे काय हाल होतात ते परमेश्वरच जाणे. सांगण्याचे तात्पर्य काय तर याप्रमाणे जीवात्म्यांस वश करून घेऊन त्यांच्याकडून कामे करवून घेता येतात. परंतु ते मंत्रतंत्रादिकांनी त्यांच्यावर लादलेले नसले तर त्यांच्याशी परिचय करून घेऊन त्याच्या पूर्ण सहकार्याने मानव जातीला कल्याणकारक अशी कार्ये करून घ्यावीत. सर्वच स्पिरिटस् वाईट असतात असे नाही. तर पुष्कळशी चांगल्या मनोवृत्तीची पण असतात. त्यांच्यात मानवाच्या कल्याणाची तळमळ पण असते. परंतु त्यांना पुष्कळ वेळा योग्य असा मध्यस्थ मिळत नाही. अजून आपणासही त्यांच्याशी संपर्क साधून, त्यांना आपलेसे करून, त्यांच्याशी सहकार्य करून मानवजातीत कल्याणकारक कार्ये कशी करवून घेता येतील, या दृष्टीने प्रयत्नच होत नाहीत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे.

* * *

११. Psychometry

Psycho = Mind or Soul = मन किंवा आत्मा.

Metry = To measure = मोजणे, मापणे.

यास आपल्या भाषेतील योग्य असा प्रतिशब्द निदान मला माहीत नाही. पुष्कळशा इंग्रजी डिक्शनरीतूनही हा शब्द सापडत नाहीं. त्याच्या एकंदर कार्यव्याप्तीवरून हा शब्द तयार केला गेला असे दिसते

कोणत्याही वस्तूच्या नुसत्या दर्शनाने किंवा स्पर्शाने ती वस्तू ज्याची असेल किंवा ज्यासंबंधी असेल, त्यासंबधी तत्कालीन—म्हणजे ज्यावेळी ती वस्तू व्यक्तीजवळ होती त्या वेळची त्या व्यक्तीसंबंधी सर्व माहिती केवळ मानसिक सामर्थ्याने सांगता येते व त्यास Psychometry असे म्हणतात. प्रयोग करणारास Psychometrist असे म्हणतात. हे अद्यापि शास्त्र बनलेले नाही. तर केवळ एखाद्या व्यक्तीस जन्मतःच तत्संबंधी सिद्धी असते. तर इतर काही व्यक्तींस काही आकस्मिक कारणाने ती पुढील आयुष्यात मिळते. ती अभ्यास करून कशी मिळवावी यासंबंधी थोडे वाङ्मय उपलब्ध आहे. परंतु अनुभवाच्या दृष्टीने त्याचा अद्याप तरी फारसा उपयोग केलेला अगर झालेला आहे असे दिसत नाही.

Psychometry ही एक प्रकारची दिव्यदृष्टी Clairvoyance च आहे. कारण दिव्यदृष्टी किंवा दिव्यश्रवण या दोहोंत प्रयोग करणारा हा एक प्रकारचा माध्यम असतो. परंतु त्यास ज्या व्यक्तीची किंवा वस्तूची माहिती हवी असते, ती जवळ किंवा समक्ष असण्याची काही जरूरी नसते. परंतु सायकोमेट्रीत तसे नसते. त्यात ज्या व्यक्ती किंवा वस्तूंसंबंधी माहिती हवी असते, तिच्याशी प्रत्यक्ष संबंध आलेली एखादी व्यक्ती वा वस्तू मग ती काही का असेना ती वस्तू किंवा ती व्यक्ती प्रयोग करणाराच्या समोर असणे आवश्यक. तसे असले म्हणजे तत्संबंधी ग्रहणक्षमता Sensitivity असलेली व्यक्ती Psychometrist त्या व्यक्ती अगर वस्तुसंबंधी इत्थंभूत माहिती सांगू शकते. ही एक अत्यंत उपयुक्त अशी सिद्धी आहे. तीत आपले मन त्या वस्तूशी निगडित असलेली सर्व स्पंदने ग्रहण करून तत्संबंधी सर्व ज्ञान मिळवू शकते. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की वस्तू मग ती कोणतीही का असेना ती ज्याच्या साहचर्यात येते त्यासंबंधीची सर्व स्पंदने ग्रहण करून आपल्याजवळ ठेवते व प्रयोग करणारा आपली चेतना Conciousness तेथपर्यंत पोचवून ती ग्रहण करून त्याच्या मेंदूस पोचवितो. एक उदाहरण असे आहे, की एका सुमारे ८०० वर्षांपूर्वीच्या थडग्याच्या चुनामातीचा एक भाग प्रायोगिकास दाखविण्यात आला. त्याने त्या जागेचे वर्णन तर केलेच, पण त्यावेळची परिस्थिती, लोकांचे पोषाख, रीतिरिवाज वगैरे सर्वांचे यथातथ्य वर्णन

केले; इतकेच नाही तर त्यावेळेस आजूबाजूस शेतात कोणती पिके काढीत असत; भाजीपाला वगैरे कोणता पेरला जात होता याचे योग्य वर्णन केले. हे अद्यापि शास्त्र या संज्ञेस पात्र झाले नसले तरी ते ज्यास अवगत आहे त्यास त्याचा सर्वदृष्टीने कल्याणकारक रीतीने उपयोग करता येईल. रोगाचे निदान, हरवलेल्या व्यक्तीचा वा वस्तूंचा शोध, गुन्हेगारांचा शोध अशा व तत्सम सर्व बाबतींत त्याचा उपयोग होऊ शकतो यात प्रयोग करणाराचे मन अगर संज्ञा ज्या व्यक्ती अगर वस्तुसंबंधी प्रयोग सुरू असेल तिच्याशी, संपूर्णपणे संलग्न होऊन तत्संबंधी सर्व ज्ञान व माहिती करून घेता येते. यातील यश मुख्यत्वे करून प्रयोग करणाराचे मन पूर्वग्रहरहित असले तरच पदरात पडते. जर काही पूर्वग्रह असतील तर त्यांचा अडथळा उत्पन्न होऊन स्वच्छ व निर्भेळ असे निर्णय अनुभवास येत नाहीत. याकरिता प्रयोग करणाराचे मन पूर्वग्रहरहित असणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. सायकोमेट्रीत आपले मन अथवा संज्ञा आपणामधून काढून प्रयोग केले जाणे व ते व्यक्ती किंवा वस्तूवर पूर्णपणे केंद्रित करणे आवश्यक असते, (ज्यांना तत्संबंधी सिद्धी आहे, त्यांच्या बाबतीत त्यांना न कळत या सर्व क्रिया होत असतात.) अशा रीतीने केंद्रित झाल्यावर तीत त्या वस्तू अगर व्यक्तीसंबंधीच्या विचारांची पुटे बसलेली असतात. ती ग्रहण करून मेंदूस पोचविली जातात व हे काम त्यास केवळ न कळत व काही क्षणातच घडते. आणखी एका गोष्टीची सतत जाणीव ठेवावी की ज्या व्यक्ती अगर वस्तूबद्दल माहिती हवी असेल, त्याबद्दल प्रयोग करणारास काहीही माहिती नसावी व असे असले तरच प्रयोग निर्भेळ व यशस्वी होतात.

या संबंधात सौदम्प्टनच्या मिसेस हार्वे यांचे प्रयोग विशेष उल्लेखनीय आहेत. ज्या व्यक्ती अगर वस्तूसंबंधी माहिती हवी असेल, तत्संबंधित वस्तू म्हणजे त्याचा रुमाल, घड्याळ, त्याने लिहिलेले पत्र, त्याचा फोटो ... ज्यांचा त्या व्यक्तीशी थोडा फार का होईना प्रत्यक्ष संबंध आलेला आहे, त्या सर्व प्रयोग करणारास न कळत त्यास काहीही माहिती न देता एका टेबलावर व्यवस्थित मांडून ठेवतात. मात्र एक काळजी अवश्य घेण्यात यावी की त्या सर्व वस्तू परस्परांपासून अलग ठेवाव्या. एकमेकास स्पर्श झाला तर त्याचे निर्णय एकमेकात मिसळून योग्य ती माहिती मिळू शकत नाही व प्रयोग अयशस्वी होतो. प्रयोग करताना प्रयोगासाठी ज्या वस्तू ठेवण्यात येतात त्यासंबंधी कसलीही माहिती प्रयोग करणारास असणार नाही, याची दक्षता घ्यावी. वस्तूसुद्धा अशा असाव्यात की तत्संबंधित व्यक्ती स्त्री आहे की पुरुष हेसुद्धा त्या वस्तूंवरून कळू नये. असे असले तरच खरी परीक्षा होते. याबाबत असा अनुभव आहे की मिसेस हार्वे त्या वस्तूजवळ गेल्या की तावडतोब ती वस्तू कोणाची, त्याचे वय काय, स्त्री वा पुरुष, धंदाव्यवसाय, कौटुंबिक परिस्थिती, हल्ली ती कोणत्या परिस्थितीतून जात आहे, त्याचे नातेवाईक, यासंबंधी काही माहिती—इतकेच नाहीतर कधी कधी त्यासंबंधी नजिकच्या

CamScanner

काळात घडून येणाऱ्या घटना यांचे अचूक वर्णन करीत असतात. पुष्कळ वेळा असे होई की टेबलावरील एक वस्तू ज्या व्यक्तीची असेल, त्याच्याजवळील दुसरी वस्तू ज्या इसमाची असेल ती व्यक्ती शेकडो मैल दूर राहणारी असे व असे असले तरी काही क्षणांत तिने निवेदन केलेली माहिती अचूक ठरत असे. त्यांचा विशेष हातखंडा म्हणजे त्या व्यक्तीच्या स्वभाववर्णनासंबंधी असे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, ज्या कोणत्याही वस्तूचा मालकाशी संबंध आलेला असेल त्या विचारांची स्पंदने त्या वस्तूत कायमची चिकटून राहात असली पाहिजेत. ग्रामोफोन प्लेटप्रमाणे त्यांची स्पंदने केव्हाही ग्रहणशील असतात. एकदा एकाचे एक पत्र एका सायकोमेट्रिस्टला पाहावयास दिले व दुसऱ्याचे त्याने नुसते हाताळलेले कोरे कागद दिले, तरी दोहोवरून त्यानें दोघांसंबंधी अगदी बरोबर वर्णने सांगितली. यावरून वस्तू कोणती का असेना, तिचा कोणी उपयोग केलेला असो वा नसो फक्त त्या वस्तूचा त्या व्यक्तीशी प्रत्यक्ष संबंध आलेला असला पाहिजे. यावरून प्रयोग करणारास त्या व्यक्तीसंबंधीं सर्व माहिती सांगता येणे शक्य होते. प्रो. डेन्टन यांनी अत्यंत पूर्वकालीन खनिजाबाबत प्रयोग करून पाहिले. त्यासंबंधीचें विवरण ऐकून त्यांच्या आश्चर्यास पारावार राहिला नाही. प्रयोगकर्त्याने त्या वस्तु कोणत्या कालातील व कोठल्या हे तर सांगितलेच; पण त्याच्या आसपास कोणते प्राणी राहात होते, त्यांचा आकार, शिंगे वगैरे सर्व प्रकारचे सुसंगत वर्णन केले इतकेच नाही तर ते काय खात होते हेही सांगितले. खरोखर म्हणजे ते सर्व प्राणी अश्मयुगातील होते. कालप्रवाहात त्यांच्या जाती केव्हाच नामशेष झाल्या होत्या व ते जीवसृष्टीतून नाहीसे झाले होते. असे होते तरी त्यांचे यथातथ्य वर्णन त्याने केले होते. त्यास आश्चर्य वाटत होते की, तो खरी हकीकत सांगत होता की कादंबरी. त्याबाबतीत पूर्वीच्या खनिजासंबंधी रेकॉर्ड तपासून पाहता ते अगदी बरोबर होते, असे आढळून आले. इतकेच नाही तर त्या कालखंडात प्रवेश करून त्या वेळी कोणते वृक्ष, वनस्पती वगैरे आस्तित्वात होत्या याचे पण यथातथ्य वर्णन केले आहे.

याबाबत सिद्धी मिळविण्याकरिता राजमार्ग असा काही नाही. ती शक्ती आपणात प्रकट अथवा सुप्त अवस्थेत असावी लागते. अथवा काही आकस्मिक कारणाने प्राप्त होते. तरीही ती आपणात सुप्तावस्थेत आहे किंवा कसे हे पाहण्यासाठी खालील प्रयोग करून पाहावा.

मनातील सर्व विचार काढून मन पूर्वग्रहरहित करा. सर्व स्नायू शिथिल करा व बाहेरून येणारी कोणतीही स्पंदनें, कोणताही अडथळा न होता सहज परिणाम करू शकतील अशा स्थितीत एकांत स्थळी बसा. नंतर ज्या वस्तूपासून आपणास तत्संबंधी कांही माहिती हवी असेल तीवरून हळूच हात फिरवा. कोणत्या कल्पना व कोणते विचार मनात येतात त्यांवर लक्ष ठेवा. त्यासंबंधी चर्चा किंवा टीकाही करू नका. प्रयोगाच्या शेवटीं काय अनुभव येतात त्याचे टिपण ठेवा व प्रत्येक प्रयोगाच्या वेळी त्याच्याशी

तुलना करून किती प्रगती झाली आहे ते पाहा. मात्र त्यात आपली मते मिसळली जाणार नाहीत आणि आपल्या कल्पना व विचार यांचा त्यांच्याशी अजिबात संपर्क येणार नाही याची दक्षता जरूर घ्या. तुम्हाला प्रत्येक वेळी निरनिराळे अनुभव येऊ लागतील. समजा, एखाद्याने लिहिलेले पत्र न वाचता त्यावरून नुसता हात फिरवा व मनात काय विचार येतात याची नोंद करून ठेवा व नंतर मूळ पत्रांशी ताडून पाहा. याचप्रमाणे फोटो. प्राण्यांचे सांगाडे. जीर्ण वस्तू, औषधे वगैरेसंबंधी प्रयोग करीत राहा. तुमच्या स्वतःच्या अंतर्मनातील विचार आणि या पदार्थांच्या स्पर्शाने उत्पन्न होणारे विचार यातील फरकाची जाणीव होऊ लागली की तुमची या शास्त्रात प्रगती होत आहे असे समजावे. यात महत्त्वाची गोष्ट ही आहे की, ज्यांना या शास्त्रात प्रगती करावयाची आहे त्यांचा असा विश्वास पाहिजे की, ते कोणत्याही वस्तूचे अंतःस्वरूप पाहू शकतील व त्या विश्वासाच्या अनुरोधाने वर्तन करण्याच्या प्रयत्नात असतील. मात्र असे करताना आपले विचार लादण्याचा प्रयत्न कधीही करू नये. फक्त कोणते विचार मनात आपोआप येतात ते पाहात असावे. एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवावी की, प्रत्येक विचार तत्संबंधी वस्तूवर आपला ठसा उमटवीत असतो व तो कायम असतो. क्रीट बेटावर झालेली लढाई अद्याप पाहावयास मिळते हे याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. साधारणतः रोज पंधरा ते वीस मिनिटे यासंबंधी प्रॅक्टिस करावी. मात्र जागा व वेळ ठराविक असावी. असे करताना पुष्कळ वेळा डोकेदुखी व तत्सम त्रास सुरू होतात, त्यांचे कारण समजत नाही. असे होऊ लागले म्हणजे उगाच डॉक्टराच्या मागे लागण्याऐवजी काही दिवस प्रॅक्टिस बंद ठेवावी हे बरे. अर्थात मी लिहितो इतके ते सोपे नाही. बरेच कठीण आहे. असे असले तरी कष्टसाध्य का होईना पण साध्य आहे. प्रत्येक वस्तूवर ज्याप्रमाणे जीवनाची छाया पडलेली असते त्याचप्रमाणे ज्या व्यक्तींशी किंवा वस्तूंशी अदृश्य विचारांचा संबंध येतो, त्यावर ते आपला ठसा कायमचा उमटवून ठेवतात व ज्यांना तत्संबंधी सिद्धी आहे त्यांना त्यांची उकल होऊ शकते.

आपल्या अंतर्मनाची शक्ती आपण अभ्यासाने जितकी वाढवू तितके असे प्रश्न उकलणे आपणांस सुलभ जाते. अलीकडे अमेरिकेत काही बँकांतसुद्धा खऱ्याखोट्या नोटा शोधून काढण्याची नवी पद्धत उपयोगात आणली जात आहे. तेथे काम करणाऱ्या काही मुलींना तत्संबंधी सिद्धी असते. त्यांना या सर्व नोटा देण्यात येतात. त्या थोडा वेळ स्तब्ध बसून डोळे मिटून त्यांवरून हात फिरवितात व लागलीच त्यांतील खऱ्या कोणत्या व खोट्या कोणत्या त्या निराळ्या काढतात. नंतर केमिकल टेस्ट वगैरे दिल्यानंतर त्यांनी दिलेले निर्णय अचूक होते असे आढळून येते; मात्र हे कसे होत असते ते त्यांना स्वतःला पण सांगता येत नाही. प्रत्येक विचाराला काहीं आकार असतो. मात्र त्याची आपणास जाणीव नसते. त्यामुळे ज्या वेळी एखादी वस्तू आपल्या सान्निध्यात येते, त्या त्या वेळी आपल्या विचारांचा त्यावर ठसा उमटतो व शास्त्रज्ञांच्या मते तो कायम

राहतो. तत्संबंधी सिद्धी असणाऱ्यांना ते काही शतकानंतरसुद्धा आकलन होते आणि त्यासंबंधी ते सुसंबद्ध वर्णन करू शकतात. मात्र ज्यावेळी त्या वस्तूंवर विचारांचे संस्कार झाले असतील त्या वेळेसंबंधीच ते असतील. आपल्या विचारांची शक्ती किती असते याचे एक साधे उदाहरण माझ्या पाहण्यात आले आहे. आपल्याकडील योगी विचारावर मन केंद्रित करून नुसते आकारच देऊ शकतात असे नाही. परंतु त्या केंद्रीकरणामुळे विचारांचे शरीरात रूपांतर होऊन ते प्रत्यक्ष दिसू लागते. त्यास Thought body असे म्हणतात. बरेच वेळा मध्यस्थाची Spirit body त्याच्या शरीरापासून अनेक मैलांवर पाहण्यात आल्याची उदाहरणे आहेत. आपली जाणीव किंवा चेतनाशक्ती Consciousness आपणातून बाहेर पडून त्या वस्तूच्या चैतन्यात शिरून तत्संबंधी सर्व माहिती घेऊन काही क्षणातच परत येते व मग आपणास त्या वस्तूच्या संबंधित व्यक्तींचा सर्व इतिहास ज्ञात होतो. यामुळे त्या वस्तूत काही काही तरंग किंवा स्पंदने शिल्लक राहतात व तो प्रयोग करणारा ग्रहण करून तत्संबंधी ज्ञान करून घेतो हे म्हणणे समर्थनीय ठरत नाही. वा Thought forms बद्दल एक उल्लेखनीय हकीकत आढळली ती या संदर्भात समजावून घेण्यास सोयीचे पडेल असे वाटल्यावरून देत आहे.

मॅडम डेव्हीड नील नावाच्या एका स्त्रीस अशा गूढ विषयांचा नाद होता व त्याचा प्रत्यक्ष असा अभ्यास करण्यासाठी ती तिबेटमध्ये जाऊन राहिली होती. मंत्र-तंत्र, जादूटोणा वगैरेंसाठी तिबेट अद्याप प्रसिद्ध आहे. एका गुहेत अभ्यास करीत असता तिला अशा Thought forms चा अनुभव येऊ लागला. जसजसा तिचा अभ्यास वाढूं लागला व यावरून तिने एक प्रयोग करून पाहावयाचे ठरविले. ती एकांतात ध्यानात असताना एका काल्पनिक लामावर आपले ध्यान केंद्रित करू लागली. काही महिन्यांत तिच्या त्या Thought forms मधून तो काल्पनिक लामा प्रगट होऊ लागला. लवकरच त्याने मूर्त स्वरूप धारण केले व एखाद्या जिवंत माणसाप्रमाणे राहूं लागला. तो जणू काही तिचा एक पाहुणाच बनला. पुढे तिने एकांतवास सोडून काही नोकरांसोबत प्रवास सुरू केला तर तोंही तिची सोबत करू लागला. बऱ्याच वेळा तो चालणे, बसणे, आजूबाजूस पाहणे वगैरे सर्व इतर माणसांप्रमाणेच करीत असे. एकदां तर तिला त्याचा स्पर्श झाल्याचा भास झाला. दिवसेंदिवस तो जास्त धीट व त्रासदायक होऊ लागला. थोडक्यात म्हणजे तिच्या ताब्यातून निसटून तो स्वतंत्र अस्तित्व गाजवू लागला. एकदा तर एक शेतकरी तिच्याकडे लोणी घेऊन आला असता त्यास तिच्या खोलीत खरोखरीच लामा बसलेला दिसला पुढे पुढे तिला त्याचा कंटाळा येंऊ लागला व तिला ल्हासा येथे जावयाचे असल्याने तो सोबत नको होता. परंतु तो फारच चिवट झाला होता व काही केल्या तिचा पिच्छा सोडेना. ध्यानाने त्याला नाहीसा करण्यास तिला सहा महिने लागले. Thought forms असे जडत्व Materialisation कसे पावू शकतात याचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

यावरून मी माझ्या ‘ वैतरणेच्या ऐलतिरी ’ या पुस्तकात देवतांचे प्रतीकात्मक स्वरूप कसे आहे व त्यांना विचारातून आकारात कसे आणता येते, यासंबंधी केलेले विवेचन किती समर्पक आहे त्याची कल्पना येईल.

प्रयोग करणारांना सर्वच बाबतींत यश मिळते असे नाही. काही व्यक्तींना औषधे, हाडे, जीर्णवस्तू, धातू वगैरेंपासून काहीच ज्ञान होऊ शकत नाही. जिवंत व्यक्तींची पत्रें, पुस्तके, घड्याळे वगैरेंवरून तत्काळ संवेदना प्राप्त होते. त्यांना अशा वस्तूवरून गुन्हेसुद्धा शोधून काढणे शक्य व सुलभ असते. पुष्कळ वेळा असे आढळते की, ज्याची वस्तु असेल त्याच्या जवळच्या आप्तांबद्दलसुद्धा त्याच्या स्वभावादिकासंबंधी माहिती मिळतेच. परंतु त्याच्या बाबतीत घडून येणाऱ्या नजीकच्या कालातील घटनांचे सुद्धा ज्ञान होऊ शकते मात्र असे नेहमी होऊ शकते असे नाही.

ही सिद्धी असणाऱ्या व्यक्तींना मनुष्य अगर त्याची एखादी वस्तु किंवा फोटोसुद्धा पाहिला किंवा स्पर्श करण्यास मिळाला तर त्याच्यासंबंधीच काय परंतु त्या व्यक्तीच्या संबंधित असणाऱ्या व्यक्तींची चित्रे उभी राहतात व त्यासंबंधी त्यास सर्व सांगता येते. एवढेच नाही तर काही वेळेला कोणी मनुष्य फोनवरून बोलत असेल तर त्याने फोन हातात घेताच तो काहीही बोलण्यापूर्वी त्या व्यक्तीसंबंधी त्यास ज्ञान होते. आपला असा अनुभव आहे की समजा आपली आई, भाऊ, घरदार वगैरेपासून आपण कितीही लांब असलो अगर त्या व्यक्ती जिवंत असोत वा नसोत त्यांची चित्रे आपण कोणत्याही क्षणी आपणापुढे उभी करू शकतो. अगदी त्याचप्रमाणे ती व्यक्ती अगर तत्संबंधी कोणतीही वस्तु संपर्कात आली तर त्यासंबंधी मागील सर्व घटना त्याच्या मनःश्चक्षूंसमोर येतात. हे कसे व का होते, हे मात्र त्यांना सांगता येत नाही. आपली खोली आपण पाहिलेली असते व तिचे चित्र आपणात सामावलेले असते. त्याचप्रमाणे एखादी खोली आपण पाहिलेली नसली तर चित्र तयार झालेले नसते असे नाही. तिचे चित्र ती तयार झाली त्याच वेळी तयार झालेले असते. जे जे इसम ती पाहतील त्यांच्यात तिचे चित्र सामावेल. अशी एखादी व्यक्ती अगर एखादी वस्तु या प्रायोगिकाच्या संपर्कात आली तर ती सर्व चित्रे त्याच्यासमोर येतात. इतकेच नाही तर काही भविष्यकालीन घटनासुद्धा त्याच्या नजरेस येतात. याचा अर्थ त्या घटना त्या व्यक्तीत सामावलेल्या असल्या पाहिजेत. तसे नसते तर या प्रयोग करणाराला देखील काही सांगता आले नसते.

यासंबंधात वाचकांच्या माहितीसाठी म्हणून पीटर हर्कोस नावाच्या इसमाच्या आयुष्यातील काही हकीगती देणार आहे. त्यावरून अगदी सामान्य माणूससुद्धा काही आकस्मिक कारणाने अशी सिद्धी मिळवून तीत पारंगत होऊन परोपकाराची कृत्ये करू शकतो हे वाचकांच्या निदर्शनास येईल.

हॉलंडमधील एका मध्यम वस्तीच्या गावात पीटर हर्कोस नावाचा एक मुलगा मे १९११ मध्ये जन्मास आला. त्याचे कुटुंब मध्यमवर्गीतील असून हा मुलगा शाळा

कॉलेज वगैरे शिक्षणात काही मोठा हुषार म्हणून चमकला नाही व त्याचा हाच आयुष्यक्रम दुसऱ्या जागतिक लढाईपर्यंत चालू होता. सर्वसाधारण माणसापेक्षा किंवा कुटुंबापेक्षा त्याच्यात विशेष असें काही कधीच दिसले नाही. युद्ध सुरू झाल्यावर तर त्याची परिस्थिती आधिकच बिकट झाली. जर्मनांनी सर्व देश चुटकीसारखा पादाक्रांत करून नागरिकांना टाचेखाली रगडण्यास सुरुवात केली. दिवसाढवळ्या नागरिकांजवळ असेल नसेल ते—मग ते कपडे वा खाण्याचे पदार्थ असोत, फक्त त्यांना उपयोगी पडण्यासारखे वाटले की हिसकावून घेतले जात व प्रतिकाराचा प्रयत्न केल्यास गोळीची शिकार व्हावे लागे. अशा परिस्थितीत ते सर्व कुटुंब अन्नान्नदशा होऊन देशोधडीस लागले व मिळेल त्या ठिकाणी मिळेल त्या पगारावर अथवा त्याच्या मोबदल्यात दिल्या जाणाऱ्या अन्नावर दिवस काढण्याचा प्रसंग आला अशा परिस्थितीतसुद्धा पीटरला भूमिगत राहून मायभूमीसाठी कार्य करावे लागत होते

अशा रीतीने कालक्रमणा चालू असताना एकदा जून १९४३ मध्ये पीटर काही काम करीत असता एकाएकी पाय घसरून तीस फूट उंचीवरून खाली डोके वर पाय असा, खालील फरशीवर फेकला गेला. एका सेकंदातच त्यास त्याचे कुटुंब, देश, सर्व ब्रह्मांड आठवले व खालील फरशीवर तो डोके आदळून पडला. डोक्यास भयंकर जखम झाली एक हात मोडला. अशा स्थितीत तो जगण्याची तिळमात्र आशा नसतानासुद्धा त्यास एका हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. तेथे तो तीन दिवस व रात्री बेशुद्धावस्थेत होता. चवथ्या दिवशी थोडा शुद्धीवर येऊन डोळे किलकिले करून पाहू लागला, त्या वेळी त्यास त्याच्या भोवतालची सर्व मंडळी डॉक्टर्स, नर्सेस वगैरे चमत्कारिक नजरेने पाहात असलेली आढळली. मात्र त्यास काय घडले आहे हे काहीच आठवेना त्याने सहज विचारले की, मी कोठे आहे ? व मला काय झाले आहे ? त्यावर त्यास सांगण्यात आले की तू तीस फुटांवरून पडलास व आतापर्यंत जीवनमरणाच्या सीमेवर होतास. त्याने अंगावर व डोक्यावर हात लावून पाहिले असता तो भाग फार दुखत आहे असे त्यास आढळले व त्यासोबतच आपणास काहीतरी चमत्कारिक, असाधारण असे वाटत आहे असे आढळून आले. परंतु ते खरोखरीच काय आहे, व असे काय होते आहे, याचा त्यास काहीच उलगडा होईना. डोक्यात काहीतरी गोंधळ माजला असून आपणास सर्वजण, आजूबाजूची माणसे वगैरेंबद्दल काहीतरी असाधारण व आजपर्यंत कधीच अनुभवास आले नाही असे अनुभवास येत आहे असे वाटू लागले.

दिवस गेले तसतशी त्याची जखम बरी होऊ लागली व डोक्यातील गोंधळ निवळू लागला. परंतु पूर्वी त्यास जे कधीच दिसत नव्हते अगर कळत नव्हते ते दिसत आहे, कळत आहे असे आढळून आले. (या इसमासंबंधी इतके सविस्तर मी का लिहिले याचा खुलासा या लेखाच्या शेवटी येईल.) एक नवीन देणगी, शक्ती, आपणास प्राप्त झाली आहे असे त्यास दिसून आले. प्रत्येक समोर येणाऱ्या व्यक्तीविषयी

तिच्या अंतरंगात काय आहे ते त्यास कळू लागले. शेजारच्या कॉटवर एक रुग्ण पडला होता त्याकडे पाहून याच्या तोंडून अनाहूत उद्‌गार बाहेर पडले, की तू फार वाईट मनुष्य आहेस. असे पीटर का बोलला त्याचे कारण त्यासही समजले नाही. नंतर तो म्हणाला की, तुझा बाप मेला त्या वेळीं त्यानें तुला एक सोन्याचे घड्याळ दिले होते ते तू विकले आहेस. त्यास अत्यंत आश्चर्य वाटले. तो म्हणाला की, 'तुला हे कसे कळले ?' कसे 'कळले ते मलाही माहीत नाही. पण तू असे केलेस हे खरे तर !' तो एक धान्याचा व्यापारी होता व त्याच्या बापाने एक संस्मरणीय कौटुंबिक वस्तू म्हणून ते घड्याळ त्यास दिले होते. ते त्याने विकावयास नको होते. परंतु ते विकल्यावर त्याचे मन त्याला खात होते व त्याची स्पष्ट जाणीव त्याला स्वतःला देखील न कळत झाली होती. अजाणता पीटर वरील शब्द बोलून गेला होता. त्याने आपला गुन्हा कबूल केला. त्या वेळी त्याला जाणीव झाली, की आपणास अशी काही देणगी मिळाली आहे व त्याचा त्यास लगेच पुन्हा प्रत्यय आला. त्याची नर्स झेडा त्याचा चार्ट तपावयास आली. त्या वेळी तिला पाहून तो म्हणाला की, सांभाळ हो, तू आज गाडीला जाऊन तुझ्या मैत्रिणीची एक बॅग हरवून येणार आहेस. तिच्याही आश्चर्यास पारावार राहिला नाही ती म्हणाली की मी अद्याप तिलाही सांगितले नाही. हे तुला कसे कळले ? तो म्हणाला, 'कसे कळले ते मलाही माहित नाही परंतु कळले खरे !'

या गोष्टीस चार-पाच दिवस लोटल्यानंतर एके दिवशी एक मनुष्य साध्या पोषाखात त्याच्या भेटीस आला; काही दिवसांपूर्वी तो देखील त्याच्याच सारखा एक रुग्ण असून वारंवार त्याच्याकडे डोकावून जात असे. तो म्हणाला की, मी आता येथून जात आहे. तूही लवकर बरा होऊन जाशील असे म्हणून त्याने त्याच्याशी हस्तांदोलन केले. तत्क्षणी त्यास संवेदना क्षाली की हा मनुष्य ब्रिटिश एजंट असून त्याचा एक जर्मन काल्वर स्ट्रीटवर खून करणार आहे. नकळत त्याने त्याचा हात इतका घट्ट धरून ठेवला की त्याला तो सोडवितां येईना व त्याच्याकडे चमत्कारिक नजरेने पाहून तो ओरडू लागला. त्यावरून नर्स धावून आली व दोघातिघांनी हाताची घट्ट मिठी सोडवून त्यास मोकळा केला. लगेच पीटर शुद्धीवर आला व त्यावर सर्व यास विचारू लागले, की तू असे का केलेस ? त्यावर याने विचारले की त्याचे नाव काय आहे ? नावाचा उल्लेख केल्याबरोबर हर्कोस ओरडून म्हणाला, की त्याचा खून होणार आहे. त्यावर यास डोक्यास दुखापत झाली असल्याने डॉक्टर व नर्स मिळून त्याला गादीवर झोपविले. पुढे याने सांगितल्याप्रमाणे हॉलंडमध्ये काल्वर स्ट्रीटवर जर्मन गेस्टापोकडून खरोखरीच त्याचा खून झाला. यापुढील हकीकत तितकीच चमत्कारिक आहे. परंतु विस्तारभयास्तव आवरते घेत आहे. पुढे लवकरच त्यास थोडेसे बरे वाटू लागले म्हणून मोठ्या वार्डमध्ये हलविण्यात आले. तेथे गेल्याबरोबर तो एका खाटेवरील रुग्णाकडे पाहून म्हणाला 'की' हा आज सायंकाळी मरणार आहे व त्याप्रमाणे तो वारला.

चार महिन्यांनी त्यास घरी आणण्यात आल्यावर त्याची स्थिती अत्यंत चमत्कारिक झाली. तो दुरुस्त होऊन परत आला, म्हणून एक जंगी पार्टी देण्यात आली होती व तिच्याकरता त्याचे मित्र, आप्तेष्ट वगैरे त्याच्या जवळ येऊन अभिनंदन करीत होते व त्यांस अत्यंत आनंद झाला असे दर्शवीत होते. परंतु त्यापैकी कोणीही समोर आले की हा काही बोलावयास सुरुवात करण्यापूर्वीच त्याच्या अंतरंगात काय चालले आहे ते त्यास कळत असे. हा मेला असता तर काय बिघडले असते, असे आतल्या आत बोलणारा मनुष्य वरून मात्र सांगत असे की, फार बरे झाले, तू सुखरूप परत आलास. आम्हाला तुझी फार काळजी वाटत होती; वगैरे. असे वाटणारे निव्वळ परके इसम नव्हते तर याचे जवळचे नातेवाईक होते व म्हणून तो अत्यंत विमनस्क झाला व आपणास मिळाले हे वरदान आहे की शाप हे यास काहीच कळेना.

हळूहळू त्याच्या या नवीन सिद्धीबद्दलची हकीकत लोकांत पसरू लागली व त्यांचे कुतूहल वाढू लागले. कोणी प्रश्न विचारण्याकरिता, तर कोणी परीक्षा पाहण्याकरिता त्याजकडे येऊ लागले. आणि त्यांस वस्तुस्थिति-निदर्शक अशी उत्तरे मिळू लागली. एकदा एकाने एका साध्या कपड्यातील माणसाचे चित्र दाखवून त्याबद्दल मला काय वाटते ते सांगावयास सांगितले. (ज्या ज्या ठिकाणी प्रथमपुरुषी म्हणजे मी मला असा प्रयोग येईल तेथे त्याचा अर्थ पीटर हर्कोस असा समजावा, त्यावेळी थोडा वेळ थांबून मी सांगितले की, मी याच्या ठिकाणी एक युनिफॉर्ममधील मनुष्य पाहात आहे. त्याला तो म्हणाला की, खोटे. हा तर साधा नागरिक आहे. त्यावर मी म्हणालो की, तुम्ही काही म्हणा, मला तर हा जर्मन नाझी पोशाखातील एक ऑफिसर दिसत आहे. त्यावर याने तो फोटो हातामधून हिसकावून घेऊन तो निघून गेला. परंतु काही आठवड्यानंतर कळले की, तो फोटो त्याच्या भावाचा असून परीक्षा पाहण्याकरिता आणला होता व मी सांगितलेले अगदी बरोबर होते. कारण तो इसम डच असून नाझी एजंट होता. डच लोकांबरोबर भूमिगत राहून तो जर्मनांना बातम्या कळवीत असे. काही अकल्पित कारणाने हे उघडकीस आले व त्याची चौकशी होऊन त्यास देहांताची शिक्षा मिळाली.

या सिद्धीचा उपयोग कसा करावा यासंबंधी यास पुष्कळ वेळा मोह पडे. चोर, दरोडेखोर, लाखो डॉलर्सची संपत्ती, जड–जवाहीर कसे बरोबर नेत, कोठे लपवून ठेवीत हे यास बरोबर समजत असे. जुगारातील खेळांतील गरगर फिरणारे चाक कोणत्या नंबरावर येऊन थांबणार आहे हे त्यास नक्की कळत असे. रेसमध्ये कोणता घोडा अथवा कुत्रा येणार हे यास कित्येक दिवस अगाऊ कळत असे. इतकेच नाही तर बॉक्सिंग मॅच जी पाच महिन्यानंतर होणार होती ती कोणाकोणात होणार, व तीत कोण कितव्या फेरीत चीत होणार हे पण याला आगाऊ दिसले होते. आणि हे त्याने त्याच्या मित्रांना सांगितले होते. अशा प्रकारे सिद्धी वापरली तर ती टिकणार नाही

याची पण त्याला कल्पना होती. म्हणून त्याने स्वतःच्या फायद्याकरिता त्याच्या सिद्धीचा उपयोग केला नाही. अद्याप करीत नाही. तरीपण याच्या आयुष्यात अशा अनेक चमत्कारिक घटना घडून आल्या आहेत की, त्यासंबंधी आश्चर्य वाटल्याखेरीज राहात नाही.

(१) १९४७ साली खुनाची एक केस त्याजकडे आली. ज्याप्रमाणे ब्लडहाऊन्डला पाणी आडवे आले कीं, त्याची गती खुंटते त्याप्रमाणे कोणीही स्पर्श केलेला कपडा जर धुऊन, किंवा लाँड्रीत दिल्यानंतर त्याच्याकडे आणला गेला तर त्यास त्यापासून काही ज्ञान होत नसे. कदाचित त्या इसमाची स्पंदने त्यायोगे नाहीशी होत असली पाहिजेत. या केसमध्ये पोलिसांनी मयताचा एक कोट त्यास दिला. त्यावरून त्याने सांगितले की, खून करणारा इसम हा मध्यमवयीन असून त्याने मिशा वाढविल्या आहेत. तो चष्मा वापरीत असून त्याचा एक पाय लाकडाचा आहे; परंतु एवढ्याने पोलिसांची खात्री झाली नाही. कारण त्यांनी त्या माणसास कैद करून तुरुंगात डांबले होते. परंतु त्यांना अद्याप खून केलेल्या हत्यारांचा तपास लागला नव्हता. ते म्हणाले की, तुला नुसत्या मयताच्या फोटोवरून इतके सांगता येते तर ज्या हत्याराने मारले ते हत्यार कोठे आहे ते सांग. त्यावरून त्याने सांगितले की, ते मयताच्या घराच्या छपरावर आहे. त्याप्रमाणे त्या ठिकाणी बंदूक सापडली. तीवर खुनी इसमाच्या बोटांचे ठसे होते. त्यानुसार खटला होऊन गुन्हेगारास जन्मठेपेची शिक्षा झाली.

(२) एकदा एका संस्थेच्या मदतीकरिता पीटरचे प्रयोग ठेवण्यात आले होते. त्या ठिकाणी बऱ्याच जिनसा ठेवण्यात आल्या होत्या. त्यांत एक फोटोग्राफ पण होता. त्या संबंधात त्यास फारच चमत्कारिक व तीव्र अशा संवेदना येऊ लागल्या. त्यास नीट बोध होईना म्हणून त्याने तो फोटो हातात घेऊन, तो टेबलावर ज्याने ठेवला त्यास समोर उभे राहण्यास सांगितले. तो समोर उभा राहिल्यावर सुद्धा पीटर यास काही सुचेना. तो गोंधळून गेल्यामुळे स्तब्ध झाला. त्यामुळे जमलेला समाज अस्वस्थ झाला व काय झाले म्हणून विचारणा होऊ लागली. थोडा वेळ थांबून पीटरने त्या माणसास विचारले की, मला या फोटोपासून दोन्ही प्रकारच्या संवेदना येत आहेत. हे असे का होते ? ही व्यक्ती जिवंत आहे की त्याचे उलट मृत आहे. हे असे काय आहे ? यावर आश्चर्यचकित व्हायची पाळी त्या माणसावर आली. तो म्हणाला की तू म्हणतोस ते खरे आहे. मी तुला परीक्षा पाहण्याकरिता असे केले होते की फोटोचा खालील भाग माझ्या जिवंत भावाचा असून डोक्याच्या जागी मी दोन वर्षांपूर्वी मृत झालेल्या पत्नीच्या डोक्याचा भाग टेवून फोटो घेतला व तो परीक्षा पाहण्याकरिता म्हणून ठेवला. तुला दिसले ते अगदी बरोबर आहे. ही गोष्ट सुद्धा १९४७ सालीच घडली.

(३) सन १९५१ साली तो व त्याचा मित्र हॉलंडमध्ये एके ठिकाणी प्रयोग करण्यासाठी म्हणून गेले. सहज फिरता फिरता त्याला मनोमय सूचना आली की, या

CS CamScanner

ठिकाणी काही तासांतच मोठी आग लागणार आहे. म्हणून सूचना देण्याकरिता तो एका पोलीस ऑफिसरकडे गेला. आगाऊ काही उपाय योजना करावी म्हणून सांगू लागला. तो पोलीस ऑफिसर त्याच्यावर गुरकावला की, तुमच्यासारख्यांच्या अशा भाकड कथांवर आम्ही विश्वास ठेवू लागलो म्हणजे संपलेच. त्यानंतर याने याची नेहमीची युक्ती अमलात आणली. याने त्यास त्याच्या खिशात काय आहे हे तर सांगितलेच, पण त्याच्याजवळ उभ्या असलेल्या पोलिस-सार्जंटच्या खिशात त्याच्या मित्राचा एक फोटो असून त्यातील इसमाचे हुबेहूब वर्णन केले. त्यावरून खात्री पटून लागेल ती मदत द्यावयाचे त्याने कबूल केले. त्याच्या आसपास अलीकडेच बऱ्याच आगी लागल्या होत्या. त्या ठिकाणी हिंडता हिंडता एक चावी सापडली. ती हातात घेताच त्यास संवेदना येऊ लागल्या व त्याने सांगितले की, या आगी जर्मनांनी लावलेल्या नसून; कोणी मोठ्या माणसांनी पण लावलेल्या नाहीत. परंतु हे काम एका सहा फूट उंच अशा सोळा वर्षांच्या मुलाचे आहे. त्याने त्याच्या कपड्यांचेही हुबेहूब वर्णन केले. पोलिसांचा विश्वास बसेना; परंतु त्यांनी सांगितले की फोटो दाखविले तर त्यांतून तू ओळखशील काय ? हा होय म्हणाला व याला दाखविलेल्या फोटोंमधून बरोबर एक फोटो काढून त्यांच्या हातात दिला; त्यांत त्याचा ड्रेस वगैरे याने सांगितलेल्या वर्णनाबरहुकूम होता. मुलास धरून आणले असता त्याने सर्व नाकबूल केले व म्हणाला की मी असे का करू ? त्यावर पीटरने त्याची बाही वर करून हातावर काटेरी तारांचे ओरखडे दाखविले व ते कसे आले म्हणून विचारले. त्याने आणखी विचारले की, प्रथम एकदा एक आग लागलेली तू पाहिलीस व लोक ती विझवण्याकरिता कशी धावपळ करतात हेही तू पाहिलेस. तुला गंमत वाटली. पुनः पुन्हा असे घडावे व पुन्हा पाहावे असे तुला वाटले व तू ह्या आगी लावल्यास हे खरे काय ? अशा एका वेळी आग तुझ्या जवळ आली म्हणून तू काटेरी तारेतून बाहेर पडलास त्यावेळी तुला हे खरचटले हे खरे आहे काय ? इतके विचारल्यावर तो सरळ आला. त्याने गुन्हा कबूल केला. या आगी लावणारास पकडून देणारास २५००० गिल्डरचे बक्षीस लावले होते; परंतु ते मात्र यास देण्यात आले नाही.

(४) कोणाचा विश्वास असो वा नसो, याने सांगितलेली एक गोष्ट येथे नमूद केल्याशिवाय राहवत नाही. हे सांगण्यापूर्वी एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे : एकदा फ्रान्स सरकारचे पोलिस खाते व वैज्ञानिक यांनी; पूर्वसंकेत करून, कोणासही कळू न देता यास एकाएकी बोलावून, एक अत्यंत किचकट अशी परीक्षा घेतली होती. तीत तो संपूर्ण यशस्वी ठरल्याचे त्यांनी मान्य केले होते. यास त्याची फक्त एकच चूक दाखवली. पीटरने सांगितले होते की त्या गुन्ह्यातील कैदी मेला आहे. तसे नसून तो जिवंत होता इतकेच; बाकी सर्व अत्यंत गुप्त ठेवलेला मजकूर त्याने तंतोतंत बरोबर सांगितला होता. त्यानंतर पुन्हा असे आश्चर्य घडले की याने सांगितले त्यावेळी खरोखरीच तो कैदी गळफास लावून मेलेला होता. परंतु ती

हकीकत या परीक्षकांना माहीत नव्हती. त्याला नंतर पाच दिवसांनी ते कळविण्यात आले. इतके तावून सुलाखून निघाल्यानंतर एखादी हकिगत निव्वळ वर्तमानपत्रात आली नाही म्हणून किंवा पुढील तपासाच्या अभावी ताडून पाहिली गेली नाही म्हणून खोटी मानणे धार्ष्ट्याचे होईल.

(५) पीटर एकदा १९५२ साली स्पेनमध्ये प्रवास करीत असताना त्याला एकाएकी असे वाटू लागले की त्या गाडीत हिटलर प्रवास करीत आहे. वास्तविक त्याने आत्महत्या केली असून त्याचे प्रेतही जाळून टाकण्यात आले असे प्रसिद्ध झालेले असल्याने त्याबाबत आस्ति अगर नास्ति पक्षी असा काहीच पुरावा नव्हता व तो मेलेला आहे असाच याचा समज होता. परंतु त्यास एकाएकी असे वाटू लागले लागली की, हिटलर जिवंत असून एका साधूच्या वेशात स्पेनमध्ये फिरत आहे. ही गोष्ट याने काही मित्रांजवळ बोलून दाखविली व या गोष्टीस थोडीथोडी प्रसिद्धी मिळू लागली. तेव्हा यास दोन अनोळखी इसम भेटावयास आले व त्यांनी त्यास एकांतात नेऊन सांगितले की आतापर्यंत झाले ते ठीक झाले; यापुढे असे काही बडबडत राहिलास तर कोणत्याही क्षणी तुझ्या डोक्यातून गोळी आरपार जाईल. त्यानंतर अर्थात पीटरने स्पेन सोडले. परंतु त्याचा अद्याप असा विश्वास आहे की निदान १९५२ पर्यंत हिटलर निश्चित जिवंत होता

(६) एकदा हेगमधील भारतीय एम्बसीमधून पीटरकडे एक केस आली. मुंबईतील एका कुटुंबातील एक मुलगा गंगेवर पोहावयास म्हणून गेला. तो परतच आला नव्हता. त्याचा शर्ट व चपला काठावर सापडल्या. त्या मुलाच्या डोक्याचे केस फक्त पाठविण्यात आले होते. त्यावरून पीटर यास संवेदना आली की तो मुलगा बुडाला नव्हता. तो जिवंत असून चांगला धडधाकट होता व एका सर्कसमध्ये काम करीत असल्याचे त्याला दिसले. त्याने त्याच्या आईबापांना पुष्कळ पत्रे पाठविली होती. परंतु त्यांना एकही मिळाले नव्हते. ही हकीकत याने या कुटुंबास कळविली व एखाद्या सर्कसमध्ये तपास केल्यास तो सापडेल, त्याचा तपास मुंबईतच लागेल, असे कळविले. तीन महिन्यानंतर त्यास कळविण्यात आले की मुलगा मुंबईतच सापडला. परंतु सर्कसमध्ये नव्हता. तरीपण त्यांनी ही गोष्ट मान्य केली की त्याने कळविले त्यावेळी तो सर्कसमध्ये काम करीत होता.

(७) १९५० साली एक मनोरंजक घटना घडली. इंग्लंडमध्ये वेस्टमिनिस्टर ॲबेमध्ये एक Stone of Score म्हणून दगड होता. या दगडास इंग्लंडमध्ये फार सांस्कृतिक महत्व होते व प्रत्येक राज्याभिषेकाच्या वेळी हा दगड राज्याभिषेकाच्या खुर्चीखाली ठेवण्याचा प्रघात होता व आहे. एकाएकी हा दगड पोलीस बंदोबस्त असतानाही वेस्ट मिनिस्टर ॲबेमधून नाहीसा झाला व ही वार्ता ऐकून सर्व इंग्लंड हादरले. पोलीस तपास जारीने सुरू झाला. पण काही केल्या तपास लागेना. पोलीसखाते चिंताक्रांत झाले. त्यांना फक्त एके ठिकाणी त्यावरील माहितिफलक रस्त्यावर फेकून दिलेला

आढळला. स्कॉटलंडयार्डपैकी कोणी सूचना केल्यावरून पीटर यास बोलावून घेण्यात आले व त्यास माहितीफलक दाखविण्यात आला. याखेरीज गुन्ह्याची काही नाव-निशाणी सुद्धा पोलिसांना कोठेच आढळली नाही. त्या फलकावरून पीटरने सांगितले की लोखंडाचे दार फोडून तुफ्टन रस्त्याने तो दगड मोटारीने नेण्यात आलेला असून तो हल्ली ग्लासगोमध्ये आहे. हे काम करण्यात पाच जणांचा भाग आहे हे सांगून त्याने लंडनमधील कोणकोणत्या रस्त्याने तो दगड नेण्यात आला त्याचा नकाशा काढून दाखविला. त्याने हेही सांगितले की केवळ विद्यार्थ्यांनी ही निव्वळ खोडी म्हणून केलेली आहे. तो दगड बरेच दिवस लंडनमध्येच होता. नंतर अलीकडेच तो ग्लासगो येथे नेण्यात आलेला आहे. आणखी चार आठवड्यांत तो वेस्ट मिनिस्टर ॲबेत परत येईल. परंतु स्कॉटलंडयार्डासारख्या निष्णात पोलिसांनी पीटरसारख्याची मदत घ्यावी यावर इंग्लंडमध्ये बरीच टीका झाली. म्हणून त्यांनी त्याचा नाद सोडला. परंतु त्याने सांगितल्याप्रमाणे चार आठवड्यांत त्या दगडाचा शोध लावून तो परत आणण्यात पोलिसांना यश आले. इंग्लंडला आनंद झाला व गंमतही वाटली.

(८) नुसत्या नकाशावर हात फिरवून त्याने खाण शोधून काढल्याची दप्तरी नोंद आहे. त्याचप्रमाणे चोरी करून बागेत पुरून ठेवलेली मालमत्ता नक्की कोठे व किती फुटांवर आहे ते त्याने सांगितल्याचीही नोंद आहे.

याच इसमाबद्दल किंवा यासारख्या इतर इसमांनी अनुभविलेल्या घटना आणखी पुष्कळ सांगता येतील. परंतु मुख्यत्वे याचाच विस्तारपूर्वक उल्लेख करण्याचे कारण इतके की पीटर याला ही सिद्धी जन्मतः नव्हती तर त्याच्यामध्ये ती सुप्त होती. तिचे यास ज्ञान नव्हते. जन्मसिद्धी असली तर असे म्हणता येईल की, त्याला ती स्पेशल देणगी होती. याचे असे नव्हते. हा वयाच्या ३२ वर्षांपर्यंत अगदी सर्वसाधारण मनुष्य होता. केवळ एक अपघात झाला व त्यास एकाएकी सर्व समजू लागले. याचा अर्थ असा होतो की आपणा सर्वांत ही अगर अशा सिद्धी ठिकठिकाणी सुप्तावस्थेत वास करीत आहेत. याच्या बाबतीत यास अपघात होऊन हा आदळला गेला व त्याचा धक्का त्या सुप्तशक्तींच्या जागी जोरात बसून ती जागृत झाली व आज १९७० पर्यंत ती टिकून राहिली आहे. त्याला अपघाताने आपोआप मिळाली तर आपणासही अपघात न होता, प्रयत्न केला व तो योग्य दिशेने झाला तर ती किंवा अशीच एखादी सिद्धी प्राप्त करून घेणे अशक्य नाही, हे वाचकाच्या लक्षांत यावे व त्यानी या दिशेने प्रयत्न करावा हा हेतू. तो प्रयत्न कसा व कोणत्या दिशेने करावा असे मला वाटते, ते मी निराळ्या एका प्रकरणात सांगणार आहे. परंतु वाचकांस त्यांचा एखादा मार्ग माहीत असेल व सोयीचा वाटेल तर त्यांनी अवश्य त्याप्रमाणे करावयास सुरुवात करावी.

* * *

१२. आत्मप्रक्षेपण

प्रत्येक मानवास एक स्थूल देह व दुसरा Spirit देह असतो यासंबंधी विवेचन पूर्वीच येऊन गेले आहे. Spirit देह हा शरीर जिवंत असेपर्यंत सर्व शरीर व्यापून व लपेटून शरीराबरोबरच असतो. शरीराच्या मृत्यूनंतर तो देहापासून सुटा होऊन त्याच आकारात परंतु वायुरूपांत अदृश्य अशा स्थितीत राहतो. शरीरातून मृत्युसमयी बाहेर पडताना तो Spirt Mind त्याच्या वासनाही सर्व घेऊन बाहेर पडतो व त्यातल्या त्यात मृत्युसमयी ज्या वासना अत्यंत प्रबल असतील त्या त्याच्यात जास्त तीव्र स्वरूपात शिल्लक राहिलेल्या असतात व त्या तीव्रतेच्या कमीजास्त प्रमाणात त्याच्या Spirit Body मधील अस्तित्वाचा काळ ठरत असतो. त्यासंबंधी पुन्हा विवेचन करण्याची जरूरी नाही.

अशी स्पिरिट बॉडी असते हेच मुळी फार थोड्यांना माहीत असते व ज्यांना त्याची माहिती असते त्यांची कल्पना अशी असते की शरीर व स्पिरीट बॉडी ही एकमेकांवर सर्वस्वी अवलंबून असून एकमेकांशी संलग्न व एकमेकात सामावलेल्या असल्याने त्या एकमेकापासून वेगळ्या होऊ शकत नाहीत. परंतु प्रत्यक्ष परिस्थिती मात्र तशी नसते. मृत्यूनंतर ती ज्याप्रमाणे शरीरापासून अलग होऊन स्वतंत्रपणे आपले जीवन जगते त्याचप्रमाणे ती जिवंतपणीसुद्धा शरीरापासून अलग राहून कार्य करू शकते, व त्यासच Out of body experiences किंवा Astral projection असे म्हणतात. त्यास आपण आत्मप्रक्षेपण म्हणू या. अशा आत्मप्रक्षेपणाचा अनुभव आपणापैकी बहुतेकांस असतो. परंतु ते काय आहे हेच आपणास माहीत नसते. पुष्कळ वेळा झोपेत आपणास स्वप्न पडले असा समज होतो व प्रत्यक्ष अनुभवाच्या अभावी ते खरोखरी काय व कसे आहे याची आपणास कल्पना येत नाही. अनुभव असा की आपला स्पिरिट देह सुटा होऊन कोणास भेटून आला व त्या मित्राने तशी भेट झाल्याचे सांगितले अथवा एखाद्या न पाहिलेल्या ठिकाणी स्पिरिट देह जाऊन परत आला व त्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहिले असता परिस्थिती तशीच तंतोतंत आढळते. अशा वेळी स्पिरिट बॉडी शरीरास सोडून जाऊन आली असे कबूल करणे भाग पडते. अशी J. B. Rhine यांनी दहा हजारापेक्षा जास्त उदाहरणे पुराव्या सहित गोळा करून ठेविली आहेत. अशी प्रक्षेपणे साधारणपणे मनुष्य अत्यंत त्रासलेला असता, बाळंतपणाच्या वेळी, ऑपरेशनच्या वेळा, अत्यंत आजारीपणात किंवा मृत्युसमयी असे अनुभव जास्त येतात. काही लोकांना लहानपणापासून अशी एक प्रकारची सिद्धी असते. काही लोकांना अकारण असे अनुभव येतात; तर काहींना ती सिद्धी मिळून ते स्वेच्छेने असे प्रक्षेपण करू शकतात. त्यात पुन्हा दोन प्रकार आहेत.

प्रक्षेपण झाल्यानंतर ते कोठे जातील त्यावर त्यांचा ताबा नसतो. तर काही लोक स्वेच्छेने त्यांना हव्या त्या ठिकाणी जाऊन भेट देऊन येतात. मात्र अशा वेळी त्यांचा सिल्व्हर कॉर्ड मार्फत (त्याचा खुलासा व्याधिविमोचन या प्रकरणात आहे.) शरीराशी संबंध राहतो. शरीरातील मेंदूमार्फत बाहेर पडून कितीही लांब आपली स्पिरिट बॉडी गेली तरी ती सिल्व्हर कॉर्ड शरीरातून तिच्याशी संबंध ठेवते. काही कारणाने तो संपर्क तुटला तर शरीर मृत होते. स्पिरिट बॉडी शरीरापासून सुटी होऊन बाहेर कोठे गेली तर शरीराचे तपमान कमी होते, असा अनुभव आहे. काही लोकांच्या मते फक्त Spirit Mind स्पिरीट मनच बाहेर जाते. तसे नसून स्पिरिट मन स्पिरिट बॉडीसह बाहेर जाऊन तिच्या मार्फत कार्य करते असा अनुभव आहे.

विषय नवीन असल्याने नुसत्या तात्त्विक चर्चेने वाचकांस कदाचित फारसा बोध होणार नाही. याकरता प्रथम आत्मप्रक्षेपण Astral projection कोणत्या व किती प्रकाराने होऊ शकते, त्यात काय काय अनुभव येऊ शकतात. नंतर त्यासंबंधी काय केले म्हणजे सामान्य व्यक्तीस सुद्धा ते करणे शक्य होईल, असे करताना धोके काय आहेत व सर्वांत शेवटी आत्मप्रक्षेपण करता आले तर त्यापासून उपयुक्त असे काही करून घेणे शक्य आहे काय ? यासंबंधी विचार करू.

(A) एखाद्या व्यक्तीस अपघात होऊन तो जखमी झाला व असहाय अशा अवस्थेत पडला असता त्यास अशी तीव्र इच्छा होते की ही हकीगत आपल्या आप्त, स्नेही वगैरे मंडळीस कळून त्यांनी मदतीस यावे. अशी इच्छा तीव्र झाली म्हणजे त्याची Spirit Body बाहेर पडून त्याची इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करते. यासंबंधी काही प्रत्यक्ष घडलेल्या हकीगती बघू या.

सेंट लुई येथील एक गृहस्थ R. E. हे आपल्या मोटारीत बसून चालले होते. त्यांना एकाएकी असे आढळून आले की आपण आपला देह सोडून आकाशात गेलो असून पाठीमागून एक मोटार ट्रक आपल्या मोटारीवर धडक देण्याकरिता वेगाने येत आहे. त्यांना स्वतःचा देह मोटार चालवीत असलेला स्पष्ट दिसत होता. काही क्षणात त्या ट्रकने त्यांच्या मोटारला धडक दिलेली त्यांनी पाहिली व त्यांचा देह भयंकर जखमी होऊन मोटारबाहेर फेकला गेलेला त्यांनी पाहिला. परंतु त्यांना इजा किंवा दुःख यांची कसलीही संवेदना झाली नाही. ते अगदी त्रयस्थ भावनेने स्वतःच्या मोटारीकडे व जखमी शरीराकडे पाहत होते. त्या देहाकडे पाहून एक स्त्री किंचाळून मूर्च्छित पडली तरी त्याचे त्यांना काहीच वाटले नाही. लवकरच पोलिस व इतर बऱ्या लोकांची गर्दी जमली. त्यांच्या लोळागोळा होऊन गेलेल्या देहाभोवती कोंडाळे करून लोक उभे असलेले त्यांनी पाहिले. त्यांना तरीसुद्धा नुसती गंमत वाटत होती. कसलेही शारीरिक दुःख वाटत नव्हते. त्या जमलेल्या गर्दीत एक डॉक्टर होते. त्यांनी इंजेक्शनची एक सुई काढून त्यांच्या अंगात कसलासा द्रव टोचलेला

त्यांनी पाहिला व काही क्षणातच ते त्या जखमी देहात संपूर्ण समाविष्ट होऊन देहास होणाऱ्या दुःखाच्या संवेदना अनुभवू लागले.

(२) K. L. नावाचे एक गृहस्थ एका चौदा फूट खोल खंदकात एक मोठा नळ जोडण्याचे काम करीत होते. सायंकाळचे चार वाजले व त्यांचे सर्व सहकारी आपापले काम आटोपून निघून गेले. K. L. यांनी ठरविले की थोडा वेळ झाला तरी हरकत नाही, परंतु हातातील काम पूर्ण करून जावे. अर्धा तास झाला असेल नसेल तोच आवाज न करता खंदकाभोवतालची माती खड्ड्यात येऊन पडू लागली व काही क्षणातच ते मातीच्या ढिगाऱ्याखाली पुरले गेले. अंगावर माती कोसळत असता ते गुडघ्यावर वाकून पडले त्यामुळे पोकळी राहून त्यांना हवा मिळू शकत होती. त्यावेळी त्याना प्रकर्षाने आपल्या पत्नीची आठवण झाली. तिने व आपल्या मुलांनी मदतीस यावे असे वाटले. क्षणातच त्यांना आढळून आले की ते पत्नीजवळ उभे असून ती स्वयंपाकाचे साहित्य करण्यात गुंतलेली आहे. त्यांनी तिला स्पर्श करून आपण आल्याची जाणीव देण्याचा प्रयत्न केला. तिने चमकून मागे वळून पाहिले व भूत दिसले म्हणजे होते त्याप्रमाणे एक मोठी किंकाळी फोडली. तेथे काही उपयोग होत नाही असे पाहून वेल्डिंगचे काम करणारा त्यांचा एक B. J. नावाचा मित्र होता, त्याच्याकडे जावे असे त्यांना वाटले. काही क्षणांतच त्यांना असे आढळले की आपण त्याच्याजवळ उभे आहोत. त्याच्या हातावरील घड्याळात त्यांना ४·४५ झालेले दिसले. यावरून अपघात होऊन पंधरा मिनिटे झाली आहेत याची त्यांना जाणीव झाली. थोड्याच वेळात B. J. यांना यांचा मित्र K. L. जवळच उभा असलेला दिसला. त्यांचा Spiritualism चा थोडा अभ्यास होता. यावरून त्यांना कल्पना आली की आपला मित्र K L. काही भयंकर संकटात आहे. तो कोठे काय करीत आहे हे त्यांना माहीत होते; ते लागलीच त्या ठिकाणी गेले. मातीच्या ढिगाऱ्याबाहेर त्यांना K. L चा हात दिसला. त्यांनी लागलीच लोक जमवून ढिगारा उपसून K. L. यांना जिवंत बाहेर काढले. B. J. यांना या विषयाचे ज्ञान असल्याने K. L. यांचे प्राण वाचले.

(३) रेव्हरंड बर्नार्ड नावाचे एक पाद्री काही विद्यार्थ्यांच्या तुकडीला घेऊन पर्वतरोहणाला एक मार्गदर्शक घेऊन गेले होते. वाट चालताना ते थोडे पुढे येऊन विद्यार्थ्यांची वाट पाहू लागले विद्यार्थी लवकर येईनात. यांच्यावर थंडीचा परिणाम होऊन आपण बेशुद्ध होत आहोत असे त्यांना वाटू लागले. परंतु लवकरच आपण देहापासून सुटे होऊन अंतराळात फिरत आहोत असे त्यांना आढळून आले. तेथून त्यांनी पाहिले तर विद्यार्थी वाट चुकून लांबच्या वाटेने येत आहेत व त्यांचा गाईड एका खडकाआड बसून त्या पाद्रीसाहेबासाठी आणलेले खाण्याचे सामान खाण्यात गुंग झालेला दिसला. नंतर त्यांना त्यांच्या पत्नीस भेटावे असे वाटले. त्यांची पत्नी तीन दिवसानंतर निघणार होती. परंतु बेत बदलून चार जण बरोबर घेऊन ती त्याच

दिवशी निघाली होती व एका हॉटेलमध्ये खाना घेताना दिसली. हे पाहून परत ते आपल्या देहाकडे येऊन पाहातात तर विद्यार्थी मंडळी व गाईड त्यांचे शरीर चोळून ऊब आणण्याचा प्रयत्न करीत होते. लवकरच ते परत शरीरात खेचले गेले व शुद्धीवर आल्यावर त्यांनी विद्यार्थ्यांस ते कसे चुकले होते व कोणत्या रस्त्याने जात होते ते सांगितले. तसेच त्या गाईडलाही त्याने फराळाचे चोरून खाल्ले म्हणून आपले व पत्नीसही ती कशी व कोणाबरोबर निघून कोठे थांबली होती त्याचे वर्णन केले. यावरून त्या सर्वांना आश्चर्य वाटून त्यास काही सिद्धी प्राप्त झाली असली पाहिजे असे वाटले.

(४) अर्नेस्ट हेमिंग्वे याला पण १९१८ साली त्याच्या वयाच्या १९ व्या वर्षी एका मॉर्टर डील ने दुखावले होते. त्या वेळी असाच अनुभव आला होता. त्याला वाटले की आपला मृत्यू झालेला असून आपला प्राण शरीराबाहेर निघून फिरत आहे. अशी काही वेळ भ्रमंती केल्यावर त्यांना शरीरात परत प्रवेश केल्यासारखे वाटले व अजून मृत्यू झाला नसून जिवंत आहोत असा अनुभव आला.

(B) ज्याप्रमाणे अपघात झाला म्हणजे असे आत्मप्रक्षेपणाचे अनुभव येतात, त्याचप्रमाणे शरीरास अत्यंत दुःख झाले म्हणजेही किंवा होत असले म्हणजेही आत्मप्रक्षेपण घडून येते.

(१) एड मॉरेल या नावाचा एक गुन्हेगार जेलमध्ये होता व त्याच्यावरील अधिकारी, कैद्यांना त्रास देण्यात आनंद मानीत. निरनिराळ्या प्रकारांनी ते कैद्यांचे भयंकर हाल करीत असत. ते मॉरेल यास एका कॅन्व्हस जॅकेटमध्ये घालून वर पाणी ओतीत व नंतर ते जॅकेट आकसू लागले की मॉरेलला वेदना होत. त्या वेदना सहन होईनाशा झाल्या की मॉरेल याची स्पिरीट बॉडी शरीराबाहेर पडून त्याचे हाल निर्विकार मनाने पाहत असे. त्या स्थितीत त्याची स्पिरीट बॉडी पुष्कळ ठिकाणी हिंडून येई. एकदा त्याने एक जहाज बुडताना पाहिले व त्याचे सांगोपांग वर्णन केले. एकदा स्पिरिट स्वरूपात असताना त्याने त्या प्रांताच्या गव्हर्नरांना आपल्या सुटकेची नक्की तारीख सांगितली. दिवसचे दिवस या जॅकेटमध्ये ठेवूनही मॉरेल काहीच कबूल होत नाही, हे पाहून जेलच्या अधिकाऱ्यांना फारच आश्चर्य वाटत असे. परंतु प्रत्येक वेळी जेव्हा जेव्हा त्यास फार त्रास होई तेव्हा तो देहापासून सुटा होऊन बाहेर हिंडत असे. त्यामुळे त्यास त्रास असा मुळीच जाणवत नसे. मात्र ज्या वेळी ते त्यास त्रास देत नसत, त्या वेळी इच्छा असून व प्रयत्न करूनही त्याला आपला देह सोडता येत नसे.

(२) त्याचप्रमाणे २७-५-१९६२ रोजी दोन बहिणींना असाच अनुभव आला. त्यांची नावे व्हिक्टोरिया व इसाबेल अशी होती. त्यांचे असे ठरले होते की, इसाबेलाच्या बाळंतपणाच्या वेळी व्हिक्टोरियाने तिच्याकडे यावे. मे १९६२ मध्ये वरील तारखेस व्हिक्टोरिया आपल्या खोलीत बसली असताना तिचा कुत्रा एकाएकी कान वर करून पाहू लागला व एखाद्या ओळखीच्या इसमास पाहिल्यावर करावे तसे करू लागला. थोड्याच वेळात समोर एक धुरकट अशी आकृती दिसू लागली. तिच्या

आकारावरून ती इसाबेल सारखीच तिला वाटली. परंतु थोड्याच वेळात वेळात ती नाहीशी झाली. पुढे इसाबेलाच्या नवऱ्याचे पत्र आले की इसाबेलाचे अपेक्षित बाळंतपण २१ दिवस पुढे असताना अपुऱ्या दिवसांचे २७ ५-१९६२ रोजी झाले. त्या वेळी तिला अत्यंत त्रास झाला व ती त्या वेळी तुझी सारखी आठवण करीत होती. हे पत्र मिळाल्यानंतर तिला सर्व उलगडा झाला.

(C) अत्यंत आजारी असताना, त्याचप्रमाणे एखाद्या मोठ्या ऑपरेशनच्या वेळी मनावर ताण पडूनसुद्धा पुष्कळ वेळा आत्मप्रक्षेपण घडून येते.

१. एका डॉक्टरांना (ज्यांना आपलें नाव प्रसिद्ध करावयाचे नाही.) २६ फेब्रु. १९३७ रोजी गॅस्ट्रोचा विकार झाला, व दुसऱ्या दिवशी दहा वाजेपर्यंत त्यांची मरणासन्न स्थिती झाली. त्यांना जरी खूप अशक्तपणा आला होता व दुःख होत होते तरी त्यांची विचारशक्ती पूर्णपणे जागृत होती. त्यांना लवकरच असे आढळून आले की त्यांच्या Conciousness संवेदनेचे दोन भाग झाले असून, एक शरीराबरोबर होता तर दुसरा भाग शरीराबाहेर सुटा होऊन बाहेरील दृश्ये पहू लागला होता त्यांचे शरीर बिछान्यावर पडलेले ते स्पष्ट पहात होते. ते नुसते स्वतःचेच शरीर पाहात होते असे नसून, घरातील सर्व वस्तू त्यांना स्पष्ट दिसत होत्या. त्यांनी इच्छा केल्याबरोबर ते इंग्लंड, स्कॉटलंड किंवा इतर कोणतीही दृश्ये पाहू शकत होते. त्यांना एक स्पिरिट गाईड भेटला व त्याने त्यांना जाणीव करून दिली की ते आता स्वतंत्र असून कालावकाशाच्या पलीकडे चवथ्या व पाचव्या Dimension मध्ये वावरू शकत आहेत. त्यांना प्रत्येक मानवाच्या डोक्याभोवती असे काही बाहेर आलेले दिसू लागले की त्याच्या योगाने प्रत्येक जण कालावकाश ओलांडून चवथ्या वा पाचव्या Dimension मध्ये जाऊ शकेल. इकडे त्यांच्या शरीरात जी संवेदना राहिली होती, तिच्या योगाने त्यांचा देह टेलिफोनकडे गेलेला त्यांनी पाहिला. तो एका डॉक्टरांना हकिगत कळवीत असलेला आढळला. लवकरच एक डॉक्टर आले व त्यांनी त्यांचे शरीर तपासून इंजेक्शन देण्यास सुरवात केली. इंजेक्शन देणे चालू असताना त्यास आपण शरीरात परत खेचले जात आहोत असे आढळून आले व ते काही क्षणांतच परत शरीरात येऊन समाविष्ट झाले.

२. सुप्रसिद्ध मानसतज्ज्ञ श्री. जुंग यांनी आपला एक अनुभव दिला आहे. त्यांच्या एका पायाचे हाड मोडले होते व हृदयविकाराचा झटका आला होता. त्या वेळी त्यांना आपण शरीरापासून सुटे होऊन अंतराळात फिरत असल्याचे दिसले. पृथ्वी खूप खाली गोल अशी निळ्या प्रकाशात चमकत असलेली दिसू लागली. त्यांच्या पायाखाली सिलोन व दूर अंतरावर हिंदुस्थानचा काही भाग दिसत होता. त्यांना पृथ्वीचा सर्व गोल दिसत नव्हता; पण जो भाग दिसत होता त्याचा गोलाकार स्पष्टपणे प्रतीत होत होता. त्यांना अरबस्थानचे वाळवंट, लाल समुद्र व भूमध्य समुद्राचा काही भाग स्पष्ट दिसत होता. त्यावेळी त्याचे पृथ्वीपासून अंतर कमीतकमी एक

हजार मैल तरी असावे. त्यांनी असे खात्रीपूर्वक विधान केले की हा माझ्या मनाचा खेळ नसून, खरोखरीच घडलेली घटना आहे.

३. मिडवेस्टमधील एका स्त्रीची ही हकीगत आहे. हिच्या बाबतीत तिच्या ऑपरेशनच्या वेळी नुसत्या प्रक्षेपणाशिवाय आणखी काही गोष्टी घडल्याचे तिने निवेदन केले. तिला डॉक्टरांनी ऑपरेशनबद्दल काहीच कल्पना दिलेली नव्हती. परंतु आपसात चर्चा करून ते काहीतरी ठरवीत आहेत हे तिने पाहिले व डॉक्टर सांगतात त्यापेक्षा काहीतरी विशेष असले पाहिजे याची तिला कल्पना आली. तिला चाके असलेल्या एका टेबलावर ठेवण्यात आले असल्याचे तिने पाहिले. तिला थोडे गरगरल्यासारखे झाले व आपण स्वतः एखाद्या गोल बलूनसारख्या असून, एका चमकत्या चकचकीत दोऱ्यासारख्या पदार्थाने शरीराशी संपर्क ठेवीत आहोत असे दिसू लागले. खाली टेबलावरील शरीर व दोन्ही नर्सेस तिला स्पष्ट दिसत होत्या. थोड्या वेळात तिचा डॉक्टर आला व तिला तपासून त्याने टेबल ताबडतोब ऑपरेशन हॉलमध्ये घेऊन जाण्यास सांगितले. तिला वाटले काही तरी भयंकर घडले आहे. बहुतेक शरीराचा अंत झाला असावा असे तिला वाटले. एकाएकी तिला मृत्युसमयी वाजवितात तसा घंटानाद ऐकू येऊ लागला. परंतु दुरून एक आवाज आला की—नाही अजून नाही—आणि तिला आपणास कोणीतरी वरवर खेचीत आहे असे वाटले व तिचा बलूनचा आकार जाऊन मूळ स्वरूप प्राप्त झाले आहे व तिच्याभोवती चमकत असलेल्या पुष्कळ व्यक्ती वावरत असलेल्या तिला दिसू लागल्या. त्या ज्यांना देवदूत किंवा Angels म्हणता येईल. त्याप्रमाणे दिसत होत्या. त्यापैकी एकाने सांगितले की तुला येथे थोडा वेळ थांबता येईल, पण तुला परत जावे लागेल. तिला त्या ठिकाणी बागबगिचे, हिरवी शेते, झुळझुळ वाहणारे ओढे वैगेरे सर्व अत्यंत रमणीय दिसत होते. तिला वाटले की आपले आईबाप भेटले तर किती बरे होईल, त्याक्षणीच ते दोघे तिच्या बाजूस उभे असलेले दिसले. ते मृत्युसमयी होते त्यापेक्षा बरेच तरुण दिसत होते व त्यांच्या डोळ्यात भेटीच्या आनंदाचे अश्रू दिसत होते. तिला आपण आपल्या आई वडिलांबरोबर तासचे तास बोलत आहोत असे वाटले व हे चालू असतानाच त्या देवदूतांपैकी एकाने जवळ येऊन सांगितले की, ‘ वेळ संपली आहे; आता परत गेले पाहिजे. ’ हे तिला सांगितले जात आहे तोच तिला असे आढळले की, ती हॉस्पिटलच्या तक्तपोशीजवळ असून एक पाद्री तिच्याकरता शेवटची प्रार्थना म्हणत आहे. तिचा नवरा तिच्या शरीराजवळ रडत उभा असलेला तिला दिसला. अजून तुझी वेळ आलेली नाही असा आवाज तिला पुन्हा ऐकू आला व ती शरीरात पुन्हा प्रविष्ट झाल्याचे तिला आढळून आले. ती नुकत्याच संपविलेल्या ऑपरेशनच्या दुःखाने कण्हू लागली. तिने डोळे उघडले, त्या वेळी तिचा नवरा व पाद्री हसत आहेत असे तिला आढळून आले.

(D) मृत्युसमयी, त्यातल्या त्यात शेवटच्या काही क्षणात अशा प्रकारचे विविध अनुभव दृष्टोत्पत्तीस येतात. मृत्युसमयीच्या प्रक्षेपणाचे वैशिष्ट्य असे असते की, मर-

गाऱ्याचा स्पिरिट देह इतक्या तीव्रतेने व इतरांपेक्षा निराळ्या अशा वैशिष्ट्यपूर्ण रीतीने बाहेर पडतो की त्याचे दर्शन इतरांस तर होतेच, परंतु त्याचा स्पर्शही पुष्कळदा जाणवतो व त्याचे संभाषणही प्रत्यक्ष होऊ शकते. इतर प्रक्षेपणात हे सहसा आढळत नाही.

कन्नासमधील स्किर्डी येथील डॉ. विल्टसे यांनी हा अनुभव घेतला आहे. ते आजारी होते व अगदी मृत्युसमयी त्यांना वाटले की त्यांचा शरीराशी काही संबंध राहिला नाही. स्वतःच्या टाळूतून ते संपूर्णपणे बाहेर पडले असून संपूर्ण वस्त्रविरहित होते. ते खाली वर भिंतीतून अडथळा न होता कोणीकडेही जाऊ शकत होते. एकदम त्यांना अशी संवेदना आली की त्यांच्या शरीरावर कपडे घातले गेले आहेत. खालील रस्ता आता स्वच्छ व चांगला दिसत होता. त्यांचे दोन स्नेही उभे असलेले त्यांनी पाहिले. परंतु त्यांना यांच्या अस्तित्वाची जाणीव झाली नाही. त्यांच्या शरीरातून ते पलीकडे सहज जाऊ शकले. मात्र अद्याप ते डोक्यातून निघालेल्या सिल्व्हर कॉर्डशी संलग्न होते. त्यामुळे थोड्या वेळातच परत शरीरात येऊन आपल्या बिछान्यावर आहोत याची त्यांना जाणीव झाली.

(E) झोपेत आपली Spirit Body पुष्कळ वेळा शरीराबाहेर जाते व इकडेतिकडे फिरून येते. परंतु एक तर आपण या विषयात अनभिज्ञ असतो व आपण त्याचे वर्णन आपणास अशा अशा प्रकारचे स्वप्न पडले होते, असे करतो. परंतु प्रत्यक्षात बहुतेक सर्व व्यक्तींच्या आयुष्यात असे काही प्रसंग येतातच की त्यांची स्पिरिट बॉडी कारणपरत्वे शरीराबाहेर पडून काही वेळ बाहेर काढून परत शरीरात आलेली असते. अशा वेळी कधी कधी असे घडते की आपल्या ओळखीची एखादी व्यक्ती काही करीत असते. ती व्यक्ती परगावी असते वा त्यावेळी काय करीत आहे हे कळण्याचा संभव नसतो. अशा काही हकीकती झोपेत असताना पाहून सांगितल्या व त्याचे प्रत्यक्ष प्रत्यंतर आले म्हणजे ते स्वप्न नसून प्रत्यक्षात घडतेली हकीकत आहे याची खात्री पटते. अशी उदाहरणे शेकडो आहेत. त्यापैकी नमुन्यादाखल म्हणून एक–दोन देत आहे. त्यावरून निदान आपल्या देहाखेरीज स्पिरिट-बॉडी म्हणून काही आहे व शरीर निद्रितावस्थेत असून काही करीत नसले तरीही स्पिरिट बॉडी निराळी असून स्वतंत्रपणे कार्य करू शकते याची खात्री पटते.

१. अलास्कामधील R. R यांचे एक दुकान होते व त्यात T. C. म्हणून एक नोकर ठेवलेला होता. एके दिवशी दुपारी R, R, दुकानाचे काम आटपून थोडा वेळ विश्रांती घ्यावी म्हणून वरच्या मजल्यावर जाऊन झोपले. थोडी झोप लागताच त्यांना वाटले की आपण आपल्या देहातून सुटे झालो असून कशाचाही अडथळा न येता, दारे, खिडक्या व भिंती यांमधून वावरू शकत आहोत. खाली दुकानात काय चालले आहे म्हणून विचार येताच ते स्पिरिट स्वरूपात दुकानात येऊन दाखल झाले व पाहतात तो त्यांचा नोकर T. C. त्याच्या एका मित्राबरोबर दुकाना-

तील खाऊ खाण्यात गुंग आहे. T. C. च्या मित्राने विचारले की, असे करण्याने तुझा मालक रागावणार नाही काय ? त्यावर T. C. म्हणाला की तो वरच्या मजल्यावर स्वस्थ झोपला आहे. त्याची काळजी नको. इतक्यात R R. यांना वाटले की निदान त्यांच्या पत्नीने दुकानात येऊन काय चालले आहे ते पाहावे. असे वाटताच त्यांची स्पिरिट बॉडी पत्नी होती त्या ठिकाणी जाऊन पोचली. ती एका हॉटेलात चमचमीत पदार्थांवर ताव मारीत होती. ती नेहमी घरी असताना तक्रार करीत असे की तिला भूकच लागत नसे. त्यानंतर त्यांची स्पिरिट बॉडी परत शरीरात जाऊन त्यास जाग आली त्यावर त्यांनी त्यांचा गुमास्ता T. C यास बोलावून चोरून खाण्याबद्दल विचारले. त्यावर तो टंगळमंगळ करीत असता त्यांनी T.C.याने व त्याच्या मित्राने कोणते पदार्थ किती खाल्ले, त्याचप्रमाणे त्यांची पत्नी घरी परत आल्यावर तिने हॉटेलमध्ये कोणकोणत्या पदार्थांवर ताव मारला ते सविस्तर सांगितले; त्यावरून त्या दोघांची खात्री झाली की R, R, यांना काही तरी विशेष सिद्धी असली पाहिजे.

२. सिटी ऑफ लिमार्क या बोटीने (Wilmot) विल्माट नावाचा एक व्यापारी लिव्हरपूलहून न्यूयॉर्कला यावयास निघाला होता. मध्यंतरी समुद्र थोडा खवळला असल्याने, त्यांना थोडा त्रास झाला. अशा परिस्थितीत तो व त्याचा एक सहप्रवासी कॅबिनमध्ये झोपलेला असताना त्याला एक स्वप्न पडल्यासारखे वाटले की, त्याची पत्नी तेथे येऊन त्याच्या अंगावरून हात फिरवीत आहे व त्याचा मुका घेत आहे. त्याला वाटले की, त्यास हे केवळ एक स्वप्न पडले. परंतु त्याचा सहप्रवासी हे सर्व पाहात होता. तो दुसऱ्या दिवशी म्हणाला की तू फार भाग्यवान आहेस. तू निजलेला असताना एक तरुण सुंदर स्त्री तुझा मुका घेत असलेली मी पाहिली. या सर्व गोष्टींचा त्यास उलगडा होईना. तो घरी पोचल्यावर त्याच्या पत्नीने सांगितले की एके रात्री निजताना तिला आपल्या पतीस भेटण्याची उत्कट इच्छा झाली व तिला स्वप्न पडले की, त्याप्रमाणे ती जाऊन भेटली. तारीख व वेळ पाहता तंतोतंत जमली. यावरून स्पिरिट देहाने जाऊन ती भेटून आली. इतकेच नाही तर तिच्या स्पिरिट देहाने शरीराचे स्वरूप व आकार पण घेतलेला होता म्हणून त्याच्या सहप्रवाशासमुद्धा ते दृश्य दिसू शकले.

(F) आतापर्यंत आपण सहजासहजी किंवा काही प्रसंगाने परंतु स्वतः इच्छा न करता, अनुभव आलेली आत्मप्रक्षेपणाची उदाहरणे पाहिली. परंतु काही व्यक्तींना स्वतः इच्छा केली असता आत्मप्रक्षेपण करून कोठे काय चालले आहे ते बिनचूक पाहता येते व यास फार महत्त्व आहे. तसे न करता आले तर नुसते असे होते हे कळण्यात काहीच महत्त्व नाही. ती एक निव्वळ करमणूक वाचावयास मिळाली; यापलीकडे त्याचे फारसे महत्त्व नाही. असो.

१. पहिल्या जागतिक युद्धाच्या वेळची ही हकीकत आहे. एका जर्मन शिपायाला

इच्छा होई त्या वेळी स्पिरिट देहाने कोठेही जाऊन काय चालले आहे ते पाहून येण्याची सिद्धी होती. त्याने एकदा त्याच्या वरिष्ठास सांगितले की, तो फ्रेंच कँपात गेला होता व त्यांनी जर्मनीवर प्रतिहल्ला चढविण्याची अमुक अमुक तारीख व वेळ निश्चित केली आहे. हे याला कळणे शक्य नाही व तो काहीतरी सांगत आहे असे समजून त्याच्या वरिष्ठांनी तिकडे दुर्लक्ष केले. परंतु तो वारंवार सांगू लागला. यावरून त्यास विचारले की यात पुरावा काय ? तुला जर अशी सिद्धी असेल तर काही किलोमीटर अंतरावर असलेल्या आपल्याच कँपात जाऊन तेथे काय चालले आहे ते पाहून येऊन आम्हास सांग. म्हणजे आम्ही टेलिफोनने खात्री करून घेऊ. यावर तो बरे आहे असे म्हणाला व खंदकात जाऊन पांघरुण घेऊन काही मिनिटे झोपला. काही मिनिटांतच परत येऊन, एक ऑस्ट्रियन जनरल नुकताच आला असून, त्याने काय काय हुकूम सोडले, ते शब्दशः त्याने सांगितले. त्याची अधिकाऱ्यांनी नोंद करून टेलिफोनने ही हकीकत खरी आहे काय म्हणून कँपामध्ये विचारणा केली. त्याच्यापेक्षा कँप अधिकाऱ्यांना जास्त आश्चर्य वाटले; कारण त्यांनी सांगितले की त्या जनरलने सांगितलेले हुकूम अत्यंत गुप्त स्वरूपाचे असून, त्यासंबंधी अद्याप कोणाकडून सुद्धा उल्लेख करण्यात आलेला नाही; असें असता तुम्हास कसे कळले ? काही फितुरी वगैरे आहे की काय ? त्यांना नंतर खरी हकीकत सांगण्यात आली.

२. S. N. Beard नावाचे एक गृहस्थ अमेरिकेत होते व त्यांचे मिस् व्हेरिटी नावाच्या मुलीशी लग्न ठरले होते. एके दिवशी बियर्ड यांनी इच्छा केली की व्हेरिटी इला जाऊन भेटावे. लागलीच ते ती असलेल्या खोलीत दाखल झाले. वेळ रात्रीची होती. दारे बंद होती व झोपावयाची वेळ झाली होती. अशा वेळी कोणी मनुष्य तिच्याजवळ उभा आहे असा तिला भास झाला व थोड्याच वेळांत तो बियर्ड आहे असे तिला दिसले. तिने किंकाळी फोडली. त्यासरशी तिची धाकटी बहीण तेथे आली; तीसुद्धा ते दृश्य पाहून ओरडू लागली. त्याबरोबर मंडळी गोळा होऊं लागली तशी बियर्डची प्रतिमा अस्पष्ट होत होत नाहीशी झाली. त्याचे काही बरें वाईट झाले असेल अशा शंकेने त्या मुलीला काळजी वाटू लागली पुढे तो प्रत्यक्षच आला असता त्याने सर्व हकीगत समजावून सांगितली. तो अस्पष्ट होईपर्यंत बियर्ड पारदर्शक वगैरे दिसत नसून प्रत्यक्ष हाडामांसाचा देहधारी असा दिसत होता. याप्रमाणे बियर्ड याने श्री. गुर्नी यांना प्रथम सांगून त्या ठरलेल्या वेळी त्यांना स्पिरिट देहाने भेट दिली व त्यावेळी त्यांना नुसते दर्शन दिले, एवढेच नाही तर त्यांचे केस ओढून प्रत्यक्ष खात्री करून दिली.

(G) काही वेळी यापेक्षा थोडे निराळे परंतु असेच आत्मप्रक्षेपणाचे प्रकार घडून येतात किंवा घडवून आणता येतात. त्यास Autoscopy असे म्हणतात. याचा अर्थ स्वतःची प्रतिमा स्वतःसमोर स्पिरीट बॉडीच्या स्वरूपात पाहणे किंवा तयार करणे.

१. गाय डे नावाचे एक गृहस्थ सांगत की, जेव्हा जेव्हा ते कामावरून घरी परततात त्या त्या वेळी त्यांच्या खुर्चीत कोणीतरी बसलेले आहे असे त्यांना दिसे. जवळ जाऊन पाहता ती प्रतिमा स्वतःचीच आहे असे आढळून येई. मात्र ते स्वतः परत आल्यावर ती प्रतिमा नाहीशी होत असे.

२. प्रसिद्ध जर्मन कादंबरीकार गटे यांना असे अनुभव कधी कधी येत असल्याचे त्यांनी नमूद करून ठेवलेले होते. ते एकदा घोड्यावर बसून त्यांच्या मैत्रिणीकडे जात असता त्यांना थोड्या निराळ्या तऱ्हेने स्वतःचीच प्रतिमा रस्त्यात भेटली होती.

३. १९२९ साली सर ऑलिव्हर लॉज यांना आर्चबिशप फ्रेडरिककडून एक पत्र आले; त्यात त्यांनी लिहिले होते की, १४ जानेवारी रोजी सायंकाळी इझीचेअरवर असताना त्यांना झोपेची डुलकी आली होती. पंधरा मिनिटांनी उठून पाहतात तो त्यांना असे आढळून आले की, त्यांचीच प्रतिकृती अशी एक व्यक्ती, मात्र पारदर्शक व प्रकाशयुक्त अशी त्यांच्याकडेच कुतूहलाने व आनंदाने पाहात होती. त्यांनी दोघांनी एकमेकांकडे पाच दहा सेकंद पाहिले असेल नसेल तोच त्यांची ती स्वतःची प्रतिमा नाहीशी झाली. यास Doppelganger असे जर्मन नाव आहे. परंतु यास Autoscopy असे इंग्लिशमध्ये म्हणतात व हा एक आत्मप्रक्षेपणाचाच प्रकार समजला जातो.

४. असेच अनुभव शिकागोचे श्री. हॅरोल्ड, कनासचे श्री. सॅम्युयेल व श्रीमती जेनी पी यांनी दिलेले आहेत. त्यांना असा अनुभव होता की आपण हात हालविला तर ती प्रतिमा तोच हात तसाच हालवी व अगदी आपण करू त्याच हालचाली करीत असे व मिसेस जेनी यांनी त्या प्रतिमेस बोटाने स्पर्श करण्याचा प्रयत्न केला तर प्रतिमेने पण तेच केले (आरशाप्रमाणे) यासंबंधी खुलासा देण्याचा वैज्ञानिकांनी प्रयत्न केला आहे; परंतु तो सर्वांस पटेल असा शास्त्रीय नाही कारण त्यांचे म्हणणे असे की आपली स्मृती (Memory) च प्रक्षेपित होते व स्वतःला पाहिल्याचा भास होतो. तर मग ती प्रतिमा जवळपासचे दुसरे लोक पाहू शकतात याचे काय ?

५. नॉर्वे देशात यासारखाच परंतु थोडा निराळा प्रकार काही ठिकाणी अनुभवास येतो. ऑफिसचे किंवा कसलेही काम संपवून मनुष्य घरी यावयास निघाला की तोच पोचण्याच्या सुमारे दहा पंधरा मिनिटे अगोदर, त्याच्या घराच्या घंटी वाजते बूट काढल्याचा, काठी टोपी अडकविल्याचा आवाज येतो व खुर्चीवर कोणीतरी येऊन बसल्यासारखे वाटते. नवख्या माणसास कोणी तरी आले आहे असे वाटून, कोण आले म्हणून पाहावयास बाहेर येतो. परंतु तेथल्या राहाणाऱ्यास माहीत असते की येणाराची ही नुसती पूर्वसूचना आहे. नंतर दहा पंधरा मिनिटांनी ती व्यक्ती प्रत्यक्ष येऊन घंटी वाजविण्यापासून पुन्हा सर्व तोच प्रकार—मात्र आता प्रत्यक्षात घडून येतो.

६. हॅरी हॉप बॉबर हे याप्रमाणे आत्मप्रक्षेपण करतात. त्यांत त्यांची जी प्रतिमा असते ती त्यांच्याप्रमाणे हाडामासाची नसली तरी तिला स्पर्श करता येतो व

ती त्यांच्याप्रमाणे कामे पण करू शकते. विशेष म्हणजे ही प्रक्षोपणविद्या त्यांनी पुस्तके वाचून त्यातील सूचनांप्रमाणे प्रॅक्टिस करून आत्मसात केली. त्यांच्या बाबतीत असे म्हणता येईल की त्यांनीं एकदा आत्मप्रक्षेपण केले की त्यांच्या बाहेर पडलेल्या त्या स्पिरिट शरीरास स्थळ काळाचे बंधन नसते. स्थलांचे बंधन नसते हे तर आपण पुष्कळ उदाहरणात पाहिले आहे. कारण प्रक्षेपकाने इच्छा केली की तत्क्षणीच ती व्यक्ती पृथ्वीतलावर कोठेही असली तरी तेथे त्यास जाता येते. यांच्या बाबतीत यांनी असा प्रयोग केला की आत्मप्रक्षेपण करीत असताना अथेन्स शहर दोन हजार वर्षीपूर्वी कसे असावे ते पाहण्याची इच्छा केली तर त्यांचा स्पिरिट देह लगेच अथेन्स शहरी तर गेलाच, परंतु ते शहर चालू जमान्यातील नसून इतिहासात वर्णन केल्याप्रमाणे जुन्या इमारती, माणसे, त्यांचे पोषाख हत्यारे वगैरे सर्व त्यांना जुनीच दिसू लागली. याप्रमाणे गतकालात जाता येणे शक्य झाले तर इतिहासाची किती तरी प्रमेये सहज सुटतील; मात्र या सर्व उदाहरणात भविष्यकालात कोणी स्वतः प्रक्षेपित करून काही अनुभव सांगितल्याचे कोठे नमूद केल्याचे निदान माझ्या आढळात नाही.

(H) आत्मप्रक्षेपणाचे आणखी काही प्रकार आहेत. कदाचित त्यांना सारखेसुद्धा म्हणता येईल. त्यांना इंग्रजीत Bilocation आणि Teleportation बायलोकेशन म्हणजे एकच व्यक्ती एकाच वेळी दोन किंवा आधिक ठिकाणी असणे व टेलिपोर्टेशन म्हणजे एखादी व्यक्ती एखाद्या ठिकाणाहून नाहीशी होऊन दुसऱ्या ठिकाणी प्रकट होणे. यास दुसरे नाव Dematerializatiou व Remarerialization असेही म्हणतात. यापैकी बायलोकेशनचे प्रकार आपल्याकडील साधू, संन्यासी वगैरेंच्या बाबतीत पुष्कळ वेळा सांगण्यात येतात व त्यांचा आढळ त्यांच्या चरित्रग्रंथातून आढळतो. हुमणाबादचे श्री माणिकप्रभू, अक्कलकोटचे स्वामी, नृसिंहसरस्वती, इंदोरचे श्री माधवनाथ महाराज वगैरेंच्या चरित्रग्रंथात अशा पुष्कळ गोष्टी आढळतात. परंतु त्यासोबत इतर आणखी इतक्या काही चमत्कारांची गर्दी केलेली असते की, त्यातील खरे–खोटे निवडणे शक्य होत नाही. हे अगदी निर्विवाद आहे की वर नमूद केले आहेत त्यांनीच काय आणखी इतर पुष्कळांनी अशा गोष्टी कारणपरत्वे केलेल्या आहेत व आजही करीत आहेत. परंतु दुर्दैवाने आपणाकडे पद्धतशीर, तारीखवार रेकॉर्ड ठेवण्याचा प्रघात नाही हे एक व दुसरे म्हणजे कोणतीही गोष्ट सांगताना तिचे महत्त्व वाढण्याकरता ती अत्यंत अतिशयोक्तिपूर्ण सांगण्याची आपली सवय. त्यामुळे त्यातील खऱ्याचा अंश शोधून त्याचा निर्देश करणे शक्य होत नाही. खरोखरी ही सर्व विद्या मूळ भारतीयच. तेथे अशा मंडळींचा अभाव हे शक्यच नाही. परंतु एक तर अशी मंडळी स्वतः होऊन काही सांगत नाहीत. कारण त्थांना त्यापासून पैसा अथर कीर्ती हे काहीच मिळवायचे नसते. मात्र त्यांच्याभोवतीची मंडळी, थोडे घडलें असले किंवा काही घडले नसले तरीही त्याची अतिशयोक्ती करून सांगण्यास सुरवात करतात. त्यामुळे आपणाकडे ही विद्या पूर्ण स्थितीत असूनही

तिचा आपणास फायदा घेता येत नाही. आजकालचीच उदाहरणे पाहा ना. एकजण म्हणतात की देवाच्या नावात काय आहे, माझेच नाव घ्या. मी तुम्हास देवदर्शन घडवून देईन; किंवा दुसरे म्हणतात तुम्ही आमच्याकडे या. तुमच्या डोक्यावर हात ठेवतो. तुमची कुंडलिनी एकदम सर्व षट्चक्रे भेदून ब्रह्मरंध्रापर्यंत जाईल. इतके सोपे असताना पातञ्जल योगशास्त्र, गीतेत भगवंतांनी सहाव्या अध्यायांत अथवा ज्ञानेश्वरांसारख्यांनी त्यावर सविस्तर विवरण का केले तेच कळत नाही. लोकांच्या विश्वासाचा फायदा घेऊन त्याचा उपयोग करून घेणाऱ्या अशा भोंदू लोकांचे जोपर्यंत उच्चाटण होत नाही व त्यांना असे भोळे लोक–थोडक्यात कष्ट न करता सर्व मिळते आहे तर का न घ्या, अशा प्रवृत्तीचा शिष्यगण मिळत आहे तोपर्यंत हे असेच चालणार. वस्तूचे महत्त्व व गुणाप्रमाणे त्याची किंमतही मोजावी लागते. त्याशिवाय मिळत नाही; याची जाणीव ठेवावी लागते. इतके सोपे असते तर श्री पतञ्जलींनी योगशास्त्र किंवा भगवंतांनी सहावा अध्याय व त्यावर ज्ञानेश्वरांनी विवरण केले नसते. हिमालयातील एकांतात थंडी, वारा, ऊन, भूक ही सर्व सहन करून वीस-वीस वर्षे तपश्चर्या करणारे लोक यांच्या दृष्टीने अज्ञानीच म्हटले पाहिजेत. मी म्हणतो मग कोणाचा डोक्यावर हात तरी कशाला पाहिजे. थोडे L. S. D. घ्या की एकदम अष्टांगयोगसाधन होऊन तुम्ही ब्रह्मरंध्री लीन होऊ शकता, असे हिप्पी म्हणतात ते तर जास्त सोपे. असो. दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये.

१. ऑक्टोबर १९५३ मध्ये एके सकाळी Gil Pereg जिल पर्झे या नावाच्या एका शिपायाची, फिलीपाईन्समधील मनिला येथील गव्हर्नरच्या राजवाड्याच्या दारावर पहारा करण्यास नेमणूक झाली होती. तो त्या दिवशी एकाएकी निराळ्याच ठिकाणी दाखल झाला हे ठिकाण त्याच्या ओळखीचे नव्हते. त्याठिकाणी तो कसा आला त्याची त्यास काहीच कल्पना येईना. त्याने तपास करता ते ठिकाण मेक्सिको शहर असल्याचे कळले. ते ठिकाण मनिलापासून हजारो मैल दूर आहे. त्याच्यावर कोणाचा विश्वास बसेना. परंतु दोन महिन्यानंतर मनिला येथील काही माणसे सरकारी कामाकरता मेक्सिकोला आली होती त्यांनी त्याला ओळखला व परत नेला.

२. यासारखीच थोडीशी ड्यूनंट नावाच्या एका कॅनेडियन इसमाची हकीकत आहे. तो आपल्या इच्छेनुसार आपले शरीर कालावकाशाच्या बंधनातून नेऊ शकतो. एका डॉक्टरांनी त्याच्याबद्दल लिहून ठेवले आहे की त्यांच्यासमोर तो हळूहळू दृष्टीसमोरून नाहीसा झाला व फक्त त्याचे कपडे शिल्लक राहिले. पुढे काही डॉक्टर व पोलिस यांनी त्याची परीक्षा घेतली. त्यास लोखंडी साखळीने चांगले जखडून एका खोलीत कोंडून, कुलपे लावून सील करून ठेवले. काही क्षणांतच तो बाहेर येऊन सर्वांस भेटला. कुलपे व खोलीची सीले तशीच कायम होती व साखळदंड मोकळा होऊन पडला होता. पुढे शिकागो येथे अनेक तज्ञांसमोर त्याची अशीच परीक्षा घेण्यात आली. त्यास त्याचप्रमाणे जखडून ठेवले. साखळदंड, सिले वगैरे तेथेच असताना व

बाहेरील पहारेकऱ्यांच्या दृष्टोत्पत्तीस न येता एक तासाने पाहतात तर तो नाहीसा झाला होता.

३. एका जानेवारी महिन्यात शनिवारी सायंकाळी हन आणि वुइल्यम हे मध्यस्थासमवेत Scance कड्या कुलपे लावून साधारण अंधारांत स्पिरिटसंबंधी प्रयोग करीत होते. त्यांच्या मदतीत त्यावेळी दोन स्पिरिट गाईड हजर होते. त्यांची नावे जॉन किंग व त्याची मुलगी केटी किंग. त्यांपैकी केटी किंग हिने त्या मीटिंगमध्ये Appori चा म्हणजे Dematerization व Rematerialization (म्हणजे एके ठिकाणी नाहीसे होऊन दुसऱ्या ठिकाणी प्रकट होण्याचा) प्रयोग करण्याचे ठरविले. त्यावर त्या मंडळीपैकी हॅरिसन म्हणाले की, श्रीमती गुपी नावाची एक चांगली गलेलठ्ठ मध्यस्थ आहे. तिच्यावर प्रयोग करावयास काय हरकत आहे ? त्यावर केटी म्हणाली, मी तुम्हास करून दाखविते. त्यावेळी श्रीमती गुपी तिच्या घरात काही मित्रांसमवेत शेकोटीजवळ बसलेली होती व ती श्रीमती नेल्यांडबरोबर बोलत होती. थोड्याच वेळात बोलता बोलता श्रीमती गुपी त्यांच्या समक्ष दिसेनाशी झाली व त्यांना मोठा धक्का बसला. इकडे त्या स्पिरिट सर्कलमधील लोकांना केटी ते वाक्य बोलल्यापासून तीन मिनिटाच्या आत टेबलावर एक मोठा दाणकन असा आवाज ऐकू आला व आवाज कसला म्हणून पाहतात तो मिसेस गुपी कित्येक मैलांवरून तेथे हजर झाल्या होत्या. थोड्याच वेळात गुपी सावध झाल्या व स्वतःकडे पाहून म्हणाल्या, माझ्या अंगावर अगदीच अपुरे कपडे आहेत. असे म्हणत आहेत तोच टेबलावर तिचे बूट कपडे वगैरे सर्व येऊन पडले श्रीमती गुपी टेबलावर पडल्या त्यावेळी त्यांच्या हातात असलेले पेनही तसेच होते.

४. सुप्रसिद्ध जादुगार हुडिनी यांच्यासंबंधी अनेक उदाहरणे प्रसिद्ध आहेत. त्यास प्रयोगादाखल म्हणून हातपाय लोखंडी साखळ्यांनी बांधून एका लोखंडी पेटीत बंद करून ती पेटी पाण्यात सोडण्यात आली होती. थोड्याच वेळात तो पोलिस चौकीवर हजर होऊन तेथील अधिकारी वर्गास भेटला. यापूर्वी याप्रमाणे त्यास खोलीत कोंडून ठेवण्याचे प्रयोग पुष्कळ वेळा करण्यात आले होते.

५. १७७४ मध्ये इटलीमध्ये अल्फान्झो नावाचा एक कैदी तुरुंगात खितपत पडला होता. एके दिवशी सकाळी उठून तो सांगू लागला की, पोप क्लेमंट १४ हा वारला असून त्याच्या मृत्युसमयी मी त्याच्याजवळ हजर होतो. एकतर पोपचे निवासस्थान त्यांच्यापासून शे-दोनशे मैल लांब होते व पोप वारल्याची खबरसुद्धा तोपर्यंत जेलच्या अधिकाऱ्यांना नव्हती. परंतु पुढे ज्यावेळी पोपचा अंत्यसंस्कार करण्यात आला त्यावेळी तेथे हजर असलेल्या अनेक लोकांनी तो त्या ठिकाणी हजर असल्याचे पाहिल्याचे सांगितले.

(I) अलीकडील विज्ञानचर्चेत माझ्या असे ऐकण्यात आले की, हल्ली अवकाशप्रवास सुरू झाला असून, अगदी अलीकडेच मानवाने चंद्रावर पदार्पण केले

आहे. विज्ञानाची अशीच वाढ होत जाऊन एखाद्या शतकाच्या काळात आपली ग्रहमाला सोडून एखाद्या ताऱ्यावर जाण्याचा प्रयत्न करणे वैज्ञानिकास अशक्य नाही. परंतु आजच्या गतीने (ताशी २५००० मैल) अगदी जवळचा तारा जो आल्फा सेंटारी की जो केवळ ५॥ प्रकाश वर्षे दूर आहे. त्यावर अवकाश यानास पोचावयास निदान एक लक्ष वर्षे लागतील. समजा गती आणखी दहापट केली तरी १०,००० वर्षे लागतील. मग इतर ताऱ्यांची गोष्टच निराळी. याकरता ताऱ्यावर जाणे असेल तर आयुष्यमान पण वाढले पाहिजे; परंतु वाढून वाढून किती वाढणार ? याकरता त्यांचे असे म्हणणे आहे की भारतीय योगशास्त्रात प्रगती करून कोणत्याही स्थळी कोणत्याही वेळी शरीर Dematerialization चित्‌शक्तीत विलीन होऊन परत ठराविक वेळी ठराविक ठिकाणी Remateliaizatiion सशरीर प्रकट होण्याची कला साध्य करून घेतली पाहिजे. तसे करता आले नाही तर अवकाश प्रवासाची मर्यादा थोड्या ग्रहांपलीकडे जाऊच शकणार नाही. ते कसे घडून येणे शक्य आहे त्याचा आपण पुढे विचार करू. आपणास माहीत आहे की श्री विवेकानंद यांना हैदराबाद येथे एक साधारण मनुष्य भेटला होता. त्यास भानामती विद्या अवगत होती त्याने श्री विवेकानंदांना दुर्मिळ असलेली फळे, फुले तर आणून दाखविलीच; परंतु अमेरिकन हॉटेलची नावे असलेल्या कपबशा व त्यांच्या सोबतच्या किटलीतील चहासुद्धा काढून दाखविला व हे सर्व करण्यास त्याला काही सेकंद पुरले. ही विवेकानंदांची गोष्ट झाली. पण अगदी कुर्ला स्टेशनजवळील लहानशा मैदानात, अगदी साधे लोक असे प्रयोग करून दाखवीत आले आहेत की, त्यांना सांगितले ताजे गरम बटाटे वडे व भजी पाहिजे आहेत तर ते एका क्षणात तसे वडे व भजी गरम गरम खालील बशासुद्धा काढून दाखवितात व खाण्यास पण देतात. ही माणसे अगदी साधारण अशिक्षित वर्गापैकी असतात. यावरून ही विद्या फारशी कठीण किंवा मोठीशी गूढही नाही. थोड्या प्रयासाने तिचे रहस्य व प्रक्रिया कळू शकेल व ती फारशी कठीण पण नसेल.

(J) यासोबत आपणास यासंबंधात आणखी एका मूळ विषयाचा विचार करणे आहे. त्याच्या अंतर्गत बाबींसंबंधीही विवेचन होणार आहे.

अमेरिकेत हल्ली पॉल ट्विचेल Paul Twitchel या नावाचे एक सुप्रसिद्ध गूढवादी आहेत. त्यांचे तत्त्वज्ञान इतरांपेक्षा थोडे निराळे असून त्यांचे जगातील सर्व भागांत शिष्य आहेत व त्यांचा असा दावा आहे की, ते शिष्याच्या स्वप्नात जाऊनसुद्धा त्यास या विषयाची संथा देतात. शिष्यांनी दुसऱ्या कोणत्या पद्धतीने आत्मसात करावे या संबंधात काही धडे दिले आहेत; परंतु त्यायोगे काम झाले नाही व त्यांच्या विद्येत पारंगतता मिळाली नाही तर ते शिष्याने तशी इच्छा केल्यास स्वप्नात जाऊन त्याचे आत्मशरीर बरोबर घेऊन त्यास स्पिरिच्युअल जगतातील सप्त लोकांत घेऊन जाऊन तेथील लामांकडून या विद्येत पारंगतता मिळविली. या विद्येस ते (Ekankar) एकंकार विद्या म्हणतात व त्यांचा असा दावा आहे की सर्व धर्म योग इत्यादींपासून ही

विद्या निराळी आहे व तीत स्पिरिट बॉडीच्या ऐवजी शरीरातील प्राणशक्तीचे प्रक्षेपण करावयाचे (त्यास ते आत्मस्वरूप—Atma Sarup असे नामाभिधान देतात.) स्पिरिट बॉडी व प्राणशक्ती (आत्मस्वरूप) यातील फरक त्यांनी विशद केलेला आढळला नाही किंवा आत्मस्वरूप म्हणजे काय याचेही स्पष्ट असे विवेचन मला आढळले नाही त्यामुळे त्यासंबंधी माझे असे काहीच मत मी देऊ शकत नाही. त्यांचे म्हणणे असे आहे की स्पिरिट बॉडीच्या प्रक्षेपणाने Projection स्पिरिट जगतातील फक्त खालच्या थरातच प्रवेश मिळतो. त्यात जे आणखी एकावर एक असे पाच थर आहेत तेथे स्पिरिट जाऊन ईश्वरी साक्षात्कार करवितात. त्यांनी भारत व तिबेटमध्ये या विद्येचा अभ्यास केला असून, लहानपणी सदरासिंग यांच्याकडून आत्मप्रक्षेपणाचे शिक्षण घेतले. नंतरच्या आयुष्यात गोपालदास या नावाच्या गुरूंनी संथा दिली व त्यानंतर त्यांनी तिबेटात गुरू किंवा जास्त प्रगत झालेले स्पिरिटस, एंजल्स वगैरेंचा वास असतो, त्यांच्या मदतीने वरच्या एकावर एक असलेल्या निरनिराळ्या थरांत प्रवेश मिळून तो शेवटच्या थरात जाऊन ईश्वरस्वरूप होतो.

निव्वळ स्पिरिटप्रक्षेपण करणाऱ्यांना वरच्या थरात प्रवेश मिळत नाही. त्यामुळे त्यांची प्रगती होऊ शकत नाही. परंतु ज्यांनी हे Soul Projection आत्मस्वरूपाचे प्रक्षेपण आत्मसात केले आहे त्यांना एकदम वरच्या थरात प्रवेश मिळून त्यांची पुढील प्रगती लवकर लवकर होते; खरे म्हणजे यातील तत्त्वज्ञान मला स्वतःला फारसे पटलेले नाही किंवा विज्ञानाच्या कसोटीवरही त्याची अद्याप कसोटी घेतलेली नाही. त्यामुळे त्यावर कितपत विश्वास ठेवावा हे ज्याचा त्याने ठरविलेले बरे. मग याचा समावेश मी माझ्या पुस्तकात का केला असे कोणी सहज विचारील त्यावर माझे असे म्हणणे आहे का आज जगातील बरेच विचारवंत त्यास मानीत आहेत व त्यास अनुसरीत आहेत. निदान या विषयासंबंधी माहिती वाचकांस असावी हा उद्देश व यापेक्षा दुसरा महत्त्वाचा उद्देश म्हणजे त्यांनी एकंकार प्राप्त करण्याकरिता ज्या काही पद्धती सांगितल्या आहेत त्या आत्मप्रक्षेपणासाठी सुद्धा उपयोगी पडण्यासारख्या आहेत वाटले तर वाचकांनी त्यापैकी कशाचाही उपयोग करून Soul Projection नाहीतर निदान Spirit body Projection आत्मसात करून घ्यावे. याकरिता यानंतर त्यांनी, त्याचप्रमाणे इतरांनी सांगितलेल्या आत्मप्रक्षेपण साध्य करण्याच्या काही पद्धती सांगून हे प्रकरण आटोपते घेतो. खरे म्हणजे हे प्रकरण अत्यंत महत्त्वाच्या प्रकरणांपैकी एक असून सर्व अंगोपांगांसहित सविस्तर त्यासंबंधी लिहावयाचे म्हणजे त्यावर एक स्वतंत्र ग्रंथच हवा. त्यामुळे एका ग्रंथाच्या एका प्रकरणात साकल्याने त्याचा समावेश करणे ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. तरीपण त्यातील महत्त्वाचे व आवश्यक असे काही न गाळता संक्षेपाने देण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे ते वाचकांनी ठरवावे. आत्मप्रक्षेपण आत्मसात करण्याकरिता उपयोगात आणल्या जाणाऱ्या काही पद्धती अशा :

१ अ. चांगली झोप येऊ लागल्यावर झोपेकरता म्हणून अंथरुणावर पडावे व निजताना असा निश्चय करून निजावे की मला अमुक एक संख्या म्हणण्याच्या आत झोप लागली पाहिजे. असे ठरवून बिछान्यावर पडताच एक, दोन, तीन, चार असे हळूहळू मनातल्या मनात अंक मोजावयास सुरुवात करावी. सुरुवातीला ती संख्या तीन वेळा मोजून झाली तरी झोप लागलेली नाही असे आढळून येईल. पुढे पुढे लवकर लवकर झोप लागत आहे असे आढळून येईल व ज्यावेळी तुम्हास ठरविलेल्या संख्येला झोप लागेल त्याच सुमारास तुम्ही शरीराच्या बाहेर असून स्वतःच्या शरीरास पाहात आहात असे आढळून येईल. असे झाले म्हणजे स्पिरिट जगतातील निरनिराळ्या थरांतून जाण्याचा प्रयत्न करा. स्पिरिट गाईड व एंजल्स यांची मदत मिळेल व तुम्ही लवकरच सर्वांत वरच्या थरात प्रविष्ट व्हाल.

१ ब. कदाचित याने सिद्धी मिळत नाही असे वाटले किंवा तसा अनुभव आला तर यातील गुरू पॉल ट्विचेल (Paul Twitchel) यांना आवाहन करा किंवा त्यांना लिहून त्यांच्याशी संपर्क साधा. त्यांचा असा दावा आहे की ते तुमच्या स्वप्नात येऊन तुम्हास मार्गदर्शन करतील.

२. पॉल यांनीच दुसरी एक अनुभाविक पद्धती सांगितली आहे.

झोपी जाण्याच्या वेळी थोडे अगोदर एका खुर्चीवर बसा तुमचे ध्यान भ्रूमध्यात (आज्ञाचक्र) ठेवून ॐ चा जप करा व असे करीत असताना डोळे मिटल्यानंतर जे अंधकार-पटल दिसते त्यावर लक्ष केंद्रित करा. ते न जमले तर तेथे तुमच्या इष्ट देवतेची स्थापना करा व त्याकडे मनात इतर कोणताही विचार न येऊ देता जप करीत पाहात राहा. लवकरच काही दिवसांच्या सवयीने तुम्हास कानात किणी किणी किंवा घंटानादासारखे आवाज येऊ लागतील. असे झाले की तुम्ही तुमच्या स्थूल देहापासून सुटे होऊन स्थूल देहाकडे पाहात आहा असा अनुभव येईल.

या पद्धतीत काही सुधारणा केली तर लवकरच ही गोष्ट जमेल असे मला वाटते. आपणास खुर्चीची आवश्यकता नाही. मध्यरात्रीच्या सुमारास हात-पाय, तोंड धुऊन मृदू आसनावर धूतवस्त्र टाकून अंधारातच असावे. यापूर्वी दोन तीन महिने त्राटकाचा अभ्यास झालेला असला तर बरे. नसला तरी हरकत नाही. प्रथम सुमारे अर्धा तास ' ॐ ह्रीं नमः चा जप करा. मग जप बंद करून भ्रूमध्यात दृष्टी स्थिर करा. (डोळे बंद करून) डोळ्यांसमोर जे अंधाराचे पटल येते त्यास चिदाकाश असे म्हणतात. त्यामध्ये, ते पटल भेदून पाहात आहोत अशा रीतीने सर्व लक्ष केंद्रित करा. काही दिवसाच्या सवयीने अंधाराच्या कडा प्रकाशमान होत आहेत असे दिसेल व हळू हळू अंधार नाहीसा होऊन सर्वत्र मंद असा पिवळसर प्रकाश दिसेल. त्यात तुमच्या ध्यानाच्या तीव्रतेप्रमाणे इच्छित मूर्ती पण दिसू शकेल. याच सुमारास कानात विशिष्ट आवाज ऐकू येऊ लागतील. एवढी तयारी झाली की आत्मप्रक्षेपणाच प्रयत्न करून पाहा. निश्चित यश येईल.

३. श्री. फॉक्स यांनी हाच प्रयोग थोड्या निराळ्या स्वरूपात सांगितला आहे. त्यांच्या मते, एकांतात रात्री टाळूच्या ठिकाणी ब्रह्मरंध्रात डोळे मिटून लक्ष केंद्रित करावे. मात्र दृष्टी भ्रूमध्यात असावी. श्वासोच्छ्वास अगदी हळू असावा. लवकरच अभ्यासातून आपण शरीराबाहेर असण्याचा अनुभव येऊ असेल व त्यास आपलेच दोन देह दिसू लागतील. हा अभ्यास शक्य तो सकाळी चार ते पाच वाजता केल्यास त्यात लवकर यश येते.

४. दुसऱ्या एकने त्राटकाचाच एक प्रकार सांगितला आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे अगदी अंधारयुक्त जागेत एक पाच वॅटचा दिवा असावा व भ्रूमध्याच्या ठिकाणी येईल अशी समोर एक संत्र्याच्या रंगाची डिस्क ठेवा व तिकडे पापणी न लवता पाच मिनिटे पाहा व ही प्रॅक्टिस वाढवीत नेऊन निदान दहा मिनिटे करा. डोळ्यास पाणी येणे सुद्धा बंद झाले पाहिजे. लवकरच तुम्ही इच्छेप्रमाणे आत्मप्रक्षेपण करू शकत असा अनुभव येईल.

५. मी माझ्या ‘ वैतरणेच्या ऐलतिरी ’ या पुस्तकांत आरशात पाहून आत्मप्रक्षेपण करण्याचा अभ्यास दिलेला आहे तो वाचावा. तो बराच सोपा व अनुभविक आहे.

६. या पेक्षा जरा कठीण परंतु हटकून यश येणारा असा एक प्रयोग देत आहे.

निदान चोवीस तास अगदी कडकडीत उपवास करावा. पाणीसुद्धा पिऊ नये. चोवीस तास झाले की एका उघड्या ताटात आपल्या आवडीचे असे पदार्थ (बारीक जाळीने झाकून) सुमारे २० ते २५ फूट अंतरावर ठेवावे व त्याच्या जवळच स्वच्छ पाण्याने भरलेला असा एक ग्लास झाकून ठेवावा. ही दोन्ही आपल्या नजरेसमोर असावीत. अंतर जितके जास्त तितके बरे. निदान दहा फूट तरी असावेच. उपासाने ग्लानी आलेली असेलच. तशाच स्थितीत त्या अन्नपाण्याकडे नुसते मधून मधून पाहावे. मात्र जवळ जाऊन कोणताही पदार्थ घेऊ नये अथवा पाणीसुद्धा पिऊ नये. असा सहा तास वेळ काढावा. तुमचे आत्मप्रक्षेपण होत असून तुमचा स्पिरिट देह त्या अन्न पाण्याजवळ जात आहे असा तुम्हास अनुभव येईल. एका प्रयोगात असा अनुभव न आला तर तीस तास उपवास करा व अनुभव येईपर्यंत ती मुदत तीन दिवस उपवासापर्यंत वाढवा. साधारणपणे चोवीस तासांतच अनुभव यावा. पहिल्यांदा नाही तर दुसऱ्यांदा अथवा फार तर तिसऱ्यांदा. पुढे काय करावयाचे याचा उल्लेख मागे येऊन गेलाच आहे. तुम्ही निराळे असून स्वतःचे शरीर पाहात आहा, असा अनुभव आला की मग तुम्ही कशादूनही कोठेही जाऊ शकता व परत येऊ शकता त्याचा उपयोग कसा करून घ्यावयाचा हे ज्याने त्याने ठरवावे. मात्र त्याचा उपयोग वाईट कामाकरता केला तर तुमची सिद्धी लवकरच नाहीशी होऊन पुन्हा कोणत्याही सिद्धीला अपात्र व्हाल. पवित्र आचरण, आहार, विहार, यावाचून काहीच होऊ शकणार नाही, याची सदैव जाणीव ठेवा. आता

या संबंधात फक्त एकच परंतु फार महत्त्वाची अशी गोष्ट सांगण्याची राहिली आहे ती सांगून हे प्रकरण पुरे करतो. ती गोष्ट म्हणजे या प्रकारचे आत्मप्रक्षेपणाचे प्रयोग करीत असताना थोडे दुर्लक्ष झाले तरी अनुभवास येणारे धोके:—

१) काही तंत्र चुकल्यास शॉकमुळे हृदय बंद पडते अथवा वेड लागते.

२) आत्मप्रक्षेपण केले असता शरीर चलनवलनरहित असे पडून राहते. असा बराच वेळ गेला म्हणजे त्याचा मृत्यू झाला असे समजून त्यास जिवंतपणीच जाळतात किंवा पुरतात.

३) आत्मप्रपक्षेपण व परत येणे या करण्यात शरीरातील सिस्टिममध्ये कधी कधी अनपेक्षित असा बिघाड उत्पन्न होतो. परंतु थोडे दिवस प्रयोग बंद ठेवले असता तो बरा होतो

४) एखाद्या वेळी मेंदूत रक्तस्राव होतो. कारण आत्मप्रक्षेपणाची व परत येण्याची क्रिया किंवा कळत अथवा नकळत टाळूतील ब्रह्मरंध्रामार्फत होत असते.

५) आत्मप्रक्षेपण झाले असता मेंदूमार्फत, सिल्व्हर कॉर्डमार्फत स्पिरिट देह व स्थूल शरीर यांचा संबंध ठेवला जातो, ती कॉर्ड जर काही कारणाने तुटली तर संपर्क नाहीसा होऊन स्थूल शरीराचा मृत्यू घडून येतो.

६) कधी कधी स्पिरिट शरीर निराळे असता त्यास काही कारणाने विकृती अगर इजा होते. ती इजा काही दृश्य कारण नसता शरीराच्या त्याच भागात त्याच प्रकारची विकृती अथवा इजा होत असते.

७) भूतसंचारासारख्या एखाद्या मनोविकृतीने पछाडणे. आत्मप्रक्षेपणाचा प्रयोग करीत असताना वरीलपैकी काहीही होण्याचा संभव असतो. त्याची जाणीव ठेवून तसे काही न होईल याची किंवा काही झाल्यास ते यामुळे झाले आहे याची जाणीव ठेवून प्रयोग काही दिवस बंद ठेवावेत व योग्य उपचार करावेत. पुष्कळ वेळा प्रयोग नुसत्या थांबविण्यानेसुद्धा सुधारणा होते. यात आणखी एक समाधानाची गोष्ट आहे की असे प्रयोग सुरू केले म्हणजे स्पिरिट गाईड त्यावर लक्ष ठेवून संभाव्य धोक्यापासून त्यास संभाळून नेतात.

* * *

१३ टेलीपथी (Telepathy)

दुसऱ्याच्या मनातील विचार त्याने न सांगता समजणे किंवा समजावून घेणे यास Telepathy अशी संज्ञा आहे. त्याचप्रमाणे Phrenology (मस्तिष्क शास्त्र) म्हणजे डोक्याचा आकार, त्यावरील उंचवटे, खाच-खळगे वगैरेवरून त्या व्यक्तीचा स्वभाव आदि समजावून घेणे दोन्ही शास्त्रे आपापल्या परीने अत्यंत महत्त्वाची व उपयुक्त आहेत. परंतु अद्याप ती अत्यंत बाल्यावस्थेत आहेत. इतकी की त्यांना शास्त्र ही संज्ञा देणे सुद्धा बरोबर होणार नाही. असे असले तरी त्या दोहोंत शास्त्रशुद्ध प्रगती करण्याचा व त्यांचे शास्त्र बनविण्याचा प्रयत्न वैज्ञानिक करीत आहेत. त्यांचे महत्त्व, उपयोग व साधारण रूपरेषा कळली तर आपल्याकडील प्रयत्नवाद्यांस त्यात संशोधन व प्रगती करण्यास वाव मिळेल; केवळ याच उद्देशाने या दोन्ही शास्त्रांची साधारण रूपरेषा देण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

प्रथम टेलीपथीसंबंधी विचार करू या. दुसऱ्याचे विचार त्याने न सांगता किंवा इतर कोणत्याही ज्ञात साधनाविना समजणे व सांगता येणे यास टेलीपथी असे म्हणतात.

ही विद्या जशी काही लोकांना उपजत साध्य असते त्याचप्रमाणे ती साध्य करण्याची काही तंत्रे व पद्धती आहेत. त्यांचा पद्धतशीर अभ्यास व अवलंब केला तर ती काही अंशी साध्य होऊ शकेल. किती ते प्रयत्नांची चिकाटी व त्या विषयाची शास्त्रशुद्ध माहिती व तंत्रे याच्या ज्ञानावर अवलंबून राहील. ज्यांना जन्मत च ती सिद्धी असते त्यांची गोष्टच निराळी. त्याचप्रमाणे पातञ्जल शास्त्राचा ज्याने पद्धतशीर व योग्य मार्गदर्शनाखाली अभ्यास केला आहे त्यासही यात कठीण असे काहीच नाही; पण याखेरीज ज्या कोणास या शास्त्रांत प्रगती करून घेणे असेल त्याने खाली दिलेल्या किंवा तत्सम मार्गाने प्रयत्न केल्यास ती विद्या बरीचशी आत्मसात करता येईल. मात्र याचा अर्थ असा नाही की या खेरीज इतर मार्ग उपलब्ध नाहीतच. ज्यांनी ही विद्या प्रयत्न करून साध्य करून घेतली आहे ते आपापल्या अनुभवाप्रमाणे निराळी पद्धत सांगू शकतील व ती उपयुक्तही असेल. मात्र ज्यांना ही सिद्धी उपजत असेल त्यांच्याकडून मार्गदर्शन मिळविण्याचा प्रयत्न करू नये. कारण त्यांना ती आपोआप मिळालेली असल्याने, ती आत्मसात करून घेण्याकरता काय करावे लागते याचे त्यास ज्ञान नसते. तसा ते आव आणतात ते खोटे असते. त्याचप्रमाणे खाली मी निवेदन करीत असलेली पद्धती केवळ एक थोडक्यात मार्गदर्शन या स्वरूपात देत आहे. याचाही अर्थ असा नाही की इतर उपयुक्त पद्धती नाहीतच व या पद्धतीने सुद्धा ती विद्या संपूर्ण आत्मसात होईल याची जाणीव ठेवावी. केवळ एक साधारण रूपरेषा म्हणून तिचा उपयोग करावा. नाही तरी एका लहानशा पुस्तकातील एका प्रकरणात सबंध शास्त्राची माहिती सांगोपांग देण्याचा प्रयत्न यापेक्षा

जास्त कसा करणार ? अगदी खालच्या दर्जीतील काही लोकांना ही विद्या साध्य असल्याचे, प्रस्तुत लेखकाने पाहिले आहे. परंतु त्यांना ती सिद्धी जन्मत: मिळालेली असल्याने मार्गदर्शक म्हणून त्यांचा काही उपयोग नाही.

ज्यांना ही विद्या आत्मसात करणे असेल त्यांना चित्त एकाग्र करता आलेच पाहिजे. तसे होत नसेल तर या विषयात प्रगतीसुद्धा होणे कष्टप्रद मग सिद्धी तर लांबच. याकरता रोज निदान दहा पंधरा मिनिटे त्राटकाचा अभ्यास आवश्यक आहे व तो कमीत कमी तीन महिने करून मग या विषयाचा अभ्यास करण्यास प्रवृत्त व्हावे.

१. सुरुवातीस एखादी व्यक्ती काय विचार करीत आहे त्यासंबंधी, त्यावर विचार केंद्रित करून कळवून घेण्याचा प्रयत्न करू नये. ती शेवटची अवस्था आहे. त्यात अपयश येईल व निराश व्हाल. सुरवात कॉंटॅक टेलीपथीपासून करावी म्हणजे ज्याच्या मनातील पदार्थ ओळखायचा असेल त्याचे प्रयोग करणाऱ्याने उजव्या हाताने मनगट व डाव्या हाताने उजवे मनगट धरावे किंवा त्याच्या तळव्याखाली आपले तळवे लावावे; किंवा पंजात पंजा अडकवून ठेवावा. सुरुवात साध्या पदार्थांपासून करावी. एखाद्या खोलीत थोडयाशा नित्य परिचयातील वस्तू असाव्यात. पाकीट, कंगवा, चाकू, कपबशी वगैरे. त्यासुद्धा फार नसाव्यात त्यापैकी कोणीतरी एक जिन्नस ध्यानात ठेवावा व त्याकडे न पाहता स्वस्थ बसावे. मग प्रयोग करणाऱ्याने खोलीत घेऊन त्याच्या शरीराशी संपर्क साधून, त्याच्या मनावर लक्ष केंद्रित करून त्यानें कोणता पदार्थ मनात धरला आहे ते ओळखण्याचा प्रयत्न करावा. असे करीत असता वस्तू मनात धरणाराने पण आपले त्या वस्तूंसंबंधी विचार प्रयोग करणाराकडे प्रक्षेपित करीत असावे. मात्र त्या पदार्थांकडे पाहू नये. प्रयोग करणारास असा अनुभव येईल की, त्यातील एखाद्या विवक्षित वस्तूतून विशेष संवेदना येत आहेत. असे झाले म्हणजे तीच वस्तू त्याने मनात धरली आहे असे निश्चित समजावे. जरूर तर वस्तूकडे नुसते न पाहता प्रत्येक वस्तूस हात लावून कोणत्या वस्तूस स्पर्श न केल्याने विशेष संवेदना येते ते पहावे.

२. यानंतरचा प्रयोग म्हणजे एखादा जिन्नस न ओळखता त्यासोबत दुसरे काही ओळखावे. म्हणजे समजा, पेटी ओळखता आली तर त्या गटातील जिन्नसही ओळखण्याचा प्रयत्न करावा. मात्र ज्या इसमाने ती पेटी मनात धरली असले त्यास त्या पेटीतील जिन्नस माहीत असावयास हवेत व मागील प्रयोगाप्रमाणे त्याने ते मनोमन प्रक्षेपण करीत असले पाहिजे.

३. त्यानंतरचा प्रयोग म्हणजे मंडळीपैकी कोणीतरी एखादा जिन्नस लपवून ठेवावयाचा व प्रयोग करणाराने तो ओळखून काढावयाचा. मात्र ज्याने पदार्थ लपविला असेल तो कोण आहे त्याची प्रयोग करणाराला माहिती असावी व त्याने मनोमन कोणता पदार्थ कोठे ठेवला आहे त्याचे प्रयोग करीत असावे व त्या प्रक्षेपित विचारांचें प्रयोग करणाऱ्याच्या मनावर होऊन त्यास तो जिन्नस हुडकून काढता आला पाहिजे.

४. याच्या पुढचा प्रयोग म्हणजे तो पदार्थ जमलेल्या व्यक्तींपैकी कोणी ठेवला आहे ते सुद्धा न सांगता केवळ सर्वांकडे पाहून कोणी कोणता पदार्थ कोठे ठेविला आहे ते ओळखता आले पाहिजे. मात्र अशा वेळी मंडळी पाचपेक्षा अधिक नसावी.

५. याचा पुढचा प्रयोग म्हणजे यापेक्षा निराळा व कठीण असावा. जमलेल्या मंडळींपैकी एकासमोर नाटक करावयाचे म्हणजे ते असे की एक जण एकास चाकूने वार करून मारतो व चाकू लपवून ठेवतो व नंतर प्रेत हलवून दुसऱ्या खोलीत नेऊन ठेवतो, किंवा पुरून ठेवतो हे सर्व नाटकच असते. परंतु ते एका व्यक्तीच्या समोर प्रत्यक्ष करावयाचे म्हणजे ते त्याच्या क्रमाने मनावर ठसते. मग प्रयोग करणाऱ्याने खोलीत यावयाचे व ज्याने हे सर्व पाहिले आहे त्यावर लक्ष केंद्रित करावयाचे व त्याचा हात हातात धरावयाचा म्हणजे त्यास थोड्याच वेळात संवेदना होऊ लागतात. परंतु त्या उलट्या क्रमाने म्हणजे त्यास प्रथम प्रेत सापडेल. मग हत्यार व नंतर खून करणारा. ज्याचा या शास्त्राचा अभ्यास चांगला झाला आहे तो नुसत्या प्रेतावरून सर्व शोध लावू शकतो. याच मालिकेत आणखी एक प्रयोग करून पाहावा. एखाद्या मित्राने मनात योजावयाचे की कोणकोणत्या रस्त्यावरून कोणत्या ठिकाणी जावयाचे. त्यावर त्या मित्राने आपले सर्व मन केंद्रित ठेवावयाचे व प्रयोग करणाऱ्याने त्याचा हात आपल्या खाद्यांवर ठेवावयास सांगून गाडी चालवावयास बसावयाचे. त्या मित्रामार्फत संवेदना येऊन त्याने काही न सांगता प्रयोग करणारा त्याच रस्त्याने गाडी चालवीत नियोजित ठिकाणी गाडी आणून उभी करील.

६. पुढील प्रयोग म्हणजे जमलेल्या मंडळींपैकी एखाद्याने शेल्फमधील एखादे पुस्तक काढून त्यातील एखाद्या पानावरील मजकूर वाचावयाचा. प्रयोग करणाऱ्याने त्याचा हात हातात धरून त्या सर्व पुस्तकावरून नजर फिरवून नेमके पुस्तक व त्यातील पान काढून दाखवावयाचे येथपर्यंत प्रयोग करणारा व करविणारा यांचा प्रत्यक्ष संपर्क असतो. यानंतरचे प्रयोग असा संपर्क न ठेवता करावयाचे असतात.

७. काही मंडळींनी खोलीत असलेल्या पदार्थांपैकी एखादा पदार्थ पाहून ठरवून ठेवावयाचा. मात्र पदार्थ दहाच्या आत असावेत. प्रयोग करणाऱ्याने खोलीत येऊन सर्वांकडे पाहावयाचे व पदार्थांवर नजर फिरवून बरोबर पदार्थ शोधून काढावयाचा. प्रथम ते न जमले तर त्या वस्तूवरून प्रत्येकी हळू हळू हात फिरवावयाचा व ज्या वस्तूपासून अपेक्षित संवेदना येईल ती वस्तू त्यांना नेऊन दाखवावयाची अथवा एखाद्या टेबलावर पाच ते दहा वस्तू एकमेकींपासून अगदी पृथक् अशा वर्तुळाकार मांडून ठेवावयाच्या व जमलेल्या मंडळींनी त्यांपैकी एक आपल्या मनांत योजून ठेवावयाची व त्यावर त्या सर्वांनी आपले मन केंद्रित करून ठेवावयाचे. मात्र त्याकडे पाहू नये. प्रयोग करणाऱ्यांनी टेबलाजवळ येऊन प्रत्येक वस्तूवरून हात फिरवावा. नियोजित वस्तूपासून त्यास निश्चित अपेक्षित संवेदना येऊ लागतील. ती वस्तू त्याने उचलून त्यास दाखवावी. मात्र जिनसा थोड्या व नेहमीच्या परिचयातील असाव्यात.

८. पुढचा प्रयोग म्हणजे खेळावयाचे पत्ते घ्यावेत. त्यातील सात पत्ते काढावेत. ते असे की सहा काळे म्हणजे इस्पिक किंवा किलवर व एक लाल व ते एकमेकापासून, स्पर्श करणार नाहीत असे सुटे पालथे घालून ठेवावेत जमलेल्या मंडळीत त्यातील लाल पत्ता कोणत्या क्रमांकावर आहे त्याची माहिती असावी. प्रयोग करणाराने त्या सर्व पत्त्यांवरून त्यास स्पर्श न करता हात फिरवावा. हळूहळू शेवटपर्यंत जाऊन उलट क्रमाने परत फिरावे. जमलेल्या मंडळींनी मात्र एक करावे की प्रयोग करणाऱ्याचा हात लाल पत्त्याजवळ आला की मनोमन त्यास थांब असे प्रक्षेपण करावयाचे. प्रयोग करणारास असा अनुभव येईल की त्याचा हात लाल पत्त्याजवळ आला की इच्छा असो वा नसो तो खाली जाईल. त्याने ते पान उलटून पाहावे. ते लाल असेल. सात पानांत जमले नाही तर क्रमाक्रमाने उलटीत सहा पाच चार तीन व दोन असे आणावे व त्याच क्रमाने पुन्हा चढवीत नेऊन सात पानांवरील अभ्यास पक्का करावा. मात्र प्रत्येक वेळी लाल पान एकच असावे.

९. यानंतर म्हणजे एका खोलीत आठ-दहा परिचित जिन्नस ठेवावयाचे. ते जमलेल्या मंडळींनी सुद्धा न पाहता त्यांपैकी एक फक्त आपल्या मनात ठेवावयाचा. समजा खोलीत टेबलावर कंगवा, आरसा, पोमेडची बाटली अशा परिचित वस्तू आहेत. त्या पाहताच त्यांपैकी एक मनात ठेवावयाची. प्रयोग करणाराने नुसते खोलीत येऊन सर्वांकडे पाहावयाचें व त्याच्या संवेदना मनात नोंदून दुसऱ्या खोलीत जाऊन जिन्नस उचलून आणावयाचा.

१०. याच्या पुढील प्रयोग म्हणजे जमलेल्या मंडळींपैकी एकास टाचणी टोचावयाची किंवा एका भागास चटका द्यावयाचा. प्रयोग करणारा खरोखरी त्या व्यक्तीशी समरस झाला असेल तर त्यास त्याच भागात टाचणीची जखम किंवा चटका याचा त्रास होईल. येथपर्यंत प्रगती बिनचूक झाली असून ती कायम टिकली आहे अशी खात्री झाली म्हणजे पुढील प्रयोग करावा. नक्की वेळ ठरवून कोणी तरी स्नेह्याने स्वतःच्या खोलीत बसून एका कागदावर त्रिकोण, चौकोन, वर्तुळ असे काही साधे चित्र काढावे व प्रयोग करणाऱ्याने त्याच वेळी स्वतःच्या घरी बसून संवेदना येतील त्याप्रमाणे आकृत्या काढाव्यात. दोघांच्या आकृत्या जमू लागल्या म्हणजे पुढील प्रयोग करावा.

११. एखाद्या मित्राने कोठेही कितीही अंतरावर मात्र ठरलेल्या वेळी बसून मनोमनी कोणत्याही दृश्यावर म्हणजे रस्ता, चौक, बगीचा अशावर मन संपूर्ण केंद्रित करावे व त्याच वेळी प्रयोग करणाऱ्याने आपल्या खोलीत बसून त्याच्या मित्रापासून येणाऱ्या संवेदनांचा अभ्यास करून त्याच्या मनात असेल ते सर्व खाणाखुणा सुद्धा सांगण्याचा प्रयत्न करावा. मात्र त्याच्याशी एकतानता पूर्ण होईल व वेळ नक्की सेकंद टू सेकंद तीच असेल याची दक्षता घ्यावी. अंतर किती का असेना !

१२. यापुढील प्रयोग म्हणजे एखाद्या मित्राने ५२ पत्त्यांतून एखादा पत्ता

पाहून पुन्हा त्यात मिसळून ठेवावयाचा व प्रयोग करणाराने मित्राकडे पाहून संवेदना घेऊन हुडकून काढावयाचा. हे पुष्कळ कठीण आहे. त्यास बराच काळ लागेल. परंतु ते थोडे अचूक जमू लागले तर त्यास थोड्या प्रयासाने कोणाच्या मनात काय चालले आहे अथवा त्याने काय लिहून ठेवले आहे ते सांगता येईल व पुढे प्रॅक्टिस वाढत गेली तर मन केंद्रित न करताही सांगता येऊ लागेल. कोणाकडे नुसते पाहताच तो काय विचार करीत आहे ते कळू शकेल व तो सांगतो यात खरे किती व खोटे किती हे पण समजू शकेल. यापासून थोडे तोटे असले तरी फायदे अनेक आहेत. सर्वसाधारण माणसापर्यंत ही विद्या जाऊन पोचली तर समाजातील गुन्हेगारी, भंपकगिरी, दंभ हे आपोआप नाहीसे होतील. सुरुवातीला थोडे वाईट परिणाम दिसून येतील; पण मग मनोवृत्तीतही फरक पडून सर्व चित्र बदलून जाईल. खरे म्हणजे हा विषय मोठा व क्लिष्ट तर आहेच परंतु अजून यातील प्रगती केवळ बाल्यावस्थेत आहे हें खरे आहे. मी एका लहानशा पुस्तकातील एका प्रकरणात याचा संगतवार समावेश करण्याचा प्रयत्न केला असल्याने केवळ सामान्य रूपरेषा यापलीकडे काही देऊ शकलेलो नाही. परंतु निदान याने जिज्ञासा उत्पन्न होऊन कोणी त्यास संपूर्ण शास्त्र या स्वरूपात आणण्याचा प्रयत्न करू लागेल तर माझ्या या लिहिण्याचे सार्थक झाले असे मी मानीन. सोप्याकडून कठिणाकडे कसे जावे याचा एक साधा क्रम मी दाखविला आहे. त्याच क्रमाने किंवा त्याच पद्धतीने सर्वांनी गेले पाहिजे असे नाही. तो ज्याचा त्याने किंवा मार्गदर्शकाच्या मदतीने ठरविलेला बरा. मात्र एकच गोष्ट लक्षात ठेवावी की सुरुवात एकदम कठीण व क्लिष्ट अशी असू नये. चढता क्रम असावा मग तो कसाही असो. या विद्येचा संघटित प्रखर व्हावयाचा म्हणजे आज सुरुवात केली तरी सुमारे पन्नास वर्षे सहज लागतील. खरे म्हणजे त्यावेळी खरी सुरुवात केली तरी सुमारे पन्नास वर्षें सहज लागतील. खरे म्हणजे त्यावेळी खरी सुरुवात होईल. परंतु मानवाच्या इतिहासात ५० वर्षांचा काळ म्हणजे काही फार नाही. तो प्रकार असाः सुविद्य अशा पतिपत्नींनी प्रयत्नपूर्वक दृढनिश्चयाने यावरील सर्व वाङ्मय वाचून यातील अनुभविक तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेऊन या विषयात शंभर टक्के प्रावीण्य मिळवावयाचे. म्हणजे त्यांच्या संततीत आपोआप परंपरेने तो गुण काही अंशाने उतरेल. त्यांना फार प्रयास न पडता ती विद्या प्राप्त करून घेता येईल. मात्र ती दोन्ही पति पत्नी या परंपरेतील असावीत. एक अगदी नवीन असे नको. तिसऱ्या पिढीत जन्मतःच त्या मुलास पुष्कळ अवगत असेल व चवथ्या पिढीत तर ही पूर्णावस्था त्यास जन्मतःच असेल. समजा, अशा दहा पतिपत्नींनी आज सुरुवात केली तर त्यापासून चवथ्या पिढीत निदान पाचशे जन्मतः सिद्धी असलेले जन्मास येतील. मार्ग जरा आडवळणी व लांबचा आहे, परंतु अखेर मानवतेच्या हिताचा आहे. याकरता त्या दृष्टीने अवश्य प्रयत्न व्हावा.

* * *

१४. उदकशोध (Doswsing-water finding)

जमिनीत पाणी कोठे आहे ते वरील काही खाणाखुणांवरून म्हणजे विशिष्ट प्रकारच्या वनस्पतींचे अस्तित्व, मुंग्यांचे वारुळ वगैरेंवरून सांगणारे आपणाकडे आहेत. त्याचप्रमाणे काहींना यासंबंधी जन्मतःच सिद्धी असते. तिच्या योगाने पाहणी करून कोणत्या ठिकाणी किती अंतरावर किती लहान– मोठा पाण्याचा प्रवाह आहे हे सांगणारे गावोगाव, खेडोपाडी आहेत. परंतु यांपैकी बरेचसे नुसत्या थापा मारणारे असतात. त्यामुळे त्यांच्यावर विश्वासून राहिल्यास पैसा, श्रम व वेळ ही फुकट जातात. यामुळे कोणावर किती विश्वास ठेवावा अगर ठेवू नये याचा अंदाज येत नाही. पाश्चात्यांनी याबाबत स्वतंत्र शास्त्र बनविले आहे. त्यास ते Radiesthesia किंवा Dowsing असे म्हणतात. मात्र ही शक्ती कोणात सुप्त असते किंवा नसेल तर ती कशी मिळवावी याचा खुलासा नसून ज्याच्यात ती असते त्यांनी तिचा कसा उपयोग करावा याचे विवेचन असते. तरी त्यांचे म्हणणे असे आहे की निदान ६० टक्के लोकांत ही शक्ती सुप्तावस्थेत असतेच व बहुतेक लोक आपणात ती आहे किंवा कसे याचा प्रत्ययच घेत नाहीत. कारण त्यांना त्याची जाणीवच नसते. आपणास कदाचित माहीत असेल की १९३४–३५ साली मुंबई सरकारने असा एक युरोपियन साहेब पाणी पाहण्यास रु. ४००० महिना पगारावर ठेवला होता. त्याने काही ठिकाणी पाणी शोधलेही होते असे म्हणतात.

ज्याच्यात ही शक्ती वास करीत असेल किंवा ज्यांना ती आहे किंवा नाही याचा प्रत्यय पाहणे असेल त्यांनी खालील प्रयोग करून पाहावा.



कोणत्याही झाडाची साधारण दीड हात लांबीची बारीक व लवचिक अशी फांदी घ्यावी. तिला एका बाजूस सरळ असा दीड फूट लांबीचा दांडा असून दुसऱ्या बाजूस आकड्यासारखी दोन टोके असावीत. सोबतच्या चित्रात दाखविल्याप्रमाणे असा प्रयोग करणाराने एका हातात अ व दुसऱ्या हातात ब हे टोक धरून दोन्ही हात छातीजवळ आणावेत. क ड हा भाग छातीच्या समोर राहील असा धरावा. हळूहळू ज्या ठिकाणी पाणी असावे असे वाटत असेल त्या जागेवरून व त्याच्या आजूबाजूने चालत जावे. खाली पाण्याचा प्रवाह असेल व प्रयोग करणारास सुप्तशक्ती असेल तर ज्या ठिकाणी जमिनीत पाणी असेल त्याच्यावर येताच त्या ठिकाणी फांदीचा क ड हा भाग

खालून कोणी ओढीत असल्याप्रमाणे वाकू लागेल. कित्येक वेळी ओढ इतकी असते की ती फांदी हातातून गळून पडते. किंवा प्रयोग करणारा त्याबरोबर खाली वाकतो. प्रवाह असेल अगर तो जास्त खोलीवर असेल तर ओढ कमी प्रमाणात असेल. तरी पण त्यास ती जाणवेल. ज्यांना आपणात शक्ती आहे की कसे हे पाहावयाचे असेल त्यांनी ज्या ठिकाणी प्रयोग यशस्वी झाला असेल तेथे प्रयोग करून पाहावा. मात्र पहिल्याच प्रयत्नात यश येईल असे मानू नये. कदाचित सुप्त शक्ती जागृत व्हावयास वेळ सुद्धा लागेल व असे प्रयोग दोन चार वेळा करावे लागतील. त्याचप्रमाणे पाण्याचा प्रवाह किती मोठा, किती खोलीवर आहे याचा अंदाज केवळ वेळोवेळी येणाऱ्या अनुभवावरूनच ठरवावा लागेल. या कामासाठी पूर्वी हेझेल नावाच्या झाडाची फांदीच हवी असल्याचे मानण्यात येत होते. परंतु अनुभवाने असे आढळून आले आहे की कोणत्याही झाडाची फांदी चालू शकते. इतकेच नाही तर तारेचे कोट टांगावयाचे हँगर घेऊन ते वाकवून ‘ वाय ’ या आकाराचे बनवावे. व त्याचा झाडाच्या फांदीसारखा उपयोग करावा. अ ब हे भाग हातात धरून क ड हा भाग छातीसमोर येईल असे धरून वरीलप्रमाणे कृती करावी. आणखी दुसरा पण प्रयोग करता येईल; तारेस किंवा दोरीस किल्ली अथवा अंगठी बांधावी व विरुद्ध बाजूच्या तारेचे अथवा दोरीचे टोक अंगठा व तर्जनी या दोन बोटांत धरून अंगठी किंवा किल्ली जमिनीपासून दीड दोन फूट राहील अशी धरावी व वरप्रमाणे प्रयोग करावा ज्या ठिकाणी पाणी असेल त्या ठिकाणावर आल्यावर ती तार अथवा दोरी आपोआप हेलकावे खाऊ लागेल, किंवा गिरक्या घेऊ लागेल. साधारणपणे पुरुषाच्या हातात असली तर पुढे मागे हेलकावे खाते व स्त्रीच्या हातात असेल तर गिरक्या खाते असा अनुभव आहे. मात्र अपेक्षित जागेवरून किंवा बाजूने अगदी हळूहळू चालत जावे असे तीन चार वेळा करावे म्हणजे जागा निश्चित करता येते. दोरी किंवा तारेची हालचाल किंवा गिरक्यांचा हळूपणा किंवा जोर हे त्या पाण्याच्या प्रवाहाच्या जमिनीपासूनच्या अंतरावर किंवा प्रवाहांच्या लहानमोठेपणावर अवलंबून असते.



समजा, एखाद्या ठिकाणी पाणी नसून तेल आहे असे आपणास वाटले तर तार किंवा दोरीच्या टोकाशी किल्ली किंवा अंगठी न बांधता, एक लहान धातूचा गड्डू बांधावा व त्यात तेल टाकावे–अगदी भरून पाहिजे असे नाही व मग वरील प्रमाणे प्रयोग करावा. तेल त्या ठिकाणी भूगर्भात असेल तर वरप्रमाणेच अनुभव येईल. मात्र पुष्कळ वेळा तेलाचे साठे खूप खोलवर असतात. त्यांची स्पंदने यावयास वेळ लागतो व ती बरीच सूक्ष्म पण असतात. केवळ अनुभवी व्यक्तीच त्याची नोंद घेऊ शकेल.

ह्याच प्रयोग कोठे एखाद्या धातूची खाण आहे असा संशय असेल तेथे करावा. मात्र त्या गड्डूत पाणी किंवा तेलाऐवजी ज्या धातूची खाण असावी असे आपणांस वाटत असेल ती धातू त्या गडूत टाकावी व वरील प्रयोग करावा. प्रयोग करताना मन शांत, स्थिर व एकाग्र ठेवावे. अति सूक्ष्म अशी जरी संवेदना येऊ लागली तरी त्याची आपल्या मेंदूवर नोंद झाली पाहिजे.

काही लोक याहीपेक्षा निराळा प्रयोग करतात व त्यांना यश येते असे म्हणतात. ज्या जागी खाण आहे किंवा असावी असे वाटत असेल त्या जागेचा एक फार मोठा असा अगदी लहानसुद्धा खड्डखुड्डे, झाडेझुडपे किंवा डोंगर वगैरे दाखविणारा प्रमाणशीर असा नकाशा तयार करावयाचा. म्हणजे एक स्क्वेअर मैलाच्या जमिनीचा निदान १०० फुटांचा नकाशा असावा व त्यावरून वरीलप्रमाणे गड्डूत तो धातू ठेवून दोरी अथवा तार फिरवावी. त्यांचे म्हणणे असे आहे की, ज्या जागी प्रत्यक्ष खाण असेल नकाशातील त्या जागेवर तुमची दोरी किंवा तार आल्यावर त्या ठिकाणी ती मागेपुढे होऊ लागेल किंवा गिरक्या खाऊ लागेल. त्या जागी निश्चित ती खाण लहान प्रमाणात का होईना पण सापडते. मात्र या सर्व प्रयोगात, प्रयोग करणारात ती शक्ती निदान सुप्तावस्थेत तरी अवश्य असावयास हवी. याचाच उपयोग पुरलेले धन, हरवलेली वस्तू, मनुष्य अथवा गुरे सापडण्याकडे करून घेतात. मात्र ते कसे यासंबंधी सविस्तर वर्णन मला आढळले नाही. वाचकांनी तारतम्याने प्रयोग करून पाहावेत. या कामी असे प्रयोग यशस्वी होतात हे मात्र खरे. तपशील वाचकांनी शोधून काढावा.

* * *

१५. मस्तिष्क-शास्त्र (Phrenology)

हे एक अत्यंत बाल्यावस्थेतील परंतु उपयुक्त असे शास्त्र आहे. खरे म्हणजे शास्त्र या संज्ञेस पात्र होण्याइतके ते अद्याप प्रगत नाही. परंतु प्रगती होत जाऊन ते शास्त्र बनले तर ते निःसंशय अत्यंत उपयुक्त ठरेल. याकरिता त्याच्या प्रगतीस इच्छुक व जाणकार व्यक्तींनी हातभार लावावा, या दृष्टीने मी हे प्रकरण या ग्रंथात समाविष्ट करीत आहे. आपला मेंदू हा आपल्या शरीराच्या सर्व अंतर्बाह्य भागांवर ताबा ठेवतो. इतकेच नाही तर मेंदूतील विवाक्षित भाग शरीरातील विवाक्षित भागांवरच नियंत्रण ठेवतो. बाकीच्या मेंदूचा त्याच्याशी काही संबंध येत नाही. दृष्टी नियंत्रित करणारा मेंदूतील भाग मॅनिंजॅयटिस होऊन अथवा अन्य कारणाने खराब होऊन अकार्यक्षम झाला तर डोळे संपूर्ण शाबूत असूनही त्यास काही दिसू शकत नाही. जे डोळ्याच्या बाबतीत तेच इतर भागाचे. काही कारणाने मेंदूत रक्तस्राव होऊन तो भाग बधिर झाला तर त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या शरीराचा भाग लागलीच अकार्यक्षम बनतो. अर्धांग वगैरेमध्ये हा आपणास नेहमीचा अनुभव आहे. ज्याप्रमाणे सर्व शरीरावर मेंदूचा ताबा आहे त्याचप्रमाणे आपणांस माहीत आहे की मन सुद्धा सर्वस्वी मेंदूमार्फतच काम करीत असते. त्यामुळे मनाच्या सर्व प्रकारच्या कार्यक्षमतेवरही मेंदूचे नियंत्रण आहे. इतकेच नाही तर शरीराप्रमाणे मेंदूचे निरनिराळे भाग मनाच्या faculties वरसुद्धा नियंत्रण करीत असतात. राग, द्वेष, प्रेम, असूया इत्यादि मुख्य मुख्य तर आहेतच, परंतु गणित, गायन, चित्रकला, विज्ञान इत्यादीत प्रावीण्य मिळविण्यात मनाचा जो भाग कार्य करीत असतो ते सुद्धा त्याने मेंदूच्या कोणत्या भागापर्यंत करायचे ते ठरलेले असते. मानसिक क्रियांच्या किंवा कार्यांच्या कोणत्या भागावर मेंदूतील कोणता भाग नियंत्रण ठेवीत असतो ते हुडकून काढून तो भाग कितपत विकसित झाला आहे ते पाहून त्यावरून मानवी मनाची कोणत्या विषयात किती प्रगती करण्याची पात्रता आहे ते ठरविण्याचे कार्य हे शास्त्र करीत असते. शास्त्रज्ञांनी हजारो माणसांची डोकी तपासून प्रथम कोणता भाग, कोणती मानसिक क्रिया अथवा कार्य नियंत्रित करतो ते ठरविले व त्यानंतर कोणता भाग इतर भागापेक्षा जास्त अथवा कमी विकसित दिसत असल्याने त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या मानसिक क्रियांवर त्याचे काय परिणाम होतात ते ठरविले. खरे म्हणजे अद्याप ठरवीत आहेत. या मानसिक क्रियांवर नियंत्रण ठेवणारा मेंदूचा एखादा भाग विशेष प्रगत असा आढळून आला तर या भागाने नियंत्रित होणारी मानसिक क्रिया तो विशेष चांगल्या व परिणामकारक रीतीने करू शकेल असे अनुमान काढण्यात येते. म्हणून आपणाकडे मोठे डोके, रुंद कपाळ

ही बुद्धिमत्तेची लक्षणे समजली जातात. परंतु ते सर्वस्वी बरोबर नाही. फार तर बुद्धिमान असण्याची त्याची पात्रता असू शकेल परंतु तो बुद्धिमान असेलच असे नाही. समजा, गणित या विषयावर मेंदूतील नियंत्रण करणारा भाग विशेष प्रगत असेल तर फार तर गणितात विशेष प्रावीण्य मिळविण्याची त्याची पात्रता आहे असे अनुमान करता येते. योग्य संधी व सहाय्य मिळाले तर तो उत्तम गणिती होऊ शकेल. मात्र त्याची अशी पात्रता आहे हेच कळले नाही तर तो काहीच करू शकणार नाही. इतर विषयांत त्याची पात्रता नसल्याने त्यात गती मिळत नाही, त्याचा जन्म फुकट जातो. मुलाचा कल कोणीकडे आहे हे पाहण्याचा प्रकार यापैकीच आहे. मात्र ही पद्धत ठोकळ अनुमानापेक्षा जास्त विश्वसनीय आहे.

या पद्धतीत मेंदूचा कोणता भाग इतर भागांपेक्षा जास्त विकसित आहे किंवा असावयास पाहिजे त्यापेक्षा कमी विकसित आहे ते शोधून त्याच्या नियंत्रणाखालील असलेल्या मानसिक कार्यक्षेत्रात कमीजास्त पात्रतेप्रमाणे कमीअधिक उत्तेजन द्यावयाचे. मात्र ही पद्धती थोडी आडवळणाची असल्याने तिच्यात अद्याप तरी पुष्कळ दोष आहेत. कारण या शास्त्रात डोक्याच्या कवटीचा भाग काळजीपूर्वक तपासावयाचा असतो. त्या तपासणीत एखाद्या ठिकाणी कवटीचा भाग पुढे आलेला दिसेल तर त्याच्या नियंत्रणाखालील मानसिक कार्यक्षेत्र विशेष विकसित करण्याची पात्रता त्या व्यक्तीच्या अंगी आहे असे समजावयाचे किंवा तोच भाग वाजवीपेक्षा फारच पुढे आलेला असेल तर त्या क्षेत्रात तो अतिरेकीपणा करील अथवा तो खोलगट असला तर त्याच्या नियंत्रणाखाली मानसिक क्षेत्रात प्रगती करू शकणार नाही; असे मानण्यात येते. त्यामुळे सामान्यापेक्षा अधिक परंतु वाजवीपेक्षा जास्त नाहीत असा उंचवटा ठरविणे कठीण काम असून बऱ्याच अनुभवाखेरीज योग्य असे ठरविता येणार नाही. शास्त्रज्ञांनी हजारो डोकी तपासली व त्यावरून काही अनुमाने बसविली असल्याने ती बरोबर आहेत असे धरून चालावयास हरकत नाही. असे असले तरी निदान त्यात आज तरी पुष्कळ अडचणी आहेत.

१. निदान आज तरी आपल्या देशात हल्लीची अवस्था अशी आहे की, बहुतांश जनतेला दैनंदिन आवश्यक गरजा कशा भागवावयाच्या हाच प्रश्न सतत भेडसावत असल्याने त्या त्या वर्गातील, कुटुंबातील मुलास प्राथमिक शिक्षणापलीकडे मजल मारणेच शक्य होत नाही व म्हणून त्यास हे शास्त्र कितीही उपयुक्त असले तरी त्याचा काहीही फायदा घेता येणे शक्य होऊ शकत नाही. अर्थात आज होऊ शकत नसला तरी उद्या होऊ शकेल या भावनेने त्याच्या प्रगतीची उपेक्षा करणे वाजवी ठरणार नाही.

२. मध्यम सुशिक्षित वर्गात थोडा प्रश्न निराळा असतो. मुलाचा कल कळूनही उपयोग होऊ शकत नाही. वकिलास आपला मुलगा वकील व्हावा व डॉक्टरास तो डॉक्टर होऊन आपल्या उपजीविकेचा व्यवसाय त्याने पुढे चालवावा असे साहजिकच

वाटते. व्यावहारिकदृष्ट्या ते बरोबर पण असते. त्यामुळे मुलाचा कल दुसरीकडे आहे हे कळून सुद्धा त्याचा उपयोग होणे शक्य नसते.

३. पुष्कळ वेळा निश्चित कल कळला व इच्छाही असली तरी त्याची पूर्तता करण्याच्या साधनांचा अभाव असतो. एखाद्या खेड्यातील शेतकऱ्याच्या मुलाचा कल गायन किंवा चित्रकला याकडे असला तर काय करणार ? एक तर साधनांचा अभाव व द्रव्याचिंता निराळीच प्रथम उपजीविकेच्या साधनांकडे लक्ष देणे आवश्यक असते. त्यानंतर वेळ व पैसा ही उरली दुसरी चिंता. चित्रकला अथवा गायन हे दोन्ही छंद जीवनोपयोगी होऊ शकत नाहीत असे नाही. होतात, परंतु अगदी अपवादात्मक संख्येत.

४. मूल जन्मास आले म्हणजे त्याची सर्व हाडे अत्यंत कोमल व लवचिक असतात. त्यास आवश्यक ते काठिण्य येण्यास निदान एखादे वर्ष लागते. त्यातल्या त्यात टाळूच्या ठिकाणी तर काही महिनेपर्यंत खड्डाच असतो. इतर डोक्याचा भाग सुद्धा नरम व लवचिक असा असतो. त्यामुळे आतील मेंदूचा जो भाग इतर भागांपेक्षा जास्त विकसित असेल त्या ठिकाणी कवटीचा तो भाग थोडा फुगीर असा वाटतो व अशा वेळीच परीक्षा केली तर ती खरी परीक्षा होऊ शकेल. कारण बऱ्याच वेळा असे घडते की आई किंवा दाई अननुभवी असली तर ते मूल एकाच अंगावर पडून राहते व त्याच्या डोक्याचा तो भाग चपटा होतो. डोक्याचा मागील भाग एकदम चपटा असलेल्या पुष्कळ व्यक्ती आपणास पाहावयास मिळतात. काही दाया मुलास तेल लावून न्हाऊनमाखून स्नान घालतेवेळी त्याचे डोके दोन्ही बाजूंनी थोपटतात; त्यामुळे साहाजिकच डोक्याचा काही भाग थोडाफार पुढे मागे होतो. परंतु हा आकार नैसर्गिक नसल्याने त्यावरून केलेली अनुमाने बरोबर असणार नाहीत.

५. शास्त्रज्ञांनी अभ्यास करून डोक्याच्या कवटीचे एकंदर ४२ भाग पाडलेले असून त्यातील कोणत्या भागाच्या नियंत्रणाखाली कोणती मानसिक प्रवृत्ती आहे, त्यासंबंधी अनुमाने बसविली आहेत. त्यास अद्याप सिद्धता म्हणता येणार नाहीत. कारण त्यात पुष्कळ अडचणी आहेत. (i) प्रत्येकाच्या डोक्याचा आकार निरनिराळा व लहानमोठा असतो. शास्त्रज्ञांनी डोक्याचे जे भाग पाडले आहेत व प्रत्येक भागाच्या ज्या मर्यादा दाखविल्या आहेत तशा कोणत्याही कवटीला प्रत्यक्ष नाहीत--त्या केवळ काल्पनिक आहेत. त्यामुळे कोणती रेषा कोठे सुरू होते व कोठे संपते हे नक्की ठरविणे केवळ अशक्य असते. (ii) दुसरे म्हणजे कवटीस येणारा फुगवटा किंवा खोलगट भाग काही शास्त्रज्ञांच्या रेघा पाहून तयार होत नाहीत. एखादा फुगवटा शास्त्रज्ञांनी ठरविलेल्या एखाद्या भागास थोडा व जवळच्या भागात अधिक असा असू शकतो व दोन्ही भाग परस्परविरोधी प्रवृत्ती दाखवीत असतात. अशा वेळी अनुमान कसे करावयाचे. (iii) एक भाग कोठे संपतो व दुसरा कोठे सुरू होतो हे नक्की ठरविणे शक्य नसते. (iv) तसेच उठावदार असलेला भाग मर्यादित असला तर त्याचे

नियंत्रण विशेष प्रभावशाली होऊ शकेल. उठाव जास्त असले तर तेच कार्य अतिरेकी स्वरूपात होते. तर या उठावाच्या मर्यादा कशा ठरवावयाच्या ते ज्याच्या त्याच्या अनुभवावरून ठरवावे लागते. प्रत्येकाचे अनुभव निराळे असतात. ते कधी बरोबर तर कधी चुकीचेही असू शकतील. (v) शिवाय डोक्यावरील वाढलेल्या झुलपांमुळे कवटी नीट तपासून अनुमान काढणे पण कठीणच असते.

६. खरे म्हणजे मेंदूचा आतील कोणता भाग किती विकसित झाला आहे त्यावरून हे ठरवावयाचे असते, वरील कवटीवरून नव्हे. परंतु जिवंतपणी ते शक्य नसल्याने त्याचा बाहेरील कवटीवर जो परिणाम झाला असेल त्यावरून ठरवावे लागते. ते चुकीचेही असू शकेल.

७. मेंदूचा कोणता भाग कोणत्या मानसिक क्रिया नियंत्रित करतो याबद्दल शास्त्रज्ञांतच अद्याप एकवाक्यता नाही. प्रत्येक मनुष्य काही शास्त्रज्ञ नाही. त्यामुळे कोणत्या शास्त्रज्ञाचे मत ग्राह्य मानावे अगर मानू नये हे सामान्य माणसास ठरविणे शक्य नसते. त्यामुळे एखाद्याचे चुकीचे अनुमान ग्राह्य धरून एखाद्याचे जन्माचे नुकसान होण्याचा संभव असतो.

८. या सर्वांपेक्षा महत्त्वाचा मोठा आक्षेप म्हणजे मेंदूमार्फत मनाच्या क्रिया चालतात हे खरे असले तरी मन म्हणजे मेंदू नव्हे व मेंदू काही मनाच्या क्रिया उत्पन्न करीत नाही. नळातून पाणी वाहते. नळ बारीक असेल तर धार बारीक येईल व जाड असेल तर मोठी येईल. हे जरी खरे असले तरी नळ म्हणजे पाणी नव्हे. त्यामुळे मनाच्या मूळ प्रवृत्तीमुळे मेंदूचा तो विशिष्ट भाग अधिक फुगीर अथवा खोलगट बनतो. किंवा तो भाग अगोदरच अधिक फुगीर किंवा खोलगट असल्याने मनास त्या ठिकाणी त्या भागाने नियंत्रित केलेल्या प्रवृत्तीच्या वाढीस अधिक अथवा कमी वाव मिळतो. हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. त्याचा निश्चित निर्णय लागल्याखेरीज त्यावरून काही अनुमान करणेसुद्धा चुकते. मेंदूच्या फुगवट्यामुळे अथवा खोलगट भागामुळे मनाच्या प्रवृत्ती कमी–अधिक कार्यक्षम बनतात असे असले तर अगदी लहानपणी मुलाची कवटी लवचिक असता विवक्षित ठिकाणी फुगवटे किंवा खोलगट भाग तयार करवून घेता येतील व त्यास आपल्या इच्छेप्रमाणे गणिती किंवा शास्त्रज्ञ बनविता येईल. परंतु तसे शक्य वाटत नाही व मनाच्या मूळ प्रवृत्तीमुळे असे फुगवटे व खोलगट भाग तयार होतात असे मानले तर त्यात मागे मी लिहिल्याप्रमाणे आई अथवा दाईमुळे फेरफार होणे शक्य असल्याने सर्व अनुमाने चुकीची अशी येतील.

असो. असे आक्षेपच काढीत गेले तर ते कधीच संपावयाचे नाहीत. तरी पण मला जे महत्त्वाचे वाटले ते मी नमूद केले आहेत. आता मूळ विषयाकडे वळू.

गेल्या शतकात एक काल असा होता की, युरोपातील पुष्कळ देशांत बरेचसे कारखानदार, व्यावसायिक, व्यापारी संस्था उमेदवाराकडून त्याच्या कार्यक्षेत्रांत असलेल्या व्यवसायास तो लायक आहे असे फरेनॉलॉजिस्टकडून प्रमाणपत्र आणल्याशिवाय

नोकरीवर ठेवीत नसत. परिणामी अति तेथे माती असे होऊन मध्ये काही काल हे शास्त्र लुप्तप्राय झाले होते. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जर्मनांना त्याची उपयुक्तता कळून आली व त्यावेळी त्यांना जिवंत अथवा मृत अशा मानवी कवट्या मिळण्यात कसलीच अडचण नसल्याने त्यांनी हजारो मेंदूंचे आतून बाहेरून काळजीपूर्वक संशोधन करून काही विशेष सिद्धान्त ठरवून त्याची टिपणे करून ठेवली होती. ती सर्व रशियाच्या ताब्यात गेली असून ते त्यावर विशेष संशोधन करीत आहेत असे कळते. ते कसेही असो, हे एक अत्यंत उपयुक्त शास्त्र आहे व त्यात प्रगती होणे आवश्यक आहे हे निर्विवाद. म्हणून वाचकांच्या माहितीकरता एक साधारण रूपरेषा देण्याचा या प्रकरणात मी प्रयत्न करीत आहे.

मी यापूर्वीच सांगितले आहे की, शास्त्रज्ञांनी मेंदूच्या नियंत्रणाखाली असलेल्या मनोव्यापाराचे एकंदर ४२ भाग पाडले आहेत; व त्यांपैकी कोणता भाग मनाच्या कोणत्या मनोव्यापारावर नियंत्रण ठेवितो हे ठरविले आहे. परिशिष्टातील चित्रात दाखविल्याप्रमाणे त्यात नंबर दिले आहेत. त्यात पुन्हा एक वैशिष्ट्य आहे की, एखादा नंबर एखाद्या विशिष्ट मनोव्यापारावरील नियंत्रण निदर्शित करीत असेल व तो भाग इतर भागांपेक्षा थोडा पुढे आलेला असेल तर त्याच्या नियंत्रणाखालील विषयात त्यास विशेष प्रावीण्य मिळेल, असे समजावयाचे. परंतु तो वाजवीपेक्षा जास्त पुढे आला असेल तर त्याच बावतीत तो अतिरेक करील असे समजावयाचे. म्हणजे साधारण पुढे आलेला विशेषत्व दाखवितो तर त्यापेक्षा अधिक पुढे असला तर अतिरेक दर्शवितो. आता हे प्रमाण कसे ओळखावयाचे ? बुद्धिमत्तेचा अतिरेकीपण म्हणजे घमेंडखोरपणा, आत्मप्रौढीपासून ते वेडेपणापर्यंत तोच भाग वाजवीपेक्षा जास्त खोलगट असेल तर मंदबुद्धी, बावळट, व्यवहारशून्य वगैरे. अशाप्रकारे प्रत्येक भागासंबंधी तारतम्याने समजायचे असते. त्यास प्रमाण असे काहीच नाही. याप्रमाणे या ४२ भागांपैकी प्रत्येक भागास चार स्वरूपे असतात. साधारण–खोलगट–फुगवटा–जास्त फुगवटा. या लहानशा लेखात सर्व ४२ भागांबद्दल सुद्धा प्रत्येकी गुणधर्म देणे शक्य नाही. मग प्रत्येकाचे हे चार प्रकार तर शक्यच नाहीत. ते प्रत्येकाने आपल्या अनुभवाने व तारतम्याने समजावून घेणेचे असते. मी यापुढे प्रत्येक ग्रूपसंबंधी ठोकळ रूपरेषा देण्याचे ठरवीत आहे त्या प्रत्येकातसुद्धा वरील चार भाग असतातच. ते वाचकांनी तारतम्याने ठरवावेत. अथवा यात कोणास विशेष औत्सुक्य वाटत असेल त्यांनी त्यावरील संपूर्ण विवेचनात्मक असे ग्रंथ वाचावेत. या लेखाचा उद्देश वाचकांस फक्त रूपरेषा व तीही अगदी साधारण रूपरेषा कळण्याइतपतच होईल. वाचकास निदान यावरून हे शास्त्र काय आहे, याचे महत्त्व काय आहे याचा जरी बोध झाला तरी पुरे. तसेच मी यापूर्वीच सांगितले आहे की, फक्त कोणाची कोणत्या विषयात किती प्रगती करण्याची पात्रता आहे अगर आहे की नाही हे ठरविण्यापुरतीच त्याची मर्यादा आहे, अधिक नाही.

वर लिहिलेले ४२ भाग शास्त्रज्ञांनी आठ मुख्य भागांत विभागले आहेत व त्यांतही तीन मुख्य आहेत. पहिला भाग जो मुख्यत्वे करून डोक्याच्या मागील भागात समाविष्ट असतो, त्यावरून अंतरस्फूर्ती- मनाचा विशेष कल कोणीकडे आहे ते ठरविले जाते. दुसरा भाग जो मेंदूचा बहुतेक वरील भाग व्यापून आहे त्यावरून भावना-नीतिमत्तेच्या कल्पना याचा बोध होतो. तिसरा भाग म्हणजे कपाळ व त्याच्या जवळील दोन्ही कानांपर्यंतचा भाग हा बुद्धिमत्ता निदर्शक असतो. यावरून पुढे आलेले कपाळ हे उत्तम बुद्धीचे लक्षण समजले जाते. तेच जर वाजवीपेक्षा जास्त पुढे आलेले असेल तर उलट तिचा अतिरेक म्हणजे फाजील घमेंड किंवा वेडापर्यंत मजल किंवा अविकसित भावनाप्रधानता दाखविली जाते. मोठे डोके हे विशेष चांगल्या भावना सामावणारे असे समजले जाते.

जसजसे या तीन भागांबद्दल अनुभव येत गेले तसतसे त्याची आधिक फोड व्हावी असे वाटू लागले व त्याप्रमाणे प्रयत्न करून आधिक पोटविभाग पाडण्यात येऊन त्या प्रत्येकाने कशाचे नियंत्रण केले जाते, हे दाखविण्याचा प्रयत्न केला गेला. एकंदर ४२ भाग पाडले. परंतु साधारणतः समान गुणधर्मांचे असे त्यातून आठ प्रमुख भाग पाडून त्याचे पोटभाग म्हणून एकंदर ४२ भाग समजण्यात येऊ लागले.

या ४२ भागांपैकी नं. १ ते ६ चा पहिला गट (ग्रूप) समजण्यात येतो. या पहिल्या गटावरून मुख्यत्वे करून स्वाभाविक कला-प्रेम-प्रीती, सर्व शाखा-उपशाखांसहित म्हणजे पती-पत्नी, आई वडील, भाऊ-बहीण-मित्र या सर्वांसंबंधी इतकेच नाहीतर घर, दार, कुत्रा, मांजर, पोपट यावरीलसुद्धा प्रेम व आसक्ती याच्या नियंत्रणाखाली आहे. जास्त मोठा फुगवटा अथवा खोलगटपणा यासंबंधी वर लिहिले आहे त्याप्रमाणे तारतम्याने समजावे.

दुसरा गट नं. ७ ते १२ चा समजला जातो यात बहुतेक स्वाभाविक प्रवृत्तीचा समावेश होतो. रोगाची प्रतिकारशक्ती, भांडखोर प्रवृत्ती, कृपणता, दुसऱ्यास मदत करण्याची प्रवृत्ती, चांगल्या वस्तू खाण्याची आवड, योग्य अभिरुची, द्रव्य मिळविण्याची व जतन करण्याची लालसा, खऱ्याखोट्या, चांगल्यावाईट महत्त्वाकांक्षा, व्यावहारिक हुषारी, दुटप्पीपणा, योग्य अथवा अतिरेकी काळजीवाहूपणा वगैरे.

तिसरा गट नं. १३ ते १६ चा समजला जातो. याच्या नियंत्रणाखाली कीर्ती-अपकीर्ती, मानापमान, आत्मस्तुती, पुढारीपणा, प्रसिद्धीची हाव, दुसऱ्यावर हुकमत चालविण्याची पात्रता; स्वतःचे महत्त्व वाढविण्याचे प्रयत्न, मनमिळाऊपणा, तसेच उद्धटपणा; सर्वांशी मिळते घेणे अथवा फटकून वागणे, गर्विष्ठपणा, सहनशक्ती, आपले तेच खरे करण्याची प्रवृत्ती, मिळमिळीतपणा व भित्रा स्वभाव कोणी काही सांगितले तरी त्यावर विश्वास ठेवण्याची प्रवृत्ती, मनाचा कमकुवतपणा, निराशावाद वगैरे.

चवथा गट नं. १७ ते २१ चा समजला जातो. याच्या नियंत्रणाखाली इमानीपणा, न्यायबुद्धी, प्रामाणिक अथवा अप्रामाणिकपणा, आत्मश्लाघा, खरा किंवा

खोटा बचाव, आशाआकांक्षेच्या पूर्ततेकरिता अनुसरावे लागणारे भलेबुरे मार्ग,स्वप्नाळूपणा, भलतीच मनोराज्ये, आध्यात्मिक, धार्मिक, अलौकिक, मानसिक, चांगल्यावाईट प्रवृत्ती, विचारपूर्वक पाऊल टाकणे, एककल्लीपणा, अविचारीपणा, संशयी प्रवृत्ती, शंकेखोर स्वभाव सर्वांविषयी सहानुभूती व मदत करण्याची प्रवृत्ती, किंवा त्याचा अतिरेक, स्वार्थी तुटक बेपर्वाई वृत्ती, दुसऱ्याच्या सुखदुःखाविषयी निष्काळजी वगैरे

पाचवा गट २२ ते २६ नंबरने दर्शविला जातो. त्याच्या नियंत्रणाखाली सुद्धा बुद्धिविषयक परंतु विशेष करून तांत्रिक गोष्टीचा समावेश होतो. इंजिनिअरिंग, चित्रकला, डिझाइन्स सौंदर्य, नाटक, गायन, नकला, निसर्गप्रेम, हजरजबाबीपणा, खेळकर वृत्ती, थट्टेखोर स्वभाव वगैरे.

सहाव्या गट विभागात नं. २७ ते ३० येतात याच्या नियंत्रणाखाली मनन, चिंतन, सारासार विवेक व विचार करण्याची शक्ती, चिकित्सक प्रवृत्ती, भाषेवर प्रभुत्व, दृष्टी, निश्चित निर्णयास लवकर येण्याची पात्रता, मनुष्यस्वभावाची पारख व त्यास लागणारे गुण, उत्तम वक्तव्य, दुसऱ्यावर छाप पाडण्याची लकब वगैरे.

सातव्या गटात नं. ३१ ते ३४ चा अंतर्भाव होतो. याच्या नियंत्रणाखाली इतिहास, संख्याविषयक ज्ञान, तारीख वार ध्यानात ठेवण्याची शक्ती, योग्य समयाचे अचूक ज्ञान, वक्तशीरपणा, गायन, चित्रकला इत्यादींचे शास्त्रीय ज्ञान, त्यातील खाचाखोचा, बारीकसारीक भेद यांचे विशेष ज्ञान, मग त्यास प्रत्यक्ष गायन अगर चित्रकला येवो वा न येवो निरनिराळ्या भाषा शिकण्याची आवड त्यावर प्रभुत्व मिळविण्याची पात्रता, उत्तम वक्ता व लेखक वगैरे.

आठव्या गटात नं. ३४ ते ४२ चा अंतर्भाव होतो. त्याच्या नियंत्रणाखाली सूक्ष्म दृष्टी व चिकित्सक प्रवृत्ती, कोणत्याही व्यक्तीतील गुणदोष हुडकून काढण्याची पात्रता, एखादी व्यक्ती नैसर्गिक सौंदर्य, सुंदर चित्र, उत्तम गाणे वगैरे लक्षात ठेवण्याची पात्रता व प्रवृत्ती, एखादा जिन्नस नुसता पाहून तो किती अंतरावर व काय आकाराचा आहे याचे अचूक अनुमान, पदार्थांचे गुणधर्म, वजने, मापे न करता अचूक सांगता येणे, विविध रंगांचे, आवाजाचे सूक्ष्म ज्ञान व माहिती रंगांचे यथायोग्य मिश्रण करण्याची लकब, निरनिराळ्या आवाजांचे सूक्ष्म ज्ञान, पद्धतशीर प्लॅनिंग करणे, त्याची योग्य मोजमापे अंदाजाने पण बरोबर न मोजता सांगता येणे, गणिती प्रवृत्ती, त्यासंबंधी योग्य ते मानसिक समालोचन प्रवासाची आवड परिस्थितीशी समरस होणे, सूक्ष्म अवलोकन व स्मरणशक्ती वगैरे वगैरे.

याप्रमाणे १ ते ४२ नंबरांत शास्त्रज्ञांनी बहुतेक मानसिक प्रवृत्तींचा समावेश केलेला आहे. त्याच्या वर्णनात परस्परविरोधी प्रवृत्ती एकाच गटाच्या नियंत्रणाखाली दिल्या आहेत. त्या त्यातील उंचनीच फुगवटा किंवा खोलगट भाग याप्रमाणे समजावेत. असे असले तरी त्यात अडचणी व अडथळे काय आहेत याचे सुरवातीस विवेचन

केले आहे, ते दृष्टिआड करू नये. प्रयोग करणाराने ते सर्व ध्यानात ठेवून सारासार विचार करून फार काळजीपूर्वक निर्णय घ्यावेत. कितीही पुस्तके वाचली तरी प्रत्यक्ष-अनुभवाखेरीज सर्व व्यर्थ आहे. प्रथम कोणाच्या तरी मार्गदर्शनाखाली व नंतर स्वतंत्रपणे अत्यंत काळजीपूर्वक निर्णय घ्यावेत. त्यांचे टिपण ठेवावे. ते ताडून पाहत जावे. वेळोवेळी त्यात जरूर त्या सुधारणा करीत जाव्यात. सतत प्रयत्न व पुष्कळ अनुभव व त्यांचा अभ्यास हीच या विषयात प्रभुत्व मिळवून देण्यास उपयोगी पडतील.

* * *

१६. व्याधि-विमोचन (Healing)

मानवी शरीरास अनेक कारणांनी निरनिराळ्या प्रकारच्या व्याधींचा उपद्रव होत असतो व त्यातून मुक्त होण्यासाठी देशकालमानाप्रमाणे निरनिराळे उपाय योजिले जातात. आज सर्व देश, सर्व समाज, सर्व जग एकत्र येण्याच्या मार्गात आहे. त्यामुळे सर्व मानवजात व्याधींच्या उपद्रवापासून मुक्त होण्याकरिता योजीत असलेल्या अनेक उपायांची परस्परांस माहिती होत आहे. विशेषतः आपणाकडे आयुर्वेदिक, युनानी, ॲलोपॅथी, होमिओपॅथी, बारा क्षार वगैरेंसारख्या निरनिराळ्या पद्धतीनुसार उपाययोजना होत असतात. या सर्वांत प्रामुख्याने निरनिराळ्या प्रकारच्या औषधी वापरल्या जातात. मग त्या कोणत्याही पद्धतीने तयार केलेल्या असोत. काही ठिकाणी हिप्नॉटिझम, मेस्मेरिझमसारख्या प्रकारांनी पण इलाज केले जात आहेत. परंतु अद्याप त्यावर कोणी फारसा भर दिलेला दिसत नाही. याखेरीज बव्हंशी बहुजनसमाजात अज्ञात असे काही व्याधिनिवारणाचे प्रकार आहेत. त्यांचा मी प्रामुख्याने विचार करणार आहे. त्यासोबतच सामान्य माणसात थोड्या श्रमाने त्या उपायांचा स्वतः करता, त्याचप्रमाणे इतरांकरता उपयोग कसा करता येईल हेही पण सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.

अज्ञात या सदरातसुद्धा तीन मुख्य भाग पडतात. १. मानसिक, २ प्रार्थना व ३ Spirituai जीवात्म्यांच्या साहाय्याने

यांपैकी मानसिक या सदरात हिप्नॉटिझम, मेस्मेरिझम, Auto suggestion [आत्मसूचना] वैचारिक शक्तियुक्त–केवळ मानसिक वगैरे. यांत हिप्नॉटिझम, मेस्मेरिझमवर पुष्कळ वाङ्मय सर्व भाषांत उपलब्ध आहे. म्हणून याबद्दल विवरण येथे करीत नाही. इतर सर्व मानसिक उपचारांच्या प्रयोगात आत्मसूचना किंवा Auto-Snggeston हा सर्वांचा पाया आहे. म्हणून त्याचा प्रथम जरा विस्तारपूर्वक विचार करू या.

स्वतः आरोग्यसंपन्न असणे व कोणत्याही व्याधीस प्रतिकार करण्यास समर्थ असणे ही गोष्ट व्याधिनिवृत्तीपेक्षाही महत्त्वाची आहे. व्याधीच होऊ दिली नाही तर ती निवारण करण्याचा प्रसंगच कसा येणार ? परंतु तसे होऊ शकत नाही. याकरता दोहोंचाही विचार केला पाहिजे. त्यातल्या त्यात त्यांना मानसिक व तत्सम प्रकाराने इतरांच्या व्याधी निवारण करणे आहेत त्यांनी स्वतः पूर्ण आरोग्यसंपन्न व कोणत्याही व्याधीस प्रतिकारक्षम असलेच पाहिजे. जो स्वतःची व्याधी निवारण करू शकत नाही किंवा जो स्वतःच व्याधिग्रस्त आहे किंवा त्याचा प्रतिकार करू शकत नाही तो या कोणत्याही (मानसिक) प्रकाराने इतरांच्या व्याधी निवारण करूच शकणार नाही. याकरिता स्वतः व्याधिप्रतिकारक्षम व संपूर्ण आरोग्यसंपन्न राहण्याकरता काय काय केले पाहिजे त्याचा अगोदर विचार करू या.

Auto-Suggestion किंवा कोणतेही मानसिक उपचार म्हणा, त्याकरता मन एकाग्र करणे आवश्यक असते. इतकेच नाही तर शरीरातील शक्तीसुद्धा एके ठिकाणी केंद्रित करता आल्या पाहिजेत. याकरता प्रत्यक्षात घडणारी लहानशी घटना निवेदन करतो. आपणास माहीत आहे की पूर्वी बहुतेक दंतवैद्य चिनी होते व पूर्वीच्या काळी आज दंतवैद्याजवळ आहेत असे चिमटे वगैरे नव्हते, त्यामुळे त्यांना हालणारे वा न हालणारे दात सुद्धा निव्वळ बोटाच्या चिमटीत धरून काढावे लागत व कोणत्याही प्रकारची भूल वगैरे न देता ते सहज एका बोटाने सुद्धा नेट देऊन काढताना मी पाहिले आहेत. दोन बोटांनी काढणारे तर पुष्कळ. हल्ली ती निव्वळ चिनी लोकांची मोनोपली राहिली नसून आपणापैकी सुद्धा काही जणांचा माधवबागेसारख्या ठिकाणी दंतयज्ञ चालू असलेला पाहावयास मिळतो. त्याची पूर्वतयारी ते याप्रमाणे करीत असत. प्रथम एका पांगाऱ्याच्या फळीत एक तारचूक अधर ठोकावयाची व ती अंगठा अगर त्याच्याजवळील बोट यांनी उपटून काढावयाची मग थोडी अधिक खोल ठोकावयाची व त्याच बोटांना प्रयत्न करून उपटून काढावयाची. असे करीत खूप खोल ठोकूनही किंवा कोणत्याही लाकडात खोल ठोकून तो खिळा केवळ दोन बोटांनी उपटून काढावयाची प्रॅक्टिस ते करीत असत. अशा रीतीने मनाची व शरीराची सर्व शक्ती त्या दोन बोटांत केंद्रित करून खिळा काढावयाची प्रॅक्टिस पूर्ण झाली की कोणताही दात हालणारा असो वा नसो ते त्या दोन बोटांनी सहज काढू शकत असत व अद्याप काढतात. कोणी मोठा पहिलवान असला तरी त्यास हे जमणे शक्य नसते. कारण प्रॅक्टिसने शक्ती केंद्रित करून मग ते करणे शक्य होत असते. ऑटोसजेशन मध्ये सुद्धा याप्रमाणेच. मात्र हवे तेथे मन सर्व शक्तीनिशी केंद्रित करण्याची प्रॅक्टिस करावी लागते.

मानसिक शक्तीने इतर कोणाची व्याधी दूर करण्याचा प्रयत्न करण्या अगोदर स्वतःचे शरीर अगर मन व्याधियुक्त असेल तर ते त्यातून मुक्त केले पाहिजे व त्यानंतर ती दोन्ही म्हणजे शरीर व मन ही नेहमी व्याधिमुक्त कशी राहतील याची काळजी घेतली पाहिजे. कारण तुम्ही संपूर्ण आरोग्यसंपन्न असल्याखेरीज मन व शरीर ही कोठेही केंद्रित करूच शकणार नाही. त्याकरिता म्हणजे शरीर सर्व प्रकारच्या व्याधींस प्रतिकारक्षम ठेवून सतत आरोग्यसंपन्न ठेवण्याकरिता काय केले पाहिजे ते पाहू या.

ज्यांना या क्षेत्रात काही कार्य करणे आहे त्यांनी त्राटकाचा अभ्यास ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासंबंधी वर्णन ' योग ' या प्रकरणात आले आहे. ते कृपा करून पाहावे. त्राटक करण्यापूर्वी पद्मासनावर बसून दहा सेकंद पूरक व वीस सेकंद रेचक असे अर्ध्या मिनिटात एक श्वास याप्रमाणे तीस पूरक व रेचक करावेत. पूरक करताना एका नाकपुडीने श्वास घेतला तर रेचक करताना दुसऱ्या नाकपुडीने सोडावा. कुंभक चुकूनही करू नका. पूरक म्हणजे श्वास आत घेणे व रेचक म्हणजे बाहेर सोडणे. त्राटकास

पंधरा मिनिटे व या क्रियेस पंधरा असा अर्धा तास लागेल. इतर आसने किंवा प्राणायाम करण्याची जरूरी नाही. सायंकाळी पुन्हा एकदा पूरक व रेचक तितकाच वेळ करावे. त्राटक दोन वेळ करण्याची आवश्यकता नाही. निव्वळ इतके नियमाने करीत राहिले व सात्विक, परिमित आहारविहार व निद्रा ही असली तर तुमची प्रकृती निःसंशय संपूर्ण आरोग्यसंपन्न राहील. अजीर्ण कधीही होऊ नये. विडीकाडीचे सुद्धा व्यसन नसावे. सर्वच परिमित असावे. जो जास्त खातो, जास्त झोपतो व जास्त बोलतो त्याच्याकडून काहीच होणार नाही याची खात्री ठेवावी. कारण त्यातच त्याच्या शक्तीचा व्यय होऊन इतरत्र ती उपयोगात आणण्यास शिल्लकच राहत नाही.

याशिवाय जर शक्य असेल तर शुद्ध पारदाचे लॉकेट शरीरावर असावे. त्याने निदान मोठे आजार शरीरास होऊ शकत नाहीत —असा अनुभव आहे. आपणास माहीत आहे की शेणात थोडा पारा कालविला व त्याचे गोळे करून उन्हात वाळगून धान्यात ठवेल तर वर्षानुवर्षे त्यात कीड पडत नाही. त्याच तत्त्वावर लॉकेटच्या स्वरूपात पारदाचा शरीराशी सतत संपर्क राहिला तर सहसा त्यास कोणताही नवीन आजार होऊ शकत नाही मात्र एखादा आजार अगोदरच घर करून बसला असला तर लॉकेटचा फारसा उपयोग होत नाही. त्याकरिता पारदामृताचा उपयोग करावा लागतो. पारदावर खरोखरी पुष्कळ संशोधन होऊन सामान्य माणसास रोजच्या प्रचारात तो कसा आणता येईल, याचा प्रयत्न झाला पाहिजे. कारण पारदाच्या अमोल गुणधर्मांची सामान्य नागरिकास अद्याप कल्पनाच नाही. एकच गोष्ट सांगतो की आयुर्वेदातील कोणतेही महत्त्वाचे औषध पारदाखेरीज नाही. पारद हा देह-लोह-सिद्धीकर आहे. म्हणजे पारद शरीराचा कायाकल्प तर घडवून आणतोच; परंतु त्यापासून जाणत्यास सुवर्ण देखील करता येते. असे असले तरी एक महत्त्वाची गोष्ट नमूद करून ठेवावीशी वाटते, ती ही की पारद हा औषधी प्रयोगात अमृत असला तरी मूळ व अशुद्ध स्वरूपात तो विष आहे. त्यासंबंधी ज्याचा प्रत्यक्ष कोणा तज्ञाच्या देखरेखीखाली अभ्यास झाला नसेल त्याने या भानगडीत पडू नये, स्वतः तर पडू नये, परंतु ज्याला अपुरी माहिती आहे अशा व्यक्तीकडूनही काही करवून घेऊ नये. कारण त्यायोगे फायदा होणे तर दूरच राहील, पण नुकसान मात्र निश्चित होईल. कच्च्या गुरूच्या मार्गदर्शनाखालील योगाभ्यास व अपुऱ्या माहितगाराकडून पारदक्रिया यासारख्याच गोष्टी हानिकारक असतात. पारदबद्ध करून लॉकेट, अंगठी, गुटी आदी करण्यापूर्वी तो संपूर्ण अष्टांगपूर्ण शुद्ध, शक्यतोवर बुभुक्षित करून घ्यावा. लागतो. ती क्रिया पुस्तकात वाचून जमत नाही, तर ज्याने प्रत्यक्ष कोणाच्या मार्गदर्शनाखाली स्वतः तयार केले असेल तोच करू शकेल. यामुळेच जुन्या पिढीतील वैद्य लोकांच्या घराण्यात ही विद्या अद्याप जिवंत आहे. ती हळूहळू लुप्त होत आहे. काही साधुसंन्याशी त्यातल्या त्यात नाथपंथीय ही विद्या हाताळतात. परंतु या लोकात देखील फसविणारेच

अधिक. कारण नुसते पारद शुद्धीकरण म्हटले तरी कमीतकमी पंधरा ते वीस दिवस लागतात कितीही घाई केली तरी याच्या आत होऊ शकत नाही इतका त्यांना वेळ नसतो. तर क्रिया त्यानंतरच्या. पारद शुद्ध केल्यावाचून गुटी वगैरे केल्यास ती उलट हानिकारक होते, याची जाणीव ठेवावी. इतके सविस्तर लिहिण्याचे कारण म्हणजे ज्यांना शक्य आहे त्यांनी पारद लॅाकेट, गुटी वगैरेचा लाभ जरूर घ्यावा. त्याने आरोग्य टिकविण्यास अमोल मदत होते. परंतु त्यात फसवणूक होऊ नये. कारण त्याने नुकसान होईल, उपयोग तर होणार नाहीच. असो. या अगर अन्य कोणत्याही प्रकारांनी शरीर व मन ही दोन्ही आरोग्यसंपन्न ठेवावीत.

मानसिक व्याधिनिवारणाच्या पद्धतीत प्राणशक्तिद्वारा; विचारशक्तिद्वारा, अध्यात्मसाधनाने वगैरे बरेच प्रकार आहेत. त्यात कोणी रोग्याच्या दुःखाच्या भागावर हात फिरवून तर कोणी बोटांनी ठोकून, कोणी हळू हळू थापट्या मारून किंवा कोणी रोग्याकडे नुसते पाहूनसुद्धा व्याधिनिवारणाचे प्रयोग करीत असतात. त्या सर्वांत एकच तत्त्व आहे. मग प्रकार कोणतेही असोत. त्याकरिता प्राथमिक तयारी म्हणून खालील गोष्टींवर भर द्यावा.

१. सकाळ—सायंकाळ वर सांगितल्याप्रमाणे त्राटक करून पूरक—रेचक १५-१५ मिनिटे करावे. त्राटक मात्र एकच वेळ करावे.

२. पूरक—रेचक झाल्यावर साधारण पंधरा मिनिटे शरीराचा प्रत्येक भाग शिथिल Relax करावा की कोणताही भाग उचलला असता आपोआप खाली पडला पाहिजे. त्याचप्रमाणे त्याच वेळी मन पण Relax करण्याचा अभ्यास करावा.

३. रात्री ९ नंतर साधारण अर्धा तास ध्यानात साधे अर्ध पद्मासन घालून बसावे. त्या कालात आपले मन शरीरातील प्रत्येक भागावर थोडे थोडे केंद्रित करण्याचा अभ्यास करावा. हात, पाय पोट, छाती, मेंदू या सर्वांकडे पृथक्पणे आपण अमृत दृष्टीने पाहत असून, आपल्या शरीरातील प्रत्येक भाग आरोग्यपूर्ण व बलवान आहे अशी भावना करीत जा. तशा सूचना देत जा. मी आजारी, दुर्बल, नाही, अशा नकारात्मक सूचना कधीही नसाव्या. तर मी निरोगी आहे, बलवान आहे, दुसऱ्यास निरोगी करू शकेन अशा असाव्यात.

४. ज्यांच्या शरीरात एखाद्या आजाराने घर केलेले आहे व ज्यांचे मन रागद्वेषांनी भावनांनी मलिन असल्याने कोठेही केंद्रित होऊ शकत नाही अशा व्यक्ती या क्षेत्रात काहीच करू शकत नाहीत. याकरिता प्रथम शरीर व मन ही निरोगी करा.

५. शरीराच्या प्रत्येक भागास सूचना देऊन तें नुसते आरोग्यसंपन्न होईल असे करून भागणार नाही. तर ते कोणत्याही व्याधींस समर्थपणे प्रतिकार करू शकेल असे केले पाहिजे. कारण तुमचा निरनिराळ्या रोग्यांशी संबंध यावयाचा असतो. याची उलट प्रक्रिया तुमच्यावर होण्याची शक्यता असते, हे ध्यानात असू द्या.

६. ज्याच्या मनास राग, लोभ, मत्सर, ईर्षा इत्यादी अथवा यापैकी काहीही

प्रकर्षाने वास करीत असतात, त्याच्या मनाच्या बऱ्याचशा शक्तीचा त्यातच व्यय होत असतो व त्यामुळे ती इतर कोणाच्या व्याधीवर केंद्रित करण्यास शिल्लकच राहात नाही. मन निर्मळ असेल तर त्यास कोठेही केंद्रित करणे सोपे जाते.

७. आहार, निद्रा, संभोग हीसुद्धा परिमित असावीत आहार सात्त्विक व कितीही आवडीचा पदार्थ, असला तरी कधीही अजीर्ण होणार नाही याची काळजी घ्या. साठ टक्केपेक्षा जास्त आजार खाण्यानेच होतात. पान-तंबाखूसारख्या व्यसनापासून सुद्धा अलिप्त असावे. मग दारू वगैरे तर लांबच. परस्त्री मातेसमान मानावी. तारुण्यात परस्त्री-चिंतनात जितका वेळ जातो तितका इतर कशात जात नाही असे तज्ज्ञ सांगतात.

८ आठवड्यातून एक दिवस मौन पाळता आले तर उत्तमच. मात्र मौन म्हणजे तोंडाने न बोलता पाटीवर लिहून दाखविणे हे मौन नव्हे; उलट दुप्पट बोलण्यासारखे होते. त्यात प्रथम आपण स्वतःशी बोलतो, मग लिहितो व पुन्हा वाचतो म्हणजे बोलतोच. मौन म्हणजे कोणाशी बोलावयाचे तर नाहीच, परंतु स्वतःशी विचार देखील कमी करावयाचा. मनाच्या शक्तीचा जास्तीत जास्त संचय करावयाचा; हे त्यात धोरण असावे. शिवाय तो विश्रांतीचा दिवस असल्याने आठवड्यात आपण काय केले, काय करावयास पाहिजे होते याचा आढावा घ्यावा व काही चुकत असले तर त्यात सुधारणा करण्याचा निश्चय करावा.

९. मानसोपचार करणाऱ्याने त्यावर आपली उपजीविका अवलंबून कधीही ठेवू नये. कारण त्यायोगे जास्त जास्त रोगी आपणाकडे यावेत व आपणास जास्त जास्त पैसा त्यापासून कसा मिळविता येईल याकडे प्रवृत्ती वाढते व मन मलीन होते. मिळालेली सिद्धी नाहीशी होते. उपजीविकेचे साधन काही निराळे असावे. मानसोपचार विनामूल्य असावेत हे उत्तम.

१०. परान्न कटाक्षाने वर्ज्य असावे. होता होई तो रुग्णाच्या घरी चहासुद्धा घेऊ नये. सतत प्रवासही वर्ज्य असावे. थोडक्यात म्हणजे आत्मशक्तीचा क्षय होईल किंवा ती मलीन होईल असे काही करू नये.

चारित्र्यसंपन्नता हा सर्वांचा पाया आहे.

११. मानसोपचार करणाराने द्रव्याच्या स्वरूपात उपाहार घेऊ नये. तरी पण मोबदला म्हणून त्यात अगर त्याच्या नातेवाईकास काही हजार श्रीराप जप वगैरेसारखे करावयास सांगावे. त्याने रुग्णास तर मदत होतेच; परंतु त्याचा आपणासही अप्रत्यक्ष रीतीने फायदा मिळतो.

१२. आणखी एक गोष्ट नेहमी ध्यानात असू द्यावी की कोणीही कशाहीकरता व्यक्त केला की, शिल्लक ही कमी व्हावयाचीच. मग तो व्यय चांगल्याकरता असो वा वाइटाकरिता. मानसोपचार करणे याचा अर्थ आपल्या मनशक्तीचा व्यय करणे असा होतो. त्याकरता तिचा सतत पुरवठा होत राहील असे करीत असावे.

त्याकरता रोज ॐ ह्रीं नमः हा जप निदान ११ माळा केल्यास उत्तम. किंवा दुसरा काही उपाय माहीत असला तर तो करीत असावा. मात्र सतत पुरवठा होईल असे काही तरी करीत असावे प्रथम प्रथम मानसोपचार करून आल्यावर चांगलाच थकवा येतो, असे आढळून येईल. याचाच अर्थ शक्तीचा क्षय. तिच्या पुरवठ्याची व्यवस्था होत न गेली तर लवकरच तुम्हांस अंगीकृत कार्यात अपयश येत आहे असे आढळून येईल.

शरीर शिथिल करून शरीरातील प्रत्येक भागावर मम केंद्रित करण्याची प्रॅक्टिस निंदान तीन महिने झाली म्हणजे तुमचा तुम्हासच आत्मविश्वास उत्पन्न होईल. मनातील सर्व शक्ती आपल्या हातातून प्रवाहित होत आहे, अशी कल्पना करून त्याप्रमाणे प्रयत्न करीत राहा. पवित्र आहारविहार, विचार व चारित्र्य ही सर्व कटाक्षाने पाळा. मग पाहा की तुम्ही काय चमत्कार करू शकता.

ज्याला मानसोपचार करण आहेत त्याने नेहमी एक लक्षात ठेवावे की, त्याच्याकडे येणारे रुग्ण अगोदर इतर सर्व डॉक्टर वैद्य पाहून आलेले असतात. त्यामुळे एक तर आजार असाध्य अवस्थेत गेलेला असतो. शिवाय त्याहीपेक्षा वाईट म्हणजे रोगी निराश झालेला असतो. त्यास वाटत असते की इतके करून काही गुण आलेला नाही व आता कसचा गुण येणार ! पण एक शेवटचा इलाज म्हणून प्रयत्न करून पहावा इतकेच. ज्याठिकाणी रुग्णाचे मानसिक सहाय्य आपणास मिळत नाही तोपर्यंत यश येणें दुरापास्त असते. याकरिता असे उपचार करणाराने प्रथम नेहमी हसतमुख, आनंदी, कपडे साधे पण स्वच्छ य रोग्याशी बोलताना प्रथम त्याच्याशी आत्मविश्वास उत्पन्न करून तुम्ही त्यास बरे करणारच अशी त्यात भावना उत्पन्न करा. त्याचे मानसिक सहाय्य तुम्हास शंभर टक्के मिळाले पाहिजे म्हणजे तुमचे काम पुष्कळ सुलभ झाले. मग आजार किती का असाध्य असेना रोग्याच्या पोटावरून हात फिरवावयाचा की टिचक्या मारावयाच्या अथवा थापट्या मारावयाच्या याला फारसे महत्त्व नाही. मानसोपचार म्हणजे निव्वळ मानसिक रोगावर उपचार असे नव्हे. आजार कोणताही असो त्यात रोग्याचे मन व आपले मन यात एकतानता साधून त्याचा त्यास विश्वास उत्पन्न झाला पाहिजे असे प्रथम करा.

मानसोपचारतज्ज्ञ म्हटला तरी त्यास थोडी Anotomy Physioiogy रोग्याची नावे स्थाने, त्याचे निदान इत्यादींची निदान रूपरेषा माहीत असावी. त्याप्रमाणे आपल्या प्रत्येक अवयवास व शरीरास त्याचप्रमाणे प्रत्येक आजारास त्याची (आजाराची) एक मानसिक बाजू असते. आजार शरीरावर आक्रमण करतो, त्यात सुद्धा कोणत्या तरी शक्तीचा व्यय होत असतोच. त्या शक्तीवर आजाऱ्याचे मन केंद्रित करून ती शक्ती त्याच्या शरीरातून काढून टाका व त्यास नवीन शक्तीचा पुरवठा होणार नाही असे करा; म्हणजे आपोआपच आजाराचा जोर कमी होऊन तो निर्मूल होईल. मग राहिलें त्याने जे नुकसान केले असेल ते भरून काढण्याचे. याकरता एक

सोपी पद्धत अमलात आणा. रोग्याचा हात हातात धरा अथवा त्याच्या छातीवर, पोटावर ठेवा व स्वतःच्या सर्व शरीरातील व मनातील शक्ती आपल्या हातातून प्रवाहित करून सतत असे चिंतन ठेवा की मी आरोग्यप्रवाह रोग्याच्या शरीरात सोडीत आहे. असें करताना रोग्याचा दुसरा हात एका भांड्यात थोडे गरम पाणी घेऊन त्यात सोडून ठेवा; म्हणजे तुमच्या शरीरातील व मनातील आरोग्यप्रवाह त्याच्या शरीरावर परिणाम करून आपणासोबत आजाराची बीजे घेऊन पाण्यात निघून जाईल. फार तर दहा पंधरा मिनिटे रोज हा प्रयोग करावा. प्रथम तुम्हास हे सर्व लक्ष केंद्रित करून त्यावर संपूर्ण लक्ष ठेवून करावे लागेल व त्याने थकवा सुद्धा येईल. परंतु पुढे सवय होऊन केवळ पाच मिनिटात मुद्दाम काही न करता तुमचे कार्य होत आहे असा तुम्हास अनुभव येऊ लागेल.

मात्र यात कधी कधी एक थोडा धोका संभवतो व तो म्हणजे आजाराचा जोर जास्त असेल व रोगी तुमच्याशी सहकार्य न करता उलट अप्रत्यक्ष का होईना पण प्रतिकार करीत असेल तर त्याच्या शरीरातील प्रवाह तुमच्या हातामार्फत तुमच्याच शरीरात प्रवेश करतात व त्याने रुग्णाचा तर फायदा होत नाहीच तर तुमचे मात्र नुकसान होण्याचा संभव असतो. याकरता त्याच वेळी दुसरे एक भांडे जवळ ठेवून त्यांत आपल्या दुसऱ्या हाताची बोटे बुडवून ठेवावीत. सहसा असे होत नाही. परंतु एक संभाव्य धोका म्हणून माहिती असावी. ज्यावेळी तुम्हास त्याच्या आजाराचे निदान माहीत नसेल किंवा ज्यावेळी तुमच्या मनाचा गोंधळ होईल त्यावेळी रोग्याचे मणिपूर चक्रावर तुमचे मन केंद्रित करून हात रोग्याचे बेंबीजवळ असू द्या. थोड्या प्रयत्नाने किंवा रोज ठराविक वेळी बैठक ठेवून तुम्ही हा प्रयोग करीत गेल्यास व रोग्याचे मानसिक सहकार्य तुम्हास मिळत गेल्यास कोणत्याही असाध्य समजल्या जाणाऱ्या रोगावर सुद्धा तुम्हांस विजय मिळविता येईल. मणिपूर चक्र जाग्रत करता आले तर आजार आपोआपच नाहीसे होतात. मात्र ते इतके सोपे नाही. यासंबंधी वर्णन ' योग ' या प्रकरणात वाचावयास मिळेल.

निव्वळ सेवाभाव व निरभिलाष वृत्तीने कार्य करीत राहिल्यास तुमची आत्मशक्ती वाढत आहे असे तुम्हास आढळून येईल. पुढे पुढे रुग्णाचा आजार कळला, फोटो मिळाला, तरी तुम्हास त्या फोटोतील मणिपूर चक्रावर लक्ष केंद्रित करून सुद्धा व्याधिनिवारण करता येईल. या सर्व प्रक्रियेत खालील गोष्टी लक्षात ठेवाव्यात :

१. पवित्र आहार-विहार-आचार यावर सदैव पूर्ण लक्ष ठेवावे. परान्न वर्ज्य असावे.

२. स्वतः आरोग्यसंपन्न राहून आत्मशक्तीस सतत पुरवठा होत राहील असे करावे.

३. विना मोबदला काम करू नये. निदान भगवन्नामाचा मोबदला सतत वसूल करीत असावे. मात्र स्वतःच्या फायद्याकरता असा कोणताही मोबदला असू नये.

४. वृत्ती सदा प्रसन्न व आनंदी असावी. कपडे साधे पण स्वच्छ असावेत. रुग्णाशी नेहमी सहानुभूतीने व त्याचा आत्मविश्वास उत्पन्न होईल असे संभाषण असावे.

५. रुग्णाच्या मनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न असावा. त्यांच्या मनावर आपले मन केंद्रित करून त्याच्या मनाकडून व्याधीस होणाऱ्या शक्तीचा पुरवठा बंद होईल असे करावे व आपणही त्या दृष्टीने प्रयत्नशील असावे.

६. ज्याप्रमाणे शरीर, अवयव, मन इत्यादींना Spiritual Counterpart असतो त्याचप्रमाणे तो व्याधींना पण असतो. याचा नीट अभ्यास करून त्या Counterpart वर आपली आरोग्यस्पंदने टाकून तो नाहीसा करावा. हे जरा नवीन वाटेल. पण ती वस्तुस्थिती आहे व तीवर जरूर प्रयत्न करा.

७. सूचना नेहमी Positive होकारात्मक असाव्यात. तुला आजार नाही, मी तो दुरुस्त करतो असे न म्हणता तू आरोग्यसंपन्न आहेस, तू बलवान आहेस, तुझी सर्व रोगनिवृत्ती झालेली आहे अशा असाव्यात.

८. मात्र एक गोष्ट सदैव लक्षात ठेवावी. मानसिक उपचार असोत वा कोणतेही असोत त्या प्रत्येकास काही नैसर्गिक मर्यादा आहेतच. समजा, एखाद्याचा हात तुटला आहे, डोळ्याच्या खाचा झालेल्या आहेत किंवा कॅन्सर क्षयासारख्या आजारात अंतर्गत अवयवात कायम धक्का पोचला आहे अशा परिस्थितीत जेथे नैसर्गिक मर्यादा आहेत तेथे कोणीही, काहीही करू शकणार नाही.

९. विषय फार मोठा आहे; परंतु चालू ग्रंथाच्या विस्तारमर्यादा सांभाळून जितके लिहिता आले तितके दिले आहे. मात्र ही केवळ या विषयाची रूपरेषा समजावी.. प्रत्येकाने आपल्या अनुभवाप्रमाणे त्यातील तपशील ठरवून प्रगती करून घ्यावी. सदैव एका गोष्टीचे विस्मरण होऊ देऊ नये, की व्याधीचे कारण निर्मूलन झाल्याशिवाय केवळ वरवरच्या उपचारांनी व्याधी निर्मूलन होणार नाही. याकरता कोणती व्याधी आहे—तिचे कारण काय व कोठे आहे याचे ज्ञान चिकित्सकास व्हावे इतपत तरी त्याचा वैद्यक शास्त्राचा अभ्यास असावा.

हीच गोष्ट प्रार्थना व Spirit Healing मध्ये आवश्यक आहे. तरी त्याचा विसर पडू देऊ नये, तुमचा अभ्यास पुष्कळ वाढला म्हणजे केवळ अंतःस्फूर्तीने तुम्हास योग्य मार्गदर्शन मिळू लागेल ती गोष्ट निराळी. पण त्यास बराच वेळ लागेल. तोपर्यंत केवळ अंधारातच चाचपणे असे होऊ नये. रुग्णाच्या जिवाशी खेळ करू नये. आपला आत्मविश्वास व तत्संबंधी ज्ञान असेल तितकाच पल्ला गाठावा हे बरे. कोणीही चिकित्सक धन्वंतरी होऊ शकत नाही. धन्वतरी यांनीसुद्धा स्वतःच्या मर्यादा कबूल केल्या आहेत.

प्रार्थना—

अच्युतानंत गोविंद नामोच्चारणभेषजात्
नश्यंति सकला रोगाः सत्यं सत्यं वदाम्यहम्

—धन्वंतरी

वैद्यकशास्त्राचे मूळ प्रवर्तक व सर्व इंद्रचंद्रादि देवांचे वैद्य यांचे हे वरील वचन आहे. देवांचे वैद्य व अश्विनीकुमार यांनी सुद्धा वैद्यकशास्त्राचे शिक्षण श्रीभगवान धन्वंतरी यांजकडून घेतलेले आहे. त्यांचेसुद्धा म्हणणे असे आहे की, असा कोणताही आजार नाही, की जो केवळ नामस्मरणाने दुरुस्त होत नाही. यात भवरोगाचा सुद्धा अंतर्भाव होतो हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. यासंबंधी माझ्या ‘ अमृततुषार ’ व ‘ वैतरणेच्या ऐलतिरी ’ या ग्रंथात पुष्कळ ऊहापोह आलेला आहे. त्या सर्वांची द्विरुक्ती येथे करणे युक्त होणार नाही. याकरता हा भाग वाचण्यापूर्वी वाचकांनी कृपा करून ‘ अमृततुषार ’ व ‘ वैतरणेच्या ऐलतिरी ’ मधील प्रार्थना व माझे नारायण-नामावरील पत्रक जरूर अभ्यासावे. त्याखेरीज यासंबंधात मला जे काही सुचले आहे ते मी येथे नमूद करून ठेवीत आहे. मात्र हा लेख त्या पुस्तकातील लेखास पूरक म्हणून समजावा.

अनंत अशा चित्‌शक्तीतून Cosmic or Universal energy सर्व स्थावर–जंगम, वृक्ष-पाषाण, कीटक, पशुपक्षी, मानव, चंद्र–सूर्यादि तारांगणापासून अनंत ब्रह्मांडे उत्पन्न झालेली असून सूक्ष्मातील सूक्ष्म असे अणु–परमाणूपर्यंत सर्वत्र तिचीच व्याप्ती आहे. इतके करूनही अपरिमित अशी ती शिल्लक आहे. सर्व ब्रह्मांडात अंतर्बाह्य संपूर्णपणे भरलेली असून त्याच्या उत्पत्ती, स्थिती, लयादि क्रिया तिच्यातच सुरू आहेत. तिचा काही भाग घनीभवन (Condensed) होऊन वृक्ष, पाषाण, मानवादिपासून सर्व ब्रह्मांडे तयार झालेली आहेत व होत आहेत. सर्व विश्वे तीच नटली असून कालावकाशात तीच सतत वावरत आहे. मात्र हे कोण करतो व कसे होते हा मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे. चित्‌शक्तीपैकी काही भाग घनीभूत होऊन दगड झाला अगर मानव झाला. परंतु तीस दगड किंवा मानव होण्यास कोणी प्रवृत्त केले ? तिने स्वयंस्फूर्तीने असे केले असे म्हटले तरी तिला स्फूर्ती कोणी दिली हा प्रश्न राहतोच की, कालावकाशातील या काली व या स्थळी तिने अमुक स्वरूपात घनीभूत व्हावे, काही ठराविक काळ त्या स्वरूपात स्थिर राहावे व नंतर स्व-स्वरूपी लय पावावे. या चित्‌शक्तीचे Cosmic energy चे जी कोणी शक्ती नियमन करते तीच God’s will होय. आपल्यापुरते बोलावयाचे म्हणजे आपल्या प्राचीन ऋषिमुनींनी आपल्या तपःसामर्थ्याने या चित्‌शक्तीतून लहानमोठी अशी प्रतीकात्मक दैवते निर्माण केली व त्यांच्या ठिकाणी विशिष्ट शक्ती प्रदान करून ठेवल्या आहेत. त्यासंबंधीचे वर्णन ‘ वैतरणेच्या ऐलतिरी ’ या पुस्तकात पाहावयास मिळेल. प्रतीकांपैकी काहींना विष्णू, नारायण, शिव, राम, कृष्ण, दत्तात्रेय, हनुमान, गणपती, दुर्गा अशी निरनिराळी नावे असून त्यांना विशिष्ट शक्ती प्रदान केलेल्या आहेत. त्यांच्या मर्यादेपर्यंत (त्यांची उपासना करून ते दैवत जागृत केले तरी) त्या शक्तीचा उपयोग करून घेता येतो. पहारेकऱ्यास पहारेकरी व राष्ट्रपतीस राष्ट्रपती आपणच केलेले आहे. पहारेकरी त्याच्या क्षेत्रात, तर राष्ट्रपती त्याच्या मर्यादेत कार्ये करीत असतात व तेथून निवृत्त

झाले की, समान पातळीवर येतात. सेशन्स जजला त्याच्या शक्ती आपणच प्रदान केलेल्या आहेत व तो आपल्या मर्यादेत आवश्यक वाटल्यास आपणापैकी कोणासही फाशीसुद्धा देऊ शकतो. त्या जागेच्या शक्ती–मर्यादा आपणच ठरविलेल्या असून जजाची नेमणूक पण आपणच करीत असतो. तो आपल्या मर्यादेत आपले नियमन करून आपणावर सत्ता गाजवीत असतो. त्याचप्रमाणे सर्व प्रतीकात्मक दैवतांसंबंधी समजावे.

तुम्ही जे दैवत निवडून उपासनेने जागृत करून सहाय्यभूत करून घ्याल त्याच्या कक्षेत असलेल्या शक्तीचा अवश्य उपयोग होऊ शकेल. याकरता कोणत्या दैवताची निवड करावयाची याला सुद्धा फार महत्त्व आहे व ते विचारपूर्वक केले गेले पाहिजे. तुम्ही एखाद्या तलाठ्यास प्रसन्न करून घेतले तर तो मदत अवश्य करील; परंतु त्याच्या मर्यादेपर्यंत. राष्ट्रपती जे करू शकेल ते तो काही करू शकणार नाही. याकरता योग्य निवडीलाही फार महत्त्व असते. या प्रकरणापुरते बोलावयाचे म्हणजे ज्या दैवताकडून अथवा ज्या मंत्रजपाने आपणांस व्याधी निवारण करून घेणे शक्य असेल त्याची निवड होऊन त्याचीच उपासना ते जागृत होईपर्यंत करणे आवश्यक असते. खरे म्हणजे ती एक आपली आत्मशक्ती जास्त विकसित करून तिच्याकडूनच इच्छित कार्य करवून घेण्याचा हा एक प्रकार आहे. इतकेच की त्या आत्मशक्तीस थोडी बाहेरून मदत मिळत राहते. ज्या शक्तीने मंत्र्यास मंत्री केले, राष्ट्रपतीस राष्ट्रपती केले किंवा या सदर्भात बोलावयाचे म्हणजे विष्णूस विष्णू केले, शंकर, गणपती, दुर्गा, आदि करून सर्वांस त्यांची त्यांची पदें दिली, तिचे आवाहन करता आले पाहिजे. परंतु सर्वसामान्य व्यक्तीस त्याची कल्पना नसते व तसे करणे शक्यही नसते. या प्रतीकांपैकी आपल्या आवडीचे की, ज्यावर आपली श्रद्धा असेल तिची उपासना केल्यास ते दैवत लवकर जागृत वा प्रसन्न होणे शक्य असते. मात्र यात एक गोष्ट लक्षात असू द्यावी की, गणपती दुर्गेचे कार्य करू शकणार नाही किंवा हनुमान रामाचे करू शकणार नाही. याकरता या प्रकरणाच्या संदर्भात निवड करावयाची तर व्याधिनिवारणी ज्याचा उपयोग होईल अशाची निवड झाली व त्याची उपासना करून त्यास जागृत करण्यात यश आले तरच अत्यंत उपयोग होईल. गणपती विघ्न निवारण करील व सरस्वती विद्या व वाणी प्रगल्भ करील. परंतु व्याधिनिवारण्याच्या कामी ज्याचा उपयोग होईल अशाच दैवतांची किंवा बीजमंत्रांची निवड करून जप व ध्यानाने ते दैवत जागृत करावे अथवा तो मंत्र सिद्ध करावा. त्याचा उपयोग स्वतःच्या किंवा इतरांच्या व्याधिनिवारणाच्या कामी करावा. याकरता माझ्या अनुभवाप्रमाणेच ‘ॐ ह्रीं नमः’ किंवा ‘ॐ नारायणाय नमः’ या जपांचा विशेष उपयोग होतो. माझ्या ‘अमृततुषार’ या ग्रंथात सविस्तर विवरण केले असल्याने त्याची पुनरुक्ती येथे करीत नाही. तरी पण जप सिद्ध करताना विशेष करून काय करावयास हवे ते थोडक्यात सांगतो. बऱ्याच मंडळींची अशी तक्रार असते की आम्ही कोटींनी जप केला. परंतु त्याचा काहीच उपयोग

झालेला नाही. ना प्रापंचिक ना पारमार्थिक. दरसाल लक्षावधी लोक श्री विठ्ठलाच्या नावाचा जयघोष करीत दिंड्या काढून पायी मोठ्या श्रद्धायुक्त अंतःकरणाने पंढरपुरास जात असतात व श्री पांडुरंगांचे दर्शन घेत असतात. नाममाहात्म्यात तर असे सांगितले आहे की--

> नकळता पद अग्निवरी पडे । न करि दाह असे न कधी घडे ।
> अजित नाम वदो भलत्या मिषे । सकल पातक दग्ध करीतसे ॥

कोणावरही टीका करण्याचा माझा हेतू नाही; परंतु वस्तुस्थिती माहीत असता निव्वळ लोक काय म्हणतील म्हणून ती छपवून ठेवणे हे क्षम्य होणार नाही. म्हणून सांगतो की आपणास जे काही करणे आहे ते डोळसपणे नीट समजावून घेऊन करीत असावे. म्हणजे निदान श्रम व वेळ फुकट जाणार नाहीत. पंढरीस जाणारे लाखो वारकरी भक्तिभावाने भजन-अर्चन करीत सर्व प्रकारच्या हाल-अपेष्टा सोशीत दरसाल पंढरीस जात असतात. त्यांच्या बाबतीत काय होत आहे हे कोणी तपासून पाहिले आहे काय ? त्यांतील शेकडा एकाच्या बाबतीत सुद्धा काही आध्यात्मिक प्रगती झाली आहे किंवा त्यांच्या प्रापंचिक अडचणी दूर झाल्या आहेत असे आढळून येत नाही.

राग, द्वेष, लोभ, मोह यात सुद्धा काही फरक पडलेला दिसत नाही. इतकेच नाही तर त्यांचा मृत्यु सुद्धा इतर सामान्य माणसापेक्षा काही निराळ्या रीतीने झाला आहे असे दिसत नाही. अत्यंत भक्तियुक्त व श्रद्धायुक्त अंतःकरणाने वर्षानुवर्ष व कोट्यावधी नामजप करून सुद्धा असे होत आहे तर मग नुसते अनवधानाने एखाद्या दैवताचे नाव घेतले गेले म्हणजे त्यास एकदम स्वर्गातून विमान येते असे होऊ शकेल की कसे याचा विचार करावा. उगीच परंपरेने कोणी सांगत आहे म्हणून त्याच्या आहारी जाऊन वेळ व श्रम फुकट घालवू नयेत. मी म्हणतो हे वस्तुस्थितीस सोडून, खोटे आहे अशी माझी कोणी खात्री करून दिली तर मी त्याची जाहीर माफी मागेन. त्यात मला काही सुद्धा कमीपणा वाटणार नाही. याकरता सर्व दैवते प्रतीकात्मक कशी आहेत, त्यातील आपल्या कार्यास उपयुक्त असे कोणते दैवत आपणांस जागृत करणे आहे ते ठरवा व तेही शास्त्रीय पद्धतीने, निव्वळ भावना किंवा श्रद्धेने नाही मग अनुभव येतो की नाही ते पाहा. व्याधिनिवारणाच्या संदर्भात ' ॐ ह्रीं नमः ' किंवा 'ॐ नारायणाय नमः' याचा विशेष उपयोग होतो. त्यासंबंधी काय व कसे करणे योग्य व शास्त्रीय पद्धतीस धरून होईल ते पाहू या.

कोणत्याही जपाची परिणती नेहमी ध्यानात होत असते व ध्यानाची लयात. अशा रीतीने जप ध्यानादून लयात प्रवेश करतो व तेथे स्थिर होतो. त्यावेळी तो खरा फलदायी होण्यास सुरुवात होते. कोणताही जप अथवा उपासना परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार प्रकारांनी होत असते.

जप हा ज्यावेळी वैखरीच्या स्वरूपात असतो त्यावेळी तो फक्त मनाच्या पृष्ठ-

भागावर तरंग उत्पन्न करून तात्पुरते परिणाम करीत असतो. परंतु अल्पकालातच ते नाहीसे होतात. जप मध्यमेच्या स्थितीत गेला म्हणजे तोंडातल्या तोंडात परंतु ओठ हालवून हळू आवाजात किंवा आवाज न करताही, जप होऊ शकतो तो मध्यमेतील. तो मनाच्या पृष्ठ भागावरील थराच्या थोडे खाली जाऊन परंतु बऱ्याच स्थायी स्वरूपात काम करीत राहतो. तेथील मल वगैरे विकृती नाहीशी करीत राहतो. तोच जप पश्यंतीच्या स्वरूपात जाऊन (म्हणजे ओठसुद्धा न हालविता, अर्धोन्मीलित दृष्टी होऊन आतल्या आत हृदयाकाशातील जो जप तो पश्यंति जप) टिकून राहू लागला म्हणजे मनाशयाच्या तळाच्या बराच जवळ जातो. त्याची स्पंदने जोरदार व जास्त परिणामकारी होऊन पुष्कळ टिकाऊ व परिणामकारी कार्ये करीत राहतो. तो परेच्या स्थितीप्रत जाऊ शकला नाही तरी त्याची स्पंदने जोरदार व चिरपरिणामकारी असल्याने पुष्कळच भरीव व उपयुक्त कामगिरी करीत राहतो व उशीरा का होईना परंतु इष्ट सिद्धी घडवून आणतो. तोच जप परा या अवस्थेत गेला (तो केवळ असीम प्रयत्नाने व गुरुकृपेनेच जाऊ शकतो.) म्हणजे तो अत्यंत प्रभावी होऊन मनाशयाच्या अगदी तळाशी जाऊन पोचतो व सर्व मनाशय [मनरूपी सरोवर] तळापासून ढवळून काढतो. पाण्यात चुन्याची निवळी टाकली म्हणजे ती ज्याप्रमाणे पाण्यातील घाणीचा निचरा करून पाणी स्वच्छ करते, त्याचप्रमाणे हा परा जप मनाशय तळापासून ढवळून काढून त्यातील घाण बाहेर फेकून किंवा स्वतःत समाविष्ट करून मन सर्व किल्मिषांपासून मुक्त करून त्यास स्वच्छ व निर्मळ करतो.

पाप-वासना, काम–क्रोध, मोहादि मंडळी वर्षानुवर्षे सहकार्याने मनात घर करून अगदी तळाशी जाऊन स्थायिक झालेली असतात व कारणपरत्वे उसळी मारून पृष्ठभागावर येऊन बलपूर्वक आपली कार्ये करवून घेऊन, परत तळाशी जाऊन सुप्तावस्थेत राहतात. हा परा जप त्या सर्वांना हुडकून काढून एक तर त्यांना मनाशयातून पार हद्दपार करतो किंवा स्वतःत समाविष्ट करून घेऊन त्यांना अकार्यक्षम करून टाकतो. गंगेचे पाणी ज्याप्रमाणे त्यास कितीही नद्या, नाले, ओढे येऊन मिळाले तरी त्या सर्वांस पवित्र असे गंगाजलच करून टाकते त्याचप्रमाणे कामक्रोधादि या परा जपात समाविष्ट होऊन त्यात सामावून गेले तरी तो स्वतः पवित्रच राहतो व सर्व मनाशय पवित्र व निर्मल ठेवतो. पराजप साधला की तीच ध्यानातील लयावस्था होय. त्यास अध्यात्म व परमार्थातील कोणतीही सिद्धी थोड्या प्रयासाने साध्य होते व याच स्थितीस "राम हमारा जप करे हम रहे आराम" असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. इतके करून सुद्धा शरीरधर्म कोणास सुटले नाहीत. मनावर आतून–बाहेरून नवीन नवीन आघात सारखे होतच असतात व ज्याप्रमाणे पाण्याची त्याचप्रमाणे मनाची प्रवृत्तीच मुळी अधोगतीची असते. त्यामुळे इतके करूनही कधी कधी अक्षम्य असे प्रमाद होतात. परंतु म्हणून घाबरून जाऊ नये व प्रयत्नात खंडही पडू देऊ नये. यश हे तुमचेच आहे. परा जप सिद्ध झाला की कोणतेही दैवत लवकर

प्रसन्न करून घेता येते व त्याकडून अपेक्षित कार्यसिद्धी पण करवून घेता येते. अलीकडे असे सिद्ध झाले आहे की ज्याप्रमाणे वीज, वाफ वगैरेंमध्ये सुप्त शक्ती असते, त्याचप्रमाणे प्रार्थना ही सुद्धा महान शक्ती असून जड वस्तूवर सुद्धा कार्य करू शकते. इतर अदृश्य शक्तींप्रमाणे तिचा उपयोग अनेक प्रकारची कार्ये करवून घेण्याकडे करता येतो. ती निव्वळ मनावर परिणाम करणारी शक्ती नसून प्राकृतिक जडावर (Matter) सुद्धा इतर शक्तीप्रमाणे कार्य करते

कोणतीही जड वस्तू (Matter) व चित्‌शक्ती (Cosmic energy) ही ज्याप्रमाणे एकच आहेत अगदी त्याचप्रमाणे प्रार्थनेतील शक्तीसुद्धा चित्‌शक्तीच आहे. मात्र प्रार्थना हे एक शास्त्र आहे व ते परिणामकारी स्वरूपात कसे उपयोगात आणावयाचे याचा प्रथम नीट अभ्यास होऊन आत्मसात होणे जरूर आहे. याकरिता ‘ अमृततुषार ’ व ‘ वैतरणेच्या ऐलतिरी ’मधील प्रार्थनाविषयक भाग वाचकांनी कृपा करून वाचावा. त्या सर्व लेखांचे येथे पुनर्मुद्रण करणे ग्रंथविस्ताराच्या दृष्टीने व ज्यांनी तो भाग यापूर्वीच वाचला आहे त्यांच्या दृष्टीने अप्रस्तुत ठरेल याकरता ही सूचना. असा अनुभव आहे की, प्रार्थनेमुळे प्रार्थना करणाराच्या शरीरात एक शक्तिस्रोत उत्पन्न होतो व तो केवळ मनुष्यप्राण्यावरच नाहीतर वनस्पतीवर सुद्धा परिणामकारी असू शकतो. हा तर नेहमीचा अनुभव आहे की, प्रार्थना अगर मंत्र यांनी अभिमंत्रून दिलेले पाणी अगर रक्षा यांचा असाध्य समजल्या जाणाऱ्या व्याधींवर तर उपयोग होतोच; परंतु अलीकडे असे प्रयोग केले गेले आहेत की, सीलबंद बाटलीत पाणी ठेवून त्यावर प्रार्थनाशक्तीचा स्रोत सोडून ते पाणी जर वनस्पतीस घातले तर ती त्याच परिस्थितीतील इतर वनस्पतींपेक्षा जास्त जोरदार व लवकर फुले, फळे देणारी अशी बनते. (Dr Loher)डॉ. लोहर या नावाच्या एका वैज्ञानिकाने या बाबतीत प्रयोग करून आपले अनुभव ग्रथित केले आहेत. त्यांनी काही वनस्पती प्रयोगाकरता घेतल्या. त्यांची रोपे निरनिराळ्या कुंड्यांतून एकाच वेळी लावण्यात आली. त्यांना हवा, पाणी, ऊन वगैरे सारखीच मिळतील अशी व्यवस्था करण्यात आली. त्यांतील काहींवर त्यांनी प्रार्थनेचा प्रयोग केला. १५० इसमांनी २७००० बीजांवर ९०० प्रयोग केले आणि ८००० वर मोजमापे घेण्यात आली. त्यात असे निश्चित आढळून आले की, ज्यांच्यावर प्रार्थना करण्यात आली होती त्यांची इतरांपेक्षा निःसंशय लवकर वाढ झालेली असून ती जास्त जोमदार व टवटवीत अशी होती. इतरांची मात्र नैसर्गिक तितकी व तशीच वाढ होत होती. वनस्पतींची वाढ त्याचप्रमाणे त्यांचे आरोग्य यावरसुद्धा प्रार्थनाशक्तीचा निःसंशय परिणाम होतो, असे आढळून आले; एवढेच नव्हे तर प्रार्थनेने त्यांची वाढ नेहमीपेक्षा कमी सुद्धा करता येते किंवा थांबविता येते. यावरून ट्यूमर किंवा कॅन्सरसारख्या रोगांची वाढ प्रार्थनेने थांबविता येणे शक्य आहे असे त्यांनी अनुमान काढले आहे. यावरून आपले ऋषि–मुनी प्रार्थनेने पाऊस पाडीत किंवा थांबवीत यात खोटे मानण्यासारखे

काहीच नाही. अलीकडे अलाहाबाद येथे असा पाऊस पाडल्याचे वाचनात आहे. त्याचप्रमाणे एकाने अगोदर जाहीर करून सर्वांसमक्ष एक प्रेत उठवून ते काही काल कार्यक्षम करून दाखविले होते. त्यात काही नामांकित डॉक्टर परीक्षक म्हणून होते. परंतु याबाबतची नोंद माझ्याजवळ नसल्याने त्यासंबंधी सविस्तर असे मी काही देऊ शकत नाही.

कॅनडामधील मान्ट्रील येथील डॉ. ग्रॅड (Grad) यांनी प्रार्थनेसंबंधी काही प्रयोग केले व त्यांचा अनुभव असा आहे की, वनस्पतींच्या वाढीवर तर प्रार्थनेचा उपयोग होतोच; परंतु त्याने जखमा सुद्धा लवकर भरून येतात. त्यांनी काही जखमी उंदरांवर प्रयोग केले व त्यात त्यांस असे आढळून आले की, ज्यांच्याकरता प्रार्थना केली गेली त्यांच्या जखमा इतरांपेक्षा पुष्कळ लवकर बऱ्या झाल्या. डॉ. ग्रॅड यांनी जवाचे झाड लवकर व ढते म्हणून त्यावर प्रयोग करण्याचे ठरविले. त्याने जव पेरलेल्या कुंड्यांचे दोन भाग केले व एकाच परिस्थितीत एकत्रच सारखे पाणी व ऊन मिळत राहील अशी योजना केली. त्यातील एका भागातील कुंड्यांत प्रार्थनेने अभिमंत्रित पाणी टाकण्यात येत होते, तर दुसऱ्यावर तितकेच पण साधे पाणी टाकण्यात येत होते. चौदा दिवस प्रयोग केल्यावर असे आढळून आले की, ज्या भागातील कुंड्यांवर अभिमंत्रित पाणी टाकण्यात येत होते त्यांतील रोपे इतर सर्वांच्या पेक्षा जास्त वाढलेली असून जास्त जोमदार, प्रफुल्ल व टवटवीत अशी होती. त्याचप्रमाणे त्यांनी आणखी एक प्रयोग केला. एका आजारी व मनाने खचलेल्या अशा माणसास प्रार्थना करण्यास सांगितली. त्याने जास्त वाढ तर झाली नाहीच परंतु त्या वनस्पतीची नैसर्गिक वाढ पण खुटली होती. याचा अर्थ असा होतो की, प्रार्थना करणाऱ्याच्या मनःस्थितीचा सुद्धा अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होत राहतो. प्रार्थना करीत असताना शरीरात एक प्रकारचा शक्तिसंचय होत राहून तो आपल्या शरीरातून प्रवाहित होऊन ज्याकरता प्रार्थना केली जाते त्यावर अनुकूल असा परिणाम घडवीत राहतो. प्रयोग करणाऱ्याने शक्तिसंचय ज्यामानाने कमीअधिक प्रभावी असा असेल त्यामानाने परिणामास कमीअधिक वेळ लागत असतो.

१) ऑक्टोबर १९६२ मध्ये श्री होम्स् (Holms) यांनी प्रार्थनेचे काही उल्लेखनीय प्रयोग करून दाखविले. एका इसमाचा एक पाय दुसऱ्यापेक्षा थोडा आखूड होता. त्यास खुर्चीवर बसण्यास सांगून त्याच्या दोन्ही पायांची मापे घेण्यास सांगितले व त्याच्या अंगास स्पर्श न करता प्रार्थना केली व पुन्हा मापे घेतली असता दोन्ही पाय सारख्या मापाचे आहेत असे आढळून आले. अंतर अर्ध्या इंचापेक्षा कमी नव्हते. डॉ. ग्रॅड यांच्या पत्नीवर त्यांनी प्रयोग केला. तिचा एक पाय नेहमी सुजलेला असे. तो इतका की तिला निरनिराळ्या मापाचे बूट करवून घ्यावे लागत. श्री. होम्स यांनी तिच्या डोक्यावर हात ठेवून थोडा वेळ प्रार्थना केली व मागे सरून तीस उभे राहण्यास सांगितले. ती उठून चालू लागली असता तिच्या सुजलेल्या पायातील बूट गळून पडला; सूज साफ नाहीशी झालेली होती व तीच स्थिती पुढे कायम राहिली.

प्रार्थना करताना एखादे वेळी प्रार्थना करणारास आजाराने म्हणा की मनक्षोभाने म्हणा, आत्मविश्वासाचा अभाव असला तर गुण येत नाही, असा अनुभव आहे. याकरता दोन्ही बाजूस विश्वास असण्याची जरूरी असते.

२) डॉ. लीमर म्हणून एक जागतिक चर्चेसचे जनरल सेक्रेटरी यांचा काही आजाराने डावा डोळा निकामी होऊन वर्षानुवर्षे त्या डोळ्याने काही दिसत नव्हते. नामांकित अशा तीन नेत्रविशारदांनी तो दुरुस्त होऊन त्याने काही दिसू शकणे केवळ अशक्य आहे असा निर्वाळा दिला होता. १९५८ साली होम्स यांनी त्या डोळ्यावर हात ठेवून थोडा वेळ प्रार्थना केली व हात काढताच लीमर यांना त्या डोळ्याने दिसू लागले. इतकेच नाही तर दुसऱ्या डोळ्यात एक काळा डाग उत्पन्न होऊन त्याने दृष्टी थोडी अधू झाली होती. तो डागसुद्धा नाहीसा होऊन दृष्टी साफ निवळली असून, दोन्ही डोळ्यांनी पूर्ण दिसू लागले असे आढळून आले. डॉ लीसर यांनी असे सांगितले की अर्थरायटिस, (संधिवात), सुकलेले अवयव, पाठीच्या कण्यातील दोष, काचबिंदूने (ग्लॅकोमा) गेलेली दृष्टी या सर्व होम्स यांनी केलेल्या प्रार्थनेने दुरुस्त झालेले त्यांनी पाहिल्या होत्या. याप्रमाणे पुष्कळ असाध्य समजले जाणारे आजार होम्स यांनी दुरुस्त केलेले आहेत व करीत आहेत.

३) उत्तर कॅरोलिनामधील आठ वर्षांच्या एका मुलीची ही हकीकत आहे. तिला हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले असून तिला मेंदू व पाठीच्या कण्याचे Virus infection होते. दर तीन चार मिनिटांनी तिला झटका येऊन अतीव दुःखाने तिची स्थिती अनुकंपनीय व्हायची. थोड्याच तासात तिचा मृत्यू होणार हे स्पष्ट दिसत होते. मानेखालील भाग बधीर झाला असून तपमान १०६° होते. त्याच हॉस्पिटलमधील एका परिचारिकेने मिसेस सॅन्सफोर्ड यांना फोन करून ही हकीगत कळवली. त्या केवळ प्रार्थनेने असाध्य व्याधी दूर करीत असत. त्यांनी फोनवरून ठीक ९॥ वाजता तिच्या एका परिचयाच्या डॉक्टरांना त्या मुलीच्या छातीवर हात ठेवून बसण्यास सांगितले. डॉ. त्या मुलीच्या खोलीत गेले त्यावेळी त्या मुलीस झटक्यांचा त्रास होऊ नये म्हणून नर्स तिला क्लोरोफार्म देण्याच्या तयारीत होती. ठीक ९–३० ला डॉक्टरांनी त्या मुलीच्या छातीवर हात ठेवताच त्या मुलीने सुटकेचा एक श्वास सोडला. तिला दर तीन चार मिनिटांनी येणारे झटके थांबले व ती शांतपणे झोपी गेली. तिच्या बधीर झालेल्या भागात हालचाल दिसू लागली व तिसऱ्या प्रहरापर्यंत तिच्या सर्व शरीरात पूर्णपणे हालचाल सुरू होऊन तिचा सर्व आजार नाहीसा झाला. दहा दिवसानंतर ती पूर्ण बरी होऊन घरी गेली. आज (१९७०) एक आदर्श गृहिणी म्हणून आरोग्यपूर्ण जीवन ती जगत आहे.

४) Weeping Madona

१९५३ च्या मे-जून मध्ये ग्रीसमधील सायराक्यूस येथे ॲन्टोनिटा व अन्जेली लग्नबद्ध झाले. त्या वेळी त्यांना एक प्लॅस्टरचा मॅडोना [सेंट मेरीचा लहान पुतळा]

लग्न भेट म्हणून मिळाला. तीन डॉलर किंमतीच्या इतर शेकडों पुतळ्यांपैकींच तो एक होता. त्यात निराळे असे काही वैशिष्ट्य नव्हते.

लग्नानंतर काही महिन्यानंतरची ही घटना आहे. ती गर्भवती होती व तिला अत्यंत त्रास होऊ लागला ती अत्यंत धार्मिक प्रवृत्तीची असून, त्या मॅडोनाची अगदीं कळकळीने प्रार्थना करीत असे की मडोनाने तिचं दुःख थांबवावे.

तिला २९।८।१९५३ ला अत्यंत चमत्कारिक दृश्य दिसले. तिचे पोट अतिशय दुखत होते. त्यावेळी तिने त्या पुतळ्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत असलेल्या पाहिल्या. प्रथम तिला वाटले हा निव्वळ भास असावा. पुढे तिची खात्री झाल्यावर ती खोलीबाहेर गेली व मोठमोठ्याने सांगू लागली की मॅडोना रडत आहे. अगदी लहान मुलासारखी रडत आहे तिची आई व नवऱ्याच्या बहिणीस हे खरे वाटेना तरी पण तिने वारंवार सांगितल्यावरून पाहता, खरो खरच त्या पुतळ्याच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहात होत्या व त्या छातीवरून ओघळत होत्या बातमी पसरली व लोक जमू लागले. एका शेजाऱ्याने तो पुतळा भिंतीपासून हलविला. भिंतीस ओलावा असा बिलकुल नव्हता. त्यांनी तो पुतळा फडक्याने पुसून स्वच्छ कोरडा केला. थोड्याच वेळात पुन्हा दोन मोटाले अश्रबिंदू दिसू लागले. ही बातमी लगेच सर्व इटलीभर पसरली. देशातील सर्व भागातील लोक मोठ्या संख्येने येऊ लागले. फार गर्दी होऊन त्या मॅडोनास धक्का पोचू नये म्हणून पोलिसांनी तो आपले व्हॅनमधून सुरक्षित ठिकाणी हलविला. मोटारीतून नेत असता ज्या पोलिसाच्या मांडीवर तो होता त्याचे जाकीट ओले झाले. पोलिसांनी ते अश्रू गोळा करून लॅबोरेटरीत पाठवले असता ते मानवी अश्रू आहेत असा रिपोर्ट आला.

लवकरच त्या अश्रूंची व्याधिनिवारक शक्ती अनुभवास येऊ लागली. ते अश्रू पाहताच ॲनिमोटाचे सर्व दुःख एकदम थांबले होते. लंगडे लुळे वगैरे मंडळी तेथे जमू लागली. व दुःखी भागाला त्या अश्रूंनी भिजवलेले फडके लावताच तो तो भाग एकदम बरा होत आहे, असे आढळून येऊ लागले. कायमचे लंगडे, लुळे तत्क्षणी बरे होऊन चालू लागले. एका मध्यमवयीन माणसाचा एक हात बऱ्याच वर्षांपासून निकामी झाला होता. पोलिओने एका मुलाचे पाय गेले होते. एका आठ वर्षांच्या मुलीची कित्येक वर्षांपासून वाचा गेली होती. त्या माणसाच्या हातावरून ओले फडके फिरवताच हाताची हालचाल सुरू झाली. तीच हकीकत पोलिओग्रस्त मुलाची झाली. ओले फडके पायावरून फिरताच तो सरळ चालू लागला व ती मुलगी ओठांवरून फडक्याचा स्पर्श होताच बोलू लागली. चार दिवसांनंतर ते अश्रू थांबले. परंतु ते कसे, कोठून येत होते याचा उलगडा कोणास कधीही झाला नाही. एक महिन्यानंतर तीस हजारांच्या जमावाची मिरवणूक काढून तो पुतळा काचेच्या कपाटात एका रेल्वे शेडमध्ये ठेवण्यात आला. नंतर त्या पुतळ्याभोवती हजारोंनी गर्दी केली. त्यात बिशप, आर्च बिशप, कार्डिनल वगैरे मंडळीसुद्धा होती. आजूबाजूस दुरुस्त झालेल्या

CamScanner

लोकांनी टाकून दिलेल्या कुबड्या वगैरे उपकरणे शेकडयांनी पडलेली होती. तेथे अजूनही दिवसभर प्रार्थना सुरु असून हजारोंच्या संख्येने लोक व्याधिमुक्त होऊन जात आहेत. त्याच्या सभोवतीच्या बारा एकर जागेत ३६ लहान लहान चॅपेल बांधण्यास आले आहेत. तेथे एका वेळी १२००० लोक एकत्र जमून प्रार्थना करू शकतात.

५) ग्रीसमध्ये Athanasious या नावाच्या एका मेंढपाळाकडे एक शेतकरी कुटुंब आपल्या लंगडया झालेल्या मुलास घेऊन आले व त्यास त्याच्या पायावरून हात फिरवण्यास सांगू लागले. तो म्हणाला की, मी काही डॉक्टर किंवा मांत्रिक नाही की हात फिरवून तुझ्या मुलास गुण येईल. त्या शेतकरी कुटुंबाने पुष्कळ वेळा पाहिले होते की हा मुलगा त्याच्या कळपातील मेंढ्या व बकऱ्यांच्या मोडलेल्या भागावरून त्याने नुसता हात फिरवताच त्या बऱ्या होतात. पुष्कळ विनंती केल्यानंतर तो कबूल झाला व त्याने हात फिरविताच त्याचे (लंगडया मुलाचे) हाड दुरुस्त होऊन तो चालू लागला. लवकरच त्याची कीर्ती सर्व ग्रीसभर पसरली व ठिकठिकाणचे लोक येऊन मोडलेल्या भागांवरून त्यांचा हात फिरताच दुरुस्त होऊन जाऊ लागले. त्यास फक्त एकच सिद्धी होती व ती ही की त्याची इच्छा असो वा नसो, त्याने हात फिरवताच कोणाचेही मोडलेले हाड सांधले जाऊन त्या क्षणास ते पूर्ववत होऊन पूर्वीप्रमाणे काम करू लागे. त्याच्याकडून ग्रीसचे राजे किंग पाल, एथिओपियाचे राजे हेलेसियासी, अमेरिकन व ब्रिटिश कौन्सिल इत्यादींनी सुद्धा त्याच्याकडून इलाज करवून अनुभव घेतलेले आहेत. १९४१ साली एक उल्लेखनीय घटना घडली. अथेन्समधील डॉक्टर मंडळींनी एकत्र जमून त्याच्यावर कोर्टात खटला भरला की एक तर हा शिकलेला नाही. याला लायसेन्स नाही व हा याप्रमाणे प्रॅक्टिस करून जनतेचे नुकसान करीत आहे. लोकांस फसवून ढोंग करीत आहे. त्यावरून त्यास कोर्टाचे समन्स आले. जज्जाने विचारले की तू याप्रमाणे प्रॅक्टीस करीत आहेस हीं गोष्ट खरी आहे काय ? त्याने अर्थातच होय असे उत्तर दिले. त्यावर त्यास विचारले की, याप्रमाणे प्रॅक्टीस करण्याचे लायसेन्स तुझ्याजवळ आहे काय ? यावर त्या डॉक्टर मंडळीतील प्रमुख उठून उपहासाने म्हणाला की यास लिहिता वाचतासुद्धा येत नाही. त्याच्याजवळ लायसेन्स कोठून असेल ? त्याला यातील मर्म समजले नाही. तरी तो म्हणाला की, मी एक गोष्ट करतो ती या डॉक्टर मंडळीपैकी एकाने तरी करून दाखवावी. दाखवली तर मी प्रॅक्टिस करणे तत्क्षणी सोडून देईन. असे म्हणून त्याने बाहेर जाऊन सोबत आणलेले एक लहान कोकरू आत आणले व त्याचा एक पाय धरून त्याचे हाड काडकन मोडले. ते कोकरू दु:खाने केकाटू लागले. त्याने ते सर्व डॉक्टरांस दाखवले व त्याचे हाड खरोखरी मोडले आहे की कसे याची परीक्षा करण्यास सांगितले. त्यांनी परीक्षा करून हो असे म्हटल्यावर त्यांना सांगितले की, ते तुम्ही दुरुस्त करून दाखवा. त्यावर ते सर्व उपाहासाने म्हणाले की ते कसे शक्य आहे ?

त्यास बँडेज बांधून दुरुस्त व्हावयास कमीत कमी दोन महिने लागतील. त्यानंतर त्याने परत ते कोकरू आपल्या हातात घेऊन त्याच्या मोडलेल्या भागावरून आपला हात फिरविला. ते लागलीच खडखडीत बरे होऊन नाचू-बागडू लागले त्यावर त्याने ते पुन्हा तपासण्याकरिता डॉक्टरांजवळ दिले व त्यांना कबूल करणे भाग पडले की, त्याचे हाड तत्क्षणी बरे झाले आहे. कोर्टाने अर्थातच डॉक्टरांच्या विरुद्ध निकाल दिला हे सांगावयास नकोच. हा मेंढपाळ त्यावेळी अत्यंत वृद्ध होता. आज तो हयात आहे की कसे याची कल्पना नाही.

६ Dr. Tony

मॅनिला (फिलिपाईन्स) मध्ये डॉ टोनी या नावाचा एक गृहस्थ आहे. हा फारसे शिकलेला नाही. धंद्याने डॉक्टर तर नाहीच नाही. त्यास एक दैवी देणगी आहे. एक अमेरिकन जिज्ञासू त्याच्यासंबंधी काही ऐकून खरे—खोटे काय आहे याची प्रत्यक्ष खात्री करून घेण्याकरता त्याच्याकडे गेला होता. त्याने ता. २१--३—१९६५ रोजी स्वतः पाहिलेली हकीगत दिली आहे.

पंधरा स्क्वेअर फुटांची एक खोली. त्यात एक टेबल, एक कॉट, टेबलावर अल्कोहलची एक बाटली व एक कातरी एवढाच सरंजाम व कॉटवर एक रुग्ण स्त्री.

डॉ. टोनी तेथे आले. त्यांनी तिचे पोट बोटांनी तपासून पाहिले. त्याने एकदम आपल्या हाताचा तळवा आडवा करून त्या स्त्रीच्या पोटावरून फिरविला व काय आश्चर्य ! एखाद्या शस्त्राने कापले जावे तसे पोट कापले गेले. त्या स्त्रीस कसलीही भूल वगैरे देण्यात आली नव्हती. तरी पण या कापण्याने तिला काही वेदना झाल्याचे पण दिसले नाही. पोटचा भाग उलटला जाऊन मांस बाहेर दिसू लागले. डॉ. टोनी यांनी आपला हात आत घातला व आतील ट्यूमरसारखा भाग हातात धरून कातरीने कातरून काढला. त्या स्त्रीच्या पोटावर अल्कोहोल चोळले व हाताचा तळवा पालथा असा पोटावरून फिरविला. कापलेली जागा पूर्ववत झाली. कापल्याच्या जखमेची नावनिशाणीसुद्धा राहिलेली दिसली नाही किंवा त्या स्त्रीस कसलेही दु:ख पण झालेले दिसले नाही. ती उठली व खोलीबाहेर चालू लागली. त्याने कसलेही भुलीचे औषध वापरले नव्हते. अथवा कसलेही शिक्षण घेतलेले नाही. त्यास ही एक दैवी देणगी आहे. अमेरिकेचे क्लानिनबर्ग (मिमिबीच) यांनी समक्ष पाहिलेली व नोंद करून ठेवलेली ही हकीकत आहे. डॉ. टोनी मॅनिला येथे अद्याप अशा शस्त्रक्रिया करीत आहेत.

त्यांचा दवाखाना Antonio Agapasa या भागात दुसऱ्या मजल्यावर आहे Dr. Delkar ने त्यांना डॉ. टोनींच्या क्लिनिकमध्ये नेले होते. तेथे बरेच रुग्ण वाट पाहात बसले होते. त्यात वरील स्त्री होती. या वरील शस्त्रक्रियेला केवळ पाच मिनिटे लागली. त्या स्त्रीची पाळी आली त्यावेळी तिला आत बोलावण्यात आले. तिचा

टोनीवर पूर्ण विश्वास होता. ती उठून न घाबरता कॉटवर जाऊन झोपली. वर वर्णन केलेले ऑपरेशन त्यांच्या समक्ष झाले. रोगी आपल्या खुशीने काही देईल तर टोनी घेतो, मागत नाही व कोणी काही न दिले तर त्याची त्यास खंत नसते. त्यास प्रथम प्रथम कायदेशीर हरकतीस तोंड द्यावे लागले. परंतु पुढे मोठे मोठे अधिकारी स्वतःच येऊ लागले. त्यामुळे तो प्रश्न मिटला. एका मुलीच्या खांद्यावर सूज होती. श्री. कोमेनबर्ग जवळ बसून होते. श्री. टोनी यांनी हाताचा आडवा तळवा खांद्याच्या सुजलेल्या भागावरून फिरविला. ताबडतोब तो खांद्याचा भाग कापले गेल्याप्रमाणे फाकून आतील भाग उघडा झाला. त्यात थोडी वाढ झालेली दिसत होती. ती त्याने हाताच्या तळव्यानेच कापून बाहेर काढली व जखम बंद केली. रक्तस्राव अगदी मामुली झाला. तिला कसलेही दुःख होत नव्हते. ऑपरेशन चालू असता ती बोलत होती व प्रश्नास उत्तरे देत होती. कोणतीही केस कधीही सेप्टिक झाल्याचे ऐकिवात नव्हते यात हिप्नॉटिझम वगैरेसारखा कसलाही प्रकार नव्हता.

कोमेनबर्ग यांनी त्यानंतर अशा प्रकारची पुष्कळ ऑपरेशन्स पाहिली व एकात तर प्रत्यक्ष भाग घेतला. तेथे सर्व प्रकारची ऑपरेशन्स केली जातात. त्यांना डोळे व मेंदू यांवरील ऑपरेशन्स पाहावयास मिळाली नाहीत, परंतु तीही केली जातात, असे त्यास खात्रीपूर्वक सांगण्यात आले. आतापर्यंत एकही (१९६५) दगावल्याचे उदाहरण नाही. त्या ठिकाणी वीज नाही (खिडकीतून येईल तितकाच उजेड) डॉ. टोनी यांच्या ठिकाणी रोग्यांचा आत्यंतिक विश्वास दिसला. ऑपरेशन-मग ते कितीही मोठे असो, ते काही मिनिटांतच आटोपते व रोगी उठून आपल्या पायावर चालू लागतो. ऑपरेशनच्या जखमेची खूण सुद्धा क्वचितच राहाते. डॉ. टोनी यांनी अमेरिकेत जाऊन प्रात्यक्षिक दाखविण्याचे कबूल केले होते. परंतु पुढे काय झाले ते कळले नाही.

७) फ्रान्समधील लूर्ड्स या ठिकाणची ही हकीकत आहे. हे ठिकाण एका शतकाहून अधिक काल प्रसिद्ध आहे. या ठिकाणी पाण्याचे काही झरे आहेत. त्या झऱ्यांत ख्रिस्तमाता मेरीच्या कृपेने काही विलक्षण शक्ती आहे. तेथील पाण्यात कोणत्याही रोग्याने स्नान केले की तो बरा होतो. मग तो आजार कसलाही व कितीही असाध्य असो. सुरुवातीला अगदी १०० टक्के गुण येत असे. पुढे त्याची कीर्ती ऐकून हजारोंच्या संख्येने लोक तेथे येऊ लागले. नंतर तेथे घाण, चोऱ्यामाऱ्या वगैरे होऊ नयेत, पाणी स्वच्छ राहावे, म्हणून पोलिसबंदोबस्त व लोकांच्या राहाण्याखाण्याच्या व्यवस्थेकरता इमारती उठू लागल्या. सरकारी टॅक्सेस बसले. या कारणांनी म्हणा की काही अन्य कारणांनी त्या जागेचे महत्त्व कमी झाले. तरी पण काही आश्चर्यकारक घटना अनुभवास येतात.

मेरी बेल नावाची स्त्री क्षयाच्या शेवटच्या अवस्थेत होती. तिला आंतरराष्ट्रीय कीर्तीचे डॉक्टर केरेल यांच्याकडे नेण्यात आले. या डॉक्टरना सन १९०२ मध्ये नोबेल प्राईज मिळाले होते. त्यांनी तिला तपासून सांगितले की ती यापुढे तर वाचणे

CamScanner

शक्यच नाही; ती कोणत्याही क्षणी मरू शकेल. तिच्या कुटुंबातील सर्वजण यापूर्वी T.B. क्षयानेच मेलेले होते. या डॉक्टरांचे मत म्हणजे अखेरचे समजले जाई. तरी पण शेवटचा इलाज म्हणून तिच्या नातेवाईकांनी तिला लुईस येथे न्यावयाचे ठरविले. डॉ. केरेल यांच्या काही स्नेह्यांनी पण त्यांना तेथे काय होते ते पहावयास त्याच वेळी नेले. ही मंडळी तेथे गेली त्या वेळी तेथे बरीच मंडळी जमलेली होती. मेरीला मृत्युपंथास लागलेल्या स्थितीत स्ट्रेचरवर झऱ्याजवळ आणण्यात आले. डॉ. केरेल व इतर मंडळी उत्सुकतेने पाहात होती. झऱ्यातून बाहेर आल्यावर थोड्याच वेळात मेरीच्या चेहऱ्यावरील मलूलपणा व पांढरेपणा जाऊन गुलाबी छटा आली. तिचा सुजलेला पोटाचा भाग सपाट झाला. तिची नाडी शांत वाहू लागली. श्वासोच्छ्वास पण पूर्ववत झाला. तिने एक दुधाचा पेला मागून घेतला. त्यानंतर डॉ. केरेल व इतर तीन डॉक्टरांनी तिची तपासणी करून निर्वाळा दिला की, ती संपूर्णपणे बरी झाली असून रोगाचा लवलेशही तिच्या अंगात राहिलेला नाही. त्यानंतर निरोगी अवस्थेत ती पुष्कळ वर्षे जगली. त्यांनी तपासण्यापूर्वी केवळ एका तासापूर्वी ती मरणासन्न स्थितीत होती. व तिचा मृत्यू अटळ आहे असे डॉक्टरमंडळींनी ठरविले होते.

८) ऑरल रॉबर्ट Oral Robert यांचा जन्म २४।१।१९१८ रोजी झाला. हे मूल जन्मताच अशक्त व रोगी होते. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यास एक अपघात होऊन तो अंथरुणास खिळला. त्याचे दोन्ही पाय निकामी झाले होते. लिंडसे सेंटर म्हणून एक प्रार्थना मंडळ होते. ते फिरते राहून आपल्या प्रार्थनेने आजार दुरुस्त करण्याचे काम करीत असे. त्यांनी या मुलाबरोबर रात्रभर प्रार्थना केली व सकाळी असे आढळून आले की त्याचे पाय पूर्ण कार्यक्षम झाले आहेत. त्याला नंतर जवळच्या एका प्रार्थना-मंदिरात नेण्यात आले. त्याच्या फुफ्फुसात क्षयाचा प्रादुर्भाव झाला आहे असे डॉक्टरांनी निदान केले होते. त्यास एका खुर्चीवर बसविण्यात आले व जॉर्ज मर्सी यांनी प्रार्थनेस सुरवात केली. त्यांनी रॉबर्टच्या अंगावर हात ठेवून आजाराने त्यास सोडून जावे अशी प्रार्थना सुरू केली. थोड्याच वेळात रॉबर्टने खुर्चीवरून उडी मारली व मी दुरुस्त झालो आहे म्हणून तो सांगू लागला. तपासणीनंतर असे आढळून आले की तो पूर्णपणे बरा झाला असून कोणत्याही आजाराचा त्याच्यात लवलेश राहिला नव्हता. त्यानंतर दहा वर्षेपर्यंत रॉबर्ट हा धार्मिक अभ्यास व प्रवचन करीत होता. १९४६ साली तो मोठा धर्मगुरू म्हणून मान्यता पावला होता.

एके दिवशी Clyde Lawson क्लाईड लाउसन नावाच्या इसमाच्या पायावर एक मोठे लोखंडी चाक पडले. त्याने जखम होऊन बुटांतून रक्तप्रवाह सुरू झाला. ते पाहून रॉबर्ट यांनी वाकून त्या जखमी माणसाकरिता प्रार्थना केली. थोड्या वेळात लाउसन म्हणाला की, माझे दुःख थांबले आहे. बूट काढून पाहाता रक्त थांबलेले

होते. जखमेचा मागमूसही नव्हता. त्या घटनेनंतर रॉबर्ट परत आपल्या घरी गेले व त्यांच्या मनाची स्थिती थोडी चमत्कारिक झाली. त्यानंतर त्यास दृष्टांत झाला की तू अमुक ठिकाणी जा; तुला प्रार्थनेने आजार दुरुस्त करण्याची सिद्धी प्राप्त होईल; त्याप्रमाणे त्यांनी केले व त्यावेळेपासून आजपर्यंत अव्याहत ते हेच कार्य करीत आहेत. त्यानंतर त्यांनी केवळ प्रार्थनेने शेकडो रोगी दुरुस्त केलेले आहेत. त्यात अगदी ठार आंधळे, संधिवाताने बिछान्यास जखडलेले वगैरे अनेकांचा समावेश आहे. त्यांनी जगातील सर्व भागांतून प्रवास केलेला असून ठिकठिकाणी प्रार्थना करून हजारो लोकांचे रोग बरे केलेले आहेत व करीत आहेत. The Oral Roberts Evangelist Association Abundant Life (Bld) Tulsa, Oklahoma U. S. A. या ठिकाणी त्यांचे हेडक्वार्टस आहे.

९) **Kathyrn Kuhlman** कॅथरिन कुलमन

जॉर्ज ऑर याच्या उजव्या डोळ्यात लोखंडाचा रस उडून तो निकामी झाला होता. गेली बारा वर्षे तो त्या डोळ्यांनी पाहू शकत नव्हता. त्यास १९२७ साली कंपनीकडून नुकसानभरपाई पण मिळाली होती व त्याचे कारण एक डोळा कंपनीच्या कामात संपूर्ण निकामी झाला असे दाखविण्यात आले होते. मे १९४८ मध्ये कॅथरीन कुलमन या स्त्रीची प्रार्थना सुरू असता जॉर्ज ऑर याच्या डोळ्यात एकाएकी काही संवेदना सुरू झाली. लवकरच त्या डोळ्यातून पाणी वाहू लागले व आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याच क्षणी त्यास त्या डोळ्याने चांगले दिसू लागले.

कॅथरीन बाईच्या प्रार्थनेने पुष्कळ असाध्य समजले जाणारे आजार नाहीसे झाले. ती गावोगाव Miracle servicc भरवीत असते व त्यावेळी कमीत कमी २००० लोक हजर असतात. तिच्या रविवारच्या सर्व्हिसला तर ५ ते १५ हजारपर्यंत लोक हजर असतात. एका वैज्ञानिकाने प्रत्यक्ष पाहिलेल्या अशा सर्व्हिसबद्दल म्हटले आहे की, वैद्यकीय शास्त्रात ज्यास आधार सापडणार नाहीं किंवा आजच्या शास्त्रात जे केवळ अशक्य वाटत आहे अशा पुष्कळ गोष्टी चमत्कार या स्वरूपात तेथे पाहावयास मिळाल्या. लंगडे चालू लागतात. बहिऱ्यांना ऐकू येऊ लागते. संधिवाताने जखडलेले रोगी क्षणात दुःख व रोगमुक्त होऊन आपल्या पायाने चालू लागतात. जॉर्ज ऑर सारख्यांना दृष्टिलाभ होतो.

पाठीच्या मणक्यास कॅन्सर झालेल्या एका स्त्रीने वाकून पायाच्या अंगठ्यास स्पर्श केला. इतर वेळी या बाईचा मणका मोडून ती निश्चेष्ट झाली असती. पिटसबर्गमध्ये पन्नास वर्षे प्रॅक्टिस केलेल्या डॉ. हेन्सी या गृहस्थांनी स्वतः पाहिलेले चमत्कार वर्णन केले आहेत, की जे कोणत्याही वैद्यक शास्त्राप्रमाणे घडून येणे केवळ अशक्य होते. १९६३ साली त्यांच्या समक्ष एका रुग्णाच्या मानेवरचे गळू केवळ प्रार्थनेने हळूहळू कमी कमी होत थोड्याच वेळात नाहीसे झालेले त्याने पाहिले होते. त्यांचा

CamScanner

स्वतःचा बहिरेपणा गेला होता. आणि त्यांच्या कॉलर बोनवरील झालेली वाढ बरीच कमी झालेली होती. तिने दुरुस्त केलेल्या, अशक्य अशा वाटणाऱ्या व केवळ चमत्कार या सदरात मोडणाऱ्या केसेस थोडक्यात जरी देऊ म्हटले तरी त्यांची काही शेकड्यांनी मोजदाद करावी लागेल.

हल्ली या कॅथरीनबाईची पद्धत अशी आहे, ती व्यासपीठावर असते व प्रार्थना सुरू करते. समोर हजारो लोक गर्दी करून बसलेले असतात. त्यात सर्व प्रकारचे रुग्ण असतात. अनुभव असा आहे की, तिची प्रार्थना सुरू झाली की तिच्यापासून अत्यंत जोरदार असा आरोग्यकारक प्रवाह सुरू होतो. आणि तो समोरच्या जमलेल्या रुग्णांवर परिणाम करू लागतो. त्यातल्या त्यात अगदी पुढे जे बसलेले किंवा उभे असतात, त्यांच्यापैकी पुष्कळांना एकाएकी बरे वाटल्याची भावना होऊ लागते. कित्येक बरे होऊन चालू लागतात. मग मागील लोकांची पाळी येते. असा क्रम सुरू असतो. अर्थात त्यात असेही काही लोक असतात की त्यांना मुळीच गुण येत नाही. मग ते दुसऱ्या सर्व्हिसला हजर राहातात. कित्येक मंडळींनी या पद्धतीत एक मोठा दोष काढला आहे व तो म्हणजे कॅथरीन बाईकडून निघालेला प्रवाह हा फार जोरदार असतो म्हणूनच तो इतक्या सर्व लोकांवर पुष्कळ अशी परिणाम करू शकतो. परंतु त्याचा कमकुवत मनोवृत्तीच्या माणसावर विपरीत परिणाम होतो. जे वेडसर असतात ते पूर्ण वेडे होतात. ज्यांना मुळात विचार करण्याची शक्तीच नसते ते मनाने जास्त दुर्बल होतात. असे असले तरी अर्धांगवायू, क्षय, आंधळे-बहिरेपणा, पंगूपणा इत्यादि अगदी अशक्य समजल्या जाणाऱ्या व्याधीसुद्धा काही क्षणांतच दुरुस्त झालेल्या आहेत व होत आहेत.

दर शुक्रवारी ११-३० वाजता पिटसबर्ग (Pittsburg) शहरात कार्नेजी हॉलमध्ये कॅथरिनबाईची मिरॅकल सर्व्हिस होत असते. त्याचा फायदा आजही हजारो लोक घेत आहेत.

दर शुक्रवारी ११-३० वाजता कॅथरीनबाई प्लॅटफॉर्मवर येते. समोर जमलेल्या मोठ्या जमावास अभिवादन करते. सर्व जमाव उठून उभा राहतो व तिचे अभिवादन स्वीकारतो. नंतर एकदम शांतता पसरते. श्रीमती कॅथरिन प्रार्थनेस सुरवात करते. प्रार्थना संपताच ती बायबलमधील एक प्रार्थनायुक्त गाणे मोठ्याने म्हणते व सर्व जमाव आपल्या आवाजात तिला साथ देतो. त्यात काही साथ देत असतात तर काहींच्या डोळ्यांतून अश्रू येत असतात. एकदम कॅथरिनमध्ये संचार होतो. ती जमावातील एका स्त्रीकडे बोट करते आणि सांगते, तू प्रार्थनेला आज प्रथमच आलेली आहेस. तुला संधिवाताचा Arthritis) चा विकार असून तुझे हात व पायाचे सांधे जखडलेले आहेत. ईश्वराची तुझ्यावर कृपा झाली आहे व या क्षणापासून तू रोगमुक्त झाली आहेस. कॅथरिन त्या स्त्रीस माईक जवळ बोलावते. ती स्त्री सांगते की खरे आहे. मी आज प्रथमच प्रार्थनासभेस आलेली असून, मला अनेक वर्षांपासून अंथरुणास जखडून ठेवणाऱ्या

संधिवातापासून मी इतक्यात मुक्त झाले आहे. आता मला सर्व प्रकारची हालचाल करता येऊ लागली असून त्या आजारामुळे येणाऱ्या कळा व दुःख यापासून मी मुक्त झाले आहे. यापूर्वी ती अनेक वर्षांपासून या आजाराने अंथरुणास खिळली होती व हातापायाच्या सांध्यावर सूज असल्याने ते हलविणे सुद्धा तिला अशक्य होते. थोडीशी हालचालही तिला अत्यंत क्लेशकारक होत असे. ती त्यानंतर आपल्या पायाने चालत घरी गेली. तिला येताना दोन माणसांनी आधार देऊन कशीतरी रखडत आणून बसविली होती.

ही सर्व्हिस त्या दिवशी तीन तास चालली होती. तीत सर्मन नव्हते. उपदेश नव्हता. काही नव्हते. होती ती निव्वळ प्रार्थना व कॅथरिनमधील संचार. ही सर्व्हिस चालू असता त्या जमावातील एकामागून एक उठून आपापल्या व्याधिमुक्तीच्या हकीकती सांगू लागले. एकीने सांगितले की मी ठार बहिरी होते. मला आता चांगले ऐकू येऊ लागले आहे. खरोखर ती स्त्री स्वतःकरता आलेलीच नव्हती. कधी बरी होऊ शकेल ही तिला कल्पनाच नव्हती. ती दुसऱ्याकरिता प्रार्थना करण्यासाठी आली होती व ती स्वतः बरी झाली. अगदी कोणी नुसते तोंडातल्या तोंडात बोलले तरी तिला ऐकू येऊ लागले. एकामागून एक माणसे येऊन आपापल्या हकीकती सांगू लागले. एक वीस वर्षांचा तरुण कॅन्सरने मरणासन्न स्थितीत तेथे आला होता. त्याच्या कमरेतील मोठी थोरली सूज काही क्षणांतच नाहीशी झाली होती. एकाच्या पाठीत कुबड होते. त्याच क्षणी त्याने वापरते जाकीट टाकून दिले व सरळ होऊन चालू लागला. दोन संधिवाताने जखडलेले इसम क्षणात बरे होऊन सर्व हालचाली करू लागले.

एका तिशीच्या वयाच्या इसमास त्याच्या दोघा मित्रांनी जवळ जवळ उचलून आणले होते. त्यास पोटातील कॅन्सर झालेला असून तो कल्पनेबाहेर खंगलेला होता. डॉक्टरमंडळींनी तो त्याच्या अखेरच्या स्थितीत आहे असे निदान केले होते. सर्व्हिस सुरू होऊन थोडा वेळ होताच त्याच्यात आश्चर्यकारक फरक दृष्टोत्पत्तीस येऊ लागला. शरीरास विजेचा धक्का बसलेला असताना मनुष्य कापतो त्याप्रमाणे तो थरथर कापू लागला. काही क्षणांत तो कोणाच्या मदतीशिवाय उभा राहिला. काही मिनिटांतच त्याचे शरीर भरलेले व गाल वर आलेले दिसू लागले. तो पुढील शुक्रवारी सर्व्हिसला हजर होता. तोपर्यंत त्याचे वजन वीस पौंडांनी वाढलेले होते. तो आता वाटेल ते खाऊ पिऊ शकत होता. दंगा–मस्ती पण करू शकत होता.

ती सर्व्हिस दुपारी २-३० ला संपली. शेवटी प्रार्थनायुक्त गाणे व तिचे समारोपाचे भाषण होऊन मीटिंगचा समारोप झाला. ती समारोपाच्या भाषणात म्हणाली की ज्यांचे ज्यांचे व्याधिनिवारण झाले आहे त्यांनी आपापल्या डॉक्टरांकडून खात्री करून घ्यावी आणि मनःपूर्वक परमेश्वरास धन्यवाद द्यावेत. तिला विचारण्यात आले की या प्रचंड जमावातील काही थोड्यांनाच लाभ झालेला दिसत आहे, मग ते शेकड्यांनी का असेनात, जमावाच्या मानाने थोडेच. बाकीच्यांना व्याधिनिवृत्ती का झाली नाही. त्यावर ती म्हणाली, हे मला सुद्धा मोठे कोडेच आहे. परंतु थोडे का होईना, त्यांची या रीतीने

व्याधिनिवृत्ति व्हावी ही ईश्वराची कृपा नव्हे काय ? ईश्वराच्या इच्छेशिवाय काही होऊच शकत नाही. परंतु ईश्वर काहींना दुरुस्त करतो व काहींना का करीत नाही याचे उत्तर तिच्याजवळ नाही.

या सर्व चमत्कारासंबंधी तिचा खुलासा अगदी साधा आहे. ती म्हणते–' मी काही धार्मिक पुस्तके वाचीत नाही. प्रवचने करीत नाही. कारण त्यायोगे मनात निष्कारण गोंधळ मात्र निर्माण होतो. वेळ झाली की मी प्लॅटफॉर्मवर चढते. त्यावेळी मी एक लहान मूल बनते. मी केवळ परमेश्वरावर सर्व भार टाकते व मनाशी म्हणते की, कर्ता करविता सर्व काही तूच आहेस. तुझ्या इच्छेस येईल तसे तू कर. माझा विश्वास आहे की चमत्कार घडतात. त्याप्रमाणे घडताना मी पाहते. ती सांगते की ही सिद्धी तिला मिळाली हाच मोठा चमत्कार आहे. खरे म्हणजे अशा चमत्कारांवर तिचा स्वतःचाच विश्वास नव्हता व चमत्कार करणाऱ्यांवरही नव्हता. ती पूर्वी प्रवचने (Sermons) करीत असे. पहिला चमत्कार १९४५ साली झाला ती प्रवचन करीत असता एका स्त्रीस एकाएकी काही संवेदना झाली. काय ते तिलाच कळले नाही. म्हणून ती तिच्या डॉक्टरांकडे गेली. त्यांनी सांगितले की वर्षानुवर्षे असलेला तुझा आजार नाहीसा झाला आहे. ही गोष्ट तिने दुसऱ्या प्रवचनाच्या वेळी सांगितली. प्रवचनाच्या वेळी असे चमत्कार वारंवार घडू लागले. ते इतके झाले की तिला त्यांकडे दुर्लक्ष करणे अशक्य होऊ लागले. दुरुस्त होणाऱ्यांत ज्यांची श्रद्धा असेल तेच दुरुस्त होत असेही नसे.

१९४८ नंतर अशी एकही सर्व्हिस झाली नाही की जीत कोणाला व्याधिमुक्ती मिळाली नाही. असेही पुष्कळ वेळा आढळून आले की, दोन माणसे जवळ जवळ असत त्यापैकी एक मोठा धार्मिक प्रवृत्तीचा असून दुसरा ईश्वरावर श्रद्धा न ठेवणारा असा असे. त्यात दुसऱ्या माणसाची त्याची कल्पना नसताही व्याधिनिवृत्ती झालेली आढळून येई; तर तो धार्मिक मनुष्य निराश मनाने परत जाई. एकदा तर एक संशयात्मा निव्वळ थट्टा करण्याच्या उद्देशाने आला होता. तो सभा चालू असताना एकदम कोसळला व त्यास असे आढळून आले की त्याचा वर्षानुवर्षांचा एक जुना आजार नाहीसा झाला आहे. ती पुष्कळ वेळा जमलेल्या लोकांतून काहींना प्लॅटफॉर्मवर बोलावते. त्यांच्या अंगावरून हात फिरवते व ते बरे होतात. काही वेळा ती आपली शक्ती जमावाकडे प्रेषित करते. अशा वेळी असे आढळते की पहिल्या रांगेतील कित्येक इसम एकदम बरे झाले आहेत नंतर त्याच्या मागच्या रांगेतील, याप्रमाणे तिने स्पर्श केलेल्या व्यक्तींचें अनुभव भिन्न भिन्न असतात. काहींना शेकडो सुया टोचल्यासारखे वाटते, तर काहींना इलेक्ट्रिक शॉक बसल्याचा अनुभव येतो. काहींना अंगातील सर्व शक्ती नाहीशी झाली आहे असे वाटते व आपण उभे राहू शकू असे वाटतच नाही. परंतु लगेच एक थंड असा हवेचा झोत अंगावर पडल्यासारखा वाटून सर्व पूर्वस्थितीस येतात. त्यांना व्याधी नाहीशी झाली आहे असा अनुभव येतो.

१९४९ साली मेरी स्मिथ या स्त्रीच्या घशातील सूज Goiter क्षणात नाहीशी झाली. लोक पहात असता तिच्या मानेवरील गळू हळूहळू कमी कमी होत नाहीसे झाले. पिटसबर्गमधील एका हॉस्पिटलमध्ये एक पोलीस कॅन्सरने मरणासन्न स्थितीत होता. ऑक्टोबर १९४९ मध्ये त्यास कॅथरिनच्या एका सर्व्हिसला नेण्यात आले. डॉक्टरमंडळी त्याच्यावर फार रागावली की या कृत्याने तो आपला मृत्यू जवळ आणीत आहे. सर्व्हिस चालू असता त्याच्या छातीतून एक प्रकारची संवेदना आली व त्याच क्षणी त्याचे सर्व दु:ख व अशक्तपणाही नाहीशी झाली. त्याने आपल्या आजाराचे रिपोर्ट जपून ठेवले आहेत. १९५५ साली श्रीमती डॉली ग्रॅहम ही तिच्या हृदयविकारापासून मुक्त झाली. तिची नखे क्षणात काळ्याची लाल झाली व तिच्या चेहऱ्यावरही लाली पसरली. जणू काही तिच्या शरीरात रक्त टाकले जात होते. ही केवळ ईश्वरी शक्ती होती. त्यास दुसरा कोणताही खुलासा नाही. ती आज सुद्धा आरोग्यसंपन्न आहे. कॅथरीनबाईना जगातील सर्व भागांतून बोलावणी येतात. परंतु त्या पीटसबर्ग सोडून कोठे जात नाहीत. त्यांचे वय १९६८ साली ८४ वर्षांचे होते. असे असूनही त्या सदैव आनंदी, हास्यमुख व कोणासही मदत करण्यास सदैव तत्पर असतात.

यासारखीच, पण याहीपेक्षा चमत्कारिक, मनास स्तंभित करणारी, वैद्यकीय शास्त्रास न उकलणारी व केवळ प्रार्थनेने बरी झालेली कितीतरी उदाहरणे आहेत. परंतु त्यापैकी आणखी काही देत बसलो तर ग्रंथविस्तार फार होईल. एका लहानशा ग्रंथात या सर्व विषयावरील माहिती व उदाहरणे संकलित करणे हे जरा कठीणच काम आहे. परंतु निरनिराळे भाग प्रसिद्ध केले तर ते एकत्र राहात नाहीत व वाचकांस सुद्धा एकत्र माहिती मिळणे शक्य होत नाही. याकरता संक्षेपाने का होईना पण शक्य तितक्या जास्त अज्ञात विषयांबद्दल एकाच ग्रंथात माहिती देण्याचा प्रयत्न करीत आहे.

प्रार्थनेत किती शक्ती आहे याची या प्रकरणातील माहिती वाचून वाचकांस साधारण कल्पना आली असेलच. कोणीही मनुष्य आजारी पडला की, त्याची साधारण प्रवृत्ती प्रथम नेहमीच्या डॉक्टर वैद्यांकडून उपाययोजना करून घेण्याची असते. असे पुष्कळ उपाय करून काही उपयोग होत नाही असे आढळून आले म्हणजे मग मनुष्य अशा दैवी इलाजाकडे वळतो. म्हणजे समजा, आजवर अगदी असाध्य किंवा निदान दु:साध्य स्थितीला येईपर्यंत तरी कोणी या बाजूकडे वळतच नाही. प्रार्थना किंवा इतर कोणत्याही दैवी इलाजांना त्यांच्याही सीमा Limitations म्हणून काही असतातच. समजा, हात तुटून तुकडा पडला आहे. प्रार्थनेने काही त्याची वाढ होऊन तो पूर्ववत होणार नाही किंवा शंभर वर्षांचा मनुष्य असाध्य व मरणासन्न स्थितीत पडला आहे, तो काही प्रार्थना किंवा इतर कशानेही दुरुस्त होऊन अमर होणार नाही. कदाचित थोडा बरा होईलही. परंतु तोही थोड्या काळापुरताच.

मी म्हणतो, अध्यात्म हा भारताचा विषय आहे व प्रार्थना हा अध्यात्माचा भाग आहे. तो उपयुक्त आहे याची कल्पना हे वाचून वाचकांस आली असेलच. खरोखर प्रार्थना म्हणजे काय व ती कोणाकडे कशा पद्धतीने करावी याची पाश्चात्यांस फारच थोडी माहिती आहे. त्यांना एकच गोष्ट माहीत आहे की, अत्यंत कळकळीने ईश्वर किंवा जीझसमार्फत ईश्वरास आवाहन करावयाचे. आणि त्याचे फळ त्यांना मिळते. आपल्याप्रमाणे काही बीजमंत्र किंवा आरोग्य प्रदान करणाऱ्या देवता वगैरेंची त्यांना माहिती नाही. खरोखरी प्रार्थना हे एक शास्त्र आहे याचीच त्यांना नीटशी कल्पना नाही असे दिसते. असे असून, चिकाटीने, तळमळीने प्रयत्न करणारे किती आश्चर्यकारक कामे करू शकतात, हे पाहून त्यांच्याबद्दल आदराने मन भारावून जाते. माहिती नसणे हा काही गुन्हा नाही व तशी ती त्याना नाही या म्हणण्यात मी त्यांना काही कमी लेखतो असाही कोणी अर्थ करू नये. उलट अशाही परिस्थितीत ते किती आश्चर्यकारक कार्य करीत आहेत, ते कौतुकास्पद आहे ते दाखविण्याचा व आमच्याकडे सर्व परिस्थिती अनुकूल असताना या बाबतीत आमच्या पूर्वजांनी प्रगत असे शास्त्र बनविले असताना त्याचा अगदी काहीही फायदा इतरांकरता तर नाहीच, परंतु स्वत करताही घेता येऊ नये इतके आम्ही करंटे आहोत, हे दाखविण्याकरता आहे. आपले सरकार तर निजलेले आहेच; परंतु सरकारसुद्धा जनतेने बनविलेले आहे. जनतेने थोडे जरी मनावर घेऊन नुसती पायाशुद्ध सुरुवात केली तर लवकरच हे मूळ धरून रोपटे तयार होईल. पुढे त्याच्या शाखा–उपशाखांनी युक्त असा वृक्ष तयार होईल व मानवतेला आपल्या छायेखाली घेईल. दानशूर व त्यागी माणसे आपणात नाहीत असे नाही. परंतु मी म्हणेन, त्यांना योग्य मार्गदर्शन नाही. या माझ्या लिखाणाने कोणास तरी स्फूर्ती येऊन त्यांनी या कार्यास सुरुवात केली तर मी केलेल्या श्रमाचे सार्थक झाले असे समजेन. माझे आता वय झालेले आहे व कदाचित हा ग्रंथ छापून प्रसिद्ध झालेला तरी मला पाहावयास मिळेल की कसे याची मला शंका आहे. तरी पण ज्याच्या वाचनात हे येईल, मग ते केव्हा का येईना, त्यांनी हे वाचून नीट माहिती करून घेऊन प्रयत्न करून अखिल मानवजात उपकृत करावी ही इच्छा.

Spiritual Healing

स्पिरिट या शब्दास मराठीत योग्य असा प्रतिशब्द नसल्याने स्पिरिच्युअल हीलिंग यास काय म्हटले असता यथार्थ बोध होईल हा एक विचाराचा प्रश्न आहे. प्रथम स्पिरिट कशास म्हणावयाचे हाच प्रश्न आहे. आपण सर्वसाधारणपणे त्यास मृतात्मा किंवा भूतयोनी असे म्हणतो. परंतु पाश्चात्य या अर्थाने तो शब्द वापरीत नाहीत. स्पिरिट हा शब्द एकतर सर्व स्पिरिटांचे स्पिरिट म्हणजे ईश्वर किंवा शरीराच्या मृत्यूनंतर त्या व्यक्तीचे अस्तित्व ज्या स्वरूपात राहाते ते स्वरूप. मग त्यास जीवात्मा, मृतात्मा, भूत काय वाटेल ते म्हणा. भूत हा शब्द साधारणपणे वाईट अर्थाने वापरतात म्हणून

त्याचा वापर करण्याचे टाळू या. राहिले मृतात्मा किंवा जीवात्मा. पाश्चात्य वैज्ञानिक स्पिरिट याला माणसाचे शारीरिक मृत्यूनंतर असलेले जीवन असे म्हणत असले तरी मृतात्मा हा शब्द योग्य होणार नाही म्हणून राहता राहिला जीवात्मा. परंतु त्याने सुद्धा नीट अर्थबोध होत नाही. त्यांच्यात सुद्धा स्पिरिट याच्या संदर्भाने निरनिराळे अर्थ धरण्यात येतात. म्हणून जीवात्मा हाच शब्द स्पिरिटकरता वापरणे सयुक्तिक ठरेल.

स्पिरिट हीलिंग—Spirit–Healing—याचा अर्थ स्पिरिटच्या साहाय्याने व्याधिनिवारण करणे. यातही काही प्रकार आहेत. एकतर स्पिरिटच्या साहाय्याने म्हणजे जीवात्म्याकडून एखाद्या व्यक्तीत शक्ति संचार करून त्या शक्तीच्या योगाने रुग्णाची व्याधी निवारण करणे. दुसरे म्हणजे प्रत्यक्ष एखाद्या जीवात्म्याने एखाद्या व्यक्तीच्या शरीराचा ताबा घेऊन त्याच्यामार्फत परंतु स्वतःच व्याधी निवारण करणे. दोहोमधील तत्त्व एकच. परंतु एकात मुख्य स्पिरिटची शक्ती वापरली जाते; तर दुसऱ्यात स्पिरिट हे स्वतःच व्याधी निवारण्याचे कार्य करते. दोन्ही प्रकार आपणास अपरिचित असल्याने आपणास नीट बोध होणार नाही. परंतु पुढे दिल्या जाणाऱ्या विवरणाने बोध होऊ शकेल. या पाश्चात्यांतसुद्धा स्पिरिटच्या योग्य अर्थाबद्दल तात्विक वाद आहे. त्यांच्यांतील चर्च या संस्थेला मरणानंतर मानवास स्पिरिट या स्वरूपात अस्तित्व राहाते हे तत्त्व मान्य नाही. पण स्पिरिच्युअल हीलिंग तर ते प्रत्यक्ष पाहात असतात. म्हणून त्यांचा आग्रह असा आहे की, हे कार्य करणारे स्पिरिट म्हणजे सर्वशक्तिमान असा परमेश्वर. त्याच्या इच्छेने Gods will म्हणा की Cosmic Energy (चित् शक्ती) म्हणा, की जी सर्वत्र सारखी भरलेली असते. तिच्यामार्फत हे कार्य होत असते.

God's will म्हटले तर Healer म्हणजे उपचार करणारा व करवून घेणारा हे दोन्ही ईश्वरापेक्षा भिन्न व त्रयस्थ असे असून ईश्वर त्यांच्यामार्फत कार्य करवून घेत असतो. हे कोणाही बुद्धिवाद्यास पटण्यासारखे नाही. परंतु आपणातील जीर्णमतवादी कर्मठ मंडळी ज्याप्रमाणे नविन असे काही म्हटले की त्यास विरोधच करावयाचा व नवीन बुद्धीस कितीही पटले तरी ते कबूल न करता जुने तेच खरे असा हटवाद करतात, त्याप्रमाणे बरेचसे या चर्चमधील मंडळींचे असते. बायबलला मान्य नाही अशा किती तरी गोष्टी आज विज्ञानाने सिद्ध झालेल्या आहेत. परंतु या मंडळींनी त्या सर्वांस प्रत्येक वेळी विरोध केला आहे. त्यापैकी काहीसा हा प्रकार आहे. परमेश्वर सर्वत्र अंतर्बाह्य असून, त्याखेरीज काहाही निराळे असे काही असूच शकत नाही. असे जर आहे तर उपचार करणारा निराळा व उपचार करविणाऱ्यामार्फत कार्य करणारा परमेश्वर निराळा, असे कसे असू शकेल ?

आपणाकडे अशा प्रकारांनी व्याधिनिवारण करण्यासंबंधी काहीच कल्पना नसल्याने यासंबंधीचे प्रयोग व हकीगती पुष्कळशा अविश्वसनीय व काही वेळेस तर अशक्य पण वाटतील परंतु मी यापुढे या प्रकरणात नमूद केलेल्या हकीगती कितीही अविश्वसनीय अथवा अशक्य कोटीतील वाटल्या तरी त्याबद्दल मी अशी ग्वाही देतो की

त्या सर्व सत्य सृष्टीत घडलेल्या असून अजूनही प्रत्यही घडत आहेत. त्या कोठे आणि कशा घडत आहेत यासंबंधी सांगोपांग हकीकत तपास करणाऱ्यास अवश्य मिळेल.

मानसिक व्याधिनिवृत्ती म्हणजे आपली मनःशक्ती जोरदार, समृद्ध व संपन्न अशी करून तिच्यामार्फत रुग्णाच्या शरीरातील व्याधीचे निवारण करणे. मात्र मनच सर्व करणारे असल्याने ते सदैव शक्तिसंपन्न असे राहील अशी व्यवस्था करावी लागते. आणि त्यास जरूर असलेल्या शक्तीचा पुरवठा सतत करीत राहावे लागते. याबद्दल पुष्कळ ऊहापोह याच संदर्भात यापूर्वीच येऊन गेला आहे. यातील थोडा निराळा भाग म्हणजे Thought Force Healing म्हणजे शक्तियुक्त विचारांचे संक्रमण करून व्याधिनिवृत्ती करणे होय. यात सुद्धा मनाचाच विशेषेकरून संबंध येतो. फक्त मानसिक प्रयोगात एकाचे मन दुसऱ्याच्या मनावर प्रभाव पाडून कार्य करीत असते, तर यात उपचार करणारा आपल्या विचारांचा बलवान असा प्रवाह रुग्णावर सोडून त्याची व्याधिनिवृत्ती करीत असतो. या दोहोंत उपचार करणाऱ्यास स्वतःमध्ये सतत शक्तिसंचय राहात जाईल व त्याकरता शक्तीचा पुरवठा होत राहील याची काळजी घ्यावी लागते. त्याकरता जप, प्रार्थना वगैरेंच्या साहाय्याने पुरवठा करीत राहावे लागते.

Spirit Healing मध्ये यापेक्षा परिस्थिती थोडी निराळी असते. यात स्वतःच्या मनाचा त्याचप्रमाणे प्रार्थनेचाही फारसा भाग नसतो. याचा अर्थ संबंध येतच नाही असा नाही; परंतु प्रामुख्याने नाही. काही व्यक्तींना जन्मतःच ही सिद्धी असते, तर काहींना पुढील आयुष्यात ती सहजासहजी मिळते. काहींना प्रयत्नानेही मिळू शकते व त्यात सुद्धा त्यांच्या मते Solar plexus किंवा नाभीजवळील मणिपूर चक्र याचा विशेष संबंध असतो. आपण त्यांना स्पिरिटस किंवा जीवात्मे म्हणतो, त्यांच्यापैकी कोणी योग्य व्यक्ती पाहून त्याच्यामार्फत आपली शक्ती वापरीत असतात. योग्य व्यक्तीची निवड ते कशी करतात ते मात्र अद्याप अज्ञात आहे. असे सर्व प्रकारचे जीवात्मे आपणाभोवती सतत वावरत असतात. त्यातील जे चांगल्या वृत्तीचे असून शक्तिसंपन्न व व्याधिनिवृत्ती कशी करावी याची माहिती असलेले असतात ते अशा एखाद्या योग्य व्यक्तीच्याच शोधात असतात की जिच्यामार्फत त्यांना त्यांच्यात असलेली शक्ती उपयोगात आणून कोणत्याही रुग्णाची व्याधी निवारण करता येईल. याकरता ते सतत योग्य व्यक्तीच्या शोधात असतात. अशी व्यक्ती मिळाली की आपली शक्ती त्या व्यक्तीत ओतून त्याच्यामार्फत त्या शक्तीच्या योगाने ते रुग्णाची व्याधी निवृत्त करीत असतात.

Spiritual Healing व इतर Healing मध्ये हा फरक असतो की इतर पद्धतीने कार्य करणारी व्यक्ती ही स्वतः कार्य करीत असते. त्यात तिच्या स्वतःच्या शक्तीचा व्यय होत असतो म्हणून तिचा सतत पुरवठा व संचय होत राहण्याची दक्षता त्याला घ्यावी लागते. या पद्धतीत तसे नसते. उपचार करणारी व्यक्ती Healer ही

खरोखर काहीच उपचार करीतच नसते. ती केवळ माध्यम म्हणून असते. तिच्या शरीराचा व मनाचा उपयोग करून जीवात्मा आपल्या स्वतःच्या शक्तीने रुग्णाची व्याधिनिवृत्ती करीत असतो. Healer हा केवळ माध्यम असतो. तो खरोखरीचा Healer नसतोच. तर केवळ आपले शरीर व मन यांचा उपयोग या चांगल्या कार्याकरता करू देत असतो इतकेच. त्यात त्या व्यक्तीच्या स्वतःच्या ज्ञानाचा अगर शक्तीचा काही एक संबंध नसतो. आणि गरजही नसते. Spiritual व्याधिनिवारण हे कोणी व्यक्ती करीत नसून, त्याच्याकडून करवून घेतले जात असते. पाश्चात्यांच्या मताप्रमाणे हे कार्य काही जीवात्मे Spirits करीत असतात. तर काहींच्या मते ते God's will किंवा Cosmic energy अथवा चित्शक्तीच करीत असते. यापैकी God's will याबद्दल यापूर्वीच आपण विचार केलेला आहे. Cosmic energy संबंधी असे सांगण्यात येते की चित्शक्ती ही आपणा सर्वांत व सभोवती अंतर्बाह्य सतत भरलेली असल्याने, तीतून पुरवठा करून घेऊन तिचा उपयोग करण्याची शक्ती या उपचार करणाऱ्यात असते. ते तिचा उपयोग करून व्याधिनिवारण करतात. एकूण तत्त्व एकच Healer हे माध्यम म्हणून राहून त्यांच्यातून शक्तिप्रवाह रुग्णावर टाकून त्यांची व्याधी निवारण करणे हेच होय. दोन्ही पद्धतीत शक्तीचे स्वरूप निराळे असले तरी परिणाम व प्रकार मात्र एकच.

'मृत्यू म्हणजे काय व नंतर या' प्रकरणात स्पिरिट बॉडी यासंबंधी सविस्तर वर्णन आहे ते वाचकांनी पुन्हा एकदा वाचावे. म्हणजे येथे त्याची पुनरुक्ती करावयास नको. मृत्यूनंतर शरीरापासून सुटे होऊन जे काही आपले अस्तित्व काही काळ टिकून राहते, ते स्पिरिट किंवा तो जीवात्मा ज्या स्वरूपात राहतो ती स्पिरिट बॉडी. शरीर जिवंत असताना जी शक्ती शरीर, मन यांस अंतर्बाह्य व्यापून त्याजकडून आपापली कार्ये करवून घेत असते आणि त्या शरीरासोबतच शरीराचा आकार धरून राहते व शरीराच्या मृत्यूनंतर शरीरापासून सुटी होऊन त्याच स्वरूपात काही काळ आपले अस्तित्व टिकवते, ती आपली Spirit Body होय. जसजसे शरीर मोठे होत जाते व मन परिपक्व होत जाते तसतसा त्याचप्रमाणे ह्या स्पिरिट बॉडीत सुद्धा फरक पडत जातो. व त्याप्रमाणे चित्शक्ती तात्पुरता आकार धारण करून शरीराच्या निरनिराळ्या अवयवांकडून कार्य करवून घेत असते. म्हणजे सांख्यांच्या तन्मात्रांप्रमाणे ती चित्शक्ती शरीराच्या आकारातच व शरीराच्या आधाराने असते. तीच मनाच्या स्वरूपात राहून कार्य करीत राहाते. मनाकडून मनाचे कार्य करून घेणारी शक्ती तेच आपले Spirit Mind होय.

स्पिरिट हीलिंग मध्ये स्वतः काही एक न करता केवळ त्याच्या शरीरातून शक्तिस्रोत निघून रुग्णावर परिणाम करीत असतो. हे तर झालेच. परंतु त्यातही उपचार करणारा Healer म्हणून जो कोणी असतो त्याचे सुद्धा फक्त Spirit Mind च रुग्णाच्या Spirit Mind वर शक्तियुक्त स्पंदने टाकून त्याचा व्याधिपरिहार करीत असते त्यासच Spirit Therapy असे म्हणतात. Healer किंवा उपचार करणारास न कळत त्याच्या Spirit

Mind मध्ये जीवात्मा अथवा Cosmic energy चा संचार होऊन ती रुग्णाच्या Spirit Mind वर प्रत्यक्ष परिणाम करून व्याधिनिवृत्तीचे कार्य घडवून आणीत असते. रुग्णाच्या Spirit Mind वर होणाऱ्या शक्तीच्या आघातांचा परिणाम शरीर व त्यातील व्याधी मग ती कोणती का असेना तीवर परिणाम होऊन तिची निवृत्ती होत असते व व्याधीस जडमुळासकट नाहीशी करते. सूक्ष्माचा सूक्ष्मावर परिणाम जडापेक्षा केव्हाही तत्काळ व जास्त परिणामकारी असतो. त्यामुळे Spiritual Healing मध्ये पुष्कळ वेळा असे पाहण्यात येते की सुरवात करताच काही क्षणांतच व्याधिनिवृत्ती संपूर्णपणे होऊन आसन्नमरण स्थितीतील रोगी आपल्या पायाने चालत जातो.

या पद्धतीने ज्याच्यामार्फत उपचार होतो त्यास Healer असे म्हणतात. त्याने सतत ही जाणीव ठेवली पाहिजे की आपले शरीर हे केवळ साधन असून कर्ता करविता सर्व काही Spirit जीवात्मा आहे. त्यात आपण स्वतः काही करीत नाही की करू शकत नाही. वेळो वेळी रुग्ण अथवा त्याचे नातेवाईक येऊन याची स्तुती करीत असतात. आभार मानीत असतात. वारंवार तेच ते कानी पडत गेले की, त्यास असे वाटू लागते की माझ्यामुळेच हे सर्व काही होत आहे. मग अभिमान उत्पन्न होतो. असे झाले म्हणजे त्याच्यातील शक्तिसंचार हळूहळू कमी होऊ लागतो व शेवटी नाहीसा होता. अशा कित्येक व्यक्तींची शक्ती त्यांस सोडून गेल्याचे अनुभवात आहे. त्याचप्रमाणे Spirit Healing हे स्वतंत्र उपचार म्हणून न करता इतर इलाज चालू असतील त्यांस सहाय्यक म्हणून असावे. त्याचप्रमाणे या पद्धतीने वाटेल ते आजार दुरुस्त होऊ शकतील अशा भ्रामक समजुतीत पण राहू नये. हात तुटला किंवा डोळा आंधळा झाला तर ते काही नवीन येणार नाहीत. अथवा जरा नाहीशी करून कोणास अमर करता येणार नाही. तर निसर्ग व वैद्यकशास्त्र याच्या मर्यादेत राहून जे काही करता येणे शक्य असेल त्याबाबतच प्रयत्न असावेत. तसेच उपचार करणारास रुग्णाचे मानसिक सहाय्य असेल तर ठीकच. पण निदान विरोध नसावा. याकरता होता होईतो आपण कोणत्या पद्धतीने इलाज करीत असतो हे त्यास न कळलेले बरे. कारण मानसिक विरोधाने प्रतिबंधक तरंग उत्पन्न होऊन प्रयोग फुकट जातात.

त्याचप्रमाणे कोणत्या पद्धतीने उपचार करावेत याबद्दल काही ठाम असे नियम नाहीत. कोणी शरीरास हात लावून तर कोणी दुःखाच्या भागावर हात ठेवून इलाज करीत असतात काही निव्वळ रुग्णाकडे पाहून त्यास दुरुस्त करतात. कोणी प्रयोगास सुरवात करताना प्रथम शरीरावर किंवा दुःखाच्या जागी हात ठेवून व्याधिपरिहार करतात. थोडा अनुभव येऊन प्रगती होऊ लागली म्हणजे नुसत्या रुग्णाच्या डोळ्यांकडे पाहूनही त्याच्यात शक्तिस्रोताचा प्रवेश करवून व्याधिनिवृत्ती करू शकतो. याप्रकारे रुग्णास हात न लावता नुसते पाहून व्याधिनिवृत्ती करणे जमू लागले म्हणजे रुग्णाच्या फोटोकडे किंवा फोटोतील त्याच्या दुःखित भागाकडे पाहूनही व्याधिनिवृत्ती करता येऊ

CamScanner

लागते. त्याची पुढची पायरी म्हणजे रुग्णाकडून कितीही लांबून नुसते पत्र आले आणि ते त्याच्या हस्ताक्षरात असले की झाले. त्याहीनंतर रुग्णाचे कोणी नातेवाईक अथवा स्नेही यांनी विनंती केली अथवा पत्राने हकीगत कळविली तरी त्यावर परिणामकारी इलाज करू शकतात.

आपणाकडे अशा प्रकारचे व्याधिविमोचनाचे प्रयोग तर कोठे होत नाहीतच. परंतु अशा रीतीने व्याधिनिवारण होऊ शकते हे सुद्धा क्वचितच कोणास माहिती असेल. इंग्लंड, राशिया, अमेरिका अशा प्रगत देशांत असे कार्य करणाऱ्या संस्था, शेकड्यांनी असून, निर्लोभ वृत्तीने निरलसपणे काम करणाऱ्या व्यक्ती पण आहेत. त्या देश, समाज, धर्म वगैरेंचा विचार न करता केवळ सेवाभावी वृत्तीने व त्यागपूर्वक कार्य करीत आहेत त्यांची स्तुती करावी तितकी थोडीच. त्यांना सरकारी आश्रय तर नाहीच, पण बऱ्याच ठिकाणी विरोध आहे. पैसा कोणाकडून घेत नाहीत, शंकाखोरांकडून वेळोवेळी उपहास होत असतो तरी देखील त्या आपापले कार्य चिकाटीने व जिद्दीने करीत आहेत. जनताजनार्दन त्यांना साथ देत आहे. इंग्लंडमधील हॅरी एडवर्डस, ॲलेक्स होम्स, रेव्हरंड कॅमेरान, पेड्रो, जॉर्ज चॅपमन, ऑस्ट्रेलियातील सिस्टर केनी, अमेरिकेतील वॉरेल पतिपत्नी इत्यादि अनेक मंडळी त्यागपूर्वक अद्भुत कार्ये करीत आहेत की ज्यांच्या कार्यांची आज आपणास कल्पनाही येणार नाही व कोणी सांगितले तर ते आपणास अशक्य कोटीतील वाटेल. त्यांना अजून सरकार व वैद्यक मंडळाने मान्यता दिलेली नसली तरी, त्यांनी केलेले प्रयोग नामांकित डॉक्टर मंडळींनी समक्ष पाहिलेले असून रोज पाहात आहेत. वैद्यकशास्त्राने केवळ अशक्य म्हणून ठरविलेले रुग्ण काही क्षणांत दुरुस्त होऊन चालू लागलेले पाहून डॉक्टर आश्चर्यचकित होत आहेत. त्यांनी काय काय केले व करीत आहेत, हे पाहण्यापूर्वी ही सिद्धी कशी मिळते अथवा मिळू शकते ते आपण पाहू या.

यासंबंधी श्री. हॅरी एडवर्डस या प्रथम श्रेणीच्या स्पिरिच्युअल हीलरखेरीज इतरांनी ही एक दैवी देणगी असते असेच सांगितलेले आढळते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आपणाभोवती ज्याप्रमाणे वीज, मॅग्नेटिझम, हवा वगैरे सर्वत्र पसरली आहेत. त्याचप्रमाणे आरोग्यदायक प्रवाह आपणासभोवती सर्वत्र पसरला आहे. फक्त त्याचा आपणास उपयोग करून घेता येत नाही. केवळ ईश्वरी कृपेने त्याचा वापर करण्याची शक्ती काही व्यक्तींना मिळते व ती शक्ती आपणात सामावून तिचा उपयोग त्या व्यक्ती, दुसऱ्यास आरोग्य प्रदान करण्याकरता करतात. ते (हीलर) या संबंधात एखाद्या झाडाचे उदाहरण देतात. कोणत्याही झाडाचे बी पेरले तर ते मूळ धरून वर येते. मग पाणी, हवा, क्लोरोफिल वगैरे त्यास आवश्यक असलेले सर्व सभोवतीच्या वातावरणातून शोषून घेऊन आपली वाढ करून घेत असते.

खरे म्हणजे ज्यांना बाहेरील शक्ती आत्मसात करता येते, ते झाडापासूनही आरोग्यदायक शक्ती खेचू शकतील. मात्र ती शक्ती मिळवून ती स्वतःत सामावून रुग्णाच्या

उपयोगात आणण्याचा राजमार्ग म्हणजे एकमेव परमेश्वरी इच्छा. यापलीकडे ते काही सांगू शकत नाहीत. फक्त श्री. Harry Edwards यांचे म्हणणे असे आहे की, हिंदुस्थान व इतर पौर्वात्य देशांत प्राणायाम, मनन चिंतन यांनी ही शक्ती मिळविण्याची प्रथा आहे. त्यांचेसुद्धा म्हणणे असे आहे की आपले सोलर प्लेक्सस किंवा मणिपूर चक्र जागृत झाले की ती सिद्धी आपोआप येते. मात्र हे सर्व प्रकार ज्यांना जीवात्म्याकडून शक्ती प्रदान होत नसेल त्यांच्याकरता. ज्यांना जीवात्मे आपली शक्ती प्रदान करून त्यांच्याकडून व्याधिनिवृत्ती करवून घेतात त्यांची गोष्ट निराळी. पण ज्यांना हे साधत उपलब्ध नाही त्यांना प्रयत्नाने ते मिळू नये असे नाही. तरी त्याकरता पौर्वात्य पद्धती काय आहे ते आपण पाहू या.

खरोखरी आपणाकडे हे शास्त्र या स्वरूपात, पुष्कळ प्रगत स्वरूपात उपलब्ध आहे. परंतु आज शतकानुशतके त्याकडे दुर्लक्ष झालेले असल्याने ते उपेक्षित आहे. यासंबंधी व तत्सम नियमांसंबंधी वर्णन ‘ योग ’ या प्रकरणात सविस्तर येईल. तरी पण या ठिकाणी त्यासंबंधी थोडे विवेचन केले तर अस्थानी होणार नाही.

स्वतःच्या व इतरांच्या व्याधिनिवृत्तीकरता योगाच्या काही प्रक्रिया निःसंशय अत्यंत उपयुक्त आहेतच; परंतु त्याखेरीजही खास याच कारणास्तव म्हणून काही मंत्र व साधना उपलब्ध आहेत, त्यांचा उल्लेख मी माझ्या ‘ अमृत-तुषार ’ या ग्रंथात सविस्तर केलेला आहे. परंतु ते ज्यांना वाचावयास मिळाले नाही त्यांच्याकरता थोडक्यात विवरण करीत आहे :

यातील प्रथम म्हणजे ॐ ह्रीं नमः हा बीज मंत्र होय. याचा जप दोन प्रकारांनी होत असतो. पहिला प्रकार म्हणजे ओठं न हालविता मनातल्या मनात केवळ पश्यंतीने. असा जप पाच लक्ष झाला म्हणजे जपकर्त्यांचे तेज वाढते. आपण ज्यास मॅग्नेटिझम असे म्हणतो, ते स्वतःबद्दल अनुभवास येऊ लागते. जवळील लोक व समाजावर त्याची छाप पडू लागते अनपेक्षित व्यक्तींकडून महत्त्वाची कामे अल्प सायासाने पार पडू लागतात. मात्र नुसती मॅग्नेटिझम वाढविणे असेल तर ॐ क्लीं नमः हा जप जास्त उपयोगी. हाच ॐ ह्रीं नमः हा जप थोडया निराळ्या पद्धतीने केला तर त्याचा उपयोग जपकर्त्यांत शक्तिसंचय होऊन तो व्याधिनिवारणाचे कार्य नुसत्या जपाच्या सहाय्याने करू शकतो. मात्र या जपाचे थोडे तंत्र आहे. एक तर तो जप मोठ्याने म्हणजे वैखरीत करावयाचा असतो. ॐ ह्रीं नमः हा जप म्हणताना ॐ म्हटले की त्याचा अखेरचा म म्हणजे ओंम्...त्या म्चा आवाज नाकातल्या नाकात गुंगवावयाचा व तसे थोडा वेळ झाले म्हणजे ह्रीम् म्हणून त्याचप्रमाणे म्चा आवाज गुंगवावयाचा. शेवटी श्वास संपत आला म्हणजे नमः म्हणून श्वास संपवावयाचा. अशा रीतीने एका श्वासात तो एकच जप पुरा करावयास हवा. त्यास निदान १२ ते १५ सेकंद लागले पाहिजेत व ते सुद्धा धाप न लागता लगेच त्याचप्रमाणे दुसरा श्वास घेता आला पाहिजे. अशा रीतीने प्रत्येक श्वासास १२ ते १५ सेकंदांस एक ॐ ह्रीं नमः हा जप करावा. पंधरा झाले तर उत्तमच, मात्र शेवटी धाप लागू नये.

असा जप सकाळी स्नानानंतर १०८ ची एक माळ व सायंकाळी किंवा रात्री १०८ ची माळ असा रोज निदान २१६ जप करावा. या पद्धतीने सव्वा लक्ष जप पुरा करावा. त्यास सरासरी दोन वर्षे लागतील. जपकाळात मकार मेंदूकडे गुंगवीत असताना त्याकडे लक्ष केंद्रित असावे. साधारणपणे २० ते २५ हजार जप पूर्ण झाला म्हणजे तुमच्यात शक्तिसंचार होत आहे असा तुम्हास अनुभव येऊ लागेल व तो पुढे पुढे वाढू लागेल. जपसंख्या पूर्ण झाल्यावर सुद्धा शक्तिसंचय कायम राहावा म्हणून याच पद्धतीने रोज निदान एक माळ १०८ जप तरी करावाच करावा.

त्याचप्रमाणे दुसरा जप म्हणजे ‘ ॐ नारायणाय नमः ’ हा जप प्रपंच व परमार्थ या दोहोंत सारखाच उपयोगी आहे. यासंबंधी मी एक स्वतंत्र पत्रक काढले आहे, ते वाचावयास मिळाल्यास बरे. त्यासंबंधी येथे सविस्तर लिहावयाचे तर ग्रंथविस्तार प्रमाणाबाहेर होईल असे वाटते.

‘ ॐ नारायणाय नमः ’ हा जप रोज निदान अकरा माळा म्हणजे ११०० तरी करावाच. हा जप नऊ लक्ष पूर्ण करावा म्हणजे त्यात हवन तर्पण सर्व आले. लवकर संपावा अशी इच्छा असेल तर रोज जास्त करावा. मात्र कसेही करून नऊ लक्ष पूर्ण करावा. याने प्रापंचिक अडचणी, साडेसातीसारखी ग्रहबाधा ही तर दूर होतातच; परंतु ॐ ह्री नमः या जपाप्रमाणे शक्तिसंचार होऊन व्याधिनिवारण करण्याचे सामर्थ्य अंगी येते. मात्र हा जप परा, पश्यंती, मध्यमा, वैखरीपैकी परामध्ये न जपला तरी निदान पश्यंतीत म्हणजे मनातल्या मनात ओठ न हालविता करावा. मध्यमा किंवा वैखरीत नसावा. त्याने शक्तिसंचय होऊ शकत नाही. दोनही जपांपैकी कोणताही जप सिद्ध केला म्हणजे त्या जपाने अभिमंत्रून दिलेले पाणी अथवा रक्षा ही सुद्धा व्याधी अथवा संकटनिवारणाचे कार्य करते जितका त्याचा त्यागपूर्वक अधिक उपयोग केला जाईल तितकी त्याची शक्ती व आत्मविश्वासही वाढत जातात व तो मानवी बुद्धीस व वैद्यकशास्त्रास अतर्क्य व अशक्य अशी कार्ये करू शकतो. पुढे पुढे सवयीने तो रोग्याकडे नुसते पाहून किंवा लांबच्या रोग्यास नुसती लावावयास रक्षा देऊन किंवा त्यावर मंत्रयुक्त ध्यान करून व्याधिनिवारण करू शकतो. मात्र त्याकरता जप करीत राहून शक्तिसंचय हमेशा करीत राहिले पाहिजे. आणि खालील नियम कटाक्षाने पाळले गेले पाहिजेत.

१. व्याधिनिवारण किंवा संकटविमोचन करीत असताना स्वतःचा अथवा स्वकीयांचा आर्थिक फायदा होईल असा मोबदला घेऊ नये; अट म्हणून तर नसावीच. परंतु व्याधिनिवारणानंतर कृतज्ञतेच्या भावनेने म्हणून काही आणून दिले तरी ते घेऊ नये; त्याचा विनियोग चांगल्या कार्यास करण्यास सांगावा. सदैव त्याग व निरलस वृत्तीने कार्य करीत राहण्याची तयारी ठेवावी.

२. दुष्ट, पापी, व्यभिचारी अशा लोकांकरता ते तसे आहेत हे माहीत असले तर कधीही काहीही करू नये. त्यांना त्यांच्या पापाची फळे भोगू द्यावीत.

एखादा दरवडेखोर त्याच्या कर्माने मरत असेल तर त्यास खुशाल मरू द्यावे. तुमच्यामार्फत दुरुस्त होऊन त्याने पुन्हा दरवडा घातला तर ते पाप तुमच्या शिरावर बसेल. वैद्यक शास्त्र हे फार उच्च कोटीतील असून भेदाभेद करू नये फक्त कर्तव्य करीत असावे वगैरे सर्व खोटे आहे. ज्यांना आर्थिक मोबदला घेऊन करणे आहे त्यांना करू द्यावे. तुमच्या कृत्याने तो सन्मार्गास लागण्याची शक्यता असेल तर मात्र अवश्य मदत करावी व नंतर मार्गदर्शन करावे.

३. त्याचप्रमाणे विना मोबदला पण कधीही शक्तीचा व्यय करू नये. ज्यांना फायदा करून घेणे आहे त्यांनी योग्य मोबदला देण्याची तयारी ठेवली पाहिजे याचा अर्थ स्वतःकरता द्रव्य वगैरे घ्यावे असा मात्र नाही तर त्यास व्याधीच्या मानाने काही हजार अथवा लाख रामनाम किंवा त्यास मानवेल त्या देवतेचे नाव लिहावयास सांगावे. तोंडी जप तो कबूल करून करील वा न करील याकरता लेखीच असावा. त्यास इतका करणे शक्य नसेल तर कुटुंबीयांनी केला तरी चालेल. त्यास लिहिता येत नसेल तर राम ही दोन अक्षरे त्यास लिहावयास शिकवावीत व करणे भाग पाडावे. विना मोबदला काहीही मिळाले तर त्याची किंमत नसते व त्याचा गुणही यावयास वेळ लागतो. याप्रमाणे मोबदला घेत गेले तर त्याच्या व्याधिनिवृत्तीस मदत होऊन तुमचाही शक्तिसंचय वाढत जाईल. त्यास आर्थिक खर्च करण्याची ऐपत व इच्छा असली तर तुमच्या मार्फत एखाद्या खरोखरीच्या सत्कृत्यात खर्ची पडेल अशी व्यवस्था करावी. मात्र त्याच्या मोबदल्यात रामनामाची अट मात्र शिथिल करू नये.

४. या सर्वांपेक्षा अधिक महत्त्वाचे म्हणजे ज्यांना या क्षेत्रात खरोखरी काही कार्य करण्याची इच्छा आहे त्यांनी सतत पवित्र आचार, आहार, विहार व विचार यांनी युक्त असे चारित्र्यसंपन्न जीवन जगलेच पाहिजे. होता होईतो परान्न वर्ज्य करावे. कोणाचेही उपकार विनामोबदला घेऊ नयेत. भोजन निरामिष व परिमित–मितभाषी व संस्कारयुक्त त्यागी जीवन जगावे. ज्यांना काया-वाचा-मने करून चारित्र्यसंपन्न जीवन जगणे शक्य नसेल, त्यांनी या खटपटीत पडू नये. त्यांचे श्रम व वेळ फुकट जाईल, हे आध्यात्मिक क्षेत्र असून अशक्य ते शक्य करून दाखविणे आहे व ते फक्त चारित्र्यवान व्यक्तीच करू शकेल.

याशिवाय ‘ योग ’ या प्रकरणात मणिपूर चक्र कसे जागृत करावे त्याचा उल्लेख येईल. ते जागृत करता आले तर ही व अशा काही सिद्धी विनासायास व आपोआप प्राप्त होतात. मात्र तो मार्ग बिकट आहे हे येथेच सांगून ठेवलेले बरे.

अमेरिकेत बाल्टिमोर येथे अँब्रोज व ओल्गा वॉरल म्हणून पतिपत्नी व इंग्लंडमध्ये श्री. हॅरी एडवर्डस हे स्पिरिच्युअल हीलिंगचे काम त्यागपूर्वक, विनामूल्य व सातत्याने करीत आहेत. त्यांच्या अनुभवातील काही प्रसंग वाचकांस निःसंशय उद्बोधक वाटतील. म्हणून त्यातील थोडे वाचकांच्या माहितीकरता खाली देत आहे. वाचकांस

CamScanner

यावरून थोडी कल्पना येईल की याही क्षेत्रात ते किती पुढे गेले आहेत, जात आहेत व किती आश्चर्यकारक कार्य करीत आहेत.

१. Olga warral हिला प्रथम कल्पनाही नव्हती की तिच्यात अशी काही शक्ती आहे. एकदा तिची बहीण बार्बारा ही व्हरांड्यात बसली होती. तिची मान मन्यास्थंभ होऊन तिची हालहाल करणे शक्य होत नव्हते. ओल्गा ही एक वर्तमानपत्र वाचीत होती. तिला एकाएकी आपणात काही शक्तिसंचार होत आहे असे वाटू लागले व तिच्या हातातून वर्तमानपत्र गळून पडले. Solar Plexus (मणिपूर चक्र) मधून काही तरी जड असा पदार्थ वर छातीकडे येत आहे असे तिला वाटू लागले. आपणास काय होते आहे हे कळण्यापूर्वीच आपणास कोणीतरी ओढीत आपल्या बहिणीकडे नेत आहे असे तिला आढळून आले. या स्थितीत ती बार्बाराच्या खुर्चीजवळ गेली व आपले दोन्ही हात तिने तिच्या मानेवर ठेवले. पाच सहा सेकंद झाले असतील नसतील तोच बार्बाराची मान सरळ झाली व तिचा ताठपणा जाऊन मनास येईल त्याप्रमाणे हालचाल करता येऊ लागली. तिच्या मानेचे दुःख व ताठपणा ही क्षणात नाहीशी झाली होती. यापूर्वी डॉक्टरांचे निदान असे होते की तिची मान कधीच दुरुस्त होणे शक्य नाही.

२. ॲनी नावाच्या स्त्रीचे गुडघे संधिवाताने धरले होते व त्याचा परिणाम तिच्या हृदयावर सुद्धा झाला होता. गुढघे खूप सुजून सारखे दुखत होते. तिच्या नवऱ्याने ओल्गा हिला तिच्याकरता इलाज करण्याची विनंती केली. त्याच क्षणी ओल्गा हिला आपल्यात शक्ति-संचार होत आहे असा अनुभव येऊ लागला व तो तिच्या हातातून प्रवाहित होत आहे असे तिला वाटले. ॲनीजवळ जाऊन तिने तिच्या गुडघ्यांवर दोन्ही हात ठेवले. एखादे मिनिट ठेवून नंतर काढून घेतले व पाहिले तर तिच्या हाताचे तळवे अक्षरशः काळे झाले होते. तिच्या कल्पनेप्रमाणे ॲनीच्या शरीरातील आजार तिच्या हातात उतरला होता. हात थोडा झटकताच काळेपणा जाऊन हात पूर्ववत् झाले. त्याच क्षणी ॲनी म्हणाली, “ ही बघ माझी सूज अजिबात गेली असून, दुःख पण नाहीसे झाले आहे व गुडघ्याची मोकळेपणी हालचाल करता येऊ लागली आहे. ” ॲनी वर्षानुवर्षे डॉक्टरांची बिले भरीत होती; परंतु कशाचाही उपयोग होत नव्हता.

३. एकदा वॉरल पतिपत्नीचे स्नेही मिडलब्रूक यांनी त्यांच्याकडे एक चमत्कारिक केस आणली. एका माणसाच्या चेहऱ्यावर, मानेवर, पाट, पोट, पाय या सर्वांवर लहान मोठे फोड होते व यातील काहीतून रक्तस्राव होत असून त्यास चालणे, बोलणे पण जड जात होते. डॉक्टरांच्या मते त्यावर ऑपरेशन हा एकमेव इलाज असून त्याचा सुद्धा उपयोग होईलच याची त्यांना शाश्वती नव्हती. थोडा विचार करून ॲब्रोज वॉरल यास वाटले की त्याच्या कमरेवर आपल्या हाताचा अंगठा ठेवावा. पंधरा ते वीस मिनिटे त्या जागी त्याने आपला अंगठा ठेवला व काय आश्चर्य ? त्या अव-

धीत त्याच्या अंगावरील सर्व फोड नाहीसे झाले होते. रक्त येणे, दुःख व खाज ही सर्व थांबली होती व त्यानंतर त्याच्या हयातीत त्यास पुन्हा असा त्रास कधीही झाला नाही.

४. Schwatehe या नावाच्या एका स्त्रीच्या स्तनात अंड्याएवढी मोठी गाठ झालेली होती व ऑपरेशन करून सर्व स्तन कापून काढण्याखेरीज इलाज नाही असे डॉक्टरांचे मत पडल्यावरून दुसऱ्या दिवशी ऑपरेशन निश्चित केले होते. तिच्या स्तनाचा सर्व भाग काढला गेल्यावर ती विद्रूप तर दिसणार होतीच; परंतु त्याशिवाय तिच्या जिवास पण धोका होता. सायंकाळी ती स्त्री ओल्गाकडे आली व काही तरी इलाज करण्याकरता तिला विनविले. ओल्गाने तिला आपल्या हीलिंग खोलीत नेले व स्तनातील गाठीवर आपला हात ठेवला. पाच मिनिटे झाली तरी काही हालचाल दिसेना. इतक्यात तिच्यात शक्तिसंचार होऊन तिला असे जाणवले की त्या स्त्रीच्या मानेवर दुसरा हात ठेवावा. याप्रमाणे एक हात स्तनावर व दुसरा हात मानेवर असे सुमारे पंधरा मिनिटे हात ठेवले. त्या वेळी क्षणाक्षणाने ओल्गा हीस जाणवत होते की गाठ लहान लहान होत आहे. तिने हात काढला त्यावेळी ती चिंचोक्याएवढी राहिली होती व थोड्या वेळांत ती पण नाहीशी होऊन ती संपूर्ण व्याधिमुक्त झाली. दुसऱ्या दिवशी तिने डॉक्टरास पुन्हा तपासण्यास सांगितले. त्यावरून ते म्हणाले की काल तर पाहिले आहे. आता पुन्हा काय पाहावयाचे. ऑपरेशनच्या तयारीस लागू या. परंतु ॲनीच्या आग्रहावरून त्यांनी पुन्हा तपासले. आता आश्चर्य करण्याची पाळी डॉक्टरांची होती. त्यांस ते कधीच न उलगडणारे कोडे होते.

५. खुद्द ओल्गा हिच्या बाबतीत असाच एक चमत्कार घडला होता. लहानपणी तिच्या मनगटास जखम होऊन त्या ठिकाणी सुपारीएवढी गाठ उत्पन्न झाली होती. तिचे दुःख वगैरे काही नव्हते; तरी ते वाईट दिसत होते. एक दिवस तिला स्पष्ट ऐकू आले की ‘ तुझा पती ॲम्ब्रोज यास त्यावर हात ठेवण्यास सांग.’ त्याप्रमाणे तिने रात्री त्यास सांगितले व थोडा वेळ हात ठेवला व दोघे झोपी गेले. सकाळीच ॲम्ब्रोज थोडा लवकर कामाला गेला. तो गेल्यावर ओल्गा पाहते तो तिच्या हातावरील गळू नाहीसे झाले होते. सायंकाळी तिने ते ॲम्ब्रोजच्या निदर्शनास आणले. दोघांनी हर्षभराने परमेश्वराचे आभार मानले.

६. (i) ओल्गाची संवेदना नुसत्या माणसावरच परिणामकारी होते असे नाही. पशुपक्षी, झाडे यांवरसुद्धा ती कार्य करते. एकदा एके ठिकाणी फुलझाडांचे प्रदर्शन होते. तिला असे आढळले की, तिच्या बागेतील फुलझाडे अपेक्षित असलेल्या उंचीपेक्षा एक इंचाने कमी आहेत, त्यावर तिने हात फिरवून इच्छा प्रकट केली की, उद्यापर्यंत त्यांची उंची निदान एक इंचाने वाढावी. दुसऱ्या दिवशी मोजून पाहाता त्यांतील प्रत्येक झाड दीड इंचाने वाढले होते.

(ii) त्याचप्रमाणे शेजाऱ्याचा सीझर नावाचा कुत्रा फार म्हातारा होऊन

त्याची ऐकण्याची शक्ती गेली होती, काही अंतःशक्तीने तो ओल्गाकडे आला व तिचे अंग चाटू लागला. तिने त्याच्या कानाजवळ काही वेळ हात ठेवला. त्याचप्रमाणे तो दुसऱ्या दिवशी पण आला. तिसऱ्या दिवशी त्यांचा शेजारी येऊन सांगू लागला की आमच्या सीझरवर तुमचा प्रयोग शंभर टक्के यशस्वी झाला असून त्यास पूर्वीप्रमाणे ऐकू येऊ लागले आहे.

(iii) एका शेजाऱ्याची आवडती मांजरी किटी हिच्यावर एकदा दोन कुत्र्यांनी हल्ला करून तिला प्राणांतिक जखमी केले होते. तिच्या बरगड्या मोडल्या होत्या. जखमांतून रक्तस्राव होत होता व कुत्र्याच्या दातांची जखम दिसत होती. ती जवळ जवळ बेशुद्ध व मरणासन्न स्थितीत होती तिच्या मालकाने ओल्गास विनंती करून तिच्या करता काही तरी करण्यास सांगितले. एका तासात तिच्यात हुशारी येऊन तिचा रक्तस्राव बंद झाला व तिने एक पेलाभर दूध घेतले. एका आठवड्यात तिच्या सर्व जखमा व बरगड्या दुरुस्त होऊन ती हिंडू-फिरू लागली.

(iv) एका तीन महिन्यांच्या मुलीच्या तोंडात एक गळू झाले होते. ते इतके वाढले की तोंडातून बाहेर त्याचा भाग आला होता. ऑपरेशन केले पाहिजे असे डॉक्टरचे म्हणणे होते. तिला ओल्गाकडे आणले. तिनें त्या मुलीस आपल्या मांडीवर सुमारे २० मिनिटे ठेवले, त्या अवधीत ते गळू संपूर्णपणे नाहीसे झाले होते. डॉक्टरांनी दुसऱ्या दिवशी हे कसे घडू शकले याबद्दल आश्चर्य व्यक्त केलें. सुमारे १ वर्षाने त्याच मुलीच्या घशात काही रोग झाला व तिला खाणेपिणे तर काय परंतु श्वासोच्छवास देखील करणे जड जाऊ लागले. एक एक क्षण मोलाचा होता. ओल्गाला विनंती करण्यात आली. मुलगी तिच्या घरी होती. ओल्गास तिच्या मणिपूर चक्रातून काहीतरी जड असे वर येत असून त्याची ओढ त्या मुलीच्या घराकडे आहे असे वाटू लागले. ही संवेदना तिला काही क्षणच अनुभवास आली. दुसऱ्या दिवशी त्या मुलीच्या आईबापांनी सांगितले की ओल्गाने सांगितल्याप्रमाणे आम्ही त्या मुलीस घेऊन बसलो असता त्या मुलीस खोकला येऊन काही क्षणातच कफासारखे काहीतरी बाहेर पडून तिचा घसा मोकळा झाला व तिला झोप लागली. त्यावेळी त्या मुलीस हाताच्या खाली काही चमत्कारिक ओढ लागली आहे असे वाटत होते. सकाळी उठून पाहता त्या मुलीचा आजार संपूर्णपणे लय झालेला आढळून आला.

दोघा पति पत्नींनी असे अनेक असाध्य समजले जाणारे आजार नुसत्या Spirit Healing पद्धतीने दुरुस्त केले आहेत. त्यांच्या बाबत एक उल्लेखनीय हकीकत म्हणजे एका अत्यंत श्रीमंत स्त्रीचा काही असाध्य ठरविला गेलेला आजार त्यांनी दुरुस्त केला होता. त्याची कृतज्ञतापूर्वक अंशतः फेड म्हणून तिने यांना एक उत्तम फर्निचरसहित बंगला व एक कोरा चेक दिला व त्यावर त्यांना योग्य वाटेल तो आकडा भरण्यास सांगितला. मग तो आकडा हजार वा दहा हजार डॉलरचा असो. ओल्गाने ते विनयपूर्वक नाकारले व सांगितले की आम्ही कष्ट करून मिळवतो व ते आम्हास पुरून

उरते. आम्ही तुमचा बंगला घेतला तर आम्ही ऐषआरामात राहू लागू व अधिक पैशाची गरज लागून यातून तो कमवावा अशी बुद्धी होईल. त्याचप्रमाणे तुमचा चेकही पण आम्हास नको. मग तो लाख डॉलरचा का असेना; तुमचे म्हणणे असेल की ती रक्कम घेऊन वाटले तर धर्मादाय म्हणून खर्च करावी परंतु तरीही नको तुम्हास वाटले तर तुम्हीच तुम्हाला योग्य वाटेल त्या ठिकाणी त्याचा विनियोग करा. हेच व्रत त्यांनी आजतागायत सांभाळले आहे. अशा ऋषितुल्य व्यक्ती कोठे व आपणाकडे गोशाळा, देऊळे, धर्मशाळा, दवाखाना वगैरेकरता पैसे गोळा करून स्वताचा गल्ला भरणारे महद्भक्त कोठे. असो.

Harry Edwards हॅरी एडवर्डस यांचे काही Spiritual Healing संबंधी अनुभव असे :

१. एका सात वर्षांचा मुलाला लंडनमधील एका मोठ्यातील मोठया हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले होते. त्यास Myloid Leneomia एक प्रकारचा रक्त-कॅन्सर झाला होता. हा आजार बहुधा मोठया माणसांस होत असून त्यातून बरा होण्याची आशा नसते. त्या मुलाच्या वडिलांस तेथील प्रमुख डॉक्डरांनी सांगितले की या रोगास कोणताही मानवी उपचार नाही. हा लवकरच मृत्युमुखी पडणार आहे. त्याप्रमाणे मनाची तयारी ठेवा व त्यास घरी घेऊन जा. ही हकीकत त्यांनी त्यांच्या एका स्नेहास सांगितली हॅरी एडवर्डस यांची माहिती या स्नेह्यास होती. त्याने त्यास फोनवर ही हकीकत सांगितली. केवळ चोवीस तासांत त्या मुलात पुष्कळ सुधारणा दिसून आली व एक दोन आठवडयातच तो पूर्णपणे व्याधिमुक्त होऊन बरा झाला.

२. एक मनुष्य निरीश्वरवादी होता. तो बायबल, स्पिरीट वगैरे काही मानीत नव्हता त्यास कॅन्सर झाला होता व तो दुरुस्त होणे शक्य नाही म्हणून हॉस्पिटलमधून डिस्चार्ज दिला होता. त्याच्या पत्नीस हॅरी एडवर्डस यांची माहिती होती. तिने अगदी अखेरचा इलाज म्हणून एडवर्डसना विनंती केली. तो निरीश्वरवादी असल्याने तो हे उपचार करून घेण्यास मान्यता देणे शक्य नव्हते म्हणून त्यास समक्ष भेटणे योग्य नव्हते. म्हणून त्याला Distant Healing करण्याचे ठरविले. दुसऱ्या दिवशी त्याची पत्नी हर्षभरीत होऊन एडवर्डसकडे आली व सांगू लागली की त्यास आता पुष्कळ हुषारी वाटत असून त्याने आज सकाळीच मला आपल्या हाताने चहा करून दिला. त्यात पुष्कळ सुधारणा दिसून आली होती. हळूहळू कोणत्याही औषधावाचून तो संपूर्णपणे बरा झाला व नेहमीचे कामकाज करू लागला. तरी पण त्याची पत्नी त्यास ही हकीकत सांगू शकली नाही. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी तो हॉस्पिटलमध्ये काही कारणासाठी तपासून घेण्यास गेला असता त्यास कधीच कॅन्सर झाला नसावा असे मत डॉक्टरांनी व्यक्त केले. त्यावरून त्याने त्याचे X Ray फोटो दाखविले. ते दुसऱ्याचे असावेत असे डॉक्टर म्हणाल्यावरून त्यावरील स्वतःच्या नावाचे लेबल त्याने दाखविले. त्यावर ते म्हणाले कोणा दुसऱ्याचे चुकून ते लेबल लागले असावे.

एक स्त्री तीन वर्षांची असताना तिच्या पाठीच्या कण्यात दुखू लागले. तो पाठीच्या कण्याचा T. B. असावा म्हणून तिला एका अंगावर वर्षभर प्लॅस्टर करून ठेवले. तिला त्याचा त्रास सतत १० वर्षे होत होता. पुढे तिची स्थिती आणखीनच वाईट झाली. वयाच्या ३ ऱ्या वर्षापासून सतत चाळीस वर्षेपर्यंत तिच्यावर निरनिराळे इलाज केले जात होते. परंतु कशानेही उतार म्हणून नव्हता. आता तिची स्थिती अत्यंत अनुकंपनीय झाली होती. सर्वांगाने वाकडी होऊन चालणेसुद्धा अशक्य होत होते. प्लॅस्टिकचे जाकीट व लाकडी कुबड्या हे तिचे कायम सहाय्यक बनले होते. अशा वेळी तिला एडवर्डसकडे आणण्यात आले. तिच्या पाठीच्या कण्यास बाक येऊन कुबड निघाली होती. सरळ बसणेसुद्धा अशक्य होते. दुःख होत होते ते निराळेच. एडवर्डस यांनी तिला पर्सनल ट्रीटमेंट दिली. त्यांचा हात तिच्या हाताखालून फिरू लागताच तिचे दुखणे थांबले. तिच्या कंबर व पाठीवरून हात फिरविताच त्यांचा ताठपणा जाऊन सहज हालचाल करणे तिला शक्य होऊ लागले. लवकरच तिचे सर्व दुःख व अवयवातील ताठपणा नाहीसा होऊन ४० वर्षांत ती जे कधीच करू शकत नव्हती ते सर्व ती सहज करू लागली. कण्यातील बाक जाऊन पाठ सरळ झाली. सर्व सांधे मोकळे होऊन कसलाही आधार न घेता ती चालू लागली. जाकीट, कुबड्या वगैरेंची गरज कायमची नाहीशी झाली. त्यानंतर तिला त्यांची कधीही गरज भासली नाही.

४. एक तरुण मनुष्य संधिवाताने आजारी होता. त्याच्या खांद्याचे सांधे धरलेले असून सारखे दुखत होते, सांधे जखडलेले असल्याने हालचाल करणेसुद्धा अशक्य झाले होते. त्याचा Spiritual Healing वर विश्वास नव्हता. परंतु निव्वळ त्याच्या मावशीच्या आग्रहावरून व तिला बरे वाटावे म्हणून तो एडवर्डसकडे आला होता. त्यास दोन्हीही हातांची हालचाल करता येत नव्हती. एडवर्ड्सनी त्याच्या एका हातावर थोडा वेळ आपला हात ठेवला व त्यास जाणीव झाली की त्या हाताचा सांधा सुटा झाला आहे. त्यांनी त्यास तो हात वर करावयास सांगितला व तो त्यास सहज करता आला. त्या मुलास आश्चर्य वाटले. परंतु त्याची संशयनिवृत्ती झाली नाही हे एडवर्ड्सच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी त्यास त्याचा दुसरा हात उचलून पाहण्यास सांगितले. त्याची स्थिती पहिल्यापेक्षाही वाईट होती. त्याने प्रयत्न करून पाहिला; परंतु शक्य झाले नाही. हा हात उचलता आला तर तुझी खात्री होईल काय ? असे विचारता होय असे म्हणाला. एडवर्ड्स यांनी दुसऱ्या हाताच्या सांध्यावरून हात फिरविला व काही क्षणांतच त्याही हाताचे दुःख नाहीसे होऊन त्याची हालचाल सुरळीत व त्रास न होता होऊ लागली. त्या मुलाचे इतर सांधे सुद्धा लवकरच सुटे झाले व तो संपूर्णपणे बरा झाला. याप्रमाणे त्याचा विश्वास नसताही तो अगदी थोड्या वेळात बरा होऊन घरी चालत गेला.

५. एका मुलास वयाच्या ३ ऱ्या वर्षापासून काही व्याधी होती व तिचे

निदान कोणासही होऊ शकले नव्हते. ७ वर्षे निरनिराळ्या हॉस्पिटलमध्ये ठेवून व स्पेशालिस्टना दाखवूनही निदान होईना. निदान नाही तर औषध कोठून ! त्यास भूक लागत नव्हती व अन्न जात नव्हते. निव्वळ अस्थिपंजर बनला व त्यास अर्धांगाची चिन्हे दिसू लागल्यावरून, कोणीही काहीही करू शकत नसल्याने डॉक्टरांनी त्या मुलास घरी नेण्यास सांगितले. त्यास केवळ मरण्याकरताच म्हणून घरी आणण्यात आले होते. त्याला तर उभे राहताच येत नव्हते, परंतु अर्धांगामुळे हातापायांची हालचाल सुद्धा होऊ शकत नव्हती. अशा परिस्थितीत त्या मुलाच्या बहिणीने एडवर्ड्सना सर्व हकीकत कळविली व Absent Healing करण्याबद्दल विनंती केली. तीन आठवडयांत कोणत्याही औषधावाचून तो मुलगा अन्न खाऊ लागला व अंगाने भरू लागला. हळूहळू अर्धांगाची व्यथा नाहीशी झाली व तो मुलगा संपूर्णपणे बरा झाला. त्या मुलास एडवर्ड्स् यांनी त्यापूर्वी कधीही पाहिले सुद्धा नव्हते केवळ Absent Healing Treatment ने तो बरा झाला. एडवर्ड्स यांच्या मताने Absent Healing मध्ये प्रार्थना व चित्शक्ती यांचा संगम असतो. एडवर्ड्स यांना वर्षांतून सुमारे ५ लाख पत्रे येतात. एका वर्षात तर ६४०००० पत्रे आली होती. म्हणजे रोज १८०० हून अधिक पत्रे पडली. त्यांनी Evidance of Spiritual Healing म्हणून एक पुस्तक लिहिले आहे. त्यात वैद्यकशास्त्रास अशक्य वाटणाऱ्या अशा दहा हजारावर केसीस दुरुस्त केल्याचे वर्णन आहे व या सर्व केसीस त्यांनी केवळ चार वर्षांत दुरुस्त केलेल्या आहेत. असे असतानाही त्यांना लिहिलेल्या कोणत्याही पत्राचे, त्याचा सर्व अभ्यास करून सूचनायुक्त सांगोपांग असे उत्तर केवळ एक आठदहा दिवसांच्या आत येते त्यावरून त्यांच्या कामाचा व्याप व उरक याची कल्पना येईल. त्यांना पोस्टेजकरता पैसे पाठवा वा न पाठवा उत्तर हे येणारच. स्वतःकरता कोणाकडूनही ते एक पैसासुद्धा घेत नाहीत. कोणास मदत करणे असेल ती त्यांच्या हिलींग सेंटरला द्यावी. तेथे त्याचा हिशेब राहतो व योग्य विनियोग होतो. फी अशी नाहीच. कोणास स्वखुषीने काही पाठवावे असे वाटले तर पाठवावे. पाठविले पाहिजे अशी मागणी नाही.

जगातील सर्व भागांतून सर्व धर्मांचे स्त्री-पुरुष त्यांची मदत घेत आहेत. उपचार करताना भेदाभेद नाही. सरकारी मान्यता तर नाहीच. उलट काही अंशी विरोध ! डॉक्टर मंडळी त्यास मान्यता देऊ शकत नाहीत. उलट उदासीनता व उपहास. अशा परिस्थितीत एवढे प्रचंड कार्य अव्याहत चालवणे व तेसुद्धा सर्वांना समाधानकारक अशा रीतीने हे केवढे दिव्य असेल याची कल्पना करा. आपणाकडे धनिक आहेत, उदारही आहेत. परंतु त्यांना अशा विषयाची कल्पनाच नाही. कोणी निष्ठावंत कार्यकर्ते मनावर घेऊन काही करू म्हणतील तर काही होणार नाही असे नाही. एडवर्डस यांच्या हिलींग सेंटरवरील दररोजच्या केसेसची सरासरी घेतली तर असे आढळून आले की त्यात हजेरी लावणाऱ्यात हृदय व रुधिराभिसरणाचे रोगी १५०, संधि-

वातादी प्रकारचे १९०, अशक्तपणादी ७०, पोटातील तक्रारी ५०, पाठीच्या कण्याविषयीं ५०, नर्वससंबंधी ६०, इतर अवयवांतील तक्रारी १००, इन्फ्लुएन्झा ६० छाती व इतर श्वासोछ्वाससंबंधी १००; लहान मुलांच्या तक्रारी ५०, गळू वगैरे ४०, अर्धांग ७०, चामडीचे रोग ३०, व इतर ५० हे आकडे सरासरीचे आहेत. तरी रोजची हजेरी साधारण इतकीच.

यासंबंधी अनुभव असा आहे की १० पैकी ८ रुग्णांना ताबडतोब गुण वाटू लागतो व त्यांपैकी ३ लौकरच पूर्ण बरे होतात. उरलेले ५ हि हळूहळू बरे होतात, व दोघांस मात्र काहीच गुण येत नाही यात एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. येथे येणारे बहुतेक रुग्ण—डॉक्टर मंडळींनी रोग असाध्य ठरविल्यानंतर इकडे येतात. त्यात पुन्हा अगदी म्हातारे जास्त. मृत्यूशिवाय पर्याय नाही अशांचाही भरणा असतो. या गोष्टी ध्यानात घेतल्या म्हणजे व्याधिमुक्त होणाऱ्यांची सरासरी आश्चर्यकारक आहे असे म्हटल्याखेरीज राहवत नाही. त्यांना रोजच्या रोज शेकडो पत्रे येतात. त्यातील काहीमधील उल्लेखः २१–१–६१ : माझ्या मुलीस Malignant Brain Tumor झाले होते. डॉक्टरांच्या मताने अशा १० लाखांतील एखादीच केस दुरुस्त होते. तुम्ही तिला Distant Healing ने दुरुस्त केले याबद्दल आभार. २६–१–६१ : एक स्त्री कळवते. तुमच्या उपायाने माझ्या छातीतील गळू दुरुस्त झाले. असे होऊ शकेल याची मला स्वप्नातही कल्पना नव्हती.

२८–१–६१ : एक गृहस्थ कळवितात की माझे डॉक्टर आता माझ्या शरीरात कॅन्सरचा लवलेशही नाही हे पाहून आश्चर्यचकित झाले आहेत.

८–२–६१ : एक रुग्ण लिहितो अनेक वर्षे माझ्यात घर करून राहिलेला आजार दमा व संधिवात यातून आपण मला मुक्त केले आहे. मी आता पूर्ण आरोग्यसंपन्न आहे. याप्रमाणे हजारोंची पत्रे त्यांच्या संग्रही आहेत. व संग्रही पडत आहेत. सर्व देशांतून सर्व प्रकारच्या रुग्णांची पत्रे दररोज येत असतात.

(६) लंडनमधील हॉस्पिटलमध्ये एक मनुष्य Galloping Consumption क्षयाने आजारी होता. त्यात प्लुरसी झालेली असून रक्तस्राव व १०३° डिग्री ताप होता. त्याने जगण्याची आशा सोडली होती. एडवर्ड यांना ही हकीकत सांगून विनंती करण्यात आली. तत्क्षणी त्यांच्या डोळ्यासमोर एक चित्र उभे राहिले व त्यांना रुग्ण कोणत्या वॉर्डमध्ये कोणत्या कॉटवर आहे ते दिसलें व मागाहून तपास करता ते बरोबर होते असे ठरले. त्या रात्री त्यांनी आपली आरोग्य संवेदना त्या रुग्णाकडे प्रेषित केली. दुसऱ्या दिवशी त्याचा रक्तस्राव थांबला होता. प्लुरसीचे दुःख थांबले होते व टेंपरेचर नॉर्मल झाले होते. श्वासोच्छवास मोकळा होऊ लागला होता. तीनच आठवड्यात तो दुरुस्त होऊन त्यास पुढील सुधारणेकरता Convalesce हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले.

७. अशीच दुसरी एक स्त्री क्षयाने मरणासन्न स्थितीत असता तिच्या बहिणीने

विनंती केल्यावरून एडवर्डस तिच्या घरी गेले. तिला पाहून त्यांना वाटले की ही बरी होऊ शकेल व त्यांना काय संवेदना आली कोण जाणे ! त्यांनी सांगितले की तीन दिवसांनी रविवारी उठून बसू शकेल. दुसऱ्या दिवशी तिचे टेंप्रेचर १०३° वरून १००° वर आले पुष्कळ हुषारी वाटू लागली व दिवसें–दिवस ती सुधारू लागली. तिचे एक फुफ्फुस बंद Collapse केले होते. व तिला दर १५ दिवसांनी हवा भरण्याकरता जावे लागत होते. काही कारणाने एकदा जाणे शक्य झाले नाही. तेव्हा आढळून आले की तिचे फुफ्फुस पूर्ववत झाले असून हवा भरून घेण्याची गरज राहिली नाही. ही हकीगत ऑगस्ट महिन्यातील होती. त्यानंतर ती नववर्षाच्या सुरुवातीला पुन्हा तपासून घेण्याकरता हॉस्पिटलमध्ये गेली असता तिला काही आजार शिल्लक राहिला नाही, असे सार्टीफिकेट देण्यात आले व काही महिन्यानंतर तिला त्याच हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून घेण्यात आली. ऑलिव्ह बर्टन म्हणून एक Spiritual Healer आहेत. त्यांना फक्त इंद्रियासंबंधी enses आजाराच्या बाबत सिद्धी आहे. म्हणजे ऐकणे,दृष्टिदोष, मानसिक वगैरे विशेषतः डोळ्यांचे आजार त्यांनी पुष्कळ व अशक्य कोटीतील असलेले दुरुस्त केलेले आहेत.

हल्ली इंग्लंड अमेरिकेत असे हीलिंग सेंटर्स असून सामुदायिक रीतीने प्रार्थना १००–२०० मंडळींनी एकत्र येऊन त्यांच्यातील हिलींग फोर्स सामुदायिक रीतीने समोर जमलेल्या जमावाकडे प्रक्षेपित करावयाचा. त्याबाबत असा अनुभव आहे की जमावातील काही व्यक्तींना तत्क्षणीच बरे वाटू लागले व ते कायमचे व्याधीमुक्त झाले. मग त्या व्याधी कितीही असाध्य असोत. उलट त्याच जमावातील काही व्यक्तींचे आजार अगदी सामान्य स्वरूपाचे असतात. असे असूनही त्यांना काहीच गुण येत नाही. असे का होते याचे कारण मात्र अद्याप कोणी सांगू शकत नाही. काही ठिकाणी याप्रमाणे हीलींग फोर्स प्रक्षेपित करतात तर काही ठिकाणी सामुदायिक प्रार्थना करून त्यात समोरील जमावास सामील करून घेऊन मोठ्याने प्रार्थना म्हणून जमावातील व्याधीग्रस्तांची व्याधिनिवारण करून त्यांना आरोग्य प्राप्त व्हावे अशी इच्छा प्रगट करतात. त्याचा परिणाम सुद्धा पुष्कळ अंशी वरीलप्रमाणेच होतो असा अनुभव आहे.

मी आता व्याधिनिवृत्तीचा जो प्रकार सांगणार आहे तो सामान्य वाचकासच काय परंतु विद्वान व शास्त्रीय दृष्टीने विचार करणाऱ्यास सुद्धा अत्यंत अशक्य व असंभवनीय अशा कोटीतील वाटेल. परंतु मी आपणास असे आश्वासन देतो की त्यातील अक्षरन् अक्षर खरे आहे. त्या हकीगती घडलेल्या आहेत व तसल्याच त्यापेक्षाही चमत्कारिक हकीगती आजही घडत आहेत. त्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल. कल्पना बसणार नाही पण प्रचलित कोणत्याही वैद्यक पद्धतीत अशक्य मानल्या गेलेल्या व्याधींनी मरणासन्न रुग्ण यांना आपला फायदा करून घेता येईल. तरी वाचकांनी त्याकडे उपहासाने किंवा उपेक्षेने न पाहाता, यातील प्रत्येक शब्द खरा आहे

हे गृहीत धरून ज्यांना अशा मदतीची गरज असेल त्यांना ती मिळवून देता येईल व स्वतःचाही फायदा करून घेता येईल. आपणापैकी सुशिक्षित समजल्यां जाणाऱ्या कोणाही व्यक्तीस जर सांगितले की भुते आहेत व ती मानवी कल्याणाची कामे करू शकतात, तर त्यापैकी ९९ टक्के हसून म्हणतील की तुम्ही इतके शिकलेले असून असल्या भाकड-कथांवर विश्वास ठेवता ! कमाल आहे. अहो, कसली आली आहेत भुते वगैरे. आपल्या मनाची निव्वळ कल्पना ? तुकाराम महाराज सुद्धा म्हणतात की, ‘ वाजे पाऊल आपुले, म्हणे मागे कोण आले ’ मात्र असे म्हणणाऱ्या गृहस्थास जर सांगितले की एक पछाडलेला वाडा आहे. तेथे रात्री एकटे जाऊन राहा. तर मात्र ते कोणती तरी सबब सांगून जाण्याचे टाळतील व जाणार नाहीत.

या संदर्भात भूत हा शब्द वापरणे योग्य होणार नाही. कारण भूत म्हणजे काहीतरी भयंकर वाईट अशी समजूत आपणाकडे रूढ आहे म्हणून त्यात आपण स्पिरिट म्हणूनच संबोधलेले बरे.

इंग्लंडमधील बर्नार्ड हटन या नावाच्या गृहस्थाची हकीगत आहे. १९५८ साली त्याच्या दोन्ही डोळ्यांत काही विकृती उत्पन्न झाली व त्यामुळे त्यांची दृष्टी दिवसेंदिवस मंद होत चालली होती. त्यांनी डॉ. हडसन नावाच्या प्रख्यात नेत्रतज्ञांकडून इलाज करवून घेतले होते. १९६३ च्या अखेरीस अशीच एकदा तपासणी करून घेतली असता डॉ. हडसन म्हणाले की तुमच्या डोळ्यास Non paralitc Poliomylits झालेला असून त्यावर प्रचलित औषधापैकी कशाचाही उपयोग नाही. सर्व औषधे देऊन झाली परंतु कशाचाही उपयोग न होता दृष्टी कमीच होत गेली होती. आता थोड्या अंतरावरील माणूससुद्धा ओळखू येईनासे झाले होते व कधी कधी एकाच्या ऐवजी दोन वस्तु दिसत. अशा एका दिवशी त्यांची पत्नी पर्ल हिने त्याच्या Phychic मधील एका शीर्षकाकडे लक्ष वेधले. व इंग्लंडमधीलच श्री. जॉर्ज चॅपमन यांना भेटण्याचा सल्ला दिला. त्यात चॅपमन यांना माध्यम करून डॉ. लॅग हे एक १९३७ साली वारलेले डॉक्टर रुग्णांवर उपचार करीत असत असा उल्लेख होता.

असल्या गोष्टीवर विश्वास ठेवणे अशक्य वाटल्याने ह्याने त्यांकडे जाण्याचा इन्कार केला. परंतु एक शेवटचा इलाज म्हणून प्रयत्न करून पाहण्यास काय हरकत आहे असे त्यांच्या पत्नीचे मत पडल्यावरून तारीख ६ जानेवारी १९६४ रोजी दुपारी २ च्या सुमारास ते चॅपमनकडे पोचले. त्यांनी बेल वाजविली व विचार केला, येथील हकीगत जर सर्व बोगस निघाली तर रविवारच्या एखाद्या प्रातः साप्ताहिकास चांगले खाद्य मिळेल. श्री. हटन यांना वेटिंग रूममध्ये सांगण्यात आले की, डॉ. लॅग तुम्हांस लवकरच भेटतील.

त्यास वाटले की १९३७ साली वारलेले डॉ. लॅग १९६४ साली कसे भेटणार ? त्यांना त्याच जाड चष्म्याच्या भिंगांतून एक मध्यमवयातील पांढऱ्या

कपड्यातील व्यक्ति येताना दिसली व त्यांनी विचारले की तरुणा तुला काय त्रास आहे ? त्याने फोटोत पाहिलेल्या चॅपमनपेक्षा हा गृहस्थ वराच वयस्कर दिसत होता व आवाजही वृद्ध माणसाच्या सारखाच वाटला. (ज्या ज्या वेळी श्री चॅपमन यांच्या मध्ये डॉ. लॅग यांचा आविष्कार होत असे. त्या त्या वेळी चॅपमन हे ते असल्यापेक्षा जास्त वृद्ध दिसू लागत व त्यांच्या आवाजातही त्याचप्रमाणे बदल होत असे. डॉ. लॅग हे १९३७ सालीच वारलेले होते व त्यांच्या बोलणे ऑपरेशन्स आदी सर्व क्रिया ते श्री. चॅपमन यांच्या शरीरामार्फतच करीत असत व अशा वेळी त्यांचे डोळे हमेशा मिटलेले असत व मिटलेल्या डोळ्यांनीच ते सर्व क्रिया करीत असत. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी डॉ. लॅग असा उल्लेख येईल त्या त्या वेळी तेथे श्री. चॅपमन यांचे शरीर असे समजावे कारण डॉ. लॅग यांना शरीरच नव्हते ते स्पिरीट असून सदैव चॅपमन यांच्या शरीरामार्फत काम करीत असत व आहेत.)

लॅग म्हणाले की तुझ्या डोळ्यास त्रास आहे काय ? होय. असे उत्तर येताच त्यांनी हटन यांचा चष्मा काढून हातांनी डोळे चाचपले व सांगितले तुमची दृष्टी उणे अठरा आहे. अगदी लहानपणी तुमचे डोळे तिरळे होते त्यावर ऑपरेशन केले होते. वास्तविक ही गोष्ट त्यांच्या पत्नीसही माहीत नव्हती. कारण ऑपरेशन ६ व्या वर्षी झाले असून तो डॉक्टर पण मरून बरीच वर्षे झाली होती व त्यासंबंधी विचार सुद्धा त्यांच्या मनात नव्हता. डॉ. लॅग हातांनी डोळ्यांची पाहणी करीत होते व सारखे वैद्यकीय भाषेत की जी नेत्रतज्ञासच समजू शकेल अशा भाषेत वर्णन करीत होते त्यांनी सांगितले की तुम्हास हल्ली एका ऐवजी दोन वस्तू दिसू लागल्या आहेत व ते खरे होते.

डॉ. लॅग म्हणाले की, तुमची जरा इतर तपासणी करू या. त्यावर हटन यास वाटले की आता कपडे वगैरे काढावे लागणार परंतु तसे काही झाले नाही. शरीरास त्यांनी हलकेच स्पर्श केला व एक दोन मिनिटे तसाच राहू दिला. डॉ. लॅग मिटलेल्या डोळ्यांनीच तपासणी करीत होते. त्यांनी सांगितले की डॉक्टरांनी निदान Non Paralitic Poliomylits असे केले आहे ते बरोबर नाही. त्यापेक्षा तुझी स्थिती अधिक वाईट आहे. आजाराचे मूळ तुझ्या लिव्हरपर्यंत पोचले होते. Hepalitis virus हे तुझे लिव्हर खराब करीत आहे.

जी गोष्ट त्यांचे डॅक्टर किंवा पत्नी यांखेरीज कोणासही माहीत नव्हते. ते त्यांनी मिटलेल्या डोळ्यांनी तपासून बरोबर सांगितले होते. त्याचे त्यांना कल्पनेबाहेर आश्चर्य वाटले. डॉ. लॅग म्हणाले की, तुला मदत करावयाची म्हणजे तुझ्या डोळ्यावर ऑपरेशन केले पाहिजे. ते म्हणाले की तुला माहीत आहे की प्रत्येकास दोन शरीरे असतात. एक आपले चालू शरीर व दुसरे त्याभोवती असलेली Spirit Body. त्यापैकी मी तुझ्या स्पिरिट बॉडीवर ऑपरेशन करणार आहे व त्याचा परिणाम तुझ्या शरीरातील व्याधीवर होईल. मी बोलत असेन, नावाने हाका मारीत असेन, निरनिराळी उपकरणे मागत असेन त्यामुळे घाबरू नकोस. माझ्या मदतीस माझा मुलगा व

CamScanner

इतर आहेत. तुला काही इजा होणार नाही. तू फक्त कोचावर पडून रहा. कपडे सुद्धा काढण्याची गरज पडली नाही. डॉ. लॅंग कोचाजवळ आले व त्यांची बोटे हटन यांच्या डोळ्याभोवती फिरू लागली. त्यांच्या हातांची व बोटांची हालचाल अशी होऊं लागली की ते जणू काही हातांनी शस्त्रक्रियेची शस्त्रे व उपकरणे हाताळीत आहेत व ठेवीत आहेत. हे सर्व पाहून श्री हटन यांना गंमत वाटली व त्यांना मोठ्याने हसण्याची अनावर इच्छा उत्पन्न झाली. परंतु प्रयत्नाने ती दाबून ते काय बोलतात इकडे लक्ष देऊ लागले. डॉ. लॅंग म्हणाले की, तुमची स्पिरिट बॉडी बाजूस घेतली असून तीवर मी ऑपरेशन करीत आहे. डोळ्याच्या एका भागातून एक प्रकारचा द्रव काढीत आहे व त्यांनी डोळ्यांच्या आतील भागातील कोणत्या भागासंबंधी कोणते व कसे ऑपरेशन केले जात आहे त्याचे समग्र वर्णन डॉक्टरी भाषेत केले डॉ. लॅंग म्हणाले की, तुमच्या डोळ्यांचे [Eye ball) चे ऑपरेशन संपले आहे.

त्याच वेळी हटन यांना सुद्धा डोळ्याच्या आतील भागात काही कापले जात आहे अशी संवेदना झाली. परंतु त्यांना कसलेही दुःख व इजा होत नव्हती. डॉ. लॅंग यांनी डोळे उघडले नव्हते व शरीरास हात पण लावला नव्हता, तरीसुद्धा श्री. हटन यांना जखम शिवली जात असल्यास रख्या संवेदना होत होत्या. आता हसण्याची जागा आश्चर्य घेऊ लागले होते. डोळ्याचे ऑपरेशन संपल्यावर डॉ. लॅंग त्यांच्या सहाय्यकांना सांगत होते की, जर आपण Hepalitis Virus कडे लक्ष दिले नाही तर केलेल्या ऑपरेशनचा काही सुद्धा फायदा होणार नाही. नंतर ते हटन यांना म्हणाले की मी तुमच्या स्पिरिट बॉडीवर ऑपरेशन करून Virus घालविण्याचा प्रयत्न करतो. पुन्हा डॉ. लॅंग यांनी पूर्वीप्रमाणे हाताची हालचाल केली. उपकरणे घेऊन टाकीत असल्याचे बोलू लागले व हटन यांना पण ऑपरेशनसारखे काही होत आहे याची जाणीव होऊ लागली. नंतर त्यांना सरळ बसण्यास सांगण्यात आले व त्यांना धक्काच बसला. कारण त्यांना काहीच दिसत नव्हते. किंचितसा उजेड दिसत होता इतकेच. त्यांना लागलीच आठवले की डॉ. हडसन यांनी त्यांना १९५८ साली सांगितले होते की, असे एखादे ऑपरेशन करावे लागेल. ते फार गुंतागुंतीचे असेल व त्याच ऑपरेशनमधून ऑपरेशनस् करावी लागतील आणि त्यात थोडी चूक झाली तर कायमचे अंधत्व येण्याचा संभव होता व त्यांना वाटले की, असेच काही झाले असून दृष्टी कायमची गेली आहे. डॉ. हडसन यांनी त्याप्रमाणे धोक्याची सूचना पण देऊन ठेविली होती.

ते सर्व आठवून हटन ओरडले की, माझी दृष्टी गेली आहे व लवकर काहीतरी करा. डॉ. लॅंग म्हणाले की मित्रा काळजी करू नकोस. तुला लवकरच दिसू लागेल. अगदी पूर्ण नाही तरी तुझ्या दृष्टीत तुला पुष्कळ सुधारणा झालेली आढळेल. मी तू झोपलेला असताना तुझ्याकडे येत जाईन, कारण झोपेत स्पिरिट बॉडी वेगळी करणे सोपे असते. माझ्याकडून शक्य आहे ते मी तुझ्याकरता जरूर करीन. तू मला

तीन महिन्यांच्या आत पुन्हा भेट मी ते कबूल केले. मला दिसत नव्हते. म्हणून हात धरून मोटारीत नेऊन बसविण्यात आले. मला त्या वेळी मोटार पण दिसू शकत नव्हती, या मूर्खांचे ऐकून उगीच डोळे गमावून बसलो, असे मला वाटले. परंतु थोड्याच वेळात दृष्टी निवळत आहे असे दिसू लागले. झाडे–झुडपे, इमारती धुरकट दिसू लागल्या. हळूहळू त्या जास्त जास्त स्पष्ट दिसू लागल्या, थोड्याच वेळात मोटारीच्या काचेवर धूळ बसली आहे तेही दिसू लागले. रंग, माणसे दूरच्या वस्तु या ओळखता येऊ लागल्या. माझी पत्नी व मुले येत होती, त्यांना लांबूनच ओळखले व त्या सर्वांचे डोळे आनंदाने भरून आले. सर्वांनी माझे अभिनंदन केले. त्या रात्री कपडे काढून पाहिले तर माझ्या शरीरावर चाकूने कापून शिंवल्यासारखा पाच इंच लांबीचा, रेघ मारल्यासारखा, गुलाबी रंगाचा व शिवल्यासारखा व्रण दिसत होता. मात्र हातास सर्व जागा गुळगुळीत व सपाटच लागत होती. ता. २२ ला मी पुन्हा गेलो. डॉ. लॅंग यांनी तपासून सांगितले. ऑपरेशन यशस्वी झाले आहे. परंतु ते सांगण्याची जरूरीच नव्हती.

याच श्री. हटन यांनी उत्सुकतेने व कृतज्ञतेच्या भावनेने त्यांच्या संबंधी बरीच माहिती गोळा केली. त्यापैकी काही मी खाली देत आहे.

हे काय व कसे आहे हे समजण्याकरता वाचकांनी कृपा करून " मृत्यू म्हणजे काय व नंतर " या प्रकरणातील Spirit व Spirit Body हा भाग पुन्हा काळजीपूर्वक वाचावा म्हणजे त्याची येथे पुनरावृत्ती करावयास नको व वाचकांना पण समजावयास अडचण पडणार नाही.

डॉ. वुइल्यम लॅंग् यांचा जन्म डिसेंबर १८५२ मध्ये झाला. त्यांच्या विद्यार्थीदशेत ते एक अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून नावाजले होते. त्यांनी वैद्यकीचा अभ्यास पूर्ण करून A. R. C. S. ही उच्च पदवी प्राप्त केली होती. पुढे सन १८८० मध्ये त्यांची लंडन येथील हॉस्पिटलमध्ये नेत्रविशारद म्हणून नेमणूक झाली. ते नेत्रविशारद म्हणून जरी काम करीत होते तरी इतर शाखांतही त्यांची प्रगती व ज्ञान चांगले होते. ते अत्यंत आस्थापूर्वक कळकळीने आपले कर्तव्य पार पाडीत, रुग्णसेवा करीत असत. त्यांच्या हातास गुणही चांगला होता. त्यांच्या परोपकारी व काळजीपूर्वक काम करण्याच्या वृत्तीने त्यांचा नावलौकिकही चांगला होता. यांनी नेत्रचिकित्सेवर काही पुस्तके पण लिहिली होती. त्यांचा मुलगा बेसिल हा पण वैद्यकीय व्यवसायात पारंगत होऊन डॉ. लॅंग् यांना त्यांच्या शस्त्रक्रियेच्या बाबतीत सर्वप्रकारे मदत करीत असे, इतकेच नाही तर स्वतंत्रपणेसुद्धा अनेक शस्त्रक्रिया यशस्वी रीतीने पार पाडीत असे. अशा रीतीने सर्व सुरळीत चालले असता डॉ. लॅंग् यांच्यावर एक मोठा दुःखाचा प्रसंग आला व त्याने ते एकदम खचले. त्यांचा कर्तबगार मुलगा बेसिल याला न्युमोनिया होऊन त्या वेळेच्या चांगल्यातील चांगला उपचारांचा काही एक उपयोग न होता तो दिवंगत झाला. त्यामुळे ते दिवसेंदिवस खंगत चालले.

CamScanner

त्यांचे वय अगोदरच ऐशींच्या आसपास होते, तरी पण उरलेले आयुष्य कर्तव्यपालनात घालवून ते १३ जुलै १९३७ साली इहलोक सोडून गेले. मृत्युघटिका जवळ आली तसे त्यांना काही अनुभव येऊ लागले.

प्रथम म्हणजे त्यांना अपरिमित समाधान व तृप्तीची भावना उत्पन्न झाली. शरीराच भान नाहीसे झाले व त्यांना त्यांच्या दोन मृत पत्नी, मुलगा बेसिल व त्यांच्या पूर्वी मरण पावलेली त्यांची काही आप्त, स्नेही वगैरे मंडळी कोंडाळे करून उभे आहेत असे दिसले. लॅग यांना प्रथम वाटले की त्यांना स्वप्न पडत आहे; म्हणून त्यांनी स्वतःस विचारले की हे आहे तरी काय? परंतु लवकरच त्यांना स्वतःचा प्राणरहित देह बिछान्यावर पडलेला दिसला. आणि त्यांच्याभोवती डॉक्टर मंडळी चर्चा करीत असलेली दिसली. त्यावरून त्यांना सत्य परिस्थितीची कल्पना आली. त्यानंतर त्यांना मूर्च्छा आल्यासारखे वाटले. ती स्थिती किती वेळ टिकली त्याची त्यांना कल्पना नव्हती, त्या काळात स्पिरिट डॉक्टरांनी त्यांची चांगली काळजी घेतलेली होती. आणि त्यांच्या मनावरचे दडपण कमी केले होते. त्यानंतर पुन्हा एकदा सर्व चित्र बदलले.

दोन्ही पत्नी व मुलगा यांनी त्यांचे हार्दिक स्वागत केले. त्यांत त्यांचे जुने दिवंगत मित्रही सामील होते. ते मृत्यू पावले असून स्पिरिट जगात वावरत आहेत याबद्दल त्यांना कसलीही शंका नव्हती. त्या सर्वांच्या पुनर्मीलनाने त्यांना फार आनंद झाला होता व ते अतिशय सुखी होते. मुलगा व पत्नी यांनी त्यांना नवीन जगातून फेरफटका करवून आणले होते. त्या सर्वांशी पूर्ववत हसत खेळत गोष्टी करण्यात त्यांना अतीव सुख वाटत होते. या जगातून दुसऱ्या जगात पाऊल टाकताना त्यांना कसलेही दुःख अगर असमाधान वाटले नव्हते. उलट सर्वांच्या भेटीगाठी होऊन काही नवीन पाहावयास मिळत आहे याचा त्यांना आनंद होत होता. खरे म्हणजे काही विशेष घडले आहे अगर घडत आहे असे त्यांना वाटेच ना. एका खोलीतून दुसऱ्या खोलीत अथवा एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जावे यापेक्षा त्यांना जास्त काही फरक वाटत नव्हता.

त्यांचा पृथ्वीवरील सर्व जन्म रुग्णसेवा करण्यात गेला होता, त्यामुळे येथे सुद्धा काही न करता उगीच वेळ घालविण्यापेक्षा काही तरी प्रत्यक्ष करावे असे त्यांना वाटू लागले व ते त्यांनी आपल्या सहकाऱ्यांजवळ प्रगट केले. त्यांनी सर्व आयुष्य वैद्यकीय व्यवसायात घालविले होते, त्यामुळे त्याशिवाय इतर कोणत्याही क्षेत्रांची त्यांना फारशी माहिती नव्हती, म्हणून त्याच क्षेत्रात काही तरी करता आले तर बरे अशी त्यांनी त्यांच्या इतर स्पिरिट मित्रांजवळ इच्छा व्यक्त केली. त्यावर त्यांनी त्यास स्पिरिट जगातील हॉस्पिटल व तेथील काम करण्याची पद्धती दाखविली. त्यात मृत्यूसमयी जो आजार असतो त्यावर त्याच्या स्पिरिट बॉडीवर इलाज करण्यात येतात. ते तंत्र थोडे निराळे असते. ते त्यांना तेथे शिकावे लागले. त्यांचा

एक दिवंगत डॉक्टर मित्र जो त्यांच्यापूर्वी एक वर्ष वारला होता त्याचे नाव Bland Sutton—ब्लॅंड सटन—यांनी त्यास ते सर्व तंत्र शिकविले.

त्यांनी तेथे स्पिरिट शस्त्रक्रियेचा अभ्यास केला व तेथे शस्त्रडॉक्टर स्नेहयांच्या समवेत पुष्कळ यशस्वी शस्त्रक्रिया केल्या. अनुभवाने त्यांना लवकरच असे आढळून आले की त्या ठिकाणी डॉक्टर किंवा त्यांच्या शस्त्रक्रिया यांना फारसा वाव व आवश्यकता पण नाही. जी काही खरी गरज आहे ती पृथ्वीवरील मृत्युलोकातच. त्यांनाच अजूनही आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा घेता यावा अशी त्यांनी इच्छा व्यक्त केली त्यावर त्यांना असे सांगण्यात आले की तुमच्या पूर्वीसुद्धा येथे पुष्कळ डॉक्टर आले असून त्यांचीही पण अशीच इच्छा आहे. परंतु योग्य माध्यमाच्या अभावी त्यांना काही करणे शक्य होत नाही. योग्य माध्यम मिळणे व या कामास सर्वस्वी वाहून घेणे ही फार महत्त्वाची व आवश्यक गोष्ट आहे व तसे जमून येणे फार कटीण असते. त्यावर डॉक्टर लॅंग् म्हणाले की, प्रयत्न करून पाहू या. योग्य प्रकारचा मध्यस्थ मिळाला की त्यास काही शिक्षण पण द्यावे लागते मध्यस्थ योग्य असण्याची गरज का असते ? याचे कारण असे की एकदा मध्यस्थ पसंत करून त्याच्यामार्फत कार्यास सुरवात केली की स्पिरिट डॉक्टरला त्याच्याबरोबर सतत राहावे लागते व त्या मध्यस्थाच्या शरीराच्या मृत्यूबरोबरच स्पिरिट डॉक्टरचे पण कार्य संपते; तोपर्यंत नाही. त्यानंतरच त्यास स्पिरिट जमावात परत जाता येते. असे असले तरी, डॉ. लॅंग् यांनी पृथ्वीवरील जीवनात आपले कार्यक्षेत्र पुन्हा स्थापन करण्याचे व तेथील रुग्णांस आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ विनामूल्य देण्याचे ठरविले व योग्य मध्यस्थाच्या शोधास ते लागले. इच्छा असली की मार्ग सापडतो

जॉर्ज चॅपमन या नावाचे १९२१ साली साधारण कुटुंबात जन्मलेले गृहस्थ फायर ब्रिग्रेडमध्ये काम करीत होते. ते स्वतः Sensitive (ग्रहणक्षम) असे होते व त्यांना अध्यात्म व गूढ विद्या यांचा फार नाद होता. त्यासंबंधी व्यवसाय सांभाळून ते प्रयोग पण करीत. त्यांना इच्छेनुसार आत्मप्रक्षेपण Astral Projection पण करता येत होते. त्यामुळे त्यांची या मार्गात पुष्कळ प्रगती झाली होती व त्यांस Trance समाधिसदृश अवस्थेत स्पिरिट जगतातील पुष्कळ अनुभव येत असत. ते स्वखर्चाने औषधीविरहित व्याधी निवारण्याचे कार्य पण करीत असत. एकदा Trance मध्ये असताना त्यांची डॉ. लॅंग् यांच्या स्पिरिटशी गाठ पडली व परस्पर विचारविनिमय होऊन (तो एक विस्तृत इतिहास आहे, तो या ठिकाणी अप्रस्तुत आहे.) डॉ. लॅंग् यांच्या स्पिरिटने स्पिरिट डॉक्टर म्हणून श्री. जॉर्ज चॅपमन यांच्या शरीरामार्फत रुग्णांच्या व्याधी निवारण्याचे कार्य करावे असे ठरले.

ही घटना १९५१ साली घडली व तेव्हापासून आजतागायत (१९७०) त्यांची ही सेवा सुरू आहे. १९५१ पासून आतापर्यंत त्यांनी अनेक असाध्य समजल्या जाणाऱ्या, डॉक्टरनी असाध्य ठरविलेल्या, यापुढे काही करता येणे शक्य

होणार नाही म्हणून हॉस्पिटलमधून डिस्चार्ज केलेल्या शेकडो केसेस त्यांनी दुरुस्त केल्या असून अजूनही करीत आहेत. मी हे मुद्दाम देत आहे, का की जनता व गरजूंनी या अनोख्या परंतु हटकून गुणकारी अशा योजनेचा फायदा घ्यावा. आपणास पुष्कळ तळमळीने काम करणारे त्यागी देशभक्त, ईश्वरभक्त, समाजसेवक असे माहीत आहेत की ज्यांनी तळमळीने व अत्यंत त्यागपूर्वक मरेपर्यंत जनताजनार्दनाची सेवा केली व ती करण्यात कसलीही अपेक्षा ठेवलेली नव्हती. परंतु ज्यांनी मरेपर्यंत तर अशी सेवा केलीच; परंतु मृत्यूनंतरही तितक्याच तळमळीने व त्यागपूर्वक आज १९३७ ते १९७० म्हणजे ३३ वर्षे असे कार्य करीत राहण्याचे हे एकमेव उदाहरण निदान माझ्या तरी पाहण्यात दुसरे नाही.

जॉर्ज चॅपमन मध्यस्थ म्हणून काम करू लागले. परंतु त्यांना आपले कंट्रोल डॉ. लॅग हे कसे दिसत असतील याबद्दल काहीच कल्पना नव्हती. त्यांना प्रत्यक्ष पाहिलेल्या व्यक्तींनी केलेल्या वर्णनाखेरीज काहीच कल्पना येईना व त्याने समाधान होण्यासारखे नव्हते. त्यांना कळले की, श्री. मॅक्डोनाल्ड नावाच्या एका गृहस्थाचा दावा असा आहे की ते स्पिरिट फोटोग्राफी तर करू शकत असतच, परंतु ते कोणत्याही मृत व्यक्तीचा फोटो ते ज्या व्यक्तीला फोटो हवा असेल केवळ त्याची सही (मृत व्यक्तीची नव्हे) पाहून ते काढून देत असत. श्री. चॅपमन यांनी एका कोऱ्या कागदावर “ माझ्या स्पिरिट कंट्रोलचा फोटो मला हवा आहे. ” एवढाच मजकूर लिहून त्याखाली आपली सही केली व तो कागद श्री. मॅक्डोनाल्ड यांच्याकडे पाठवून दिला. काही दिवसांनंतर त्यांना एक पार्सल आले व त्यात एका वृद्ध गृहस्थाचा फोटो होता व त्यासोबत मॅक्डोनाल्ड यांचे पत्र. त्यात “ फोटोतील गृहस्थांचे नाव लॅग असून ते डॉक्टर होते. ” असा मजकूर होता. श्री. चॅपमन यांची मॅक्डोनाल्ड यांच्याशी कधीही भेट झालेली नव्हती व त्यांनी त्यांना वर लिहिल्याप्रमाणे जास्त असा मजकूर पण कधीही लिहिलेला नव्हता. त्यांच्याशी बरीच वर्षे प्रत्यक्ष परिचय असलेल्या स्त्रीस फोटो दाखविला. त्यावर ती म्हणाली, अरे हे तर डॉ. लॅग, तुम्हास माहीत नाही ? चॅपमन म्हणाले की, तुमची काही चूक तर होत नाही ? त्यावर त्या म्हणाल्या की, माझा इतकी वर्ष परिचय असताना मी कशी चुकेन ? त्यानंतर चॅपमन यांनी पुष्कळ परिश्रम करून एका वैद्यकीय जुन्या नियतकालिकातून त्यांचा फोटो मिळविला. तो तंतोतंत तोच होतो.

१. ता. ३–९–१९५४ रोजी चॅपमन समवेत लॅग् हे मिसेस होम्स यांच्या घरी गेले होते. त्यावेळी त्यांचे पती घरी नव्हते; म्हणून त्यांना थोडा वेळ थांबण्यास सांगण्यात आले. थोड्या वेळाने मि. होम्स आले, त्यावेळी त्यांच्या पत्नीने चॅपमन व लॅग यांची ओळख करून देऊन यांच्या कार्याची माहिती सांगितली. श्री. होम्स अशा विषयांवर विश्वास ठेवणाऱ्यापैकी नव्हते म्हणून त्यांनी स्पष्ट इन्कार केला परंतु पत्नीच्या अत्याग्रहास्तव ते डॉ. लॅग यांच्याकडून स्पिरिट ऑपरेशन करून घेण्यास तयार झाले.

श्री. होम्स यांचे X Ray परीक्षेत Slipped Disk आढळून आले होते व त्यावर तीन वेळा इलाज करूनही पुनरावृत्ती होत गेल्याने आता त्यावर पोलादी जाकीट बसविले होते व असे जाकीट सतत अंगावर ठेवून कारखान्यात काम करणे किती कष्टाचे व जिकिरीचे असेल त्याची कल्पनाच केलेली बरी. नंतर चॅपमन खोलीत जाऊन Trance मध्ये गेले व त्यांचा ताबा डॉ. लॅग यांच्या स्पिरिटने घेतला. त्यांनी त्यांच्या शरीरास स्पर्श केला व बोलले की बरे झाले तुमच्या पत्नीस बुद्धी झाली. मी तुम्हास निश्चित बरा करीन व तुमची Slipped Disk योग्य रीतीने बसवून पुन्हा कधीही त्रास होणार नाही असे करीन. पुन्हा जाकीट वगैरे कधीच वापरावे लागणार नाही असे करीन. होम्स यांना आश्चर्य वाटले की श्री. लॅग यांनी काही एक न विचारता अगर तपासता अगदी बरोबर निदान केले होते. नंतर डॉ. लॅग यांनी नेहमीप्रमाणे होम्स यांची स्पिरिट बॉडी बाजूला घेऊन ऑपरेशन करू लागले. शरीरापासून दोन ते चार इंच अंतरावर ते वारंवार आपल्या हाताच्या बोटांची हालचाल निरनिराळ्या प्रकारांनी करू लागले व त्यांचा मुलगा बेसिल व इतर साहाय्यकांना काही सांगू लागले. हे चालू असता श्री. होम्स यांना एकाएकी दुःखाची एक सणक आली. हे सर्व चालू असता डॉ. लॅग (चॅपमन) यांचे डोळे सतत मिटलेले असून त्यांनी होम्स यांच्या शरीरास चुकूनही स्पर्श केलेला नव्हता. दुःखाचा झटका बसला त्यावेळीसुद्धा त्यांची बोटे दोन ते तीन इंच अंतरावर होती. ऑपरेशन संपले. परंतु होम्स यांना ते अयशस्वी झाले असे वाटले. कारण त्यांना बरे वाटण्याऐवजी स्थिती जास्तच बिघडली आहे असे वाटू लागले. त्यांना वाटू लागले की या मूर्ख बायकोच्या नादी लागून उगीच या फंदात पडून नुकसान करून घेतले. असे मनात विचार येत आहेत तोच लॅग म्हणाले की मित्रा उठून जरा चालून पाहा. चमत्कार घडून आला होता. ते आपले पाय दुःख न होता सहज खाली ओढू शकले होते, ताठ उभे राहू शकत होते. त्यांनी एक पाऊल टाकले व काही एक त्रास न होता व जाकीट न घालता त्यांना सरळ चालता येऊ लागले. ते खोलीबाहेर चालत जाऊन परत चालत आले. कसलेही दुःख अगर त्रास त्यांना झाला नाही. ते पूर्ण बरे झाले होते.

मिसेस होम्स यांना डॉक्टरांनी ऑपरेशनचा सल्ला दिला होता. परंतु त्यांना त्याची फार भीती वाटत होती. त्यांना डॉ. लॅग यांनी खोलीत बोलावून कोचावर बसविले व वरप्रमाणेच त्यांच्या स्पिरिट बॉडीवर ऑपरेशन केले. ऑपरेशन चालू असता शरीरास स्पर्श होतच नव्हता. ऑपरेशन संपल्यावर त्या हसत उठून बसल्या. त्या डॉ. लॅगकडे चालत आल्या व त्यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. त्या म्हणाल्या की सर्व दुःख नाहीसे झाले असून, मला फार बरे वाटत आहे. यापुढे ला ऑपरेशन करावे लागणार नाही. त्यानंतर त्यांना कधीच ऑपरेशन करावे लागले नाही व होम्स यांना पण जाकीट वापरावे लागले नाही.

२. १९५६ मध्ये डॉ. लॅग यांना श्रीमती जॉन स्मिथ यांच्याकडून त्यांनी

CamScanner

बार्मिंगहॅम येथे येऊन त्यांची प्रकृती पाहावी असे आमंत्रण आले. त्या संधिवाताने अंथरुणास खिळलेल्या असून सांध्यात सतत दुखत होते. सांधे जखडल्यामुळे त्या अंथरुणास खिळलेल्या होत्या. डॉक्टरी इलाज सर्व करून झाले होते व दुःखास उतार पडत नव्हता. डॉ. लॅग यांनी स्मिथ यांच्याकडे जाताच बरोबर निदान केले. त्यांना संधिवात झाला असून ऑपरेशन करावे लागेल म्हणून सांगितले. परंतु त्यापूर्वी त्यांनी बजावले की एका ऑपरेशनने भागणार नाही. पूर्ण गुण येण्यास अंतरा-अंतराने आणखी काही ऑपरेशने करावी लागतील. त्याप्रमाणे एकात एक अशी ऑपरेशन्स पहिल्याच खेपेस केली. ऑपरेशन नेहमीप्रमाणे स्पिरिट बॉडीवर होते. त्यामुळे दुःख वैगरे काही न होता पहिल्या खेपेतच पुष्कळ बरे वाटू लागले होते. ऑपरेशन संपवून ते बाहेर आले त्या वेळी त्या बाईंनी आणखी वीस रुग्ण बोलावून ठेवले होते. त्या सर्वांची परीक्षा व निदान करून त्यांपैकी ज्यांना आवश्यक वाटले त्यांवर त्यांनी ऑपरेशन्स केली व त्यातील पुष्कळांना त्या पहिल्या भेटीतच कायम गुण आला. त्यामुळे डॉ. लॅग यांची त्या भागात कीर्ती वाढली व लांबलाबचे रोगी येऊन त्यांची मदत घेऊ लागले.

श्रीमती स्मिथ यांची एक मैत्रीण श्रीमती कार्टर यांनी डॉ. लॅग यांना सार्वजनिक प्रयोग करण्यास सांगितला. तो तर फारच यशस्वी झाला व काही रुग्णांत आश्चर्यकारक गुण आला. त्यामुळे त्याना बर्मिंगहॅम येथे यावे लागू लागले व त्यांना फार त्रास होऊ लागल्यामुळे श्रीमती स्मिथ व कार्टर यांनी त्यांची तेथे कायम सोय केली. दर शनिवार व रविवार डॉ. लॅग यांनी तेथे येऊन सर्जरी करावी अशी व्यवस्था केली त्यास प्रतिसाद मिळाला. येणाऱ्या रुग्णाला आजाराचे बिनचूक निदान करून त्याच्यावर स्पिरिट उपचार अथवा ऑपरेशन करीत. पुष्कळांना त्याच वेळी आराम वाटू लागे. रुग्ण कायमचा गुण येऊन डॉ. लॅग यांचे आभार मानीत परत जात. पुढे दोन तीन ऑपरेशनमध्ये स्मिथबाईंना कायमचा गुण आला व त्यांनी बर्मिंगहॅम हीलिंग सेंटर अद्याप चालू ठेवले असून दर शनिवार, रविवारी तेथे इलाज केले जातात.

३. १९५६ च्या पावसाळ्यात श्रीमती फ्लेचर यांच्यावर स्पिरिट ऑपरेशन करण्यात आले. त्यांना १९४९ पासून मूत्रपिंडात (किडनी) खडा होण्याची तक्रार होती. व त्यामुळे त्यांना आतिशय त्रास होत असे व पुष्कळ वेळा त्रास कमी वाटावा म्हणून अफू पण घ्यावी लागावयाची. आजार बराच गुंतागुंतीचा होता व मुख्य म्हणजे खडा होण्याचे कारण शोधून ते नाहीसे करणे आवश्यक होते. व त्यामुळे संपूर्ण व्याधिनिवृत्ती होण्यास वेळ लागेल म्हणून तिला अगोदरच बजावले होते. नेहमीप्रमाणे डॉ. लॅग यांनी तिच्यावर स्पिरिट ऑपरेशन केले व पहिल्याच ऑपरेशनमध्ये तिच्या किडनीतील सर्व खडे नाहीसे होऊन तिला पूर्ण बरे वाटू लागले व पुन्हा तसा त्रास झाला नाही.

४. कु. नारो आसवर्न ही १९४३ साली आजारी पडली. त्यावेळी ती नर्सिंगचे ट्रेनिंग घेत होती. डॉक्टरांनी तिला सांगितले की तुला घशाचा विकार झालेला आहे; तरी पण ऑपरेशन मात्र करू नये असे मत त्यांनी व्यक्त केले. तिला खरोखरी कॅन्सर झालेला होता. परंतु त्याबद्दल तिला मुद्दाम काही सांगण्यात आले नव्हते. तिने सतत दहा वर्षे त्रास काढला. १९५३ साली तिची प्रकृती खूपच बिघडली. तिने आणखी दोन वर्षे तशीच काढली. प्रकृती खालावत जात होती व त्रास वाढत होता. तिने डॉ. लॅंग यांना Distant Healnig ची विनंती केली; परंतु त्याचा फारसा उपयोग होत आहे असे दिसेना म्हणून Contact Healing (प्रत्यक्ष उपचार) करण्याचे ठरले व त्याप्रमाणे १९५७ च्या एप्रिलमध्ये चॅपमनकडे ती आली.

चॅपमन नेहमीप्रमाणे ट्रान्स Trance मध्ये गेले. त्यांच्यामार्फत डॉ. लॅंग तिच्या स्पिरिट बॉडीवर स्पिरिट ऑपरेशन करू लागले. अदृश्य अशा स्पिरिट बॉडीवर ऑपरेशन सुरू झाले. तिला अशी स्पष्ट जाणीव होऊ लागली की तिच्या शरीरातून काहीतरी बाहेर काढले जात आहे. याप्रमाणे ते Pain less दुःखरहित ऑपरेशन संपविल्यानंतर ते म्हणाले की जरा थांब, तुझ्या डोळ्यावरसुद्धा ऑपरेशन केले पाहिजे. कारण मला त्यात थोडा दोष दिसत आहे व ते खरे होते. तिला चष्मा तर लागत असेच, पण तरीसुद्धा लांबचे धुरकट दिसत असे.

डॉ. लॅंग यांनी त्यांच्या पद्धतीप्रमाणे Spirit ऑपरेशन केले. त्यानंतर तिने विचारले की आता चष्मा लावावा लागेल काय ? त्यावर ते म्हणाले की चष्म्याची जरूरी पडणार नाही. यापूर्वी कित्येक वर्षे ती चष्मा वापरीत होती. आणि त्यानंतर तो कधीही तिला लागला नाही. पण मूळ आजारासंबंधी सांगावयाचे म्हणजे तिला उलट जास्त त्रास होऊ लागला होता. एकंदर प्रकार पाहून तिला निश्चित वाटले की थोडा उशीरा का होईना, गुण नक्की येईल. डॉ. लॅंग यांच्याकडे ती ऑपरेशनसाठी पुन्हा गेली त्यावेळी तिने आपल्याबरोबर आपल्या आईला नेले होते, कारण तिच्या पण डोळ्यास विकृती होती व बरोबर दिसत नव्हते. डॉ. लॅंग यांनी सांगितले की तिला मोतिबिंदू नसून Scotoma (डोळ्यातील एक काळा डाग आहे.) ते डाग दृष्टीसमोर येऊन दृष्टिदोष उत्पन्न करतात. त्यांनी कोचामागे उभे राहण्यास सांगून नेहमीप्रमाणे शरीरास स्पर्श न करता Spirit ऑपरेशन केले व ते संपताच तिला एकदम चांगले दिसू लागले.

डॉ. लॅंग यांनी सांगितल्याप्रमाणे काही मिनिटांतच नोराच्या आईस पूर्ण बरे केले होते. त्यानंतर त्यांनी नोराला कोचावर बसण्यास सांगितले आणि तपासून सांगितले की फार वाईट स्थिती आहे. विष पुन्हा काढून टाकावे लागेल. नंतर त्यांनी स्पिरिट ऑपरेशन केले व काहीतरी आतले जात आहे अशी जाणीवसुद्धा तिला झाली. त्यांनी दहा मिनिटे विश्रांती घ्यावयास सांगितली. मग त्यांनी तिच्यावर पुन्हा एक ऑपरेशन केले व सांगितले की एका ग्लॅंडमध्ये फार विष साचले आहे ते काढावे

लागेल, तरी पण मी शक्य तितका प्रयत्न करीन. दोन दिवसानंतर नोराची आई डोळे तपासण्याकरता पुन्हा आली त्यावेळी त्यांनी सांगितले की नोराची केस फार वाढलेल्या कॅन्सरची आहे. तरीपण त्यांनी आश्वासन दिले की थोडा अधिक वेळ लागेल पण गुण नक्की येईल. त्यानंतर तीन महिने डिस्टंट हीलिंग घेतली. फारसा फरक न दिसल्याने १९५७ च्या ऑगस्टमध्ये पुन्हा स्पिरिट ऑपरेशन करण्यात आले. त्यावेळी लॅग यांनी सांगितले की आता तू पूर्ण बरी झाली आहेस. पुढे काही गरज पडली तर आपल्या नेहमीच्या डॉक्टरकडे जावेस. यापुढे काही दिवसांनी एक ग्लँड कापताना डॉक्टरांची चूक झाली. तिचा तो भाग बधीर झाला व नंतर डॉक्टरांनी सांगितले की आता काही इलाज नाही असेच राहणार. त्यामुळे तिला पुन्हा डॉ. लॅगकडे जावे लागले. यांनी परत स्पिरिट ऑपरेशन करून तिची व्यथा कायमची घालविली तेव्हापासून आजतागायत तिची प्रकृती उत्तम असून ती सर्व प्रकारची कामे करू शकते.

५. श्री. पॅट्रीक आल्डर यांना १९४२ साली Spondylitis (पाठीच्या कण्यातील सूज) आलेली होती व त्यावर १९५६ मधील ॲलोपथींत जेवढे म्हणून इलाज करण शक्य होते ते सर्व केले होते, पण गुण आला नव्हता. १९५८ साली आजार जास्तच बळावला व कण्यात सारखे दुखू लागले. डॉक्टरांनी निदान केले की झाले आहे त्यापेक्षा जास्त काही एक करता येणे शक्य होणार नाही व आहे त्यात समाधान मानून राहिले पाहिजे. काही गोळ्या वगैरें खाऊन दुःख तात्पुरते थांबविणे इतकेच. यापेक्षा जास्त काही एक करता येणार नाही.

ता. २७-१०-१९५८ रोजी श्री. लॅग यांच्याशी त्यांची गाठ पडली. त्यांनी परीक्षा करून निदान केले की आतापर्यंत केलेले उपचार सर्व चुकीचे होते व त्यामुळेच आजार जास्त वाढला. त्यांनी सांगितले की जर स्पिरिट ऑपरेशन केले तर निश्चित आराम वाटेल.

त्याप्रमाणे ऑपरेशन करावयाचे ठरले. ऑपरेशन चालू असता त्याच्या शरीरात स्पर्श होत नव्हता, तरी पण आल्डर यांना पाठीच्या कण्यास सुई खुपसून इंजेक्शने दिली जात असल्याची भावना होत होती. ऑपरेशननंतर त्यांचे दुःख एकदम कमी झाले. त्यांनी पुष्कळच बरे वाटत असल्याचे सांगितले. याप्रमाणे संपूर्ण व्याधिनिवारण होऊन ते दैनंदिन कष्टाची कामे करू लागले. तिसऱ्या ऑपरेशनच्या वेळी त्यांनी सांगितले की आणखी एक ऑपरेशन करून टाकू या. आल्डर यांच्या हातावर एक गळू होते. ते त्यांनी वरीलप्रमाणे ऑपरेशन करताच आपोआप नाहीसे झाले. डॉक्टर अदृश्य, त्यांची उपकरणे अदृश्य; ऑपरेशनही अदृश्य, भूक नाही, दुःख नाही गुण मात्र काही मिनिटांत सोळा आणे हे पाहून त्यांना फार आश्चर्य वाटले.

६. मिसेस एथिल बेली यांच्या उजव्या डोळ्याची पापणी जन्मतःच मिटलेली होती. ती थोडी मोठी झाल्यावर ऑपरेशन केल्यावर दुरुस्त होऊ शकेल असे

सांगण्यात आले. त्या वेळी १९१५ साली डॉ. लँग हे हॉस्टिलमध्ये नेत्रचिकित्सक म्हणून काम करीत होते. त्यांनी तिला तपासून सांगितले की ऑपरेशन करून फारसा फायदा होणार नाही. कारण पापणी एकदा उघडली की पुन्हा मिटणारच नाही डोळा सदैव उघडा राहील याचा विचार करा. त्यावर त्यांनी विचारविनिमय करून ऑपरेशन न करण्याचा निर्णय घेतला. नंतर १९६३ साली तिने चॅपमन व डॉ. लँग यांच्याबद्दल ऐकले व त्यांच्याकडे गेली. त्यांनी तिला ताबडतोब ओळखले व म्हणाले की आपण पूर्वी केव्हातरी भेटलो होतो. ती म्हणाली की होय, १९१५ साली जेव्हा तुम्ही सर्जन म्हणून काम करीत होता त्या वेळी. त्यांनी नंतर तिला कोचावर निजण्यास सांगितले. मी तुझ्या स्पिरिट बॉडीवर ऑपरेशन करतो. तुझी पापणी हालचाल करू लागेल.

त्यांनी त्यांचा मुलगा बेसिल यास बोलावून उपकरणे आणावयास सांगितली व त्यांनी आपल्या पद्धतीने तिच्या स्पिरिट बॉडीवर ऑपरेशन केले व डोळे उघडण्यास सांगितले. ते म्हणाले की तुझी पापणी आता दुरुस्त झाली आहे. आज ६९ वर्षे सतत बंद राहिल्याने दृष्टीदोष (Lazy Eye) उत्पन्न झाला आहे त्यावर ऑपरेशन केले. त्यायोगे डोळ्याची पहाण्याची कमी झालेली शक्ती पुन्हा आली. त्यांनी आणखी एक ऑपरेशन तिच्या लिव्हरवर केले. तिला आता पापण्यांची उघडझाप सुरळीतपणे करता येऊ लागली असून, त्या डोळ्याने पण उत्तम दिसू लागले होते. १९६४ मध्ये पुन्हा एकदा तपासणी करून घेण्याकरता गेल्या असता, तपासून सांगितले की सर्व काही उत्तम आहे. त्याबद्दल काही एक करावयास नको परंतु तुमच्या आंगठ्याचे हाड सरकले आहे. त्यावर ऑपरेशन करू या. खरे म्हणजे आंगठ्याबद्दल त्या काहीही बोलल्या नव्हत्या. त्यांनी आपल्या पद्धतीप्रमाणे ऑपरेशन केले व जखम शिवून काढली आणि आंगठा पूर्ववत केला.

७. (i) Distant Healing अप्रत्यक्ष व दूर अंतरावरील व्याधिग्रस्ताचे व्याधिनिवारण.

ता. २९।४।१९५९ रोजी श्रीमती हेम्सवर्थ या लिहितात तुम्ही माझ्यावर सात आठवडे Distant Healing (दूरस्थ व्याधिनिवारण) केलेत; आता माझा घसा पूर्णपणे बरा आहे व काहीही त्रास शिल्लक नाही.

(ii) श्रीमती मॅन्युअल यांच्या भगंदराचे ऑपरेशन झाले होते व त्यायोगे झालेली जखम दुरुस्त होण्याऐवजी दिवसेंदिवस चिघळत गेली व शेवटी त्यांना बिछान्यावर एका अंगावर पडून राहणे भाग पडले. केलेल्या उपायांचा काही एक उपयोग न होता दिवसेंदिवस जास्तच त्रास होऊ लागला. त्यांनी श्री. चॅपमन यांना लिहून डिस्टंट हिलींग्ज करण्याविषयी विनंती केली. त्याप्रमाणे २९।९।६२ रोजी डिस्टंट हीलिंग सुरू केले. एक आठवड्यानंतर मॅन्युअलचे पत्र आले की गेल्या तीन दिवसांपासून मला पुष्कळ बरे वाटत आहे. दुःख व खाज ही कमी झाली आहेत. नंतर

ता. २९।११।६२ ला लिहिले की माझा सर्व प्रकारचा त्रास नाहीसा झाला असून मी पूर्ण बरी झाले आहे. दोन वर्षांनंतर तपासणी करता कसलीही पुनरावृत्ती झालेली नसून प्रकृती संपूर्ण चांगली असल्याचे सांगितले.

श्री. हटन यांचा बारा वर्षांचा मुलगा डिसेंबर १९६४ मध्ये एका ट्रिपवर जावयाचा होता. पण दोन तीन दिवस अगोदरच त्यास ताप, खोकला व पडसे यांचा त्रास सुरू झाला व त्यातल्या त्यात खोकल्याने त्यास फार त्रास दिला. त्यामुळे त्यास सहलीला जाता येईल की नाही याबद्दल शंका उत्पन्न झाली. तसे झाले तर त्याची फार निराशा होणार होती. खोकला तर काही केल्या थांबेना; म्हणून त्या मुलास न कळत श्री. हटन यांनी आपले विचारप्रवाह डॉ. लॅंगकडे प्रक्षेपित केले व त्यांच्याकडून प्रतिसाद आला नाही म्हणून प्रक्षेपण करावे की कसे याचा विचार मनात आला असता आपल्यामागे कोणी उभे आहे असे त्यांना वाटले. परंतु अंधारामुळे काही दिसले नाही थोडया वेळाने कोणीतरी डोक्यास थंड असा स्पर्श केल्याचा भास झाला व आणखी थोडया वेळाने कपाळावर थोपटल्यासारखे वाटले व अलार्म टाइमपीस कोणीतरी उचलून हलकेच पालथे करून ठेवले. त्यावरून त्यांची खात्री पटली की डॉ. लॅंगकडून प्रतिसाद मिळाला आहे. त्यानंतर काही मिनिटांतच हॅरोल्डचा खोकला थांबला व त्यास शांत झोप आली. दुसरे दिवशी तो उठतानाच खडखडीत बरा होऊन उठला व नियोजित सहलीला जाऊ शकला. अशी आणखी पुष्कळ उदाहरणे देता येतील; परंतु त्याने उगीच ग्रंथविस्तार वाढेल. येथवर दिलेल्या उदाहरणांनी माझी खात्री आहे की चमत्कृतिपूर्ण व अनोख्या अशा ज्ञानाच्या एका दालनाचे वाचकांना दर्शन झाले आहे.

आता हे सर्व कसे घडून येते याबाबत डॉ. लॅंग यांचे काय विवरण आहे ते आपण पाहू या.

स्पिरिट ऑपरेशन्स कशी केली जातात याबद्दल त्यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की स्पिरिट हीलिंग हे स्पिरिट डॉक्टर्सनी स्पिरिट जगतातून स्पिरिट पद्धतीने केलेले व्याधिनिवारण होय. व्याधिनिवृत्तीचे उपचार व्याधिग्रस्तांच्या स्पिरिट बॉडीवर केले जातात व त्याचा परिणाम शरीरातील त्या भागातील व्याधीवर होऊन व्याधी निर्मूलन होते. त्यांचे म्हणणे असे की, प्रत्येक मानवी शरीरास ते कार्यक्षम ठेवण्यास स्पिरिट बॉडीची आवश्यकता असते. यासंबंधी सविस्तर माहिती 'मृत्यू व नंतर' या प्रकरणात आहे ती कृपया पुन्हा वाचावी. शरीराचा प्रत्येक भाग कार्यक्षम ठेवण्यासाठी त्या भागात चित्‌शक्ती काम करीत असते. ज्याप्रमाणे शरीर त्याचप्रमाणे मनाचे सर्व व्यापार चालू ठेवण्यास स्पिरिट मनाची पण आवश्यकता असते व ते स्पिरिट बॉडीत अंतर्भूत असते. मन व शरीर यांना अंतर्बाह्य व्यापून शरीराचे बाहेर काही अंतरापर्यंत शरीराचा आकार धरून जी चित्‌शक्ती वास करीत असते तीच आपली स्पिरिट बॉडी. शरीरातील मेंदूचा भाग हा सर्वांत महत्त्वाचा भाग

होय. त्यातच मन व विचार यांचे अस्तित्व असून सर्व शरीरास तेच कंट्रोल करीत असते. म्हणून त्या ठिकाणी व त्याच्या बाजूस स्पिरिट बॉडी प्रामुख्याने असते. तिची व्याप्ती डोक्याच्या आजूबाजूस सर्व बाजूंस काही अंतरापर्यंत असते व ती वलयासारखी दिसते. दैवते व साधू पुरुष यांच्या डोक्याभोवती जे तेजोवलय दाखविण्यात येते ते तेच. त्यास इंग्रजीत Aura ऑरा असे म्हणतात. वास्तविक हा ऑरा सर्व शरीराभोवती असतो. परंतु डोक्याभोवती असणाऱ्या वलयासच (ऑरा) म्हणण्याचा प्रघात पडला आहे. त्यात राग, लोभ, मोहादि विकार ज्या ज्या वेळी जसे जसे असतील त्या त्याप्रमाणे निरनिराळे रंग दिसतात. त्यावरून त्या व्यक्तीच्या आध्यात्मिक प्रगतीची कल्पना करता येते. हे तेजोवलय डोक्याभोवतीच असते असे नसून ते सर्व शरीराभोवती असते. ती आपली स्पिरिट बॉडी होय. शरीर मृत झाले म्हणजे ही स्पिरिट बॉडी सुटी होऊन काही काळ स्पिरिट जगतात कार्यक्षम राहते. हेच त्या व्यक्तीचे स्पिरिट जगातील मृत्यूनंतरचे अस्तित्व. त्याची मुदत त्या व्यक्तीच्या चांगल्या, वाईट, तीव्र, तीव्रतर अशा वासनांवर व प्रवृत्तींवर अवलंबून असते. काही व्यक्तींना आत्मप्रक्षेपण Self Projection करता येते. तरी काहींचे काही कारणवशात् होत असते. अशा वेळी त्याचे शरीर बिछान्यावर राहून त्याची स्पिरिट बॉडी बाहेर भटकत असते. (यासंबंधी एका स्वतंत्र प्रकरणात विवेचन केले आहे.) यावेळी तो स्वतःचे शरीर बिछान्यावर पडलेले पाहू शकतो. ज्या वेळी असे प्रक्षेपण (Self Projection) चालू असते तेव्हा त्याचे शरीर व स्पिरिट बॉडी यांना जोडणारा एक दुवा असतो. त्यास सिल्व्हर कार्ड किंवा रुपेरी दोर अशी संज्ञा आहे. ती मस्तकातून निघून स्पिरिट बॉडीचा शरीराशी संपर्क कायम टेवते. स्पिरिट बॉडी कोठेही गेली तरी ती त्यास चिकटून असते व तिची लांबी कितीही वाढू शकते. मात्र एकदा का तिचा संबंध तुटला की स्पिरिट बॉडी ही सर्वस्वी अलग होते व त्या शरीराचा मृत्यू होतो. प्रक्षेपित स्पिरिट शरीर परत आपल्या देहात प्रवेश करू लागले म्हणजे ती सिल्व्हर कार्ड आत खेचली जाऊ लागते व तिच्यामार्फत स्पिरिट शरीर परत आपल्या शरीराशी पूर्ण संपर्क साधते. स्पिरिट शरीर जोपर्यंत शरीराबाहेर असते, तोपर्यंत शरीर चलनवलनरहित असते व त्या सिल्व्हर कार्डमार्फत पुन्हा चलनवलन सुरू होते.

शरीर व मनाचे सर्व व्यापार चित्‌शक्तिस्वरूप स्पिरिट बॉडीकडून चाललेले असतात व ती स्पिरिट बॉडी शरीराच्याच आकाराने सर्व शरीर व्यापून शरीराचे बाहेर अदृश्य स्वरूपात असते. त्यामुळे शरीराचे ज्या भागात काही आजार अगर विकृती उत्पन्न होते, स्पिरिट बॉडीच्या त्याच भागात तीच विकृती उत्पन्न होणे, अपरिहार्य असते. काही इलाज करून शरीर दुरुस्त झाले, म्हणजे स्पिरिट बॉडीचा सुद्धा विकृत झालेला भाग आपोआप दुरुस्त होतो. स्पिरिट उपचार (Healing) म्हणजे याच्या उलट म्हणजे शरीरविकृतीमुळे स्पिरिट बॉडीचा जो भाग आजारी किंवा विकृत झाला असेल त्या भागावर स्पिरिट पद्धतीने स्पिरिट डॉक्टर उपचार करतात व स्पिरिट बॉडी दुरुस्त झाली

की त्यास साक्षेप असा शरीराचा आजार किंवा विकृती आपोआप दुरुस्त होते. सामान्य मनास हे पटण्यासारखे नसते, कारण त्यास स्पिरिट शरीर म्हणजे काय याचीच कल्पना नसते. परंतु त्याचा उमज पडला की वरील तत्त्व व विचारसरणी सहज पटेल. तरी त्यास एक शंका राहीलच की, स्पिरिट बॉडीचा विकृत भाग दुरुस्त झाला की शरीराचा तोच भाग दुरुस्त कसा होऊ शकेल ? मी म्हणतो की त्याप्रमाणे झाले नाही तर तो स्पिरिट बॉडीचा भाग शरीराशी संलग्न असतो त्यामुळे तो पुन्हा व्याधिग्रस्त किंवा विकृत होईल व ती कधीही न संपणारी मालिका ठरेल, तत्त्व एकच की जर शरीराची व्याधी बरी झाली की स्पिरिट बॉडीचा तो भाग दुरुस्त होतो; तर स्पिरिट बॉडीचा जो भाग दुरुस्त केला जाईल, त्याशी संलग्न असलेला शरीराचा भागही दुरुस्त झालाच पाहिजे. दुसरे म्हणजे तुमचा विश्वास असो वा नसो, तत्त्व म्हणून पटो वा न पटो, तसा अनुभव आला आहे व येत आहे ज्यांना खात्री करून घ्यावयाची असेल त्यांना करून घेण्याचे साधन आहे. त्याप्रमाणे त्यांनी ती करून घ्यावी. आपल्या शरीराप्रमाणे स्पिरिट बॉडीस त्वचा, रक्तमांस, मज्जा वगैरे नसते, त्यामुळे स्पिरिट बॉडीवर उपचार किंवा ऑपरेशन करताना त्वचा, रक्त, मांस वगैरेंना इजा पोचू शकत नाही व म्हणूनच सर्व स्पिरिट ऑपरेशन Painless दुःखरहित असतात. त्यावेळी भूल देण्याचा किंवा सेप्टिक वगैरे होण्याचा प्रश्नच नसतो.

हे सर्व झाले तरी पण स्पिरिट हीलिंग म्हणजे काय हा प्रश्न राहतोच. शरीरास आरोग्यपूर्ण ठेवणारे प्रवाहतरंग आपणा सभोवती सतत वावरत असतात व ते सतत स्पंदन पावत असतात. पण ती स्पंदने आत्मसात करून त्यांचा कसा व किती उपयोग करून घ्यावयाचा यांचे आपल्यासारख्या सामान्यजनास ज्ञान नसते. ते स्पिरिट डॉक्टरांना असते. रेडिओलहरी सर्वत्र वावरत आहेत. परंतु मुंबईचा प्रोग्राम ऐकायचा म्हणजे प्रथम रेडिओ दुरुस्त अवस्थेत पाहिजे. मग तो लावायचे ज्ञान पाहिजे. नंतर त्याला मुंबई ट्यून कोठे करावयाची याची माहिती हवी तरच ती माहिती मिळेल किंवा गाणे ऐकत येईल; नाही तर रेडिओतरंग व स्पंदने सर्वत्र सतत चालू असूनही आपणास माहिती नसली तर काही करता येणार नाही. अगदी त्याचप्रमाणे सामान्यजनास त्या आरोग्यतरंगांचा कसा उपयोग करून घ्यावयाचा याची माहिती नसते. ती या स्पिरिट डॉक्टरांना असते. मृत्युलोकांत व्याधिनिवारणाचे उपाय व उपचार वैद्यकीय तज्ज्ञ किंवा डॉक्टर मंडळीस माहीत असतात व तेच त्यांचा उपयोग करून शारीरिक व्याधिनिवारणाचा प्रयत्न करीत असतात. अगदी त्याचप्रमाणे ते स्पिरिट जगतात आले म्हणजे तीच मंडळी जास्त सुलभतेने स्पिरिट उपचार किंवा ऑपरेशन्स करू शकतात. मृत्युलोकात त्यांचे तत्संबंधी शिक्षण झालेले असून अनुभव पण पदरी असतो. त्यामुळे स्पिरिट जगतात आले की त्यांना स्पिरिट उपचार किंवा ऑपरेशन शिकणे सोपे जाते व उपचार करणे पण सोपे जाते. मात्र हे टेक्निक थोडे निराळे व स्पंदनयुक्त असल्याने त्यांनासुद्धा इतर स्पिरिट डॉक्टरांकडून शिकावे हे लागतेच. पण ते लवकर शिकतात

इतकेच. मृत्युलोकांतून येताना जी मंडळी व्याधियुक्त स्थितीत स्पिरिट जगात येतात त्यांच्यावर स्पिरिट डॉक्टर उपचार करीत असतातच. परंतु पृथ्वीवरील जिवंत रक्त-मांसयुक्त शरीर धारण करणाऱ्या व्याधिग्रस्तांस स्पिरिट उपचार करणारे स्पिरिट डॉक्टर क्वचितच. माझ्या माहितीप्रमाणे एकच व ते म्हणजे डॉ. लॅग. त्यांना सुद्धा मानवमध्यस्थामार्फतच काम करावे लागते. त्यातील अडचणी काय असतात त्यांचे वर्णन मागे आलेलेच आहे. हे स्पिरिट डॉक्टर हे सततच सर्वांत वावरत असणारे आरोग्यतरंग स्वतःत समाविष्ट करून घेतात व स्पंदनयुक्त पद्धतीने त्याचे व्याधिग्रस्ताच्या स्पिरिट बॉडीच्या व्याधियुक्त भागावर उपचार किंवा ऑपरेशन करतात. स्पिरिट डॉक्टरांस रुग्णाच्या स्पिरिट बॉडीच्या व्याधियुक्त भागावर कोणती स्पंदने कशा रीतीने कोणत्या प्रमाणात सोडावयाची त्याची माहिती असते. त्याप्रमाणे करून ते प्रथम स्पिरिट बॉडीचे व्याधिनिवारण करून ती आरोग्यसंपन्न करतात व मग आपोआपच तीस संलग्न असलेल्या त्वचा-मांसयुक्त शरीराचे व्याधिनिवारण होऊन ते आरोग्यसंपन्न होते. स्पिरिट ऑपरेशनच्या बाबतीत येथील व तेथील उपकरणे सर्वसाधारणपणे सारखीच असतात. ऑपरेशनची पद्धती पण साधारण सारखीच असली तरी थोडी निराळी असते. कारण ते अदृश्य अशा उपकरणांनी अदृश्य अशा स्पिरिट बॉडीस त्वचा रक्त, मांस वगैरे काहीच नसल्याने उपचार किंवा ऑपरेशन करणे सोपे जाते व त्याचा कोणत्याही तऱ्हेने अनिष्ट परिणाम होऊ शकत नाही.

पुन्हा प्रश्न असा आहे की व्याधीचे स्वरूप कसे कळू शकते ?

स्पिरिट शरीर हे इतरांना अदृश्य असते. ते स्पिरिट डॉक्टरांना दिसू शकते. त्यामुळे स्पिरिट डॉक्टर ज्या वेळी रुग्णास पाहतो त्या वेळी त्यास त्याच्या मर्त्य शरीराप्रमाणे त्याची स्पिरिट बॉडी पण दिसते. स्पिरिट बॉडी ही सर्व शरीर व्यापून शरीराबाहेर सर्व बाजूंनी दोन इंचांपर्यंत असते ती शरीरातील कामक्रोधादि मनोव्यापार, तसेच शरीराचे आरोग्य अनारोग्य परावर्तित करीत असते. कामक्रोधादी ज्यांचे ज्या वेळी विशेष प्राबल्य असेल त्या त्याप्रमाणे तिच्या रंगात व छटात फरक पडत असतो. त्याचप्रमाणे शरीराचा एखादा भाग जर व्याधिग्रस्त झालेला असेल तर स्पिरिट बॉडीचा तोच भाग त्याचप्रमाणे व्याधिग्रस्त दिसतो. कारण शरीर व स्पिरिट हे एकमेकांवर आपापली अर्धी व्याधी परावर्तित करीत असतात व स्पिरिट बॉडी ही पारदर्शक असल्याने कोणत्या भागात कोठे काय झाले आहे ते स्पिरिट डॉक्टरांस उघड्या डोळ्यांनी दिसते. त्यामुळे त्यांस फारशी निराळी परीक्षा करावी लागत नाही. त्यामुळे कोणत्याही रुग्णाकडे पाहिल्याबरोबर त्यास काय झाले आहे ते त्यांना तत्काळ कळते आणि ज्याप्रमाणे पृथ्वीवर डॉक्टरांच्या कमीजास्त ज्ञानाने किंवा अनुभवात निदान व उपचारपद्धतीत फरक पडू शकतो त्याचप्रमाणे स्पिरिट डॉक्टरांतसुद्धा फरक पडू शकतो. मात्र त्यांचे प्रमाण पुष्कळ कमी असते. रोगाचे निदान करण्यास शरीरा-

CamScanner

वरील त्वचा, मांस, हाडे वगैरेंमुळे अडथळा उत्पन्न होतो व त्यामुळे पुष्कळ वेळा निदान चुकणे संभवनीय असते. स्पिरिट बॉडीच्या बाबतीत तसे काही नसल्याने निदान करणे सुलभ असते, तरीसुद्धा काळजी, कौशल्य व तारतम्य ही वापरावीच लागतात.

स्पिरिट ऑपरेशन कसे असते ? : स्पिरिट ऑपरेशन करण्याच्या वेळी स्पिरिट बॉडी जी सर्व शरीरास लपेटून असते ती सुटी करून थोडी बाजूस करून घ्यावी लागते. ती तशी बाजूस झाली म्हणजे तिच्या कोणत्या भागास काय झाले आहे हे स्पष्टपणे दिसू शकते आणि त्यावर ऑपरेशन करणे सोपे जाते. नेहमीच ऑपरेशन करावे लागते असे नाही. समजा, लिव्हरसंबंधी तक्रार आहे तर त्यास इंजेक्शन दिले जाते व ते इंजेक्शन Astral Fluid चे असते. हे सर्व डॉ. लॅग एकटेच करतात, असे नसून त्यांचा मुलगा बेसिल व इतर साहाय्यक त्यांना नेहमी सर्व प्रकारे साहाय्य करीत असतात. या ठिकाणी त्यांनी सुमारे आठ दहा M D. F R C E अशा सहाय्यक डॉक्टरांची नावे दिली आहेत. त्याशिवाय नर्सिंग स्टाफ असतो तो निराळाच. शस्त्रक्रिया या दृष्टीने शरीरावरील व स्पिरिट बॉडीवरील ऑपरेशन्स ही जवळ जवळ सारखीच असतात. त्यास उपकरणे व शस्त्रे पण सारखीच वापरावी लागतात. स्पिरिट ऑपरेशनमध्ये शस्त्रे कमी लागतात. कारण स्पिरिट बॉडीचे स्वरूप स्थूल शरीरापेक्षा निराळे असते, त्यामुळे स्पिरिट डॉक्टरांना ऑपरेशनच्या जागी सहज पोचता येते. कारण तसे करताना त्यांना त्वचा वगैरेंचा अडथळा नसतो.

काही वेळेला शरीराचा आतील भाग सडतो, कुजतो अथवा खराब होतो म्हणून काढून टाकावा लागतो. त्याच्या जागी त्याची जागा भरून काढण्याकरता मध्यस्थाच्या शरीरातून Ectoplasm काढून त्याची योजना त्या ठिकाणी करावी लागते. स्थूल शरीरावर ऑपरेशन करताना त्याचा असा एखादा भाग काढला गेला तरी सुद्धा तो बसविता येतो. पण ते जरा जास्त कठीण असते व त्यात यश येतेच असे नाही. स्पिरिट हीलिंग हा खरोखर Medical Treatment चाच एक भाग आहे. त्यात धर्माचा अगर विश्वासाचा काही भाग नाही. ते एक शास्त्र आहे. धार्मिक विधी किंवा क्रिया नाही.

डॉ. लॅग यांना डिस्टंट हीलिंगकरता हजारोंची पत्रे येतात. त्या सर्वांकडे जाऊन लक्ष देणे त्यांना कसे शक्य होते ? ते म्हणाले की, सर्वांकडे मला एकट्यास जाणे केवळ अशक्य आहे. मी शक्यतोवर रुग्णांना झोपेत भेट देतो व ज्या ठिकाणी माझी स्वतःची गरज नसते किंवा जाणे शक्य नसते त्या ठिकाणी माझा मुलगा बेसिल किंवा इतर साहाय्यक जातात. त्यांना माझ्याइतकेच ज्ञान, कौशल्य व अनुभव पण आहे व बेसिल किंवा इतर साहाय्यक जातात. त्यांना माझ्याइतकेच ज्ञान, कौशल्य व अनुभव पण आहे व बेसिल तर ऑपरेशन्स फार चांगल्या रीतीने करतो. आम्ही सर्व मिळून एका टीमने कामं करीत असते. फक्त मला मध्यस्थ मिळाला आहे

म्हणून मी एकटा तुमच्याशी बोलू शकतो; तसे इतर करू शकत नाहीत. मुख्य गोष्ट म्हणजे प्रत्येक गरजूस स्पिरिट हीलिंगचा फायदा मिळालाच पाहिजे अशी व्यवस्था ठेवतो.

रुग्ण कोणत्याही देशातून कोणत्याही वेळी गरज पडली की डॉ. लॅंग यांची आठवण करतो. तेव्हा शंका अशी आहे की ते त्याच्याशी संपर्क कसा साधू शकतात ? त्यांचे म्हणणे असे की आम्ही रुग्णांना हुडकून काढतो, असे म्हणण्यापेक्षा तेच आम्हाला हुडकून आमच्याशी संपर्क साधतात असे म्हणणे जास्त सयुक्तिक होईल. कारण रुग्णास ज्या वेळी गरज वाटते त्या वेळी तो आपला विचारप्रवाह स्पंदनरूपाने खूप जोराने प्रक्षेपित करतो. ते आपोआप आमच्यापर्यंत येऊन पोचतात; त्या वेळी समजा, मी कामात असल्याने स्वीकारू शकत नसलो तर माझ्या सहकाऱ्यांपैकी कोणीतरी त्यास प्रतिसाद देतात किंवा मी मोकळा झालो की माझ्याकडे ते पोचवितात. त्यामुळे कोणासही संपर्क साधणे व त्यास इष्ट ती मदत करणे हे केव्हाही शक्य होऊ शकते. त्याप्रमाणे ते करीत असतात.

डिस्टंट हीलिंग (दुरून प्रक्षेपण) पेक्षा (Contact Healing) प्रत्यक्ष प्रक्षेपण व उपचार हे केव्हाही जास्त प्रभावी व परिणामकारी असतात. पण ज्या ठिकाणी इलाजच नसतो व Contact Healing (प्रत्यक्ष उपचार) अशक्य असतो त्या ठिकाणी डिस्टंट हीलिंग करावेच लागते व उशीरा का होईना परंतु त्याचा परिणाम होतोच. पुष्कळ वेळा डॉ. लॅंग हे डिस्टंट हीलिंगच्या वेळी आरोग्यकिरणांचा (Healing Rays) उपयोग करतात. म्हणून रुग्णांना कधी कधी झोपेत अथवा जागे असतानासुद्धा प्रकाशाचे ठिपके दिसतात.

हंट म्हणून डॉ. लॅंग यांचा सेक्रेटरी आहे. तो सर्व रुग्णांचे रेकॉर्ड ठेवतो व गरज पडेल त्या वेळी त्यातील माहिती व त्या रुग्णांचा इतिहास पुरवितो व त्याचा पुढील उपचार करण्यास फार उपयोग होतो. कॅन्सर, ल्युकेमिया, पोलिओसारखे असाध्य समजले जाणारे आजारसुद्धा अगदी शवटच्या अवस्थेत असतानासुद्धा बरे झाले असल्याची उदाहरणे आहेत. मात्र फार उशीर झाला तर नेहमीच उपयोग होतो असे नाही. फार उशीर झाल्यामुळे अथवा वयाचा परिणाम म्हणून मृत्यू अटळ आहे अशी त्यांची खात्री झाली तर त्यास दुःख वगैरे न होता सुखाने त्रास न होता मृत्यू येईल अशी व्यवस्था स्पिरिट डॉक्टर्स करू शकतात व करतात.

पुष्कळ वेळा सत्य हे कल्पितापेक्षा अद्भुत असते. त्यातला हा एक प्रकार आहे. निदान मराठी वाचकांना अशा प्रकारच्या व्याधिनिवारणाची क्वचितच कल्पना असेल. हे वाचीत असताना आपण काहीतरी अद्भुत व कल्पित कादंबरी वाचीत आहोत असे वाचकांना कदाचित वाटलेही असेल; परंतु मी सांगतो की यातील शब्द न् शब्द खरा आहे. या घटना घडलेल्या आहेत; अजून घडत आहेत. त्याचा रुग्ण फायदा घेत आहेत व घेता येईल त्या दोघांचा एक फोटो मी दिला आहे. (परिशिष्ट

CS CamScanner

पाहा) त्यातील तरुण व अर्धे डोळे मिटलेले जे गृहस्थ आहेत ते जॉर्ज चॅपमन व दुसरे म्हातारे डॉ. लॅग आहेत. विशेष म्हणजे डॉ. लॅग हे डावखोर असून चॅपमन हे उजवे आहेत. डॉ. लॅग ज्या वेळी चॅपमनमध्ये प्रवेश करतात त्या वेळी चॅपमन अधिक वृद्ध दिसू लागतात. त्यांचा आवाजही वृद्ध माणसासारखा येऊ लागतो व विशेष म्हणजे मग ते आपल्या सर्व हालचाली, ऑपरेशन्स वगैरे डाव्या हाताने करतात. त्यांचा पत्ता मी येथे मुद्दाम दिला नाही. त्यांना उगीच ऊठसूठ कोणी त्रास देऊ नये हा हेतू. परंतु खरोखर गरजू असतील त्यांनी आपल्या गरजेचे स्वरूप २५००० रामनाम गायत्री प्रकाशनाकडे पोस्टेजसह लिहून पाठवावे. त्यांना त्यांचा समग्र पत्ता कळविला जाईल.

दुसरी माझी एक सूचना अशी आहे की व्याधिविमोचन या प्रकरणात जेवढ्या म्हणून प्रकारांनी ते पाश्चात्यात केले जात आहे, ज्यासंबंधी मी या प्रकरणात वर्णन केले आहे ते सर्व किंवा निदान त्यापैकी काही कोणी प्रयत्नशील व्यक्तींनी आपणाकडे का करू नये ? त्यासाठी काही साहाय्य लागेल तर ते मी आनंदाने देईन. दुसऱ्यावर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःच्या पायावर उभे राहून केलेले काय वाईट ? यासंबंधी कोणी प्रयत्न करावा या उद्देशानेच मी सारे सविस्तर दिले आहे त्यांच्याकडे या देणगीच्या स्वरूपात आहेत तर आपणाकडे कोणासही प्रयत्नाने या सिद्धी मिळविण्यासारख्या आहेत. फक्त त्याग, चिकाटी, चारित्र्य व योग्य मार्गदर्शन हवे.

पारद (व्याधिविमोचन)

पारदः सर्व रोगाणाम् । जेता पुष्टिकरः स्मृतः ।।

व्याधिहरण करणाऱ्या औषधी द्रव्यात पारदाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मी माझ्या ‘ अमृत-तुषार ’ या ग्रंथात धातुवाद या प्रकरणात पारदासंबंधी बरेच लिहिले आहे. त्याची पुनरुक्ती न करता मानवी व्याधिनिवारणाच्या कामी पारदाचा प्रत्यक्ष कसा उपयोग करता येतो याचा फक्त विचार करणार आहे. पारद नुसतेच व्याधिनिवारण करतो असे नसून, तो व्याधिप्रतिबंधक पण आहे, हे त्याचे वैशिष्ट्य आहे. तो खरोखरी कायाकल्प करणारा आहे. फक्त त्याचा उपयोग कसा करावयाचा याची संपूर्ण व शास्त्रीय माहिती हवी. कोणतेही महत्त्वाचे असे आयुर्वेदीय औषध पारदाशिवाय होऊ शकत नाही, हे त्याचे महान वैशिष्ट्य आहे.

खरोखरी पाहता हिंगूळ किंवा पारद हा आपल्या देशात कोठेही सापडत नाही. तो परदेशातून आयात करावा लागतो. असे असूनही भारतात पारदासंबंधी जितके संशोधन झाले आहे तितके इतरत्र कोठेही झालेले नाही. आपल्या पूर्वाचार्यांनी ज्याप्रमाणे व्यवहार व धर्म यांची सांगड घातली आहे, त्याचप्रमाणे आयुर्वेदास पाचवा वेद मानले आहे. पारदाचे अनन्यसाधारण महत्त्व पाहून त्यास आपल्या पूर्वाचार्यांनी धर्मात पण फार महत्त्वाचे स्थान देऊन ठेवले आहे. योगीश्वर जे श्री देवाधिदेव महा-

देव त्यांचे पारद हे वीर्य कल्पिले गेले असून, त्याचे नुसते दर्शन व स्पर्श यातसुद्धा महान पुण्य आहे असे वर्णन आहे.

शताश्वमेधेन कृतेन पुण्य । गोकोटिभिः स्वर्णसहस्रदानात् ।
नृणाम् भवेत् सूतकदर्शनेन । यत् सर्वतीर्थेषु कृताभिषेकाम् ॥

शंभर अश्वमेध, कोटी गोदान; सहस्र सुवर्णमुद्र दान किंवा सर्व तीर्थांवर केलेले अभिषेक यांनी जे पुण्य मिळते ते फल पारदाच्या दर्शनाने मिळते. (मात्र तो शुद्ध व बुभुक्षित असला पाहिजे. नाही तर डॉक्टर मंडळी थर्मामीटरमधील पारद-दर्शन दिवसातून शंभर वेळा घेतात.) त्याचप्रमाणे---

स्वयंभू लिंगसाहस्रं । यत्फलं सम्यगार्चनात् ।
तत्फलं कोटिगुणितं । रसालिंगार्चनात् भवेत् ॥ १ ॥
रसविद्या पराविद्या । त्रैलोक्येऽपि सुदुर्लभः ।
भक्ति—मुक्तिकरी यस्मात् । तस्माद्देया गुणान्विते ॥ २ ॥

त्याचप्रमाणे औषधीसुद्धा किती आहे ते पाहा :—

सूते गुणान् शतकोटिवज्रंच चाभ्रेसहस्रं कनके शतैकम् ।
तारे गुणाशीति तदर्धकांते । तीक्ष्णं चतुःषष्टि—रवौत्वदर्धम् ।

म्हणजे तांब्यास ३२ तर सोन्यास १००, हिऱ्यास १००० तर पारदास शतकोटी गुण औषधी ह्या कल्पिलेल्या आहेत. म्हणून सुवर्ण अथवा हिऱ्याने दागिने कांतिप्रद असतात व ते अंगावर वापरले जातात. परंतु पारद एक तर असा मिळत नाही. म्हणून व पातळ असल्याने अंगावर वापरता येत नाही. पण त्यामुळे त्याचे औषधी गुणधर्म कमी होतात असे मात्र नाही. पारद शेणात टाकून उन्हात सुकवून तो जर धान्याच्या राशीत ठेवला तर वर्षानुवर्षे त्यात कीड होऊ शकत नाही व असली तर ती मरते. त्याचप्रमाणे अलीकडील सर्व पिकांवरील कीड मरण्याकरता मारण्यात येणाऱ्या रासायनिक फवाऱ्यात पारा असतो. हा पारा अशुद्ध असतो. शास्त्रोक्त रीतीने शुद्ध केलेला पारद जर शरीरावर कायम वापरता आला तर तो रोग नाहीसा करून नवीन होणाऱ्या रोगांस प्रतिबंध करील यात मुळीच संशय नाही. पारद पोटात घेण्याजोगा करता आल्यावर मानवी शरीरात कोणताही आजार मूळच धरू शकत नाही आणि अगोदरच असला तर नाहीसा होतो असा अनुभव आहे. परंतु यापूर्वी पारदशुद्धी व बध्य करण्याकरता काही विशेष प्रक्रिया कराव्या लागतात. त्या न करता असे काही केले तर अपरिमित हानी मात्र होते. कारण पारद हा प्रामुख्याने विषद्रव्यांपैकी एक असून काही संस्कारांनी त्याचे अमृतीकरण होते.

ज्याप्रमाणे समुद्रमंथन करून दैत्यांशी झगडून, श्रीशंकरास हलाहल विष प्राशन करणे भाग पडून त्यानंतर देवांना अमृताची प्राप्ती झाली. त्याप्रमाणे पारदापासून दीर्घ प्रयत्न व परिश्रमाने अमृताची प्राप्ती करून घ्यावी लागते. पारद ज्या स्थितीत प्राप्त होतो त्या वेळी तो अत्यंत अशुद्ध व अनेक धातू व उपधातू यांनी

CamScanner

मिश्र असा असतो व म्हणून तो केवळ विष असतो. त्यास अष्टसंस्कारयुक्त शुद्धी व नंतर अमृत करण्यासाठी काही संस्कार व्हावे लागतात. ते कष्टदायक, खर्चीचे व कालावधी लागणारे असे असतात.

त्या सर्व प्रक्रियांतून पारदास तयार करून घेतले तर तो अमृतच आहे. तरीपण याचा अर्थ असा नाही की हे झाले म्हणजे त्याचे नुसतेच भक्षण करावयाचे, तो शुद्ध व अशुद्ध कसाही असो नुसताच पोटात गेला तर आतडी व चामडी फाडून शरीराचे बाहेर येईल याची सतत जाणीव ठेवावी. शुद्ध गंधकाबरोबर समभाग खलून त्याची कज्जली करून सर्व आयुर्वेदीय महत्त्वाच्या औषधात वापरतात. असे एकही महत्त्वाचे आयुर्वेदीय औषध नाही की ज्यात पारद नाही. पारा, हरताळ, गंधक, सोमल यांसारखी स्थावर विषे; पाल, विंचू, साप यांसारख्यांची जंगम विषे ही सर्व प्राणहारक असतात. परंतु श्रम व युक्तीने त्यातील प्राणहारक गुणधर्म काढून टाकून त्यांच्यातील रोगहारक गुणधर्मांचा उपयोग करून घेता आला पाहिजे. नागविषाचा कॅन्सरवर उपयोग होतो असे अलीकडेच माझ्या वाचण्यात आले आहे.

पारदात जरी प्रत्यक्ष अमृत असले तरी त्यात सामावलेल्या सर्व दोष व विषांपासून त्यास मुक्त करून त्यातील अमृतत्वाचा उपयोग व अनुभव घ्यावयाचा असतो. त्याकरता काय काय करणे आवश्यक आहे याचा यथाक्रम विचार करू.

अगदी प्रथम म्हणजे पारदात अष्टमहादोष असतात, ते त्यातून काढून टाकून नंतर त्याच्यावर अष्टसंस्कार करावयाचे असतात व त्या प्रत्येकाबाबत निरनिराळ्या प्रक्रिया सांगितल्या आहेत.

नागोर्वंगो मलोर्वन्हिश्चाचलस्य विषं गिरी ।
असह्याऽग्निर्महादोषा । निसर्गात् पारदे स्थिताः ॥

१. नाग (शिसे); २. वंग (कथील); ३. मल; ४. अग्नी. ५. चांचल्य; ६. विष; ७. गिरी व ८. अग्नीसहन न होणे असे आठ महादोष पारदात निसर्गतःच असतात. त्यांची निवृत्ती न करता पारद औषधी कामी वापरला गेला तर तो उलट महाहानिकारक होतो. कारण— १. शिशाच्या दोषाने जडत्व येते, अंगावर गाठी उत्पन्न होतात; २. कथलाच्या दोषाने कुष्ट होते; ३. आग्निदोषापासून दाह; ५. चांचल्य दोषामुळे शुक्रनाश; ६. विषदोषाने मृत्यू ; ७. गिरिदोषाने सर्वांगावर फोड येतात व अग्निसह्य दोषाने मोह व तंद्रा ही उत्पन्न होतात. याकरिता प्रत्येक दोषाची पृथक् निवृत्ती करून पारदाची शुद्धी करून घेणे आवश्यक असते. ती खालीलप्रमाणे.

१. जुनी बिटकर व हळद यांचे चूर्ण व लिंबाचा रस याने शिशाचा दोष; २. कडू वृन्दावन व अंकोलमूळ-साल याने कथलाचा; ३. बाहवा चूर्ण मलदोषाकरता; ४. चित्रकाच्या मुळ्यांच्या रसाचे भावनेने अग्निदोष; ५. धोत्र्याच्या भावनेने चांचल्य; ६. त्रिफळाच्या भावनेने गिरी दोष; ७. गोखराचे भावनेने अग्निऽसह्य

दोष, हे नाहीसे होतात. प्रत्येक चूर्ण पारदाच्या सोळाव्या भागाइतके वजनी घेऊन त्यात कोरफडीचा रस घालून तप्त खलांत प्रत्येक दोष जाण्याकरिता सकाळी एक प्रहर व सायंकाळी एक प्रहर याप्रमाणे प्रत्येकी सात सात दिवस खल करावा. निदान तीन तीन दिवस खल करणे पूर्ण झाल्यावर एक दिवस कांजीने स्वच्छ धुऊन गाळून घ्यावा. मग दुसरे औषध घालून खलांत टाकावा (कांजी म्हणजे तांदुळाची साळ एक भाग व सोळा भाग पाणी उकळून चतुर्थांश उरविणे.) याप्रमाणे प्रत्येक दोषाकरता तप्त खलांत खलून तो सर्व दोष व कंचुकीरहित करून घेणे म्हणजे तो औषधी व धातुवादाच्या कार्यास योग्य होतो. तप्त खल म्हणजे साधारणपणे एक किलो पाणी मावेल एवढा मोठा काळ्या दगडाचा खल असावा. त्याचे खाली बकरीच्या लेंड्या किंवा शेंगदाण्याच्या शेंगाची टरफले यांचा अग्नी असावा. ही क्रिया करीत असता पुष्कळ वेळा पारा उडून जात असतो. परंतु त्यास इलाज नाही. जितका हाती लागेल व उरेल तोच आपला. असे करताना पुष्कळ वेळा खलास टॉच पडते व फुटतोसुद्धा. हे सर्व जाणून व अनुभव घेताना नुकसान येऊन पुष्कळ वेळा पैसा, श्रम व वेळही वाया जाईल हे गृहीत धरूनच या प्रयत्नास लागावे.

याप्रमाणे प्रक्रिया केलेला पारद शुद्ध होतो. पारदशुद्धी करण्याच्या आणखी काही क्रिया सांगितलेल्या आहेत. परंतु त्या साकल्येकरून असल्याने व त्याचा मानवी शरीराशी संबंध येत असल्याने आळस न करता पृथक्‌शुद्धी करून घेतलेली उत्तम. या सर्व क्रिया एक तर स्वतः कराव्यात किंवा ज्याने प्रत्यक्ष आपल्या हाताने अनेक वेळा केल्या आहेत, जो विश्वासपात्र आहे व धार्मिक प्रवृत्तीचा आहे, ज्यास द्रव्यलोभ नाही अशाकडून करवून घ्याव्या. कोणत्याही फार्मसीकडून कधीही करवून घेऊ नयेत किंवा ज्यास द्रव्यलोभ आहे व ज्याने प्रत्यक्ष स्वतःच्या हाताने क्रिया केलेल्या नाहीत, अशाकडूनही करवून घेऊ नयेत; मग त्याचे नाव, इतर औषधीक्षेत्रात त्याचा अनुभव कितीही असो. द्रव्यलोभी जास्त द्रव्य मिळण्याच्या आशेने काही क्रिया न करता खोटेच सांगेल. कारण शुद्ध व अशुद्ध पारद हे दिसण्यात अगदी सारखे असतात. फक्त औषधीक्रियेत वापरला गेल्यावर फरक पडतो; पण तो फार उशीरा व मग इलाज राहत नाही. म्हणून ही धोक्याची सूचना, स्वतःच्या देखरेखीखाली केलेले सर्वांत उत्तम. म्हणजे आपणाला त्याची शंभर टक्के खात्री देता येते व गुणही येतो. दुसरे कोणीही केलेले असते तर त्याला अप्रत्यक्ष खात्री असते याची जाणीव ठेवावी.

अशा रीतीने शुद्ध केलेला पारद षंढत्व पावतो म्हणजे तो हीनवीर्य होतो. याकरता त्यास रोधन नामक संस्कार करणे जरूर असते व तो म्हणजे तो पारद काचकुपीत ठेवून त्यात बुडेल इतके पाणी टाकून दोन हात खोल खड्डा करून त्यात तीन दिवस पुरून ठेवणे. म्हणजे तो पुन्हा वीर्यवान होतो. याप्रमाणे तो शुद्ध दोषमुक्त व वीर्यवान झाला म्हणजे त्यास आठ प्रकारचे संस्कार करावे लागतात.

स्वेदनं मर्दनं चैव–मूर्छनीत्यापने यथा
पातनं रोधनं चैव नियामनमतः परम् ।
दीपनं चेति संस्कारा–सूत स्याऽष्टो प्रकीर्तितः ॥

१. स्वेदन; २. मर्दनः ३. मूर्छन; ४. उत्थापन; ५. पातन; ६. रोधन; ७. नियमन; ८. दीपन; हे त्याचे आठ संस्कार. तसे एकंदर अठरा संस्कार सांगितले आहेत. त्यांत हे आठ मुख्य आहेत.

या सर्व प्राक्रिया निरनिराळ्या असून त्यासंबंधी साविस्तर वर्णन ग्रंथांतरी दिलेले आहे. परंतु त्याचा या लेखाशी फारसा संबंध येत नसल्याने त्याचे विवरण येथे केलेले नाही. असा एक समज आहे की. पारदासंबंधी प्रक्रिया करताना विशेषतः धातुवादाकरता करीत असताना अनेक विघ्ने येऊन पारदसिद्धी मिळत नाही. याकरता पारदशुद्धीला घेताना अघोर मंत्राचा शुचिर्भूत होऊन निदान दहा हजार जप करावा.म्हणजे सर्व क्रिया निर्विघ्न पार पडून रसक्रिया पूर्णपणे सिद्धीस जाते. तो मंत्र येणेप्रमाणे आहे.

अघोरेभ्योऽथ घोरेभ्यो घोराघोरतरेभ्यः ।
सर्वतः सर्व सर्वेभ्यो नमस्ते रुद्ररूपेभ्यः ॥ १ ॥

पारद हे शिववीर्य असल्याने अघोर मंत्राचा जप केला तर प्रत्यक्ष शंकर त्याचे सर्व विघ्न निवारण करतात असे ग्रंथांतरी वर्णन आहे.

येणेप्रमाणे पारदाचे शुद्धीकरण झाले म्हणजे तो अमृताप्रमाणे गुणकारी होतो. त्यास कारणपरत्वे अष्टसंस्कार द्यावे लागतात. पुढे सांगितलेल्या क्रियेकरता नुसते शुद्धीकरण पुरे. याप्रमाणे पारद शुद्ध झाला म्हणजे त्यास खालील अठरापैकी मिळतील त्या चार घेऊन प्रत्येकीचा स्वतंत्र रस काढावा (अंगरस) व प्रत्येकी रोज सकाळी १ प्रहर व सायंकाळी १ प्रहर याप्रमाणे तीन दिवस तप्त खलात पारा टाकून रस थोडा थोडा टाकीत घोटीत जाणे व पारदाच्या वजनाच्या बरोबर रस जिरविणे. याप्रमाणे एका वनस्पतीचा रस जिरवून झाला म्हणजे दुसऱ्या वनस्पतीचा रस घेणे; असे प्रत्येकी तीन दिवस करावे. अग्नीवर सांगितल्याप्रमाणे बकरीच्या लेंड्या, तूस किंवा शेंगदाण्याचे शेंगांची टरफले याचा असावा व तोही मंदाग्नीचा असावा. तीव्राग्नी झाला तर खल फुटून जाण्याचा संभव असतो. असे करीत असता तीव्राग्नी झाला तर पारा उडून जाण्याचा संभव असतो. साधारणपणे एक किलोपेक्षा कमी पारा रसशुद्धी किंवा बंधनाकरता घेऊ नये. याप्रमाणे बारा दिवसांत चार वनस्पतींचा रस जिरवावा. यापैकी काही लवकर रस बंध करणाऱ्या आहेत, तर काहींना वेळ लागतो. म्हणून चार वनस्पतींनी रस बांधून लोण्यासारखा झाला नाही तर आणखी त्यातीलच एक-दोन वनस्पतींच्या रसाचा प्रयोग करावा.

या प्रयोगात पारा प्रत्येक वेळी धुऊन फडक्याने गाळून घ्यावा. पारा जास्तीत जास्त म्हणजे लिबलिबीत लोण्यासारखा होईल. यापेक्षा जास्त घट्ट कोणत्याही क्रियेने होणार नाही. त्यानंतर त्यास कांजी किंवा शिरक्यात स्वच्छ धुऊन त्यास रजत किंव

सुवर्ण यांचा यथायोग्य ग्रास द्यावा म्हणजे ज्या प्रमाणात घट्ट झाला असेल त्या प्रमाणात; कमी पडला तर गोळी बांधली जाणार नाही व जास्त झाला तर भुगा होईल व गोळी बांधणे शक्य होणार नाही. याकरता जपून काम करावे. केवळ अनुभवानेच योग्य प्रमाण कळते. गोळी बांधण्यायोग्य झाला म्हणजे त्याची गोळी न बांधता सर्व बाजूंस आतून कंगोरे ठेवून दोन्ही बाजूंस मोकळे असे, म्हणजे आत बद्ध पारदाची लुगदी बसविता येईल असे ठेवून म्हणजे फक्त बाहेरील बाजू व वर कडी असे करवून द्यावे. आत पत्रा वगैरे बसवू नये. त्या त्या कंगोऱ्या दाबून बद्ध पारदाची लुगदी बसवावी म्हणजे लॉकेट तयार झाले. मग ते लिंबाच्या रसात तीन दिवस ठेवावे म्हणजे बरेच घट्ट होईल व नंतर अगदी गरम (उकळते नव्हे) अशा करंजाच्या तेलात बुचकळून काढावे म्हणजे एकदम कडक होईल. एक-दोन दिवस राहू देऊन एखाद्या मृदू फडक्यावर दोन्ही बाजूंनी चांगले घासावे म्हणजे लकाकू लागेल. मात्र अशा प्रकारे एक-दोन लॉकेटस करण्याचा प्रयत्न करू नये. शुद्धीकरणाकरता निदान एक किलो पारद घ्यावा. त्यात फार तर १०० ग्रॅम शिल्लक राहील किंवा जितका शिल्लक राहील त्याचे लॉकेटस बनवावे. साधारण १५–२० तरी होतील व त्यास वनस्पती, रस, भट्टी मजुरी वगैरेमिळून प्रत्येकी पंधरापेक्षा कमी नाही व २० पेक्षा जास्त नाहीत अशी लॅकेटस तयार होतील पारद पूर्वी ५ रु. किलो होता; तो आज २५० रुपये (अडीचशे) आहे. हा भाव व चालू मजुरीचे भाव हिशेबात धरून ही किंमत साधारणपणे काढली आहे.

पारदबंधक अशा चौसष्ट वनस्पतींची यादी सापडते. परंतु त्यातील पुष्कळशा दुर्मिळ असून काहींची नावे बदलली गेल्याने ओळख राहिलेली नाही. तरी पण साधारण सुलभतेने मिळू शकतील अशा अठरा वनस्पतींची यादी खाली देत आहे. त्यातील कोणत्याही चार प्रयोगाकरता घ्याव्यात. कार्तिक ते माघ हे महिने रस काढण्यास उत्तम. आषाढ ते आश्विन वनस्पतीच्या रसात पाण्याचे प्रमाण जास्त असते, तर फाल्गुन ते ज्येष्ठ त्या कोरड्या होतात व रस निघू शकत नाही. एकीच्या रसाचे काम संपले म्हणजे दुसरीचा काढावा. प्रत्येक वेळी ताजा रस घ्यावा. रसक्रिया मुळात फार कठीण आहेत; तरीपण त्यातल्या त्यात सोपी करून मी नमूद केली आहे. वनस्पतींची नावे.

१ जलजमनी, २ शिवलिंगी, ३ विजया, ४ वाराही, ५ मूषाकर्णी, ६ अमरवेल, ७ नागिनी, ८ काळी तुळस, ९ पळसाची फुले, १० लाजाळू, ११ झेंडूची फुले १२ लाल तोंडली–फळे व पाला, १४ त्रिधारी चीक, १४ ज्योतिष्मती, १५ आवळे, १६ वज्रवल्ली, १७ कावळी, १८ तांबडी घेटोळी.

याप्रमाणे घट्ट केलेला पारद बसविलेले लॉकेट किंवा अंगठी शरीरावर सतत वापरल्यास तीन महिन्यांत शरीरातील रक्त अत्यंत शुद्ध व कोणत्याही आजारात प्रतिकारक्षम असे होते त्यास साथीचे आजार तर होत नाहीतच; परंतु ज्यात Bactria

CamScanner

(जंतु) चा प्रादुर्भाव असतो असे आजार होतच नाहीत. रक्तातील व शरीरातील कण न कण अत्यंत शुद्ध होऊन उत्साह व धारणशक्ती वाढते. नेहमीपेक्षा दुपप्ट चालले किंवा शारीरिक वा मानसिक कामे केली तरी थकवा येत नाही. झोप चांगली लागते. शरीर आरोग्यसंपन्न होऊन त्यास क्षय, कॅन्सर, दमा आव असे आजार होऊच शकत नाहीत व वापरणारा आरोग्यसंपन्न राहून दीर्घायुषी होतो. मात्र याचा अर्थ असा नाही की त्यास कधीच कोणताही आजार होत नाही. शरीर हे मर्त्य आहे व केव्हातरी मृत्यू पावणारच; परंतु सुखाने दीर्घायुष्य व आरोग्यपूर्ण जीवन जगता येते. किरकोळ पडसे, खोकला व ऋतुपरत्वे होणारे किरकोळ आजार होऊ शकतात, मात्र प्रकृतीस अपायकारक अशा सवयी नसांव्या व उगीच दांडगाईही नसावी. अगदी लहान मुलांच्या गळ्यात काळ्या दोऱ्यात घालून तांईत ठेंवला तर त्यास, लहान मुलास होणारे आजार तर सहसा होत नाहीतच; परंतु दातसुद्धा काही त्रास न होंता सुलभतेने येयात असा अनुभव आहे. मुले आरोग्यसंपन्न, आनंदी व टुणटुणीत राहतात व त्यांच्या तारुण्यातील आरोग्याचा पाया घातला जातो हे मी मागे सांगितले आहेच की, हे एक तर स्वतःच करावे किंवा निर्लोभी, जाणत्या व ज्यास अनुभव आहे अशांकडून घ्यावे; थोंडी जास्त किंमत पडली तरी हरकत नाही; कारण कोणत्याही वस्तूंची किंमत तिची दुर्मिळता व उपयोग यावर अवलंबून असते. ती तयार करण्यात खर्च किती येतो यावर नसते. अजाणता मनुष्य. साधुसंन्याशी किंवा फार्मसी यांच्याकडून चुकूनही घेऊ नये कारण त्यास सर्व शास्त्रीय पद्धतीने करण्याची साधने नसतात व वेळही नसतो. माहिती असणे हा प्रश्न आणखी निराळा. फसवे लोक अशुद्ध पारद, गांधूळ, मोरचूद, शिसे, कथील यापासून थोडया वेळात गुटी तयार करून देतात. मात्र ही काही उपयोगी पडण्यापेक्षा शरीरास अत्यंत हानिकारक अशी असते, याची जाणीव ठेवावी. या शास्त्रात थापा मारणारे व अतिशयोक्ती करणारेच फार असतात. मानवी शरीराशी संबंध असल्याने चुकूनही असा खेळ करू नये. प्रयोग करून पाहणे असेल तर शिशाचा पत्रा घेऊन त्यावर पारा चोळा; एक दोन मिनिटांत गोळी तयार होते किंवा अल्युमिनियमची वाटी थोडी खरडून त्याद पारद टाका; लागलीच भस्म बाहेर येऊ लागेल. परंतु हे सर्व अत्यंत हानिकारक असून त्याचा चुकूनही उपयोग करू नये.

यास एक थोडा पर्याय आहे व तो म्हणजे हिंगूळ लिंबूरसात खलून त्यातून पारा काढला तर तो शुद्धच असतो. तरी पण त्यास ५, ६, ७, ८ या शुद्धीकरणाच्या क्रिया केलेल्या बऱ्या असतात.

यापुढे मी आणखी एका महत्त्वाच्या क्रियेचे वर्णन करणार आहे. ती सर्वांस सुसाध्य अशी नसली तरी ती अत्यंत उपयुक्त म्हणून देत आहे. ज्यास शक्य असेल त्यांनी प्रयत्न करून त्याचा फायदा घ्यावा.

वरीलप्रमाणे पारदाचे अष्टदोष निवारण करून त्यास शुद्ध केले म्हणजे त्यास

बद्ध करण्याची प्रक्रिया करण्यापूर्वी खालील आठ संस्कार करावेत. (१) स्वेदन, (२) मर्दन, (४) उत्थापन, (५) पातन, (६) रोधन, (७) नियमन हे सात संस्कार ग्रंथांतरी दिले आहेत. त्यानंतर जो दीपन, आठवा संस्कार तो करावा. तो खालील पद्धतीने करावा;

अष्टादशांशभागेन कनकेनच सूतकः ।
निंबूरसेन संमर्घो वासरेक; मतः परम् ।।
क्षारैश्च लवणैः रम्यैः स्वेदितः कांजिकेन हि ।
क्षालितः कांजिकेनैव वक्त्रं भोक्तुं प्रजायते ।। १ ।।

शुद्ध पारदात अठराव्या हिश्शाने सुवर्ण मिसळून लिंबाच्या रसांत एक खल करणे, नंतर क्षार व पंच लवणे घालून तयार केलेल्या कांजीत दिवसभर स्वेदन करावे व कांजीनेच धुऊन घ्यावा म्हणजे त्यास मुख उत्पन्न होते व तो सर्व रोगांचे भक्षण करण्यास समर्थ होतो.

तीव्रत्वं वेगमारित्वं व्यापकत्वं बुभुक्षितः ।
बलवंतं विशेषेण कृते सम्यक् प्रजायते ।। १ ।।

अशा रीतीने बुभुक्षित झालेला पारद तीव्र, वेगवान, व्यापक व बलवान असा होऊन सर्व रोगांवर तत्काळ परिणाम करण्यास समर्थ असा होतो. या पद्धतीने पारदास प्रथम बुभुक्षित करून त्यानंतर त्यास पूर्वी दिलेल्या पद्धतीने बध्य करून त्याची गुटिकाकार गोळी बांधावी व निंबू रसात तीन दिवस ठेवून करंजेचे तेलात थोडा वेळ उकळून घ्यावी. अशा रीतीने ती घट्ट व टणक करून नंतर खालीलप्रमाणे उपयोग करावा. (अष्टसंस्कारासंबंधी सविस्तर विवेचन केले नाही याचे कारण एक तर त्या क्रिया पुष्कळ क्लिष्ट असून त्या कळल्या तरी निदान एकदा तरी एखाद्या माहीतगार व्यक्तीस मदतीस घेऊन स्वतः केल्याशिवाय जमू शकत नाहीत, व श्रम, वेळ व पैसा फुकट जातो. याकरता ज्यांना त्या प्रक्रिया करणे असेल त्यांनी त्या निदान एक वेळ तरी वरप्रमाणे स्वतः कराव्या.)

या गुटीचे वर्णन काय करावे ? ती मुखात ठेवली तर सर्व मुखरोग नाहीसा होऊन मनुष्य कितीही चालला तरी त्यास थकवा येत नाही. ती गुटी दुधात ठेवून ते तापवून गोळी बाहेर काढून ते दूध गाळून निजताना पिण्याची सवय ठेवल्यास थोड्याच दिवसांत तो व्याधिमुक्त होऊन ओज, सामर्थ्य, मेधा व कामवासना ही वाढतात. तो बुद्धिसंपन्न व बलसंपन्न बनतो. पारदाचे पेले राजे महाराजे लाख रुपये किंमत देऊन वापरीत होते. हीच गुटी चांदीच्या अथवा स्टेनलेसच्या भांड्यात ठेवून त्यात पाणी टाकून मंदाग्नीवर निम्मे होईपर्यंत उकळू द्यावे व मग ती गुटी काढून ते पाणी सेवन करावे. सुमारे दोन महिने याप्रमाणे नियमित सेवन करावे. नियमित सेवन करीत राहिल्यास दमा, ब्लडप्रेशर, मधुमेह, जुनी आव, प्रथमावस्थेतील क्षय, कॅन्सर, संधिवात यावर परिणामकारक असर होतो असा अनुभव आहे. त्या

आटवलेल्या पाण्याचे साखर टाकून सादरप केले तर ते टिकाऊ होऊन बाहेरगावच्या रुग्णासही देता येते व त्यांचाही चांगला अनुभव आहे. मात्र निदान महिना दीड महिना नुसता गुण दिसू लागण्यास लागतो, याची जाणीव असू द्यावी. याने टिकाउ असा गुण येतो. मात्र तो हळूहळू पण कायमचा असा असतो. आम्हीसुद्धा याबाबतीत प्रयोग करीत आहोत व काही असाध्य समजल्या जाणाऱ्या व्याधींच्या बाबतीत आश्चर्यकारक अशी प्रगती दिसून आली आहे. आमच्याकडील वैज्ञानिकांनी याबाबत संशोधन करून काही निश्चित असे सिद्धांत प्रस्थापित केले तर मानवजातीवर उपकार केल्याचे श्रेय मिळेल.

शैलोदक

व्याधिविमोचनाचा एक अनोखा प्रकार. आपणास कल्पनाही नाही असे अनंत चमत्कार या अवनीतलावर भरलेले आहेत. आपण आपले दैनंदिन चाकोरीतून वावरत असतो व त्याबाहेर काही निदर्शनास आले तरी आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. निरनिराळ्या वनस्पतीत ज्याप्रमाणे व्याधिनिवारणाचे गुणधर्म असतात त्याचप्रमाणे निरनिराळ्या प्रकारचे अपूर्व गुंणकारी व व्याधिहारक पाणी असते याची आपणापैकी फारच थोड्यांस कल्पना असेल. आपणास एकच म्हणजे गंगोदक माहीत आहे की जे सर्वदा निर्मळ राहते. तसेच, थोडेफार वज्रेश्वरी, उनमदेव, गौरीकुंड, बदरीनाथ येथील गंधकयुक्त उष्ण कुंडांची माहिती असते व त्यांचा चर्मरोगनिवारणाकडे उपयोग होतो हेही जवळपास राहणाऱ्यांना माहीत असते. श्री बदरीनाथधाम सहा महिने तरी सारखे बर्फात झाकलेले असते. तरीपण असल्या विलक्षण थंडीतही तेथील उष्ण कुंडातून सतत गरम वाफा निघत असतात. ते पाणी सतत इतके गरम ठेवण्याची किमया कशी होत असेल याची कल्पनाही करवत नाही. तेथे भर उन्हाळ्यात दुपारी गरम उकळता चहा दोन मिनिटांत थंड होऊन जातो. असो.

अशा प्रकारची औषधी गुणधर्मयुक्त अनेक प्रकारची उदके आहेत. त्यांपैकी खालील माझे वाचनात आहेत.

१. शैलोदक, २. विषोदक, ३. उष्णोदक, ४. संजीवनी उदक, ५. चंद्रोदक, ६. रक्तोदक, ७. कृष्णोदक, ८. घृतोदक.

या सर्वांसंबंधी व त्यांच्या गुणधर्मांसंबंधी संस्कृत वाङ्मयात पुष्कळ लिहिलेले आहे. परंतु पुष्कळ तपास करूनही शैलोदकाशिवाय कोणतेही माझ्या पाहण्यात आले नाही. म्हणून त्यासंबंधी वर्णन करून पाने अडवीत नाही. फक्त शैलोदक माझ्या प्रत्यक्ष पाहण्यात आहे व त्याचा थोडा फार अनुभव पण घेतला आहे व त्यातील व्याधिनिवारणच काय, परंतु आरोग्यरक्षक व व्याधिप्रतिबंधक गुणधर्म विलक्षण आहेत म्हणून ते उदक या प्रकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे वाटल्यावरून त्यासंबंधी माहिती देत आहे.

ग्रंथांतरी निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळी उदके असल्याचा उल्लेख सापडतो;

CS CamScanner

पण एक तर कालांतराने त्या ठिकाणी नावे बदलली आहेत व जी काही थोडी ओळखू येतात तेथील लोकांना त्याची काहीच माहिती आढळत नाही. त्यामुळे श्रम, पैसा व वेळ ही फुकट जातात. काही संघटित कार्य केले गेले तरच काही तरी होण्याचा संभव आहे. नाही तर सर्व विस्मृतीत अगोदरच गेले आहे, ते तसेच राहून मानव असल्या काही अमोल ठेव्याला मुकेल.

शैलोदकासंबंधी उल्लेख पुष्कळ प्राचीन संस्कृत ग्रंथातून आढळतात. शैल म्हणजे पर्वत व त्यातून येणारे पाणी ते शैलोदक. परंतु सर्वच नद्या पर्वतात उगम पावतात म्हणून काही त्या सर्वांचे पाणी शैलोदक नव्हे. शैलोदक फारच क्वचित मिळते. त्यास एक विशिष्ट अर्थ आहे. ज्या पाण्यात कोणत्याही पदार्थांचा कालांतराने शैल म्हणजे दगड होतो ते शैलोदक. हे पाणी वेधक असते; म्हणजे त्यात पडलेल्या पदार्थांवर ते पडल्यापासून वेध करू लागते व हळूहळू प्रथम त्याचा वरचा भाग शिलामय होतो व तसेच आत आत वेध करीत जाऊन सर्व पदार्थ शिलामय म्हणण्यापेक्षा शिलाच बनतो. त्या ठिकाणी गेले म्हणजे वेधक्रिया पाहावयास मिळते. प्रथम त्या पदार्थांचा—मग ते झाड, साल, पान, फूल, फळ काही असो, त्याचा वरचा भाग चुनखडीसारख्या पदार्थाने व्यापलेला दिसेल. काहीत निम्मेपेक्षा अधिक भाग चुनखडीसारखा दिसेल तर काही आतून-बाहेरून घट्ट असा चुनखडी झालेला दिसेल. मात्र त्याचा आकार कायम राहतो. फक्त वजन वाढते; म्हणजे पाहताक्षणीच वाटते की ही जिन्नस पूर्वी साल असली पाहिजे की फळ. जीवर अर्धे अधिक वेधक कार्य केले असेल त्यात वरचा भाग चुनखडीसारखा असून आतील भाग तसाच असेल. इतकेच नाही तर ज्या ठिकाणी प्रवाह वाहत असतो व तो काही कारणाने अडून मग पुढे जातो त्या ठिकाणी जाड असा चुनखडीसारखा थर आढळतो व हा फार औषधी उपयोगी असतो. याचे काही नमुने मजजवळ आहेत. पाणी मी दोन वर्षांच्या वर ठेवले. पण त्यात कसलाही थर आला नाही. जसेच्या तसे स्वच्छ व न नासलेले असे राहिले.

या पाण्यासंबंधी लॅबोरेटरी रिपोर्ट नुसते पाण्यासारखे पाणी आहे असा असून शिला झालेला पदार्थ कॅल्शियम आहे म्हणून सांगण्यात येते. यंत्र बिचारे त्यातील गुणधर्म काय सांगणार ? मला आठवते, एक वेळ अद्भुत गुणकारी असे सहस्रपुटी अभ्रक परीक्षेकरिता दिले होते. त्याचा रिपोर्ट ते राख आहे असा आला. समजा, श्री. आइनस्टाईनसारख्याचा मेंदू लॅबोरेटरीत पाठविला तर त्यात हाडे, मांस, पेशी, रक्त वगैरेची समग्र माहिती व त्यांचे प्रमाण कळू शकेल. त्यात वसत असलेली बुद्धिमत्ता, विचारशक्ती, वगैरेसंबंधी काहीच उल्लेख सापडणार नाही. फार तर आकारावरून धारणशक्ती जास्त असू शकेल, असे मोघम विधान करतील. ते सुद्धा मेंदू कोणाचा आहे ते कळल्यावर असो.

हे शैलोदक भारतात ठिकठिकाणी सापडते असे वर्णन आहे व त्यांचे वेधक-

CamScanner

शक्तीत फरक असतो. म्हणजे एखाद्या ठिकाणचे पाणी क्षणात वेध करते म्हणजे त्यात काही पडल्याबरोबर त्याचे शैल म्हणजे दगड होतो तर काही एक दिवसात, काही तीन, काही पंधरा दिवसांत, काही एक महिन्यात, काही तीन-सहा महिन्यांत, तर काही एक ते तीन वर्षांत वेध करणारी असतात. मात्र वेध करण्यास जरी कमी-जास्त वेळ लागत असला तरी त्या सर्वांचे गुणधर्म मात्र सारखेच असतात.

शैलोदकाचे प्रवाह असतात. आषाढ ते आश्विनमध्ये इतर पावसाचे पाणी त्यात येऊन मिळत असल्याने त्यावेळी शुद्ध स्वरूपात मिळत नाही. आश्विन ते वैशाख-ज्येष्ठमध्ये शुद्ध स्वरूपांत मिळू शकते. शैलोदक हे देह-लोहवेधक आहे याचा अर्थ, त्याने शरीरातील व्याधी तर निवारण होतातच, पण त्याच्या काही प्रक्रिया माहीत असल्या तर त्यापासून लोहवेध म्हणजे पारा किंवा तांब्याचे सोने सुद्धा होऊ शकते असे उल्लेख आढळतात मूळ सर्व संस्कृत श्लोकबद्ध आहे; मी फक्त त्याचा जरूरीपुरता अनुवाद देणार आहे. म्हणजे विस्तार वाचेल. येथे एक नमूद करून ठेवावेसे वाटते की आपल्या प्राचीन वाङ्मयात सर्वत्र अतिशयोक्ती आढळते. ती यथायोग्य समजावून घेऊन कालमानाप्रमाणे त्याचा अर्थ लावावा म्हणजे हजार वर्षे जगतो किंवा अजरामर होतो याचा अर्थ पुष्कळ वर्षे जगेल असा घ्यावा. दहा हजार हत्तींचे बळ येईल म्हणजे बलवान होईल असा घ्यावा. मात्र अनुवाद करताना मी जसेच्या तसे दिलेले आहे. संदर्भाने वाचकांनी समजावून घ्यावे म्हणून वरील सूचना.

(१) शैलोदक एक शेर घेऊन त्यात दहा तोळे दूध टाकावे व मंदाग्नीवर पाणी आटेपर्यंत आटवून ते दूध घ्यावे. असे तीन आठवडे करावे. शरीरावरील जरेच्या सुरकुत्या वगैरे जाऊन सुदृढ आरोग्यसंपन्न होऊन हजार वर्षेपर्यंत जगेल.

(२) त्याचप्रमाणे एक भाग कुळथा व आठ भाग पाणी टाकून $\frac{१}{८}$ उरवावे ते गाळून घेऊन त्यात चौपट तूप टाकून पुन्हा तापवून फक्त तूप उरवावे. त्यात समभाग मध मिळवून प्रकृतिमानाप्रमाणे खावे. एक महिनाभर याप्रमाणे सेवन केले असता सोळा वर्षांच्या मुलासारखा तरुण, बृहस्पतीप्रमाणे बुद्धिमान होऊन एक हजार वर्षे जगेल.

(३) त्याचप्रमाणे याच पद्धतीने ते सिद्ध करून त्याच्या शरीरास एक महिना मर्दन करावे सर्व प्रकारचे चर्मरोग वर्षाभरात नाहीसे होऊन दिव्य देह होईल व सहस्र वर्षे जगेल.

(४) रोज सकाळी उठून काही न खाता–पिता एक पेलाभर शैलोदक पिण्याचा प्रघात ठेवला तर सहा महिन्यांत त्याच्या शरीरातील सर्व रोग नाहीसे होऊन आरोग्यसंपन्न असा सहस्र वर्षेपर्यंत जगेल.

(५) शुद्ध पारद शैलोदकात एक महिना घोटावा. त्याची भुकटी तयार होईल. ही भुकटी योग्य प्रमाणात योग्य अनुपानासहित घेतली असता मनुष्य अजरामर होतो.

(६) किंवा त्या भुकटीत सुवर्ण किंवा सुवर्णभस्म मिळवून शैलोदकात दोन सप्ताह घोटावे व खैराचे अग्नीवर गुटी तयार करावी. ती गुटी तोंडात धरली असता शस्त्रस्तंभक होऊन संपूर्ण बलवान असा सूर्यचंद्र आहेत तोपर्यंत जगतो.

(७) कुळथी शैलोदकात ठेवून तिची शिला झाली म्हणजे सेवन करावी. सहा महिन्यांत क्लीबत्वरहित असा होऊन सहस्र वर्षे जगेल.

(८) हिंगण बेटाच्या फळात सुवर्णपिष्टी व अभ्रकपिष्टी ठेवून बंद करून शैलोदकात ठेवणे. त्या सर्वांसह त्या फळाचे शैल (दगड) झाले म्हणजे त्याचे चौसष्ट भाग ताम्र अथवा रौप्य (चांदी) यांचे सोने करील.

(९) पळस पापडीचे शैलोदकात पाषाण करावे. तिचे चूर्ण वंगाची चांदी करील.

(१०) हिंगणबेटाची साल किंवा हळकुंड शैलोदकात टाकावे. पाषाण झाल्यावर हिंगणबेट ताम्राची हळद शिशाचे सुवर्ण करील.

(११) कोहळे शैलोदकात टाकून पाषाण झाल्यावर दुधात टाकून भक्षण केले तर वज्रकाय होऊन दीर्घायू होईल.

याप्रमाणे अनेक प्रयोग दिलेले आहेत व सर्वांचा सारांश एकच की, त्या उदकाच्या योगाने देह व लोहसिद्धी होते. त्यातील अतिशयोक्तीचा भाग सोडून दिला तरी त्याच्या सेवनाने शरीरातील सर्व रोग, त्वचारोग सुद्धा नाहीसे होऊन आरोग्यसंपन्न होतो व योग्य रीतीने उपयोग करता आल्यास हीन धातूचे सुवर्णही करता येते.

साहाजिकच वाचक विचारतील की, असे हे शैलोदक आहे तरी कोठे ? मी पाहिलेले ठिकाण म्हणजे हरिद्वारजवळ चौदा मैलांवर हृषीकेश आहे; तेथे जाताना लक्ष्मण-झूला ओलांडला की उजव्या हातास स्वर्गाश्रमाकडे जाण्याचा रस्ता आहे. तो सोडून द्यावयाचा व डाव्या हाताकडे एक पायवाट आहे. तो जुना बदरीनारायणाकडे जाणारा रस्ता होय. त्या रस्त्याने सुमारे अडीच मैल चालत गेल्यावर (तेथे कोणतेही वाहन जात नाही.) गरुडचट्टी म्हणून आहे, तेथे श्री गरुडाचे मंदिर असून समोर एक कुंड आहे. त्याच्यापुढे सुमारे ५० फुटांवर एक ओढा खळखळ सतत वाहत असतो. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा सर्व काठ तळ पांढरे स्वच्छ दिसेल व त्यात अनेक काष्ठांचे पाषाण झालेले सापडतील तसेच त्यावर एक लहानसा पूल आहे. त्यास पाणी अडकते तेथें शैल पाण्याचे खडक झालेले सापडतात त्याचा औषधी उपयोग फार आहे. नुसती थोडी २ गुंजप्रमाण भुकटी सकाळ-संध्याकाळ मधात घेतली तर मधुमेहावर चांगला उपयोग होतो. मात्र कमीत कमी तीन महिने सतत घेतली पाहिजे. पथ्य नेहमीप्रमाणे. निराळे नाही.

पुण्याजवळ असे एक ठिकाण आहे की तेथे थोडा शोध घेतला तर शैलोदक मिळू शकते; नव्हे तशी माझी खात्री आहे. परंतु तेथील पुढाऱ्याचे त्याकडे लक्ष वेधूनही कोणीही त्याकडे लक्ष द्यावयास तयार झाले नाही. माझा त्यात स्वार्थ

काहीच नाही म्हणून उगीच कोणाची हांजी हांजी करीत बसणे योग्य न वाटल्याने त्याचा नाद सोडून दिला. पुणेकरांचे दुर्दैव दुसरे काय ! अशी दुष्प्राप्य वस्तू सन्निध असतानाही जनतेला तिची माहिती करून घेऊन लाभ देता येऊ नये, हे दुर्दैव नव्हे काय ?

योगवल्ली (अजानवृक्ष)

मी माझ्या पुस्तकात अजानवृक्षाबद्दल वेळोवेळी लिहिले आहे. परंतु त्याकडे अद्याप कोणाचे फारसे लक्ष गेलेले दिसत नाही. या वृक्षासंबंधी विशेष म्हणजे कोणत्याही वैद्यकीय पुस्तकात अथवा निघंटूत यासंबंधी उल्लेख आढळत नाही. परंतु श्रीज्ञानेश्वर हे त्रिकालज्ञानी होते; त्यांनी या वृक्षाचे महत्त्व जाणून त्यास जवळ केला व त्यासंबंधी थोडी माहिती ज्ञानेश्वरीतून, श्रीएकनाथांनी त्यांच्या भागवत एकादश स्कंदात दिली. पंधराव्या अध्यायात याचा ओझरता उल्लेख केला आहे. अजानवृक्षाचे फळ ते श्वानमुखी जाण । ते सेवन करता मनुज अजरामर होय निश्चित ।। हा वृक्ष फळमुळासहित अत्यंत उपयुक्त असून देह व लोहसिद्धि करणारा आहे. म्हणजे ज्याप्रमाणे शरीरातील सर्व व्याधीचे निर्मूलन करतो त्याचप्रमाणे धातुपरिवर्तनही करतो, असे त्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे व म्हणून ज्ञानेश्वरांनी तो आपल्या समाधीवर वेलीच्या स्वरूपात ठेवला आहे व त्याच्याखाली श्री ज्ञानेश्वरीचे अध्ययन करीत असलेली मंडळी आपणास नेहमी दिसतात. अष्टांग योगसाधन करून जे काही प्राप्त होते ते याचे, विशिष्ट प्रकाराने नुसते सेवन केले असताही प्राप्त होते असा यासंबंधी दावा आहे. म्हणून त्यास योगवल्ली असे पण नाव आहे. यासंबंधी काही वर्णन प्राचीन बाडातून सापडते, ते बरेच अतिशयोक्तिपूर्ण असल्याने आतापर्यंत त्याचा निर्देश करण्याचे टाळले होते. परंतु ते मजजवळ राहून असेच नाहीसे होण्यापेक्षा त्यास प्रसिद्धी मिळाली तर साधक अथवा प्रयोग तारतम्याने त्यापासून किती व कसे घ्यावयाचे याचा बोध घेऊन संशोधन करू शकतील व त्या अपेक्षेनेच मी त्यास ते अत्यंत गुप्त ठेवले असे सांगितले असताही त्यास प्रसिद्धी देत आहे, त्याचा वाचकांनी योग्य तो परामर्ष घ्यावा. जुन्या बाडात काही ओव्या मिळाल्या आहेत, त्या अतिशयोक्तिपूर्ण तर आहेतच; परंतु काही ठिकाणी अशुद्धही आहेत. त्या जशाच्या तशाच मी वाचकांच्या पुढे ठेवीत आहे. अशुद्धाचे प्रतिपादन केले जाण्याचा संभव असतो; म्हणून तो धोका पत्करला नाही. असो. त्या ओव्या खालीलप्रमाणे :

श्री

श्री गणेशायनमः । श्री सरस्वतये नमः ।।
श्री शांभवी जननी । योगायोगाची आदि भवानी
सुखेन मे शूलपाणी । म्हणोनि प्रकटेयी बळे ।। १ ।।

योगवल्ली छत्तीस अंग । सदतिसावी आपण सांग ॥
शिव नाना वेष घेतो । गगन चढे इज ऐसा ॥ २ ॥
न चढ ऐसा बळ कंठावरी । जिभेने हाणितो जिभेवरी
नाना धीतरा घेता तरी । नोहे ऐसे समाधान ॥ ३ ॥
ही आदिशक्ती चित्कळा । जिने भुलविला शिव भोळा ॥
तेची साध्ये दाऊ हेळा । योगिनी योगिया ॥ ४ ॥
योगिया अनुपान अंबिकेचे । सावध आकावया कान मनाचे ॥
घेत वल्ली परब्रह्माचे । सर्व आंगकारी रेणुके ॥ ५ ॥
सोमवारी अवसे सांजवेळी । अक्षदा करोनी पिवळी ॥
जावे भव्यवल्लीजवळी । सर्व कार्य आवतन ॥ ६ ॥
आमंत्रण देऊन साक्षी । शाखा । मूळसहित छायामध्ये सुकविणे ॥७॥
विरीसंग्र विक्रेचूर्ण । भरजन ठेवून कथील करंडा ॥ ८ ॥
मासा पत्री मासा घालू । जो करी सेवन
तरी परनारी वश होय । कामी नरा ॥ ९ ॥
जायफळ मासा मिश्रित । त्वरित होय शत्रुघात
लवंगी मासा सेवित । तरी न पुसे काम भरी ॥ १० ॥
वेलदोडे मासा सेवन । तरी वांझेस होय संतान
मिरीत घेता भान करी । कंपन परदळा ॥ ११ ॥
कंदयोमाजी जो रत । तरी निष्कामा काम सुरस ॥
जिऱ्यामाजी घेता मासा—तरी चुकला अन्याय सुधारी ॥ १२ ॥
काळ्या जिऱ्यास देता । तरी राज चढे हाता
दालचिनी सवे सेविता । स्वदरा व्रतस्थ होय ॥ १३ ॥
उदक मात्र भरी मासा घालोनी । तरी भव सिंधू तरीती चढाव घेता चूर्ण
तरी वाचा-सिद्धी लाभे तया ॥ १४ ॥
मिनी मासा मिळवून । तरी सभा आणावी जिंकोन ।
गोरख मुंढी करता सेवन भविष्य जाणे सर्व तो ॥ १५ ॥
सुंठी मुसळी मिश्रित तरी । विश्व मनोगत अवगत ।
सफेत मुसळी सवे सेवित । जाणे मृत्यू आपला ॥ १६ ॥
मनुखा मासा सारी । सेरी खुस्त शितल करी ।
सेविता आवडे कस्तुरी । सेरी सुत्स सीधे ॥ १७ ॥
कापरा सेवन । तरी वारा दिपका प्रसन्न ।
गुरुकंदासी खाणे । देवताप्रसन्न सर्वही ॥ १८ ॥
खसखसी माजी घेता । झाकळा जाय दूर पडता
बेदाण्यामाजी सेवता । सर्व श्वापदे मारी ॥ १९ ॥

बकुळामाजि सेवन । तरी तत्काळ सर्वजन वश होय ।
साखरेमाजि सेवन । सहज भोगणे इंद्रपद ।। २० ।।
आपुल्या रसांत । तरी तो जाणे जन मनोगत ।
सौंदडे रसे खात । विंदान करीत बीर गाढ ।। २१ ।।
जांभळी साली संगे । ब्रह्मपद जागे ।
आंबीयाच्या साली संगे । धनुर्विद्या जाणे ।। २२ ।।
महार गुंजा मुळी रसा । घेता ब्रह्मजागी खासा ।
काळा भोपळा सेवि रसा । धनाढ्य होय सेविता ।। २३ ।।
आमरा सौंदड एके ठायी । देऊनि रस तोयी
मालधी रामा लागे पायी । सपिनु तोही सिद्धी जाय ।। २४ ।।
गोदुग्धामाजि घेता । तरी पशू मनोगत जाणिता ।
गोमूत्रामाजि सेविता । सांगे पोटातील विश्वासे ।। २५ ।।
माते दुधामाजि सेवी । तरी तो परमहंस गोसावी ।
होसासी चढवी । जीवासि या ।। २६ ।।
गुरुतीर्थ संगे सेवन । तरी तत्काळ आत्मदर्शन ।
नाना अवतार खेळण । देव जाणे दुजा कैचा ।। २७ ।।
गुरु चालती तयाची मृत्तिका । मिश्रित करोनि सेविता ।।
तरी तो योगियामाजी अंबिका । पुत्र निकाग्रणी ।। २८ ।।
हे आदियोगिनी । कलालविका मार्च्छिद्रलागी ।
तिणे संतोषते सिबिका । मार्च्छिद्रा पार्वती ओपी ।। २९ ।।
तो मार्च्छिद्रनाथा योगी । देव झाला गोरक्षालागी ।
तो गहनी अंगी । लेववी गोरक्ष ।। ३० ।।
चौरंगी मैनिचा बोधला । तोचि गहनी निवृत्ती दादुला ।
सोपान मुक्ताबाई केला । ही योगिनी ज्ञानेश्वराची ।। ३१ ।।
ही योगिनी ज्ञानेश्वराची । सेविता सकळ सर्व कर्मांची
साधकी साध्याची । मूळवल्ली ।। ३२ ।।
आदिनाथविने अंगे । रंगला सर्व सांग ।
ईस सेविता सुरंग । नौ ऐसे समान ।। ३३ ।।
इचेनि समाधान अवसान । बळेचि योगिया नेईल धकाऊन
दावील परब्रह्म सदन । ऐसे सामर्थ्य दे जगदंबा ।। ३४ ।।
हे जगत मूळमाया पिठिणी । असे योगियांचे ध्यानी ।
ज्ञानेश्वराचे अंगणी । खेळतसे ।। ३५ ।।
हे प्रकट न करावी सज्जनी । गुप्त आचरोनि
दृढ राखावी आण । तया सद्गुरूची ।। ३६ ।।

CS CamScanner

शरीरामाजी छत्तीस सत्त्वे । जाण सदतिसावी पदवी गुरु खूण ।
योगी करती जैसे चिंतन । तैसे होय ॥ ३७ ॥
श्री निवृत्ती दाता समर्थ । तोचि गुरु बोलिला कळपात ।
ज्ञानेश्वरांचे मनोगत । संत समर्थ जाणती ॥ ३८ ॥
आपुले कार्य साधावे । सांधोनी गुप्त असावे
प्रकट करोन बोलावे । इतकेवरि सज्जना ॥ ३९ ॥
नैश्वर पदार्थ असता जीवगाठी । न बोले प्राण हारलीया कंठी
ऐसे ज्ञानेश्वराची गुप्त पोटी । वेद आज्ञा ॥ ४० ॥

* * *

CS CamScanner

१७. योगशास्त्र

अज्ञाताच्या शोधात योगास अद्वितीय महत्त्व आहे ही गोष्ट नितांत सत्य आहे. तरी पण हा विषय इतका गूढ व विशाल आहे की त्यासंबंधी या ग्रंथात अगदी संक्षेपाने जरी विचार करावयाचे ठरविले तरी त्याचा विस्तार इतका होईल की, या ग्रंथातील इतर सर्व प्रकरणे व हे एक प्रकरण बरोबरीचे होईल आणि तरीही इतका संकोच होईल की सामान्य वाचकास त्याच्या रूपरेषेचाही बोध होणार नाही. म्हणून यासंबंधी या ग्रंथांत इतकाच उल्लेख करीन की, वाचकांस त्याविषयीची गोडी उत्पन्न होऊन त्यावर इतरत्र जे विशाल वाङ्मय उपलब्ध आहे, त्याचा अभ्यास करण्याकडे त्यांची प्रवृत्ती होईल. विशेषतः या ग्रंथात मागील प्रकरणात निरनिराळ्या सिद्धीसंबंधीं जी वर्णने आली आहेत त्यांना अनुलक्षून जास्त विस्ताराने लिहीन म्हणतो.

या ग्रंथात जीवात्म्यांचे अस्तित्व, त्याच्याशी संबंध, Precognition, भविष्य-सिद्धी, दिव्य दृष्टी, दिव्य श्रवण, प्लँचेटने जीवात्म्यांशी संपर्क, मस्तिष्कशास्त्र, Spiritual Healing इ. अनेक विषय आले असून त्या त्या सिद्धी असलेल्या व्यक्ती व त्यांनी केलेली कार्ये याबद्दल उल्लेख आहेत. त्या त्या सिद्धी काहींना जन्मतःच होत्या, तर काहींना अकल्पित कारणाने प्राप्त झालेल्या होत्या. परंतु त्या कशा मिळवायच्या याचा मात्र कोठेही उल्लेख आढळत नाही व त्यांना त्याची फारशी कल्पना आहे असे पण वाटत नाही. जोपर्यंत या सिद्धी व्यक्तिगत असून त्या कशा मिळवायच्या याची कल्पना नाही व सर्वसाधारण जनतेस तत्संबंधी होणारे फायदे उपलब्ध करून देता येत नाहीत, तोपर्यंत नुसती करमणूक यापलीकडे या माहितीचा फारसा उपयोग नाही. कारण त्या जोपर्यंत केवळ व्यक्तिगत उपलब्ध आहेत तोपर्यंतच त्यांनी त्यांचा कितीही उदारपणे उपयोग करून फायदा करून देण्याचे ठरविले, तरी ते काही झाले तरी मर्त्यच आहेत व त्यांच्या पश्चात यासंबंधाने पोकळी निर्माण होऊन सर्व जनता त्या लाभास मुकते. एडवर्ड केसीचे या बाबतीत तेच झाले आहे. याकरिता त्या सिद्धी कशा प्राप्त होतील, याचे ज्ञान होणे अत्यावश्यक आहे व ते उपायसुद्धा असे असावेत की सर्वसामान्य जनतेपैकी जे कोणी तीव्रतेने मनावर घेऊन प्रयत्न करतील, निदान त्यांना तरी या साध्य झाल्या पाहिजेत.

आपल्याकडे सुद्धा हठयोग अथवा अष्टांगयोग याखेरीज ह्यासंबंधी फारसे वाङ्मय उपलब्ध नाही. या दोन्ही योगांनी निरनिराळ्या सिद्धी कोणत्या व त्या कशा मिळवाव्यात याचे सांगोपांग वर्णन केलेले आढळते. मात्र इतके खरे की त्यातील क्रिया इतक्या सुलभ नाहीत की, ज्या कोणीही करू शकेल. परंतु निदान त्या कोणत्या व कशा

आहेत हे कळले, तर त्यापासून सुलभ असा मार्ग कसा काढता येईल, याचा प्रयत्न पण करता येईल.

योग हा शब्द फार व्यापक अर्थाने वापरला जातो. त्यात ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग, हठयोग, राजयोग, मंत्रयोग, नादयोग, लययोग, इ. अनेक योग येतात व ते सर्व अद्याप तरी अज्ञात याच सदरात समाविष्ट होतात. यापैकी फक्त हठयोग व राजयोग यातील काही थोडा भाग आपल्याला या ग्रंथाच्या संदर्भात अभिप्रेत आहे. या सर्व योगांवर आपणाकडे पुष्कळ वाङ्मय उपलब्ध असल्याने त्यासंबंधी थोडी थोडी का होईना, पण चर्चा करून पाने अडवीत नाही. जिज्ञासूंनी त्यासंबंधी स्वतंत्र वाङ्मय जरूर वाचावे.

हठयोग व राजयोग यांनीसुद्धा सिद्धींच्या संबंधात जे काही लिहिलेले आहे, ते त्या मिळविण्याकरिता नसून त्या टाळण्याकरता आहे. त्यांचे मताप्रमाणे साधक समाधि-सिद्धीच्या मार्गाने वाटचाल करीत असता त्या वाटेत आडव्या येतात व त्याचा कैवल्य-सिद्धीचा मार्ग रोखून त्यास त्यापासून मागे खेचतात. म्हणून त्या कोणकोणत्या आहेत व त्यांची कोठे कोठे गाठ पडते यांची माहिती अशाकरता दिलेली आढळते की त्यांची योगमार्गातील साधकाला माहिती असली तर तो सावध राहून त्यांना टाळू शकेल व ते त्याने करावे, याच उद्देशाने त्यांचे वर्णन सविस्तर केलेले आढळते. त्यातील अगदी थोड्या अशा आहेत की त्यांचा उपयोग साधकास योग्य मार्ग आक्रमण करीत असता होऊ शकतो. त्यांचे म्हणणे असे आहे की या सर्व सिद्धी योगमार्गातील अडचणी असून साधक त्यात गुरफटला की मग तो या मार्गापासून वंचित होऊन ना इकडचा ना तिकडचा असा होऊन बसतो; असे वारंवार बजावून सांगितले आहे, ते त्या दृष्टीने बरोबर आहे.

हे सर्व जरी बरोबर असले तरी जगातील सर्व तीनशे कोटी लोकांनी योगी व्हावे असे कोणी म्हणणार नाही व तसा कोणी आग्रह पण धरणार नाही. तसा योगशास्त्राचा उद्देश पण नाही. काही अगदी अपवादात्मक व्यक्तीच योगमार्गात प्रवेश करू शकतात व त्यांपैकीसुद्धा अपवादात्मकच अखेरची सिद्धी गाठतात. त्यांनी सिद्धींबद्दल जी निवेदने केली आहेत, ते साधक व्यक्तीपुरते ठीक आहे; परंतु सर्वसामान्य जनतेस त्याचे काय ? दैनंदिन जीवन मोठ्या कष्टाने जगणाऱ्यांना त्याचे काय होय ? सामान्य माणसाला थोड्या श्रमात सुखी व निरोगी जीवन हवे असते व त्याकरता ज्या कशाचाही उपयोग होईल ते त्याला हवे असते. त्या दृष्टीने पाहता या सिद्धीपैकी काही जर दैनंदिन जीवनात मानवाच्या सेवेत आणता आल्या तर त्यास सुखी जीवन जगणे बरेच सुलभ होईल.

आपण पूर्वी पाहिले आहे, की अगदी एखादी लहानशी सिद्धी का होईना ती ज्या व्यक्तीस प्राप्त झालेली आहे त्यांनी जर ती निरपेक्ष भावनेने वापरली तर केव्हा तरी मोठे लोककल्याण करता येते. परंतु असे असले तरी त्याच्या पश्चात ते सर्व

कार्य एकदम बंद पडते व जनता त्या लाभास एकदम मुकते. याकरिता असा प्रयत्न व्हावयास हवा की कोणती एखादी लहानशी सिद्धी का होईना, पण ती मिळवायची कशी व ती विशेष सुलभतेने कशी मिळवायची म्हणजे सर्वसाधारण जनता त्याचा लाभ सतत घेऊ शकेल. आज वीज, किंवा वायरलेस यांचे शोध घ्या. यासुद्धा एक प्रकारच्या भौतिक सिद्धीच आहेत. सामान्य माणसास वीज किंवा वाफ अथवा वायरलेस यांचे तांत्रिक ज्ञान नसेल, तर त्यास वीज उत्पन्न करता येणार नाही किंवा वाफेचे इंजिन तयार करण्याची माहिती नसेल, परतु बटण दाबून उजेडाचा कसा उपयोग करून घ्यावयाचा अगर रेडिओ कसा चालू करावा याचे ज्ञान त्यास असले म्हणजे त्या शोधांचा सर्वसामान्य जनतेस चांगला उपयोग होऊ शकतो व याशिवाय ज्या कोणास त्यासंबंधी तांत्रिक माहिती कोणाला करून घेणे असेल तर ते सहज शक्य होते. असे या आध्यात्मिक सिद्धीबद्दल निदान अजून तरी झाले नाही. Peter Huros किंवा Ambrose पतिपत्नी किंवा चॅपमन ही मंडळी आज स्पिरिच्युअल हीलिंगचे अत्यंत स्तुत्य कार्य करीत आहेत, परंतु त्यांच्या पश्चात त्यांचे उत्तरदायित्व कोणासही घेता येणार नाही व ते कार्य बंद पडेल. असे होऊ नये म्हणून Jean Dixon ची महनीय सिद्धी किंवा इतरांची Spiritual Healing ची सिद्धी त्यांना–कशी का मिळाली असेना-या मिळालेल्या आहेत. याचा अर्थ इतर कोणीही मानव त्या मिळविण्यास पात्र आहे; मात्र त्या कशा मिळवायच्या याचे मार्ग उपलब्ध नाहीत. ते प्रयत्नांनी उपलब्ध करून घ्यावयाचे व ते सुद्धा अशा मार्गाने व पद्धतीने की तो मार्ग व पद्धत कोणीही अनुसरली तर त्यास ती सिद्धी प्राप्त झाली पाहिजे. तसे झाले तरच या लिहिण्याचा काही उपयोग झाला, नाहीतर नुसते कळून काय उपयोग ! याकरता प्रथम हे कळले पाहिजे की मानवी शरीरात कोणकोणत्या शक्ती कोठेकोठे सुप्तावस्थेत आहेत, व नंतर त्या जागृत करून त्यांचा उपयोग करून घेण्याचे मार्ग कोणते. एका माणसाच्या डोक्यात मेंदू आहे असे म्हटले की ज्याप्रमाणे तो सर्व माणसांच्या डोक्यात असलाच पाहिजे, हा सिद्धात आहे व तो बरोबर आहे, त्याचप्रमाणे कोणत्या का कारणाने होईना, परंतु एखाद्या व्यक्तीच्या अंतर्गत एखादी सिद्धी वास करीत आहे हे सिद्ध झाले तर ती इतर कोणातही असलीच पाहिजे हे ओघानेच आले. मात्र ती नुसती आहे हे कळून काही उपयोग नसतो तर ती कशी प्राप्त करून घ्यावयाची याचा मार्ग कोणी सांगितला आहे की कसे, असला तर तो किती व्यवहार्य आहे. त्यात काही सुधारणा करण्यास हव्यात की नाही किंवा नसलाच तर जो शोधून काढावयाचा तो असा काढावयाचा की तो सर्वसामान्य व्यक्तीस चोखाळता आला पाहिजे. इतके करता आले तरच त्याचा काही उपयोग. याकरता काही त्यागी व्यक्तींनी पुढे येऊन प्रयत्न करावयास हवेत. कदाचित असे होईल की प्रयत्नात त्यांचे सर्व जीवन व्यतीत होईल व सिद्धी मिळणार नाही. असे झाले तरी त्यांनी केलेले प्रयत्न मार्गदर्शक म्हणून पुढील पिढीस उपयोगी पडतील व ते कार्य पुढे

चालू राहील. आक्रोंडाचे झाड स्वतः फळ खाण्याकरता लावायचे नसते हे लक्षात असू द्यावे.

सिद्धीबद्दलची सांगोपांग माहिती प्राचीन वाङ्मयात फक्त हठयोग व अष्टांगयोगात सांगितलेली आहे. हे सुद्धा फक्त या दृष्टीने की त्या साधकाचे मागील अडथळे असून त्यात गुरफटल्यास पुढील मार्ग बंद होऊन त्याचे पतन होते. हे मान्य करूनही मी असे म्हणेन की पतन होऊनही जर मानवजातीचे कल्याण करता येत असेल तर ते पतनसुद्धा एक प्रकारचा त्याग होऊन त्या व्यक्तीस भूषणावह होईल. याशिवाय आपण पाहिले आहे की, जर कोणीही या सिद्धी निरपेक्ष व सेवाभावी वृत्तीने वापरल्या तर त्या नाहीशा न होता उलट त्यात अंतर्दृष्टी येऊन त्याचे काम सुलभ व मोठ्या प्रमाणावर होऊ लागते, याकरता तसा कोणताही किंतु मनात न बाळगता कोणत्या सिद्धी आपणामध्ये सुप्तावस्थेत आहेत याची संपूर्ण माहिती करून घ्यावी व त्यापैकी निदान एक तरी प्राप्त करून घेऊन ती सर्वांना सुलभतेने कशी प्राप्त करून घेता येईल याचा मार्ग दाखवून देता आला तरी पुरे.

सर्व आध्यात्मिक वाङ्मय धुंडाळून पाहता सिद्धीसंबंधी वर्णन व माहिती हठयोग किंवा अष्टांगयोगासारखी इतरत्र कोठेच आढळत नाही.

वास्तविक सर्वच योग अज्ञात अशा सदरात येतात व त्या सर्वांची माहिती साकल्याने का होईना परंतु या ग्रंथात येणे आवश्यक होती. परंतु त्याने ग्रंथविस्तार फार झाला असता व शिवाय त्यावर पुष्कळच मराठी वाङ्मय उपलब्ध असल्याने त्याची विशेष जरूर पण नव्हती. माझे 'वैतरणेचे ऐलतिरी' या ग्रंथात आवश्यकतेइतकी माहिती दिलेली असल्याने, द्विरुक्ती झाली असती; म्हणून या ग्रंथात सर्व योगांसंबंधी तर नाहीच परंतु हठयोग अष्टांगयोग यातील सुद्धा सर्व माहिती न देता, त्यातील सिद्धीपुरतीच माहिती देण्याचे योजीत आहे व त्याचा उद्देश इतकाच की या पुस्तकात इतरत्र बऱ्याच सिद्धींबद्दल वर्णन व उपयोग आलेले आहेत, परंतु त्या व इतर सिद्धी कशा मिळवायच्या व सर्व जनहितासाठी कशा राबवायच्या यासंबंधी माहिती दिलेली नसल्याने या प्रकरणात फक्त त्याबद्दलच माहिती देण्याचे योजीत आहे.

याविषयी मूळ विषयाला सुरवात करण्यापूर्वी एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते की प्राचीन वाङ्मय, मग ते कोणत्याही देशातील वा कोणत्याही धर्माचे असो, ते अतिशयोक्तिपूर्ण असते व आहे. त्याचा नीट अभ्यास करून त्यातील अतिशयोक्तीचा भाग काढून टाकून त्यातून दैनंदिन उपयुक्त असे काय असेल ते शोधून काढून त्याची स्वतंत्र नोंद करून व त्याबद्दलच प्रयत्न, प्रयोग करणे योग्य व उपयुक्त ठरेल. नाहीतर उगीच श्रम, पैसा व आयुष्य यांचा व्यय होऊन पदरात काहीच पडणार नाही. याप्रमाणे छाननी करताना हा आपला व हा परका असा भेद करू नये. ते जर तुमच्या शास्त्रीय दृष्टीला पटत नसेल तर योग्य कारणे देऊन निर्भीडपणे

तसे नमूद करून ठेवणे हे प्रत्येक शास्त्रज्ञाचे कर्तव्य होय. मग त्यामुळे आपल्या लोकप्रिययतेला बाध येईल हा विचार मनाला शिवू देऊ नये. तसे केले नाही तर चुकीचे मार्गदर्शन केल्याचा दोष आपणावर येईल. मात्र टीकेंकरता टीका, किंवा हा परका म्हणून त्यावर कडक टीका असे मात्र करू नये. होता होईतो टीका अशी करूच नये. तो मोह टाळावा व ग्रहण करण्यासारखे काय आहे ते निवडून बाकीचे टाळावे. परंतु टीका करणे प्राप्त आहे व तसे न केल्यास इतरांस चुकीचे मार्गदर्शन होईल असे वाटले तर कोणासही भीक न घालता जरूर करावी. उदाहरणार्थ, रामायणात सांगितले आहे की मारुतराय जन्मास येताच उड्डाण करून सूर्याचा चेंडू करून त्यास धरू लागले व सूर्य थरथर कापू लागला व त्याच वेळी राहू त्यास गिळण्यास आला होता. अगोदर तो पौर्णिमेचा दिवस असल्याने त्या दिवशी राहू त्यास गिळावयास येणे शक्य नव्हते व आज निदान सूर्य काय आहे ते आपणास माहीत आहे. त्यामुळे ही हकीकत खरी नाही हे सर्वांस कळते, परंतु बोलून दाखवण्यास सर्व कचरतात. त्याचप्रमाणे भारतीय युद्धात भीमसेन यांनी फेकलेले हत्ती जनमेजयाच्या वेळेपर्यंत वातावरणात फिरत होते व त्यासंबंधी चर्चा चालू असता त्यांपैकी एक हत्ती धाड्कन येऊन पडला अशी विधाने शेकड्यांनी सापडतील अर्थात अशा विधानांसंबंधी चर्चा किंवा टीका करण्याचे काही कारण नाही. कारण त्यापासून काही निष्पन्न व्हावयाचे नसते व ती असली म्हणून काही बिघडते असे पण नाही. परंतु ज्या ठिकाणची विधाने नुकसानकारक ठरण्याचा संभव वाटेल त्या त्या ठिकाणी तसे स्पष्ट सकारण नमूद करून ठेवणे प्रत्येक शास्त्रजिज्ञासूंनी आपले कर्तव्य समजले पाहिजे. त्यास योगवाङ्मय हे अपवाद आहे असे समजण्याचे कारण नाही. योग—त्यातले त्यात हठयोग व अष्टांगयोग हे शास्त्रीय पद्धतीनेच रचले व मांडले गेले आहेत हे निर्विवाद आहे व त्याचप्रमाणे तो सर्वग्राही आहे असेही मानण्यात येऊ नये. त्यातही पुष्कळ भाग अतिशयोक्तीचा आहे व त्याचप्रमाणे तो सर्वग्राही आहे असेही मानण्यात येऊ नये. याचा अर्थ आपल्या प्रचलित संदर्भापुरतेच बोलावयाचे म्हणजे त्यात ज्या सिद्धी वर्णन केलेल्या आहेत त्या सर्व खरोखरीच सुप्तावस्थेत आहेत असे समजू नये व त्यापेक्षा आणखी काही निराळ्या नसतील असेही समजू नये तर तारतम्याने व विचारपूर्वक त्यांपैकी कोणत्या खरोखरच असू शकतील, त्यापैकी कोणत्या सर्वसाधारण जनतेचे हितसंबंधात राबविता येतील त्या निवडून काढून त्यासंबंधी प्रयोग करावेत किंवा त्यात सांगितलेल्या मार्गाने मिळविण्याचा प्रयत्न करावा व प्रयत्न करतानासुद्धा असा मार्ग शोधण्याच्या प्रयत्ना असावे की सर्वसामान्य माणसाने मनावर घेतले तर त्यास ती सिद्धी मिळवणे सुलभ कसे होईल ?

याबाबत प्रयत्न व प्रयोग करणारास सुद्धा एक लहानसा इशारा देऊन ठेवावासा वाटतो की, सिद्धी पुष्कळच आहेत, त्या सर्वच किंवा त्यापैकी पुष्कळ एकदम मिळविण्याच्या प्रयत्नास लागू नये, कारण मग काहीच मिळणार नाही. याकरता

आपले मनःप्रवृत्तीस कोणती विशेष मानवते ती निवडून काढून बाकीच्यासंबंधी विचार मनातून काढून टाकावेत व एक म्हणजे एकच, ती आपणास पूर्णपणे कशी आकलन होऊन मिळेल त्याकरता प्रयत्नास लागावे. त्याबाबत जितके म्हणून वाङ्मय मिळविता येईल तितके मिळवून त्यासंबंधी सखोल अभ्यास करावा. त्यातील तज्ज्ञ समजल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी त्याच एका बाबीची चर्चा करावी. विचारविनिमय करावा, खूप चिंतन-मनन करावे, प्रयोगाची दिशा विचारपूर्वक व व पूर्वनिर्दिष्ट मार्गाने होता होईतो ठरवावी. त्यात आपले डोके फारसे चालवू नये, तर ज्यांनी अनुभव घेतला आहे त्यांचेच मार्गदर्शन उपयोगी पडेल मग तो ग्रंथ असो वा जिवंत व्यक्ती. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे सिद्धी मिळाली तर तिचा उपयोग स्वतःच्या फायद्याकरता चुकूनही करावयाचा नाही. हा प्रथम दृढनिश्चय हवा. मक तो फायदा आर्थिक असो वा कीर्तिरूप असो व ही वृत्ती कटाक्षाने अखेरपर्यंत टिकवली गेली पाहिजे. तसे नसले तर एक तर ती सिद्धी मिळणार नाही, व मिळाली तरी टिकणार नाही याची जाणीव ठेवावी.

हठयोग व पातञ्जलयोग यांत सिद्धींचे वर्णन व त्या कशा मिळवायच्या याचे विवेचन आढळते. त्यातल्या त्यात हठयोगात त्या शक्ती शरीरातील कोणत्या भागात सुप्तावस्थेत आहेत व त्या जागृत कशा करावयाच्या यासंबंधी वर्णन आढळते.

पातञ्जलयोगसूत्रात कैवल्यपादातील पहिले सूत्र असे आहे—

जन्मौषधि मंत्रं तपः समाधिजाः सिद्धयः ।।

काही सिद्धी जन्मतःच असतात. जसे पक्ष्यांस उडण्याची, जलचरांस पोहण्याची तसेच काही मानवांस जन्मतःच काही किंवा पुष्कळ सिद्धी प्राप्त झालेल्या असतात. शुकमहामुनी जन्मसिद्ध होते. त्याचप्रमाणे मी म्हणतो की श्री आद्यशंकराचार्य व श्री ज्ञानेश्वर हेही जन्मसिद्धच होते. त्यांना फक्त त्याची आठवण करून द्यावी लागली व त्या त्यांचे ठिकाणी प्रगट झाल्या. त्याचप्रमाणे काही औषधीतही काही विशेष गुण असतात. जसे भांग, गांजा किंवा अलीकडील म्हणजे L. S. D. यांच्यात जसे दुर्गुण आहेत, तसे गुणही आहेत. काही वनस्पतींसंबंधी मी 'वैतरणेचे ऐलतिरी' या पुस्तकात थोडेसे वर्णन केलेले आहे, वनस्पतीने रोगनिर्मूलन करता येणे ही सुद्धा एक प्रकारची सिद्धीच आहे असे म्हणावे लागेल.

वैद्यकशास्त्रात असे म्हटले आहे की, जितक्या वनस्पती त्या प्रत्येकात काही ना काही गुणधर्म आहेत. फक्त अद्याप आपणास त्याचे ज्ञान होणे आहे. त्यासंबंधी सविस्तर लिहिणे म्हणजे विस्तार होईल. तो एका स्वतंत्र लेखाचा विषय आहे. तरी पण वाचकांच्या माहितीकरता एक उल्लेख करून ठेवावा असे वाटते. अजान नावाची एक वनस्पती आहे. तिचा योग्य उल्लेख एकनाथी भागवतात आला आहे. ती वनस्पती आळंदी येथे श्रीज्ञानेश्वरांचे समाधीजवळ आहे व तेथे पानसुद्धा तोडण्याची मनाई आहे परंतु तेथून सुमारे एक मैलावर जेथे हल्ली नदीस धरण बांधले आहे त्याच्या जवळ बेट म्हणून एक जागा

आहे, तेथे वटवृक्षाखाली ज्ञानेश्वरादींनी तपश्चर्या केली असे सांगतात. त्या ठिकाणी दोन-तीन समाधीचे दगड पण दिसतात. त्या ठिकाणी शेतातही बरीच झाडे उगवलेली आढळतात. यासंबंधी काही लिखाण मजजवळ आहे. परंतु ते अत्यंत अतिशयोक्तिपूर्ण असल्याने ते येथे देऊन वाचकांची दिशाभूल करणे योग्य होणार नाही म्हणून देत नाही. तरी पण एक सांगण्यासारखे आहे की, वैद्यक ग्रंथात या झाडाचा उल्लेख सध्या आढळत नाही. पण हे प्रत्येक नाथाच्या समाधीजवळ हटकून आहे. अजूनही नाथपंथीय चांगले योगी व किमयागार आढळतात व त्यांच्याकडून असे कळते की, या झाडाचे पंचांगांत देह व लोहसिद्धी करण्याचे सामर्थ्य आहे. म्हणजे कोणत्याही हीन धातूपासून सोने बनविता येणे ही लोकासिद्धी व जरामरण यांपासून वाचवून शरीर आरोग्यसंपन्न राखणे ही देहसिद्धी. हे दोन्ही गुण त्यात आहेत. मात्र याचा उल्लेख कोणत्याही वैद्यक आणि इतर पुस्तकांत सापडत नाही. फक्त जाणकार नाथपंथीयच जाणू शकतील. तो एक चांगला संशोधनाचा विषय आहे. त्याच्या सेवनापासून ज्या सिद्धी योगक्रिया केल्याने मिळतात त्याही मिळू शकतात असा त्यांचा दावा आहे. निरनिराळ्या अनुमानांसोबत याचे फक्त चूर्ण घेतल्यास त्या आपोआप मिळतात असे सांगण्यात येते. मी एकच सांगू शकतो की, प्रयोग करणाऱ्यास निदान काही अपाय होणार नाही. उपाय काय होईल व कोणत्या सिद्धी मिळतील ते प्रयोग करूनच पाहावे व त्याप्रमाणे प्रसिद्ध करावे. निरनिराळ्या समाजांत निरनिराळ्या ठिकाणी पुष्कळ लोकांस अशा काही वनस्पतींची माहिती असते, परतु ती गुप्त ठेवण्याची त्यांची प्रवृत्ती असते. खटपट करून ती माहिती मिळवून संकलित करण्याकडे आमची प्रवृत्तीही नाही, हा दुसरा दोष. नाहीतर वनस्पतिसेवनाने सिद्धी मिळू शकतात असे निर्विवादपणे मला वाटते. फक्त त्या दृष्टीने सर्वांगीण प्रयत्न झाला पाहिजे. आपणास सर्व आयते पाहिजे; तसे हे नाही. असो.

तप व समाधी यांमुळे सिद्धी मिळतात, याबद्दल वादच नाही. याबद्दल येथे काही निराळे लिहिणे म्हणजे उगीच वाचकांचा वेळ घेतल्यासारखे होईल. शिवाय तो सर्वसामान्य वाचकांचा विषय पण नाही. सर्वसामान्य माणूस काही तप करणारा किंवा समाधीकरता प्रयोग करणारा असू शकत नाही, ही गोष्ट वादातीत आहे. त्यास आपल्या दैनंदिन गरजा भागविताना नाकी नव येतात. त्यांना त्यासंबंधी विवेचन करून काय उपयोग ? आता त्या सूत्रांपैकी राहिला मंत्र. श्री. पतंजलीचे म्हणणे आहे की, ज्याप्रमाणे तप व समाधीने सिद्धी मिळतात त्याप्रमाणे जप व मंत्राने देखील मिळू शकतात. यासंबंधी बरेच विवेचन माझे ‘ वैतरणेच्या ऐलतिरी ’ या पुस्तकात आलेले असल्याने त्याची द्विरुक्ती करीत बसणे योग्य होणार नाही. परंतु या प्रकरणातही त्याचा उल्लेख आला आहे म्हणून थोडे निवेदन करतो.

मंत्र हे दोन प्रकारचे मुख्यतः आहेत. काहींत स्वतःतच अंतर्गत शक्ती असते ते स्वतःसिद्ध (Objective) तर काहींच्या जपाने आपली आत्मशक्ती जागृत

करून तिच्याकडून काही अपेक्षित कार्य करून घ्यायचे असते. ज्या मंत्रास काही अर्थ असतो—मग ते कोणत्याही भाषेतील असोत—ते सर्व बीजमंत्र असून त्यांच्या जपाने आपल्या मनावर आघात करून आपलीच आत्मशक्ती जागृत करून तिच्याकडून ती कार्ये करवून घेणे असतात विंचू, साप, काही रोग वगैरेंवरील मंत्र या प्रकारात मोडतात. त्यात खरोखरी ते मंत्र कार्य करीत नसून आपली आत्मशक्तीच ते करीत असते. फक्त तिला त्यासंबंधात मंत्रजपाने जागृत करावयाचे असते इतकेच. त्यामुळे एखादा योगी किंवा महान भक्त, ज्याची आत्मशक्ती पुष्कळ विकास पावलेली असते, तो कोणत्याही आपल्या मंत्रावाचून ती कार्ये करू शकेल, करू शकतो व त्यास आपण चमत्कार असे म्हणतो. खरोखरी तो चमत्कार नसतो, त्याच्या आत्मशक्तीचा थोडासा आविष्कार असतो. याउलट Objective मंत्राचे थोडे निराळे असतात. अर्थहीन असे जे बीजमंत्र ते सर्व या पंक्तीत बसतात. त्यांची एक लहानशी जंत्री ‘ वैतरणेचे ऐलतिरी ’ व ‘ अमृत-तुषार ’ मध्ये दिलेली आहे. नुसते श्री किंवा ऐं किंवा ह्रीं यांना तसा काहीच अर्थ नाही, किंवा त्यांच्या उच्चाराने काही अर्थबोध पण होत नाही, ते कोणत्याही भाषेतील आहेत असे म्हणता येणार नाही.

खरोखर वर्णमालेतील एकेक अक्षर हे एकेक बीजमंत्र आहे. कौमुदीत सांगितल्याप्रमाणे श्री शंकराचे डमरूपासून ती बाहेर पडली आहेत. त्याचा एक विशिष्ट क्रम आहे. ‘ अ ई ऊ ण ऋ ऌ ऊ ऐ वो च ’ वगैरे व त्याला विशेष वैशिष्टय व महत्त्व आहे. त्याचा वैज्ञानिक दृष्टीने अभ्यास झाला तर त्यापासून पुष्कळ चमत्कार बाहेर पडतील. अशा त्या वर्णमालेतून काही थोडी १४—१५ बीजे निवडली गेली व त्यांचा अभ्यास झाला. त्यावरून असे आढळून आले की त्या प्रत्येक बीजात स्वतःचे असे सामर्थ्य आहे त्याचा जसजसा जितका जितका अधिक उच्चार होत जाईल तसतशी त्याची स्पंदने उत्पन्न होऊन ती आपल्या मेंदूवर, मनावर व आत्मशक्तीवर आघात करून त्याच्यात (बीजात) अंतर्भूत असलेली शक्ती उत्पन्न करून अपेक्षित कार्य करवून घेतात. काही बीजांचा उच्चार मोठ्याने करावयाचा असतो तर काहींचा परावाणीत, फार फार तर पश्यंतीत करावयाचा असतो. म्हणजे तो फलभूत होतो. त्याची दिलेली संख्या ही सर्वसाधारण म्हणून दिलेली असते. ज्याची विशेष तयारी पूर्वीच झालेली असते त्यांना तितक्या संख्येची गरज देखील पडणार नाही. इतरांस, जे अगदी नवखे असतील व ज्यांना तद्विषयक नियम पाळणे शक्य होत नसेल त्यांना तितकी संख्या जप जपूनही फळ मिळणार नाही. तरी पण सर्व साधारणपणे नियम सांभाळून फक्त संख्येइतका जप केला तर त्याचे फल मिळते असा अनुभव आहे. कोणी कदाचित असे विचारील की असे कसे होऊ शकेल ? औषधाच्या बाबतीत आपण पाहिले की त्यांना सिलेक्टिव्ह अ‍ॅक्शन असते (Selective action). म्हणजे समजा, एक औषध पोटात दिले तर किंवा इंजेक्ट केले तर त्याचा परिणाम मेंदूवर होईल, तर दुसऱ्याचा किडनीवर होईल. औषध घेण्याची

पद्धत तीच परंतु परिणाम मात्र निरनिराळे. पोटात गेलेले औषध रक्तात तत्काल मिसळून पण तीच क्रिया करते. अगदी त्याचप्रमाणे ही बीजमंत्राची स्पंदने नुसत्या शरीरातील निरनिराळ्या भागांवर परिणाम करतात असे नव्हे, तर मनावर परिणाम करून त्याची शक्ती त्या त्या दिशेने म्हणजे बीजात जी शक्ती अंतर्भूत असेल त्या दिशेने वाढवून शरीराबाहेरील ही कामे करवून घेता येतात. समजा, काही बीजात भविष्यासिद्धि प्रदान करण्याचे सामर्थ्य आहे तर त्याचे स्पंदनांनी मनात ती शक्ती प्रादुर्भूत होऊन तो भविष्य सांगू लागेल. औषधींचे परिणाम फक्त शरीरापुरतेच असतात तर या बीजमंत्राचे परिणाम शरीरात तर होतातच, पण शरीराबाहेरील जगातसुद्धा होतात असा अनुभव आहे. उदा० ॐ श्रीं हे बीज घ्या. यापासून अशी शक्ती प्राप्त होते की, आपण व्यवहार तरी कसा करावा, त्यापासून निदान आपल्या उदरनिर्वाहापुरते व अधिक कसे मिळवावे, त्याचप्रमाणे हा जप केलेल्या माणसाविषयी सहानुभूती उत्पन्न होऊन त्यास प्रापंचिक व आर्थिक मदत करावी अशी बुद्धी दुसऱ्यातसुद्धा उत्पन्न करण्याचे सामर्थ्य या जपात आहे. ॐ ऐं हा जप घ्या. याने आत्मसामर्थ्य वाढून वाणी शुद्ध व प्रभावी होते. शब्द तेच ते असतात; परंतु हा जप सिद्ध केलेला मनुष्य जे बोलतो त्यास आपोआपच महत्त्व येते. ॐ ह्रीं हा मंत्र घ्या. याने आत्मसामर्थ्य वाढते, आत्मविश्वास उत्पन्न होतो. जे करीन त्यात यश मिळवीन असे त्यास वाटू लागते व त्याप्रमाणे घडते. पण तोच जप एका विशिष्ट पद्धतीने सिद्ध केला तर तो इतरांचे लहानमोठे आजार दुरुस्त करू शकतो. त्याने विभूती अथवा पाणी जरी त्या मंत्राने अभिमंत्रून दिले, तरी ते कोणत्याही औषधाचे काम करतात. पुष्कळ वेळा औषधापेक्षाही विशेष काम करतात. अशा रीतीनें त्यांना पण Selective action आहे, परंतु पुष्कळ निराळ्या अर्थाने आहे. औषधीपेक्षा पुष्कळ अधिक कार्य ते करतात. पुष्कळ मंत्रांनी दिव्य दृष्टी, दिव्य श्रवण अशा सिद्धी मिळतात. त्यातल्या त्यात आपण ज्यास Black magic किंवा काळी जादू म्हणतो, त्यांनी तर विशेष चमत्कार पाहावयास मिळतात. अनेकदा ते अनर्थकारक असतात, हे मान्य करूनही त्यातील सामर्थ्य अमान्य करता येत नाही याकरता बीजमंत्राबाबत शास्त्रीय संशोधन होऊन त्या प्रत्येकात कोणकोणत्या शक्ती समाविष्ट आहेत त्या पूर्वग्रहरहित होऊन केवळ शास्त्रीय पद्धतीने पाहून काढून कायम केल्या तर त्यापासून बहूजन समाजास फायदा कसा करून घेता येईल याचा उपाय पण शोधून काढता येईल.

या ठिकाणी एक महत्त्वाची सूचना करावीशी वाटते की, वाचकांनी खरा विचार करावा. प्रत्येक विचारास आकार आहे व आपले विचार बोलून किंवा लिहून न दाखवता दुसऱ्यास सांगता येतात किंवा व्यक्तींना, ते पुस्तकात वाचावे असे कानामात्रेसुद्धा मनःपटलावर वाचता येतात. याचा अर्थ त्यांच्यापासून स्पंदने उत्पन्न होऊन ती त्यांच्या मनःपटलावर नोंदली जातात व त्याच्या भाषेत रूपांतर करून

CamScanner

आपणास ज्ञान करून देता येते. त्याचप्रमाणे प्रत्येक बीजात सुप्तशक्ती आहेत व त्या प्रकट करता येतात हे सिद्ध झाले आहे. याचा अर्थ ते सुद्धा अणुरूप आहेत. फक्त ते अणू निराळ्या प्रकारचे इतकेच. तसे नसते तर त्याची स्पंदने होऊ शकली नसती व ते परिणामही करू शकले नव्हते. अणू म्हटले म्हणजे, आजच्या शास्त्रीय व वैज्ञानिक परिभाषेत बोलावयाचे म्हणजे ते सुद्धा घनीभूत शक्तीचेच Concentrated Energy चेच बनलेले आहेत. आपण पूर्वीच्या प्रकरणात पाहिले आहेच की सर्व विश्वे ही त्या चित्शक्तीची निरनिराळ्या स्वरूपातील घनीभूत स्वरूपे आहेत. मग तो सूर्य असो, झाड, पशू, पक्षी, मानव अथवा त्याचे मन व देहात्मा वा जीवात्मा, काहीही असो, त्याचे बाहेर असूच शकत नाही. असे असल्याने बीजमंत्रात जी शक्ती सामावलेली आहे व जी अनेक लाख वेळा म्हणून स्पंदने उत्पन्न करून त्याचे काही थोडा अंशाचा फायदा करून घ्यावयाचा असतो त्यापेक्षा जर काही शास्त्रीय पद्धतीने या बीजातील अणू फोडून त्यातील शक्ती मुक्त करून उपयोगात आणता आली तर जगात एक निराळीच क्रांती झालेली आपल्या अनुभवास येईल व हे काम बौद्धिक शास्त्रात ज्यांना अणुविभाजनाची माहिती झाली आहे, त्यांना सुलभ जाईल. वाचकांनी ही निव्वळ कविकल्पना समजू नये. या विषयाकडे जेव्हा वैज्ञानिकांचे लक्ष जाईल तेव्हा निःसंशय जगाने आजवर अनुभवलेली नाही, अशी क्रांती—मात्र ती उपकारक अशी—अनुभवास येईल. हे थोडे विषयांतर झाले असले तरी चालू विषयास धरूनच आहे.

अष्टांगयोगात सिद्धीचे वर्णन जे श्री पतञ्जली महामुनींनी केले आहे, त्यात त्यांनी त्या सिद्धी कशा प्राप्त करून घ्यायच्या याच्या पण क्रिया सविस्तर सांगितल्या आहेत. त्या सामान्य वाचकास जमण्यासारखा नाहीत. तरी पण त्यांची माहिती असली तर अन्य प्रकाराने का होईना, पण त्या सिद्धी कशा प्राप्त करून घेता येतील, यांचा वाचकास काही विचार करता येईल. याकरता निदान त्या क्रिया व सिद्धी कोणत्या याची माहिती असली तर काही करता तरी येईल. माहितीच नसली तर काय करणार ? अष्टांगयोग म्हणजे आठ अंगांनी युक्त असा जो योगमार्ग तो. त्याची आठ अंगे म्हणजे यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी. हा अगदी स्वतंत्र विषय आहे व त्याचा थोडासा ऊहापोह ‘ वैतरणेचे ऐलतिरी ’ या पुस्तकात केला आहे, तो या संबंधाने जरूर वाचावा. यापैकी एकाच वस्तू किंवा विषयाविषयी धारणा, ध्यान व समाधियुक्त असे जे ध्यान त्यास संयम अशी संज्ञा योगात आहे. याचा अगदी सरळ व सोप्या भाषेत अर्थ असा की कोणत्याही एकाच वस्तूविषयी सतत बारा दिवस तो एकच विचार मनात ठेवून त्यावर सतत मन केंद्रित ठेवणे व त्या व्यतिरिक्त दुसरा कोणताही विचार मनात येऊ न देणे. यास त्या वस्तू अगर विषयावरील संयम असे म्हणतात. कोणत्याही वस्तू अगर विषयासंबंधी असा संयम सिद्ध झाला म्हणजे

CamScanner

ती वस्तू अगर तो विषय स्वत: आपणहून आपले हृद्गत सांगतो व त्या साधकास वस्तु अगर त्या विषयासंबंधी इतर काही अभ्यास न करता त्यासंबंधी सर्व ज्ञान आपोआप होते. अभ्यासाशिवाय बारा दिवस काय पण बारा सेकंदसुद्धा विचारातीत किंवा निर्विकार स्थितीत आपणास राहता येत नाही; याचा वाचकांनी अनुभव घेऊन बघावा. तरी पण ज्यांना खरोखरी काही करणे आहे त्यांनी प्रथम त्राटक सिद्ध करून मन निर्विचार करण्यास शिकावे. तसे करणे निदान पंधरा मिनिटे जमले, म्हणजे मग ते एकाच वस्तूवर किंवा विषयावर केंद्रित करण्याचा अभ्यास करावा. तो जर जमू शकला, तर तो वाढवून ५ घटिका म्हणजे दोन तासपर्यंत वाढवावा. तसा तो वाढविता आला तरी त्यास मी खाली लिहीत असलेल्या पुष्कळशा सिद्धींबद्दल निश्चित अनुभव येईल. हे सुद्धा कठीण आहे. मला जमलेले नाही म्हणून माझ्याकडून मार्गदर्शनाची अपेक्षा कोणी करू नये. परंतु ज्यांना हे जमलेले आहे. अशा काही व्यक्ती मला भेटलेल्या आहेत; त्यांच्या अनुभवावरून मी हे लिहीत आहे आता कशाकशावर कशा प्रकारे संयम केला म्हणजे कोणत्या सिद्धी मिळतात असे श्री पतञ्जलींनी सांगितले आहे ते सांगतो. त्या म्हणजेच सर्व आहेत असे नाही व त्या सर्व जशाच्या तशा अनुभवास येतील असेही नाही. काही अतिशयोक्तिपूर्ण असतील तर काहीत कालमानाने फरकही पडला असेल. वाचकांनी तारतम्याने आपली तयारी, अभ्यास व शक्ती पाहून त्यातून एखाद्याची निवड करावी व त्यासंबंधी प्रयोग करावा.

१. प्रत्ययस्य परचित्तज्ञानम् ।। ३–१९ ।।

दुसऱ्याच्या देहावर असणाऱ्या चिन्हावर संयम केला असता त्याच्या मनात काय चालले आहे ते कळते.

२. कायरूप संयमात्तद्ग्राह्यशक्तिस्तम्भे चक्षुप्रकाशासंयोगेऽन्तर्द्धानम् ।।३-२०।।

आपल्या शरीराच्या रूपात संयम केल्याने दुसऱ्याला आपले ठिकाणी रूप पाहण्यास प्रतिबंध होऊन योगी आपल्या इच्छेप्रमाणे अदृश्य होतो.

३. मैत्र्यादिषु बलानि ।। ३–२१ ।।

मैत्री, करुणा व मुदिता यावर संयम केल्याने तत्संबंधी बलवृद्धी होते.

४. बलेषु हस्तिबलादीनि ।। ३-२४ ।।

हत्ती इत्यादींच्या ठिकाणी संयम केला असता ती ती बले प्राप्त होतात. म्हणजे हत्तीच्या ठिकाणी संयम केला असता हत्तीचे; गरुडाच्या ठिकाणी केले तर गरुडाचे बल प्राप्त होईल, इत्यादी.

५. प्रवृत्या लोकन्यासात्सूक्ष्मव्यवहित विप्रकृष्टज्ञानम् ।।

हृदयकोशातील तेजोवलयावर संयम केला असता सूक्ष्मातील सूक्ष्म वस्तूचे किंवा दूर, अतिदूरच्या वस्तूचे दर्शन होऊन ज्ञान होते. त्याच्या दृष्टीस काहीच अडथळा आणू शकत नाही. त्यास भूमिगत त्याचप्रमाणे शेकडो मैलांवरील वस्तू दिसू शकतात.

६. भुवनज्ञानम् सूर्ये संयमात् ।। ३–२६ ।।

CamScanner

सूर्यावर संयम केला असता सर्व भुवनांचे ज्ञान होते.

७. चंद्रे ताराव्यूहज्ञानम् ॥ ३–२७ ॥

चंद्रावर संयम केला असता ग्रह, तारे इ. संबंधी ज्ञान होते.

८. ध्रुवे तद्गतिज्ञानम् ॥ ३–२८ ॥

ध्रुवावर संयम केला असता, ग्रह तारे आदींचे ज्ञान प्राप्त होते.

९. नाभिचक्रे कायव्यूहज्ञानम् ॥ ३–२९ ॥

नाभीच्या ठिकाणी असलेल्या चक्रावर संयम केला असता शरीरातील सर्व व्यवहारांचे-शरीरशास्त्राचे ज्ञान होईल.

१०. कण्ठकूपे क्षुत्पिपासानिवृत्तिः ॥ ३–३० ॥

गळ्याचे ठिकाणी जो खळगा आहे त्यावर संयम केला असता क्षुधा न तृषा यांचे निवारण होते.

११. कूर्मनाड्यां स्थैर्यम् ॥ ३–३१ ॥

कंठकूपाचे खाली हृदयाचे ठिकाणी एक कासवाचे आकाराची नाडी आहे, तीस कूर्म नाडी म्हणतात. तिच्यावर संयम केल्यास सर्प व घोरपड जसे गच्च बसतात त्याप्रमाणे स्थिरता येते.

१२. मूर्धज्योतिषिसिद्धदर्शनम् ॥ ३–३२ ॥

ब्रह्मरंध्राच्या ज्योतीमध्ये संयम केला असता अदृश्य अशा सिद्धीचे दर्शन होते. लहान मुलाच्या ठिकाणी नरम किंवा पोकळी अशी वाटते त्या ठिकाणी ब्रह्मरंध्राचा वास आहे. तेथे ज्योती कल्पून तीवर संयम करावयाचा असतो.

१३. हृदये चित्तसंवित् ॥ ३–३४ ॥

हृदयकमलाचे ठिकाणी संयम केला असता परचित्ताचे संपूर्ण ज्ञान होते.

१४. ततः प्रातिभश्रवणवेदनादर्शास्वादवार्ता जायन्ते ॥ ३–३६ ॥

बुद्धी ही भोग्य आहे व पुरुष हा चेतन आहे. तो भोक्ता आहे. हे दोघे निराळे असता बुद्धीचे सुखदुःखमोहज्ञान वगैरेंचा परिणाम पुरुषावर झालेले दिसतो. त्यामुळे त्या प्रतिबिंबावर सुख, दुःख, मोह इ. बुध्दीचे विकार भासू लागतात व त्यायोगे पुरुषच दुःखी, मूढ वगैरे भासू लागतो. त्यासच भोग अशी संज्ञा आहे. त्या दोहींचे ठिकाणी संयम केला असता दिव्यश्रवण, दिव्यदर्शन, दिव्य आस्वाद, दिव्य गंध इ. प्राप्त होतात.

१५. बंधकारणशैथिल्यात्प्रचारसंवेदनाच्चचित्तस्य परशरीरप्रवेशः ॥ ३–३८ ॥

(चित्त) मनाचे ठिकाणी धर्मअधर्मादिकांचे बंधन होऊन त्याचे अप्रतिहत गतीस प्रतिबंध होत असतो. त्यामुळे ते विशिष्ट मर्यादेपलीकडे जाऊन कार्य करू शकत नाही. त्यावर संयम केल्याने ते बंध शिथिल होऊन चित्त अप्रतिहत गमन करण्यास समर्थ होते. त्यामुळे त्यात मृत अथवा जिवंत शरीरात सुद्धा प्रवेश करणे सहज सुलभ होते, त्यासच परकायाप्रवेश म्हणतात.

१६. कायाकाशयोः संबंधसंयमाल्लघुतूलसमापत्तेश्चाकाशगमनं ॥ ३-४२ ॥

पंचमहाभूतांचे शरीर व त्यास आश्रय देणारे आकाश यांचे ठायी संयम केला असता आकाशगमन-सिद्धी प्राप्त होते.

१७. स्थूलस्वरूपसूक्ष्मान्वयार्थवत्वसंयमाद्भूतजयः ॥ ३-४४ ॥

पृथ्वी आदि पंचमहाभूते यांच्या स्थूलत्व, स्वरूपत्व, सूक्ष्मत्व, अन्वयत्व व अर्थवत्व या पाचही अवस्थांवर संयम केला असता पंचमहाभूतांवर जय मिळविण्याची सिद्धी प्राप्त होते.

१८. ततोऽणिमादि प्रादुर्भवः कायसंपत्तद्धर्मानभिघातस्य ॥ ३-४५ ॥

त्यायोगे अणिमादि अष्टमहासिद्धी व कायसंपत्ती प्राप्त होते, म्हणजे त्यास विषबाधा, शीत, उष्ण यांची बाधा होऊ शकत नाही.

(अणिमादि शक्तींचे वर्णन पुढे येईल.)

१९. रूपलावण्यबलवज्रसंहननत्वानि कायसंपत् ॥ ३-४६ ॥

त्यायोगे त्यास सर्वांगसुंदरता, वज्राप्रमाणे कठीणता, पराक्रम इ. प्राप्त होतात.

२०. ग्रहणस्वरूपास्मितान्वयार्थवत्त्वसंयमादिन्द्रिय जयः ॥ ३-४७ ॥

इंद्रियांच्या ग्रहण—स्वरूप—अस्मिता—अन्वयत्व—अर्थयत्व या सर्वांवर संयम केला असता इन्द्रियजय होतो.

या व यासारख्या बऱ्याच सिद्धी संयम करून कशा मिळवाव्यात, यासंबंधी श्री पतंजली महामुनींनी विवरण केले आहे. त्यांतील काही म्हणजे जे आपणास सुलभ व दैनंदिन व्यवहारात स्वतःस व आमजनतेस उपयोग होऊ शकेल असे निवडून त्याबद्दलच प्रयत्न करावा. यापैकी काही कदाचित अव्यवहार्य व अशक्य वाटतील. ज्यांनी काहीच केले नाही त्यांना तसे ठरवण्याचा अगर शंका घेण्याचा काहीच अधिकार नाही. याकरता त्यातील जे आपणास सुलभ, सोयीचे व उपयुक्त वाटेल ते निवडून त्याबद्दल प्रयोग करावेत. त्यापूर्वी एखाद्या निःस्वार्थी अनुभविक व्यक्तीस निवडून त्याकडून संयम म्हणजे काय व तो कसा करावयाचा हे नीट समजावून घेऊन शिकून घ्यावा. हे काम सोपे नाही. नुसती आसने, प्राणायाम किंवा जडसमाधी लावणाऱ्याचे सुद्धा हे काम नाही. त्यास अधिकारी पुरुषच हवा. याची प्रथम परीक्षा म्हणजे तो योगी आहे की नाही हे पाहण्यापूर्वी कनक, कामिनी व कीर्ती यांपासून मुक्त आहे की नाही हे प्रथम पाहा. यापैकी एकात जरी तो गुरफटलेला आढळला तरी उगीच त्याच्या नादी लागून आपल्या आयुष्याचा अमूल्य वेळ खर्ची घालू नका. अशी कोणी अधिकारी व्यक्ती भेटेपर्यंत त्राटक व ध्यानाचा वेळ वाढवीत चला. हळूहळू तुम्हाला अनुभव येऊ लागतील व योग्य मार्गदर्शक घरी चालून येतील. फक्त नियमपूर्वक व चिकाटीने कार्य सुरू ठेवा. चरातिचरतो भगः हे तत्त्व विसरू नका. कार्य करू लागा; कोणीही मदत करील या भरवशावर काही करू नका. आपल्या पायावर उभे राहून निश्चयाने मार्गक्रमण करू लागा. मार्गदर्शक जवळच भेटेल. मात्र खोट्या मार्गदर्शकाचे

CS CamScanner

नादी चुकूनही लागू नका. मग त्यासंबंधी लोकवार्ता काहीही असो. लोकांस नेहमी कोणीतरी छळविणारा लागतो व तसा कोणी धूर्त भेटला की मग ते सहज त्याच्या नादी लागतात. मी ईश्वर आहे, माझे स्मरण करा, मी डोक्यावर हात ठेवून कुंडलिनी जागृत करतो; मी गुरू आहे व गुरू हा परमेश्वराकडे जाण्याचे द्वार आहे, करता त्याचीच पूजाअर्चा करा, असे सांगणारी मंडळी कीर्तीचे नादी लागलेली असतात. त्यांच्या वाऱ्यासही उभे राहू नका. ते तुमचा नुसता वेळ फुकट घालविणार नाहीत तर ते या मार्गातील अज्ञानी असल्याने ते तुमचे नुकसान करतील. थोड्या अनुभवाने कोण कसा हे तुम्हास कळू लागेल. कस्तुरीचा सुगंध लपवून ठेवता येत नाही, फक्त नशिबाने ती प्राप्त झाली पाहिजे. मानवी शक्ती ही सर्वात श्रेष्ठ शक्ती आहे. खरा संयम म्हणजे एखादा पदार्थ किंवा विषय याचे ठिकाणी सतत बारा दिवस एकच एक विचार केंद्रित करणे. खरोखर जर असे करता आले तर मनाची शक्ती इतकी प्रचंड आहे की, त्या अवधीत त्या संपूर्ण विषयाच्या अंतरंगात शिरून त्यासंबंधी जे ज्ञान उपलब्ध असेल, ते त्यास अनायासे प्राप्त होईल. म्हणजे तो विषयच त्याला आपले हृदय उघडे करून संपूर्ण आत्मकथन करील. किंवा अलीकडील वैज्ञानिक भाषेत सांगायचे झाले तर तो योगी आपले चित्त त्याविषयाचे अगदी अणुअणूप्रत नेईल, इतकेच नाही तर ते अणू फोडून त्यातील सर्व शक्तिज्ञान वगैरे आत्मसात करून घेईल. मग ती वस्तू असो वा विषय. पूर्वाचार्यांनी वनस्पतींच्या गुणांचे ज्ञान अशाच पद्धतीने करून घेतले असले पाहिजे. सर्वसामान्य माणसास बारा दिवसच काय, बारा तास सुद्धा असे चित्त केंद्रित करता येणार नाही. याकरता त्राटकापासून प्रारंभ करून पाच मिनिटांपासून वाढवीत निदान पाच घटिका म्हणजे दोन तास लक्ष केंद्रित करता आले तरी पुरे. मात्र इतके तरी हवेच. कारण सिद्धी मिळविणे म्हणजे काही सामान्य कार्य नाही. याकरता काही असाधारणच श्रम केले पाहिजेत. उगीच सहजासहजी सिद्धी मिळेल अशी कोणी कल्पना करून घेऊ नये. निदान दोन तास तरी तुम्हास एकाच ठिकाणी लक्ष केंद्रित करणे जमणार नसेल तर उगीच वेळ घालवू नका. कारण खरोखरी दोन तास म्हणजे संयमाचा प्रारंभही नाही. दोन तास म्हणजे धारणा. २४ तास म्हणजे ध्यान व १२ दिवस म्हणजे समाधी. पैकी दोन तास म्हणजे केवळ प्रारंभच होय. परंतु तोही पुरेल, परंतु त्याहीपेक्षा कमी चालणार नाही. तुम्हास अनुभव येऊ लागेल की ते ते विषय तद्रूपता पावल्यावर आपापले हृद्गत सांगू लागतात.

हठयोग

योगासंबंधी लिहावयास घ्यावयाचे व तसे करताना त्या संबंधात फक्त सिद्धीबद्दलच लिहावयाचे हे खरोखरी अत्यंत गौण आहे. सर्व प्रकारच्या योगात जर सिद्धींचा उल्लेख काही कारणाकरता आला असेल तर फक्त त्या, साधक योगमार्गाची वाटचाल चालत असता, प्रयत्न न करताही त्यास वश होतात व त्याची वाट अडवून एक तर

CamScanner

त्याची वाटचाल बंद करतात किंवा त्यास आडवाटेने नेऊन खऱ्या मार्गापासून च्युत करतात. असे आहे म्हणून धोक्याचा सिग्नल या अर्थाने या सिद्धींचा उल्लेख आलेला आहे. असे असताना योगाबद्दल लिहिताना केवळ त्यांनी जे नको म्हणून म्हटले आहे तोच भाग तेवढा निवेदनांकरता घेऊन त्याकरता पाने अडविणे म्हणजे खरोखरी नुसते गौणच नाही तर आणखी त्याच्याहीपेक्षा काही खालच्या पातळीचे आहे. असे आहे तरी मी हे करण्यास का प्रवृत्त झालो आहे त्यासंबंधी सविस्तर विवेचन याच प्रकरणात यापूर्वी केलेले आहे. याबद्दल विचार करून वाचक क्षमा करतील अशी अपेक्षा करतो.

राजयोग व हठयोग यांच्या संदर्भात सामान्यजनांच्या काही विलक्षण समजुती आहेत. आपणांमध्ये तर एक शब्दप्रयोगच रूढ झाला आहे की, ‘आहे बुवा, तुमचा अगदी राजयोग दिसतो आहे.’ म्हणजे अगदी चंगळ चाललेली आहे. त्याचप्रमाणे हठयोग म्हणजे अट्टाहासाने काही तरी विक्षिप्तपणासारखे करीत राहणे. खरे म्हणजे दोन्ही नावे समानार्थी असून रूढ कल्पनांशी अगदी विसंगत आहेत. या दोन योगांखेरीज इतर पुष्कळ योग आहेत. ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग, मंत्रयोग, लययोग, नादयोग वगैरे वगैरे सर्व योगांचे अखेरचे ध्येय व साध्य एकच म्हणजे कैवल्यप्राप्ती किंवा तूर्यावस्थेतील समाधिअवस्था प्राप्त करून घेणे.

राजयोग व हठयोग याखेरीज इतर योगांनी सुद्धा मार्गक्रमण तेच होत असते. जसजशी त्या त्या योगात प्रगती होत असते, तसतसे साधकांना येणारे अनुभव तेच असतात. अगदी शेवटची अवस्था प्राप्त होण्यापूर्वी कुंडलिनी जागृत होऊन षट्चक्रभेदन होऊन ती ज्या वेळी ब्रह्मरंध्रापर्यंत पोचेल त्याच वेळी त्यास ही अखेरची अवस्था प्राप्त होईल. त्यावाचून नाही. लययोग घ्या की भक्ती, नाद कोणताही योग घ्या, त्या या साधनेत तन्मयता वाढत जाऊन तेच नाद, तेच ते अनुभव सर्व साधकांना येत राहतात. फक्त राजयोग व हठयोग याखेरीज इतर योगांतील मार्ग जरा लांबचा व Ironic असतो. राजयोग व हठयोग यात अभ्यास करून बळेच कुंडलिनी जागृत करून तिला ब्रह्मरंध्रापर्यंत न्यावयाची असते व असे केले म्हणजे त्या मार्गक्रमणात त्या साधकास इतर योग्यास येणारे अनुभव आपोआपच येत राहतात. इतर योगात कुंडलिनी जागृत करण्याचा असा प्रयत्न कोणी करीत नाही. तर तो साधक त्या मार्गाने जात असता त्या त्या ठिकाणी आला की कुंडलिनी आपोआप जागृत होऊन मार्गक्रमण करू लागते. त्यामुळे हे मार्ग बरेच लांबचे व Ironic आहेत. त्यात साधकास जाणीव नसते की, आपली कुंडलिनी जागृत केली अगर झाली असली तरी तिचे चालन करणे आहे. त्याची जसजशी त्या मार्गातील तन्मयता वाढत जाईल, प्रगती होत जाईल तसतसे हे आपोआप होईल व तितकी प्रगती अगर तन्मयता झाली नाही तर होणार सुद्धा नाही. राजयोग व हठयोग यात तसे नाही. ते मुळातच हात घालून कुंडलिनीस बळेच जागृत करून तीस आपली वाटचाल करावयास लावतात. याकरता राजयोग याचा अर्थ कैवल्यपद गाठण्याचा अत्यंत जवळचा असा राजमार्ग—

CamScanner

(चैन करीत व सुखोपभोग घेत, शिष्य–शिष्यिणींकडून पैसे उकळून चैन करणे हा राजयोग नव्हे तर तो अत्यंत हीन असा भोगयोग म्हणा हवे तर.) त्याचप्रमाणे हठयोग म्हणजे सुद्धा हट्टाग्रहाने काही तरी करून बसणे असा नसून दृढनिश्चयाने मी या मार्गाने जाऊन कैवल्यासिद्धी मिळवीनच मिळवीन—मग त्यात कितीही अडचणी येवोत, कितीही विघ्ने येवोत, त्या सर्वांना तोंड देऊन मी कुंडलिनी जागृत करून, शक्तिसंचलन करून तिला ब्रह्मरंध्रापर्यंत पोचवीनच; मग शेंडी तुटो वा पारंबी, अशा निश्चयाने साधक प्रारंभ करतो–आपला निश्चय तडीस नेतो, म्हणून त्यास हठयोग अशी संज्ञा आहे. म्हणून मी वर म्हटले आहे की, दोन्ही योग समानार्थी आहेत व ते खरोखरीच तसे आहेत.

राजयोग, हठयोग या दोहोंत अनेक सिद्धींचे वर्णन आहे. त्यात आठ महासिद्धी, दहा उपसिद्धी व अनेक क्षुद्र सिद्धी यांचा अंतर्भाव होतो. अष्टमहासिद्धींमध्ये १ आणिमा २ महिमा ३ गरिमा ४ लघिमा ५ प्राप्ती ६ प्राकाम्य ७ इशिता व ८ वशिता या मुख्य सिद्धी होत. यात १. आणिमा म्हणजे योग्यास अगदी अणूप्रमाणे लहान होता येते. किंवा आपणापेक्षा लहान प्राण्याचा देह धारण करता येतो व जड पदार्थांतून सुद्धा पार होता येते. याकरता मन अत्यंत सूक्ष्म करून अणुतन्मात्रावर संयम करावा. १. महिमा—यायोगे योग्यास आपला देह केवढाही मोठा करता येतो. ३. गरिमा— या सिद्धीच्या योगे योग्यास आपले शरीर खूप जड करता येते. यायोगे हवा तेवढा मोठेपणा मिळवता येतो. ४. लघिमा–शरीर अत्यंत हलके करून आकाशगमन सुद्धा करता येते. ५. प्राप्ती—या सिद्धीच्या योगे कशाचीही प्राप्ती करून घेता येते. कोणताही पदार्थ हवा म्हटला की तो समोर येऊन पडतो. किंवा एका लहानशा भांड्यात शिजवलेले पक्वान्न हजार व्यक्तींना पोटभर जेवू घालून तेवढे परत त्या भांड्यात उरविता येते. ६. प्राकाम्य कितीही दूरवरचा पदार्थ जवळ आणता येतो. किंवा त्यास स्पर्श करता येतो. कोठे काय चालले आहे अगर कोण, कोठे, काय बोलत आहे ते इच्छा केली असता पाहता अगर ऐकता येते. इतकेच नव्हे तर जीवात्मे किंवा spirit शी सुद्धा भाषण व व्यवहार करता येतात. ७. इशिता याचा अर्थ सत्ता चालविणे. हिच्या योगाने जडवस्तूवर सुद्धा सत्ता चालविता येते. इतरांच्या ठिकाणी आपणास हवे असेल त्याची प्रेरणा करता येते. सिद्ध पुरुष भेटून आपणास हवी असलेली मदत अगर मार्गदर्शन करतात. साधकास इच्छायोगाने कालावर सत्ता चालविता येते. त्यास त्रिकाल ज्ञान होते. भूतकालीन गोष्टी केव्हा, कोठे घडल्या ते सांगता येते. वर्तमानकाळी सुद्धा कोठे काय चालले आहे यासंबंधी इच्छा करताच त्यास त्यासंबंधी ज्ञान प्राप्त होते. त्याचप्रमाणे भविष्यकालीन घटनांचे ज्ञान होऊन त्या अचूक सांगता येतात. इतरांचे ठिकाणी शक्तीची प्रेरणा करता येते. श्री विष्णू भगवान यांचे ध्यानाने ही सिद्धी प्राप्त होऊ शकते. ८. वशिता ही सिद्धी प्राप्त झाल्यास यास सर्व स्थिरचर वश होतात. मानवांना तर

CS CamScanner

तो वश करून घेऊ शकतोच, परंतु व्याघ्र, सिंह, सर्प वगैरे हिंस्र व दुष्ट प्राणीसुद्धा वैर विसरून त्यास वश होतात व त्याच्या इच्छेप्रमाणे वागतात. जडसृष्टीवर सुद्धा त्याची सत्ता चालत असल्याने पाणी त्यास बुडवू शकत नाही. आकाशगमन करणे, पंचमहाभूतांवर ताबा मिळविणे शक्य होते. ताबा चालवून चमत्कार करून दाखविता येतात व विशेष म्हणजे त्या योग्यास सर्व विषय भोगूनही असंग राहता येते. ही मिळविण्यास नारायणध्यानाची आवश्यकता असते. याशिवाय ९. कामवयायित्व अशी एक नवीन सिद्धी सांगितलेली आहे. तीमुळे संकल्पसिद्धीसाठी वस्तुमात्राच्या गुणधर्मात सुद्धा फरक करता येतो. म्हणजे विषाची नुसती इच्छा केल्याने अमृत करणे. हीस सर्व महासिद्धीचा एकत्र परिणाम समजतात. हीस महासिध्दी सुध्दा म्हणतात.

याशिवाय दहा उपसिद्धी आहेत. त्या येणेप्रमाणे—

१. अनूर्मित्व— या सिद्धीचे योगे क्षुधा, तृषा, शोक, मोह, वगैरे ऊर्मीची बाधा होत नाही.

२. दूरश्रवण--कोणी—कोठे का बोलत असेना, याने इच्छा केली तर ते त्यास ऐकू येऊ शकते. कोणी कोणत्याही भाषेत बोलले तरी त्यास ते समजते.

३. दूरदर्शन— इच्छा करताच त्यास कोठे काय चालले आहे ते दिसते. सूक्ष्मातील सूक्ष्म त्यास दिसू शकते.

४. मनोजव—मनास वाटेल तेथे गमन करता येणे. हवे तेव्हा हवे तेथे क्षणमात्रात जाता येते. एका ठिकाणाहून नाहीसे होऊन दुसरे कितीही लांबचे ठिकाणी प्रकट होता येते.

५. कामयुक्त— हवा तो देह धारण करता येतो. त्यास इच्छा होईल तेव्हा जसे व्हावेसे वाटेल तसे होता येते.

६. परकायाप्रवेश—आपण वायुरूप होऊन दुसऱ्या सजीव अथवा निर्जीव देहात प्रवेश करून तेथे वास करता येतो.

७. स्वच्छंद मृत्यू—इच्छामरणी होणे.

८. सुरक्रीडाप्राप्ती—देवाचे दिव्य भोग मिळतात. देव–देवतांबरोबर मिसळून राहता येते.

९. संकल्पसिद्धी—मनात जे जे आणावे त्याप्रमाणे तत्क्षणी घडून येणे. मनात संकल्प येण्याचा अवकाश की त्याची तत्काल पूर्ती होते.

१०. अप्रातिहत आज्ञा—याची इच्छा किंवा आज्ञा कोणीही उल्लंघन करू शकत नाहीत. मानव तर नाहीच नाही, परंतु पशुपक्षीदेखील याची आज्ञा बिनतक्रार मानतात. तिचे उल्लंघन देवादिकसुद्धा करू शकत नाही.

क्षुद्र सिद्धी

क्षुद्र सिद्धी पुष्कळच आहेत त्यांपैकी मुख्य म्हणजे —

१. त्रिकाल—याने वर्तमान-भूत-भविष्यकालाचे ज्ञान होते.

CamScanner

२. अद्वंद्व—सुख-दुःख, शीत, उष्ण, मृदू, कठीण इत्यादी द्वंद्वांची बाधा होत नाही.

३. परिचितज्ञान—दुसऱ्याच्या मनातील किंवा स्वप्नातील सुद्धा सांगता येणे.

४. प्रतिष्टभ—अग्नी, वायू, उदक, शस्त्र, विष या सर्वांचा प्रतिकार करू शकतो. अग्नी त्यास जाळू शकत नाही. तो वायूबरोबर वायुरूप होऊन क्रीडा करू शकतो. बर्फासारख्या गार पाण्यात तो कितीही वेळ राहिला तरी त्यास ते बाधा करू शकत नाही. कसलेही तेज, शास्त्र, विष वगैरे त्यास अपाय करू शकत नाही.

५. अपराजय—वादात, युद्धात अथवा कोठेही, कोणीही त्याचा पराभव करू शकत नाही. त्यास नेहमी जय मिळत राहतो. सर्वत्र अजिंक्य राहतो.

याशिवाय क्षुद्र सिद्धी अनेक आहेत. त्या सर्वांचा उल्लेख करणे या ग्रंथाच्या कक्षेत बसत नाही. वाममार्गाने मिळणाऱ्या सर्व सिद्धी या क्षुद्र सिद्धींचेच प्रकार आहेत. या सर्व सिद्धींच्या बाबत एक नेहमी लक्षात ठेवावे की, या सिद्धी स्वतःच्या फायद्यासाठी किंवा कीर्तीकरता राबविल्या तर त्या हळूहळू नाहीशा होतात व साधकास अत्यंत हालात आयुष्याची अखेरी घालवावी लागते. त्याची आयुष्याची अखेरी अत्यंत हालअपेष्टात जाते; इतकेच नाहीतर मृत्यूनंतर सुद्धा त्याचा जीवात्मा बराच काल हालअपेष्टा व पश्चात्ताप यातच व्यतीत करतो, विशेषतः ज्यांनी वाममार्गाने काही सिद्धी मिळविलेल्या असतात, त्यांच्या बाबतीत हे शंभर टक्के अनुभवास येते; याची त्यांनी सतत जाणीव ठेवावी.

राजयोग व हठयोग यात यम, नियम, आसन व प्राणायाम येथपर्यंतचा मार्ग एकच आहे त्यानंतर मात्र राजयोग प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी या शास्त्रीय मार्गांनी प्रगती करीत असतो. खरोखरी हा राजमार्ग असून जवळचा पण आहे. परंतु हठयोगास ते मान्य नाही. प्राणायामापर्यंत तयारी झाली म्हणजे हठयोगातील साधक थोडा निराळा मार्ग अवलंबितो मात्र राजयोगी मार्गक्रमण करीत असता एखादेच सिद्धासनासारखे आसन सिद्ध करील व प्राणायाम सुद्धा प्रत्याहारादिकांकरता आवश्यक, तेवढाच त्या पद्धतीने आवश्यक तितकाच करून पुढील मार्गक्रमण सुरू करील. परंतु हठयोगी निरनिराळी आसने, बंध, मुद्रा, इत्यादींचा दृढ अभ्यास करील व त्याच्या साहाय्याने सुषुम्ना मार्ग बलपूर्वक खुला करून घेईल. त्याकरता प्राणायामाचे बरेच प्रकार सांगितले आहेत. त्यात त्याचा मार्गदर्शक सांगेल त्याचा अवलंब करून लवकरात लवकर सुषुम्ना मार्ग मोकळा कसा होईल, त्याचा प्रयत्न करील. त्याकरिता शरीरशुद्धीकरता नौली, धौती वगैरे जे जे काही प्रकार सांगितले आहेत ते सर्व करून संपूर्णपणे शरीरशुद्धी व नाडीशुद्धी करून घेईल की ज्यायोगे एकदा का कुंडलिनी जागृत केली की, तिचा मार्ग तिला अप्रतिहत चोखाळता यावा. शरीर थोडे जरी अशुद्ध व मलसहित असले तर जागृत झालेली कुंडलिनी शरीरात विकृती उत्पन्न करते व त्या साधकास वाटेल तो आजार होऊ शकतो. विशेषतः रक्तविकृती व हृदयविकार हे जास्त पाहण्यात येतात. याकरता आसन, प्राणायाम, नौली, धौती आदींनी संपूर्ण

शरीरशुद्धी झाली असून, सुषुम्ना, मार्ग संपूर्ण मोकळा झाला आहे, याची पूर्ण खात्री करून मगच पुढील प्रयोगास सिद्ध व्हावयाचे असते. राजयोगात मनःशुद्धी व मनाच्या शक्ती वाढविण्यावर त्याचप्रमाणे मन विचाररहित करून बलपूर्वक कुंडलिनी जागृत करून तिचे षट्चक्रातून चालन करावयाचे असते. साधकाची प्राणायामापर्यंत तयारी झाली म्हणजे सिद्ध केलेल्या आसनावर स्थिर बसावे. ते होता होईतो सिद्धासन किंवा पद्मासन असावे. व मग कमीत कमी वीस वेळा भस्त्रिका प्राणायाम करावा. म्हणजे सुषुम्ना मार्गात अजून काही अडथळे असले तर दूर होतात व कुंडलिनीचा वर जाण्याचा मार्ग पूर्णपणे मोकळा असतो. मग तिन्ही बंध करून, कुंभक करून उड्डीयानाने पोटाचा खालील भाग आवळून व मूलबंधाने कुंडलिनीस कोंडून प्राणायामाने तिचे उत्थापन करावयाचे असते. उड्डीयान व मूल बंधाचा चांगला अभ्यास झाला व प्राणायामाच्या वेळी कुंभक केला म्हणजे मूलाधारी स्थित असलेल्या कुंडलिनीच्या ठिकाणी उष्णता उत्पन्न होते. पोटात वायू उत्पन्न होऊन तो आवाज करू लागतो व ती उष्णता असह्य झाली म्हणजे कुंडलिनी आपले साडेतीन वेढे घेऊन जी सुप्त अवस्थेत पडलेली असते, ती जागृत होऊन ताठ होते व तिला कंदपीडनाने आणिक धक्के दिले की, ती सुषुम्नेतून मार्गक्रमण करू लागते. तयारी बरोबर नसली तर किंवा प्रथमावस्थेत ती थोडी वर जाऊन पुन्हा खाली येऊन सुप्त होते. मग तिचे पुन्हा चालन करावे लागते. असे करीत करीत तिचे सहाही चक्रांतून चालन करीत नेऊन तिला ब्रह्मरंध्रापर्यंत पोचवावयाचे असते व हे सर्व राजयोगाप्रमाणे अप्रत्यक्ष क्रिया न करता, तिला बलपूर्वक उठवून तिचे चालन करावयाचे असते. म्हणून या योगास हठयोग असे म्हटले आहे. या दोन्ही योगांत शक्तिचालन हेच प्रमुख साध्य आहे. हे सुद्धा इतर योगांप्रमाणे अप्रत्यक्ष नसून प्रत्यक्ष आहे. तरी पण त्यातल्या त्यात हठयोगाचा मार्ग अधिक जवळचा आहे; मात्र तो अधिक कठीण आहे व गुरुसान्निध्याशिवाय जमत नाही, हेही तितकेच खरे आहे. तरी पण राजयोगातील प्रत्याहार, धारणा, ध्यान यांनी सुद्धा शक्तिसंचालन होत असते व त्यायोगे राजयोग्यास ज्या शक्ति प्राप्त होतात, जे अनुभव येतात, ते सर्व या हठयोग्यात सुद्धा येतात. कारण दोहोंत कुंडलिनी जागृत होऊन तिचे शक्तिसंचालन व्हावेच लागते. राजयोगात ते काम मनामार्फत करावयाचे असते, तर हठयोगी ते काम स्वतःच शरीरामार्फतच करवून घेतो. त्यामुळे कुंडलिनी जागृत होऊन जे अनुभव येतात, ज्या ज्या शक्ती प्राप्त होतात, त्या दोहोत सारख्याच असतात. त्याचे सविस्तर वर्णन करणे या ग्रंथाच्या कक्षेत बसत नाही. म्हणून शक्तिसंचालनापर्यंतचा भाग देऊन आपण जो विषय हाती घेतला आहे, त्यास अनुलक्षून पुढे पाहू या.

कुंडलिनी म्हणजे काय, ती जागृत होते म्हणजे काय, तिचे उत्थापन होऊन ती षट्चक्रभेदन करते म्हणजे काय करते व त्यायोगे काय होते?

कुंडलिनी म्हणजे निदान साडेतीन वेढे घालून बसलेली एखादी नाडी नाही तर

ती साडेतीन मात्रायुक्त सर्वशक्तिसंपन्न अशी ॐकार स्वरूप साडेतीन मात्रांनी युक्त अशी महाशक्ती आहे व ती षट्चक्रे भेदन करते. म्हणजे शरीरात असलेल्या सहा स्नायुचक्रांतून किंवा Plexuses मधून जात नसते. तर त्या त्या ठिकाणी ज्ञानचक्रे असून त्यांच्यात निरनिराळ्या शक्ती सुप्तावस्थेत आहेत, त्यांना जागृत करून त्या त्या सिद्धी साधकास प्रदान करीत ती कुंडलिनी शक्ती आपला मार्ग आक्रमण करीत असते त्यामुळे राजयोगात मनाची शक्ती वाढवून जे कार्य करावयाचे असते अगर योगात आपोआप मनाची शक्ती वाढून अप्रत्यक्षपणे शक्तिसंचालन होत असते, ते हठयोगी बलपूर्वक करतो व त्यास अर्थात तीच फळे प्राप्त होतात, म्हणून धोक्याचा खरा पण हा अत्यंत जवळचा मार्ग समजला जातो.

शरीरात अशी एकंदर सहा ज्ञानचक्रे आहेत की, ज्यात निरनिराळ्या शक्ती सुप्तावस्थेत वास करीत असतात. त्यांपैकी एखाद्या चक्रातील एखादा भाग काही कारणाने जागृत झाला किंवा जन्मतःच जाग्रत असला तर त्यास त्या ठिकाणी असलेली दिव्य शक्ती, जी इतरांच्या ठिकाणी सुप्त असते, ती मिळते. आपल्याकडे निरनिराळ्या योगात साधक मार्गक्रमण करीत असता त्या त्या ठिकाणी ती ती चक्रे जाग्रत होऊन साधकास कैवल्यप्राप्ती होण्यापूर्वी त्या त्या सिद्धी मिळतात. फक्त राजयोग व हठयोग तर त्यांना बलपूर्वक जाग्रत करवून त्या प्राप्त करून घेता येतात. अशी ही ज्ञानचक्रे एकंदर सहा आहेत.

१. मूलाधार, २. स्वाधिष्ठान, ३. मणिपूर, ४. अनाहत, ५. विशुद्ध, ६. आज्ञा व त्यानंतर कैवल्यप्राप्ती देणारे व सर्वात महत्त्वाचे व मुख्य असे सहस्रदल. पैकी मूलाधार हे शिवणीचे ठिकाणी जी एक पोकळी आहे त्या ठिकाणी वास करीत असते. स्वाधिष्ठान हे उपस्थाचे ठिकाणी तर मणिपूर नाभीचे ठिकाणी, अनाहत हृदयाचे ठिकाणी, विशुद्ध कंठाचे ठिकाणी तर आज्ञाचक्र भ्रूमध्यात वास करीत असते. सर्वात अखेरचे सहस्रार हे मस्तकात ब्रह्मरंध्राचे ठिकाणी असते. या प्रत्येक चक्राची चित्रे सोबत दिली आहेत. त्यावरून कल्पना येईल.

१. यापैकी मूलाधार चक्रास चार दले असून ते वं शं षं सं या चार वर्णांनी चिन्हित अशा चार पाकळ्यांनी युक्त अग्नीच्या वर्णाप्रमाणे व भगाकृती असे हे मूलाधार चक्र आहे. त्यास वन्हिकुंड असेही म्हणतात. त्याची देवता भगवान गणेश असून, त्यात भगवती ज्योतिष्मती कुंडलिनी सुप्तावस्थेत वास करीत असते.

२. स्वाधिष्ठान—उपस्थाचे पश्चिमाभागी गुह्य देशात बं भं मं यं रं लं या सहा वर्णांनी चिन्हित अशा सहा पाकळ्यांनी युक्त सूर्य वर्णसमान व पोवळ्यांचे अंकुराप्रमाणे असे हे स्वाधिष्ठान चक्र आहे. याची देवता भगवान ब्रह्मा.

३. मणिपूर—नाभिप्रदेशात डं ढं णं तं थं दं धं नं पं फं या दहा वर्णांनी चिन्हित अशा दहा पाकळ्यांनी युक्त रक्तवर्ण असे हे मणिपूर चक्र आहे. त्याची देवता भगवान विष्णू.

४. अनाहत—हृदयप्रदेशात कं खं गं घं ङं चं छं जं झं यं टं ठं या बारा वर्णांनी चिन्हित व बारा पाकळ्यांनी युक्त असे सुवर्णपर्ण व अधोमुख असलेले असे अनाहत चक्र आहे. याची देवता भगवान शंकर.

५. विशुद्धी चक्र—कंठप्रदेशात अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ ऌ ॡ ए ऐ ओ औ अं जः या सोळा वर्णांनी चिन्हित अशा सोळा पाकळ्यांनी युक्त चंद्रवर्ण समान असे हे विशुद्धी चक्र आहे. त्याच्या डाव्या बाजूस इडा व उजव्या बाजूस पिंगला व मध्यभागी सुषम्ना आहे. याची देवता इंद्र.

६. आज्ञाचक्र—यास तालुका चक्र म्हणतात. हेच घंटिकास्थान असून दहावे द्वाराचा मार्ग आहे. दोन्ही भुवयांचे मध्ये हं व क्षं या दोन अक्षरांनी अंकित अशा दोन पाकळ्यांनी युक्त रक्तवर्ण असे हे आज्ञाचक्र आहे. याला हिंदुस्थान असेही म्हणतात. हे नासिक मूलाच्या नादोत्पत्तीचे स्थान आहे. या ठिकाणी प्रकाश व नाद यांचे ऐक्य होते.

निर्वाणसूचक ब्रह्मरंध्र सुईचे अग्रासारखे आहे. त्याचे वर दहाव्या द्वारात राहिलेले हजार पाकळ्यांनी युक्त स्फटिक वर्णासारखे असे सहस्रार ब्रह्मचक्र आहे. त्यात ज्ञानस्वरूप सच्चिदानंद आहे. ही जी चक्रे व त्याची दले म्हणून सांगितली आहेत, त्यात चक्रे म्हणजे सुषुम्नेबरोबर संबंध असलेले एक प्रकारचे शिरामंथन. यासच दले म्हटली असून त्यांनाच पद्मे म्हटले आहे. यांचे ठिकाणी प्रत्येक दलात निरनिराळ्या शक्ती सुप्तावस्थेत वास करीत असतात. भगवती कुंडलिनीचे उत्थापन होऊन ती वर वर जाऊ लागली म्हणजे या सर्व चक्रांचा भेद करून त्यातली दले विकसित म्हणजे जागृत करून, त्यातील सुप्त शक्ती साधकास मदत करीत करीत ती आपला वरचा मार्ग आक्रमण करीत जाते. यापैकी अनाहत हे मनःस्थान आहे. तेथे कुंडलिनी पोचली की, मनाच्या सर्व सुप्त शक्ती जागृत होऊन कार्य करू लागतात.

या सर्व ज्ञानचक्रांत तर सुप्त शक्ती आहेतच, परंतु त्या त्यातील प्रत्येक दलात विभागल्या गेल्या आहेत. उदाहरणार्थ, मूलाधार चक्रात चार दले आहेत व त्यात चार वर्ण आहेत. त्यातील व हा वर्ण खालच्या पाकळीत आहे. ही सर्व बीजे आहेत. त्यात व हे फार भारी आहे. या एका बीजाने सुद्धा सर्व मंत्र सिद्ध होतात. या दल.पासून विषयवासनेस चेतना मिळते. तीवर जय मिळवता आला तर मग आणखी काय पाहिजे ?

अशा रीतीने जेवढी म्हणून चक्रे आहेत व त्यात जितकी म्हणून दले आहेत, ती सर्व बीजे आहेत. थोडे सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर त्यात अ पासून क्ष पर्यंत सर्व वर्णमाला क्रमाने आली आहे असे दिसून येते व म्हणूनच म्हटले आहे की वर्णमालेतील प्रत्येक अक्षर हे एकेक बीज आहे व त्यातून निवडून, काही बीजे घेऊन, त्यांचे स्वतंत्र बीजमंत्र तयार झाले आहेत. यातील प्रत्येक वर्ण बीज आहे ही गोष्ट

खरी असली तरी ते कोणत्या चक्रात कोणत्या ठिकाणी स्थिर आहे याला खरोखरीच सर्व महत्त्व आहे. ग्रंथांतरी या प्रत्येक दलातील वर्णामध्ये कोणकोणत्या शक्ती सुप्त आहेत, त्यात कोणकोणते आनंद वास करीत आहेत, वगैरे समग्र वर्णन पाहावयास मिळते. परंतु विद्यमान काली त्याबाबत विज्ञानमय असे संशोधन होऊन त्यात प्रत्येकात खरोखरी कोणकोणत्या शक्ती सुप्त आहेत, त्या शोधून काढून त्यांपैकी आज सर्वसामान्य जनतेला कोणत्या सिद्धीचा उपयोग करून घेता येईल व त्याकरता काय करावयास पाहिजे यासंबंधी संशोधन शास्त्रीय पध्दतीने व्हावयास पाहिजे, म्हणजे एकाचा जो अनुभव येईल तोच प्रयत्न दुसऱ्याने केला तर त्यास तोच अनुभव आला पाहिजे. तिसऱ्यासही तसेच झाले पाहिजे व याप्रमाणे झाले म्हणजे त्या ठिकाणी ती सिध्दी वास करते हे सिध्द झाले व त्याचा मार्गही निश्चित झाला. याकरता ग्रंथातरी या सर्व सिद्धीबद्दल काय काय दिले आहे ते देता, त्याबाबत प्रत्येकाने अनुभव घेऊन आपापले अनुभव प्रसिद्ध करावे हे योग्य व उपयुक्त पण होईल.

परंतु प्रश्न असा उद्‌भवेल की करावयाचे म्हणजे तरी काय ? याकरता काही करावयाचे म्हणजे ते एखाद्या व्यक्तीने मनावर न घेता सामुदायिक रीतीने काही केले तरच काही होण्याची शक्यता आहे. षट्‌चक्र कोणती आहेत, यांपैकी दले कोणती व किती आहेत, त्यात कोणकोणते वर्ण आहेत. त्याचे रंग काय आहेत, त्यांच्या देवता कोणत्या, वगैरे वर्णन येथे दिले असून, त्यासंबंधी विवरणपर अशी चित्रे दिली असल्याने कोणते चक्र कोठे आहे व त्यात कोणत्या वर्णाचा वास कोठे आहे, याची वाचकास सहज कल्पना येईल.

सर्वसामान्य वाचकांपैकी प्रत्येक व्यक्तीस कुंडलिनी जागृत करून वरील अनुभव घेणे केवळ अशक्य आहे, याची मला जाणीव आहे; व तसे वाचकापैकी कोणीही करू नये, हे पण मी सर्वांस आग्रहपूर्वक सांगतो. कारण योग्य तयारी व योग्य प्रत्यक्ष मार्गदर्शन यांच्या अभावी त्यापासून कोणाचाही फायदा तर होणार नाहीच परंतु नुकसान मात्र निश्चित होईल. याकरता सर्वसाधारण वाचकापैकी कोणासही यापैकी काही करावे असे वाटले तर काय करावे ते सांगतो.

प्रथम एक गोष्ट सांगणे इष्ट वाटते की, हा प्रयोग कोणीही एखाद्या व्यक्तीने एकट्याने करीत राहणे फारसे फायदेशीर होणार नाही. एकाच मनाच्या, विचाराच्या साधारण निदान पाच व्यक्तींनी तरी एकत्र यावे व त्यांनी यापैकी कोणता प्रयोग हाती घ्यावयाचा ते ठरवावे. ते ठरवून झाल्यावर प्रथम त्राटकास सुरुवात करावी. साधारणपणे तीन महिन्यांत पंधरा मिनिटे त्राटक निर्विकारपणे करता येते असा अनुभव येईल. याकरता वेळ साधारणपणे रात्री नऊपुढील व स्थळ एकांत असावे. त्या ठिकाणी एखाद्या देवाचा फोटो, उदबत्तीचा सुगंध असावा. यासंबंधी वर्णन मागे येऊन गेले आहे, म्हणून येथे जास्त देत नाही. त्राटक करताना मुद्दाम निर्विचार मन करण्याचा प्रयत्न करू नका. फक्त कोणकोणते विचार मनात येतात

त्यावर लक्ष ठेवा व त्यांची नोंद ठेवा. कोणताही मनात येणारा विचार आपले लक्ष नसताना किंवा आपण त्याच्याशी तद्रूप झाल्याने निसटून जाणार नाही याची दक्षता घ्या. असे करीत गेल्यास साधारणपणे तीन महिन्यांत तुम्हाला असे आढळून येईल की, तुमचे विचार पुष्कळ कमी तर झाले आहेतच; परंतु तुम्हास तुमची इच्छा असेल तो विचार मनात आणून त्यावर आपले मन केंद्रित करता येते. त्यातल्या त्यात विद्यार्थी वर्गात त्याची बुद्धी कुशाग्र करून अभ्यासाच्या विषयाचे सुलभ ग्रहण करण्यास याचा अत्यंत उपयोग होतो व सर्व जीवनच सुधारते, असा अनुभव आहे. असो.

असा अभ्यास तीन महिने झाला म्हणजे वाटले तर त्राटक बंद करा. मात्र नुसते आसन व ध्यानाचा अभ्यास सुरू ठेवा. साधारणपणे दोन तास कोणत्या का होईना पण एकाच आसनावर त्रास न होता सुखाने बसता आले पाहिजे. त्या अवधीत मन अगदी निर्विचार कधीच करता येणार नाही, याचीही मला जाणीव आहे. परंतु ते निर्विचार न करता ते एकाच विषयावर किंवा मी म्हणतो एकाच विचारावर कसे केंद्रित करता येईल, याचा प्रयत्न करा. आणखी सहा महिन्यांत तुम्ही यशाच्या पुष्कळ जवळ आला आहात याचा तुम्हास अनुभव येईल. एक गोष्ट नीट ध्यानात असू द्या, की जे इतरांजवळ नाही असे काही विशेष तुम्हास मिळवावयाचे आहे व त्याकरता प्रयत्न पण तसाच करावयास हवा. खरे म्हणजे याकरता योगमार्गात संयम सांगितला आहे. संयम म्हणजे धारणा, ध्यान व समाधी या त्रयींचे एकीकरण करून होईल ते. म्हणजे धारणा याचा अर्थ निदान पाच घटका, म्हणजे दोन तास, मन एकाग्र करता आले पाहिजे. ध्यान म्हणजे २४ तास व समाधी म्हणजे बारा दिवस. यांपैकी आजच्या कालमानाने मी फक्त दोन तासच म्हणतो आहे. इतके मात्र कमीत कमी आहे. यापेक्षा कमी प्रमाणात असेल व इतके करणे जमणार नसेल तर सिद्धी मिळणे दुरापास्त आहे असे समजावे. याप्रमाणे तुम्हा सर्वांना एका आसनावर दोन तास मन एकाग्र करणे जमते असे दिसून आल्यावर कोणते तरी एक चक्र प्रयोगाकरता घ्या. त्यातल्या त्यात मणिपूर चक्र.

पाश्चात्य विद्वानांचे मत असे आहे : Solar Plexus किंवा यातील काही भाग जाग्रत झाला म्हणजे भविष्यसिद्धी, Ex-Ray Sight, Psychometry. दिव्यदृष्टी, दिव्यश्रवण, Telepathy सारख्या सिद्धी मिळतात. मात्र ते जागृत कसे करायचे याची त्यांना माहिती नाही. त्यांनी त्या दृष्टीने प्रयत्न केल्याचे निदान मला माहीत नाही. याकरता प्रथम मणिपूर चक्र प्रयोगाकरता घ्यावे त्याचे स्थान कोणते, ते कसे आहे, त्यातील वर्ण कोणकोणते आहेत, कोठे कोठे आहेत, याची सांगोपांग माहिती चित्रात मिळेल. त्याप्रमाणे ती जागा, ते चक्र, त्यातील प्रत्येकाने एखादे दल (मात्र ते प्रत्येकी निराळे असावे.) प्रयोगाकरता निवडावे व त्यातील एखाद्या वर्णावर लक्ष केंद्रित करावे. याप्रमाणे ध्यानास बसण्यापूर्वी पश्यंतीमध्ये निदान पंधरा मिनिटे श्रीनारायणाय

CS CamScanner

नमः हा जप करावा. अशा रीतीने त्या चक्रातील त्या एकाच एका दलातील, त्या एकाच एका वर्णावर लक्ष केंद्रित करा. निदान तीन सप्तके हा प्रयोग करा. काही तरी अनुभव निश्चित येईल. त्याने तुम्हास उत्तेजन मिळेल. अभ्यास चालू ठेवा. तुम्ही व तुमचे सहाध्यायी यांना काय अनुभव येतात ते एकत्र करा. तुम्हास जास्तीत जास्त सहा महिन्यांत निश्चित एखादी सिद्धी मिळेल. त्याच चक्रातील त्याच दलावर आणखी कोणास प्रयोग करू द्या. असे निदान तीन—चार व्यक्तींचे अनुभव एकत्रित करा. असा अनुभव आला की त्याने एकच एक सिद्धी प्राप्त होते; तर निश्चित करा की अमुक चक्रात अमुक शक्ती वास करीत आहे व ती या प्रकाराने कोणासही प्रयत्न केल्यास मिळू शकेल. अशा रीतीने सामुदायिक पण शास्त्रीय पद्धतीने प्रयोग करून संशोधन केल्यास मानवजातीस हितकर अशा काही सिद्धी निश्चित उपलब्ध होतील. मीं म्हणतो, प्रयत्न करून जीवात्म्याशी संपर्क, दिव्य दृष्टी, दिव्य श्रवण अशी एखादी जरी सिद्धी मिळवून ती मानव समाजापैकी कोणासही त्या मार्गाने प्रयत्न केल्यास मिळू शकेल असा मार्ग कोणी शोधून काढला, तर हा ग्रंथ लिहिल्याचे सार्थक झाले असे मी म्हणेन. एका अधिकारी पुरुषाने या संबंधात एक प्रक्रिया सांगितली आहे. तिचा अवलंब केल्यास सिद्धी मिळवणे सुलभ जाते म्हणून ती समग्र देऊन या प्रकरणाचा समारोप करतो.

वर सांगितल्याप्रमाणे कमीत कमी तीन महिने ब्रह्मचर्य व युक्ताहारविहारयुक्त त्राटक व ध्यान करावे. आहार सात्त्विक असावा. निद्रासुद्धा परिमित घेऊन, जवळ जवळ मौन पाळीत असावे. याप्रमाणे तीन महिने व्रतस्थ राहून त्राटक सिद्ध केल्यावर या प्रयोगास सुरुवात करावी. शक्यतोवर एकांत व ज्या ठिकाणी कोणी त्रास देणार नाही असे स्थळ निवडावे. याकरता घर सोडून अन्यत्र जेथे ही साधना करणे सुलभ जाईल असे स्थान शोधून साधनेच्या काळात तेथे वास करावा व खालील क्रियेस सुरुवात करावी.

रोज प्रातःकाळी चार वाजता उठून शौचमुखमार्जन वगैरे करून स्नान करून शुचिर्भूत व्हावे. त्यानंतर पाच तोळे तांदूळ घेऊन ते पाण्यात धुऊन त्या धुवणाचे पाण्यात चांगल्या चंदनाचे खोड उगाळून त्याचा २५ ग्रॅम किंवा दोन तोळे गंध घट्ट असा घेऊन त्यात तितकाच मध घालून प्राशन करावे. पुढे दिवसा केवळ दूध व भात असे थोडे व हलके अन्न सेवन करावे व रात्री मध, भाकरी, तूप, पोळी, दूध वगैरे सात्त्विक आहार करावा. तेल, तिखट, आंबट वगैरे रजोगुणी पदार्थ मुळीच सेवन करू नयेत. याप्रमाणे सेवन करून रात्री स्नान करून ध्यानस्थ बसावे व ध्यानात अजपाजप करावा. पुढे चार घटका रात्र राहिली म्हणजे पुन्हा स्नान करून वर लिहिल्याप्रमाणे झोप घ्यावी. रात्री झोप न घेता अजपाजप करण्यात वेळ घालवावा. याप्रमाणे निश्चयाने व अनन्य भावनेने क्रिया करीत राहावे. साधकाची पूर्वतयारी जर चांगली झाली असेल तर केवळ सात दिवसांत

CamScanner

अंधारात ब्रह्मरंध्रातून निघालेली प्रकाशमान ज्योती त्यात दिसू लागेल. तयारी कमी असली तर थोडे अधिक दिवस लागतील. तरी पण निश्चयाने क्रिया चालू ठेवावी. थोड्याच दिवसांत निश्चित अनुभव येऊ लागेल व एकदा अनुभव येऊ लागला की पुढील अनुभव लवकर लवकर येऊ लागतील. एक आठवड्यात जर ज्योती दिसू लागली तर पंधरवड्यात गुप्त विद्यांच्या मूल तत्त्वाचे ज्ञान होऊ लागेल.

एक महिन्याच्या शेवटी श्वासाची गती मंद मंद होत आहे, याचा त्यास अनुभव येऊ लागेल. दोन महिन्यांत त्यास जगतातील रचना समजू लागतील. चार महिन्यांत मनुष्याच्या मनातील सर्व विचार कळू लाणतील. पाच महिन्यांत शरीराची आंतररचना व मनोरचना समजू लागतील. पृथ्वीच्या अनेक भागांत कोणकोणत्या ठिकाणी कोणकोणती कार्ये होत आहेत, ते त्यास समजू लागेल. पुढे पुढे देवदेवता, सिद्ध पुरुष यांची दर्शने होऊन मार्गदर्शन मिळू लागेल. पुण्यवान पुरुषाने दृढ निश्चयानें सहा महिने सतत ही क्रिया केल्यास त्याच्या प्रबल इच्छाशक्तीने त्याच्यासारखीच एक आकृती त्याच्यासमोर प्रकट होऊन त्याला सांगेल की, तुझा शुद्ध आत्मा तुझ्या प्रबळ इच्छाशक्तीप्रमाणे कार्य करण्यास समर्थ आहे. अशा निरंतर वागण्याने वर सांगितलेला आकार आपल्या सुप्त इच्छेने आपल्या शरीरातून, आपल्या प्रबळ इच्छेप्रमाणे पाच—सात आकार धारण करून भिन्न भिन्न स्थानांत गमन करून आपल्या दृढ इच्छेप्रमाणे अनेक कार्ये करू शकतो. हे सर्व आकार आपल्यातच प्रकट होतात. याप्रमाणे श्री दत्तात्रेय, गोरखनाथ वगैरे तर करीत असतच, परंतु आजसुद्धा हिमालयातील काही महात्मे करीत असतात. प्रयोग साधा असून फारसा कठीण नाही; व त्यात प्राणायामासारखा कोणताही धोका नाही. दृढ निश्चयाने, नियमबद्ध ब्रह्मचर्याने राहून अभ्यास करीत गेल्यास कमी–अधिक कालांत का होईना निश्चित फलप्राप्ती होईल. हा प्रयोग सांगणाराचा अधिकार फार मोठा होता. असो. हे प्रकरण कल्पनेपेक्षा बरेच विस्तृत झाले आहे. त्याचा वाचकांना थोडा फार जरी फायदा झाला तरी लिहिण्याचे सार्थक झाले असे मी समजेन. हा लेख लिहिण्यात मी खालील ग्रंथ व लेखकांचे ऋण घेतले आहे. त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे मी माझे कर्तव्य समजतो. १. श्री. विवेकानंदांचा राजयोग, २. हठयोग–प्रदीपिका, ३. घेरंड संहिता, ४. योगसार, ५. योगशिखा, ६. श्री. खानवेलकर यांचे योगविद्या, ७. श्री. वैद्य यांचे षट्चक्र दर्शन व भेदन, ८. श्री. कोल्हटकर यांचे भारतीय मानसशास्त्र, ९. श्री. नानाभाई रेळे यांचे पातञ्जल योगशास्त्राचा अभिप्राय.

* * *

१८. मंत्र, तंत्र व यंत्र

माझ्या ' अमृत–तुषार ' ग्रंथातील प्रार्थना या लेखात व ' वैतरणेच्या ऐलतिरी ' यातील ' जप व प्रार्थना : विशेष विवरण ' या प्रकरणात जप ध्यान, लय यासोबत मंत्रासंबंधी शास्त्रीय माहिती व काही उपयुक्त मंत्र, त्यांचे विधी व शास्त्रीय माहिती दिलेली असल्याने त्यासंबंधी पुनरुक्ती करून या ग्रंथाची पाने अडविणे मला सयुक्तिक वाटत नाही, म्हणून तो विषयच या ग्रंथातून वगळावा असे मी ठरविले होते. परंतु नंतर विचार केला, हाही विषय अज्ञात या सदरात मोडत असून त्या दोन्ही ग्रंथांत फक्त एकाच अंगाची माहिती दिलेली आहे. त्याच विषयाचे दुसरे एक महत्त्वाचे अंग अगदीच उपेक्षित राहिले आहे. वाचकांची माहिती व उपयोगाच्या दृष्टीने सुद्धा त्यासंबंधी सवंध शास्त्रीय चर्चा जरी नसली तरी त्याची निदान त्रोटक माहिती असणे जावश्यक आहे, असे वाटल्यावरून त्यातील महत्त्वाच्या व वाचकांच्या दृष्टीने उपयुक्त भागाचे विवेचन येथे करण्याचे योजीत आहे. मात्र दोहोंची शास्त्रीय बैठक एकच असल्याने व शास्त्रीय चर्चा वरील दोन्ही ग्रंथांत साविस्तर येऊन गेलेली असल्याने ती या ग्रंथात न देण्याचे ठरविले आहे.

पूर्वी दिलेली माहिती साधारण उच्च थरातील आहे. त्या संबंधात समाजातील खालच्या थरात काय चालते ते अगदीच दुर्लक्षिले गेले आहे. ज्याप्रमाणे जप, ध्यान, लय, बीज, मंत्र इत्यादींनी काही विशिष्ट चांगल्या गोष्टी घडवून आणता येतात, त्याचप्रमाणे मंत्रशास्त्राची दुसरी पण बाजू म्हणजे धवल व कृष्ण, White व Black असे मंत्रात सुद्धा भेद आहेत. त्यातील काही धवल मंत्रांचा आपण या दोन्ही ग्रंथांत विचार केला आहे. त्याचप्रमाणे मंत्राची काळी बाजूसुद्धा वाचकांच्या हिताच्या दृष्टीने माहीत असणे आवश्यक आहे. काही मंत्र असे असतात की त्यांच्या योगाने एखाद्या व्यक्तीवर संकट आणता येते, आजारच काय परंतु मृत्युसुद्धा घडवून आणता येतो. विश्वास ठेवा, न ठेवा; पण असे प्रयोग करणारे लोक आहेत व त्यांच्याजवळ निश्चित अशा प्रकारची विद्या असते. या मंत्रांचीही स्पंदनेच असतात व ज्याप्रमाणे काही स्पंदने आजार घालवितात तसे काही आणतातही. त्यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. शहरी जीवनात आपणास त्यासंबंधी थोडीफार माहिती असली तरी फारसा अनुभव मात्र नसतो. त्यामुळे त्यावर कोणाचा फारसा विश्वास नसतो व ती एक हास्य व उपहासाची बाब होऊन बसलेली असते. परंतु थोडी कोणी चुणूक दाखविली की लगेच विश्वास बसून कोणाच्याही नादी लागून फसतात आणि पैसा व वेळ फुकट घालवितात. ज्याप्रमाणे धवल मंत्र विधानपूर्वक सिद्ध केल्यास निश्चित कार्यासिद्धी करतात त्याचप्रमाणे हे काळे मंत्रसुद्धा. त्यात गोवलेले तत्त्व एकच असल्याने तितक्याच निश्चिततेने यांचे पण कार्य सिद्ध होते.

महाराष्ट्रात त्याचा प्रचार जरी कमी असला तरी आपलेकडील कोकण, डांग विभाग तसेच मध्यप्रदेशातील बस्तर भाग, सर्व बंगाल सर्व तेलंगण, कामराज, ओरिसाचा काही भाग हे सर्व याकरता प्रसिद्ध आहेत. तिबेट तर त्याचे आगरच आहे. त्या त्या भागात याची प्रात्यक्षिके दैनंदिन जीवनात नेहमी पाहावयास मिळतात. फक्त देश–काल–भाषापरत्वे नावे व पद्धती निरनिराळ्या असतात इतकेच. करणी, चेटुक, प्रेत अथवा पिशाच्चसाधन वगैरे. त्यांची दैवते म्हणजे काली, वेताळ, भैरव, म्हसोबा, दुर्गा. यासच वाममार्ग असे दुसरे नाव आहे. बंगाल, ओरिसा, कामराज-मधील सर्व शाक्तपंथ याच वाममार्गातील. पुरीचे देवालय याचे प्रतीक आहे. तेथे देवळास कळस नसून चक्र आहे. देवळाच्या चारी बाजूस स्त्री-पुरुषांच्या रतिक्रीडेचे बीभत्स असे मोठे मोठे पुतळे असून लहान लहान तर शेकड्यांनी आहेत. विशेष म्हणजे त्या देवळातील दैवते जरी श्रीकृष्ण व बलराम हे असले तरी त्यांच्या सान्निध्यात नेहमीप्रमाणे रुक्मिणी नसून त्याची बहीण सुभद्रा आहे व त्या दैवताच्या स्थापन केलेल्या मूर्ती पाषाणाच्या नसून, लाकडाच्या आहेत. पूर्वापार अशी समजूत आहे की द्वारकेत सर्व यादवांचा क्षय झाल्यावर श्रीकृष्ण, बलराम व सुभद्रा यांचीप्रेते तेथे समद्रातून वाहत आली व त्यांची तेथे स्थापना केली. दर बारा वर्षांनी एक लाकडाचे ओंढके वाहात येते व त्यातून या तिन्ही मूर्ती कोरून स्थापना करतात असे सांगतात. (शाक्तांचे) मंत्र जसे वाम, तशाच त्यांच्या प्रक्रिया व आचार–विचार. सव्य किंवा धवल मंत्रसाधनेत ज्याप्रमाणे पवित्र आचार–विचार–आहार यांना महत्त्व, त्याच्या अगदी उलट म्हणजे वाम मंत्रधाधनेत सर्व प्रकारच्या दुर्गुणांना फार महत्त्वाचे स्थान असते.

घट-कंचुकी म्हणजे अगदी सामान्य व प्रारंभिक प्रक्रिया. इतर सर्व यांच्या पलीकडे. यांचे ध्येयवाक्य म्हणजे ‘ मातृयोनि परित्यज्य विहरेत् सर्वयोनिषु. ’ हा त्यांचा आचारधर्म. मग त्यात सख्खी बहीणसुद्धा अपवाद नाही. त्याचा आदर्श धर्म म्हणजे ‘ मद्यमांसच मीनंच मुद्रामैथुनमेवच. ’ याचा आध्यात्मिक अर्थ कोणीही काहीही लावोत परंतु त्या पंथातील लोकांचे वर्तन नेहमी त्यास धरूनच असते. हलक्या कुलातील म्हणजे महार, धेड, भंगी, चांडाळ, चांभार यांपैकी कोणी स्त्री नग्न अशी त्यांच्या अध्यक्षस्थानी म्हणजे मधोमध बसते त्यातल्या त्यात ती जर रजस्वला असली तर मग त्या सर्वांत ती एक पर्वणीच समजावयाची. त्यांच्या प्रक्रियेत श्रेष्ठ म्हणजे नवरात्रातील चक्रपूजा. आपणाकडे काही कुटुंबांत आहे ती फार निराळ्या स्वरूपात. त्यांच्या चक्रपूजेत मध्यभागी भैरव म्हणजे एक मानवी प्रेत असे व त्याभोवती चक्राकार स्त्री-पुरुष बसून सर्व प्रकारचे वामाचार करीत. याकरता ती फार गुप्त व इतरांस वर्ज्य असे. ती अजूनही चालू आहे. परंतु कायद्यामुळे प्रेत वगैरे नसते इतकेच. शेंदूर म्हणजे मानवी रक्त व कोहळा बळी देणे म्हणजे नरबळी देणे, अशी त्यांची प्रथा होती व चोरूनमारून अजूनही चालू आहेत. यात मंत्र-तंत्र साधनांचा काही भाग असला तरी सूड व विषयसुखाची तृप्ती हाच मुख्य भाग. शाक्तांच्या

बाबतीत सर्वांस थोड्याफार फरकाने अशाच क्रिया कराव्या लागतात. त्यातील काहीत तर वद्य १४ किंवा अमावस्येस मध्यरात्री स्मशानात जाऊन, नग्न होऊन ताजे प्रेत उकरून काढून, त्यास स्नान घालून, त्यावर बसून मंत्रसिद्धी करावी लागते. असे अनेक प्रकार आहेत. ते सर्व द्यावयाचे म्हणजे तो एक निराळा ग्रंथच होईल. असे असले तरी एक गोष्ट मात्र खरी की, या मार्गाने सुद्धा प्रयत्न करणारास वामविद्येत सिद्धी मिळते व तिचा उपयोग जारण, मारण, उच्चाटन वशीकरण, मोहन इत्यादी दुष्कृत्यांकडे केला जातो. सप्तशतीतील नवार्ण मंत्रास निरनिराळे शिरपल्लव व बीजे लावूनसुद्धा विधिपूर्वक जप करून या प्रकारच्या सिद्धी मिळविता येतात. हा फक्त एक प्रकार झाला. असे अनेक प्रकार आहेत.

शहरातील खालचा अशिक्षित वर्ग, खेडी व त्यातले त्यात जंगल भागातील सर्व खेडी यांतून या विद्येचे प्राबल्य दिसून येते. त्यांना मलेरियाचा ताप आला तरी ते प्रथम मांत्रिक किंवा भगताकडे जातील व त्यांच्याकडून काही झाले नाही तर मग डॉक्टर, वैद्य पाहतील. इतके मात्र खरे की, अध्यात्म क्षेत्रात ज्याप्रमाणे ढोंग व बुवाबाजी ही बोकाळली आहेत, त्याचप्रमाणे या क्षेत्रातसुद्धा मांत्रिक, भक्त वगैरे ढोंगी व या शास्त्रांत सुद्धा अनभिज्ञ असे असतात. ज्यांना थोडेफार येते ते आपणास सर्व काही येते असे भासवून भाव खात असतात व पैसे उकळीत असतात. या सर्व गोंधळातून खरे खोटे काय व किती हे निवडून काढणे केवळ अशक्य असते. कारण ज्यांना काही येत नाही तेच जास्त आव आणीत असतात व हे आपणाकडेच आहे असे नाही तर जेवढे मागासलेले देश आहेत त्या सर्वांत व सुधारलेल्या देशातील मागासलेल्या वर्गात यांचे प्राबल्य विशेष आढळते. ऑस्ट्रेलिया, दक्षिण अमेरिका, सबंध आफ्रिका, तिबेट या सर्व देशांत, सर्व जमातीत जादूटोण्याचे प्राबल्य आढळते. जादू म्हणजे मंत्र व टोणा म्हणजे तोडगा किंवा तंत्र. जादू याचा अर्थ मात्र सर्वसाधारणपणे आपण समजतो तसा अभिप्रेत नाही. आपण साधारणपणे जादू हा शब्द हातचलाखी किंवा नजरबंदी या अर्थी वापरतो. ज्या गोष्टीने साधारण मनुष्य चकित होतो त्यास आपण जादू म्हणतो. मग त्या साध्या पत्त्याच्या ट्रिक्स का असेनात. या ठिकाणी जादू म्हणजे खरोखरी काळी किंवा वाम मंत्रविद्या. असे आहे तर कोणी सहज विचारील की, तर मग त्याचा या ग्रंथात उल्लेख करण्याचे प्रयोजनच काय ? त्यास उत्तर असे काही की, सव्य किंवा धवल मंत्रविद्या न कळली तर फार तर फायदा होणार नाही; पण नुकसानही होणार नाही. परंतु वामविद्या व तिच्या प्रतिकाराची माहिती नसली तर आपणास नकळत सुद्धा नुकसान होण्याचा संभव असतो. याकरता या विद्येची अगदी शास्त्रोक्त माहिती नसली तरी तिचे प्रमुख प्रकार काय आहेत व त्यांनी काय काय नुकसान होऊ शकते याची माहिती असली पाहिजे. हे कळू शकले तर त्यास प्रतिकार कसा करावयाचा हेही कळून घेता येईल. कारण या वामविद्यांचा प्रामुख्याने नुकसान करण्याकडेच उपयोग करण्यात येतो.

नजर लागणे, करणी करणी, मूठ मारणे, प्रेत-पिशाच्च साधन व बाधा वगैरे सर्व प्रकारांपासून तंत्र ग्रंथातील जारण-मारण वगैरे सर्व या प्रकारात मोडतात. यातील मंत्रांच्या जोडीस आणखी तंत्र म्हणून काही असते व त्यासोबत काही प्रयोगात यंत्रांचा पण उपयोग केला जातो. या सर्वांचे एकसमयावच्छेदेकरून सविस्तर विवरण करणे या ग्रंथाच्या नियोजित पृष्ठसंख्येच्या कक्षेत बसत नाही. म्हणून केवळ संक्षेपाने उल्लेख करण्याचे योजीत आहे.

शाकिनी, डाकिनी, भगत, मांत्रिक वगैरे प्रकारांत मोडणारी मंडळी यापासून प्राप्त झालेल्या शक्तीने जारणमारण, उच्चाटण, मूठ मारणे वगैरेसारखे प्रयोग करीत असतात. तर त्यातील दुसऱ्या प्रकारचे लोक त्यावर इलाज करीत असतात. ते इलाज म्हणजे भूत, प्रेत, पिशाच्च वगैरे अंगात आणून किंवा सिद्ध मंत्रप्रयोग करून, यास अंडी कोंबडी वगैरेंचा नैवेद्य किंवा बळी अर्पण करून, करीत असतात या दोन्ही प्रकारांतील गोष्टी यांच्यात वंशपरंपरेने चालत आलेल्या असतात. त्यामुळे इतरांस त्यासंबंधीचे ज्ञान क्वचितच होऊ शकते. त्यांच्या शिक्षणपरंपरेत सुद्धा निरनिराळ्या प्रकारचे मंत्र व प्रक्रिया असतात. त्याकरता कराव्या लागणाऱ्या उपासना म्हणजे तत्संबंधित काली, भैरव, वेताळ, दुर्गा वगैरेंना तो जप चालू असताना अर्पण करावे लागणारे मद्य-मांस वगैरे. अशा रीतीने ती विद्या किंवा मंत्र सिद्ध झाला की त्यांचा उपयोग करणे. काही लोकांच्या बाबतीत आपण पाहतो की त्यांनी एखादी चांगली वस्तू पाहून तिची वाखाणणी केली की लगेच तीत विकृती उत्पन्न होते. अन्न नासते, मूल आजारी पडते व झाड सुद्धा भंगते किंवा सुकून जाते. चांगले अन्न क्षणात हिरवे पडून त्यात किडे दिसू लागतात. त्यांची मुळी दृष्टीच विषारी बनलेली असते. त्यांचा उद्देश असो वा नसो; परिणाम व्हावयाचा तो होतोच. पेशवेकालीन सखाराम-बापू या मुत्सद्याची दृष्टी अशीच होती. म्हणून सांगतात. त्याची अशी आख्यायिका आहे की त्यांना त्यांच्या विषारी दृष्टीची जाणीव असल्याने त्यांनी आपल्या नवजात मुलास कित्येक वर्षे पाहिले नव्हते. विश्वास ठेवा वा नका ठेवू. परंतु काही व्यक्तींत अशी सिद्धी असते की त्या माणसाचे माकड, मांजर, वाघ वगैरे बनवितात. किंवा स्वतः बनतात. आफ्रिकेत असे प्रत्यक्ष घडल्याचे व घडत असल्याचे काही सुशिक्षित जबाबदार इंग्रज अधिकाऱ्यांनी प्रतिज्ञापूर्वक लिहून ठेवलेले आहे. (Jungle Magic by James Neal). आपल्याकडील तंत्र ग्रंथात सुद्धा असे काही प्रयोग दिलेले आहेत. ते मी पुढे नमूद करणार आहे. त्यांच्या सत्यासत्यतेसंबंधी मला काही माहिती नाही किंवा अनुभव घेतलेल्या व्यक्तीशीही माझा संबंध आलेला नाही. मी केवळ ग्रंथांतरींची माहिती म्हणून देत आहे.

अगदी खालच्या थरातील जादूटोण्यापासून किंवा अन्य ग्रंथांतील जारण-मारण उच्चाटन आदि किंवा सव्य मंत्र, जप, ध्यान, लयादिपासून येणारे अनुभव ही सर्व खरे म्हणजे एकाच मालिकेतील आहेत. ती मालिका म्हणजे मानसिक किंवा वैचारिक

शब्दांची स्पंदने. जारण-मारण म्हणा की जप ध्यान म्हणा, त्यापासून उत्पन्न होणारी स्पंदनेच ही सर्व कार्ये करीत असतात. मग ती चांगली असोत वा वाईट. स्पंदने व त्यांचे आघात हीच सर्व प्रकारचे परिणाम घडवून आणीत असतात. मालिका एकच. सिद्ध मंत्र म्हणजे त्याच्या वारंवार उच्चाराने किंवा प्रक्रियेने त्यात दृढता निर्माण होऊन ते तत्काल गुणकारी होतात. तसे शेकडो हजारो मंत्र पुस्तके-पोथ्यांमधून दिलेले असतात. परंतु योग्य मार्गदर्शनाअभावी त्याचा काही उपयोग नसतो. स्पंदनाची मालिका एकच. एक त्यातील खालच्या थरातील तर दुसरे वरच्या थरातील, चांगले वाईट हे सुद्धा थंडी-उष्णता याप्रमाणे सापेक्षच असते. १००° उष्णता ही १०१° पेक्षा थंड तर ९९° पेक्षा उष्ण वास्तविक १००° उष्णता तीच. परंतु अपेक्षेने निराळी भासते त्याप्रमाणे. चांगले वाईट संबंधी सुद्धा एकाचे मरण ते दुसऱ्याचे प्रमोशन ठरते. त्याचप्रमाणे वाममार्गीसुद्धा आपला मार्ग चांगला असेच मानीत असतात.

ठग लोक, मग तो हिंदू मुसलमान कोणी असो एकाच दुर्गेस मानीत व तिचा कौल घेऊनच लोकांचा जीव घेत. एकंदरीत काय तर अत्यंत हीन अशा जादूपासून तो ध्यानधारणा-समाधीपर्यंत स्पंदनच काम करीत असल्याने मालिका एकच. त्यामुळे एखाद्या मंत्राने अथवा प्रक्रियेने काही अनिष्ट शक्ती काम करू लागली आहे, याचे ज्ञान झाले म्हणजे त्यास प्रतिकार करून ती नामशेष करणारी स्पंदने उत्पन्न करता आली तर आपोआपच ती दुष्ट शक्ती विलय पावून परिणाम करू शकत नाही. इतकेच नाही तर त्यास यशस्वी रीतीने प्रतिकार करणारी शक्ती सुद्धा अगोदर उत्पन्न करून ठेवता येते. ती स्पंदने कोणती व त्याचा उपयोग कसा करायचा हे सांगण्याचा उद्देश या प्रकरणाच्या मुळाशी आहे. तसे नसते तर या प्रकरणाचा या पुस्तकात समावेश करण्याचे कारणच नव्हते. याकरता हे सर्व जारण—मारण इत्यादी आहे तरी काय, त्यापासून काय होऊ शकते व त्यास प्रतिकार कसा करावयाचा यासंबंधी क्रमाने विचार करू.

या जादूटोणा करणाऱ्या मंडळीविषयी मी अगोदरच सांगितले आहे की, हे अगदी अशिक्षित व समाजातील खालच्या थरातील असतात ते केवळ सूड म्हणून किंवा अमाप पैशाच्या मोबदल्यात अशी कामे करावयास तयार होतात. समजा एखाद्या व्यक्तीस काही आजार आणणे आहे तर ते त्या माणसाचे प्रतीक म्हणून एक लिंबू घेऊन त्यावर त्यांचे मंत्र अभिमंत्रून, त्याची हळद, कुंकू, शेंदूर आदींनी पूजा करतील. नंतर त्यास इजा व्हावी किंवा आजार यावा या दृष्टीने त्या सुया वगैरे टोचून त्याच्या येण्याजाण्याच्या रस्त्यावर अगर त्याच्या आवारात पुरून ठेवतात व तो ते ओलांडून गेला की त्यास त्रास अथवा आजार सुरू होतो. तो कोणत्याही औषधाने जात नाही. त्यास केवळ दैवी प्रतिकारात्मक इलाज करावे लागतात पूर्वी फोटो वगैरे नसल्याने त्याचे प्रतीक लिंबू घेत असत किंवा त्याची शेणाची किंवा मातीची प्रतिमा करून तीवर प्रयोग करीत. आता फोटोवर जास्त प्रयोग करतात असे आढळून आले आहे. तो होणारा आजार कोणत्या व किती

CamScanner

प्रमाणात हे तो प्रयोग करणाराच्या शक्तीवर अवलंबून असते. त्याने केलेला मंत्र-प्रयोग हा जादूचा भाग झाला व वापरण्यात आलेले कापूर, लिंबू, शेंदूर, सुया वगैरे टोचण्याचा म्हणजे तंत्राचा भाग झाला. हे तंत्र म्हणजे तोडगेसुद्धा पुष्कळ प्रकारचे असतात. साधारणपणे अभिचार कर्मात नुसत्या मंत्राने कार्यभाग होत नाहीत. त्यास तंत्राचे साहाय्य घ्यावे लागते व ते म्हणजे लिंबू, शेंदूर, फोटो, सुया, भाकरीचा तुकडा, एखादी वनस्पती वगैरे. मंत्राची स्पंदने ती व्यक्ती मनश्चक्षूसमोर ठेवून त्या व्यक्तीचे नाव घेऊन त्या वस्तूवर म्हणजे लिंबू, भाकरीचा तुकडा किंवा राख यावर टाकावयाची व ती वस्तू त्या व्यक्तीच्या संसर्गात आली की, त्यांचा कार्यभाग होतो. ती स्पंदने त्या व्यक्तीवर आक्रमण करून आपला कार्यभाग उरकतात. काही लोक त्या व्यक्तीचे प्रतीक म्हणून एखादे चित्र, कापडाचे अथवा मातीची बाहुली वगैरे घेऊन तीवर अभिचारप्रयोग, वर सांगितल्याप्रमाणे करतात. मद्य–मांसाचा नैवेद्य–कोंबडे–बकरे बळी वगैरे प्रकार असतात. मग त्यात चाकू, सुया किंवा असे काहीतरी खुपसून ते त्या व्यक्तीच्या संसर्गात येईल असे ठेवावयाचे. मग तो तीस नुसते ओलांडून का जाईना, त्यांची कार्यसिद्धी होते. त्या व्यक्तीस क्वचितच माहीत असते की, असे काही प्रयोग त्या व्यक्तीवर चालले आहेत. म्हणून ज्या व्यक्तीवर प्रयोग करावयाचा त्या व्यक्तीच्या संसर्गातील एखादी वस्तू, मग तो त्याचा हातरुमाल का असेना, तो त्यांना मिळाला तर त्यांचे अपेक्षित कार्य लवकर सिद्ध होते. परंतु अशा गोष्टी फारशा होऊ शकत नाहीत. त्याचे कारण प्रयोग करणारे अडाणी असतात त्यांना शास्त्रीय असे ज्ञान नसते. असते ते परंपरेने चालत आलेले. ते चुकीचेही असू शकते किंवा त्यात काल-स्थल मानाने अशुद्ध अशी भेसळ झालेली असते व पुष्कळ वेळा हे करणारे ढोंगी व अज्ञानीच असतात. ज्यांना मुळी काही माहितच नसते ते नुसता आव आणीत असतात. त्यामुळे त्यांचा दृश्य असा परिणाम फारसा अनुभवास येत नाही. निदान आपल्याकडे नाही. त्या थरातील मंडळीत अशी भावना असते की साधा ताप आला तरी कोणी चेटूक केले असावे असे त्यास वाटते. त्या दृष्टीने ते इलाज करू लागतात. त्याकरता ते भगत, मांत्रिक वगैरेंचे सहाय्य घेतात. ते त्यांचे प्रतिकारात्मक स्पंदने उत्पन्न करण्याकरता असलेले प्रयोग करतात एखादे लिंबू, नारळ, कोंबडे वगैरे घेऊन त्यावर मंत्रप्रयोग करून त्या व्यक्तीवरून ओवाळून टाकतात. काही विश्वासाने तर काही मंत्रप्रयोगाने त्यांचे काम होते. पुष्कळ वेळा मुळात काही नसतेच.

(१) आपणाकडे असे प्रकार अगदी अनादिकालापासून चालत आलेले आहेत. आपल्या अथर्ववेदात यासंबंधी अनेक प्रकार पाहावयास मिळतात. त्यात जसे मोहन, हनन वगैरे करण्याचे प्रकार सांगितले आहेत; तसेच आजार उत्पन्न करण्याचे, ते नाहीसे करणाऱ्या औषधी व मंत्र पण आढळतात. पाऊस पाडण्याचे तसेच थांबविण्याचे प्रयोग, सर्व अस्त्रविद्या ही मंत्रयुक्तच आहे. त्याचा एक सिद्धांत असा होता की,

जन्मांतरकृतं पापं व्याधिरूपेण जायते ।
तच्छान्तिरौषधिभिर्दानजपहोमादिभिः ।।

याचा अर्थ असा की देशकालपरत्वे आहारविहारांनी उत्पन्न होणारे आजार दुरुस्त होतात. परंतु पूर्वजन्मी केलेल्या पापामुळे जे उत्पन्न होतात ते मात्र मंत्र, जप, होम, दान, पूजन, अर्चन इत्यादींनी नाहीसे करावेत. अथर्ववेदाचे आणखी पाच उपवेद आहेत. त्यांची नावे––सर्पवेद, पिशाचवेद, असुरवेद, इतिहासवेद व आगमवेद. यांच्या नावांवरून त्यात काय असावे याची कल्पना करता येईल––यातील (१) कौशिक सूत्र—यात निरनिराळे औषधी प्रयोग मंत्रयुक्त असे आहेत. (२) नक्षत्रकल्प—यात ब्रह्मयाग, स्कंदयाग, अस्त्रविद्या यात पाशुपतास्त्र, ब्रह्मास्त्र, अग्न्यस्त्र, वायवास्त्र वगैरे अस्त्रे येतात. यातच धनुर्विद्या, आसुरी, कल्प, भूमिकंपन, कामनिक उपाय इत्यादी. (३) वैतानकल्प—अग्निहोत्र, सोमयाग, वाजपेय, ऋत्विजकर्म, राजसूय यज्ञ, अश्वमेध यज्ञ वगैरे. (४) अंगिरसकल्प—अनुष्ठान मंत्र, माला मंत्र, यंत्रलेखन, पल्लव, संपुट, लक्ष्मीसूक्त, प्रणव मंत्र, अग्नीधूमावती, भद्रकाली, त्रिपुरभैरवी, भुवनेश्वरी इत्यादि मंत्र, देवीसूक्त, गणपती, लक्ष्मी मंत्र इत्यादि. (५) शांतिकल्प—व्रत नियम, विनायक शांति, आहुतिमंत्र, नवग्रह आवाहन, ग्रहयाग इत्यादि. अथर्ववेदातील सर्व क्रियांस अमावास्या, पूर्णिमा, पुष्यनक्षत्र सर्व कर्मांस प्रशस्त.

आपला वेदकाल निदान आठ दहा हजार वर्षांपूर्वीचा आहे. इतक्या वर्षांपूर्वी हे शास्त्र किती प्रगत होते याचा अंदाज यावरून येतो. यावरून याच्यापूर्वी अनेक शतके याची वाढ होत होती हे सिद्ध होते मात्र त्यानंतरच्या कालात त्याची वाढ खुंटत जाऊन उलट हळू हळू लोप होत गेला व त्यावर अनेक बरे-वाईट संस्कार, भेसळ आदि होऊन त्यास आजचे विकृत स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यानंतर मंत्रशास्त्रात बरीवाईट अशी भर पडत गेली व त्यावर आज शेकड्यांनी ग्रंथ उपलब्ध आहेत. तंत्र म्हणजे मंत्र अधिक काहीतरी. त्याचे एक उदाहरण देतो.

ॐ नमो सर्वभूताधिपतये ग्रासय ग्रासय ।
शोषय शोषय । भैरवी आज्ञापयति स्वाहा ।।

शनिवारी बेहेड्याचे पान आणून त्यास वरील मंत्राने १०८ वेळा अभिमंत्रून ते उजव्या मांडीखाली ठेवून आहार करावा. वीस पट आहार करता येईल व काही अपाय होणार नाही, असा याचा दावा आहे.

मंत्राच्या साहाय्यास आणखी काहीतरी घेऊन त्या दोहोंनी कार्यसिद्धी करून घेणे. यास मंत्र-तंत्र युक्त सिद्धी असे म्हणतात. पुष्कळ तंत्रे अशी आहेत की त्यास मंत्राशिवायही सिद्धी मिळू शकते. जसे शनिवारी सायंकाळी नग्न होऊन एखाद्या झाडास आवंदून येणे व मध्यरात्री जाऊन त्याची मुळी शस्त्रावाचून काढून आणणे. ती मुळी कमरेस ठेवली तर कार्यभाग होतो. [झाड व कार्य कोणती ते मुद्दाम दिलेले नाही.] यात मंत्राचा काही संबंध येत नाही. याचा आणखी एक भाग आहे व तो

म्हणजे यंत्र. हे एक स्वतंत्र प्रकरणच आहे. अशी शेकडो यंत्रे प्रचारात असून त्यातील काही मंत्रयुक्त तर काही मंत्रविरहितही असतात. ती विधिपूर्वक तयार करून उपयोगात आणली तर अपेक्षित कार्यभाग होतो असे म्हणतात. यंत्र म्हणजे त्या विवाक्षित दैवतांचे निवासस्थान व म्हणून ते अत्यंत काळजीपूर्वक, बिनचूक व विधिपूर्वक केले पाहिजे. पंधराचे यंत्रासंबंधी असे आढळते की, यंत्र तेच परंतु त्यात आकडे लिहिण्याचा क्रम बदलला की, निरनिराळी कार्ये सिद्ध होतात. आपण पाहतो की काही मांत्रिक भूर्ज पत्रावर अथवा साध्या कागदावर काही आकृत्या, अक्षरे अथवा आकडे अथवा यांपैकी दोन्ही किंवा तिन्ही लिहून त्यावर विवाक्षित संख्येने मंत्रोच्चार करून ते दंडात किंवा गळ्यात बांधतात. हे झाले मंत्र व तंत्र. यासारखी पंधरांची किंवा वीसा व तीसा अशी यंत्रे योग्य वेळी लिहून पूजा अर्चा करून विवक्षित मंत्रांनी सिद्ध करून ती पूजेत अथवा तिजोरी, दुकान, कॅश बॉक्स वगैरेमध्ये ठेवण्याची पद्धत आहे. ते योग्य रीतीने व विधिपूर्वक केले तर हमखास उपयोग होतो असे म्हणतात व काहींचा तसा अनुभव पण आहे. उदाहरणार्थ, वीसा यंत्र दीपावलीस लिहून सिद्ध करून तिजोरीत ठेवून नित्य पूजीत गेले तर पैसा कधी कमी पडत नाही. त्याचप्रमाणे रोगनिवारणार्थ, विक्री वाढाविण्याकरता, शत्रूची नजर लागू नये किंवा त्यांचा कोणताही प्रयोग आपणावर परिणामकारी होऊ नये म्हणून निरनिराळ्या यंत्रांचा उपयोग करण्यात येतो. या संबंधात काही उदाहरणे मी पुढे देणार आहे.

नंतरच्या काळात अनेक मंत्र तंत्र तयार झाले; लिहिले गेले. त्यांची यादी शेकड्यांनी होईल. त्यातल्या त्यांत मंत्रमहार्णव, मंत्रमहोदधी या दोन ग्रंथांत निवडक मंत्रांचा समावेश केलेला आढळतो, तर दत्तात्रेय तंत्र, उड्डीश तंत्र, रुद्रयामल तंत्र, काकचंडीश्वर तंत्र, सुवर्णतंत्र असे अनेक तंत्र ग्रथही निर्माण झाले. त्यांतील सुमारे चाळीस प्रमुख आहेत. त्या प्रत्येकात निरनिराळे मंत्र, तंत्र, यंत्रे यांची माहिती व ते सिद्ध करण्याची विधाने दिलेली आढळतात. श्री दुर्गासप्तशतीतील सर्वचे सर्व म्हणजे सातशे श्लोक हे मंत्रमयच आहेत. त्यातील फक्त एकाच नवार्ण मंत्राने षटकर्मे साधता येतात. या संबंधात वाचकांच्या माहितीकरता थोडी त्रोटक माहिती देतो.

॥ ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे ॥ हा नवार्ण मंत्र होय.

मंत्राणां पल्लवो वासो । मंत्राणां प्रणवः शिरः ॥
शिरः पल्लवसंयुक्तो । मंत्रो कामदुधो भवेत् ॥ १ ॥

प्रत्येक मंत्रास ॐकारयुक्त शिर लावून व योग्य पल्लवाने संपादित करून प्रयोग केला तरच तो कार्यसिद्धी करणारा होतो. तसेच,

वषट्वश्ये–फट्उच्चारे–हुं स्थंभे खेच मारणे
स्वाहा तुष्टैः ढः ढः पुष्टैः नमः सर्वार्थसिद्धये ॥

तसेच,

फडुच्चाटे हुं विद्वेषे–खेच मारणे ठः स्थंभे
वौषट आकर्षे–नमः संपत्तिहेतवे ॥ २ ॥

या संदर्भात एकदोन उदाहरणे देतो. म्हणजे थोडे स्पष्टीकरण होईल-वशीकरण, उच्चाटण, स्तंभन, विद्वेषण, आकर्षण व मोहन ही षटकर्मे होत. काही ठिकाणी थोड्या फरकाने निराळी नावे आढळतात. व एकाच नर्वाण मंत्रास वर सांगितल्याप्रमाणे निरनिराळ्या शब्दांनी संपुटित करून जप केला असता ती ती कार्यसिद्धी होते, असा दावा आहे. म्हणजे समजा, वशीकरण करणे आहे तर :—

वषट् ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे देवदत्त वषट् मे वश्यं कुरु कुरु स्वाहा । यातील देवदत्त या नावाचे ऐवजी नियोजित व्यक्तीचे नाव घालावयाचे असते.

जपसंख्या १००८

२. त्याचप्रमाणे उच्चाटन करणे असेल तर फट् ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुंडायै विच्चे देवदत्तं फट् उच्चाटनं कुरु कुरु स्वाहा (१०० जप.)

पाठभेदाने काही ठिकाणी सुरुवातीचे ॐ चा लोप केलेला आढळतो. याचप्रमाणें सर्व षट्कर्माविषयी समजावे.

मात्र यापैकी कोणताही प्रयोग करण्यापूर्वी नवार्ण मंत्र १११०८ वेळा जप, हवन, तर्पण करून सिद्ध केलेला असावा. शुक्रवारी उपास करून पूजनअर्चन करून जपास आरंभ करावा. त्यास प्रणवाचे शिर लावून नमःचे पल्लव लावावे. प्रथम मंत्र सिद्ध केल्याशिवाय कोणताही प्रयोग सिद्ध होणार नाही. शाबरीमंत्र आणखी निरनिराळेच आहेत व ते बरेच प्रभावी आहेत. यासंबंधात यापूर्वी मी जे काही निवेदन केले आहे व करणार आहे. त्यापैकी कसलाही मला स्वतःला अनुभव नाही व घेण्याची इच्छा पण नाही. केवळ वाचकांना त्यासंबंधी माहिती असावी व गरज पडेल त्यावेळी प्रतिकार करता यावा या उद्देशाने दिलेले आहेत व देत आहे. वाचकांच्या माहितीकरता थोडे 'मंत्र तंत्र'–मंत्र यंत्र तसेच तंत्र याची थोडी उदाहरणे देत आहे. त्यावरून त्यांना साधारण कल्पना येईल. तसेच कल्प काही औषधी आहेत तसे मंत्र-तंत्रात्मक पण आहेत.

अंकोल कल्प

बऱ्याचशा तंत्र ग्रंथात अंकोलास विशेष महत्त्व आहे. यास कोठे कोठे अंकोले असे सुद्धा म्हणतात. याचे बरेचसे प्रयोग अशक्य वाटणारे दिसतात. परंतु ते फारसे प्रयासयुक्त नसल्याने त्यापैकी काही वाचकांनी करून पाहावे. बऱ्याचशा तंत्र ग्रंथांतून तोच तो उल्लेख दिसल्यामुळे वाचकांच्या माहितीसाठी देत आहे.

अंकोल बीजास अर्कपत्र रसाच्या सात भावना देऊन चूर्ण करून काशाचे थाळीत ठेवावे. ते भांडे कडक उन्हात तिरके व उतरते असे करून ठेवावे. त्यातून

CS CamScanner

तेल उतरून येईल. त्याची परीक्षा म्हणजे टकलावर ते लावले असता काही क्षणांत काळेभोर केस वर येतात.

(२) अथवा हृदयविकाराने कोणी अकस्मात वारला असेल त्याच्या तोंडात एक थेंब टाकला तर तत्काळ उठून बसेल. मात्र हृदयक्रिया बंद पडून फार वेळ झालेला नसावा.

(३) आंब्याच्या कोयीस अथवा कोणत्याही बीजास या तेलाच्या सात भावना देऊन सावलीत सुकवावे व ती कोय किंवा ते बीज जमिनीत पेरून त्यावर जलसिंचन केले असता काही मिनिटांतच ती अंकुरित होऊन शाखा–फल–मूलासहित झाड तयार होते. या तेलात लोखंड सात दिवस ठेवून छायेत वाळवून त्रिलोहाचे ताइतात घालून तो ताईत तोंडात ठेवला असता तो मनुष्य अदृश्य होतो.

अंकोलाचे बी एखाद्या मृत प्राण्याच्या मुखात ठेवून त्यासुद्धा ते पेरावे. त्यापासून उत्पन्न होणाऱ्या झाडाच्या फळातील बी तोंडात धरले असता तो त्या प्राण्यासारखा दिसेल. म्हणजे वाघाचे तोंडात ठेवून पेरले तर तो वाघ दिसेल. अशाच प्रकारे कोणत्याही अन्य प्राण्यासंबंधी समजावे. हाच प्रयोग सरकीचे किंवा एरंडीचे बीसंबंधीसुद्धा करून पाहावा. त्या नवीन आलेल्या सरकीच्या तेलात दिवा लावून ठेवला तर त्याच्या प्रकाशात सर्वत्र तेच प्राणी दिसतील. असे होणे यास कोणताही शास्त्रीय आधार नाही. हे खरे असले तरी आफ्रिकेत अशी होणारी माणसे व रानडुकरे होणाऱ्या स्त्रिया प्रत्यक्ष पाहिल्याचे सुशिक्षित इंग्रज अधिकाऱ्यांनी लिहून ठेवले आहे. शिवाय प्रयोग फारसे कठीण नसल्याने कोणीतरी करून पाहावयासही हरकत नाही.

ग्रंथोक्त काही नुसते तंत्र उर्फ तोडगे नमुन्यादाखल सांगतो.

१. अंगारकी चतुर्थीस आदल्या दिवशी आवंतून श्वेत मांदाराची मुळी शस्त्र न लावता काढून तिची बनविलेली गणपतीची मूर्ती आणून तीस अन्नपूर्णा मंत्राने १०८ वेळा अभिमंत्रून पूजेत ठेवून रोज पूजा करीत गेले तर त्या घरात धनधान्याची समृद्धी राहून भूत–प्रेत–पिशाच्चादींची बाधा कधीही होत नाही.

२. रोहिणी नक्षत्रावर उंबरावरील बांडगूळ आणून ॐ नमो धनदाय स्वाहा या मंत्राने १०८ वेळ अभिमंत्रून ठेवावे. त्या घरात सदैव धनधान्यसमृद्धी राहते. बांडगूळ किंवा बांदे म्हणजे एका जातीच्या एखाद्या फांदीवर दुसऱ्या जातीचे झाड उगवणे. ते उगवलेले झाड ते बांडगूळ होय. जसे पिंपळावर वड किंवा वडावर उंबर याप्रमाणे जंगलात अशी अनेक बांडगुळे नेहमी पाहावयास मिळतात.

३. रविवारी पुष्य नक्षत्राच्या योगावर शिवलिंगीची मुळी आणून दुकानात ठेवली असता धंदा वाढत राहतो.

४. पुष्य नक्षत्री पांढरे ईश्वरीची मुळी काढून तांबूलातून ज्यास भक्षावयास दिली तो वश होईल.

५. पांढऱ्या गुंजाची मुळी उत्तराभिमुख होऊन काढून आणावी. ती कमरेस बांधली असता गर्भिणी सुखाने प्रसूत होते.

६. आघाड्याची मुळी विधिपूर्वक काढून आणून कमरेस बांधलीं असता अडलेला गर्भसुद्धा सुखपूर्वक बाहेर येईल.

संकट व अपमृत्यु–निवारण मंत्र (अघोरमंत्र)

ॐ अघोरेभ्योथ घोरेभ्यो घोर घोरतरेभ्यः ।
सर्वेभ्यः सर्वसर्वेभ्यों नमस्ते अस्तु रुद्ररूपेभ्यः ॥

एक लक्ष जप हवन–तर्पणाने सिद्ध होतो. निदान ११००० तरी करावा. याने संकटनिवारण, भूत-प्रेत-पिशाच्चादिकांपसून संरक्षण करता येते. सायंकाळी एखाद्या जंगलात एकांती राहण्याचा प्रसंग आला तर लाकडाने स्वतःभोवती एक वर्तुळ काढवे व त्यात बसून वरील मंत्र १०८ वेळा जपावा. त्या वर्तुळात सर्प, विंचू, वाघ, लांडगा वगैरे कोणी येऊ शकणार नाहीत. मात्र त्याने अगोदर तो मंत्र सिद्ध केलेला असला पाहिजे. सिद्ध मांत्रिकाने नुसती रक्षा १०८ वेळा अभिमंत्रून दिली तर करणी, पिशाच्चबाधा वगैरे सर्व बरे होतील.

७ बेहड्याचे काष्ठाचे चूर्ण फुलवातीत घालून त्याचा दिवा लावला असता ढेकूण नाहीसे होतात.

८. रुईचे कापसाची वात करून त्यांत करंज तेलाचा दिवा लावला तर सर्व ढेकूण नाहीसे होतात.

९. अनावृष्टीनिवारणः—ॐ हूं श्रीं हूं ॥ या मंत्राचा जलात उभे राहून जप केला असता यथावृष्टी होऊन सुबत्ता होते.

१०. स्वाती नक्षत्रावर एरंडाचे बांदे घेऊन हातात बांधले असता सर्व वश होतील.

११. कृत्तिका नक्षत्री उंबराचा बांधा (बांडगूळ) दुधाशी खावा म्हणजे स्त्री गर्भवती होते.

१२. रोहिणी नक्षत्री बेलाचा बांधा काढून डावे हातात बांधला असता दारिद्र्य दूर होत.

१३. कृत्तिका नक्षत्री उत्तरेकडे तोंड करून बाहव्याचे मूळ काढावे. जिचे मूल जगत नसेल तीस गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंत रोज दुधात उगाळून पाजीत जावे. मूल जगेल.

१४. पूर्वानक्षत्री आग्नेयेकडे तोंड करून चिनोरीचे मूळ काढून जवळ ठेवावे. इच्छित कार्य सफल होईल.

१५. चित्रा नक्षत्री त्रिवेणीचे मूळ काढून उगाळून कुष्ठावर लावीत जावे. कुष्ठ जाईल.

असे अनेक तोडगे ठिकठिकाणी दिलेले आढळतात. त्यावर कितपत विश्वास ठेवावा व करून पाहवे की कसे, हे प्रत्येकाने ठरवावे. फार कठीण न वाटणारे करून पाहावेत. यास शास्त्राची बैठक नाही. तरी पण शास्त्रास न कळलेल्या व रोज घडता

असलेल्या अनेक गोष्टी आपण पाहात असतो. म्हणून सर्व नाही तरी काही खऱ्या असण्याचा संभव नाही असे नाही. जी गोष्ट तंत्राविषयी तीच यंत्राविषयीसुद्धा समजावी. निदान तंत्र व यंत्र ही काय आहेत, याची वाचकांना थोडी कल्पना यावी म्हणून नमुन्यादाखल थोडी दिली आहेत.

निरनिराळ्या आजारांवर, त्याचप्रमाणे धनप्राप्ती, व्यापारवृद्धी, वशीकरणादि षट्कर्माकरता शेकडो प्रकारची यंत्रे आहेत. त्यांपैकी काही सिद्ध करावयास तद्विषयक मंत्राचे सहाय्य घ्यावे लागते. तर काहींच्या बाबतीत ती कागदपत्रावर किंवा भूर्जपत्रावर विशिष्ट वृक्षाची दांडीची लेखणी करून—अष्टगंध वगैरे सारख्याने विशिष्ट संख्येने लिहावीं लागतात व त्यानंतर त्याच्या कणकेत गोळ्या बांधून माशास खाऊ घालव्या लागतात. काही यंत्रे सिद्ध करून ताइतात घालून गळ्यात किंवा हातात बांधावी लागतात. निरनिराळे प्रकारचे ज्वर, कावीळ, मूळव्याध, हगवण वगैरेकरिता निरनिराळी यंत्रे आढळतात. श्रीयंत्र धन मिळण्याकरता सिद्ध करतात. ते प्रसिद्धच आहे. सौंदर्यलहरीतील शंभर श्लोकांवर शंभर प्रकारची यंत्रे दिलेली आढळतात. पंधराची यंत्रे निरनिराळ्या रीतीने लिहून निरनिराळ्या कामाकरता वापरतात. काही ठिकाणी कोणते आकडे कोणत्या क्रमाने लिहावयाचे ते सांगितलेले असते. त्या प्रत्येकांची सिद्धी निराळी सांगितलेली आढळते. वीसा यंत्र साधारणपणे एकच असते. दीपावली किंवा अशाच एखाद्या वेळी शुभमुहूर्तावर सिद्ध करून पूजेत ठेवून किंवा तिजोरीत ठेवून रोज पूजा करीत गेल्यावर त्या घरात सुखसमृद्धी, आरोग्य नांदते, असे मानण्यात येते. पुढील पानावर काहीं प्रसिद्ध यंत्रे केवळ नमुना म्हणून देत आहे. त्यावरून वाचकांस कल्पना येईल. मंत्र, तंत्र व यंत्र हे एक सर्व मिळून उपयोगी असे शास्त्र आहे. त्याचा अभ्यास होणे इष्ट आहे.

२३	३३	१३	२१
२०	१८	३९	१०
२५	२८	२३	१६

हें यंत्र कुंकवाने कागदावर लिहून ताइतात घालून देणे. सर्वांवर चालेल. मंत्र नाही.

४	३	८
९	५	१
२	७	६

हे सुप्रसिद्ध पंचदश यंत्र आहे. यांचे पुष्कळ प्रकार आहेत. यातील आकडयाची स्थाने बदलून नवग्रहांची यंत्रे तयार होतात. तसेच चमेलीचे कलमाने गोरोचनाने भूज पत्रावर आकडे विवक्षित क्रमाने सुरवात करून लिहिले असता निरनिराळ्या कामी उपयोगी पडते. सर्व न केले तरी नुसत्या भिंतीवर खालील बीसा यंत्र लिहून ठेवले तर त्या घरात भूत-पिशाच्चबाधा वगैरे होत नाहीत व सुखसमृद्धी नांदते. हीच किंवा त्यांच्यापेक्षा उजवी फळे बीसा यंत्रासंबंधी समजावीत. यंत्रे निराळी सिद्ध करण्याची जरूरी नाही.

श्री अंबाजी यंत्र

	५	
७	४	९
	३	
८	२	१०
	६	

श्री भगवती महालक्ष्मी हे एक वीसा यंत्रच आहे. परंतु हे अत्यंत प्रभावी असून मोठ्या प्रयासाने मिळालेले आहे. हे अतिशय फलप्रद आहे. 'ऐं ह्रीं क्लीं चांमुडायै विच्चे' हा जप सहा महिने रात्री १० ते २ केला असता श्री दर्शन होते व ती सदैव प्रसन्न राहाते. नंतर ते चमेलीचे कलमाने, गोरोचनाने अथवा अष्टगंधाने लिहून अथवा ताम्र, सुवर्णपत्रावर कोरून नित्य पूजेत ठेवावे.

तीसा यंत्र

१६	६	८
२	१८	१०
१२	१४	४

बत्तीसा यंत्र

८	१५	२	७
६	३	१२	११
१४	९	८	१
४	५	१०	१३

यांपैकी वरील अंबाजी यंत्र इतर काही न जमले तर दीपावली, ग्रहण अथवा इतर पर्वकाली चमेलीच्या लेखणीने अष्टगंधाने लिहून तिजोरीत ठेवावे व त्यासोबतच एक तांब्याचे अथवा सुवर्णपत्रावर कोरून नित्यपूजेत ठेवावे. अत्यंत शुभ व सौभाग्यदायक आहे. अशी अनेक यंत्रे आहेत व त्यांपैकी अनेक नित्य व्यवहारात उपयोगी अशी पण आहेत. परंतु त्या सर्वांचा या ग्रंथात समावेश करणे केवळ अशक्य असल्याने नाममात्र माहितीकरता म्हणून दिली आहेत.

या सर्वांची शास्त्रीय बैठक निदान आज तरी अज्ञात आहे. तरी पण त्यातील काही प्रत्यक्ष अनुभवातील व खात्रीचे आहेत. त्यापैकी काही असे आहेत की त्यापासून दुसऱ्यास त्रास देता येतो. त्यापासून संरक्षण कसे करावे हे सांगण्यापूर्वी परदेशातील याच विषयावरील काही सत्यसृष्टीतील अनुभव वाचकांच्या माहितीकरता देत आहे. तिबेटमधील अनुभव तर फार विचित्र आहेत. त्यावर दशकांनी पुस्तके लिहिली गेली आहेत. त्यासंबंधी माहिती देणे म्हणजे विस्तार फार होईल. येथे आफ्रिकेतील, परंतु अत्यंत विश्वसनीय व अत्यंत जबाबदार व्यक्तींनी अनुभवलेले असे काही अनुभव वाचकांच्या माहितीकरता देत आहे.

खालील हकीकती आफ्रिकेतील घाना या देशातील, तो स्वतंत्र होण्यापूर्वी ब्रिटि-

शांच्या अमलाखाली होता, त्यावेळच्या व इंग्रज अधिकाऱ्यांच्या अनुभवातील आहेत. त्यावेळी १९५३ च्या सुमारास इंग्रजांनी सर्व देशभर धरणे, कालवे, सडका, मोठमोठे कारखाने, इमारती वगैरे बांधकामे सुरू केली होती व त्याकरिता मोठमोठ्या तज्ज्ञ तांत्रिक व इंजिनिअर्सची रवानगी करण्यात आली होती. त्यांना कामे करवून घेण्याकरता तेथील राहणाऱ्या लोकांकडून मजुरीची वगैरे कामे करवून घ्यावी लागत होती व त्या सर्व कामांकरता नेहमी लागणारे सामानाचे मोठमोठे ढिगारे पडलेले होते. त्यातून लहानमोठ्या चोऱ्या नेहमी होत असत व त्यांचा कधी तपास लागत नसे. त्याकरता जेम्स नील नावाचा एक अधिकारी Investigating officer म्हणून त्याच्या पथकासुद्धा पाठविला गेला होता. त्याने स्वतः त्यास व त्याचे काही दुय्यम अधिकारी यांस जादूविषयक आलेल्या अनुभवाचे एक सुमारे १५० पानांचे पुस्तक लिहिले आहे. त्यातील काही अनुभव खाली देत आहे. त्यावरून इतर देशातही ही विद्या कशी प्रचारात आहे, याची वाचकांना साधारण कल्पना येईल.

१९५३ सालची हकीकत. नील आपल्या कामावर रुजू झाल्यावर एके ठिकाणी जाऊन त्याने प्रत्यक्ष पाहणी केली. तेथे हजारो रुपयांचे सामान रोज चोरीस जात होते व चोर कोण आहेत हे माहीत असूनही तेथील युरोपियन अधिकारी त्यांना पकडून शिक्षा करण्यास भीत होते व त्याचे कारण म्हणजे या लोकांत जू जू या नावाने प्रसिद्ध असलेली जादू. तिच्या योगाने कोणासही स्पर्श करताच एखाद्या व्यक्तीस जगातून नाहीसे करणे हा तेथील रहिवाशांच्या हातचा मळ होता. हे त्यांना अनुभवाने माहीत होते. त्यामुळे प्रत्यक्ष चोऱ्या पाहात असूनही ते त्यांच्याविरुद्ध कोणतेही पाऊल उचलण्यास असमर्थ होते. परंतु नील हा ताजा इंग्लंडहून आलेला ऑफिसर असल्याने त्याचा यावर विश्वास नव्हता. म्हणून त्याने आश्वासनपूर्वक सांगून जवळ जवळ बळजरीने काही साक्षीदार तयार केले. खटला चालू होण्याच्या सुमारास त्यातील दोन साक्षीदार एकाएकी मरण पावले .व त्यांच्या मरणाचे कारण कोणत्याही डॉक्टरांना सांगता आले नाही. नंतर एका जज्जापुढे खटला उभा राहिला त्या वेळी असा अनुभव आला की, नेमके त्या खटल्याच्या तारखेच्या दिवशी तो जज्ज आजारी पडावयाचा व तो खटला पुढे नेमला जावयाचा. असे अनेक वेळा झाले. शेवटी कसा तरी तो खटला संपून आरोपीस तीन वर्षांची सजा झाली. मध्यंतरी नील यास पण धमकीची पत्रे येऊ लागली होती व जू जू ने तुझा प्राण घेऊ असा त्यास मजकूर असे.

मध्यंतरी एकदा नीलचा मफलर चोरीस गेला व एकदा छत्री. यावरून त्याचा विश्वासू असिस्टंट ॲडेजी (तेथील रहिवासी) याची खात्री झाली की आता नीलवर सुद्धा जू जू चा प्रयोग होणार. त्याप्रमाणे एकदा मोटारीत नीलचे सीटवर एक काळी पावडर टाकलेली आढळली. दार उघडून नील बसणार इतक्यात ॲडेजीने तीचा स्पर्श होण्यापूर्वी नील यास बाहेर ओढून काढले व ती पावडर सर्व बाहेर काढून

CamScanner

लांब नेऊन टाकली व ती सीट काळजीपूर्वक पुसून स्वच्छ केली. तीवर नील बसला असता तर नक्कीच मरण पावला असता, असे अॅडेजी म्हणाला. असे तीन वेळा घडले त्यावरून अॅडेजी म्हणाला की माझा काका टेटी म्हणून आहे त्यास यासंबंधी पूर्ण माहिती असून, तो याचा पक्का बंदोबस्त करील त्यास बोलावू काय ? नीलने त्यास संमती दिल्यानंतर एक दिवस तो आला व नीलजवळून दोन शिलिंगाचे नाणे मागून घेतले. त्यावर काही मंत्र वगैरे म्हटल्यानंतर त्याने नीलवर कोणकोणते वेळी काय काय प्रयोग झाले व ते करणारी माणसे कोण कोण आहेत त्यासंबंधी सविस्तर वर्णन केले व सांगितले की, तुरुंगात गेलेल्या माणसाचा एक पुतण्या आहे. तो मोठा जू जू–वाला आहे. तो तुमच्यावर सारखा प्रयोग करीत राहणार आहे, त्याने त्या माणसांना कधीच पाहिले असण्याचा संभत नव्हता. परंतु इतके हुबेहूब वर्णन केले की, नील यास ती माणसे कोण आहेत ते सहज कळले. पुढे त्यास आढळून आले की त्याची काम करणारी माणसे एकेक कमी होत असून त्यांचा पत्ता लागत नाही. तपास करीत असता त्याच्या लोकांनी एका स्त्रीस पकडून आणले व सांगितले की ही मोठी चेटकीण आहे व ती आपली माणसे कोठेतरी जादूने उचलून नेते व मारून खाते. तिला जरब देऊन विचारले असता तिने सांगितले की, हे सर्व खोटे असून ती सर्व माणसे भूमिगत असून चोऱ्या करण्यात भाग घेत आहेत. तिने त्यांचा ठावठिकाण व वर्णन बरोबर सांगितले व ते सर्व त्या ठिकाणी सापडले ती म्हणाली की, मी व माझ्यासारख्या एकंदर आणखी नऊ स्त्रीया रात्री आकाशातून प्रवास करीत असतो, त्या वेळी आम्हास हे सर्व दिसते.

तिने आणखी हकीकत सांगितली की काही जादुगार वाघ बनून माणसाची हत्या करतात. त्यांना खातात व परत माणसाचे रूप घेऊन त्यांच्यात येऊन राहतात. ते कोण वगैरे त्यांचे सविस्तर वर्णन तिने केले. त्याचप्रमाणे तिने सांगितले की नीलला अजून काही जू जू मांत्रिकाकडून धोका आहे. त्याबद्दल त्याने इलाज करावा. पुढे नील यास त्रास सुरू झाला व काही कारण नसता त्याचे सर्वांग खाजू लागले. मान व पाठीवर काही किडे वळवळत असून ते तेथे आपले घर करीत आहेत, असे त्यास वाटू लागले. ते दिसत नव्हते. मात्र त्यांचे अस्तित्वाचा भास नक्की होत होता. सर्व औषधी इलाज झाले; परंतु त्याचा आजार वाढतच चालला. यावरून पुन्हा अॅडेजीचे काकास बोलावणे पाठवले. त्याने शकून पाहून सांगितले की, तीन मोठे जू जू मांत्रिक त्याच्या पाठीस लागले असून, त्यांचा बंदोबस्त करणे त्यांच्या आवाक्याबाहेर होते. म्हणून एक त्यांच्या ओळखीचा फार मोठा धार्मिक जू जूला प्रतिकार करणे जाणणारा महामांत्रिक मालम यास त्याचे बंदोबस्ताकरता बोलावण्यात आले. त्याने सुद्धा शकून पाहून सांगितले की तीन फार मोठे मांत्रिक तुमच्या बंगल्यावर जू जू चा प्रयोग करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांचा प्रयोग सफल झाला तर तुम्हाला काही एक कारण नसता मृत्यू येईल. ही खाज व किडे वळवळण्याचा भास ही त्याची प्रारंभिक

क्रिया होय. तुम्ही सांगाल तर मी असा बंदोबस्त करीन, की त्यामुळे बंगल्याचे भोवतालचे विवक्षित अंतराचे आत जादूचा प्रवेशच होऊ शकणार नाही त्याप्रमाणे त्याने तीन मेंढ्या मारून त्यांच्या रक्तात काही औषधे मिसळून ते बंगल्याचे आवारात सर्व बाजूस पुरून ठेवले व सांगितले की आता या बंगल्यात किंवा त्याच्या आवारात जू जू वाले काही करू शकणार नाहीत.

त्यानंतर त्याची प्रकृती आपोआप सुधारली व त्याचा सर्व त्रास कमी झाला. एकदा बंगल्याच्या आवारात काही काम करीत असता एक नाग निघाला, तो त्याचा सेक्रेटरी ॲडेजी याने मारला. परंतु थोड्या वेळाने त्यांना एक हिरवा साप दिसला. तो दिसता क्षणीच सर्व आफ्रिकन नोकर भिऊन मागे सरले. त्यांनी सांगितले की हा सर्प जू जू लोकांनी मंत्राने तयार केला असून तो चावला तर काही क्षणात मृत्यू हा ठेवलेलाच. त्यावर काही इलाजच नाही. परंतु थोड्याच वेळात असे आढळले की, त्या मांत्रिकाने भारून ठेवलेल्या जागेपुढे तो सर्प येऊच शकेना. जणू काही त्यास काही प्रत्यक्ष अडथळा होत होता. तो तेथपर्यंत येऊन डोके आपटी व परत जाई असे अनेक वेळा घडले. त्यामुळे त्यांना कळून आले की जू जू ची मात्रा या जागेपुढे काहीच चालण्यासारखी नव्हती. यावरून आपलेकडील कवच अभिमंत्रून देण्याची कल्पना येते. कारण त्या सर्पास काही दृश्य असा अडथळा दिसत नसताना सुद्धा प्रयत्न करूनही त्या जागेच्या आत येणे शक्य झाले नाही. त्यास अदृश्य पण प्रत्यक्ष प्रतिकार होत असल्याचे दिसत होते. पुढे त्याचे डोके कापले, त्यावेळी त्यातून रक्ताचा एक थेंबही निघाला नाही व हीच जू जू ची खूण होती.

परंतु ही बंगल्यापुरती व्यवस्था झाली. त्यास बाहेर जू जू चा त्रास सुरूच होता व नोकरांना डोळ्यात तेल घालून जपावे लागे. तेव्हा त्यावरही काही कायम इलाज असावा म्हणून ते मालमकडे गेले. हा मालम म्हणजे एक धार्मिक प्रवृत्तीचा अशिक्षित परंतु जादुविद्येत अत्यंत पारंगत असा मनुष्य होता. तो धर्माने मुसलमान होता. त्याने या विषयाचे केलेले विवेचन शास्त्रीय पद्धतीने विशद होत असलेल्या विवेचनाशी इतके मिळतेजुळते आहे की, चांगल्या शास्त्रज्ञास सुद्धा त्याबद्दल आश्चर्य वाटावे. त्याने सांगितले, मी तुमचा बंगला जू जू पासून संरक्षित केला आहे. परंतु तुम्ही बाहेर असला म्हणजे तुमच्यावर प्रयोग होऊ शकतो. याकरता मी तुम्हास सर्व प्रकारच्या जादूपासून सर्व काळ संरक्षण मिळेल असे काही करून देतो. ते सर्व काळ जवळ ठेवीत जा म्हणजे तुम्हास कसल्याही जादूचा कधीही त्रास होणार नाही. असे सांगून त्याने दोन तीन दिवसांत बरेच मंत्रोच्चार करून मेंढ्या वगैरे मारून व आणखी काही क्रिया करून नील यास एक Amulet वळे किंवा ताईत तयार करून दिले व सांगितले की, हे सदैव खिशांत किंवा अंगावर ठेवा. तुम्हाला कोणतीही जादू केव्हाही, कसलाही परिणाम करू शकणार नाही व त्याचा तुम्हास अनुभव पाहाणे असेल तर मोटारीत तुमचे सीटवर कोणी काळी पावडर पसरून ठेवली आहे तीवर ताईत ठेवून पहा.

नीलने त्याप्रमाणे करताच ती काळी पावडर एकाएकी जळू लागली व तिची पांढरी राख होऊन पडली. नील यास फार आश्चर्य वाटले व तो काय सांगत होता त्यावर विश्वास ठेवणे भाग पडले.

त्याने मालमला हे कसे होते म्हणून विचारले असता त्याने सांगितलेली हकीकत मोठी विलक्षण वाटली. तो म्हणाला की, मालम व्हावयाचे म्हणजे सर्व प्रकारची जू जू मंत्र विद्या शिकावी लागते. ते शिकविणारे गुरू निराळे असतात. ते प्रथम शिकाऊ उमेदवाराची परीक्षा घेतात, त्यांना उन्हात दिवसचे दिवस बसवितात. अन्नपाण्यावाचून ठेवतात व प्रसंगविशेषी भयंकर विषारी अशा मुंग्यांचे वारुळावर सुद्धा तासचे तास बसवितात, त्या सर्व परीक्षांतून तो उत्तीर्ण झाला म्हणजे मग त्यास ती विद्या शिकवितात. ती शिकून झाल्यावर दुसरा एक धार्मिक प्रवृत्तीचा गुरू पाहावा लागतो व त्याच्याकडून या सर्व जू जू स प्रतिकार करणारी विद्या शिकावी लागते व विशेष म्हणजे तिचा कोणास फायदा करून देत असता स्वतः करता म्हणून कसलाही मोबदला घ्यावयाचा नसतो व तसे केले तर सर्व विद्या नष्ट होते. त्यास विचारले की, हे जू जू करतात म्हणजे तरी काय? त्याने सांगितले की, ज्यावर प्रयोग करावयाचा असेल त्याच्या शरीराशी प्रत्यक्ष संपर्कात असलेली वस्तू प्रथम मिळवावयाची; मग तो हातरुमाल का असेना. त्यानंतर तीन मेंढ्या मंत्रपूर्वक मारण्यात येतात. त्यांचे रक्त एका कढईत गोळा करून त्यात त्या व्यक्तीचा तो जिन्नस टाकावयाचा व खाली मंदाग्नी लावून सतत मंत्रोच्चार करीत घोटीत राहावयाचे. काही वेळाने त्यातील पाण्याचा अंश जळून जाऊन केवळ काळी अशी भुकटी उरते व तीत मंत्राचे सर्व संस्कार भरलेले असतात.

आपणाकडे ज्याप्रमाणे मंत्रोच्चार करताना देवदत्त याऐवजी त्या व्यक्तीचे नाव उच्चारून मंत्र जपावयाचा असतो, त्याचप्रमाणे ही सगळी क्रिया करीत असताना त्या त्या वेळी केल्या जाणाऱ्या मंत्रोच्चारात त्या व्यक्तीचे नाव घेण्यात येत असते व अशा रीतीने मंत्रोच्चारपूर्वक पावडर तयार झाली म्हणजे ती त्या व्यक्तीच्या सीटवर अगर कोठेही अशा ठिकाणी पसरून ठेवावयाची की, तिचा त्या व्यक्तीच्या शरीराशी प्रत्यक्ष संपर्क यावा. या रीतीने एकदा का संपर्क आला की त्या पावडरमधील स्पंदने त्या व्यक्तीत शिरून ती व्यक्ती कोणताही दृश्य आजार न होता मृत्यू पावते व त्याचे कारण कोणासही कधीही समजत नाही व सांगता पण येत नाही. पोस्टमार्टेममध्ये सुद्धा काही कारण कधीही सापडू शकत नाही. ज्यांना ठार मारावयाचे नसेल त्यांना त्याच पद्धतीने पण निरनिराळ्या आजारांची स्पंदनात्मक पावडर तयार करावयाची की तिच्या संपर्काने त्यांना ते आजार होतात व त्यांवर काहीही इलाज चालत नाही. नील समोर आफ्रिकनच काय परंतु पुष्कळ युरोपियन अधिकारीसुद्धा अशा रीतीने मरण पावले होते व कित्येक नोकरी सोडून गेले होते. त्यांना असा अनुभव होता की नोकरी

सोडून जाताना बोटीत पाय ठेवताच कोणत्याही औषधावाचून ते खडखडीत बरे होत. खुद्द नील यास झालेला खाजेचा व किडे वळवळण्याचा हाच प्रकार होता.

शेवटी तर एकदा नील त्याचे संरक्षक वळे बरोबर नेण्यास विसरला किंवा मंत्रप्रयोगानेच अशी योजना केली गेली होती त्यावेळी त्यास कोणीतरी अदृश्य शक्तीने ढकलून २५ फुटांवरून खाली फेकून दिले. त्यास पडताना बघणाराने सांगितले की, त्याच्या जवळपास १०० फुटांवर कोणीही नव्हते. मात्र त्यास स्पष्ट जाणीव झाली की कोणीतरी त्यास प्रत्यक्ष धक्का देऊन झाली लोटले. त्यावेळी तो जबर जखमी झाला व कित्येक महिन्यांच्या शुश्रूषेनंतर थोडा हिंडू-फिरू लागला. त्यानंतर त्यास त्या मालमने भेटून सांगितले की तुझे शत्रू फार प्रबळ आहेत. त्यास प्रत्यक्ष पिशाच्चांचे सहाय्य आहे व त्यांच्यापैकीच एकाने तू संरक्षक वळे विसरावेस अशी योजना केली व दुसऱ्याने ते जवळ नाही असे पाहून तुला ढकलून दिले. अशा परिस्थितीत मी सुद्धा तुझे फार काळ संरक्षण करू शकणार नाही. याकरता तू आपल्या मायदेशी परत जावे हे बरे. त्याचे म्हणणे नील यास पटले व तो नोकरी सोडून मायदेशी परत गेला.

असे वृत्तांत सर्व देणे शक्य नाही ही घाना देशाच्या एका भागामधील हकीकत. आफ्रिकेतील सर्व देशांमधून असे व यापेक्षाही भयंकर जादूचे प्रयोग आजही चालू आहेत तिबेट तर या विद्येकरता प्रसिद्धच आहे, ही विद्या सर्व देशांत सर्व काळ चालू आहे त्यासंबंधी विस्तारपूर्वक लिहावयाचे म्हणजे काही ग्रंथ लिहावे लागतील. साधारण रूपरेषा समजण्यापुरते हे पुरे आहे असे मला वाटते.

असो हे सर्व झाले व अशाप्रकारची काळी जादू सर्वत्र आहे. त्यापासून अपरिमित नुकसान होते, हे कळले. परंतु नुसते कळून उपयोग काय ? तिचा परिणाम झाल्यानंतर अगर होण्यापूर्वी तिच्यापासून संरक्षण करण्याचे काही परिणामकारक इलाज असले तर ते हवेत. नाही तर पुष्कळ कळले व त्यापासून संरक्षणच करता न आले तर उपयोग काय ? यावर सुद्धा शेकडो लहानमोठे इलाज सांगितले आहेत. परंतु कोण कोणत्या प्रकारची जादू केव्हा करील किंवा केली आहे व तीवर विवक्षित इलाज काय हे सांगता येणे म्हणजे प्रत्येकास त्या सबंध शास्त्राचा अभ्यास करून तीतील डॉक्टरच बनावयास पाहिजे. याकरता जादू, करणी अथवा पिशाच्च, प्रेतसाधना काही का असेना या सर्वांवर सारखीच उपयोगी पडेल व ती खात्रीपूर्वक परिणामकारी असेल अशी उपाययोजना—मग ती थोडी कठीण का असेना—माहीत असली तर तिचा काही उपयोग तरी करता येईल. असे काही खात्रीपूर्वक इलाज खाली नमूद करीत आहेत. गरजूंनी त्याचा अवश्य अवलंब करावा.

या सर्व वाममार्गातील मंत्र, तंत्र व शक्तीपासून बचाव करून घेणे असेल तर खालील सोपी व सर्वांस सहज करता येणारी योजना करावी. ती प्रतिबंधक तर आहेच, परंतु ज्यांना बाधा वगैरे झाली असेल त्यांनासुद्धा उपयोगी पडेल.

बाधा, करणी, मंतरप्रयोग हे ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीबाबत करण्यात येतात

CamScanner

त्याचप्रमाणे ते एखाद्या वास्तूबद्दलही करू शकतात. आपण म्हणतो की हे घर झपाटलेले आहे किंवा या घराबाबत कोणी करणी केली आहे. ते खरे असते व अशा घरात नेहमी काही ना काही विचित्र घडत असते. विचित्र स्वप्ने पडतात. पुष्कळ वेळा ती भयानक असतात. तीत राहणाऱ्या व्यक्तींत कारण नसता दुरावा उत्पन्न होतो. कोणास आकस्मिक अपघात होतात. घरातील वातावरण नेहमी मलूल व उदासवाणे असते. घर सोडून थोडे दिवस जरी घरातील मंडळी बाहेरगावी गेली तरी त्यांना एकदम फरक वाटू लागतो. सर्वांच्या वृत्ती उल्हसित होतात. आरोग्य सुधारते. परत घरी आले की पूर्वीप्रमाणेच त्रास सुरू होतो. काहीही व कितीही केले तरी ऊर्जितावस्था येत नाही. अशा वेळी समजावे की त्या वास्तूत काही दैवी दोष उत्पन्न झालेला असून त्याचे निराकरण झाल्याशिवाय परिस्थिती कधीच सुधारणार नाही.

ज्याप्रमाणे वास्तू त्याप्रमाणेच व्यक्ती. मात्र व्यक्तीबाबत समजावयास फारशी अडचण पडत नाही. सुशिक्षित मंडळी यास हसतात किंवा उपेक्षा करतात. परंतु ती चूक आहे. अशा काही वाममार्गातील घटना असू शकतात व त्या आहेत याकडे दुर्लक्ष करू नये. योग्य वेळी योग्य व्यक्तीकडून इलाज करावेत. उगीच अडाणी भगत–भक्तिणी–मांत्रिक यांच्या नादी लागून कोंबड्या व बकऱ्यांचे बळी देऊन पैसा व वेळ फुकट घालवू नये. सभ्य मार्गातील उपाययोजना करीत गेले तर थोडा वेळ लागतो; पण त्यांची स्पंदने उत्पन्न होऊन ती वाममार्गातील उत्पन्न झालेली व परिणाम करीत असलेली स्पंदने निश्चित नाहीशी करतात व ते उपाय सर्वांस घरच्या घरी इतर कोणाच्या मदतीशिवाय करता येतील. एखाद्या चांगल्या सत्पुरुषाची मदत मिळाली तर सोन्याहून पिवळे. मग इतर फारसे काही करावे लागत नाही.

१. व्यक्ती असो वा वास्तू कोणाकरताही योजना करणे असो, त्या घरातील सर्वांनी आपला अहार, विहार व आचार अगदी शुद्ध व पवित्र ठेवला पाहिजे. घरातील कोणीही निषिद्ध खाणारे पिणारे अगर अनाचाराने वागणारे असले तर त्याने आचारात सुधारणा करीपर्यंत त्या व्यक्ती अगर कुटुंबाकरता ही योजना नाही असे समजावे.

२. घरातील कोणीही अगर सर्वांनी मिळून ॥ ॐ श्री रामाय नमः ॥ हा मंत्र सव्वा लक्ष करावा. कुटुंब फार लहान असेल तर निदान अकरा हजार लिहून काढावा व एका लाकडी पेटीत रेशमी अवगुंठनात गुंडाळून सुरक्षित ठेवावा. ती पेटी एखाद्या कोनाड्यात अगर कोठेही थोडया उंच जागी ठेवून तीवर श्रीरामपंचायतनाचे चित्र फ्रेम करून ठेवावे. त्याची नित्य पूजाअर्चा करीत जाऊन समोर दीप, उदबत्ती, फुले वगैरे ठेवीत जावे. रात्री जेवणापूर्वी सर्वांनी निदान कोणीतरी एकाने त्यासमोर रामरक्षेचा एक पाठ करावा. त्यात खंड पडू देऊ नये. घरास अगर व्यक्तीस भूत-बाधा असली तर ती सात सप्तकात निश्चित नाहीशी होईल. मात्र वर्तन व पूजाक्रम यात खंड पडू देऊ नये.

CamScanner

शक्य झाले तर सकाळी लवकर स्नान करून कुटुंबप्रमुख स्त्री अगर पुरुष यांपैकी कोणीही समोर विष्णुसहस्रनामाचा पाठ करावा. म्हणजे लवकर फळ मिळेल.

३. अगर नवनाथाच्या पोथीची २१ पारायणे त्या घरात करावीत. नंतर रोज एक अध्याय तरी निजताना वाचण्याचा क्रम ठेवावा. ती पोथी पूजेत ठेवून शेजारी एक श्री दत्तात्रेयाचे चित्र फ्रेम करून ठेवावे व नित्य पूजाअर्चा, गंध, फुले, धूप वगैरे करीत जावे,

४. ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः

श्री दत्तात्रेयाचे एक चित्र फ्रेम करून आणावे व योग्य ठिकाणी स्थापना करून एखाद्या गुरुवारी निर्जळी उपवास करून स्थापना करावी. सायंकाळी नैवेद्य धूपदीपादी दाखवून ११ माळा वरील मंत्राचा जप करून उपवास सोडावा. रोज निदान ११ माळा जप करून १०० दिवसांत निदान ११०० माळा जप पूर्ण करावा. नंतर हाच जप १०८ माळा म्हणजे ११००० एका वहीत लिहून काढावा, त्यास वरीलप्रमाणे रेशमी वस्त्रात ठेवून लाकडी पेटीत श्री दत्तात्रेयाचे चित्राजवळ ठेवावे. रोज निदान १ माळ जप करून पूजा–अर्चा, धूप–दीप वगैरे करीत असावे. गुरुवारचा उपवास चालू ठेवावा. १०० दिवसांत ते घर अथवा व्यक्ती दैवी उपद्रवापासून निश्चित मुक्त होईल व पूजा–पाठ चालू आहे तोपर्यंत त्रास होणार नाही.

५. श्रीराम नाम तेरा लक्ष लिहून वरप्रमाणे गुंडाळून पेटीत ठेवावे व त्याजवळ श्री मारुतिरायाचे चित्राची स्थापना करावी. शनिवारचा उपवास करून श्री मारुतिरायास फूल, माळा वगैरे वाहून नारळ फोडणे, पूजा धूप दीप वगैरे रोज करीत असावे. त्याचप्रमाणे रोज सकाळ सायंकाळ श्री रामरक्षेचा एक तरी पाठ करीत असावे. लवकरच सर्वप्रकारची पीडा शांत होईल.

६. कोणत्याही वास्तूत सतत अत्यंत त्रास होत आहे व कशानेही जात नाही, असे आढळून आले तर अखंड श्री विष्णुसहस्रनामाचा जप सतत चोवीस तास एक आठवडा करावा. सुरवात बुधवार किंवा गुरुवारी करावी. व्यक्ती असेल तर पाठ चालू असता त्यास एकभुक्त राहून पाठ ऐकवीत बसवावे. सात दिवसांत तो सर्व त्रासातून मुक्त होईल. व्यक्ती असो वा वास्तू

७. ज्यास अशी इच्छा असेल की, आपण आपल्या सर्व कुटुंबासमवेत तर अशा त्रासापासून मुक्त राहावेच; परंतु आपणाजवळ असे काही असावे की त्यायोगे आपण इतरांसही या त्रासापासून मुक्त करू शकू. त्यांनी खाली सांगितल्याप्रमाणे करावे.

घरातील कोणा एका व्यक्तीने–शक्य तोवर पुरुष व्यक्तीने एखाद्या पवित्र पंचवटीसारख्या ठिकाणी राहून नुसता राम राम राम राम राम असा एक एक कोटी जप पूर्ण करावा. नंतर नं. १ मध्ये सांगितल्याप्रमाणे त्यानेच ॥ रां रामाय

नमः ।। हा मंत्र विधिपूर्वक सव्वा लक्ष लिहून काढावा. जप चालू असता लिहिणे सुद्धा चालू असले तरी हरकत नाही; मात्र हे सर्व एकाच व्यक्तीने ब्रह्मचर्याने व काया, वाचा, मनेकरून पवित्र राहून पूर्ण करावे. क्षेत्री करणे शक्य नसेल तर घरी केला तरी चालेल. परंतु त्याकरता स्वतंत्र जागा असावी व कोणाचा उपसर्ग नसावा. नंतर नं. २ मध्ये सांगितल्याप्रमाणे लिखित जपाची श्रीरामाचे चित्रासह स्थापना करावी. रोज पूजा अर्चा करीत असावे. कोणीही पीडित मदतीकरता आला तर १०८ वेळा रक्षा हातात घेऊन १०८ वेळा तो मंत्र जप करावा व त्या पीडित व्यक्तीस रक्षा लावावी व आणखी उदी त्यात मिसळून घरभर फुंकण्यास सांगावे. असे तीन वेळ करावे. घर व घरातील सर्व व्यक्ती अशा कोणत्याही त्रासापासून मुक्त होतील व साधकाच्या घराण्यात जोपर्यंत पवित्र वातावरण कायम राहून त्या मूर्ती व जपाची पूजाअर्चा होत राहील तोपर्यंत त्यातील कुटुंबप्रमुखास ती सिद्धी कायम राहील. प्रत्येकाने कोटी जप करावयास नको. फक्त परंपरा चालू ठेवावी.

८. ज्याच्याकडे श्री दत्तात्रेयाची पूजाअर्चा असते, त्यांनी गाणगापूर, नरसिंहवाडी किंवा औदुंबर अशा ठिकाणी जाऊन कुटुंबप्रमुख अथवा कोणीही ।। ॐ द्रां दत्तात्रेय नमः ।। हा जप दहा लक्ष वेळा जपावा. गुरुवारी उपास करून सुरवात करावी. जप चालू असता अथवा नंतर सवालक्ष हाच जप लिहून काढावा. गुरुवार सतत करीत असावा घरी परत आल्यावर शक्य तर घराबाहेर परंतु आपल्या आवारात मोकळ्या जागेवर ओटा बांधून तेथे लहानसे देऊळ बांधून समोर पाचपन्नास लोक बसू शकतील अशी मोकळी जागा असावी. लहानसे देवळासारखे करून त्यात तो लिहिलेला जप वरप्रमाणे ठेवून त्या पेटीवर श्री दत्तात्रेयांच्या मूर्तीची स्थापना विधिपूर्वक करावी. धूप दीप पूजा अर्चा सकाळ सायंकाळ घरातील कोणाकडून तरी श्रद्धापूर्वक होत राहील असे करावे. श्री दत्तासमोर वरील मंत्र निदान एक माळ जपला जावा. अशी योजना झाल्यावर तेथे गुरुवारी सायंकाळी बैठक बोलावीत जावी. श्री दत्तात्रेयाचे भजन पूजन आनंदाने व श्रद्धेने करीत असावे. बैठकीत पीडित व्यक्तीस घेऊन यावे. अंगात येऊन सर्व काही सांगेल. तो सांगेल त्याप्रमाणे शांति करावी. मात्र मद्य, मांस वगैरे मागेल तर इन्कार करावा. मग त्यावर मंत्राने अभिमंत्रून नुसती उदी टाकीत राहावे. एक दोन बैठकीत अंगातील सर्व पीडा जाईल. घर झपाटलेले असेल तर तेथील उदी १०८ वेळा मंत्रून घरभर फुंकावी. तीन वेळ करण्याच्या आत सर्व त्रास मिटेल. त्या स्थानाला महत्त्व येईल. मात्र पूजा अर्चा त्याच कुटुंबातील व्यक्तीच्या हातून होत राहावी. मग तो अस्पृश्य का असेना. ही सिद्धी मिळाल्यास निदान पूजाअर्चा करणारी व्यक्ती योग्य आहारविहारयुक्त राहून उपासना करीत राहील तोपर्यंत कोणीही कटाक्षाने या कामाकरता कोणाकडूनही द्रव्य घेऊ नये. तसे केले तर व आहारविहार भ्रष्ट झाला तर सिद्धी नष्ट होईल हे लक्षात ठेवावे. विभूती उदीप्रमाणे मंत्रून तीर्थ पण पिण्यास अथवा शिंपडण्यास देण्यात येते.

कोणतेही कुटुंब सर्वच्या सर्व, जर निदान तीन महिने शरीर व मन यांनी पूर्ण पवित्र राहून वरीलपैकी कोणताही जप त्यातील कोणीही केला तर त्या कुटुंबातील सर्व दोष व त्याच्यात असलेली बरीवाईट स्पंदने विराम पावतात व त्यानंतर सव्य मंत्राचे जपाने जी स्पंदने उत्पन्न होतात त्यांना वामाचाराने उत्पन्न झालेली किंवा कोणी करणी तंत्र किंवा मंत्र इत्यादींनी लादलेली कृष्ण स्पंदने या सव्य मंत्राच्या स्पंदनांनी आक्रमण केले म्हणजे ती नाहीशी होऊन त्यांची जागा ही घेतात व व्यक्ती अथवा वास्तूमधील सर्व प्रकारचा त्रास नाहीसा होतो. हे यातील शास्त्रीय विवरण आहे. मग त्यासंबंधीचा खुलासा पटो वा न पटो. पीडितांनी जरूर करून पाहावे व त्याप्रमाणे अनुभव न आला तर मला कळवावे.

* * *

CamScanner

१९. उडत्या तबकड्या

उडत्या तबकड्या अथवा Flying Saucers किंवा Un. F. O. म्हणजे Unidentified Flying Objects याबद्दल वर्तमानपत्रे व मासिकातून बरीच उलटसुलट चर्चा सुरू असून त्यासंबंधी निर्णायक असे काहींही शास्त्रज्ञांनी ठरविलेले दिसत नाही; यामुळे हा विषय अद्याप विवाद्य आहे, असे ठरवून त्यासंबंधी या ग्रंथात काही चर्चा न करण्याचे ठरविले होते. हाही एक चर्चेस योग्य असा अज्ञात विषय आहे व अलीकडील साधकबाधक चर्चेवरून असे आढळून आले की, आता हा विषय इतका अज्ञात राहिलेला नाही; तर काही देशाच्या सरकारांनी त्यास मुद्दाम अज्ञात ठेवण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्यास तसे न करण्यास काही योग्य कारणे असतीलही; परंतु कारणे काही असली तरी सत्य हे उजेडात येणारच व त्याप्रमाणे ते हळू हळू ते येत पण आहे. म्हणून व अलीकडील काही घटनांवरून जगाच्या दृष्टीने त्यास आगळेच महत्त्व येऊ पाहात आहे. म्हणून अगदी थोडक्यात का होईना परंतु त्याचा या ग्रंथात परामर्ष घ्यावा असे ठरवीत आहे. काही हजार वर्षांपासून परग्रहावरील अथवा ताऱ्यावरील आपणापेक्षा पुष्कळ पटीने जास्त सुसंस्कृत व विज्ञानात खूप प्रगती केलेले असे मानव अगर मानवसदृश व्यक्ती पृथ्वीस भेट देऊन आपल्या संस्कृतीच्या व विज्ञानाच्या प्रगतीस मदत करीत आहेत याचे थोडे साधार विवेचन यापूर्वी याच ग्रंथात केलेले आहे.

Flying Saucers किंवा उडत्या तबकड्या असे नाव पडण्याचे कारण अलीकडे परग्रह किंवा ताऱ्यावरून पृथ्वीस भेट देणारी बहुतेक याने मोठ्या तबकड्यांच्या आकाराची दिसतात. मात्र सर्वच या आकाराची असतात असे मात्र नाही. काही सिगारचे आकारांच्या तर काही पंख्यासुद्धा विमानाच्या आकाराच्यासुद्धा दिसतात. परंतु बहुतेक तबकड्यांच्या (Saucers) आकारांची असल्याने त्यास उडत्या तबकड्या किंवा Flying Saucers हे नामाभिधान प्राप्त झाले आहे. मात्र सरकार दप्तरी यास Un. F. O. म्हणजे Unidentified Flying Objects म्हणजे 'ओळखता न आलेले असे उडते पदार्थ' या नावाने संबोधले जाते. सर्वांचा अर्थ मात्र एकच त्या अज्ञात प्रदेशातून येतात, काही वेळ दिसतात व परत अज्ञात प्रदेशात निघून जातात. त्या काय आहेत, कशा आहेत, त्यांची रचना कशी असते, त्यास इंधन काय लागते, त्यांचा अलीकडे विशेष संख्येने पृथ्वीस भेट देण्यात काय उद्देश आहे, यासंबंधी सांगोपांग विचार करण्यापूर्वी थोडा पूर्वेतिहास उपलब्ध आहे तो पाहू या.

यासंबंधी सर्वांत जुना उल्लेख सुमारे ४८००० वर्षांपूर्वी चीनमधील दुगाटिंग प्रांतातील सरोवरातील एका बेटातील खडकावर कोरलेल्या स्वरूपात आढळतो. त्यात आकाशात एक सिलेंडरसारखा पदार्थ दाखविला असून त्यावर काही माणसे सामान घेऊन उभी असून काही खाली जमिनीवर उतरली आहेत असे दाखविले आहे. यासंबंधी थोडे शास्त्रीय स्वरूपाचे उल्लेख ख्रिस्ती शकापूर्वी १५४७ ते १४४० मध्ये झालेल्या Thymose या राजाच्या कारकीर्दीत लिहिल्या गेलेल्या Papyrus मधील काही भागात सापडतो. परंतु ते फार जीर्ण झाल्याने त्यातून सुसंबद्ध असे फारसे सापडू शकले नाही. त्याचप्रमाणे इसवी सन २२ मध्ये हिवाळ्याच्या तिसऱ्या महिन्यातील सहाव्या तासाला आकाशातून गोल गरगरीत असा एक अग्निगोलक येताना दिसला. त्यास अतिशय घाण येत होती. परंतु आवाज मात्र येत नव्हता. लोकांनी यासंबंधी त्यांचा राजा फरो (इजिप्त) यास ही हकीकत सांगितली. त्यानंतर काही दिवसांनी त्यापेक्षा जास्त प्रकाशमान अशा तबकड्या उडताना दिसल्या. रामायण महाभारतात तर यासंबंधी पुष्कळ विस्तृत वर्णन आढळते. रामायणातील पुष्पक विमान हे दुमजली असून त्यात अनेक सुशोभित व सुसज्ज अशा खोल्या होत्या व अनेक खिडक्या होत्या व चालताना त्यापासून एक प्रकारचा मधुर असा आवाज निघत असे. ‘समरांगण सूत्रधार,’ या प्रकरणात विमान विद्येविषयी विस्तृत वर्णन आढळते. (दुर्दैवाने ते अद्याप लेखकास पाहावयास मिळाले नाही.) त्यात त्यांचा आकार, त्यांची यंत्रणा, त्यांचे इंधन, ते कसे चालवावे, एके ठिकाणी स्थिर ठेवणे, गिरक्या मारणे, न थांबता हज़ारो मैलांचा प्रवास करणे, वगैरे पुष्कळ गोष्टी दिलेल्या आहेत. काही तिबेटी पुस्तकांतूनही बरीच वर्णने आढळतात. ‘भारतीय ज्ञानसाधना’ हे शीर्षक असलेल्या पुस्तकातून तर असे वर्णन आढळते की, एका धातूच्या अवकाशयानातून काही लोक पृथ्वीवर वस्ती करण्याकरता म्हणून आले. प्रथम त्यांचे स्वागत झाले. परंतु पुढे मतभेद उत्पन्न झाल्यामुळे तेथील राजाने अवकाशवीर बरोबर घेऊन एका चकाकणाऱ्या यानातून शत्रूच्या शहरावर एक प्रकाशझोत टाकला. त्याने त्या शहरास आग लागून ज्वाला अंतराळापर्यंत उसळल्या व शहरातील सर्व प्राणी भाजले गेले. ज्यांनी या प्रकाशकिरणाकडे पाहिले त्यांचे डोळे आंधळे झाले व त्यानंतर त्या शहरात प्रवेश केलेले सर्व आजारी पडले व मेले. तेथील धूळ, नदी व तलावातील पाणी ही सर्व विषारी झाली होती. हा सर्व विध्वंस पाहून तो राजा यानात बसून परत गेला.

कदाचित ही एक नुसती कथा असेल; तरी पण तीवरून त्यांना अणुविच्छेदन-त्यांचे स्फोट, लेसर व त्यांचे होणारे परिणाम यांची स्पष्ट कल्पना होती असे दिसते.

प्राचीन रोमन लोकांनी यासंबंधी बरेच लिखाण करून ठेवले आहे. त्यातील काही खाली देत आहे. इ. सन पूर्वी २१६ मध्ये आकाशात बरीच याने दिसली. इ. स. पू. २१३ मध्ये हाड्रिया येथे एका यानावर बरीच माणसे पांढऱ्या पोषाखात उभी असलेली दिसली.

CamScanner

इ. स. पू. १८६ मध्ये लेक्षनिव्हिअम येथे आकाशात एक वस्तू मशालीसारखी जळताना दिसत होती, अनाग्रिया येथे काही दिवसांपूर्वी असेच दिसले होते.

B. C. २२० ते ९० या काळातील अशा स्वरूपाच्या बऱ्याच घटना नमूद केलेल्या आढळतात. परंतु त्या लोकवार्ता या सदरातील वाटतात. सन ६० ते ८० मध्ये स्कॉटलंडमध्ये अशा अनेक तबकड्या दिसल्याचा उल्लेख आहे. बरेच दिवस रात्री हा प्रकार दिसत असे व त्याने हवा तापून जात असे.

शार्लमेनच्या कारकीर्दीत (७४२ ते ८१४) काम्टे नावाचा एक लेखक लिहितो की, एके रात्री लायन्स येथे एका अवकाश–यानातून तीन माणसे व एक स्त्री पृथ्वीवर उतरताना दिसली. सन ११९ मध्ये हंगेरीत जळत्या मशालीप्रमाणे एक वस्तू व त्यातून अनेक अग्निलोलक बाहेर पडत आहेत असे दिसले. ३–८–१०१५ रोजी जपानमधील बऱ्याच लोकांनी दोन अवकाश-यानांतून बरीच चकाकणारी याने बाहेर पडताना पाहिली. ऑगस्ट १०६७ मध्ये इजिप्तमधील कैरो या शहरावरून बरीच याने आवाज करीत गेली असा उल्लेख सापडतो. सन ११९० मध्ये यॉर्कशायरमधील वायलँड ओवे येथे वर्तुळाकार तबकडीच्या आकाराचे चकाकणारे एक यान आकाशात पुष्कळांना दिसले व त्याची सर्वांना भीती वाटली. परंतु या लेखकाने लिहिले आहे की, जानेवारी १२५४ मध्ये निरभ्र आकाशात रात्री एक मोठे यान बऱ्याच उंचावरून जाताना दिसले. ते बराच वेळ दिसत होते व हळू हळू दिसेनासे झाले. इंग्लंडमधील ऑक्सीनिज येथे ८ नोव्हेंबर १३२२ रोजी रात्री आकाशात एक मोठा ज्वालेचा स्तंभ दिसला. तो एका लहान बोटीएवढा दिसत असून, हळू हळू उत्तरेकडे सरकत गेला. १ नोव्हेंबर १४०४ रोजी फ्रान्समधील आटास या गावावरून जहाजाप्रमाणे दिसणारे एक यान प्रवास करताना दिसले. १४–११–१४५५ रोजी न्यूरेंबर्ग येथे पुष्कळ लोकांनी बऱ्याच लाल व हिरव्या रंगाची तबकडींचे आकाराची वाहने आकाशात एकमेकाशी युद्ध करीत असताना आढळली. त्याचप्रमाणे ७ ऑगस्ट रोजी बेसल येथे हजारो लोकांना आकाशात काळ्या रंगाचे गोल पदार्थ मोठ्या वेगाने सूर्याकडे जात असलेले दिसले. ते मध्येच वळले व एकमेकावर आपटले. जणू काही आपसात भांडण करीत होते. त्यानंतर ते विस्तवासारखे लाल दिसू लागले व जळून गेले व त्यांचा उजेडही नाहीसा झाला. धूमकेतूचे प्राथिद्ध संशोधक एडमंड हॅले यांनी लिहिले आहे की, इंग्लंडमध्ये मे १६७० व ६ मार्च १७१६ रोजी त्यांनी रात्री आकाशात प्रकाशमान अशी याने पाहिली व पाहता पाहता त्यांचा प्रकाश एकदम वाढला. १७ डिसेंबर १७४२ रोजी जेम्सपार्क लंडन येथे एका झाडाआडून एक प्रकाश २७ डिग्रीपर्यंत वर येताना दिसला. त्याची गती कमी होती व तो सरकत सरकत नाहीसा झाला. १७४६ मध्ये लॉवेल येथे चकाकणारे तबकडीच्या आकाराचे एक यान दिसले व त्यातून एक लिबलिबित पदार्थ पृथ्वीवर पडला अथवा टाकला गेला. त्याचे वजन १४४२ पौंड असून त्यास अत्यंत घाण येत होती. १२-८-

CamScanner

१८८३ रोजी मेक्सिकोमधील झेकोक्सिकस येथे काही गोल व लांबोड्या अशा आकाराची आकाशयाने सूर्यबिंबावरून जाताना दिसली. एकूण २८३ मोजली व त्याचे फोटो पण घेतले. १–११–१८९९ रोजी सिगार आकाराचे परंतु पंख असलेले यान सॅनफ्रान्सिस्को शहरावरून जाताना दिसले. त्याच्यातून सर्चलाइटसारखा प्रकाश पण पडलेला दिसत होता. एप्रिल १८९६ मध्ये लिलीरॉक कमारा येथे एक लांबोडया आकाराचे यान दिसले. त्याची लांबी सुमारे ३०० फूट होती. १३–१०–१९१७ ला फातमा पोर्तुगाल येथे तबकडीच्या आकाराचे परंतु खूप चकचकीत असे यान आकाशातून जाताना दिसले. ता. ३० जून १९०८ साली रशियन सैबेरियात झालेली अशनीवृष्टी प्रसिद्धच आहे. तिने शेकडो मैलांचा प्रदेश उद्ध्वस्त झाला होता. ही अशनीवृष्टी नसून कोणीतरी परग्रहावरील व्यक्तींनी तेथे केलेला अणुस्फोट असावा असे शास्त्रज्ञांचे अनुमान आहे. बायबलातील सोडोरा व गोमोरा ही शहरे आकाशातून वृष्टी होऊन बेचिराख झाली किंवा भारताच्या दक्षिण भागात ऋषींच्या शापाने अग्नी व धूळ यांची वृष्टी होऊन शेकडो मैलांचा प्रदेश उद्ध्वस्त होऊन त्याचे दंडकारण्य तयार झाले हेही अणुस्फोटाचेच प्रकार असावेत.

अशा रीतीने फार पुरातन काळापासून परग्रहस्थ मधून मधून पृथ्वीस भेट देत असल्याचे उल्लेख सापडतात. परंतु १९४७ नंतरच्या त्यांच्या भेटींना काही आगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. ते काय आहे ते पाहण्यापूर्वी त्यांची थोडी पार्श्वभूमी काय व कशी आहे ते बघूया. कार्ल सेगन (Dr. Sagan) म्हणून २७ वर्षे वयाचे (१९६८ साली) एक प्रसिद्ध अमेरिकन वैज्ञानिक आहेत व त्यांचा या विषयावर सखोल अभ्यास आहे. त्यांची मते प्रमाण मानली जातात. त्यांनी विधान केले आहे की, प्रत्येक तारकापुंजात (Galaxy) कमीत कमी दहा हजार कोटी सूर्य आहेत, त्याप्रमाणे ते आपल्या आकाशगंगा तारका पुंजात सुद्धा आहेत. त्यातील प्रत्येक ताऱ्याभोवती आपल्या सूर्यमालेत आहे त्याप्रमाणे अनेक ग्रह फिरत असावेत त्यांपैकी काही ग्रहांच्या बाबतीत अशी शक्यता आहे की, पृथ्वीप्रमाणे अगर त्याहून अनेक पटींनी अधिक संस्कृती व विज्ञानसंपन्न अशी जीवसृष्टी अनेक ग्रहांवर असावी व ते आपसात सांस्कृतिक अनुदान प्रदान करीत असावेत. त्यातील काही आपल्या पृथ्वीस पण कधी कधी भेट देत असावेत. आपला सूर्य हा केवळ आठ ग्रह असलेला मध्यम गतीचा तारा आहे व तो काही प्रकाश वर्षे अंतरावरून नुसत्या डोळ्यांनी दिसणारसुद्धा नाही. त्यापेक्षा कोट्यवधी पटीने मोठे असे कोट्यवधी सूर्य इतर तारकापुंज सोडले तरी केवळ आपल्या आकाशगंगा तारका पुंजातसुद्धा आहेत व त्यामुळे अशी शक्यता आहे की, त्यापैकी बहुतेकांनी शेकडो अथवा हजारो आपले पृथ्वीसारखे ग्रह, उपग्रह आपणाभोवती फिरते ठेवले असतील. अशी कमीत कमी ५००० कोटी आकाशगंगेसारखी विश्वे आपल्या शास्त्रज्ञांस आज मोजता येतात. मग एकंदर किती असतील याची कल्पनाच केलेली बरी. कालमानाने ग्रह लवकर थंड होत जातात. त्यांचे थंड होण्याचे कालमान त्यांच्या आकार-

मानावर असते. उदाहरणार्थ, आपला चंद्र फार लहान असल्याने अजिबात थंड झाला आहे. पृथ्वीचा पृष्ठभाग थंड असला तरी पोटात अद्याप फार उष्णता आहे व गुरू, शनीसारखे फार मोठे ग्रह अद्याप उष्ण अशाच अवस्थेत आहेत. निसर्गप्रमाणे कालेकरून ग्रह थंड होऊ लागून त्यावर हवा, पाणी वगैरे उत्पन्न झाले की वनस्पती, प्राणिसृष्टी वगैरे आपोआपच उत्पन्न होऊ लागतात. त्याचप्रमाणे त्यावर कमीअधिक बुद्धिमान प्राणी पण उत्पन्न होऊ लागतात. त्यांचा विकास होत राहातो. अर्थात तो विकास ज्या मानाने पूर्वी अगर नंतर विकासास सुरुवात झाली असेल त्या मानाने होत राहतो. त्यामुळे ताऱ्यावर जरी नसले तरी त्याच्याभोवती फिरणाऱ्या ग्रहांवर ते ज्या मानाने कमीजास्त वेळात थंड होऊन जीवसृष्टी निर्माण होण्यास योग्य झाले असतील त्या त्या ग्रहावर जीवसृष्टी निर्माण होऊन उत्क्रांतिवादाप्रमाणे विकासही होत असलाच पाहिजे. मी म्हणतो, आपल्या आकाशगंगेतील प्रत्येक दहा हजार ताऱ्यांपैकी फक्त एकावर एकच ग्रह असा जीवसृष्टी धारण करणारा आहे असे धरले तरी निदान एक कोटी ग्रह तरी असे आहेत व त्यांच्यावर जीवसृष्टी असून ते उत्क्रांत होत आहेत. आपली पृथ्वी सुमारे ५०० कोटी वर्षांपूर्वी उत्पन्न झालेली आहे व तीवरील जीवसृष्टी सुद्धा उत्पन्न होऊन दोनशे कोटी वर्षे झालेली आहेत. मानव उत्पन्न होऊन तर केवळ पाच लक्ष वर्षे झाली आहेत. विज्ञानयुगास सुरुवात झाली त्यास तर केवळ तेराच वर्षे झालेली आहेत. कारण रशियाने आपला पहिला स्फुटनिक अवकाशात (आक्टोबर १९५७) सोडला. तेथूनच आपल्या अवकाश युगास सुरुवात झाली असे म्हणावे लागेल. एक कोटी ही कमीत कमी संख्या मी धरलेली आहे. खरोखरच कित्येक हजार कोटी ग्रह असे असतील की, ज्यांच्यावर जीवसृष्टी असून आपणापेक्षा ते लोक अनेक पटीने अधिक सुसंस्कृत व विज्ञानसंपन्न असतील. कारण उत्क्रांतीचे काम काल करीत असतो व मानव किंवा असा एखादा वंश त्यास केवळ कारणीभूत होत असतो. एखादा ग्रह समजा, आपल्यापेक्षा काही हजार वर्षे लवकर थंड होऊन जीवसृष्टी धारण करू लागला तर साहजिकच त्यावरील संस्कृति आपणापेक्षा अधिक प्रगत असेल, त्यामुळे हे शक्य आहे. असे संस्कृति व विज्ञानसंपन्न प्राणी आपापल्या ग्रहावरून इतरांशी संपर्क साधून सांस्कृतिक अथवा वैज्ञानिक देवाण-घेवाण करीत असतील. आपण पाहिलेच आहे की, पृथ्वीवर सुद्धा कमीत कमी ४७००० वर्षांपूर्वी कोणीतरी आपणापाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्या वेळी किंवा खरे सांगावयाचे म्हणजे आजही त्यांना समजावून घेण्यापुरती आपली तयारी नाही; याचा अर्थ पात्रता नाही. १८५३ पूर्वी मुंबईहून केवळ पुण्यास जावयाचे म्हणजे ४-५ दिवस लागत. ते आज आपण अर्ध्या तासात जाऊ शकतो. असे शक्य होईल हे त्या वेळी कोणास सांगून तरी खरे वाटले असते काय किंवा केवळ ५० वर्षांपूर्वी सुद्धा मानव चंद्रावर जाऊ शकेल असे म्हणणाऱ्यास वेड्यात काढले असते. आज अगदी अशक्य कोटीतील वाटणाऱ्या गोष्टी कालगतीने व निसर्गक्रमाने शक्य होत

जातात. असे जरी असले तरी आज जे शक्य आहे ते जमेस धरूनच नजीकच्या भविष्यातील घटनांचा विचार करावयाचा असतो. म्हणजे आजच्यापेक्षा थोडे पुढे पाऊल टाकून शक्य कोटीत काय असते ते पहावयाचे व त्यासंबंधी प्रयत्न करावयाचा असतो. रोमन लोकांनी ‘ चंद्रावर का जाता येऊ नये—प्रयत्न करून पाहू या ’ असे म्हटले असते तर त्यांना ते शक्य तर झालेच नसते; पण आम जनतेने त्यांना वेड्यात काढले असते. परंतु आज आपणापैकी काहीजण प्रत्यक्ष जाऊन आले आहेत, यावरून नजिकचे भविष्यात इतर ग्रहांवर जाणे शक्य होईल हे म्हटले तर काही वावगे होणार नाही—परंतु आजच आपण आकाशगंगेतील इतर ताऱ्यांवर अगर त्याहीपलीकडील इतर तारकापुंजावर जाऊ शकू असे म्हणणे वेडेपणाचे होईल. कोण जाणे, काही शतकांनी कदाचित ते शक्य होईलही. परंतु आज ती कल्पनाच केवळ हास्यास्पद आहे मग ती कोणीही मांडलेली असो. इतके या ठिकाणी विस्ताराने लिहावयाचे कारण असे की, काही तज्ज्ञांच्या मते या उडत्या तबकड्या सूर्यमालेपलीकडून येत असाव्यात असे आहे. याच्याविरुद्ध असा आक्षेप घेण्यात येतो की, केवळ प्रकाशाच्या वेगाने तारामंडळातून अशी याने येतील असे म्हटले तरी शंभर प्रकाश वर्षे अंतरात केवळ १५–२० तारे आहेत व बाकी सर्व एक लाख प्रकाश वर्षे अंतरात आपले आकाशगंगेत पसरलेले आहेत व त्यापलीकडे तर विचारावयास नको. ४०० कोटी प्रकाश–वर्षे अंतरावरील तारे केवळ आपली २०० इंची दुर्बीण दाखविते. त्यापलीकडे किती असतील ते तो निर्माता व नियंताच जाणे ! अशी प्रचंड अंतरे असल्याने इतर ताऱ्यांवरून कोणी कसे यावयाचे ? कारण निदान आजच्या विज्ञान कोषात प्रकाशाच्या गतीपेक्षा अधिक गती संभवत नाही. त्यानी असे सुचविले आहे की कोण जाणे इतर ताऱ्यांवर वेगमर्यादा काही निराळी असू शकेल. असे गृहीत धरले तर, एक तर आजपर्यंतची आपली सर्व अनुमाने चुकली व वेग वाढला की मग अंतरही वाढले असे होऊन मूळ प्रश्न तसाच कायम राहील. एक असंभाव्य गोष्ट गृहीत धरावयाची व मग तिचे पुष्ट्यर्थ दुसरे असंभाव्य विधान पुढे करावयाचे असे होते. निदान आजच्या परिस्थितीत मानवास सूर्यमालेपलीकडे जाणे केवळ अशक्य आहे. कारण आपल्या अवकाशयानाचा हल्ली जास्तीत जास्त वेग ताशी १८००० मैल आहे, म्हणजे मुंबई ते दिल्ली हे अंतर ते केवळ २॥ मिनिटांत कापू शकते. परंतु याच गतीने सूर्यमालेपलीकडील पहिला तारा जो Alfa Centaris जो आपणापासून केवळ ४॥ वर्षे प्रकाश-वर्षे अंतरावर आहे, तेथे आपले यान पोचावयास कमीत कमी दीड लक्ष वर्षे लागतील. पुढे-मागे हा वेग वाढेलही. परंतु बेडकी फुगून काही बैल होऊ शकत नाही. शिवाय कल्पना करा की, अशा एखाद्या अत्यंत दूरच्या ताऱ्याभोवती फिरणाऱ्या एखाद्या ग्रहावरील एखादा अत्यंत बुद्धिमान व विज्ञानात खूप प्रगत असा जीव येऊही शकेल. परंतु आपली पृथ्वी इतकी क्षुद्र आहे की, त्यास तिच्या अस्तित्वाची सुद्धा जाणीव असणार नाही. कारण, दहापंधरा प्रकाश-वर्षे अंतरावर आपण

जर जाऊ शकलो तर आपला हा प्रचंड सूर्य नुसत्या डोळ्याने दिसू पण शकणार नाही, मग पृथ्वीची गोष्टच सोडा. ते जीव त्यांच्या जवळपासचे इतर संस्कृती व विज्ञानसंपन्न ग्रह सोडून मुद्दाम अत्यंत शक्तिमान अशा दुर्बिणींनी पृथ्वी शोधून काढून येथे येण्याचा प्रयास का करतील. असे इतके आकर्षक पृथ्वीवर आहेच काय. एकमेकास खाणारे प्राणी. म्हणजे एखादे प्रेसिडेंट निक्सन बस्तर स्टेटमधील दंडकारण्यातील रेल्वेपासून १०० मैल दूर असलेल्या एखाद्या आदिवासीचे झोपडीत त्यांचे कसे काय चालले आहे त्याचा शोध घेण्याकरता जाण्यासारखे आहे त्यात कोणास मदतच करणे असेल तर आजूबाजूस काय थोडे आहे तर त्याने मुद्दाम अशी झोपडी हुडकून काढावी. इतक्या विस्ताराने लिहावयाचे कारण म्हणजे सूर्यमालेपलीकडून ही याने येत असावीत हे विधान किती अशक्य कोटीतील आहे हे दाखविण्यास पुरेसे आहे असे मला वाटते.

कित्येक हजार वर्षांपासून या उडत्या तबकड्या अथवा याने आपल्या पृथ्वीस भेट देत आहेत हे तर निश्चित; मग ती कोठून येत असावीत तर एखादा ग्रह किंवा उपग्रहावरून असे म्हणण्याखेरीज पर्याय नाही व असे ग्रह म्हणजे शुक्र व मंगळ व कदाचित गुरूचा एखादा मोठा उपग्रह. पैकी शुक्रासंबंधी शास्त्रज्ञांना अद्याप काहीच अनुमान करता आले नाही. त्यावर असलेल्या दाट धुक्याच्या आवरणामुळे त्याचा पृष्ठभाग दिसू शकत नाही. त्यामुळे त्यावर हवा, पाणी, जीवसृष्टी वगैरे आहे किंवा कसे, त्याचा दिवस केवढा मोठा आहे वगैरे काही अनुमान करता आलेले नाही. तरी पण अमेरिका व रशिया यांची याने त्यास प्रदक्षिणा करून आलेली असल्याने त्यांना काही कळले असणे शक्य आहे. परंतु ते अद्याप गुप्त आहे. शुक्र हा सूर्यापासून केवळ ६ कोटी ७२ लक्ष मैलांवर असून त्याचा आकार पृथ्वीएवढाच असला तरी जीवसृष्टी उत्पन्न होण्यासारखी परिस्थिती त्यावर अद्याप उत्पन्न झालेली नसावी, असे अनुमान आहे.

प्रथम एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे व ती म्हणजे ही की, सर्व ग्रहांची उत्पत्ती केवळ आपल्या काही महिन्यांच्या काळात झालेली असावी. कारण सूर्य अद्याप केवळ तप्त असा वायुरूप गोल आहे व त्यापासून काही कोटी मैलांवरून दुसरा एखादा प्रचंड सूर्य जात असता त्याच्या आकर्षणाने सूर्यापासून हे ग्रहरूपी गोल तोडले गेले व विवक्षित अंतरावर स्थिर होऊन स्वतःभोवती व सूर्याभोवती फिरू लागले म्हणजे त्यांचा उत्पत्तिकाल हा तो दुसरा प्रचंड सूर्य आपल्या सूर्याजवळ येऊन लांब जाईपर्यंतचा म्हणजे फार तर धूमकेतूप्रमाणे काही महिन्यांचाच केवळ असू शकेल. अर्थात सुरुवातीला सर्व ग्रह सूर्यासारखेच, रसरशीत वायुरूपी असतील; परंतु निसर्गाच्या नियमाप्रमाणे ग्रह अथवा उपग्रह जितका लहान अगर मोठा, तितका त्यास थंड व्हावयास कमी-अधिक वेळ लागणार. सुरुवातीला ते प्रचंड वेगाने स्वतःभोवती फिरत होते; परंतु जसजसे थंड होत गेले तसतशी त्यांची स्वतःभोवती

फिरण्याची गतीसुद्धा कमीकमी होऊ लागली. त्यामानाने चंद्र सर्वांत लहान आहे म्हणून तो लवकर थंड झाला व त्यास स्वत:भोवती एक प्रदक्षिणा करण्यास आपले २९ दिवस लागतात. आपली पृथ्वी त्यापेक्षा ४९ पटीने मोठी आहे. तिला स्वप्रदक्षिणेस चोवीस तास लागतात. गुरू व शनी हे अनुक्रमे पृथ्वीपेक्षा १२०० व ७०० पट मोठे असल्याने ते अद्यापि थंड झालेले नाहीत. ते स्वतःभोवती प्रदक्षिणा आपल्या केवळ ९–१० तासांत करतात. त्यांचा पृष्ठभाग अद्याप तप्त स्वरूपात असल्याने त्यांच्यावर जीवसृष्टी उत्पन्न होण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली नसावी. त्यांच्यापेक्षा दूर असलेल्या ग्रहांचा विचार करावयास नको. शक्यता एकच आहे की, गुरूचे दोन चंद्र जवळ जवळ मंगळाएवढे आहेत व त्यांस गुरूपासून थोडी उष्णता मिळत असावी, म्हणून त्यांपैकी एखाद्यावर जीवसृष्टी असण्याचा संभव आहे. परंतु त्याचे अंतर ४७ कोटी मैलांपेक्षा अधिक असल्याने त्यांनी आपणाशी संपर्क साधण्याचा संभव कमी. बुधाचा प्रश्नच नाही; कारण तो सूर्याच्या फारच निकट आहे व त्यास त्यापासून धगधगीत भट्टीइतकी उष्णता मिळते.

जीवनास अत्यंत आवश्यक असे म्हणजे हवा व पाणी. ते असले म्हणजे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही जीवसृष्टी तग धरू शकते. सहारा वाळवंटातील उष्णतेत, त्याचप्रमाणे उत्तर-दक्षिण ध्रुवावर जेथे शून्याचे खाली १०० वर थंडी असते तेथेही जीवसृष्टी आढळते. परंतु जेथे हवा व पाणीच अद्याप उत्पन्न झाले नसेल तेथे जीवसृष्टी कशी उत्पन्न होणार व तगणार? चंद्र आपणाबरोबर उत्पन्न होऊन अत्यंत लहान असल्याने पुष्कळ लवकर म्हणजे काही कोटी वर्षांपूर्वीच थंड होऊन गेला व त्यावरील हवा-पाणी नाहीसे झाले. परंतु जर त्यावर उत्खनन करून पाहिले (मात्र ते खूप खोलवर कारण कोट्यवधी वर्षांत त्यावर खूप जाड असा धूळ मातीचा थर बसला असेल.) तर तेथे फार पूर्वी असलेल्या एखाद्या प्रगत संस्कृतीचा पुरावा निश्चित सापडेल.

संस्कृती व विज्ञान यांची प्रगती काल करीत असतो व आपण त्यास केवळ कारणीभूत होत असतो, याची सतत जाणीव असू द्यावी. गर्व करण्यासारखे आपणाजवळ काही नाही. काल व निसर्ग ही त्यास हवे ते योग्य वेळी, योग्य स्थळी आपणाकडून सर्व काही करवून घेत असतात. याकरता सर्व दृष्टींनी विचार करता, मंगळावर फक्त जीवसृष्टी असण्याची शक्यता वाटते व त्यावरूनच या उडत्या तबकड्या येत असाव्यात असे अनुमान करण्यास जागा आहे. त्याबाबत मात्र साधक बाधक अशा पुष्कळ गोष्टी विचारात घेण्यासारख्या आहेत. कारण एक तर तो पृथ्वीपेक्षा बराच लहान आहे. त्याचा व्यास केवळ ४२०० मैल आहे. शिवाय त्याचे सूर्यापासून अंतर सरासरीने १४ कोटी मैल काहे. म्हणजे आपणापेक्षा त्यांस सूर्याकडून उष्णता पुष्कळ कमी प्रमाणात मिळत आहे व शिवाय त्याचा आकारही बराच लहान असल्याने पृथ्वीच्या मानाने तो लवकर थंड होऊ लागून निदान काही कोटी वर्षे तरी

अगोदर त्यावर जीवसृष्टी उत्पन्न होण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली असली पाहिजे. त्यामानाने समजा, आमच्या अगोदर काही लाख वर्षांपूर्वी जरी तेथे मानवसदृश प्राणी निर्माण झाला असेल तर साहजिकच त्यांची संस्कृती व वैज्ञानिक प्रगती आपणापेक्षा अनेक पटींनी अधिक असेल. त्याच तत्त्वाप्रमाणे तो ज्याप्रमाणे लवकर थंड होऊ लागला त्याचप्रमाणे तो आपल्यापेक्षा पुष्कळ लवकर संपूर्ण थंड होऊन त्यावरील हवा-पाणी नाहीसे होऊन तो जीवसृष्टी जगविण्यास अपात्र ठरेल. त्याची कमी गुरुत्वाकर्षण शक्ती हे पण हवा-पाण्याचे लवकर बाष्पीभवन होण्यास मदत करील कारण ते पृथ्वीइतक्या तीव्रतेने त्याला ओढून धरू शकत नाही. पृथ्वीवरीलसुद्धा अगदी सूक्ष्म प्रमाणात का होईना परंतु हवा पाणी या दोहोंचे बाष्पीभवन होऊन ती कमी कमी होत आहेत, परंतु त्यांची दृश्य स्वरूपात जाणीव होण्यास अद्याप काही कोटी वर्षे लागतील.

वरील कारणाने मंगळावर अशी परिस्थिती उत्पन्न झालेली दिसत आहे की, त्यांचे हवा व पाणी आताच बरेच कमी झाले असून त्यासंबंधी दुर्भिक्ष तीव्रतेने जाणवू लागले आहे व म्हणून त्यांनी समुद्रापासून मोठमोठे कालवे काढून ते सर्व ग्रहभर फिरविले आहेत. काही शास्त्रज्ञांनी हे विधान खोडण्याचा प्रयत्न केला होता. परंतु अगदी अलीकडेच त्यास दुजोरा मिळाला आहे. त्यामुळे तेथील बुद्धिमान व विज्ञानसंपन्न जीवांना साहजिकच यापुढे जगावयाचे कसे व कोठे हा प्रश्न पडला असेल व ही महान समस्या सोडविण्याकरता सोयीच्या अशा एखाद्या परग्रहावर स्थलांतर करण्याची कल्पना त्यांच्या बुद्धीस सुचणे काही अशक्य नाही व आपणापेक्षा विज्ञानात ते अनेक पटींनी पुढे गेलेले असल्याने ती कल्पना प्रत्यक्ष कृतीत कशी आणता येईल यासंबंधी प्रयत्न करणे सुद्धा काही अशक्य नाही. त्यांना सर्वांत जवळचा व जीवसृष्टी टिकविण्यास अनुकूल असा ग्रह म्हणजे आपली पृथ्वीच होय; हाच आपणास मोठा धोका निर्माण झालेला आहे. निदान काही हजार वर्षांपासून उडत्या तबकड्या किंवा अवकाश याने पृथ्वीस भेट देत असल्याचा उल्लेख आपणाजवळ आहे, म्हणजे त्यांचे अवकाशयुग सुरू होऊन निदान काही हजार वर्षे तरी लोटली आहेत व आपणास ऑक्टोबर १९५७ म्हणजे राशियनाने पहिले स्फुटनिक सोडल्यापासून सारी तेराच वर्षे झालेली आहेत.

मंगळावरील बुद्धिमान जीवांनी या क्षेत्रात किती प्रगती केलेली आहे हे पाहणे असेल तर केवळ त्यांच्या दोन उपग्रहांवरून कल्पना येईल. पुष्कळ प्रयत्न करूनही सन १७६२ पर्यंत तरी मंगळाला एखादा उपग्रह असावा याची शास्त्रज्ञांस जाणीव होऊ शकली नाही. साधने व उपकरणात निराळी काही सुधारणा न होता १७७७ साली त्यांना मंगळाभोवती फिरणाऱ्या दोन उपग्रहांची जाणीव झाली. यावरून असे अनुमान करावयास जागा आहे की, उपग्रह निसर्गनिर्मित नसून त्यावरील बुद्धिसंपन्न जीवांनी कृत्रिम रीतीने परग्रहावर जाण्याकरता तळ असावा म्हणून तयार केलेले

असावे व असे अनुमान करण्यास पुष्कळ जागा पण आहे. कोणी म्हणेल की, दृष्टिपथात न आले म्हणून ते नव्हेतच असे कसे म्हणता येईल ? हे जरी खरे असले तरी काही कारणे व पुराव्यावरून ते कृत्रिम असण्याचीच शक्यता अधिक वाटते. यापैकी पहिला फोबस हा मंगळापासून केवळ ५८०० मैलांवर आहे. व त्याची मंगळाभोवती फिरण्याची गती मंगळापेक्षा तिप्पट आहे. त्याचा व्यास पाच मैल आहे. हा उपग्रह जर खरोखरीच कृत्रिम असला तर आपल्या वैज्ञानिकांस असे वाटते की पुढील लाख वर्षांतसुद्धा त्यांना येवढ्या आकाराचा उपग्रह तयार करून इतक्या अंतरावर ठेवता येणार नाही. वैज्ञानिकांनी एका ०·५२ किलोमीटर व्यासाच्या उल्केच्या वजनाचे अनुमान केले तर ते १५० कोटी टन भरले, हा उपग्रह एकंदर आकाराने त्याच्या ५०० पट मोठा असल्याने त्याचे वजन काय असू शकेल त्याची कल्पनाच केलेली बरी ! आपले उपग्रह काही औसांपासून काही पौंड वजनाचे आहेत त्यावरून कल्पना करा.

दुसरा डीमास १० मैल व्यासाचा असून १४६०० मैल अंतरावर आहे. एका वैज्ञानिकाचे तर असे म्हणणे आहे की तो फोबस सर्व धातूचा बनविलेला असून आतून पोकळ आहे. हे उपग्रह कृत्रिम असावेत याची काही कारणे अशी आहेत—

(१) इतर कोणत्याही ग्रहाचा उपग्रह इतक्या जवळचे अंतरावर नाही.

(२) सूर्य मालेतील ३२ उपग्रहापैकी एकाचीही गती त्याच्या मुख्य ग्रहापेक्षा जास्त नाही व असू शकत नाही, कारण तो मूळ ग्रहापेक्षा लहान असल्याने फार तर उत्पत्तीच्या वेळी सारख्या गतीने फिरत राहील, पण त्या ग्रहाच्या मानाने पुष्कळ लवकर थंड होऊ लागल्याने त्यांची गती मूळ ग्रहापेक्षा कमी होत जाईल - वाढणार नाही. याची गती मंगळापेक्षा तिप्पट आहे.

(३) त्याचप्रमाणे तो, ग्रहाच्या मानाने इतका लहान पण असू शकत नाही यावरून उपग्रह कृत्रिम असावे, याच अनुमानास बळकटी येते.

या एकाच उदाहरणावरून त्यांची वैज्ञानिक प्रगती किती झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. या उडत्या तबकड्या जगाच्या सर्व भागावर मधून मधून दिसत असत व आहेत. २४।१२।१८९५ रोजी तर इनरविज नावाच्या जहाजावरील कॅप्टनने एक खूप मोठे अवकाशयान डोक्यावरून जाताना पाहिले. ते समुद्रात इतके जोराने पडले की त्या योगाने उसळलेल्या लाटांनी त्यांचे जहाज बुडते की काय असा धोका उत्पन्न झाला होता. अशी शेकड्यांनी उदाहरणे नमूद आहेत. ती सर्व द्यावयाची म्हणजे ग्रंथविस्तार फार होईल. त्यावेळी म्हणजे १९५७ पर्यंत आपले एकही अवकाशयान आकाशात नव्हते व सन १९०३ पर्यंत आपल्याजवळ विमानेच नव्हती. यामुळेही ती सर्व परग्रहांवरून आली होती असे म्हणणे क्रमप्राप्तच आहे. परंतु १९४७ नंतर मात्र त्यांचे दिसण्याचे प्रमाण वाढत गेले. मानवाने १९४५ साली प्रथम अणुस्फोट केला व १९४७ सालापासून ही याने थव्याथव्याने

लागली, म्हणून ती जगाची दृष्टीने चिंतनीय तशीच भीतिप्रद बाब वाटू लागली. त्याबाबत त्या काळी अमेरिकन सरकारी रिपोर्टात असे म्हटले आहे की,

The strange crafts operating beyond the capabilities and control of any man–made devices had visited every important communication centre–industrial centres and military instalations on earth.

या घटना वारंवार घडून येऊ लागल्या व त्यामुळे जनतेत खळबळजनक वातावरण निर्माण होऊ लागले. त्यावेळी अमेरिकन सरकारने, कोणत्याही सरकारी संस्थेने अथवा कर्मचाऱ्यांनी याबाबत चर्चा करू नये; उलट त्या घटना खोट्या व अतिरंजित आहेत, असा प्रचार करावा म्हणून गुप्त हुकूम काढला व ऑगस्ट १९५२ मध्ये तर एक कडक बंदीहुकूम जारी करून कोणत्याही वर्तमानपत्रासमुद्धा यासंबंधी बातमी अथवा चर्चा करण्यास बंदी केली व तो हुकूम अद्याप जारी आहे. त्याचे थोडे अगोदर सरकारला असे दिसून आले की,

The worldwide complications of U. F. O. sightings is a programme of organised survillance of earth culminating in three memorable appearances in force over Washington D. C.

वर उल्लेखिलेले सुप्रसिद्ध डॉ. सेगन यांनी १९६२ साली अमेरिकन रॉकेट सोसायटीसमोर भाषण करताना खालील उद्गार काढले आहेत.

The earth probably has been visited by inteliegent beings representing an advanced civilization from outer space and he may have logically added that these visitors built and maintained a base on our Moon on the other side, man cannot see.

Gen. Mac. David Said–"We must be prepared for the future. Our relations with other life in the universe is part of the future.

Dr. Arther G. Clerk believes that–there can be little doubt–We will ultimately come into contact out in spaces with races more intellegent than our own. The human is only one of the many forms of life with which God is concerned and that others are far superior to us. And if this true he warned,–'Our meetings with other types of existence in other places of the universe quite likely will increase the Potential eliments of conflict rather reduce it. This imposes a greater burden of leadership on the

present young generation. If this background information on which our costly space programme is predicted. It is this why.

यावरून वाचकांना निदान साधारण तरी कल्पना येईल की, अमेरिकन वैज्ञानिक व सरकार यांच्या मनांत काय खळबळ सुरू आहे. १४।८।१९६२ रोजी अमेरिकन मरीनर शुक्र ग्रहावर जाऊन त्याने तेथून काही माहिती पृथ्वीवर पाठविली. त्यास ताशी एक कोटी पन्नास लक्ष डॉलर खर्च आला व हे मरीनर म्हणजे अनेक प्रयोगांपैकी केवळ एक होय. असे निदान पाच तरी आज प्रत्यक्ष कार्य करीत आहेत व या सर्वांस १९५३ ते १९६३ या दहा वर्षांत ५००० कोटी डॉलर खर्च आलेला आहे. कोणत्याही लढाईच्या तयारीस अथवा लढाईस इतका पैसा खर्ची पडलेला नाही. करिता अशी कोणती गंभीर व तातडीची परिस्थिती उत्पन्न झाली आहे की, अमेरिकेसारख्या अत्यंत प्रगत बुद्धिमान राष्ट्राने आपल्या जनतेकडून त्यांच्या हिताकरिता कररूपाने वसूल केलेला पैसा इतका अमाप खर्च करावा. सुरुवातीला रशियाची स्पर्धा हे कारण सांगण्यास येत होते. आता त्यांनी तो बुरखा टाकून दिला असून त्यांचे कारण राष्ट्रहिताचे असून, त्याचा स्फोट जाहीर रीतीने करणे हितावह होणार नाही असे सांगण्यात येते.

कोणत्याही प्रतिकारास अगर टीकेस न जुमानता केवळ युद्धकालात ज्याप्रमाणे तातडीच्या व अत्यंत खार्चिक अशा योजना जनतेची संमती न घेता हाती घेऊन पार पाडण्यात येतात, अगदी त्याचप्रमाणे किंवा त्याहून अधिक तातडीने व कितीही खर्चाची पर्वा न करता-राष्ट्राचे दिवाळे निघाले तरी हरकत नाही, परंतु या योजना पार पाडावयाच्याच अशा हिरीरीने त्या सुरू आहेत.. असे का ? चंद्रावरील एका फेरीस जो खर्च येतो तो आपल्या सर्व भारताच्या चार वर्षांच्या बजेटपेक्षा अधिक असतो व असे चार प्रोग्राम वर्षांतून अगोदरच त्यांनी आखलेले असतात. त्यांची तयारी पण चाललेली असते. चंद्रावर हवा नाही, पाणी नाही. मानव तेथे मोकळा असा काही मिनिटेही राहू शकणार नाही. याची कल्पना शंभर वर्षांपासून सर्वसामान्य जनतेलासुद्धा आहे. असे असता केनेडींनी वेडेपणाने ही योजना हाती घेतली असे मानले तरी जॉन्सननी तितक्याच हिरीरीने तिचा पाठपुरावा केला व निक्सन पण तेच करीत आहेत. त्यांना काय आपल्या प्रतिष्ठेपुढे जनतेच्या पैशाची किंमत नाही ? मग हे आहे तरी काय व कशाकरता, असा प्रश्न राहतोच.

१९५२ साली अशा तबकडीच्या आकाराची १५०० याने दिसल्याचा उल्लेख आहे. १९५७ मध्येसुद्धा १००० च्या वर दिसली. पुढे पुढे त्यांचे हे दिसणे नुसते दिसणे या स्वरूपात राहिले नाही, तर त्यापासून नुकसान, भीतिदायक प्रकार घडू लागले. ता. १ जुलै १९५४ रोजी न्यूयॉर्क येथील रडार केंद्रावर एक विलक्षण यान जवळ येत असल्याचा संदेश आला. त्यासंबंधी तपास करण्यासाठी म्हणून F.er हे यान वर पाठविण्यात आले. त्यास ते परकी यान दिसताच या यानाचा

आपल्या एंजिनशी संबंध तुटला व यानास आग लागली. त्यानंतर ते यान खाली कोसळले. त्धाच्याखाली एक मोटार व दोन घरांचा चुराडा झाला. २ मे १९५३ साली एक ब्रिटिश कॉमेट जेट लायनर कलकत्त्याहून ४३ इसम घेऊन निघाले व थोडयाच वेळांत त्याचे हवेतच तुकडे झाले. त्याच्या कारणांचा शोध घेता असे आढळले की, एखाद्या परग्रहावरून आलेल्या यानाशी टक्कर झाली असावी. परंतु त्याचे (UFO चे) काहीच अवशेष मिळाले नाहीत. ता. १ एप्रिल १९५९ रोजी पॅकफोर्ट फील्ड एअर फोर्सचे ९९१८ या विमानाने विमानतळ सोडल्यानंतर थोडयाच वेळात त्याच्याकडून संदेश आला की, आम्ही कशावर तरी आदळत आहोत किंवा काही तरी आम्हांवर कोसळत आहे. पुष्कळशा लोकांनी ज्यांनी ते दृश्य पाहिले त्यांनी सांगितले की, त्यांना दोन पिवळसर रंगाची याने त्यांचा पाठलाग करीत असलेली दिसली. ता. १२|९|१९५२ रोजी सटन शहरावर एक फार मोठे चकाकणारे यान दिसले. त्याने सोडलेल्या प्रकाश झोतात जे आले त्यांचा घसा व तोंडे सुजली. हा काहीतरी रेडिएशनचा प्रकार असावा असे अनुमान करण्यात आले. ता. ४–११–१९५७ रोजी रात्री इटायपू येथील ब्राझिलियन आर्मी फोर्टवर एक मोठा चकाकणारा पदार्थ दिसला व त्या क्षणीच त्या गावचा वीजपुरवठा बंद पडला. काय घडत आहे हे पाहण्याकरता दोन पहारेकरी बाहेर पडले असता त्यांचे सर्वांग भाजून निघाले. हासुद्धा एक प्रकारचा रेडिएशनचाच प्रकार आहे असे सांगण्यात आले. अशा प्रकारची शेकडोंनी उदाहरणे नमूद आहेत. ही याने दिसली की, जवळपासचे सर्व वीजप्रवाह बंद पडतात. काही कारण नसता मोटारीची एंजिने अथवा इतर यंत्रे काम करीनाशी होतात. यांत्रिक बिघाड असा काहीही नसतो. त्यांनी सोडलेल्या प्रकाशझोतात जे कोणी थोडा वेळ सापडले त्यांना इलेक्ट्रिक वेल्डिंग करताना ज्या प्रकारच्या जखमा होतात तशा होत असत व काही प्रकारांत तर मानसिक विकृती पण झाल्याचे आढळून आले आहे.

हे असे का व्हावे याचे कारण शोधूनही अद्याप कळले नाही. ता. ९|११|१९६५ रोजी न्यूयॉर्कच्या प्रसिद्ध आठ तासांचे ब्लॅक आऊटचे कारण अशाच प्रकारची याने असावीत असे अनुमान करण्यात येत आहे. कारण नंतर यंत्रसामुग्रीत कोणत्याही प्रकारचा बिघाड सापडला नाही. त्याचा विस्तार लंडनपर्यंत होता असे सांगण्यात येते. त्याच वेळी अशी काही अज्ञात याने दिसली होती, असे मात्र रेकार्डवर आहे. एवढेच नाहीतर त्यानंतर पुष्कळ ठिकाणी वेळोवेळी कारणावाचून असे ब्लॅक आऊटचे प्रकार अनुभवास आले व त्या त्या वेळी अशी याने दिसल्याच्या नोंदी आहेत. असे तर पुष्कळ वेळा अनुभवास आलेले आहे की, असे एखादे यान जमिनीवर उतरलेले असले अथवा जवळपास असले तर अर्धा मैल परिसरातील सर्व वाहने व यंत्रे आपोआप बंद पडतात, अंधार पडतो, त्यामुळे या सर्व घटनांशी त्या यानांचा निश्चित संबंध आहे असे अनुमान केले जाते.

त्या यानांवर अथवा त्यातील व्यक्तींवर पिस्तुले अथवा बंदुकांचा काही परिणाम होत नाही. त्यापैकी बहुतेकांचा आकार बंद तबकडीसारखा असून, व्यास ५० ते २०० फूटपर्यंत असतो. त्यास पुष्कळ खिडक्या असून त्यातून उजेड दिसत असतो. त्यांना कोठेही स्थिर होता येते. गिरक्या घेता येतात अथवा प्रत्यक्ष जमिनीवर न उतरता ५–७ फूट वर राहून ते सर्व प्रकारची पाहणी करू शकतात. काही क्षणातच त्यांना पूर्ण वेग घेता येतो व काही थोडे अंतर गेल्याबरोबर त्या एकदम दिसेनाशा होतात. हळू हळू आपल्याप्रमाणे कमी कमी होत दिसेनाशा होत नाहीत. त्यातील व्यक्ती काही लोकांनी पाहिल्या त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्या चार फुटांपेक्षा जास्त उंचीच्या नसून मनुष्यसदृश आकाराच्या आहेत. मात्र त्यांची त्वचा हिरव्या रंगाची दिसली. काहीना त्यांच्याशी भाषणे केल्याचा व काहींना त्यांच्या यानातून त्यांनी फिरवून आणल्याचा दावा केला आहे. मात्र तो इतका विश्वसनीय वाटत नाही. इतके मात्र खरे की, त्यांना धरून ठेवण्याचा ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केला ते विजेचा मोठा धक्का बसावा तसा धक्का बसून दूर फेकले गेले. त्यांना आपल्या वातावरणात वावरण्यासाठी काही निराळी साधने वापरावी लागत नाहीत.

१९६२ च्या ऑगस्टमध्ये एकट्या वॉशिंग्टन शहरावर अशी ६८ याने एकदम दिसली. त्यासंबंधी सरकारच्या बंदीमुळे जरी वर्तमानपत्रांतून काही माहिती येऊ शकली नाही तरी त्यासंबंधी संपूर्ण रेकार्ड सरकारदप्तरी आहे. याचा दृश्य परिणाम म्हणजे एकदम अनेक राष्ट्रांनी हाती घेतलेल्या दक्षिण ध्रुवावरील संशोधन केंद्राची स्थापना व केलेली संशोधने. त्यात रशिया, स्वीडन, नार्वे, अमेरिका या सर्वांनी अमाप पैसा खर्च करून आपले प्रमुख वैज्ञानिक त्या रक्त गोठविणाऱ्या शून्याखाली १०० टक्के थंडीत पाठविले होते व अजून पाठवीत आहेत. त्यानंतर आर्जेंटिना, चिली, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, इंग्लंड हे त्यास जाऊन मिळाले. अशा रीतीने उडत्या तबकड्या दिसू लागल्यासून चोवीस महिन्यांच्या आतच या सर्व देशांनी दाक्षिण ध्रुवाकडे धाव घ्यावी, याससुद्धा काही जागतिक महत्त्व आहे. या संशोधनाने वैज्ञानिकास एक गोष्ट कळून चुकली आहे की, या सर्व तबकड्या अथवा याने ध्रुवाकडूनच पृथ्वीकडे येतात. त्या वेळी त्यांना खरी कल्पना आली नाही की, हाच मार्ग का पत्करावा. ज्या वेळी पृथ्वीवरची दोन रॉकेटस् यंत्रसामुग्री घेऊन विषुववृत्तावरून अतिशय उंच गेली त्या वेळी त्यांना विशेष अडथळे जाणवू लागले, म्हणून त्यांनी यांच्या कारणांचा शोध घेतला व त्यांनी ता. २–३–१९५८ रोजी असे जाहीर केले की, पृथ्वीच्या विषुववृत्तावर सहाशे मैलांवर बराच जाड असा रेडिएशनच्या थर आहे. त्यास त्यांनी Von Allen Belt असे नाव दिले. तसे कोणतेही थर ध्रुवावर नाहीत व म्हणून त्या ठिकाणावरून यानास अडथळे न येता निर्वेध येता येते. ध्रुवावरील रेडिएशनच्या थरापेक्षा विषुववृत्तावरील थर निदान हजारपट तरी खास आहे.

यानंतर आपल्या वैज्ञानिकांस आणखी एक शोध लागला व तो म्हणजे या

परग्रहांवरून येणाऱ्या यानांवर गुरुत्वाकर्षणाचा काहीच परिणाम होत नाही. इतकेच नव्हे तर गुरुत्वाकर्षण शक्तीचे ते वीजशक्तीत परिवर्तन करून तेच त्याचे इंधन म्हणून वापरीत असावेत, असे त्यांना वाटते. त्यामुळे त्यांना पृथ्वी किंवा इतर कोणत्याही ग्रहावर जाणे सुलभ जाते. प्रसिद्ध वैज्ञानिक Prof. Herman Oberth यांनी या बाबतीत तीन वर्षे सतत संशोधन करून आपला निष्कर्ष खालील शब्दांत निवेदन केलेला आहे.

There is no doubt in my mind that these objects (U F.O.) are interplanatory craft of some sort. I am confident they do not originate in our solar system-but they may use Mars or some other body for a way station. It is also our conclusion that, they are propelled by distorting or eonverting the gravitational field. त्यांनी असेही म्हटले आहे की that there was a world–wide effort to learn how gravity could be put to use as a form of energy—सध्या पारीस्थिती अशी आहे की थोडीशी शक्ती (Energy) उपयोगात आणण्यासाठी खूपच इंधन जाळावे लागते, त्यामुळे फार दूरचे प्रवांस शक्य होत नाहीत. वैज्ञानिकांचे असे म्हणणे आहे की,

If gravity can be converted into Electrical energy it will be possible to travel anywhere in space at fantastic speeds. This Probably seems what U. F. Os have been doing.

Prof Oberth म्हणतात की, —Just what has been accomplished I do not know but it is true we are spending vast sums of money on Gravitational resarah वैज्ञानिकांचे असे म्हणणे आहे की, ज्या तत्त्वाने आपण पृथ्वीशी अथवा पृथ्वी व इतर कोट्यावधी मैलांवरील ग्रह सूर्याशी निगडित आहेत, त्याच तत्त्वाने आपण विश्वाच्या अनंत पोकळीत निर्वेध प्रवास करू शकू. त्यांच म्हणणे असे आहे की, ही पृथ्वीवर येणारी याने निश्चित हीच शक्ती उपयोगात आणीत असली पाहिजेत.

Cravitational Energy किंवा आकर्षण शक्ती किती प्रचंड आहे पाहा. पृथ्वीसारखा सहा हजार प्रार्ध टन वजनाचा गोल नऊ कोटी मैलांवरून, सूर्य या शक्तीने लीलेने आपणाभोवती फिरवीत आहे. एवढेच काय, परंतु गुरुशक्तीसारखे प्रचंड गोल ४८ व ७८ कोटी मैलांवरून व नेपचूनसारखे ३६० कोटी मैलांवरूनसुद्धा आपल्याभोवती फिरवीत आहे.

Cosmie Energy प्रमाणे निव्वळ सूर्यमालेतच काय परंतु सर्व विश्वात दशदिशा भरून तिचा वास आहे व एखाद्या समुद्रातून पाणी घेऊन त्यावर एखादे यंत्र

CS CamScanner

चालवावे, त्याप्रमाणे ही शक्ती सर्वत्र सारखीच वास करीत असल्याने फक्त तिचा उपयोग कसा करून घ्यायचा याचे ज्ञान झाले की, साहाजिकच कोणासही, कोठेही, कोणतेही इतर इंधन न घेता जाता येईल. त्यास त्या शक्तीची कधीही कोठेही वाण पडणार नाही, कारण ती सर्व ठिकाणी ओतप्रोत भरलेली आहे. तसे करणे जमले तर इंधनाचे कितीही प्रचंड साठे बरोबर घेतले तरी किती अंतर जाणार व साठे तरी किती मोठे घेऊ शकणार ? कारण विश्वातील अंतरे कोटींनी मोजूनही भागत नाही. अजून आपणास सूर्यकिरणातील अथवा समुद्रातील लाटांची वाया जाणारी शक्तीसुद्धा उपयोगात आणता येत नाही. मग हे तत्त्व आत्मसात करणे बरेच दूर आहे. १९५७ च्या सुमारास आपल्या वैज्ञानिकांस पूर्ण कल्पना येऊन धक्का बसला की, कोणीतरी परग्रह अथवा ताऱ्यावरील बुद्धिमान जीव पृथ्वीची पद्धतशीर पाहणी करीत आहेत. त्यांचा उद्देश काय असावा ? काहीही असला तरी त्यावर आपला काहीही ताबा असू शकणार नाही. १९५६ मध्ये अमेरिकन ॲस्ट्रानामिकल सोसायटीने जाहीर केले की, त्यांना शुक्रावरून काही रेडिओ संदेश मिळाले व म्हणून मरीनर तिकडे पाठवला गेला असावा.

गेल्या पन्नास वर्षांपासून चंद्रावर निरनिराळ्या प्रकारचे प्रकाश दिसतात, त्यावरून असे वाटले की, चंद्राचे अदृश्य भागावर कोणीतरी आपला तळ केला असावा. आपल्या अवकाशयानासही परग्रहावर प्रवास करणे असेल तर चंद्रच तळ-स्टेशन Base (Station) म्हणून करावा लागेल.

मेजर पेट्रिक पावर्स यांचे म्हणणे आहे की—There may be life on other cosmic bodies that would resent out intrusion on the moon and try to force us of. to be perpared for this our space ships will bave to be armed.

ता. ९ ऑक्टोबर १९५५ रोजी तिसऱ्या महायुद्धासंबंधी बोलताना Gen. Mac Arther म्हणाले की, The nations of the world will have to unitefor the next world war will be interplanatory war. The nations of the earth must come together and make a common front against attacks by people from Planets.

त्याचप्रमाणे १९६२मध्ये ते म्हणाले की, प्रश्न फार गंभीर आहे व We deal now not with things of this world alone but with the illimitable distances and as yet unfathomed mysteries of the Univrse. We speak in terms of harnessings Cosmic Energy.

वरील सर्व घटनांचा साकल्येकरून विचार करता अमेरिका व रशियन वैज्ञानिकांची मनोमन खात्री पटली आहे की, पूर्वीच्या त्या यानांच्या भेटी व १९४७ नंतरच्या भेटी यांत पुष्कळच फरक आहे. पूर्वी कदाचित निव्वळ जिज्ञासेने अथवा

त्यांना असलेले वैज्ञानिक ज्ञान पृथ्वीवरील लोकांत प्रसार करण्यासाठी ते आले असू शकतील. परंतु १९४७ नंतर त्यांनी ज्या तऱ्हेने व ज्या ज्या विशिष्ट ठिकाणी समुदायाने भेटी दिलेल्या आहेत व देत आहेत, त्यांवरून त्यांचा असा पक्का ग्रह झाला आहे की, त्यांच्याकडील भेटीचा उद्देश काही सोज्वळ नसावा. तीन-तीनशे याने एकदम येतात किंवा जगभर सर्व प्रकारची केंद्रे पाहणी करीत हिंडत असतात, यात त्यांचा काहीतरी उद्देश असला पाहिजे. आपण पाहिलेच आहे की, मंगळावर अलीकडेच काही शतकांपासून पाणी व हवा कमी कमी होत चालली आहेत व लवकरच तेथे अशी परिस्थिती उत्पन्न होणे शक्य आहे की, जीवसृष्टीस राहणे अशक्य होऊन एक तर त्यांना स्थलांतर करणे भाग पडेल अथवा तेथेच राहिले तर विनाशास तोंड देणे भाग पडेल कारण निसर्गापुढे कोणाचे काही चालत नाही व आपण पाहिलेच आहे की, त्यांनी केलेले कालवे व त्यांचे अजस्र कृत्रिम उपग्रह यावरून त्यांची वैज्ञानिक प्रगती आपणापेक्षा कितीतरी अधिक आहे की, जेथपर्यंत पोचण्यास आपणास एक लक्ष वर्षेदेखील अपुरीच पडतील. अशा परिस्थितीत त्यांनी म्हणा की इतर कोणी, इतर ग्रहांवरील मानवसदृश बुद्धिसंपन्न जीवांनी पृथ्वीवर वसाहत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला तर संघर्ष हा क्रमप्राप्तच ठरतो. त्यांच्या वैज्ञानिक प्रगतीच्या तुलनेने आपली प्रगती अत्यंत अल्प आहे. आपले अवकाशयुग सुरू होऊन केवळ तेरा वर्षेसुद्धा झाली असण्याचा संभव आहे त्यांच्याशी सामना करण्याचा प्रसंग आला व तो आज म्हणा अथवा एखाद्या शतकात म्हणा, येणार हे त्यांना निश्चित वाटते. असे झाले तर ते एक महान जागतिक संकट ठरेल व अशी वेळ आलीच तर काय करणे युक्त होईल, या विवंचनेत आज पुढारलेली राष्ट्रे पडलेली असून, खरी परिस्थिती नीट आकलन व्हावी म्हणून चंद्र-मंगळावरील माहिती काढण्यासाठी पाठविलेली रॉकेटस व प्रत्यक्ष चंद्रावर जाऊन पाहणी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. प्रत्यक्ष युद्ध चालू असताना ज्या पद्धतीने जनतेस विश्वासात न घेता व तातडीने खर्चाची पर्वा न करता कार्य होते, त्याच पद्धतीने परंतु निराळ्या पद्धतीने ही तयारी चाललेली आहे व जनतेत घबराट पसरू नये म्हणून कायदा करून यासंबंधी कोणतीही बातमी छापण्यास अथवा प्रसार करण्यास बंदी घालण्यात आलेली आहे. त्यांचा अंदाज असा आहे की, त्यांनी आपला तळ चंद्राच्या आपणास न दिसणाऱ्या भागावर ठेवला आहे किंवा तसे नसेल तर मंगळाच्या एखाद्या उपग्रहावर असण्याची शक्यता आहे अगोदर संपूर्णपणे पाहणी करून खरोखरी त्यांचे तळ आहेत की कसे, ते काय स्वरूपाचे आहेत, त्यांची तयारी किती व कोणत्या प्रकारची आहे, याचा संपूर्ण अंदाज घेतल्यानंतर संघर्षाचा प्रसंग आलाच तर त्यास कसे तोंड द्यावयाचे यासंबंधी ते चिंतेत आहेत. हे एक आजवर कधीही अनुभवास न आलेले असे जागतिक संकट ठरू पाहात आहे.

कल्पना करा की, आपल्या ओसरीवर कोणी अनोळखी इसम अनाहूत येऊन

बसला आहे. त्यास आपण साहाजिकच विचारू की, बाबारे, तू कोण आहेस, तुझे काय काम. तू येथून उठून लवकर जा व तो जात नसला तर त्यास बळेच हाकून देण्याचा प्रयत्न आपण करू. त्याचे बळ अधिक ठरले तर तो आपणास हाकून देईल. उत्तर ध्रुवाकडे राहणे काही कारणाने अशक्य झाले व आपले आर्य पूर्वज दक्षिणेकडे सरकू लागले. काही युरोपात गेले व काही सरकत सरकत आर्यावर्तात आले. मूळ रहिवाशांवर आक्रमण झाल्यामुळे त्यांनी साहाजिकच प्रतिकाराचा प्रयत्न केला. परंतु आर्यांचे शस्त्रबल अधिक आधुनिक व प्रभावी ठरल्यामुळे ते विजेते झाले व मूळ रहिवाशांना एकतर नाहीसे व्हावे लागले, दास्य पत्करावे लागले किंवा दाक्षिणेकडे जेथे आर्यांचा उपसर्ग पोचणार नाही अशा ठिकाणी स्थलांतर करावे लागले. त्याच इतिहासाची पुनरावृत्ती पोर्तुगाल, फ्रान्स, इंग्लंड यांनी अमेरिकेत पदार्पण केले त्या वेळी झाली. पाकिस्तान, हिंदुस्थानच्या फाळणीच्या वेळचा इतिहास तर ताजाच आहे. बळी तो कान पिळी हा नियम सर्वत्र सारखाच आहे, मग ते बळ कोणत्याही स्वरूपाचे असो. शारीरिक बळ अपुरेच पडले तर यांत्रिक व शेवटी सरकारच्या पाठिंब्याने, असे जे सर्वात जास्त उपयोगी पडेल ते व प्रभावी ठरेल ते !

वसाहतवाद आला की संघर्ष आलाच. हिमालयाचा उत्तर भाग सदैव बर्फाच्छादित असतो. तेथे कोणी राहू पण शकत नाही व राहणे पण शक्य नाही; परंतु त्याचा काही भाग चीनने नुसत्या नकाशात जरी स्वतःचा म्हणून दाखविला तरी सर्व देश खळबळून जागा होतो; त्यास कारणेही तशीच असतात व जनता जागृत होऊन प्रतिकारास सिद्ध होते; यात त्यांचे काही चुकले असे पण मी म्हणत नाही; परंतु मानवी मनाची प्रवृत्ती काय आहे यासंबंधी मी निर्देश करीत आहे. कॅनडा व ऑस्ट्रेलिया यांचा ९/१० भाग उपेक्षित आहे. तेथे थोड्या आदिवासीखेरीज कोणाचीही वस्ती नाही, पण तेथे इतर कोणी वस्ती करू म्हटले तर तेथील लोक प्राणपणाने लढा देतील. दक्षिण अमेरिका, रशियाचा आशियातील पुष्कळसा भाग, आफ्रिकेचा पुष्कळसा भाग यांची परिस्थिती काही निराळी नाही—पण तेथील एक चौरस मैलाच्या भागावर जर कोणी आक्रमण करण्याचा प्रयत्न केला तर सर्व देश आपसातील मतभेद सोडून प्राणपणाने लढा देण्यास तयार होईल.

आता यापुढे जे संभाव्य संकट आहे ते जागतिक आहे. संपूर्ण जगावर आक्रमण होण्याचा धोका उत्पन्न झालेला आहे. त्याकरता लवकरच अशी वेळ येणे अपेक्षित आहे की, सर्व धर्म, राष्ट्र वगैरे सर्व भावना बाजूस सारून सर्व जगाने एकवटून प्रतिकारास सिद्ध व्हावयास पाहिजे. तसे करूनसुद्धा काय व कितपत शक्य होईल याची शंकाच वाटते. कारण आपण इतके मागासलेले आहोत की, ते कोणते इंधन वापरतात याची आपणास साधी कल्पनासुद्धा नाही. त्यांची याने नुसती जवळ येताच बाजूचे कित्येक मैलांतील वीजप्रवाह, कारखाने, मोटारी यांतील यंत्रसामुग्री वगैरे बंद पडतात व त्यांना नोव्हेंबर १९६५ सारखा मोठा ब्लॅक आऊट करणे शक्य होते.

त्यांच्या यानांवर शस्त्राचा परिणाम होत नाही किंवा त्यातील व्यक्तीस धरण्याचा प्रयत्न केला तर मोठा वीजेचा धक्का बसतो. त्यांची याने येतात कोठून, जातात कोठे याचा रडार–यंत्रासही पत्ता लागला नाही व ती थोड्या अंतरावर गेल्यावर लागलीच दिसेनाशी होतात, जणू काय हवेत विरून जातात. आपण सर्व जग एकत्र येऊन याचा सर्व सामर्थ्यानिशी प्रतिकार करू म्हटले तरी त्याचा या परिस्थितीत काय व किती उपयोग होईल याची शंकाच वाटते. अर्थात असे सामर्थ्य असले तरी हात पाय गाळून स्वस्थ बसण्यापेक्षा काही प्रतिकार केलेला निश्चित बरा व तोसुद्धा सर्व जग एकत्र येऊन, सर्व राष्ट्रांनी आपापली राष्ट्रीय भिन्नत्वाची भावना विसरून, जग हेच एक राष्ट्र आहे अशी भावना उत्पन्न झाली पाहिजे.

कल्पनेलाही अशक्य वाटणारे असे हे भयानक संकट आहे. जगाच्या आजवरच्या इतिहासात कधीही न घडलेली अशी घटना घडू पाहात आहे. विचारवंतास खरोखरी अत्यंत विचारात व विवंचनेत टाकणारी ही संभाव्य घटना आहे. अमेरिकन गहू खाऊन फावल्या वेळी सिंडिकेट–इंडिकेटसंबंधी चर्चा करणाऱ्यांना त्याचे फारसे महत्त्व वाटणार नाही हे खरे ! प्रेसिडेंट केनेडींच्या वेळी त्यासंबंधी प्रथम जाणीव झाली व त्यांनी अवकाशसंशोधनास सुरुवात केली. समजा, त्यांचे काही चुकले असले तर जॉन्सन व त्यानंतर निक्सन यांनी त्याचा पाठपुरावा न करता हा अवाढव्य खर्च–जनतेच्या द्रव्याचा व्यय बंद केला असता. पुष्कळ वेळा त्यांना असे आढळून आले आहे की, यांनी जी अवकाशयाने सोडली आहेत, ती काही कारणावाचून अकार्यक्षम होतात व काही काळाने पुन्हा पूर्वीप्रमाणे कार्य करू लागतात. त्याचप्रमाणे चांद्रयान नं. २ ला जो अपघात झाला त्यास परग्रहांवरील शक्तींची काही कारवाई कारण नसेलच असे म्हणता येत नाही; कारण अशा यानातील प्रत्येक खिळा, बोल्ट शेकडो वेळा तपासून पूर्ण कार्यक्षम आहेत अशी खात्री झाल्यावरच ती सोडण्यात येतात. असे असताना अकल्पित असा एखादा अपघात व्हावा ही घटना निःसंशय चिंतनीय आहे.

या U. F. G. च्या भेटी व त्रास दिवसें–दिवस वाढत आहे हे पाहून शास्त्रज्ञांना ते एक महान जागतिक संभाव्य संकट आहे याची जाणीव झालेली असून त्याचे निश्चित स्वरूप काय यांचा ते काळजीपूर्वक शोध घेत आहेत हे निश्चित. त्याकरता ते आपला वेळ, ज्ञान, साधने व पैसा ही सर्व तातडीने कामी लावून कमीत कमी वेळात काय निष्कर्ष निघतो ते पाहात आहेत. एकदा ते निश्चित स्वरूपात कळले म्हणजे त्यावर कोणती व कशी प्रतिकारात्मक योजना आखावयाची ते त्यांना ठरविता येईल.

चित्र भयानक आहे हे खरे व तशी परिस्थिती खरोखर असली तर ते विज्ञानात आपल्या इतके पुढे गेलेले आहेत की त्यांना आपल्या जवळ असलेल्या सर्व सामुग्री व साधने यासह अगदी सर्वंकष प्रतिकार करावयाचा म्हटले तरी त्याचा कितपत उपयोग होईल हे सांगता येत नाही. उलट आपण प्रतिकार करतो आहोत

हे त्यांच्या निदर्शनास आले तर सर्व मानवजातच नष्ट होण्याचा प्रसंग येणे काही अशक्य नाही.

चित्राची ही एक बाजू झाली. दुसऱ्या दृष्टीने थोडा विचार केला तर परिस्थिती कितीही भयानक वाटली तरी ती तितकी अनुभवास येणार नाही असें वाटते. कारण एक तर पृथ्वी आदि गोलांचे इतिहास काही कोटी वर्षांचे प्रमाण धरून घडत असतात व जी संभाव्य घटना आज आपणास तातडीची म्हणून भेडसावीत आहे ती कदाचित काही शतके घडणार पण नाही, परंतु हल्ली त्या यानांच्या तातडीच्या व मोठ्या प्रमाणावर चाललेल्या हालचाली पहिल्या म्हणजे त्या घटना फार लांबच्या भविष्यकाळाकरता आखल्या जात नसाव्यात असे वाटतें. शिवाय एक गोष्ट महत्त्वाची आहे की, घटना घडणारच आहे व तीस प्रतिकार करण्याचे साधन आपणाजवळ नाही, मग निदान ती सुसह्य कशी करता येईल, या दृष्टीने विचार करता येईल. एखादा मनुष्य निश्चित मरणार आहे व त्यास कोणत्याही उपायाने वाचविता येणे शक्य नाही असे ठरले, तर निदान त्यास उरलेला काळ सुखाने कसा घालविता येईल हे पाहावे लागते. काही अंशी याचप्रमाणे—तरी पण त्याकरता सर्व जग मानवतेच्या भावनेने सर्व वंश, राष्ट्र वगैरे भेद दूर करून एकत्र येऊन काही तरी सुसंघटित अशी योजना आखणे जरूर आहे याबद्दल वाद नाही.

इंग्लंडसारख्या शस्त्रास्त्रांनी सज्ज अशा बलवान राष्ट्रासुद्धा निःशस्त्र भारताने जेरीस आणून देश सोडून जाणे भाग पाडलेच की नाही ! काही प्रमाणात तसेच !

दुसरी बाजू म्हणजे एक तर सूर्यापलीकडून धोका असा फार कमी कारण पहिला तारा आपणापासून २५ महापद्म २५×१०^{१२} मैल लांब आहे व इतर कमीत कमी काही प्रार्ध मैल अंतरावर. तिकडून इकडे कोणत्याही यानातून येणे म्हणजे त्यासमुद्धा लक्षावधी वर्षांचा काळ लागेल व त्यांच्या दृष्टिपथात पृथ्वीसारखा अणूएवढा गोल कधीतरी येईल किंवा कसे याची शंकाच वाटते व कदाचित आला तरी पृथ्वीवरील हवापाणी, बुद्धिमान जीव वगैरेसंबंधी पुसट देखील कल्पना त्यांना येणे शक्य नाही. त्यामुळे राहता राहिले शुक्र व मंगळ. यांपैकी शुक्रावरील काहीच आपणास अद्याप कळू शकत नाही व सूर्याच्या प्रचंड उष्णतेने त्यावर जीवसृष्टी नसावी असेच अनुमान आहे.

राहता राहिला मंगळ—तेथील विज्ञान आपल्यापेक्षा शेकडो पटीने पुढे गेलेले असून तीवरील जीवसृष्टीस दिवसेंदिवस कसे जगावे हा प्रश्न पडत आहे, ही गोष्ट खरी आहे. यामुळे आपली वस्ती बदलून अन्य ग्रहावर स्थलांतर करण्याची कल्पना येणे काही अशक्य नाही. असे असले तरी सारेच मंगळवासी एकदम पृथ्वीवर येऊन थडकतील असे नाही. त्यातल्या त्यात जे विज्ञानात अत्यंत प्रगत आहेत व ज्यांना साधनसामुग्री अनुकूल आहे, असे थोडेच लोक प्रथम प्रयोग म्हणून प्रयत्न करून पाहतील. कोणासही कोणत्याही परिस्थितीत घर सोडून इतर ठिकाणचा धोका

CamScanner

पत्करावासा वाटत नसतो. इंग्लंडने ऑस्ट्रेलियात आपली वसाहत करून तेथे जाणारास वाटेल त्या सवलती जाहीर केल्या, परंतु सिंधएवढया इंग्लंडमध्ये साडेपाच कोटी लोक दाटीदाटीने राहात असून ऑस्ट्रेलियात काही लाख सुद्धा जाऊ शकले नाहीत किंवा गेले नाहीत हीच हकीकत सर्व ठिकाणची.

मंगळावरील जनता म्हटली, तरी काही तेथे सुद्धा सर्वेच शास्त्रज्ञ नाहीत व त्यांना तरी पृथ्वीवरील जीवनाची काय कल्पना? काही झाले तरी आपली पृथ्वी त्यांच्यापेक्षा ५ कोटी मैलांनी सूर्यापासून जवळ आहे; त्यामुळे त्यांच्या जीवनमानास येथील हवापाणी कितपत मानवेल हाही प्रश्नच आहे व मानवते असे ठरले तरी पूर्णपणे पचनी पडावयास पुष्कळ अवधी लागेल. त्यामुळे खरोखरी वसाहत करावयाच्या उद्देशाने जरी यावयाचे म्हटले तरी त्यातील अगदी थोडेच लोक येथे येऊ शकतील त्यांची शस्त्रास्त्रे व विज्ञानातील प्रगती आपणापेक्षा अनेक पटींनी सुधारलेली असल्याने त्यांना सशस्त्र प्रतिकार करावयाचा म्हटले तर ते कदाचित सर्व मानवजात सुद्धा नाहीशी करू शकतील. परंतु त्याच्या अंत जर सर्व मानवजातीने वंश, राष्ट्र वगैरे भेद विसरून एकत्र येऊन त्यांच्याशी संपूर्ण दग्धभूमीसारखा असहकार पुकारला तर त्यांना येथे राहणे अशक्य होईल व ते परत जातील. अर्थात हे माझे मत आहे. ते सर्वांना मान्य होईलच असे नाही; तरी पण वेळ अशी आली आहे की, सर्वांनी आपापले धार्मिक, राष्ट्रीय, सांस्कृतिक असे सर्व मतभेद विसरून संपूर्ण मानवजातीचे एक राष्ट्र बनवून, सर्वांनी मिळून मतभेदविरहित अशी योजना आखून ठेवून त्याप्रमाणे वागले तर हे जागतिक संकट जरी अल्पकाळात पृथ्वीवर आदळले तरी फार काळ टिकाव धरू शकणार नाही. परंतु मतभेद कायम ठेवून त्यांना सहकार्य करून आपापला फायदा करून घेण्याचा कोणी प्रयत्न केला तर मानववंश नाहीसा होण्यास फार अवधी लागणार नाही हे खरे! मात्र तो अवधी एक वर्षांचा असेल अथवा एखाद्या शतकाचा असेल, परंतु पृथ्वीसारख्या गोलाच्या व मानववंशाच्या इतिहासात एक शतकाचा कालखंड सुद्धा काहीच नाही, याची जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे.

यानिमिमित्ताने जरी सर्व मानवजात एकत्र आली तरी हे जागतिक संकट एक वरदानच ठरेल.

* * *

२०. सत्यसृष्टीतील अनाकलनीय हकीकती

या प्रकरणात दिलेली प्रत्येक हकीकत सत्यसृष्टीत प्रत्यक्ष घडलेली आहे. परंतु ती हकीकत कशी घडली, त्यासंबंधी कारणमीमांसा शास्त्रज्ञांनी पुष्कळ प्रयत्न करूनही कधीच आकलन झालेली नाही. वाचकांनी ती शोधून काढण्याचा प्रयत्न करावा. यापूर्वीच्या कोणत्याही प्रकरणात योग्य संदर्भाच्या अभावी याचा उल्लेख करता आला नाही. परंतु अशा सत्यसृष्टीत घडलेल्या हकीकतींची वाचकांस माहिती असावी, या दृष्टीने त्यांचा स्वतंत्रपणे या प्रकरणात समावेश केला आहे. तरी वाचकांनी मननपूर्वक वाचून त्यासंबंधी कारणमीमांसा शोधून काढण्याचा प्रयत्न करावा.

१. निखाऱ्यावरून चालणे

Believe or not या पुस्तकमालेचे अध्वर्यू रॉबर्ट रिप्ले हे त्यांच्या पुस्तकाकरता सामुग्री गोळा करीत हिंदुस्थानातून फिरत होते. त्यावेळी त्यांना खुदाबक्ष नावाचा एक फकीर भेटला. तो एक खड्डा खणून त्यात विस्तवाचे निखारे टाकून त्यावरून चालत जात असे व त्यास काहीही इजा होत नसे. त्याने प्रभावित होऊन रिप्ले यांनी त्यास अमेरिकेत नेले व तेथे त्याचे विस्तवावरून चालत जाण्याचे प्रयोग केले. त्याच्या या प्रयोगाने प्रभावित झालेल्या अमेरिकन नागरिकांसमोर त्याने आणखी एक प्रयोग करून दाखविला. एक्स्पर्ट डॉक्टर व इतर समुदायासमोर डॉक्टर्सनी खुदाबक्षाच्या डोळ्यांवर पट्ट्या बांधून व त्याच्या सर्व तोंडावरून आवरण घालून कोणत्याही परिस्थितीही त्यास डोळ्यांनी दिसू शकणार नाही असे केसे इतके करून त्यास दिसू शकत होते. त्याने फळ्यावरील अक्षरे लिहून दाखविली, समोर आणलेले जिन्नस ओळखले व सायकलवरून चिक्कार गर्दी असलेल्या रस्त्यावरून काही एक अडथळा न होता फेरफटका मारून दाखविला. प्रस्तुत लेखकाने एक अगदी साधारण रेल्वे पोर्टर अग्नीवर चालत जाण्याचा प्रयोग करीत असलेला पाहिला. तो दर आश्विन शुद्ध ८ ला रात्री आठच्या सुमारास एक सुमारे पंधरा फूट लांब, तीन फूट रुंद व २-२॥ फूट खोल असा खड्डा खणवून त्यात टन दोन लाकडे टाकून पेटवून देत असे, व चांगला निखारा तयार झाला म्हणजे काही मंत्र वगैरे म्हणून त्या अग्नीत थोडासा दहीभात वगैरे टाकून त्या खड्ड्याभोवती तीन प्रदक्षिणा घालीत असे. नंतर अगदी सावकाश एकेक पाऊल टाकीत त्यातून चालत जात असे व प्रत्येक पावलागणिक ते निखारे बाजूस होऊन पसरत. अशा तो दोन तीन फेऱ्या मारीत असे. परंतु इतरांपेक्षा त्याचे एक वैशिष्ट्य होते की, तो बाहेर आल्यानंतर इतर कोणीही चालत गेला तरी त्यास इजा होत नसे व त्या रात्री ९ ते २ पर्यंत निदान ४०–५० माणसे तरी त्यावरून चालत जात असत. आग इतकी असे की त्या खड्ड्याच्या काठावर काही

CamScanner

सेकंदांपेक्षा जास्त थांबता येत नसे हे विशेष. त्याचे नाव पांडू पोर्टर असे असून, त्यास पांडूबुवा म्हणत व तो चाळीसगाव येथे स्टेशनच्या मागे हे प्रयोग करीत असे. सुमारे वीस–पंचवीस वर्षांपूर्वी त्याच्या मृत्यूनंतर हे प्रयोग बंद पडले. तेथील वृद्ध लोक अजूनही त्याची आठवण काढतात.

२. रडणारे थडगे

फ्रान्सच्या दक्षिण भागात पिरनिज पर्वतात एके ठिकाणी अत्यंत पुरातन थडगे आहे. ते थडगे एका रोमनकालीन सत्पुरुषाचे आहे, असे मानण्यात येते. ते थडगे एका संगमरवरी दगडात कोरलेले असून, त्याच्या आत त्या सत्पुरुषाची हाडे जतन करून ठेवलेली आहेत. ते सहा फूट लांब, वीस इंच रुंद व दोन फूट उंच आहे. ते तेथून काढून एका चर्चमध्ये जमिनीपासून सुटे असे दोन लहान दगडी खांबावर ठेवलेले आहे. त्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे आज शतकानुशतके त्यातून सारखे पाणी पाझरत आहे. ते जमिनीपासून सुटे असल्याने पुष्कळ वेळा तें सर्व फडक्याने पुसून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु ते सर्व पुसून होण्याच्या आतच त्या पुसलेल्या भागातून पाणी पाझरण्यास सुरुवात होते. साधारणपणे रोज एक लिटर पाणी त्यातून बाहेर पडत असते. या पाण्याचा उपयोग रुग्णांचे रोग बरे करण्याकडे करतात काही वेळेस तर त्यातून इतके पाणी बाहेर पडते की, त्या थडग्याचे मोजमाप जितक्या क्युबिक फूट असेल त्यापेक्षा आधिक भरते. ते पाणी कसे तयार होते व कोठून येते याचा अद्याप इतकी शतके होऊन सुद्धा उलगडा होऊ शकला नाही.

फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी १७९४ साली झालेल्या बंडात त्या चर्चची नासधूस करून ते थडगे उलटेपालटे करून ठेवण्यात आले होते. पुढे १७९५ साली त्याची डागडुजी करण्यात येऊन ते थडगे पुन्हा व्यवस्थित ठेवण्यात आले. त्याप्रमाणे साफसूफ करण्याचे काम पूर्ण होत आहे–नाही तोच पुन्हा आतून पाणी तयार होऊन त्याचा प्रवाह बाहेर येण्यास सुरुवात झाली. त्या पाण्याचा उपयोग असाध्य रोग दुरुस्त करण्यात होत असे.

आपल्याकडे नर्मदेत असे गोटे सापडतात की त्यातून सतत पाणी स्रवत असते. मी असा एक गोटा श्री. पाटसकर (माजी राज्यपाल, भोपाळ) यांच्याकडे सन १९३८-३९ साली एक संन्यासी वस्तीस आला होता त्याच्याजवळ पाहिला होता. रात्री साफसूफ, पूजा वगैरे करून तो बाण एका डब्यात ठेवीत असे. सकाळपर्यंत तो डबा भरून पाणी ओसंडून बाहेर आलेले सापडत असे. श्री ओंकारेश्वराची पिंडी अशाच दगडाची आहे. असे म्हणतात, ती नेहमी पाण्यात असते. सर्व पाणी काढून साफ केली तर थोड्या वेळांत पुन्हा पाण्यात असलेली आढळते. मात्र ती एका डोंगरात असल्याने कदाचित खालून एखादा प्रवाह आल्याची शक्यता नाकबूल करून चालणार नाही. तसेच गयेला विष्णुपदावर जे देऊळ बांधले आहे त्याच्या बाहेरच्या ओवरीत घंटेजवळ दर मिनिटाला

वरून एक एक थेंब पाणी सतत टपकत असते व त्याचा खालील दगडावर एक खडा तयार झालेला आहे. वर चुनेगच्ची बांधकाम आहे. त्यात असा एखादा दगड बसविला गेला असावा असे अनुमान आहे. मात्र त्या पाण्याचा काही औषधी उपयोग आहे की कसे हे कोणी अद्याप अजमावून पाहिलेले नाही. चंद्रकांत मण्यातून चांदण्यात पाणी स्रवते ही गोष्ट पुष्कळांना माहीत असेलच.

३. होली वेल

फ्रान्समधील लुर्ड्सप्रमाणे इंग्लंडमधील वेल्स या परगण्यात एका टेकडीवर होली वेल नावाचे एक लहानसे गाव आहे. तेथे सेंट विनिफ्रिद यांचे थडगे असून त्याच्या आवारात एक विहीर आहे. त्याच्या जवळच पाण्याचा एक लहानसा प्रवाह पण आहे. त्या विहिरीतील पाण्याच्या गुणावरून त्या गावास हे नाव पडले आहे. त्या पाण्यात किंवा त्याजवळील प्रवाहात दरमहा ४-५ हजार यात्रेकरू व रुग्ण स्नान करून जातात. पाण्याचे साधारण तपमान ५२° फॅ. असते, अशा थंड पाण्यात स्नान करून पुष्कळ, अगदी शेवटच्या अवस्थेतील रुग्णसुद्धा अगदी बरे झाल्याचे व होत असल्याचे रेकॉर्ड आहे. मात्र काही लोकांना दोन, तीन किंवा पांचसहा वेळासुद्धा त्यात स्नान करावे लागते. कित्येकांस पहिल्याच बुडीत गुण येऊन ते आपल्या पायाने घरी चालत गेल्याची उदाहरणे आहेत.

४. नाहीसा होणारा बंगला

१९३३ साली एका सुटीनिमित्त श्री. आणि श्रीमती क्लिफर्ड हे स्टेट बसने कॉर्नवालमधील बॉस कॅसल नावाच्या एका खेडेगावी गेले होते. बॉस कॅसल मैल दीड मैल राहिले तसे, एखादे राहण्यालायक चांगले हॉटेल दिसते का म्हणून दोघेही बाहेर पाहू लागली. बॉस कॅसल जवळ तसे २००–२५० यार्डांवर एका पॅसेंजरला उतरविण्याकरितां बस थोडा वेळ थांबली. त्या ठिकाणाजवळून जवळच सुमारे २० यार्डांवर डाव्या बाजूस त्यांना एक बंगला दिसला. तो बंगला जुन्या पद्धतीचा असून त्याच्यापुढे बगीचा होता. त्यास नुकताच रंग दिला आहे असे दिसत होते. समोरील पटांगणात पुष्कळशा वेताच्या खुर्च्या व टेबले मांडलेली दिसत होती व त्याच्यावर छत्र्या पण दिसत होत्या. परंतु त्या सर्व रिकाम्या दिसत होत्या. तरी पण ते एकंदरीत गेस्ट हाऊस असावे असे दिसत होते. तंतर त्यांची बस बॉस कॅसल येथे पोचली व ते जोडपे तेथे उतरले. त्या गावात त्यांना विशेष असे हॉटेल आढळून आले नाही व उतरण्यासारखी जागाही पण दिसेना. म्हणून त्यांच्या पत्नीने सांगितले की, या गावात राहण्यापेक्षा येथून थोड्याच अंतरावर आपण जो बंगला पाहिला आहे तेथे जाऊन राहू या. त्यांना सुद्धा ही कल्पना रुचली व श्रीमती पै म्हणाल्या की, मी तपास करून येते. तोपर्यंत तुम्ही येथे थांबा. ते ठिकाण तेथून थोडे उंचवट्यावर पण २००–२५० यार्डांपेक्षा जास्त अंतरावर नव्हते. त्यांना परत येण्यास उशीरा

लागू लागला, तसतशी श्री. पै यांना काळजी वाटू लागली. परंतु तास सव्या तासाने त्या परत आल्या व त्यांनी सांगितले की, त्या चांगल्या मैल सव्वा मैलपर्यंत जाऊन तपास करून आल्या परंतु त्यांना कोठेही नुकताच पाहिलेला बंगला आढळला नाही. त्यांनी नंतर दुसरीकडे मुक्काम केला व आश्चर्य व कुतूहल म्हणून त्या बंगल्याचा तपास केला. परंतु सर्वांनी सांगितले की, आम्ही येथे कित्येक वर्षे राहात आहोत, परंतु तुम्ही म्हणता असा बंगला किंवा साधे घरटे सुद्धा आम्ही कधी पाहिले नाही. तेथे फक्त आज कित्येक वर्षांपासून शेतजमीन आहे, त्यांना शेवटपर्यंत हे कोडे कधीच उलगडले नाही.

५ बोटाने पाहणारी स्त्री

अमेरिकेतील श्रीमती पॅट्रिका स्टेनले यांना एक विचित्र नैसर्गिक देणगी आहे, त्यांना केवळ आपल्या बोटाच्या साहाय्याने चांगले दिसू शकते. १९३९ मध्ये त्यांना प्रथमच असे आढळून आले की, केवळ बोटाची टोके फिरवून त्या वस्तूचे रंग ओळखू शकतात; प्रथम त्यांच्या देणगीचे फारसे कोणास कौतुक वाटले नाही. परंतु रशियात व इतर ठिकाणी अशा स्त्री पुरुषांची शास्त्रीय दृष्टीने तपासणी केली. त्या वेळी त्या शास्त्रज्ञांना यांचेही नाव सुचविण्यात आले. त्यावरून योट्स यांनी खालील प्रयोग केला. प्रथम त्यांनी श्रीमती स्टेनले यांचे डोळे घट्ट बांधून त्यावरून असे काळे पट्टे बसविले की, त्यांना कसलाही उजेड कितीही प्रयत्नाने दिसू नये. नंतर त्यांनी पुठ्याचे काळ्या रंगाने सर्व बाजूने रंगविलेले असे एक खोके घेतले व त्यास बाजूने झाकण ठेवून तळाशी वरून दिसणार नाही अशा रीतीने काही वस्तू घालता येतील, अशी व्यवस्था केली व त्यात दोन कार्डांवर निळ्या रंगाचे प्रत्येकी एक चौकोन व एकावर लाल रंगाचा चौकोन असलेले मध्ये ठेवण्यात आले. बाजूने हात घालून त्यातील कोणतेही दोन कार्ड उचलून त्याचा रंग ओळखण्यास सांगितले. त्यांनी ते कित्येक वेळा अगदी अचूक बरोबर सांगितले. टेलिपथीचा संबंध येऊ नये म्हणून नंतर योट्स यांचे पण डोळे बांधून तेथे अनेक रंगांची कार्डे ठेवण्यात आली व त्यातून डॉ. योटस यांनी कोणती तरी दोन व तीन कार्डे त्यात टाकावयाची व त्याचे रंग स्टेनले यांनी बरोबर ओळखावयाचे असे अनेक वेळा करण्यात आले. आणखी काही उदाहरणात असे आढळून आले की, काही व्यक्ती नाकाने चव सांगणाऱ्या व जिभेने गंध सांगणाऱ्या अशी पुष्कळ उदाहरणे आहेत. यावरून असे दिसते की प्रत्येक इंद्रियांना जी कामे वाटून दिलेली आहेत, ती त्यांची मोनापली नाही. जन्मांधांची इतर इंद्रिये फार तीव्र असतात. त्याचप्रमाणे सापास श्रवणेंद्रिय असते. परंतु त्याच्या अंगाची त्वचा ते काम भागविते.

६. अदृश्य होणारी माणसे

(१) ता. २३-३-१९५७ रोजी आठ वर्षांचा टॉमी बोमन हा त्याचे

CamScanner

वडील, बहिणी, चुलते यांच्याबरोबर थोडे पुढे चालत होता. थोड्या अंतरावर एका वळणावर तो एकाएकी दिसेनासा झाला. त्याच ठिकाणी यापूर्वी दोन मुले नाहीशी झालेली होती. अंतर फार नसल्याने त्यांना आश्चर्य वाटले व जवळच कोठेतरी असेल म्हणून पाहणी केली. जवळपास एखादी विहीर, कपार किंवा असे काहीही नव्हते. सपाट मैदानात तो कोठे गेला असावा असा त्यांना प्रश्न पडला. चारशे माणसे व काही हेलिकाप्टर्सशोधात गुंतले. परंतु त्याचा कधीही शोध लागू शकला नाही. अगर त्याचे प्रेतही हाती आले नाही. अजूनही ते एक न सुटलेले कोडे म्हणून दप्तरी नोंद आहे.

(२) ता. १३ जुलै १९६० रोजी ब्रूस हा Y. M. C. A. च्या मुलांबरोबर पहिल्याच ट्रिपला गेला होता. पहिल्याच दिवशी त्याच्या कॅप्टनने त्याला सांगितले की, तूर्त आपल्या कँपात परत जा. उद्यापासून आम्ही तुला आमच्याबरोबर नेऊ. असे म्हणून तो त्यास त्याच्या कँपाकडे घेऊन गेला. कँप काही थोडे यार्ड अंतरावर असता त्यास सांगितले की, समोर कँप दिसत आहे, तेथे तू आता जाऊ शकतोस. परंतु ते थोड्या यार्डांचे अंतर तो कधीच तोडू शकला नाही. त्या अंतरावर तो कसा नाहीसा झाला ते कळलेच नाही. तीनशे माणसांनी सतत बारा दिवस त्याच्या तपासात त्या जागेचा इंचन इंच तपासून काढला. परंतु तो अगर त्याचे प्रेत अगर कपडे कसलाही शोध लागला नाही.

(३) ता. २३ सप्टेंबर १८८० ला डेव्हिड लँग म्हणून एक गृहस्थ टेनेसीमधील आपल्या घोड्यांची पाहणी करण्याकरता निघाले होते. निघून दहावीस पावले गेले असतील नसतील तोच त्यांची पत्नी मुले ही सर्व पाहात असता ते एकाएकी दिसेनासे झाले. सर्व गाव व इतर मंडळींनी कित्येक तास तपास केला, परंतु कधीच तपास लागू शकला नाही. मात्र काही दिवस त्यांच्या आवाजात मला मदत करा अशी हाक कधीमधी ऐकू येत असे. याबाबतीत काही शास्त्रज्ञांचे म्हणणे असे आहे की, आपण Three Dimension च्या जगात वावरत असतो. परंतु चौथी व पाचवीसुद्धा बाजू अस्तित्वात आहे व या सर्वांत काही फटी आहेत. त्या फटीत काही आकस्मित कारणाने एखादी व्यक्ती पडली की ती आपल्या Three Dimension जगतातून कायम नाहीशी होते.

७. विलक्षण वर्षाव

२६ मे १९०७ रोजी फ्रान्समधील रिमेरिमांट या गावातील लोकांना एक विलक्षण दृश्य पाहावयास मिळाले आकाश अगदी स्वच्छ होते सूर्य पण तळपत होता. एकाएकी त्या निरभ्र आकाशातून विलक्षण वर्षाव होऊ लागला. बेस बॉलच्या आकाराच्या व ६ ते ८ औंस वजनाच्या अशा गारा पडू लागल्या. त्या हवेत हळूहळू तरंगत येऊन जमिनीवर हळूच पडत असलेल्या दिसू लागल्या. विशेष म्हणजे त्या प्रत्येक पदा-

र्थांच्या आतील बाजूस एका स्त्रीचे चित्र दिसत होते. असे शेकडो दगड गोळा करण्यात आले. त्या प्रत्येकावर त्याच स्त्रीचे चित्र होते, ती चित्रे कोणी काढली ? ते सर्व दगड आकाशात कसे गेले ? व काही किलोमीटरच्या क्षेत्रात ते कसे पडले? यासंबंधीचे गूढ कधीच उलगडले नाही.

८. आकाशातून अन्नाची वृष्टी

जुलै १९२९ मध्ये सिनाई वाळवंटात मधासारख्या पदार्थांची वृष्टी झाली. काही शास्त्रज्ञ तपास करावयास गेले असता त्यांना वाळवंटात कैक मैलांचा टापू मधासारख्या पदार्थाने झाकून गेलेला आढळला.

सन १८२९ मध्ये एका उन्हाळ्यात तिसऱ्या प्रहरी इराणातील एका खेड्यात धान्यासारख्या एका पदार्थाचा वर्षाव झाला. गुरे ते खाऊ लागलेली पाहून लोकांनी त्याचे दळून पीठ केले व त्याचा धान्य म्हणून उपयोग केला. असाच एक वर्षाव १८९० साली बगदादमध्ये झाला होता. सन १९१३ साली इराणमध्ये करमणशा नावाच्या गावावर निरभ्र आकाशातून धान्याची वृष्टी झाली. ती इतकी की, रस्त्यावर त्याचा गुडघ्याइतका झालेला ढीग दूर करून रस्ते साफ करावे लागले. त्याचे पीठ करून लोकांनीं खाल्ले.

३ मार्च १८७६ रोजी बाय कौंटीमधील एका शेतात आकाशातून बीफसारख्या मांसाचे स्लाइससारखे इतके तुकडे पडले की, त्यांनी दोन्ही बाजूची डोंगराची उतरण झाकून गेली होती. काही लोकांनी खाऊन पाहाता ते अतिशय रुचकर असल्याचा निर्वाळा दिला त्याचप्रमाणे १९६८ मध्ये स्टॅनले मॉरिस यांनी एक आवाज ऐकला. घरी जाऊन पाहातात तो त्यांचे घर, गॅरेज व शेजारची काही घरे ही सर्व कुकीच्या पोत्यांनी झाकलेली आढळली. त्या पोत्यांवर लेबले नव्हती व ती कोठून कशी येऊन पडली, याचा कधीही खुलासा होऊ शकला नाही.

९. विलक्षण मेकॅनिक

जोमारल या नावाचा एक मेकॅनिक अमेरिकेत आहे. त्यास अशी एक शक्ती आहे की, कसलेही बिघडलेले इंजिन असो किंवा मेकॅनिक्सने ते यापुढे दुरुस्त होणे शक्य नाही असा निर्वाळा दिलेला असो, त्याने हात लावला की, ते आपोआप दुरुस्त होऊन चालू लागते. त्याला सन १९५० पर्यंत यासंबंधी काहीही जाणीव नव्हती:त्या साली त्याची पत्नी बाळंतपणासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल झालेली होती. तिचे सीझरीन करणे आवश्यक वाटल्यावरून डॉ.ऑपरेशनची तयारी करीत होते.इतक्यात एकाएकी इंजिनमध्ये बिघाड होऊन सर्व दिवे गेले. त्यांच्याजवळ मेणबत्त्या नव्हत्या व इंजिन लवकर दुरुस्त होणे शक्य नव्हते.अशा वेळी काय करावे व कसे करावे याचा त्यांना मोठा पेच पडला. तोपर्यंत जोमारल यास इंजिन किंवा तत्संबंधी काहीही माहिती नव्हती. त्याने इंजिनजवळ जाऊन

सहज इकडे तिकडे हात फिरविला. एकदम ते इंजिन दुरुस्त होऊन काम देऊ लागले. त्याना काय केले म्हणून त्यास विचारण्यात आले. त्यावर त्याने नुसता हात फिरवण्यापलीकडे काहीही केलेले नसल्याचे सांगितले. त्या वेळेपासून त्याला आपल्यातील सुप्त शक्तीची जाणीव झाली व त्यानंतर कितीही बिघडलेले अथवा कामाबाहेर गेलेले इंजिन असले तरी त्याने नुसता हात लावताच ते चालू होते.

१०. विलक्षण विक्रेता

अमेरिकेतील ओहिओ या शहरात एका जवाहिऱ्याच्या दुकानात शेरमन टर्नर या नावाचा एक विक्रेता होता. ता. ८ एप्रिल १९५७ रोजी मालकाने त्यास सांगितले की, तुला ठेवून बरेच दिवस झाले आहेत व तुझ्या पगारापुरतीही विक्री तू अद्याप करू शकला नाहीस. सबब तुला नोकरीवर ठेवता येणे शक्य होणार नाही असे दिसते. त्यावर तो म्हणाला की, तुम्ही म्हणता ते खरे दिसत असले तरी मला अजून एक संधी द्या. गेल्या काही आठवड्यांत मी दाखविलेला माल पाहून गेलेली काही गिऱ्हाइके पुढील आठवड्यात परत येतील व मी बरीच विक्री करू शकेन. त्यावर मालक म्हणाला की, गिऱ्हाईक एक वेळ परत जाते ते काही परत येण्याकरता नाही. ते काही असले तरी शेरमन म्हणाला की, मी सांगतो ते लिहून घ्या व त्याप्रमाणे घडले तर मला कायम करा. यावरून त्याने सांगण्यास सुरुवात केली. तो म्हणाला की, गेल्या बुधवारी एक तरुण मनुष्य हिऱ्याची अंगठी पाहून गेला आहे, तो परत येऊन ती विकत घेईल. उद्या आणखीन एक गिऱ्हाईक येईल. त्याने एक भारी किमतीचे घड्याळ पाहून ठेवले आहे. ते तो विकत घेईल. ते तो त्याच्या पत्नीस बक्षीस म्हणून विकत घेणार आहे. बुधवारी एक जोडपे येईल व जेवणाचा चांदीचा संच विकत घेईल. गुरुवारी एक मनुष्य येईल तो गेल्या आठवड्यात येथे येऊन गेला आहे; तो एक भारी किमतीची हिऱ्याची आंगठी घेईल. शुक्रवारी पूर्वी येऊन गेलेल्यापैकी तीन माणसे येतील व ते सर्वांत जास्त खरेदी करतील. या आठवड्यात माझी विक्री तीन हजार डॉलरहून अधिक होईल. मालकाने ते सर्व लिहून घेतले व सांगितले की, ठीक आहे. परंतु अशा कथा-कादंबऱ्यातील गोष्टी प्रत्यक्षात घडत नसतात व जर खरोखरीच घडल्या तर मी तुला कायम करीनच, परंतु वर बोनस पण देईन. अनुभव असा आला की, शेरमनने सांगितल्याबरहुकूम त्याने सांगितलेल्या दिवशी तीच माणसे येऊन त्याने सांगितल्याप्रमाणे जिनसा खरेदी केल्या. आता आश्चर्य करण्याची पाळी मालकाची होती.

११. दुर्मिळ नाण्याबद्दल अंतःस्फूर्ती

अमेरिकेत बर्ट केरी म्हणून एक मनुष्य आहे. त्याला जुन्या व दुर्मिळ नाण्यांबद्दल एक विशेष सिद्धी आहे. तो रस्त्याने जात असता कोठे त्यांचे अस्तित्व असले तर त्यास चटकन समजते. एकदा १९५३ साली त्याने दक्षिण कॅरोलिनातून एका रस्त्याने जात

असता एक अत्यंत जुना असा लग्नातील पोषाख खरेदी केला. त्यावर त्याची पत्नी रागावली व म्हणाली की, कशाकरता हे जुने रकटे घेतले. दिलेली किंमत तरी वसूल होईल काय ? यावर त्याने चाकू काढून तो ड्रेस कापला व आतून सत्तर वर्षांपूर्वीचे नवीन मिंटमधून आलेले डॉलर बाहेर पडू लागले. ते सुवर्ण डॉलर असून अगदी नवीन दिसत होते व त्यातील काही तर अगदी दुर्मिळ होते. त्यांची एकंदर किंमत साडेदहा हजार डॉलर भरली. तो म्हणाला की नाणी असतील अशी माझी कल्पना होती. परंतु इतकी असतील असे वाटले नाही. दुसऱ्या एका वेळी तो आपल्या स्नेह्यास म्हणाला, सध्या तुझ्या खिशात असलेली सर्व नाणी मला देत असलास तर मी तुला पाच डॉलर देतो. यावर मित्राने विचारले की चांदीची नाणी माझे खिशात आहेत हे तुला कसे कळले. त्यावर तो म्हणाला की, मला पैशांचा वास येतो. तो म्हणाला की, तुझ्या खिशात निकेलचे एक १९१३ सालचे नाणे आहे. त्याचे एकत्याचे तुला पाच डॉलर देतो. त्याचा मित्र म्हणाला की मजजवळ निकेलचे नाणे नाही. त्याने खिसे पाहावयास सांगितले, बर्टने सांगितल्याप्रमाणे खरोखरीच एक दुर्मिळ निकेलचे नाणे त्याच्या खिशात होते. आणखी एकदा त्याचा एक स्नेही चिल्लर नाण्यांची एक थैली घेऊन चालला होता. त्याच्या थैलीतील विवक्षित तीन नाणी त्यास हवी होती. ती त्यात होती की कसे हे त्या थैलीवाल्यासुद्धा माहीत नव्हते. परंतु तपासणी करता त्यात ती आढळून आली. एकदा डिसेंबर १९६१ मध्ये त्याच्या पत्नीसह तो लास व्हेगास शहरी होता. रस्त्याने चालताना तो एका डॉलरवाल्या स्लॉट मशीनजवळ थांबला. त्याने खिशातून एक चांदीचा डॉलर काढला व पत्नीस सांगितले की, या मशीनमधून मला तीन डॉलर मिळतील व त्यातील एक १८९३ चा असेल. त्याप्रमाणे घडून आले. तो १८९३ चा डॉलर १००० डॉलरला विकला गेला. अशा शेकडो अनुभवांची नोंद त्याच्याजवळ आहे. दुर्मिळ नाण्यांबद्दल त्याला अंतःस्फूर्ती आहे.

१२. जिभेने पाहणारी मुलगी

मिस चॅथम हिची दृष्टी लहानपणीच गेलेली होती. तिला नंतर जिभेने पाहता येऊ लागले. कोणत्याही वस्तूस जिभेने स्पर्श केला की ती काय आहे हे ती चटकन सांगू शकत असे. सन १८१५ साली एका थिएटरमध्ये प्रयोग करण्यात आले व तिने नुसत्या जिभेने शेकडो जिनसा ओळखल्या. शंकेखोरांनी चटकन न ओळखता येण्यासारख्या अशा वस्तू आणल्या होत्या. परंतु त्या सर्व तिने चटकन ओळखल्या. तिने सर्व इंग्लंडभर प्रवास करून प्रात्यक्षिके दिली. १८४८ साली ती वारली.

१३. विषदृष्टीची स्त्री

मॉली नावाची एक स्त्री सेंट लुथिया गावच्या गल्ल्यांतून एकोणिसाव्या शतकात फिरत असे. तिची डाकीण म्हणून ख्याती होती. तिने नुसता वस्तू अगर माणसाकडे

पाहिले तरी तिची दृष्टी परिणाम करीत असे. ती एकदा एका हॉटेलमध्ये शिरली. ती दिसावयास अगदी कुरूर व भयंकर होती. डोळे लाल व बाहेर आल्यासारखे दिसत असत. तिचे येणे कोणालाही आवडत नसे. हॉटेलमध्ये शिरल्याबरोबर तेथील एक नोकर तिला हाकून देण्याकरता एक सोटा घेऊन तिच्या अंगावर धावून गेला व म्हणाला की, डाकिणी तू येथे का आलीस ? तुझ्या स्मशानात परत जा. इतके म्हणताच तिने आपली विषदृष्टी त्याच्याकडे वळविली व म्हणाली की, बघ, मी आता तुझा समाचार घेते, असे म्हणून काही मंत्र पुटपुटत त्याच्याकडे पाहू लागली. काही क्षणांतच त्याच्या हातातील सोटा गळून पडला. त्याने आपले हात छातीभोवती आवळून धरले व तो खाली कोसळला. त्याची तपासणी केली असता त्याचे प्राण गेल्याचे निदान करण्यात आले. तिला तिने मागितलेल्या वस्तू देऊन रवाना करण्यात आले. परंतु यामुळे तिची ख्याती फार वाढली. तिने आपणास त्रास देऊ नये म्हणून अथवा आपली काही दुष्टकृत्ये तिच्याकडून करवून घेण्याकरता लोक तिच्याभोवती जमू लागले. तिला पैसे देऊ लागले. एकाने सांगितले की त्याच्या पत्नीचे एकाशी अनैतिक संबंध आहेत, त्यावर काही इलाज कर. ती म्हणाली की त्याचा काही जिन्नस मजजवळ आणून दे, मी त्याचा इलाज करते. थोड्याच दिवसात त्याच्या मृत्यूची बातमी आली. तिच्याकडे आता अशा खूप लोकांची गर्दी होऊ लागली. ती त्याबद्दल पैसा पण खूप मागत असे. अशा रीतीने तिने दोन वर्षे काढली. पण मग तिचा खून झाला. तिचे प्रेत पोलिसांना एका गल्लीत रक्ताने थबथबलेल्या स्थितीत आढळले.

१४. धातुचुंबकत्व असलेली कॅरोलिना

लंडनची सतरा वर्षांची कॅरोलिना आजारी पडली म्हणून तिला हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले. तिची भूक नाहीशी झाली असून तिचे वजन १३० पौंडांवरून ९० पौंडांवर आले होते. एकदा तिला एकाएकी आकडी आली व तिचे शरीर लोखंडाप्रमाणे अगदी ताठ होऊन गेले. तिला थंडा घाम येऊ लागला. परंतु अशाही स्थितीत ती टोनोंसे येथे जाऊन आल्याचे सांगू लागली व त्या गावाचे तिने वर्णन केले. ते ठिकाण तिच्यापासून हजारो मैल लांब होते. परंतु तिने कधीही न पाहिलेल्या शहराचे वर्णन अगदी अचूक होते. याप्रमाणे तिने आजारीपणात अनेक फेरफटके मारले. अचूक वर्णन केले. याप्रमाणे ती हॉस्पिटलमध्ये सुमारे वीस महिने होती. त्यानंतर तिची प्रकृती एकदम सुधारू लागली. परंतु विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिच्यात कोणत्याही धातूसंबंधी चुंबकत्व उत्पन्न झाले. कोणताही धातू तिच्या शरीरास लागला की खेचून काढावा लागत असे. नाहीतर तिच्या शरीरास तो चिकटून राहावयाचा. ती दुरुस्त झाल्यावर सुरुवातीस ही शक्ती विशेष प्रकर्षाने अनुभवास येत होती. पुढे हळूहळू कमी होत नाहीशी झाली व ती एक सर्वसामान्य मुलगी बनली.

१५. भूतकालात गेलेली स्त्री

ता. ८ ऑक्टोबर १९१६ रोजी कु. एडिया या इंग्लंडमधील विल्टशायरमधून मोटारने प्रवास करीत होती. दाट धुके पडले होते व तिला रस्ते नीट दिसत नव्हते. ती एका गावाजवळ आली व ते अव्हेसबेरी असावे असे तिला वाटले. तिथे तिला जास्त पाऊस व धुक्यातसुद्धा झगझगीत दिवे व जत्रा भरलेली दिसली. तिने आपली गाडी थांबविली व बराच वेळ ती त्या जत्रेची गम्मत पाहात उभी राहिली. नंतर ती स्वीडन येथे निघून गेली. परत येताना ती अव्हेसबेरी येथे थांबली असता तिला जत्रा दिसली नाही. म्हणून तपास करता तिला असे सांगण्यात आले की, अशा प्रकारची जत्रा तेथे फक्त १८५० पर्यंतच भरत असे. त्यानंतर कधीही अशी जत्रा भरलेली नाही. यावरून तिला आश्चर्य वाटले म्हणून तिने आधिक तपास केला तेव्हा तिला ऑफिशियल रेकॉर्डवरून समजले की, तेथे कॉल्वरीस्टोन नावाचा रस्ता होता. परंतु तिने पाहिले तसले दिवे लावण्याची प्रथा सन १८०० च्या पूर्वीपासून बंद पडली होती. या सर्वांवरून तिने असा तर्क केला की, ती त्या वेळी भूतकालात खेचली गेली होती. म्हणून त्यावेळेचे दृश्य पाहू शकली होती.

१६. इलेक्ट्रिक धक्का देणारी मुलगी

अमेरिकेतील मिसुरी गावात एक चौदा वर्षांची जेनी या नावाची मुलगी आहे. तिचा असा दावा आहे की, अशी कोणीही व्यक्ती नाही की, जी तिला धक्का देऊन पाडू शकेल. हे ऐकून एक शक्तिमान तरुण तिच्याजवळ गेला व त्याने आपला हात त्या मुलीकडे केला. तिच्या हाताचा स्पर्श होताच त्यास एक जोराचा इलेक्ट्रिक शॉक बसला व तो जमिनीवर कोसळून बेशुद्ध झाला. सन १८९५ पर्यंत ती सर्वसाधारण मुलीसारखीच एक मुलगी होती. काहीही दृश्य कारण नसताना त्या वर्षी ती एकाएकी हाय पॉवर इलेक्ट्रिसिटी साठवून ठेवणारी मुलगी बनली. तिने कोणत्याही वस्तूस स्पर्श केला की तिच्या बोटातून विजेचे जांभळे कण बाहेर पडताना दिसत. तिने कोणाला स्पर्श केला तर त्यास इलेक्ट्रिक शॉक बसे. परंतु पुष्कळ वेळेला तिला स्वत:लाही ते सहन होत नसे. म्हणून ती किंचाळून उठे. ती कोणत्याही धातुस स्पर्श करूच शकत नसे. कारण मग तिलाच तो धक्का जाणवत असे. कोणी जवळपास येण्याचेही धाडस करीत नसे. वैज्ञानिक व डॉक्टर्स यांनी याचे कारण शोधण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु त्यांना यश आले नाही. त्यामुळे तिला अगदी थोडे मित्र होते व तेसुद्धा तिच्या जवळपास फिरकत नसत. पुढे वाढत्या वयाबरोबर ही शक्ती कमी होत गेली. तारुण्यात ती साधारण तरुणींसारखी बनली.

१७. मागील शतकात प्रवेश

१०/८/१९०१ रोजी दोन इंग्लिश शिक्षिका व्हर्सेलिस पाहावयाकरता म्हणून

ट्रिप काढून फ्रान्समध्ये आल्या होत्या. त्या व्हर्सेलिसमधील एकेक प्रेक्षणीय स्थळ काळजीपूर्वक पाहात होत्या. त्यांच्याबरोबर दुसरे इंग्लिश टूरिस्ट पण होते. एकाएकी त्या दोघींना आपल्या शरीरातून काही अननुभूत असा प्रवाहसंचार झाला आहे असे वाटून त्या भयभीत झाल्या व आपणास काय होते आहे, हे त्यांना समजावयाच्या आतच त्यांच्या आजूबाजूस विलक्षण परिवर्तन झाले आहे. असे त्यांना आढळून आले. थोड्या वेळापूर्वी त्यांना त्या ठिकाणी स्वच्छंदपणे वागणारी मुले, प्रवासी वगैरे दिसत होते. त्याऐवजी त्यांना आता गेल्या शतकातील पेहरावातील शेतकरी, कामकरी काम करीत असताना दिसू लागले. राजवाडा व त्या सभोवतीचा बगीचा हा अदृश्य होऊन गेले. तेथील ते कामकरीसुद्धा त्या स्त्रियांकडे आश्चर्ययुक्त मुद्रेने पाहू लागले ते आपल्या हातातील हत्यारे टाकून त्यांच्याकडे एकसारखे टक लावून पाहू लागले व म्हणू लागले की, या कोणी दुसऱ्या ग्रहावरून आल्यासारख्या दिसत आहेत. थोड्याच वेळात त्यांच्या डोळ्यांपुढून ते दृश्य जाऊन त्यांना पुन्हा व्हर्सेलिस पॅलेस, बाग वगैरे दिसू लागली. त्यांनी लगेच आपला मोर्चा टूरिस्ट ऑफिसकडे वळविला व आपला अनुभव सांगितला. त्यांनी मागील रेकॉर्ड तपासून सांगितले की, या वर्णनाचे कपडे व लोक या विभागात कमीत कमी एक शतकापूर्वी अस्तित्वात होते त्या दोन्ही स्त्रिया कालावकाशातील भविष्यात एक शतक मागे खेचल्या गेल्या होत्या.

१८. फोटो घेऊ न देणारी गायत्री

१९३८ साली पॉल डिनिल्सन या नावाचा एक फोटोग्राफर हिंदुस्थानात फिरतीवर आला होता. एके ठिकाणी त्यास चार तोंडाचा, गायत्री देवीचा एक दुर्मिळ पुतळा आढळला. तिचा फोटो घ्यावा या उद्देशाने त्याने आपला कॅमेरा सज्ज केला. त्यावर तेथील एका पुजाऱ्याने सांगितले की, या देवींची विशिष्ट तऱ्हेने पूजा-अर्चा केल्याशिवाय ती आपला फोटो काढू देणार नाही. त्याचा अर्थात यावर विश्वास बसला नाही. तेथे आणखी एक मॅक्सवेल म्हणून फोटोग्राफर होता. त्या दोघांनी त्या मूर्तींचे फोटो घ्यावयाचे ठरवले. ते दोघेही धंद्याने फोटोग्राफर असल्याने फोकस वगैरेत चूक होण्याचा संभव नव्हता. त्यांनी योग्य ती काळजी घेऊन प्रत्येकी बरेचसे फोटो काढले व रात्री त्यांच्याजवळील प्रवासी डार्करूममध्ये त्या फिल्म डेव्हलप केल्या. परंतु दोघांपैकी एकाच्याही फिल्मवर एक पुसट रेघसुद्धा उमटलेली दिसली नाही. दोन्ही फिल्म अगदी कोऱ्या होत्या. त्यावरून आश्चर्यचकित होऊन त्यांनी त्या पुजाऱ्याने सांगितल्याप्रमाणे पूजाअर्चा करविली व नंतर फोटो घेतले. ते सहज व अगदी उत्तम असे आले.

१९. जस्तापासून सोने

१८५७ साली निकोलस फ्लॅमेल नावाच्या गृहस्थास एक स्वप्न पडले की, एक तांब्याच्या पत्र्याने मढविलेले पुस्तक असून त्याची पाने भूर्जपत्राची आहेत.

CamScanner

त्यातील मजकूर जुन्या लॅटीन भाषेतील होता, व ह्या पुस्तकाचे नाव ' अब्रॅहॅम घी ज्यू ' असे होते. त्यात जस्तापासून चांदी व सोने कसे करावे, याच्या कृती दिलेल्या होत्या. ते स्वप्न इतके स्पष्ट होते की, त्यातील हकीकत खरी असलीच पाहिजे असे त्यास वाटले, म्हणून त्याने जुन्या पुस्तकविक्रेत्याच्या दुकानातून तसल्या पुस्तकाचा शोध सुरू केला. बऱ्याच महिन्यांनी त्याला एका जुन्या पुस्तकविक्रेत्याच्या दुकानात तसले पुस्तक दिसले. त्याने ते लगेच खरेदी केले व त्या पुस्तकात त्याने स्वप्नात पाहिल्याप्रमाणे माहिती आढळली.

त्यांनी सतत सात वर्षे प्रयत्न करून त्याचे जुन्या लॅटीन भाषेतून चालू भाषेत भाषांतर करवून घेतले. त्यात निरनिराळ्या भट्ट्या कशा बनवावयाच्या, त्याप्रमाणे निरनिराळी उपकरणे व द्रव्ये कोणकोणती लागतात व त्याचा कसकसा उपयोग केला म्हणजे जस्तापासून चांदी व सोने बनविता येते, यासंबंधी सांगोपांग माहिती दिलेली होती. त्याप्रमाणे त्यांनी सर्व जमवाजमव करून त्यापासून आवश्यक ते द्रव्य तयार केले. त्यांनी भट्टीत शिसे टाकून ते वितळल्यानंतर त्यात ते द्रव्य टाकले. एकदम त्याचा रंग पांढरा झाला. त्यांनी सोनारास बोलावून त्यास ते दाखविले. त्यावर त्याने ती चोख चांदी असल्याचा निर्वाळा दिला. यावरून उत्साहित होऊन त्या पतिपत्नींनी आपले प्रयोग पुढे चालू ठेवले व त्यांनी एक लाल रंगाचे द्रव्य तयार केले. ते द्रव्य पारा भट्टीवर ठेवून त्यात टाकले, तर त्याचे शंभर नंबरी सोने बनत असे. मात्र ते जोडपे त्यापासून मिळणारे सर्व द्रव्य धार्मिक संस्थांना देत गेले. त्यातून एक पैसाही स्वतःकरता वापरला नाही. तो फॉर्म्युला सांगावा किंवा ते पुस्तक विकत द्यावे म्हणून शेकडो लोक त्यास मन मानेल ती किंमत द्यावयास तयार होत. परंतु ते कोणत्याही प्रलोभनाला बळी पडले नाहीत. १८९० साली पत्नी वारली. नंतर काही वर्षांनी तोसुद्धा वारला. परंतु त्यांनी ती सिद्धी केवळ स्वतःचा छंद म्हणून वापरली. त्याचा केव्हाही स्वतःच्या फायद्याकरता उपयोग करून घेतला नाही. त्याच्या मृत्यूनंतर शेकडो लोकांनी त्या पुस्तकाकरता जंग जंग पछाडले पण काही उपयोग झाला नाही.

आपल्याकडे ही विद्या अगदी साधारण साधूफकिराजवळ असलेली पाहण्यात येते. विशेषतः नाथपंथी लोकाजवळ अजूनही ही विद्या जिवंत आहे. एका अगदी तरुण संन्याशाने १९४२ साली लेखकाच्या हातून असे प ल्यापासून सोने करवून घेतले होते त्यानंतर लेखकाने त्यासंबंधी पुष्कळ वाङ्मय व हस्तलिखिते गोळा करून प्रयोग केले. परंतु निदान अद्याप तरी यश आलेले नाही. निरनिराळ्या लोकांस भेटून दुर्मिळ वाङ्मयातून, हस्तलिखितातून अमोल असे प्रयोग संग्रहित मात्र करून ठेवले आहेत. परंतु त्यासंबंधी प्रयोग करण्याची इच्छा लेखकास आता राहिलेली नाही. ते प्रयोग करताना पाऱ्याच्या बाबतीत बरेच यशस्वी प्रयोग होऊ शकले. (पारदबंधन वगैरे) यातच त्यास समाधान आहे. मात्र ज्या कोणास पोटाची विवंचना नाही व यश मिळो वा न मिळो या कार्यात श्रम, द्रव्य व वेळ घालवि-

ण्याची तयारी असेल व सिद्धी प्राप्त झाल्यावर स्वतःच्या हिताकरता त्याचा उपयोग करणार नाही अशी लेखकाची खात्री पटली तर त्यास मी माझे फॉर्म्युले सुपूर्त करण्यास तयार आहे. यावर कोणाचा विश्वास बसत नसेल तर त्याने दिल्ली येथे श्री. बिर्ला यांचे लक्ष्मीनारायण मंदिराची वास्तू आहे त्याच्या मागे एक बगीचा असून त्यात उजवे बाजूस एका संगमरवरी रथावर कृष्णार्जुन दाखविलेले आहेत. त्याच्यामागे एक यज्ञकुंड आहे, त्याच्या आतल्या बाजूस चारी बाजूंच्या भिंतीवर श्री कृष्णापाल शास्त्री यांनी बिर्ला, महादेवभाई देसाई, गणेश शंकर वगैरे प्रसिद्ध व्यक्तींसमोर पाऱ्यापासून सोने कसे बनविले होते याचे समग्र वर्णन दिलेले आहे. त्यांनी केलेल्या तीन प्रयोगांचे वर्णन तेथे वाचावयास मिळते.

२०. जादूचा पुतळा

सन १८६४ मध्ये एका इटालियन बोटीवरील कॅप्टनला अटलांटिक महासागरात एक लाकडी पुतळा तरंगताना आढळला. तो त्यांनी बोटीवर घेतला. तो पुतळा प्राचीनकाळची सौंदर्यदेवता ॲटलांटा हिचा होता. त्या लाकडी पुतळ्यात काय जादू होती ते कळले नाही. परंतु त्या जहाजावरील कर्मचारी एकामागून एक त्यावर प्रेम करू लागले. शेवटी त्यांच्या मध्ये आपसात एकमेकांविषयी मत्सराची भावना उत्पन्न होऊन एकमेकांशी भांडू लागले. मारामाऱ्या देखील करू लागले. कॅप्टनने लगेच तो पुतळा एका रिकाम्या सामानाच्या पेटीत ठेवून जिनोव्हा येईपर्यंत बंद करून ठेवला. पुढे १८७९ मध्ये जिनोव्हात त्या बंदिस्त जागेतून काढून नेव्हल म्युझियममध्ये तो ठेवण्यात आला. त्या म्युझियमचा पहारेकरी त्या पुतळ्याकडे तासचे तास पाहात बसत असे व शेवटी त्याने आत्महत्या केली. दुसऱ्या महायुद्धात एरिच कर्ट्झ नावाचा एक जर्मन शिपाई याच्या ताब्यात तो पुतळा होता. तोसुद्धा त्याच्याकडे तासचे तास एकसारखा पाहात बसत असे. त्याने तेथून तो चोरला व एका गुप्त जागी नेऊन ठेवला. काही दिवसानंतर मिलिटरी पोलिसांनी रिपोर्ट केला की, गेले कित्येक दिवस कर्ट्झ हा ड्यूटीवर दिसत नाही. त्याचा तपास करता तो त्या पुतळ्याच्या पायाशी मरून पडलेला आढळला. त्याने एक पत्र लिहून ठेवले होते. त्यात लिहिले होते की, जगातील कोणत्याही स्त्रीने मला जे जीवन दिले नाही ते या ॲटलांटाने दिले आहे म्हणून मी तिच्यासाठी माझ्या जिवाची कुर्बानी करीत आहे. त्यानंतर तो पुतळा पुन्हा म्युझियममध्ये नेऊन ठेवण्यात आला. परंतु त्यानंतर पुष्कळांच्या बाबतीत हाच अनुभव असल्यामुळे तो पुतळा तेथून हालवून कोठेतरी अज्ञात स्थळी नेऊन ठेवण्यात झाला. आज त्याचा ठावठिकाणा कोणासही माहीत नाही.

२१. जादूगार करोल

करोल हंटर नावाच्या एका २१ वर्षाच्या आस्ट्रेलियन मुलीने सन १९६२ रोजी भारतीय नेत्यांना चकित करून सोडले. ती कोळशाचा विस्तव तोंडात घालीत

असे. ॲसिड पीत असे व कापूर पेटवून तोंड भरून ठेवीत असे. तिचा जन्म सिलोनमध्ये झालेला असून, ती १२ वर्षांची असताना तिच्या आईबापाबरोबर ऑस्ट्रेलियात गेली होती. ती दर उन्हाळ्यात सिलोनकडे येत असे व बौद्ध धर्मगुरूंजवळ या विद्या शिकत असे. मात्र तिने आपल्या गुरूचे नाव कधीच सांगितले नाही. तिने एक जळती मशाल तोंडात घालून हजर असलेल्या योग्यांना चकित केले. तिने ती पेटती मशाल त्यांच्या डोक्याभोवती फिरवून त्यांना भयभीत केले. परंतु त्या अग्नीच्या ज्वाला सिगारेटच्या धूम्रवलयाप्रमाणे निरुपद्रवी होत्या. तिने नंतर एक विशेष प्रयोग करून दाखविला. तिने अत्यंत विषारी असे सहा मोठमोठे नाग आणले व ते आपल्या अंगाभोवती लपेटून एक नाच करून दाखविला. त्यावेळी करुनंदन नावाचे एक संन्यासी हजर होते. त्या ठिकाणी भारतीय योग्यांचे एक संमेलन भरले होते. त्यांनी हे प्रयोग पाहून आश्चर्य व्यक्त केले. स्वामी करुनंदन म्हणाले की, हे ज्ञान व ही विद्या गुरूपरंपरेनेच मिळू शकत असते. या मुलीने इतक्या लहान वयात इतके आत्मसात केले आहे, याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले.

२२. उद्याची बातमी आज

इंग्लंडमध्ये व्यॉलियम्स नावाची एक स्त्री आहे. तिला रेडिओवर दुसऱ्या दिवशी घडून येणाऱ्या घटना पुष्कळ वेळा ऐकू येतात. ता. १७ जानेवारी १९६५ रोजी तिने ऐकले की जॉर्जिया संस्थानातील अटलांटा येथे निग्रो लोकांच्या जमावाने मोठा दंगा केला असून त्यात बरेच लोक मृत्युमुखी पडले आहेत दुसऱ्या दिवशी सकाळी तिने ही बातमी आपल्या मुलीस सांगितली. परंतु, ती कोणत्याही वर्तमानपत्रातून छापून आलेली नव्हती. मात्र जानेवारी १८ ला सायंकाळी तिने वर्णन केलेला दंगा घडून आला व नंतर ते छापून आले. त्याचप्रमाणे एकदा तिने तिच्या सेक्रेटरीला त्या दिवशीच्या लंडन टाइम्समध्ये छापून आलेली गोष्ट टिपण करून ठेवण्यास सांगितले त्याने टाइम्सचा सर्व अंक चाळला. परंतु त्यास ही गोष्ट कोठेही आढळली नाही. दुसरे दिवशी मात्र त्याच पत्रात तिने सांगितलेल्या पानावरच ती गोष्ट छपलेली आढळली. याबाबत काय होत असावे याचा तपास सुरू असता असे आढळून आले की, तिला दुसरे दिवशी घडून येणाऱ्या घटना आज रेडिओवर ऐकू येतात व त्याप्रमाणे रेसचे निकाल तिला अगोदर कळत गेल्यामुळे तिने पुष्कळ पैसा कमविला होता. तिने पुष्कळ वेळा सहापैकी पाच रेसचे जिंकणारे घोडे अगोदर सांगितले होते.

२३. शरीरातून ज्वाला निघणारी स्त्री

इटालीमधील पियनो या गावी हॉस्पिटलमध्ये २२ वर्षांची ॲना मॅरोटी आपल्या कॉटवर पडली होती. ती जवळ जवळ बेशुद्ध अवस्थेत होती. तिच्या नर्सेस सांगू लागल्या की, तिच्या स्तनातून ज्वाला निघत आहेत. प्रथम यावर कोणी विश्वासच ठेवीना. परंतु त्यांनी पुनः पुन्हा सांगितल्यानंतर केवळ कुतूहल म्हणून काही

डॉक्टर तिच्या कॉटजवळ गेले. त्यावेळी तशा ज्वाला निघत नसल्याने, कोठे आहेत त्या ज्वाला असे डॉक्टरने विचारले, त्यावर नर्स म्हणाली, थोडे थांबा; असे सांगून तिच्या छातीवरील कपडा दूर केला. लागलीच एक निळी जांभळट रंगाची ज्वाला तिच्या स्तनाभोवती दिसू लागली. त्यातून ठिणग्या निघत असून त्याचा निळसर प्रकाश आजूबाजूस दिसत होता. लवकरच त्याचे रूपांतर एका ज्वालेत होऊन ती स्तनाचे वर अठरा इंचांपर्यंत वाढत गेलेली दिसली. एका डॉक्टराने हळूच त्या ज्वालेवरून आपला हात फिरविला. परंतु यात उष्णता अशी त्यास जाणवली नाही. त्यांनी पुष्कळ रीतीने परीक्षा घेतली. मधून मधून त्या ज्वाळा येतच राहिल्या मात्र त्यांचा फोटो घेण्याचा प्रयत्न असफल झाला. पुढे ती बरी होऊन घरी आली व त्या ज्वाला निघणे पण बंद झाले. रोममधील प्रोफेसरांनी १९२४ साली यासंबंधी सविस्तर रिपोर्ट प्रसिद्ध केला होता.

२४. अन्य गोलावरील मुले

१८८७ च्या पावसाळ्यातील हकीकत. शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना लहान मुलांचे रडणे ऐकू येऊ लागले म्हणून ते काय आहे ते पाहावयास गेले. एका डोंगराच्या एका गुहेजवळ दोन लहान मुले रडत असलेली त्यांनी पाहिली. परंतु त्यांना पाहताच त्यांना अत्यंत आश्चर्य वाटले. त्यांचे डोळे खोल गेलेले असून बदामी आकाराचे होते. त्यांची त्वचा एकदम निळी गर्द रंगाची होती. ती मुले एका अपरिचित भाषेत ओरडू लागली. त्यांपैकी एक मुलगा होता व एक मुलगी. त्यांचे कपडे धातूचे बारीक तारेने बनविलेले होते व त्वचेचा गर्द निळा रंग कृत्रिम रंग नसून, स्वाभाविक रंग होता. पुष्कळ प्रयत्न करूनही त्यांना मानवेल असे अन्न त्या खेड्यातील लोक देऊ शकले नाहीत, त्यामुळे मुलगा लवकरच मरण पावला. ती मुलगी सुद्धा शिजवलेले अन्न खाण्यास इन्कार करीत असे. तिला कच्च्या भाज्या विशेष आवडतात. ती लवकरच चांगली सुदृढ बनली. पुढे त्या गावचा मॅजिस्ट्रेट व इतर लोकांनी तिला आपली भाषा शिकवली. नंतर त्यांनी ती कोठून आली वगैरे माहिती विचारली असता कोडे अधिकच कठीण बनले. कारण ती सांगू लागली की, मी जेथून आले तेथे सूर्य दिसत नाही व त्या ठिकाणी नेहमी सायंप्रकाश असतो. प्रकाशयुक्त जमीनसुद्धा आहे. परंतु ती अनेक समुद्रांपलीकडे आहे. ती म्हणाली की, मी व माझा भाऊ आमच्या लोकांबरोबर राहात असता एके दिवशी एकदम मोठा आवाज ऐकू आला व आम्ही ढकलले गेलो व ज्या गुहेचे तोंडाशी सापडलो तेथे येऊन पडलो व उजेड पाहिला. ती हळूहळू सूर्यप्रकाश व इतर पृथ्वीवरील गोष्टीत समरस झाली व तिचा शरीराचा वर्णसुद्धा कमी कमी होत होत ती पाच वर्षांनी वारली, त्यावेळी जवळ जवळ पांढरा झाला होता.

ज्याप्रमाणे आपल्या शरीराभोवती अदृश्य अशी Spirit Body आहे, त्या-

प्रमाणेच आपल्या या सर्व विश्वाभोवती एक Anti Universe असावे असा राशियन व अमेरिकन शास्त्रज्ञांचा अंदाज आहे व त्यातून विलक्षण घटना घडून ही मुले पृथ्वीवर आली असावीत. मागे आपण पाहिले की, ज्याप्रमाणे काही व्यक्ती देखता देखता नाहीशा होऊन त्यांचा पुन्हा कधीही पत्ता लागला नाही, त्याप्रमाणे ही मुले त्या दुसऱ्या जगातून नाहीशी होऊन आपल्या जगात आली असावीत

मात्र या हकीकतीसंबंधी एक वैशिष्टय म्हणजे या हकीकतीतील व्यक्तींचा संबंध प्रथमपासून अखेरपर्यंत एका खेडयातील लोकांशी आला व ती गोष्ट अखेरपर्यंत शास्त्रज्ञांपर्यंत त्याची सत्यता पाहण्याकरता पोचलीच नाही. त्यामुळे त्या खेडयातील लोक निष्कारण खोटे सांगणार नाहीत हे जरी खरे असले तरी, त्यांना कोणतीही गोष्ट तिखट-मीठ लावून सांगणेची सवय असते त्यामुळे यापैकी सत्यतेचा भाग किती व इतर किती याचे अनुमान करणे कठीण आहे. कारण याच्या सत्यतेबद्दल कोणीही शास्त्रज्ञ किंवा संस्था यांनी निर्वाळा दिलेला नाही. त्यामुळे कदाचित ती खरी असेल किंवा केवळ दंतकथाही असू शकेल.

२५. अदृश्य होणारी परिचारिका

इंडियानामधील इव्हान्स बिले या गावात एकदा काही मुले बेस बॉल खेळत होती व त्यांचा खेळ एक काळे कपडे नेसलेली नर्स पहात होती. खेळता खेळता त्यांच्यात काही वाद उत्पन्न झाला. म्हणून त्यांच्यापैकी एकाने तिला विचारले की तो बॉल tont होता की कसे ? ती थोडा वेळ स्तब्ध उभी राहिली व सर्वांच्या देखत नाहीशी झाली. त्यापूर्वी व त्यानंतर आतापर्यंत पुष्कळ लोकांनी तिला वावरताना व नाहीशी होताना पाहिले आहे परंतु ते कोडे उलगडण्याचा कोणताही प्रयत्न अद्यापि यशस्वी झालेला नाही.

२६. पैसे देणारे चहाचे भांडे

मे १९३२ मध्ये ज्यो आणि मॅगी पॅट्रिक ही शिकागो पार्कमधील एका बाकावर बसली होती. तेथे एक म्हातारी व अत्यंत अशक्त अशी स्त्री आढळली. त्यांनी आपणाबरोबर काही खाण्यासाठी आणले होते, त्यापैकी काही तिला दिले व असाच क्रम काही दिवस चालू राहिला. सप्टेंबर १९३२ मधील एके दिवशी त्यांना असे आढळले की, आजारीपणामुळे ती नीट चालू देखील शकत नव्हती. तिची स्थिती पाहून त्यांनी हात धरून तिला जवळच असलेल्या तिच्या घरी नेले व बिछान्यावर निजवून ज्यो डॉक्टर आणण्यासाठी म्हणून बाहेर गेला. त्या अवधीत मॅगीने तिला गरम चहा पाजला. ज्यो डॉक्टर घेऊन यावयाच्या आत ती म्हातारी मॅगीस म्हणाली की, तुम्ही दोघांनी माझ्याकरता फार केले आहे व मी मात्र तुमच्याकरता काही करू शकत नाही. तरी पण मजजवळ एक वस्तू आहे व ती मला वेळोवेळी अत्यंत उप-

योगी पडली आहे. ती तुम्ही घेऊन जा. कारण मी आता मरणार आहे व तिचा मला काही उपयोग नाही. तुम्ही ती वस्तू घेतलीत तर मी तुमची थोडी उतराई होईन. असे सांगून तिने सांगितले की, शेल्फवर एक जुने असे चहाचे भांडे Tea Pot आहे ते घेऊन जा. ते अगदी जुने व कळकट असे होते. व ते नेऊन तरी काय करावयाचे असा मॅगीला प्रश्न पडला. परंतु केवळ त्या म्हातारीला बरे वाटावे म्हणून तिने ते आपणाबरोबर न्यावयाचे ठरवले. ज्यो डॉक्टर घेऊन येण्याच्या आतच त्या म्हातारीने प्राण सोडला. तिचे उत्तरकार्य दफन वगैरे सर्व यांनाच करावे लागले व तिच्या थडग्यावर फुले वाहिली त्यात त्यांच्याजवळील शेवटचा डॉलर खर्ची पडला.

इकडे मॅगीने ते चहाचे भांडे घासून पुसून स्वच्छ लख्ख करून ठेवले होते. ते तांबे व पितळ यांच्या मिश्रणाचे जरा चमत्कारिक आकाराचे होते. काय करावे, कसे करावे या विवंचनेत असताना ज्योने ते भांडे सहज तिच्या हातातून घेऊन त्यावर आणखी काही खाणाखुणा आहेत की कसे ते पाहण्याकरिता उलटे केले. तो काय चमत्कार, त्यासून काही नाणी खाली पडली. आपल्या आतापर्यंत कसे लक्षात आले नाही याचे आश्चर्य वाटून त्यांनी ती गोळा केली. त्या पैशाने त्यांनी त्या म्हातारीकरता आलेला खर्च भागविला व शिवाय काही आवश्यक व गरजेच्या वस्तू पण आणता आल्या. १९३३ च्या फेब्रुवारीत ज्योची नोकरी गेली व अशी वेळ आली की स्टोव्हमध्ये घालावयास तेल नाही म्हणून ते थंडीत कुडकुडत बसले होते. काही तरी करावयाचे म्हणून मॅगीने चहाचे भांडे खाली काढले त्यावरून हात फिरवू लागली. ती म्हणाली की, आपणाजवळ थोडे पैसे असते व आपण फ्लॉरिडाला जाऊ शकलो असतो तर काय मजा आली असती ! असे बोलत असतानाच तिच्या हातून ते भांडे उपडे झाले व त्यातून काही नाणी बाहेर पडली. वास्तविक त्यापूर्वी त्यांनी कित्येक वेळा ते भांडे आतून-बाहेरून तपासले होते व उपडे पण करून पाहिले होते. या दुसऱ्यांदा मिळालेल्या पैशाने त्यांना हात दिला. ते सर्व सामान घेऊन शिकागो येथे जाऊन स्थायिक झाले व त्यांचा धंद्यात जम पण बसला. पुढे दुसरे महायुद्ध सुरू झाले व त्यांचे नशीब पुन्हा फिरले. धंदा अजीबात बसला व खाण्याची मुष्किल होऊन बसली. १९४५ च्या हिवाळ्यात पैसे नसल्याने त्यांना एका लहानशा खोलीत येऊन राहावे लागले होते व आता काय करावे या विवंचनेत पुन्हा पडले. अशा परिस्थितीत असताना मॅगी ते भांडे हातात घेऊन ज्यो पुढे उभी राहिली व म्हणाली, हे पुन्हा काही पैसे देईल तर काय बहार होईल. यावर ज्यो म्हणाला की, काय वेडी आहेस काय. मी ते भांडे शेकडो वेळा उलटपालट करून पाहिले आहे, त्यात काही नाही. तरी सुद्धा तिने त्याचे झाकण उघडून ते उलटे केले व काय आश्चर्य ? त्यातून पुन्हा नोटा बाहेर पडल्या. त्यावर ज्यो ओरडला की, केवळ अशक्य. मी ते शेकडो वेळा उलटपालट करून पाहिले होते. परंतु सत्य परिस्थिती समोर होती; त्या पैशाने ते सावरले. पुन्हा धंदा सुरू केला व आज ते एक सुखी कुटुंब म्हणून जगत आहेत. त्यांच्या माल-

कीच्या फ्लॅटमध्ये एका सुरक्षित ठिकाणी त्यांनी ते भांडे ठेवून दिले आहे व त्यानंतर त्यांना त्याचा उपयोग करण्याची पाळी आली नाही. सध्या तरी ते रिकामे आहे. परंतु कोणी सांगावे, त्यांना पुन्हा खरी गरज पडली तर ते त्यांना अजूनही पैसे देईल.

२७. हुकमी जुगार

जुलै १९६६ मधील एका शनिवारी ग्रँड बदामा बेटाच्या मरीना फ्री पोर्टमधील लुकायन बीच हॉटेलमध्ये एक म्हातारे जोडपे शिरले व फाशांनी जुगार चालू असलेल्या टेबलावर जाऊन बसले. त्यांनी टेबलावर २५ डॉलर ठेवून खेळ सुरू केला. त्याने नंतर त्याच्या पत्नीस मानेने खूण केली व तिने लागोपाठ पाच वेळा फासे जिंकले व त्यास विचारले की, आपली रक्कम पूर्ण झाली आहे काय? त्यावर तो म्हणाला की, आणखी दोन खेळ जिंकण्याची आवश्यकता आहे. त्यावर तिने आणखी दोन वेळ फासे टाकून जिंकले व पाच हजाराच्या आसपास डॉलर गोळा केले. तेव्हा खेळणारांपैकी एकाने विचारले की, या पैशाचे तुम्ही काय करणार? तो म्हणाला की, माझ्या नातवाच्या नावाने ट्रस्ट करणे आहे. ते दोघे पुन्हा १४ सप्टेंबर १९६७ रोजी आले व त्यांनी पुन्हा पैसे जिंकण्यास सुरुवात केली. तोपर्यंत त्यांना कोणी ओळखले नव्हते. परंतु आता एकाने त्यांना ओळखले व म्हणाले की, आता काय तुम्ही दुसरा ट्रस्ट करणार काय? त्यावर तो म्हातारा म्हणाला की, होय—माझी मुलगी बाळंत होऊन तिला मुलगा झाला आहे. त्याकरता पैसे जमवीत आहे. तिने फासे टाकून हवे होते तेवढे पैसे मिळवले व मग ते फासे दुसऱ्या माणसाच्या हातात दिले. ते पुन्हा २ जून १९६८ रोजी परत आले. या वेळी त्यांना सर्वांनी एकदम ओळखले व त्यांच्या टेबलाभोवती गर्दी करून उभे राहिले. एकाने विचारले की, आणखी एका मुलाकरता काय? त्यास काही एक उत्तर न देता त्यांनी टेबलावर शंभर डॉलर ठेवून खेळ सुरू केला. सुमारे ५२०० डॉलर जमल्यावर त्यांनी खेळ बंद केला व सांगितले की, ही रक्कम आणखी एका मुलाकरता. त्यानंतर मात्र ते अद्याप परत आलेले नाहीत. त्यांच्याबरोबर बेट लावण्याची लोक वाट पाहात आहेत.

२८. छापण्याची ऑर्डर अगोदर नोंदणारा छापखानेवाला

एक लहानसा छापखाना किर्बी नावाच्या ग्रहस्थाच्या मालकीचा होता. त्याने सप्टेंबर १९५४ मध्ये एके दिवशी त्याच्या नोकरास एक लग्नपत्रिका कंपोझ करण्यास दिली. परंतु त्यातील नावाची जागा कोरी ठेवण्यास सांगितले. याप्रमाणे सांगून किर्बी बाहेर निघून गेला. किर्बी गेल्यावर थोड्याच वेळात काही लोक छापखान्यात आले व त्यांनी लग्नपत्रिका छापण्याची ऑर्डर देऊन मजकूर त्याच्या हातात दिला. ते

मजकूर किर्बी याने त्यास कंपोझ करावयास सांगितला होता तोच होता. त्या मंडळींची किर्बीशी गाठसुद्धा पडलेली नव्हती. ही नुसती सुरुवात होती. पुष्कळ वेळा किर्बी कोऱ्या कागदांची रिमेच्या रिमे आणून ठेवीत असे. थोडयाच वेळात अनपेक्षित ऑर्डर्स येऊन ती सर्व संपून जात. विशेष म्हणजे त्याने ज्या प्रकारचे कागद ज्या संख्येने आणलेले असत, त्यासंबंधी येणाऱ्या ऑर्डर्स तशाच कागदासंबंधी व तितक्याच कागदास पुरेशा अशा असत. ता. ९ फेब्रुवारी १९५५ ला अगदी कमाल झाली, किर्बीने एक ट्रक भरून कागद आणला. त्याचा नोकर म्हणाला की, इतका कागद कशाकरता? यावर किर्बी म्हणाला की, कोण जाणे. यावर तो नोकर म्हणाला की, माझी खात्री आहे की, तुला माहीत असो वा नसो, संध्याकाळचे आत या सर्व कागदापुरती ऑर्डर नक्की येणार आहे व त्याप्रमाणे झाले. काही व्यापारी आले व त्यांनी एक मोठी अर्जंट ऑर्डर दिली. त्यात तो सर्व कागद खर्ची पडला. हे सर्व पाहून तो नोकर म्हणाला की, मला येथे काम करणे शक्य नाही. मी सोडून जातो. त्यावर किर्बी म्हणाला की, मला हे माहीत आहे. हा घे तुझा चेक. मी सकाळीच तो लिहून ठेवला आहे.

२९. कोणत्या वेळी काय लागेल ते जाणणारा नोकर

मिमी बीच हॉटेलमधील १९६६ सालची हकीकत आहे. त्या हॉटेलमध्ये ४० वर्षे वयाचा गोम्झ म्हणून एक नोकर होता. त्यावर हॉटेलमध्ये येणारे सर्व पॅसेंजर्स खूष असत. कारण तो त्यांना वेळी–अवेळी उपयोगी पडत असे व पुष्कळ वेळा स्वतःची गैरसोय करूनही त्यांची कामे करीत असे. परंतु त्याच्यामध्ये आणखी एक विशेष गुण होता तो म्हणजे येणाऱ्या गिऱ्हाइकांपैकी एखादा पुढे मागे काय मागेल त्याचा अंदाज करून तो ते अगोदरच आणून ठेवीत असे. अशा जिनसा म्हणजे टॉयलेट टाइपरायटर, औषधे यापैकी काहीही असत व अनुभव असा येई की, एखादे गिऱ्हाईक एखाद वेळी अचूक अशा एखाद्या जिनसेची मागणी करी की, त्या वेळी बाजार बंद झालेला असे व त्यास ती आणून देणे अशक्य असे परंतु त्यासंबंधी गोम्झने अगोदरच तजवीज केलेली असे. तो जिन्नस स्वतः जवळून वेळेवर नेऊन देत असे. असे १९६६ साली कमीत कमी सहा वेळेला अनुभवास आले होते. त्याने एकदा कमाल केली. एका सकाळीच तो हॉटेलमधील गिऱ्हाइकाकरता एका गाडीत घालून काही सकाळचे न्याहारीचे पदार्थ घेऊन आला होता. गाडी खाली करताना तिथे तळाशी एक ऑक्सिजन फर्स्टएड बाटली होती. ती कशास आणली आहे म्हणून त्यास विचारता, काय सांगावे, कदाचित कोणास जरूर पडेलही असे म्हणताच, मालकच हसला व म्हणाला की, मूर्खा, काढ ती. असे म्हणून त्याचा फोन आला होता तिकडे गेला. इकडे त्या नोकराने तो ट्रे आठव्या मजल्यावर लिफ्टमधून नेला. सर्वांच्या न्याहाऱ्या दिल्यानंतर तो लिफ्टजवळ उभा असता त्याला शेवटच्या खोलीत कार्ड

गडबड झाली आहे असे आढळले. एक स्त्री ओरडत बाहेर आली व म्हणाली की, तिच्या नवऱ्याला हार्ट ॲटॅक आला असून ताबडतोब ऑक्सिजनची जरूरी आहे. गोम्झ चटकन ती ऑक्सिजनची बाटली घेऊन धावला व त्या माणसाचा जीव वाचला. बाजारातून तो आणावा लागला असता तर तोपर्यंत त्याचा प्राण निघून गेला असता. हे कसे घडले म्हणून त्याला विचारले असता त्याचा खुलासा तो देऊ शकला नाही. मात्र त्यास अशी वेळोवेळी स्फूर्ती येते हे मात्र खरे.

३०. प्राण वाचविणारे कुत्र्याचे भूत

२५ जुलै १९५९ रोजी श्री व श्रीमती यांनी क्रॅमर घर बंद करून एअर पोर्टवर जाण्याची तयारी केली. त्यांनी गावी जाण्याकरता प्लेन चार्टर करून ठेविले होते. ते निघण्याच्या सुमारास त्यांच्या मांजरावर एक कुत्रा जोराजोराने भुंकत असल्याचे ऐकू आले. त्यावरून ते मागील बाजूस गेले व त्यांना आढळले की, त्यांचे मांजर एका झाडावर चढून अंगाचा मुटकुळा करून एका अदृश्य अशा कुत्र्याकडे पाहात आहे. त्यांना कुत्र्याचे भुंकणे ऐकू येत होते व त्यावरून होणारी मांजराची धावपळही पाहत होते. परंतु कुत्रा मात्र दिसत नव्हता. त्यांनी त्या कुत्र्याच्या दिशेने एक दगड भिरकावला. त्यावरून ते कुत्रे थोडे विव्हळले व निघून गेले. त्यांना विव्हळण्याचा आवाज मात्र ऐकू आला. परंतु ते कुत्रे अखेरपर्यंत दिसले नाही. या सर्व करण्यात इतका वेळ झाला की, तेथून प्लेन जाण्याची वेळ होऊन गेली. म्हणून त्यांनी तपास करता त्या प्लेनला निघतानाच अपघात झाला म्हणून कळले त्यात ते त्या वेळी असते तर निःसंशय अपघातात मरण पावले असते. काही दिवसांनी त्यांनी ही हकीकत त्यांच्या शेजारच्यास सांगितली, त्यावरून त्यांनी याच रीतीने त्या कुत्र्याच्या भुताने आणखी एकाचे प्राण वाचविल्याची हकीकत सांगितली. एक वयस्क स्त्री घर बंद करून बस पकडण्यासाठी म्हणून घरातून बाहेर पडण्याच्या तयारीत होती. इतक्यात तिला घरात कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज ऐकू आला, तीन माणसे तिच्या मदतीकरता आली. परंतु कुत्रा दिसेना म्हणून ते भिऊन निघून गेले या करण्यात वीस मिनिटे निघून गेली व बस चुकली. सायंकाळी बातमी आली की, त्या बसला अपघात झाला. ती एका चालत्या आगगाडीवर आदळली व तीतील सर्वच माणसे दगावली. त्या कुत्र्याला कसे कळले किंवा कोणी पाठविले याचाही खुलासा होऊ शकला नाही.

३१. इमानदार कुलूप

श्रीमती हिपारिका डिलाट्रे यांच्या ब्लॉकला एकाने एक नवीन कुलूप बसवून दिले व सांगितले की, हे कुलूप तुमचे संकटाच्या वेळी रक्षण करील. खरोखरीच असा अनुभव आला की, कोणीही त्यांना त्रास देण्याच्या उद्देशाने आले की, कितीही खटपट केली तरी कुलूप उघडत नसे. ता. १ डिसेंबर १९६४ रोजी (ते कुलूप

बसविल्यानंतर थोड्याच दिवसांनी) त्यांच्या दाराची बेल वाजली. त्या घरात एकट्या राहात होत्या व भलताच मनुष्य त्यांच्या खोलीत येणे त्यांना नको होते. म्हणून विचारले की, तू कोण आहेस ? तुला काय हवे ? त्यावरून तो जरा जोराने धक्के देऊ लागला व म्हणू लागला की, अगदी जीवनमरणाचा प्रसंग आहे. दार उघड. तिने प्रयत्न करूनही ते कुलूप उघडले नाही. ही गडबड ऐकून शेजाऱ्यांनी पोलिसांत फोन केला व त्यांनी त्या माणसास कैद केले. त्यास पूर्वी तीन वेळा शिक्षा झालेली होती व अशा एकटया-दुकटया स्त्रीस लुबाडण्याचा त्याचा धंदाच होता. मात्र पोलिस आल्यावर प्रयत्न न करता ते सहज उघडले. थोड्या आठवड्यानंतर पुन्हा असा प्रयत्न झाला, त्या वेळीही कुलूप उघडले नाही. काही दिवसांनी तो मनुष्य अशाच प्रयत्नात पकडला गेला. तसेच ता. १ ऑगस्ट १९६५ रोजी गुन्हेगार बिल कलेक्टर म्हणून आला व त्यांना दार उघडण्यास सांगू लागला परंतु कुलूप उघडेना. म्हणून त्यांनी ज्यांनी कुलूप बसविले होते त्यास असे खोडयाळ कुलूप का लावले म्हणून सांगण्याकरता व दुरुस्त करण्याकरता फोन केला. परंतु त्यांना जबाब मिळाला, असा कोणी मनुष्यच नसून त्याची कोणासच माहिती नाही. इकडे त्या खोटया बिल कलेक्टरला वाटले की, त्या स्त्रीने पोलिसास फोन केला आहे म्हणून तो पळाला. परंतु तो लवकरच अशा प्रकारचा गुन्हा करण्यात पकडला गेला. त्या वेळी त्याने कबूल केले की, त्याने त्या स्त्रीकडे असाच प्रयत्न केला होता. पुढे एकदा अशाच एका माणसाने दार उघडण्यास सांगितले असता कुलूप उघडले नाही. त्या वेळी सरळ पोलिसास फोन करून त्या माणसाला पोलिसाच्या ताब्यात दिले व तो खरोखरीच गुन्हेगार होता. पोलिसांनी तिला विचारले की, हा गुन्हेगार आहे, हे तिला कसे कळले. त्यावर ती म्हणाली की ज्या अर्थी माझे कुलूप उघडले नाही त्यावरून तो गुन्हेगार असलाच पाहिजे अशी माझी खात्री झाली. पोलिसांनी त्यावर कितपत विश्वास ठेवला ते कळले नाही. परंतु तिचा अनुभव सतत तसा होता ही गोष्ट मात्र खरी.

३२. गूढ संदेश

१६ ऑक्टोबर १९६४ ची हकीकत आहे. श्रीमती कूपर या आपल्या मालकाने टेप करून ठेवलेला पत्रव्यवहार टाइप करीत होत्या. मालक ज्या वेळी सवड असेल त्या वेळी एकंदर पत्रव्यवहार पाहून त्यांना काय उत्तरे द्यावयाची किंवा दुसरे दिवशी काय करावयाचे वगैरे टेप करून ठेवीत असे व त्यावरून टाईप करून उत्तर देणे व इतर व्यवहार करणे वगैरे केले जात असे. त्याप्रमाणे आजही श्री. कूपर टेपरेकॉर्डवर टेप लावून त्यावरून टाईप करून घेत होत्या. हे चालू असताना त्यांना एकाएकी टेपवर खालील शब्द ऐकू आले. तुला जर तुझ्या मालकाबद्दल काही वाटत असेल तर मी सांगतो की, त्याला वाचविण्याकारिता शक्य तो प्रयत्न कर, तो बंदुकीने

CamScanner

आत्महत्या करणार आहे. तरी वेळीच मदत कर. तिला आश्चर्य वाटले व तिने तो पुन्हा लावला. तिला तेच शब्द परत ऐकू आले. त्या टेपवर मालकाशिवाय कोणी टेप करीत नसे व इतर कोणी आलेले पण नव्हते. तिने स्वतःच तो नवीन टेप सकाळी बसविला होता व मालकाशिवाय कोणी आले नव्हते. त्यावरून तिने तिच्या मालकाच्या पत्नीस फोन करून जरा सावधपणे ही हकीकत सांगितली. मालकिणीने सांगितले की, अलीकडे तो गृहस्थ बराच चिंताग्रस्त दिसत आहे ही गोष्ट खरी. तो आता आठ दिवसांकरता शिकारीस जात आहे, असे म्हणत आहे व त्याकरता एक बंदूक खरेदी करावयास गेला आहे. त्याच्या पत्नीस कल्पना होती की, ती टायपिस्ट उगीच काही सांगणारी मुलगी नव्हती. म्हणून तिने सर्व प्रकारे काळजी घ्यावयाचे ठरवले. तिने आपल्या भावास बोलावून घेतले. तो काय करतो यावर काळजीपूर्वक लक्ष ठेवावयाचे ठरवले. मालक बंदूक घेऊन परत आला व त्यांत गोळ्या वगैरे भरून उद्या शिकारीस जावयाचे असे सांगू लागला. तो बाहेर गेला आहे पाहून तिच्या भावाने बंदुकीतील सर्व गोळ्या काढून घेतल्या व त्याने पेटीत ठेवलेल्या सर्व गोळ्या पण काढून निरनिराळ्या ठिकाणी ठेवल्या. मालक घरी आल्यावर त्याच्यावर काळजीपूर्वक नजर ठेवली तो आपल्या खोलीत गेला व बंदूक भरलेली आहे अशा समजुतीत छातीला नेम धरून घोडा दाबू लागला. त्यात गोळ्या नसल्याने काहीच होऊ शकले नाही. लगेच त्याची पत्नी व तिचा भाऊ यांनी आत येऊन त्याची बंदूक काढून घेतली. पुढे त्याची मानसिक स्थिती फार बिघडली आहे असे तपासणीत सिद्ध झाल्याने त्यास काही दिवस मेंटल हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले. मात्र त्या टेपवर हा निरोप कसा टेप केला गेला ते अखेरपर्यंत गूढच राहिले.

३३. सात वर्षांची आई

दिल्ली येथे एक मुसलमान मुलगी १२–१०–१९२५ रोजी जन्मली. ती सात वर्षांची असताना तिला दिल्ली येथील व्हिक्टोरिया जनाना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले व तिने ७ जुलै १९३२ रोजी चार पौंड तीस औंस वजनाच्या एका बाळास जन्म दिला. ही गोष्ट सर्व तपशिलासह त्या हॉस्पिटलमध्ये नोंदण्यात आली. मात्र त्या मुलीचे व तिच्या आईबापाचे नाव गुप्त ठेवण्यात आले आहे.

३४. काळोखात पाहणारी व क्षणात कोठेही जाऊन येणारी पॉली

१८६६ साली कुमारी पॉली Fancher ही काही कारणाने बेशुद्धीसारख्या अवस्थेत गेली. तिच्या बेशुद्धीच्या काळात तिची नाडी अत्यंत मंद झाली होती. श्वास पण जवळ जवळ थांबला होता. ती अशा रीतीने नऊ वर्षे बेशुद्धावस्थेत होती व विशेष म्हणजे ती वर्षातून एकच वेळ काही खात असे. हे कसे घडत असावे, यासंबंधी डॉक्टर लोकांना मोठे कोडे पडले होते. ती शुद्धीवर आल्यानंतर ते कोडे

उलगडेल असे त्यांना वाटले. परंतु ती शुद्धीवर आल्यावर त्यांचा प्रश्न अधिकच बिकट झाला. तिच्या त्या बेशुद्धीच्या काळात तिच्यात काही विशेष शक्ती प्रगट झाल्या होत्या. ती शेकडो मैलांवर मनाने जाऊन तेथील हकीकती व वर्णने बिनचूक सांगू लागली. अगदी मिट्ट काळोखात कोणत्याही वस्तूचे रंग ओळखू लागली. कोणतेही पुस्तक न उघडता त्यातील पानावरील मजकूर घडाघड वाचू लागली. तिने एके दिवशी डॉक्टराना आलेल्या पत्रातील मजकूर त्यांनी ते पत्र उघडायच्या आत सांगितला व तो शब्दशः बरोबर होता. याप्रमाणे अनेक चमत्कार करीत रुग्णावस्थेत ती जवळ जवळ पन्नास वर्षे राहिली व सन १९४६ साली तिने देहाचा त्याग केला.

३५. दोन हृदये असलेला मनुष्य

आगस्टिनो नावाचा इटालीचा ३७ वर्षे वयाचा एक नागरिक आहे. जगातील एक मोठे आश्चर्य म्हणजे त्याला दोन हृदये आहेत व कदाचित जगातील सर्वात शक्तिमान माणसापैकी तो एक असू शकेल, त्याच्या इतके वजन आजपर्यंत कोणीही उचलू शकलेले नाही. तो मोठे मोठे लाकडी ठोकळे, मालाची लॉरी सहज उचलतो. आपण एखादा कागद फाडावा इतक्या सहजतेने तो टेलिफोन डिरेक्टरी हातात धरून दोन तुकडे करतो. परंतु या सगळ्यांपेक्षा जास्त आश्चर्यकारक म्हणजे त्याला दोन हृदये आहेत त्याचा उलगडा वैद्यकशास्त्रास होऊ शकला नाही. स्टेथॅस्कोपमधून दोन्ही हृदयांचे ठोके मात्र स्पष्ट ऐकू येतात.

३६. नायगारा धबधबा नाहीसा होतो.

तीस मार्च १८४८ रोजी पहाटे दोन वाजता नायगारा धबधब्याचा आवाज लोकांना ऐकू येईनासा झाला. काय झाले व होत आहे ते पाहण्याकरता लोक धावले. त्यांना आढळले की, नायगारा धबधब्यात पाणीच राहिले नव्हते. जेथे शतकानुशतके सतत चोवीस तास पाण्याचा धोधो असा कानठळ्या बसविणारा आवाज ऐकू यावयाचा, तेथे अगदी शांत शांत होते. नदीचे पात्र कोरडे पडले होते. इतकेच काय, परंतु १८१२ साली झालेल्या लढाईत त्या नदीत पडलेल्या तोफा पण दिसत होत्या. हे कोणाच्या ऐकिवात सुद्धा नव्हते. सर्व पाहणारे अगदी थक्क झाले व आता पुढे काय होणार याची चर्चा करू लागले. सर्वांच्या मते आता काही तरी भयंकर घडणार आहे असे वाटू लागले. चोवीस तासपर्यंत ती स्थिती कायम राहिली. त्यानंतर पुन्हा पाणी आले व पूर्वीप्रमाणे वाहू लागले. एप्रिलच्या पहिल्या तारखेच्या मध्यरात्रीस मंद मंद असा आवाज ऐकू येऊ लागला व थोड्याच वेळात नदी पूर्णपणे भरून धबधबा पूर्वीप्रमाणे वाहू लागला. त्यापूर्वी अथवा त्यानंतर असे कधीही घडले नाही व कारण पण कळले नाही. भूकंप वगैरे काही एक नव्हते.

CamScanner

त्याचप्रमाणे १६ डिसेंबर १८११ रोजी मिसीसिपी नदीचा प्रवाह उलट वाहू लागला व पुष्कळ बोटी त्या उलट प्रवाहात काही मैल वर वाहात गेल्या. परंतु त्यास भूकंपासारखे कारण होते व त्यमुळे त्यावेळी बरीच उलथापालथ झाली होती.

३७. विलक्षण दृश्य

कँनडामधील अल्बेटी प्रांतातील ओल्डमन नदीवरील फोर्ट वाल्टा येथील १८७६ मधील हकीकत आहे. डेनी नावाचा एक इसम तेथे रानात शिकार व फिशिंगकरता एक इंडियन गाइड घेऊन गेला होता. ठिकाणावर पोचण्यापूर्वी त्याला एका मोठ्या वादळाने गाठले. तुफानी वारा, पाऊस, विजांचा चकचकाट सुरू झाला. त्याने त्याची लहानशी बोट कशीबशी किनाऱ्यापर्यंत आणली व आसरा पाहू लागला. अशा वाऱ्या–पावसाच्या धुमधडाक्यात त्यास तेथील रहिवाशांच्या वाद्यांचे आवाज ऐकू येऊ लागले. त्याने जंगलातून वाट काढीत काय चालले आहे ते पाहण्याकरता तो कडेला गेला. तेथे पाहतो तो इंडियन लोकांचा एक कँप त्याच्या दृष्टीस पडला. त्याच्याही पलीकडे घोडे शांतपणे चरत असलेले दिसले. तेथील माणसे व घोडे यांना जणू या वादळाची काही दाद वा पर्वा वाटत नसावी असे दिसले. स्त्री–पुरुष, मुले, सणावारांचे कपडे घालून आनंदाने नाचताना बागडताना दिसत होते. त्याला राहून राहून आश्चर्य वाटत होते की, इतक्या भयंकर वादळ व पावसात इतक्या शांत मनाने हे लोक नाचगाणी कशी करीत आहेत या सुमारास त्याचे सर्व कपडे भिजले. ते जरा वाळवावे या उद्देशाने तो थोडा जंगलाच्या आत आला व इतक्यात त्याच्या जवळच एक मोठा विजेचा कडकडाट होऊन तो बेशुद्ध पडला. काही मिनिटांनी तो शुद्धीवर येऊन पाहू लागला तर त्यास ते काहीच दिसेना. तो कँप, ते घोडे, ते स्त्रीपुरुष यांपैकी तेथे काही एक नव्हते. होते काय तर एक मोठें पसरलेले रिकामे शेत. अगदी लांबपर्यंत. तेथे त्यास एकही झोपडी अथवा तंबू दिसेना. तो व त्याचा गाईड यांनी मैलोगणती तपास केला. परंतु कशाचाही तपास लागला नाही. असा एखादा कँप तेथे कधी होता याची कोणी माहिती दिली नाही. त्यास हे शेवटपर्यंत न सुटलेले कोडेच राहिले.

३८. प्रेसिडेंटचे भूत

फिनलंडचे अत्यंत लोकप्रिय व लोकादरास पात्र असलेले प्रेसिडेंट पासिकिव्ही हे हेलेसिंकी येथे १४ डिसेंबर १९५६ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी मृत्यू पावले. ता. १९ एप्रिल १९५७ रोजी सायंकाळी सुमारे ६–३० वाजता हेलसिंकी येथील ६२ मेनेरेहिम स्ट्रीटवरील एका बिल्डिंगमध्ये एक स्त्री तिच्या बहिणीसह शिरली. वर जाण्यासाठी त्या लिफ्टजवळ गेल्या तो त्यांना प्रेसिडेंट पासिकिव्ही लिफ्टजवळ उभे असलेले दिसले. त्या स्त्रिया लिफ्टचा दरवाजा उघडून,

त्यांनी अगोदर जावे म्हणून आदराने वाट पाहात बाहेरच उभ्या राहिल्या. परंतु प्रेसिडेंट म्हणाले की, स्त्रियांनी अगोदर जावे अशी प्रथा आहे. Ladies First, तरी तुम्ही पुढे व्हा. त्याप्रमाणे त्या लिफ्टमध्ये शिरल्या. नंतर ते आत आले. चवथ्या मजल्यावर लिफ्ट थांबला. त्यांनी दरवाजा उघडला नाही. म्हणून त्या स्त्रीने पुढे होऊन तो उघडला. त्या वेळी ते म्हणाले की, स्त्रियांनो, तुम्हाला आश्चर्य वाटत असेल की, या वेळी मी थडग्यात असण्याच्या ऐवजी येथे कसा, परंतु आहे खरा चवथ्या मजल्याचे बटन कोणीही दाबलेले नसताना तेथे लिफ्ट कसा थांबला, हेही एक कोडेच होते. त्या पुढे पाचव्या मजल्यावर राहात असलेल्या त्यांच्या सासूसासऱ्याकडे गेल्या व त्यांना ही हकीकत सांगितली. त्यांनी त्यांना नुसते पाहिले होते, इतकेच नाही तर त्यांच्याशी संभाषण पण केले होते.

३९. आकाशातील दफन

जुलै १८८६ च्या एके रात्री मेरीलँडमध्ये एका घरात काही मुले झोपली होती. दिवस उन्हाळ्याचे असल्याने उकडत होते. खिडक्या उघड्या होत्या व त्यामुळे तारे चमकताना दिसत होते. सकाळी दोनच्या सुमारास त्यातील एका मुलीस जाग आली व तिला खिडकीतून एक चमत्कारिक दृश्य दिसले. आकाशात तिला असे दिसले की, एक शवपेटी जिच्याभोवती अमेरिकन निशाणे गुंडाळलेली होती, अशी एक खणून ठेवलेल्या थडग्यात पुरण्याची तयारी चालली होती. दोन्ही बाजूंस निळा युनिफार्म घातलेले शिपाई उभे होते आणि एक चॅप्लेन एका लहान पुस्तकातून प्रार्थना म्हणत होता. अगदी भर दिवसा दिसावे असे स्पष्ट दिसत होते. त्यानंतर त्या शिपायांनी रायफली उचलून खांद्यावर घेऊन त्यांना सॅलूट दिला. ब्युगल वाजविले. परंतु कशाचाही आवाज मात्र ऐकू आला नाही. आवाजाखेरीज तिने त्यांच्या सर्व हालचाली स्पष्टपणे पाहिल्या. त्यानंतर ती शवपेटी खड्ड्यात टाकली गेली व हळूहळू ते चित्र विरून गेले

दुसऱ्या दिवशी तिने ही हकीकत तिच्या आईवडिलांना सांगितली. त्या वेळी त्यांना प्रथम वाटले की, तिला स्वप्न पडले असावे. परंतु तिने यापूर्वी कधीही मिलिटरी स्मशानयात्रा पाहिली नव्हती तिचे वर्णन इतके तंतोतंत होते की, कोणीही ते प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय सांगता येणे शक्य नव्हते व त्या मुलीनेसुद्धा वारंवार सांगितले की, त्या वेळी ती झोपेत नसून प्रत्यक्ष जागेपणी डोळ्याने पाहात होती.

४०. दगडातून जिवंत प्राणी

सन १८९९ साली अँड्र्यू क्रोन्सी नावाच्या तरुण सायंटिस्टने इंग्लंडधील एकवर्दी या गावात आपल्या शेतावरील जुन्या घरात काही प्रयोग सुरू केले. प्रथम प्रथम त्या खेड्यातील लोकांना त्याचे मोठे कौतुक व कुतूहल वाटले—परंतु तो करीत

असलेले एकंदर प्रकार पाहून त्यांना हा काही तरी भुताखेतांशी संबंध ठेवीत असावा असे वाटू लागले. त्याच्या घरातून विचित्र सूर, विचित्र आवाज वगैरे ऐकू येऊ लागले व त्यावरून त्या गावातील लोकांना त्याच्यासंबंधी संशय वाटू लागला होता. तरी सुद्धा त्याने आपले प्रयोग चालू ठेवले व सन १९०० साली त्याने आपल्या घोषणेने सर्व जगास चकित केले क्रोसीने लंडन इलेक्ट्रिकल सोसायटीला कळविले की, त्याने दगडातून जिवंत प्राणी उत्पन्न करण्यात यश मिळविले आहे. अशा एका केवळ होतकरू तरुण संशोधकाने केलेली ही घोषणा ऐकून सर्व शास्त्रीय जगत चकित झाले त्यांचा विश्वासच बसेना. ते म्हणाले, यात काहीतरी चूक आहे असे होणे शक्य नाही.

क्रोसीला एके दिवशी काही कल्पना सुचली. त्याने एक सच्छिद्र असा दगड घेतला. त्याला स्टोअरेज बॅटरीमधील शिसे अडकवून तो दगड सल्फ्युरिक ॲसिड व सिलिकेट ऑफ पोटयाशच्या मिश्रणात टाकला व त्या विषारी द्रव्यात विजेचा प्रवाह सोडला; चवदाव्या दिवशी त्याला त्यात काही जंतूसारखे दिसू लागले. अठराव्या दिवशी ते आकार धरू लागले आहेत असे त्यास दिसू लागले व अठ्ठाविसाव्या दिवशी त्याच्या आश्चर्यास सीमा नाही त्या प्राण्यांनी आकार धारण केला असून, आपल्या शेपटाच्या आधारे हालचाल करीत असलेले दिसून आले. तिसाव्या दिवशी आपले पाय हलवू लागले. काही दिवसानंतर ते प्राणी त्या दगडापासून सुटे होऊन स्वतंत्रपणे फिरू लागले होते. काही आठवड्यानंतर त्यातील शंभर प्राण्याची त्याने दुर्बिणीतून पाहणी केली. त्यांचे जगातील कोणत्याही प्राण्याशी साम्य नव्हते. लहान प्राण्यांना सहा पाय हे ते व मोठ्यांना आठ. ते सुमारे आठवडाभर जिवंत होते. मग ते मेले. त्याला वाटले की, त्याने प्रयोग केलेला दगड सच्छिद्र असल्याने कदाचित हे प्राणी त्यास सूक्ष्म स्वरूपात असू शकतील

म्हणून त्याने नंतरच्या प्रयोगात दगड वगळून ऑक्साईड पॉवडर्स व ॲसिड-मध्ये प्रयोग केले. त्याने भांडी स्टरलाईज करून त्यात त्या वस्तू ठेवून एअरटाईट करून त्यात इलेक्ट्रिक करंट सोडला. त्यायोगे पूर्वीपेक्षा जास्त जंतू तयार झाल्याचे त्याला आढळून आले. त्याच्या त्या झोपडीवजा घरात नामांकित शास्त्रज्ञ आले व फॅरेडेसारख्या शास्त्रज्ञाने त्याने अशा प्रकारे जंतू उत्पन्न केले आहेत व होऊ शकतात यास मान्यता दिली. इंग्लंड वगैरे देशांमधील शास्त्रज्ञ येऊन त्याचे प्रयोग खरे असल्याचे सांगू लागले तर काही प्रख्यात शास्त्रज्ञ केवळ असे होणे शक्य नही असे म्हणून त्याने केलेले प्रयोग न पाहताच त्याला विरोध करू लागले. शास्त्रज्ञांच्या संस्थेने त्यास मान्यता देण्याचे नाकारले. ही सर्व वादावादी चालू होती तरी क्रोसी आपले प्रयोग करीतच होता. पुढे १९०३ साली त्याच्या लॅबोरेटरीत आग लागली व आपल्या प्रयोगाचे कागद वाचविण्याच्या प्रयत्नात तोही जळून मेला व या सर्व प्रकरणावर पडदा पडला तो अद्याप कायम आहे.

४१. जोडे ठेवण्याची पेटी

अमेरिकेतील आयोवा येथील जेम्स वार्ड नावाच्या इसमास लागोपाठ तीन दिवस एकच स्वप्न पडत होते. ६ एप्रिल १९६२ रोजी त्यास स्वप्न पडले की, एक जोडे ठेवण्याची पेटी जळत आहे. रोज रोज पडणाऱ्या या स्वप्नाचा त्यास उलगडा होईना. त्याला वाटले की, काहीतरी अशुभ घडणार आहे त्याची ही पूर्वसूचना आहे. त्या वेळी त्याच्या डोक्यात असे घोळत होते की, घर गहाण टाकून तीन हजार डॉलर्सचे कर्ज काढावे व एक ट्रक घ्यावा. परंतु असे करण्यात त्याला गेली दहा वर्षे करीत असलेली नोकरी सोडावी लागणार होती म्हणून त्याला प्रश्न पडला होता, शिवाय कर्ज मिळते की नाही, याची पण चिंता होतीच.

ता. ६–४–१९६२ रोजी त्याच्या मालकाने त्यास एक काम सांगितले. त्याने एक जुने गोडाऊन घेतले होते व त्यात बराच केरकचरा पडला होता. तो साफ करून दुसऱ्यास स्वच्छ अशा स्थितीत भाड्याने देणे होते. म्हणून त्याने जेम्सला सांगितले की, कसेही करून सायंकाळच्या आत सर्व कचरा जाळून ते गोडाऊन नीटनेटके करून ठेव. कचरा साफ करताना त्यात तुला काही सापडले अगर स्वतःकरिता ठेवावेसे वाटले तर ठेवून घे. परंतु कोणत्याही परिस्थितीत सायंकाळपर्यंत साफ झालेच पाहिजे. निरनिराळ्या प्रकारच्या शेकडो जिनसा केरकचऱ्यात ढीग करून पडल्या होत्या, त्या सर्व एका बाजूस काढून जाळून एका दिवसात साफ करणे मोठे जिकिरीचे काम होते. परंतु जेम्सला याची सवय होती. अकरा वाजण्याच्या आत त्याने सर्व केरकचरा काढून जाळून ती जागा स्वच्छ करून ठेवली. सर्व सामान काढीत असता त्याला एक कार्डबोर्ड पेटी व त्यात लहान लहान बॉक्सेस असलेली अशी आढळली. इतर सामानासोबत तो ही पेटी सुद्धा जळणाऱ्या ढिगाऱ्यात टाकण्याच्या बेतात होता. त्याला आठवले की, स्वप्नात रोज दिसणारी पेटी ती हीच. म्हणून त्याने ती न जाळता बाजूस ठेवली. त्याने ती मोठी पेटी बाजूस ठेवून आतील लहान बॉक्सेस बाहेर काढण्यास सुरुवात केली. त्यात त्याला स्वप्नात दिसलेली शू बॉक्स (जोड्यांची खोकी) पण दिसली, ते त्याने बाजूस काढले. उघडून पाहता त्यास ८७०० डॉलर्सच्या नोटा सापडल्या. त्या वेळी त्याला ते स्वप्न उलगडले व त्याचा प्रश्न पण सुटला.

४२. हुकमी कोडी सोडविणारी एटा हिल्मन

१९४७ पासून न्यूयॉर्कमधील जॉन व एटा हिल्मन यांना असा अनुभव आहे की, त्यांना ज्या वेळी पैशाची अगर एखाद्या किंमती वस्तूची आत्यंतिक गरज असेल त्या त्या वेळी आणि त्या वेळीच मात्र तत्संबंधी कोड्यांची उत्तरे एटा हिल्मन हिला वरचेवर सुचत व ती पहिले बक्षीस पटकावीत असे. एकदा ती गरोदर होती व तिला जन्मास येणाऱ्या अपत्यासाठी एका रेफ्रिजरेटरची जरूरी होती एका

कॉन्टेस्टमध्ये रेफ्रिजरेटर पहिले बक्षीस म्हणून ठेवले होते. तिच्या नवऱ्याने तो फार्म एटाकडे आणला व त्याची उत्तरे सुचविली. त्यावर तिने थोडा विचार करून सांगितले की, नाही, ही उत्तरे त्यांना पटणार नाहीत. असे सांगून थोडा विचार करून त्या जागी तिन निराळे शब्द सुचविले व त्यांना पहिले बक्षीस म्हणून रेफ्रिजरेटर मिळाला. याप्रमाणे १९४८–४९–५० मध्ये ज्या ज्या वेळी खरी गरज लागली, त्या त्या वेळी तिने कोडी भरली व तिला पहिले बक्षीस मिळत गेले. या तीन वर्षांत तिने १६ कोडी जिंकली. १९५० साली तर त्यांनी एक मोटारगाडी जिंकली. १९५१ साली एका कोड्यास मिंक कोट पहिले बक्षीस म्हणून होता. एटाने थोडा विचार करून सांगितले, जॉन, आपण हे कोडे हरणार. कारण अशा कोटाची आपणास गरज नाही व तसेच झाले. यावरून त्यांची खात्री झाली की, खरी गरज असेल त्या वेळी कोड्यासंबंधी योग्य संवेदना येऊ शकतात. १९५५ मध्ये त्यांनी एक कोडे सोडविले व घरात कार्पेटची जरूर होती ते मिळविले. १९५६ मध्ये एक पेड अप पॉलिसी मिळविली. १९५७ साली दोन पहिली बक्षिसे मिळविली. त्यात बरेच एकर जमीन व दहाहजार डॉलर रोख असे मिळाले. ते त्यांनी मुलाच्या शिक्षण फंडात टाकले. १९५९–६० मध्ये त्यांना चार पहिली बक्षिसे मिळाली, त्यापैकी एकामुळे एक घर मिळाले. यापुढे त्यांनी निश्चय केला अगदी खरोखर आत्यंतिक गरज असेल तरच या सिद्धीचा उपयोग करावयाचा व त्याप्रमाणे ते वागले. १९६७ साली त्यांना बरीच मोठी रक्कम मिळाली व त्यायोगे त्यांच्या म्हातारपणाची सोय झाली; एटा हिने आजपर्यंत अशा ५१ कॉन्टेस्टस जिंकल्या आहेत.

४३. हरविलेल्या वस्तू नाकाने शोधून देणारा कॉनी

अटलांटामधील कर्नार्ड जोसेफ (कॉनी) यास एक विशेष सिद्धी आहे. एखादी जिन्नस हरविलेली असली व त्यास त्यासंबंधी साधारण जागा दाखविली तर तो आसपासची जागा हुंगतो व ती वस्तू किती का अडगळीत पडलेली असेना. हुडकून देतो. एकदा एका हॉटेलमध्ये गेले असता मीरा नावाच्या स्त्रीच्या हातातील अंगठीतील हिरा निखळून पडला व अगदी लहान जिन्नस असल्याने काही केल्या सापडेना कॉनी यास बोलावणे पाठविले. तो थोडा इकडे तिकडे गेला व लिफ्टजवळ जाऊन थांबला व तेथील एका फटीतून हिरा काढून दिला. पुष्कळ वेळा त्याची परीक्षा पाहण्याकरता त्याचे मित्र एखादा जिन्नस लपवून ठेवीत व हा नाकाने हुंगून बरोबर काढून देई. एकदा एका स्त्रीच्या ब्लाऊजमधून एक हिऱ्याचे बटन काढून एका बुटात लपविले. कॉनीला बोलावून विचारण्यात आले, तो काही मिनिटे थांबला व चालत एका स्त्रीकडे जाऊन तिला तिच्या डाव्या पायातील स्लीपर काढण्यास सांगितला. तेथेच तो होता एकदा एका फ्लॉवर पॉटमध्ये एक जिन्नस लपविण्यात आला होता. तो त्याने न अडखळता ताबडतोब दाखवून दिला.

एकदा एका गृहस्थाचे वडील एकाएकी वारले. त्यांनी एका टिनमध्ये काही डॉलर्स व महत्त्वाचे कागदपत्र ठेवले होते, ते काही केल्या सापडत नव्हते. कॉनी यास तेथे नेण्यात आले. त्या जुन्या घरात तो सर्वत्र हिंडला. तो एका दगडाजवळ थांबला व तो लोटून बाजूस केला. आतल्या बाजूस तो डबा व त्यात थोडे डॉलर व कागदपत्र होते. १९६३ मध्ये एक वेळ त्यास विचारणा करण्यात आली की, एक जुनी चामड्याची पिशवी असून त्यात काही सोन्याचे डॉलर आहेत. तो त्या वाड्याच्या पडक्या भिंतीकडे गेला व खिडकीची एक जुनी चौकट काढली. तिच्या खाली भिंतीत एक खड्डा असून त्यात ती बॅग सापडली. परंतु श्रमाच्या मानाने लाभ फारसा झाला नाही.

४४. केवळ अतींद्रिय शक्तीने झालेली एका मुलीची सुटका

शिकागो शहरातील एका जवाहिऱ्याकडे श्रीमती फिशर नावाची सुमारे पन्नास वर्षे वयाची स्त्री नोकरीस होती. ता. २२ डिसेंबर १९५५ रोजी मिसेस फिशर ही नुकतीच लंचहून परत आली. येऊन पाहते तो त्या दुकानांतील सर्व मंडळी गोंधळलेल्या व घाबरलेल्या मनःस्थितीत आढळली. एका गिऱ्हाइकाची तीन वर्षांची मुलगी मॅट्रिका सर्वांची नजर चुकवून खेळत खेळत त्या फर्मच्या जवाहीर ठेवण्याच्या उघडे असलेल्या मोठ्या तिजोरीत गेली व तिचे दार ती आत जाताच लागले गेले. मॅनेजर व मालक दोघेही बाहर गेले होते. ते कोठे गेले होते याची कोणासच माहिती नव्हती. मात्र त्यांपैकी कोणीही काही तास तरी परत येणार नाहीत म्हणून सांगून गेले होते. ती तिजोरी कशी उघडावयाची याची माहिती त्या दोघांनाच होती. काही विवक्षित अक्षरे जुळवून नंतरच ती उघडता येणे शक्य होते. ती तिजोरी अत्यंत मजबूत असल्याने ती फोडून त्या मुलीस बाहेर काढावयाचे तरी काही तास लागले असते. ती हवाबंद असल्याने प्रत्येक क्षणागणिक त्या मुलीच्या जिवास धोका वाढत होता व ती मुलगी आत रडत असल्याचे तिजोरीस कान लावणाऱ्यास ऐकू येत होते. फायरमेन बोलावले होते. परंतु त्यांचे मत पडले की, शिकस्तीचा प्रयत्न करून सुद्धा ती तिजोरी उघडावयास इतका वेळ लागेल की तोवर ती मुलगी गुदमरून जाईल. अशा वेळी काय व कसे करावे अशा विवंचनेत सर्व असता त्यावर श्रीमती फिशर म्हणाल्या, थोडे थांबा, मी combination शोधून काढण्याचा प्रयत्न करते. त्यावर इतर कर्मचारी म्हणाले की, ते कसे शक्य आहे. त्याची माहिती त्या दोघांसच आहे. त्यांवर ती म्हणाली कसे काय ते मला माहीत नाही, मी कधी अशी तिजोरी उघडलेली नाही. परंतु मला वाटते की उघडू शकेन. तिने Tumbler हातात घेतले व डायल उजवीकडे पाच वेळा फिरविली. नंतर एक दीर्घ श्वास घेतला व ३२ या आकड्यापाशी थांबली. नंतर पुन्हा डोळे मिटले. डायल डावीकडे दोन वेळा फिरविली व १८ वर थांबली. पुन्हा एकदा डोळे उघडून कुलुपाकडे पाहिले व हळूच उजवीकडे

फिरविले. ते ०१ वर थांबले. एक मोठासा आवाज झाला व एका क्लार्कने लोटून पाहता ते दार उघडले व ते मूल बाहेर पडले. इकडे फिशर यांना अतिश्रमाने फार थकवा आला होता व डोळ्यांतून अश्रू पण आले होते. तिला जेव्हा विचारले, हे कसे घडले, त्यावर ती म्हणाली की, त्याची मला काहीही माहिती नाही. फक्त मला स्फूर्ती आली की मी प्रयत्न करावा व मला यश येईल. त्याप्रमाणे झाले. ते कसे झाले याचा खुलासा आजपर्यंत कधीच होऊ शकला नाही.

४५. एका लहानशा खोलीत गायब झालेला मुलगा

बाल्टिमोरमधील मेरीलँड येथे रुबेन अंडरस्टन नावाचा एक दहा वर्षांचा शाळकरी मुलगा होता. तो राहात होता त्या (बिल्डिंगचे चवथ्या मजल्यावर) जागेत एक पोटमाळ्यासारखी लहानशी खोली होती. त्या जागेत रुबेन याला काही तरी भयंकर दिसले म्हणून तेथे जावयाची त्याला अत्यंत भीती वाटावयाची व तेथे काही नसताना हा काय म्हणून निष्कारण घाबरतो याची त्याचा भाऊ, बहीण व इतर मित्रमंडळी यांना गंमत वाटावयाची. म्हणून त्यांनी त्यास खूप चिडविले; नावे ठेवली. तरी तो बधेना म्हणून तो आरडत ओरडत असता व जिवाच्या आकांताने गयावया करीत असता त्या सर्वांनी त्यास ढकलीत तेथे नेले व बळजबरीने आत कोंडले. त्याने खूप धडपड केली व त्याच्यातून सुटण्याचा प्रयत्न केला. परंतु ते संख्येने पुष्कळ असल्याने त्यांनी ढकलीत ओढीत तेथपर्यंत नेऊन आत पक्के कोंडले व बाहेर थट्टा–मस्करी करीत उभे राहिले. तो आत सारखा आक्रोश करीत होता व हे बाहेर थट्टामस्करी करीत हसत होते. नंतर तो म्हणू लागला की, मला नेऊ नका; मला जाऊ द्या. त्यानंतर त्याने दारावर धक्के व लाथा मारल्या व शेवटी एक हृदयद्रावक किंकाळी फोडली व मग सर्वत्र शांत झाले. बाहेरची मंडळी एकमेकांकडे पाहू लागली. त्यांना कळेना की, रुबेन हा आपणास बनवीत आहे का त्यास खरोखरीच काही झाले आहे. त्यांनी त्याला हाका मारल्या. परंतु काही उत्तर आले नाही. बराच वेळ झाला तरी उत्तर आले नाही. इतक्यात रुबेनची आई आली व रुबेन कोठे आहे म्हणून विचारू लागली. तिला सर्व हकीकत कळल्यानंतर तिने तो पोटमाळा उघडून पाहिला. तेथे रुबेन नव्हता ती म्हणू लागली की माझा रुबेन कोठे आहे सर्व मुले आत गेली व शोधाशोध करू लागली. त्यांना फक्त त्याचे काही कपडे सापडले. सर्वांसमक्ष रुबेन नाहीसा झाला होता. शेजारीपाजारी, पोलीस वगैरे सर्व आले. त्यांनी तो माळा मजल्यासह सर्व बिल्डिंग व आजूबाजूची प्रत्येक फर्लांग जागा इंच न इंच तपासली. परंतु रुबेनचा तपास लागला नाही. सर्वांच्या देखत तो कसा नाहीसा झाला हे अद्यापि एक कोडेच आहे

४६. हृदय व लिव्हर खाणारी चेटकीण

बरीच जुनी गोष्ट आहे. त्या काळी जादू करणाऱ्या स्त्रियांस (Witches)

जाळून किंवा हाल हाल करून मारीत. अशीच एक समक्ष पाहिलेली हकीकत Pore Labet यांनी आपल्या अमेरिकेकडे जाणाऱ्या बोटीतील दिली आहे. आफ्रिकेतील एका नीग्रो स्त्रीवर आरोप होता की, ती जादूने माणसाच्या शरीरातील हृदय, लिव्हर यातील मांस शोषून खाते.

त्या बोटीवरील सर्जन मेजर तिला विनाकारण चाबकाने मारीत असे. एके दिवशी ती त्यास बोलली की, ज्या अर्थी तू माझा विनाकारण छळ करीत आहेस त्या अर्थी आज रात्री मी तुझे हृदय व लिव्हर शोषून घेईन. दुसऱ्या दिवशी तो बिछान्यातच मेलेला सापडला. त्याच्या उत्तरीय तपासणीत असे सापडले की, त्याचे हृदय व लिव्हर दिसावयास शाबूत होते परंतु त्याच्या आतील सर्व मासाचा भाग नाहीसा झाला होता. आता मात्र त्या बोटीवरील सर्व लोकांस अत्यंत भीती वाटली व त्यांनी तिला तिच्या ठिकाणी परत नेऊन सोडण्याचे कबूल केले; त्या वेळी त्या बोटीवरील कॅप्टनने हा चमत्कार तू कसा करतेस ते दाखव म्हणून सांगितले. ती म्हणाली की. बोटीवर काही फळे आहेत काय ? त्याने सांगितले की, काही कलिंगडे आहेत. त्यांपैकी काही तिने समोर मागविली व कॅप्टनला सांगितले की, ही सर्व एका पेटीत बंद करून ठेव. त्याप्रमाणे त्यांनी ती सर्व मोठया बंदोबस्ताने एका पेटीत बंद करून तीस कुलूप लावले व ती पेटी एका केबिनमध्ये ठेवून तीसही कुलूप लावून दोन्ही चाव्या आपल्या जवळ ठेवल्या दुसरे दिवशी तिने ती पेटी उघडून पाहण्यास सांगितल्यावरून उघडून पाहाता ती सर्व कलिंगडे तर सर्व तशीच होती. त्यावरून कॅप्टन म्हणाला की, हे काय, कलिंगडे तर सर्व तशीच आहेत. त्यावर ती म्हणाली की, ती हातात घेऊन पाहा. हातात घेऊन पाहाता त्यांची वरील टरफले शिल्लक असून आतला सर्व गाभा नाहीसा झालेला आढळला. ते पाहून बोट फिरवून तिला तिच्या ठिकाणी नेऊन सोडण्यात आले.

४७. अदृश्य होणारे जेवणघरातले सामान

ही सुद्धा एका बरीच जुनी परंतु विलक्षण हकीकत आहे. फादर Sinistrari यांनी आपल्या डायरीत समक्ष पाहिलेली हकीकत म्हणून नमूद करून ठेवलेली आहे. इटलीमधील फव्हिया येथील सन १७०१ मधील ही हकीकत आहे. तेथे Hicrongma या नावाची एक अत्यंत धार्मिक प्रवृत्तीची स्त्री होती. तिने व तिच्या नवऱ्याने एकदा मिलिटरीमधील काही स्नेह्यांना जेवणाचे आमंत्रण दिले होते. सुमारे आठ-दहा मंडळी जमली होती. त्याच्या जेवणाच्या खोलीत एक जुनेसे टेबल—त्यावर एक पांढरी चादर अंथरलेली असून त्यावर जेवणाचे पदार्थ, काटे-चमचे हातरुमाल वगैरे ठेवलेले होते. जमलेली मंडळी बाथरूममध्ये हात वगैरे धुण्याकरिता गेली व परत येऊन पाहातात तो काय, त्या खोलीतील टेबल वगैरे सर्व सामान अदृश्य झालेले दिसले व तो हॉल स्वच्छ धुऊन ठेवल्यासारखा मोकळा दिसत होता. पाहुणे मंडळी

चकित होऊन आता काय करायचे म्हणून पाहू लागली. त्यातील एक जण जरा जास्त चिकित्सक होता. त्याला वाटले की, हा काहीतरी नजरबंदीचा प्रकार असावा म्हणून त्याने हातात एक काठी घेऊन ती स्वतःभोवती सर्व खोलीभर हिंडून फिरविली. परंतु ती हवेत फिरावी तशी सर्वत्र कोणताही अडथळा न येता फिरावी तशी फिरली त्यावरून सर्वांनी विचार केला की, येथील जेवण तर बुडाले आहेच पण निदान घरचे तरी बुडवावयास नको म्हणून ते जावयास निघाले. परत ते रस्त्यापर्यंत येतात न येतात तोच त्यांना हॉलमध्ये मोठमोठे आवाज येत आहेत असे ऐकू आले. म्हणून ते काय आहे ते पाहण्याकरता परत येऊन पाहातात तो त्या हॉलमध्ये मध्यभागी एक मोठे राजेशाही असे जेवणाचे टेबल असून त्यावर त्यांनी कधीही न खाल्लेले असे अनेक पदार्थ मांडून ठेवलेले होते. त्याचप्रमाणे उंची थाळ्या, काटे, चमचे, हातरुमाल वगैरे सर्व साहित्य व्यवस्थित मांडलेले दिसले. तो सर्व प्रकार पाहून ते अन्न खावे की कसे याचा त्या सर्वांना विचार पडला. परंतु घरमालकाने खात्री दिल्यावर त्या सर्वांनी ते चविष्ट अन्न यथास्थित पोटभर खाल्ले व जेवण झाल्यावर हात वगैरे धुऊन स्वच्छ करण्याकरता परत बाथरूममध्ये गेले. परत येऊन पाहातात तो ते सर्व अदृश्य झाले असून त्याच्या जागी ते आले त्या वेळचे साधे टेबल व त्यावर पूर्वी मांडलेले साधे अन्न, काटे, चमचे वगैरे त्यांना दिसले. अर्थात आता त्यांना खाण्याची कसलीच इच्छा राहिली नसल्याने त्यांपैकी काही एक न खाताच परंतु झाल्या प्रकाराबद्दल स्वतःशीच आश्चर्य करीत घरोघर परत गेले.

४८. लाहिरी व त्यांचे सद्‌गुरू बाबाजी

यासारखीच परंतु थोडी निराळी अशी एक हकीकत Autobiography of a Yogi (Jaico 1969) या पुस्तकात पान ३२३ वर आढळते. वाचकांच्या माहितीकरता ती थोडक्यात येथे देतो. यातील योगी म्हणजे परमहंस योगानंद. त्यांचे गुरू श्रीयुक्तेश्वर व त्यांचे गुरू श्रीलाहिरी यांची ही हकीकत आहे. त्यांचे गुरू श्री बाबाजी जे आज अनेक शतके हिमालयात वास्तव्य करून असतात व योग्य आणि सत्पात्र अशा व्यक्तींना क्रियायोगात मदत करतात. या सर्वांच्या बाबतीत एक गोष्ट सांगावयाची म्हणजे प्रत्यक्ष शरीर धारण करून प्रकट झालेल्या त्यांनी या व्यक्तींपैकी कोणासही नुसता स्पर्श करण्याचा प्रयत्न केला तर—एक तर त्याला ते करणे शक्य होणार नाही व स्पर्श करू शकलेच तर लागलीच त्यांचे सत्यात रूपांतर होईल. यामुळे श्री लाहिरी महाशय यांनी सांगितलेली खालील हकीकत कितीही चमत्कारिक व असंभाव्य वाटली तरी त्यातील प्रत्येक अक्षर संपूर्ण सत्य आहे हे धरून चालावे. संभाव्य-असंभाव्य या गोष्टी आपणासारख्या सामान्य व्यक्तीस; त्यांना सर्वच शक्यतेच्या कोटीतील. श्री लाहिरी यांनी त्यांच्या बाबतीत घडलेली हकीकत थोडक्यात दिली आहे.

सन १८६१ मधील गोष्ट आहे. लाहिरी महाशयांची बदली दाणापूरहून राणीखेत येथे झाली होती. ते एका मिलिटरी खात्यात अटेंडंट होते. ते एकदा फिरत फिरत जंगलात बरेच लांब गेले व तेथेच अंधार पडला. अंधार पडला असल्यामुळे काय करावे हे सुचेनासे झाले. म्हणून तेथेच कोठेतरी राहण्यासाठी जागा मिळते की काय म्हणून पाहण्याकरिता, त्यांना गुहेसारखे काही दिसले म्हणून ते तिकडे गेले. तेथे जाऊन पोहोचताच त्यांचे एका संन्याशाने स्वागत केले व हिंदीत म्हणाला, लाहिरी, तू आलास ! मी तुझी किती वर्षांपासून वाट पाहात आहे. लाहिरी महाशयांना अत्यंत आश्चर्य वाटले की, मला नावाने हाक मारणारे येथे कोण असावे ! तो म्हणाला की, आत ये, थोडी विश्रांती घे. आत शिरल्यावर त्यांनी विचारले, ' लाहिरी, तुला ही जागा ओळखीची वाटते काय ? ' त्यावर लाहिरी म्हणाले की, आता अंधार पडत आहे. मला उद्या सकाळी कामावर हजर व्हावयाचे आहे. करिता परत गेले पाहिजे. त्यावर तो संन्यासी अस्खलित इंग्रजीत बोलला ऑफिस तुझ्याकरता आहे. तू ऑफिसकरता नाहीस. तुला कल्पना नसेल की, तुझी बदली, मी करविली व सायंकाळी तू फिरत येथे यावेस ही योजना माझीच ! तू आता कार्य पूर्ण करण्याकरता आला आहेस. ते पूर्ण होईपर्यंत तुला परत जाता येणार नाही. असे म्हणून त्यांनी त्यांच्या कपाळावर हात लावला तत्क्षणीच त्यांच्या सर्व पूर्वस्मृती जागृत झाल्या. त्या सर्व वस्तूंची व त्या स्वामींची त्यांना ओळख पटली. ते म्हणाले की, क्षमा करा. तुम्ही माझे परमपूज्य गुरू बाबाजी आहात हे मी आता जाणले आहे व या जागेची पण ओळख पटली आहे. येथे मी पुष्कळ वर्षे काढली आहेत असे म्हणून श्रीबाबांच्या पायांवर लोळण घातली.

बाबाजी म्हणाले, ' तीस वर्षे मी तुझी वाट पाहात आहे. शेवटी मीच तुला येथे बोलावून घेतले. तू माझ्यापासून दूर होतास तरी माझ्या दृष्टीआड कधीच नव्हतास. तुझ्या जन्मापासून मी सारखा तुझा पाठलाग करीत आहे. या बघ, येथे तुझ्या सर्व वस्तू जपून ठेवल्या आहेत. तुझी मला थोडी शुद्धी करणे आहे. याकरिता कमंडलूतील तेल तू पी व नदीकिनारी जाऊन पड. '

त्याप्रमाणे करताच त्या बर्फमय वातावरणातसुद्धा त्यांना गरम वाटू लागले. थंड वादळी वारे वाहत होते. रात्रीचा अंधाकार मी म्हणत होता. वाघासारखी क्रूर श्वापदे आजूबाजूने हिंडत होती. परंतु त्यांना ना कशाचा त्रास होता अथवा भीती वाटत होती. फक्त एकच विचार वारंवार सुख देत होता व ती म्हणजे सद्गुरूंची झालेली भेट. रात्रीचे तासामागून तास गेले. मध्यरात्रीची वेळ असावी, त्यांना माणसाची पावले ऐकू येऊ लागली. त्या अंधारात त्यांना कोणीतरी येऊन हात धरून उठविले. व त्यांना कोरडे कपडे दिले. म्हणाला की, मित्रा चल. सद्गुरू तुझी वाट पाहात आहेत त्या जंगलात थोड्या लांबवर एक उजेड दिसू लागला. त्यावर लाहिरी म्हणाले की हा सूर्योदय होत आहे काय ? त्यावर त्यांचा मार्गदर्शक

म्हणाला की ते कसे शक्य आहे ? आताशी कोठे मध्यरात्र होत आहे. तो म्हणाला की बाबाजींनी तुझ्याकरता एक रत्नखचित महाल तयार केला आहे. त्याचा हा उजेड आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी तू अशी इच्छा प्रदर्शित केली होतीस की, राजवाड्यात काय काय चैनी असतील त्या उपभोगावयास मिळाव्यात. सद्‌गुरूंनी तुझी ती इच्छा पूर्ण करण्याकरिता हा राजवाडा उत्पन्न केला आहे. कारण साधकाच्या अतृप्त इच्छा पूर्ण होईपर्यंत त्यास क्रिया—योगात प्रवेश करता येत नाही. श्रीसद्‌गुरूंचे तुझ्यावर अप्रतिम प्रेम आहे. म्हणून तुझी इच्छा ते आता पूर्ण करीत आहेत. लवकरच ते दोघे स्वर्णरंगात चमचमत असलेल्या त्या महान राजवाड्याजवळ पोचले. त्याच्या सर्व भिंती रत्नजडित होत्या. बगिचे, पाण्याचे हौद वगैरे सर्व होते. आत शिरताना लागणाऱ्या कमानींच्या भिंतीत मोठमोठे हिरे-माणिक-पन्ने इ. चें जडावाचे काम केलेले होते. व दरवाज्यास जडविलेल्या माणकांचा लाल प्रकाश पडलेला होता. त्या मार्गदर्शकाने लाहिरींना सांगितले की, तुझी राजवाड्यात राहण्याची इच्छा पुरी करून घे. त्यावर त्यांनी विचारले की, बाबाजींना काही तासांत अशा जंगलात असा रत्नखचित राजवाडा उभा करणे कसे शक्य झाले आहे ? त्यांनी सांगितली की बाबाजी हे सृष्टिकर्त्या ईश्वराशी तद्रूप झालेले असल्याने त्यास कोणत्याही क्षणी काहीही करणे अशक्य नाही. त्यांच्या मनात विचार यावयाचा अवकाश की लागलीच तो विचार स्वरूप धारण करून प्रकट होतो. त्यांच्या विचारांचे हे केवळ एक स्वरूप आहे. ज्याप्रमाणे स्वप्नात आपण पुष्कळ पदार्थ उत्पन्न करतो त्याचा उपभोग घेतो, पण जागृती येताच ते सर्व नाहीसे होतात. पण बाबाची जागृतीतच आपल्या विचारशक्तीस मूर्त स्वरूप देऊ शकतात. त्यांना हवा तो जिन्नस वाटेल त्यावेळी उत्पन्न करून नाहीसा पण करू शकतात. असे बोलत असता ते त्या राजवाड्याच्या मुख्य हॉलमध्ये आले.

त्यांना तेथे मध्यभागी एका रत्नजडित सुवर्णसिंहासनावर श्रीबाबाजी स्वस्तिकासन घालून बसलेले आढळले लाहिरींनी वाकून त्यांना नमस्कार केला. बाबाजी त्यांना म्हणाले की तुझे राजवाड्यात राहण्याचे व पाहण्याचे स्वप्न अद्याप कायम आहे काय ? तुझ्या सर्व प्रापंचिक इच्छा आता पूर्ण होणार आहेत. लाहिरी महाशयांना उठवून ते म्हणाले की वत्सा ऊठ व क्रियायोगाची दीक्षा घे. बाबाजींनी आपला हात लांब केला व तेथे एक यज्ञकुंड अग्नीसह प्रकट झाले. व पूजेस लागणारी फुले फळे बाजूस ठेवलेली आढळली. सकाळीच सर्व दीक्षाविधी पार पडला. हे सर्व राजवाडाभर हिंडले व तेथील अमाप संपत्ती, रत्ने वगैरे पाहिली. बाबाजींच्या भोवती त्यांचा शिष्यगण होता. ते म्हणाले की लाहिरी तुला भूक लागली असेल. जरा डोळे मीट. त्यांनी तसे करताच तो राजवाडा वगैरे सर्व नाहीसे झाले व परत आपल्या गुहेत इतर शिष्यांसमवेत बाबाजी बसलेले आहेत असे आढळले. त्यांनी त्यांचा रिकामा कमंडलू लाहिरींना दिला व सांगितले की तुला काय हवे ते यातून खा. त्यात हात

घालताच त्यांना त्यांनी इच्छेलेले सर्व पदार्थ त्यातून मिळाले. व ते त्यांनी खाल्ल्यावर त्यांना पाणी पिण्याची इच्छा झाली. त्याबरोबर त्या कमंडलूतील अन्न नाहीसे होऊन त्यातून त्यांना अमृतोपम असे थंड पाणी प्यावयास मिळाले.

एक लहानसा भाग या संदर्भात बसतो म्हणून मी येथे वाचकांच्या माहितीकरिता दिला आहे. असे त्या पुस्तकात प्रत्यक्ष घडलेले असे अनेक चमत्कार दिले आहेत जिज्ञासू वाचकांनी ते पुस्तक जरूर सर्व वाचावे. वाचकास त्यात हिताचे व मार्गदर्शक असे पुष्कळ आढळेल. पुस्तक Pocket edition ते बरेच दिवस अनुपलब्ध होते. आता जायको पब्लिशिंग हाऊसने ते पुन्हा १९६९ साली छापून प्रसिद्ध केले आहे. वाचकांचे माहितीकरिता सांगावेसे वाटते की, ते बाबाजी आज अनेक शतके हिमालयात वास करीत असून ज्यांना आध्यात्मिक मार्गदर्शन हवे असेल व ज्यांची पात्रता आहे त्यांना मार्गदर्शन करीत असतात. श्री. योगानंदांचे नावाने बिहारमधील रांची येथे एक योगाश्रम चालविण्यात येत असून तेथे क्रियायोग शिकविण्यात येतो. असाच आणखी एक चांगला योगाश्रम श्रीसत्यानंद यांनी बिहारमध्ये मोंघीर येथे चालविला आहे. इच्छुक व्यक्तींनी त्याचा जरूर लाभ घ्यावा.

‘ वैतरणेच्या ऐलतिरी ’ या पुस्तकात मी एका बैलाची हकीकत दिली आहे. त्यामुळे त्यासंबंधी या ग्रंथात काही विवेचन आणण्याचा माझा विचार नव्हता. परंतु या ग्रंथाच्या सर्वच वाचकांनी ते पुस्तक वाचले असेल असे नाही. त्यामुळे थोडा द्विरुक्तीचा दोष पत्करूनही ती माहिती संक्षिप्त रूपाने का होईना खाली देत आहे. कारण त्याचा विषय मानवी जिज्ञासेस खूपच चालना देणारा आहे.

मुंबई येथील फोर्ट, दादर, कुर्ला यासारख्या भागात किंवा पुणे येथे पर्वती उद्यान, डेक्कन जिमखाना अथवा नाशिक येथे सर्कल सिनेमा, पंचवटीसारख्या भागात एक बैल व त्याच्याभोवती बरीच मंडळी कोंडाळी करून बसलेली आढळतात. असे कोठे आढळले तर मुद्दाम तेथे जाऊन काय चालले आहे ते पाहा व ते कसे होत असावे याबद्दल बुद्धीस चालना देऊन तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करा.

सांताक्रूझ येथे एक भैय्यासारखा मनुष्य आहे. सुमारे दहा वर्षांपूर्वी त्याच्याजवळ असे दोन बैल होते. आज त्याच्याजवळ असे आठदहा आहेत. यावरून त्यास त्या बैलांना शिकविण्याची कला अवगत आहे याची खात्री पटते. त्या बैलाची एक खूण असते. त्याच्या वशिंडाजवळ एक स्तनाचे आकाराची मांस-ग्रंथी वाढलेली असते. असा बैल दिसला तरच तो शिकविण्याकरता विकत घेतो. म्हणजे त्याच प्रकारच्या बैलाला त्याच्या हिशेबाने ही विद्या शिकविण्याची पात्रता असते. त्या बैलास मराठी अथवा हिंदीत कोणताही प्रश्न विचारला तर तो त्यास निश्चित समजतो व तो त्याचे तारतम्याने बरोबर उत्तर देतो व ते असे असते की, आपल्यातील चांगल्या विद्वान माणसासही उत्तर देता येणार नाही. समजा, त्यास विचारले की, या जमलेल्या मंडळीत नागपूरहून कालच येथे कोण आला आहे ? तर असा कोणी आलेल

असल्यास तो बैल नक्की त्याच इसमाजवळ जाऊन उभा राहील. हे तुम्हा-आम्हास खात्रीने जमणार नाही. वाचकांचा वेळ न घेता थोडक्यात माहिती मिळावी म्हणून निवडक दोन उदाहरणे देतो. आम्ही ठरवून एकाजवळ नक्की रु. २५ ठेवले व त्यास विचारले, या मंडळीत नक्की २५ रु. कोणाजवळ आहेत. त्यावर क्षणाचाही वेळ न करता तो बैल गर्दी बाजूस करून तो मनुष्य मागे उभा होता, त्याच्याजवळ जाऊन उभा राहिला. तसेच त्या बैलवाल्याने चार लोकांजवळून चार फौंटनपेने घेऊन त्याच्या शिंगास बांधली. कोणाजवळून घेतली ती त्या बैलाने पाहिली नव्हती. मग कोणते कोणाजवळून घेतले याबद्दल तर त्यास नक्कीच काही माहिती नव्हती. त्यास ती ज्याची त्यास परत करावयास सांगितली. त्याप्रमाणे तो एका मनुष्याजवळ जाऊन उभा राहिला. त्याने आपले पेन काढून घेतले. नंतर तो दुसऱ्या माणसाजवळ उभा राहिला. त्याने एक पेन काढून घेतले पण मग तिसरे पेनकरिता तो बैल तेथून हालण्यास तयार होईना त्यास पुन्हा पुन्हा सांगूनही तो हालेना, म्हणून त्या माणसास त्याचे स्वतःचे पेन घेतले आहे काय म्हणून पाहण्यास सांगितले. त्याप्रमाणे पाहता त्याने त्याच्यासारखे दिसणारे परंतु दुसरे पेन घेतले होते असे आढळले. यावरून त्याचे कौतुक वाटले की, जी गोष्ट आपणा माणसास जमणे शक्य नाही ती त्यास कशी कळते. अर्थात बरेच लोक त्यास भविष्यवियियक प्रश्न विचारतात व ते मात्र हटकून चुकतात. असे असले तरी त्याने प्रश्न कशाबद्दल विचारले आहेत व त्यास हो किंवा नाही—काय उत्तर द्यावयाचे हे त्यास कळते. हे कसे कळू शकते हा प्रश्नच आहे व तो अद्याप तरी मला सुटलेला नाही. वाचकांनी प्रयत्न करून पाहावा.

४९. रोप ट्रिक

भारतातील जादू इतर देशात रोपट्रिकमुळे प्रसिद्ध आहे असे दिसते, की पूर्वी बरेच ठिकाणी ही रोपट्रिक करण्यात येत असे. त्यास त्यांनी ट्रिकच म्हटले असल्याने खरोखर त्यात जादूचा प्रश्नच येत नाही. जहांगिरचे वेळी एकाने दरबारात नागाचे विलक्षण प्रयोग करून दाखविल्याचे वाचकांना माहीत असेलच. आपल्या देशात सुद्धा इतर देशांप्रमाणे जादू ही पूर्वापार आहे. या रोपट्रिकबद्दल थोडे निराळे माझ्या वाचनात आले, म्हणून मुद्दाम येथे देत आहे. निदान ५० वर्षापूर्वीची हकीकत असावी. त्यातील व्यक्तींची नावें आता माझ्या लक्षात नाहीत. त्या वेळी एक युरोपियन मनुष्य फिरत फिरत काशी येथे गेला होता व तेथे एका चौकात बरीच गर्दी जमलेली पाहून हाही काय चालले आहे ते पाहण्याकरता थांबला. तेथे हीच रोपट्रिक सुरू होती. नेहमीप्रमाणे त्या गारुड्याने दोर काढला व तो सरळ सरसर करीत आकाशाकडे गेला व आश्चर्यकारक रीतीने तो ताठ आकाशाकडे टोक करून उभा असलेला दिसू लागला. नेहमीप्रमाणे त्या गारुडयाजवळील मुलगा सर्वांसमक्ष सरसर करीत त्या दोरावर चढून अदृश्य झाला व थोडयाच वेळात रक्ताने लडबडलेले

असे त्याच्या शरीराचे हातपाय हे अवयव खाली पडू लागले. याच सुमारास एक माजलेला पोळ त्या गर्दीत शिरला म्हणून भीतीने ती गर्दी त्यास वाट करून देण्याकरिता पांगली. परंतु तिकडे त्याचे लक्ष नव्हते. त्यामुळे त्यास बैलाचा धक्का लागून तो खाली पडून त्यास डोळ्यास थोडी जखम पण झाली. तो नंतर उठून पाहतो तो खेळ परत सुरू झालेला होता. परंतु त्यास तो दोर, मुलगा, त्याचे अवयव काही दिसत नव्हते. फक्त तो गारुडी व त्याच्याजवळ उभा असलेला त्याचा मुलगा एवढेच त्यास दिसत होते व तो हिंदीत काही बडबडत होता. त्याचे त्यास थोडे थोडे कळत होते. इतर लोक आश्चर्याने आकाशातून पडत असलेले त्या मुलाचे भाग पाहात होते व त्यापैकी काही तर रक्ताने लडबडलेले ते भाग पाहून मूर्च्छितसुद्धा पडले होते. परंतु या युरोपियन माणसास ते काहीच दिसत नव्हते. त्यास कळेचना की, हे लोक इतके आकाशाकडे काय पाहात आहेत. थोड्या वेळात तो खेळ संपला, त्यावेळी त्यास जाणीव झाली. मोहिनी विद्येचा हा सर्व परिणाम होता. जोराचा धक्का लागल्याने त्याच्यावरील मोहिनी निघून गेली होती. त्यामुळे त्यास खरा प्रकार दिसला होता. इतर लोक भारलेले होते. त्यामुळे गारुडी सांगेल तसे त्यास दिसत होते.

अशा आणखी शेकड्यांनी हकीकती देता येतील की, त्यांचा उलगडा मानवी ज्ञानास अद्याप होऊ शकला नाही व होऊ शकत नाही. वाचकांची निव्वळ करमणूक व्हावी म्हणून ह्या हकीकती मी दिलेल्या नाहीत, तर याबद्दल वाचकांनी स्वतंत्रपणे विचारमंथन करून त्यांचा उलगडा लावावा, म्हणजे मानवी ज्ञानात एक भर टाकल्यासारखे होईल. काही कळू शकत नाही किंवा शकले नाही, ही काही ज्ञानात भर नव्हे.

या विश्वात सर्व काही ईश्वरेच्छेने म्हणा की निसर्गाप्रमाणे म्हणा, काय वाटेल ते नाव द्या, त्याप्रमाणे चालले आहे. पुष्कळ मंडळी Super Natural असे काही घडले म्हणतात. परंतु Super Natural असे काही असूच शकत नाही. काही असलेच तर ते Super Normal असू शकते. या दोहोस मराठीत एकच शब्द वापरता येतो व तो म्हणजे अलौकिक किंवा अद्‌भुत. परंतु या दोहोंपैकी एकाचाही नीट बोध होऊ शकत नाही म्हणून ते इंग्रजी शब्द जसेच्या तसे वापरले आहेत. या विश्वात जे काही घडत आले आहे, ते सर्व निसर्गप्रणीत व निसर्गांतर्गत आहे. त्याच्या बाहेर किंवा त्यास सोडून असे काही कधी घडले नाही अथवा घडू शकत नाही. याकरता मानवी ज्ञानास आकलन न होणारे असे काही घडले तर त्यास फार तर Super Normal म्हणा, ते Super Natural नाही. हे मी का म्हणतो की, त्यातील सर्व अगर काही भाग जरी जास्त अनाकलनीय असला तरी त्याची उत्पत्ती निसर्गातच असल्याने शास्त्रीय पद्धतीने ती सोडविण्याचा प्रयत्न केला तर कदाचित सुटू शकेल. ते एकदा Super Natural म्हटले की, प्रयत्नच होणार नाही. मी या पुस्तकात लिहिलेल्या बहुतेक सर्व हकीकती जरी वास्तवात प्रत्यक्ष घडलेल्या

असल्या तरी त्यांपैकी बहुतेक आज तरी त्या कशा व का घडल्या हे सांगण्यास मानवी ज्ञान असमर्थ आहे. त्यातील एक जरी हकीकत निसर्गाच्या साहाय्याने कशी उकलू शकते यासंबंधी कोणी शास्त्रीय पद्धतीने खुलासा दिला तर त्यास मानवी ज्ञानाचे एक नवे दालन उघडल्याचे श्रेय मिळेल. कारण जोपर्यंत त्यास Super Natural किंवा Super Normal असे म्हणतो, तेथे आपण त्याची संगती लावण्यास असमर्थ आहोत, अशी कबुली देतो. निदान एकाची सांगोपांग उपपत्ती देऊ शकलो तर मग ते Super Natural किंवा Super Normal न राहता मानवी कक्षेत येते, याकरता त्यास हे महत्त्व. तरी वाचकांनी या सर्वांचा यथायोग्य परामर्ष घ्यावा ही इच्छा.

* * *

२१. स्पिरिट गाइड्स

यानंतर पूर्वीच्या एका प्रकरणात मृत्यूनंतर काय होत असते याचे थोडक्यात वर्णन आले आहे. त्यानंतर त्यासंबंधी काही विशेष हकीकत हाती आली आहे. त्यायोगे या विषयावर विशेष प्रकाश पडेल असे वाटल्यावरून वाचकांच्या माहितीकरता देत आहे. तरी पण याबाबत एक सूचना देऊन ठेवावीशी वाटते की, ज्याप्रमाणे धर्म-जाति-स्थळ-काळपरत्वे प्रत्येकाचे अनुभव निरनिराळे असतात, त्याचप्रमाणे एखादे स्पिरिटने सांगितलेली हकीकत त्याच्यापुरती शंभर टक्के खरी असली तरी सर्वसाधारण परिस्थिती अगदी तशीच असते, असे धरून चालू नये. प्रत्येकाचे अनुभव निराळे असतात. त्याचप्रमाणे गृहीत धरून चालू नये. मात्र सर्वसाधारणपणे त्यासारखेच अनुभव असावेत असे अनुमान करावयास हरकत नाही. एखाद्या अत्यंत आस्तिकाचे अनुभव नास्तिकाच्या अनुभवापेक्षा भिन्न असतील. परंतु असे असले तरी त्यातील मुख्य गोष्ट किंवा गाथा ही सारखीच असतील. मनुष्य म्हटले की त्यास दोन हात, दोन पाय, दोन डोळे असायचेच. मग त्यावर पेहेराव किंवा त्याची वागणूक देश, काल, धर्म या मानाने कशीही असो. स्पिरिटपैकी दोघातिघांचे अनुभव सांगतो यावरून सर्वसाधारण कल्पना येईल.

एका स्पिरिटचे असे म्हणणे आहे की, मृत्यू आला म्हणजे फक्त शरीर अकार्यक्षम होते. परंतु त्याच्या स्पिरिट बॉडीचे कार्य तसेच चालू राहाते. निदान त्या वेळी ती फक्त शरीरापासून सुटी होऊन स्वतंत्रपणे हिंडू फिरू लागते. त्यामुळे अगदी सुरुवातीला ती अगदी बहिर्मुख असते. आपणात काही फरक झाला आहे याची जाणीवच त्यास काही काळ होत नाही. त्यास बराच काळ काही फरक जाणवतच नाही. परंतु नंतर त्यास हळूहळू जाणीव होऊ लागते. त्यास त्याचे मेलेले नातेवाईक, स्नेहीसोबती, स्पिरिट गाईड वगैरे भेटतात. ते त्यास जाणीव करून देतात. तेथे फक्त विचारांची देवघेव असल्यामुळे विचार मनात येताच तत्संबंधी व्यक्ती अथवा वस्तूचे त्यास ज्ञान वा दर्शन होते. स्पिरिट जगात नवीन आलेले स्पिरिटस पूर्वीच्या जगतात वागत होते तसेच वागण्याचा प्रयत्न करतात. आई बाप, भाऊबंद, मित्र यांवर प्रेम करतात. शत्रूशी दुष्टावा करतात. कधीकधी भांडतात सुद्धा. त्यांचे प्रत्येक ज्ञानेंद्रिय शाबूत असते व ते पूर्वीप्रमाणेच कार्य करीत असते. त्यानंतर त्यांच्या पूर्वीच स्पिरिट जगात आलेले त्यांचे इष्टमित्र त्यांना निरनिराळ्या ठिकाणी नेऊन त्या जगताचा परिचय करून देतात. त्यांना लवकरच जाणीव होऊ लागते की ते नवीन जगात आहेत व त्यांच्या, स्वर्ग-नरक वगैरे मूर्त कल्पनांना धक्का बसतो. कारण येथे तसे काहीच नसते. पूर्वी आलेले स्पिरिटस ज्यांनी आपल्या

वागणूक—वर्तनाने अग्रस्थान मिळविले आहे व ज्यांनी स्पिरिट—जगाचा बराच अनुभव घेतला आहे ते नवीन आलेल्या स्पिरिटस मधून चांगल्या वाइटाची निवड करतात. ज्याची वर्तणूक पूर्वी चांगली असेल व ज्याची मानसिक प्रगती इतरांपेक्षा अधिक असेल अशांची पुढील शिक्षणासाठी निवड केली जाते व जे भांडखोर, व्यसनी वगैरे दुर्गुणांनी युक्त असतील त्यांना आणखी थोडी जाणीव व्हावी म्हणून तसेच राहू देण्यात येते. ही पहिली अवस्था फार तर एखादे वर्षे टिकते. त्या अवस्थेत स्पिरिटस अजून बहिर्वर्ती असतात. पृथ्वीवरील स्थूल जीवनापासून विभक्त झाले असले तरी त्यांची वृत्ती अजून तशीच असते. दिवसगतीने ती कमी कमी होत होत आता आपण नवीन जगात आहोत, पूर्वीच्या जगाशी आपला काही संबंध राहिला नाही, येथे आपणास नवीन प्रकारचे जीवन जगावयाचे आहे, याची जाणीव होऊ लागते, व तो लवकरच त्या नवीन जीवनाशी समरस होतो.

दुसरे एक स्पिरिट सांगते की, मृत्यू पावून नवीन असे कोणी या जगात आले की त्यास सर्वांत काही अत्यंत आवश्यक गरज असेल तर ती विश्रांतीची. कारण आपण काल कोठे होतो व आज कोठे व कशा परिस्थितीत आहोत हे त्यास काहीच कळेनासे होते; तो भांबावून जातो, म्हणून त्यास विश्रांती घेऊन नवीन जगताशी समरस होण्यास थोडा अवधी लागतो. ते जगत निराळे, रीतीभाती, वागण्याच्या पद्धती वगैरे सर्व निराळे असते. प्रत्येक जीवात्म्यास एकाच मार्गाने जावे लागते असे नाही. त्याची मानसिक उन्नती, त्याच्या गरजा यावरून त्यास काय हवे, काय नको ते ठरविण्यात येते त्याप्रमाणे तत्संबंधी सूचना आत्मसात करण्याकरिता त्याची निवड करण्यात येते. प्रथम त्याची बहिर्वृत्ती म्हणजे पृथ्वीवरील जगताची आसक्ती कमी कमी करीत आणून त्यास अंतर्मुख करीत त्यास नवीन जगाचा परिचय करून देण्यात येतो. पुष्कळ वेळा ते स्थूल शरीराशी इतके समरस झालेले आढळतात की, ते मृत्यू पावले असून, नवीन जगात आले आहेत असे मानावयास ते तयार होत नाहीत. त्याला त्याच्या थडग्याकडे नेऊन त्याचे मेलेले व पुरलेले शरीर दाखवावे लागते. शरीराशी असलेल्या भावनाशी ते इतके समरस झालेले असतात की, त्यांना त्याखेरीज अस्तित्वाची कल्पनाच सहन होत नाही परंतु काल हे सर्वांवर उत्तम औषध आहे. तरी पण त्यांना पूर्ण जाणीव होईपर्यंत ते सारखे त्रस्त होऊन भटकत असतात. त्यांच्या नातेवाइकांना भेटण्याचा प्रयत्न करतात, शत्रूंना त्रास देतात व अशा रीतीने अत्यंत असंतुष्ट असे जीवन जगत असतात. परंतु या भावना जोपर्यंत अत्यंत तीव्र स्वरूपात असतात तोपर्यंत त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नाही. त्यांना स्वैर हिंडू—फिरू देतात. काही काळाने तो कंटाळतो व अंतर्मुख होऊ लागतो. आपले काही तरी चुकत आहे हे त्यास कळू लागते; परंतु बरोबर काय याचा उमज होत नाही. अशा वेळी त्याला स्पिरिट गाईड भेटतात. तो कोठे आहे व नवीन जग काय व कसे आहे, काय करीत राहून त्याने स्वतःची प्रगती करून घेतली

पाहिजे, याची जाणीव त्यास हळूहळू करून देण्यात येते व त्याच्या पात्रतेप्रमाणे त्यास नवीन नवीन धडे देऊन, त्याची प्रगती वरशी होत राहील याकडे लक्ष देण्यात येते. तेथील पात्रता ही त्याच्याजवळील पूर्वायुष्यातील पैसा किंवा अधिकार यावरून न पाहता, त्याच्या सद्गुण-दुर्गुणावरून ठरविण्यात येते. जे स्पिरिट बरीच वर्षे शिक्षण घेऊन तेथील जीवन आत्मसात करून, देवदूतासमान बनतात, ते हे कार्य आस्थेने व विचारपूर्वक करीत असतात.

स्पिरिट मार्गदर्शक (Guides) नी सांगितलेली वर्णने व हकीकती

ही वर्णने व हकीकती त्यांच्याच शब्दांत देत आहे. त्यावरून कल्पना येईल की, पृथ्वीवरील संस्कार, विचार व भावना तेथेही प्रभावशाली असतात व त्याच प्रकारची वर्णने त्यांच्याकडून ऐकावयास मिळतात. म्हणून मी वर विधान केले आहे की, यावरून कायम असे सिद्धांत ठरविता येणार नाहीत. मात्र तेथील सर्वसाधारण जीवनाची कल्पना येईल.

(१) प्रथम मला वाटले की, मला काही स्वप्नच पडत आहे. परंतु लगेच सत्यपरिस्थितीची जाणीव झाली. मला वाटे की, मी हात-पाय हलवावे. परंतु लगेच जाणवले की आता त्याची आवश्यकता राहिली नाही. मी कोठे जाण्याची इच्छा करताच त्या ठिकाणी हजर होत असे. माझ्या आजूबाजूस झाडे वगैरे होती, त्यांचा अडथळा होऊ नये म्हणून बाजूने जावे असे वाटू लागले. तोच मी त्यामधून जात असे. ती झाडे सुद्धा पृथ्वीवरील झाडांच्या या जगातील प्रतिकृती होत्या. मला माझे सर्व मृत नातेवाईक, स्नेहीसोबती भेटले व त्यांनी माझ्याशी मनमोकळ्या गोष्टी केल्या. ते बोलण्याच्यापूर्वी त्यांच्या मनात काय चालले आहे ते मला कळत असे. आणि त्याचप्रमाणे माझे उत्तर त्यांना समजत असे. तेथें बोलण्याचे कामच नसे. तेथे भाषेची अडचण नव्हती. कोणत्याही भाषेत मनात विचार आला की बोलून दाखविण्याच्या आत त्याचे ज्ञान होत असे. हितचिंतक माझ्या भोवती जमून त्यांनी मला एकान्त स्थळी नेले व विचारणा केली की, मी त्यांना अनुसरून स्पिरिट जगाचे विशेष ज्ञान संपादन करावे. त्याने मन शुद्ध आणि पवित्र होऊन पुढील मार्ग सुकर होईल. हे विश्वच माझे घर हा धडा मला शिकवायचा होता व जो मोठा कठीण होता. त्याचा अर्थ जाती, धर्म, देश, वय, समाजातील स्थान या सर्वांतील उच्चनीच भाव विसरून सर्वांबरोबर समान भूमिकेवर राहावयाचे. स्वार्थ व स्वार्थी वृत्ती यांना अजिबात फाटा द्यावयाचा. मला असे कळविण्यात आले की, मी अद्याप प्राथमिक भूमिकेत वावरत होतो. वरील धोरण आत्मसात केले म्हणजे माझा स्पिरिट जगातील पहिल्या भूमिकेत प्रवेश होणार होता. एकदा त्या भूमिकेत पक्का पाय रुजला की, मग उत्तमोत्तम, एकापेक्षा एक वरच्या भूमिकेत प्रवेश मिळून ज्याला स्पिरिच्युअल जगातील अखेरची पायरी म्हणता येईल तेथपर्यंत पोचून प्रत्यक्ष परमेश्वराच्या सान्निध्यात जाणे शक्य होते.

मी त्याप्रमाणे वागावयाचे ठरविले व लवकरच माझा पहिल्या भूमिकेत प्रवेश झाला व मी तेथूनच तुमच्याशी संभाषण करीत आहे. माझ्याबरोबर आणखी काही लोक आले होते. त्यांना पण यासंबंधी विचारण्यात आले होते. परंतु त्यांना अद्याप पूर्वीच्या जगातील गोष्टींतच जास्त रस वाटत होता व त्यापासून अलग व्हावे असे त्यांस वाटेना. म्हणून त्यांचा नाद सोडून त्यांना आणखी काही काळ त्यातच रमू द्यावे असे ठरविण्यात आले. तेथे सर्व स्वेच्छेचा प्रश्न असतो. कोणी कोणावर बळजबरी करीत नाही. करू इच्छित नाही. त्यांनी या नवीन जगात पुढे पाऊल टाकण्याचे नाकारले म्हणून ते तसेच पिचत राहिले व आम्ही पुढेपुढे जात असल्याने लवकरच त्यांचा आमचा संबंध तुटला.

(२) मला वाटले मी झोपेत असून मला स्वप्न पडत आहे. लवकरच माझा तो भ्रम दूर होऊन सत्य परिस्थितीची जाणीव होऊ लागली. माझी सर्व ज्ञानेंद्रिये शाबूत होती. त्यामुळे माझा शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या सर्वांची जाणीव होत होती, परंतु लवकरच उमजून आले की, ती जाणीव पृथ्वीतलावरील नसून स्पिरिट जगातील होती. आम्हाला तेथं सर्व काही करण्याची परवानगी होती. कोणी बागाईत करीत, तर कोणी गाणे बजावणे वगैरे. मात्र ते संगीत स्वर्गीय असे. येथे दिवस-रात्र काही नाही थकवा आला असे वाटले की थोडा काळोख पसरतो व आम्ही विश्रांती घेतो. आम्हांवर नेहमी स्वर्गीय प्रकाश पसरलेला असतो. खरे म्हणजे येथे आम्हास आमची जी इच्छा होईल ते आम्ही तत्क्षणी करू शकतो. आम्ही प्रत्यक्ष ईश्वराच्या अदृश्य छायेत वावरत असतो. हळूहळू आम्हास जाणीव होऊ लागली की, आम्ही इच्छा केली की तत्क्षणी तेथे जात असू व पाहात असू. तेथे आम्हास पृथ्वीवरील आमची मेलेली कुत्री, मांजरे पण भेटत होती. आम्ही कोठेही जाण्याची अगर भेटण्याची इच्छा केली की, तत्क्षणी हजर होऊन त्या व्यक्तीस भेटत असू. आम्हाला स्थळकाळाचे बंधन नाही. कोणत्याही स्थळी केव्हाही जाण्याची इच्छा करण्याचा अवकाश की, आम्ही त्याच वेळी तेथे असतो. आम्हाला आपण देवदूतांना कल्पना करतो त्याप्रमाणे पंख नसतात. त्यांची आवश्यकताही नसते. इतक्या लांब असणारे ग्रहतारे आम्हास जवळ वाटतात. पुष्कळ नवीन नवीन जीवात्मे भेटतात. म्हातारी माणसे पुष्कळ तरुण दिसतात व मुलांची पूर्ण वाढ झालेली आहे दिसते. आम्ही सर्व एकमेकांना भेटताक्षणीच ओळखतो व त्यांच्या मनात काय आहे ते कळते.

(३) आम्ही स्पिरिट असल्याने आम्हास तुमच्यासारखे हाडामासाचे देह नाहीत. परंतु ईश्वर आम्हास कोठेही जाऊन मूळ स्वरूपात भेटण्यास परवानगी देतो. आमच्या पूर्वी येथे आलेले नातेवाईक, मित्र वगैरे येथे येताच स्वागत करतात व या प्रदेशाची ओळख करून देतात. आमचे स्वरूप बदलता येते. लहान मुलांना भेटताना आम्ही त्यांच्यासारखा आकार घेऊ शकतो. त्यामुळे त्यांना आम्ही कोणी परके आहोत असे वाटत नाही. आम्हाला इष्टमित्रांशी बोलावेसे वाटते. परंतु आम्ही शब्दा-

वाचून केवळ विचार-संक्रमणाने एकमेकांचे मनोगत समजू शकतो. आम्हास ज्याप्रमाणे स्थळकाळाचे बंधन नाही त्याप्रमाणे भाषेचे पण नाही. त्यामुळे कोणाचाही कोणाबद्दलही गैरसमज होण्याचे कारण नसते व त्यामुळे आम्ही सर्व देश भाषा, धर्म यांचे अडथळे न येता प्रेमपूर्वक एकत्र येऊ शकतो. आम्ही अगदी निराळ्या जगात वावरत असलो तरी आम्ही पृथ्वीवर मानवाशी संपर्क ठेवू शकतो. त्याचे मनोगत आम्हास समजते. येथे आम्ही अगदी स्वतंत्र असतो. येथे दुःख, आजार वगैरेंचा मागमूस नसतो. मृत्यू ओलांडून आलेला असतो.

(४) प्राथमिक अवस्थेतून पाहिल्या भूमिकेत असलेला मी एक स्पिरिट गाईड आहे. येथे आम्हास पुष्कळ कामे वाटून दिलेली असतात. जितकी आमची स्पिरिटयुक्त प्रगती झालेली असेल त्यामानाने काम असते. प्रत्येक क्षणाला स्थूल जगतातून स्पिरिट जगतात लोक येत असतात. त्यांना आम्ही वाटेतच भेटतो व एकांत स्थळी नेऊन नवीन जगाची कल्पना देण्याचा प्रयत्न करतो. त्याच्यात काय बदल झाला आहे त्याची त्यास कल्पना देत असतो. तो सुरुवातीला इतका भांबावलेला असतो की त्याचे इष्टमित्र वगैरे भेटून सारखी आश्वासने देत असतात. तरी तो ती खरी मानण्यास तयार नसतो. त्यांना अजून असे वाटते की ते स्थूल जगातच वावरत असून तेथील सर्व माणसे व वस्तूंबद्दलचे प्रेम त्यास इतर कल्पनाच करू देत नाही. तो अद्याप तेथेच व त्यांच्यातच आहे असे समजत असतो व सांगूनही समजून घेण्यास तयार नसतो. जन्मभर त्याला तेच संस्कार व अनुभव सारखे येत गेल्याने, त्यासंबंधीची आसक्ती त्यास दुसरे काही विचारच करू देत नाही. अशा परिस्थितीत आम्ही त्याचा नाद काही काळ सोडून देतो व त्यानंतर बराच काळ भटकल्यानंतर त्यास थोडी थोडी जाणीव होऊ लागते व मग तो आम्ही त्यास काही सांगितले तर तो मानू लागतो पृथ्वीवर त्याच्यावर काही धार्मिक संस्कार झालेले असतात त्यानुरूप त्याच्या परलोकासंबंधी कल्पना असतात तसे येथे काहीच नसल्याने त्यास धक्का बसतो व म्हणून नवीन परंतु सत्यपरिस्थितीशी समरस होण्यास खास वेळ लागतो. जगाच्या सर्व भागातून सर्व वयाचे लोक दरक्षणी येत असतात व आम्हास त्या सर्वांस परिस्थितीची जाणीव देऊन पुढे काय काय करावयाचे ते समजावून द्यावयाचे असते. सुदैवाने आम्हास भाषेची अडचण पडत नाही. आमचे विचार न उच्चारताही कोणासही समजतात व त्याचे आम्हास समजतात. नवीन आलेल्या जीवात्म्याचा पूर्वी थोडा अभ्यास असला तर आम्हास येथे विशेष त्रास होत नाही. परंतु ज्यांनी संसार, बायका, मुले यापलीकडे कशाचाही कधीच विचार केला नाही त्यांचा प्रश्न मोठा कठीण असतो. त्यांना कितीही प्रयत्न केला तरी ते समजावून घेण्यास तयार नसतात व दुःखात पिचत राहतात. त्यांच्याबद्दल वाईट वाटते, परंतु इलाज नसतो. काही लोक असे असतात की, त्यांना जाणीव झालेली असते; परंतु सततच्या सहवासाने जुने टाकू शकत नाहीत असे असले तरी आम्ही त्यांना संपूर्ण वाव देतो व त्यांची त्यांनाच परिस्थितीची जाणीव येण्याची वाट पाहतो.

आम्ही सर्व गाईडस् केवळ पहिल्या पायरीवर (प्लेन) असतो व आम्हासही पुष्कळ प्रगती करणे बाकी असते. ही काही जागा नसते. एक प्रकारची स्थिती असते. मात्र याचे एक वैशिष्ट्य आहे की, मी प्राथमिक स्थितीतून पहिल्या भूमिकेत प्रवेश केला की मग मागे जाण्याची भीती नसते. हळूहळू प्रगती होतच राहते. येथे आम्हास विलक्षण अनुभव येत असतात. त्यांपैकी जेवढे सांगण्याची आम्हांस परवानगी आहे ते सांगितले आहे. एक गोष्ट मात्र निश्चित व खरी आहे की, येथे अत्यंत सौख्यपूर्ण व दुःखरहित जीवन जगता येते. कोणाचा हेवादावा नाही. कोणी अधिकारी नाही. कोणी चाकर नाही. कोणी धनिक नाही. कोणी गरीब नाही. सर्व अगदी एकाच भूमिकेवर व त्याचेच काही नवीन प्रवेश करणाऱ्या लोकांना मोठे वैषम्य व दुःख होत असते. परंतु परिस्थिती बदलणे त्यांच्या हाती नसते. त्यांना आता कळते की, ते स्वतः कोणी नसून काळाचे हातातील एक खेळणे आहे.

(५) काही जीवात्म्यांच्या बाबतीत असे घडते की, त्याचा या जगात प्रवेश होताच वाईट प्रवृत्तीच्या स्पिरिटसच्या जाळ्यात सापडतात. ते त्यांना चुकीचे मार्गदर्शन करतात व मानवी प्रवृत्ती सहजच तिकडे वळणारी असल्याने त्यांना कोणी काही चांगले सांगितलेले पटत नाही. त्याची प्रवृत्ती अजून स्थूल जगाकडेच असते. मात्र त्यांना येथे आल्यावर कोणत्याही क्षणी कोठेही जाण्याची शक्ती इतराप्रमाणे प्राप्त होते. त्याचा हे दुरुपयोग करतात. त्यांना वाईट स्पिरिटकडून वेळोवेळी वाईटच सूचना मिळतात व ते त्याचे पालन करतात. त्यामुळे त्यांना मिळालेल्या शक्तीचा पण ते दुरुपयोग करू लागतात. ते पृथ्वीवरील लोकांस त्रास देऊ लागतात व कारण नसताना दगड फेकतात. सामान इकडे तिकडे फेकू लागतात. लोकाना भिववितात. ते स्थूल जगाशी असलेला संपर्क सोडण्यास तयार नसतात. पण उलट मिळालेला फायदा घेऊन इतरांना त्रास देण्यात समाधान मानतात. दुष्ट प्रवृत्तीचे स्पिरिटस अशा लोकांचा ताबा घेतात व त्यांच्याकडून त्रासदायक दुष्ट अशी कामे करवून घेतात. त्यावेळी त्यांना काही सांगितले तरी ते ऐकण्याच्या मनस्थितीत ते नसतात. त्यामुळे त्यांची एनर्जी संपेपर्यंत किंवा त्यांना पश्चात्ताप होईपर्यंत ते काय करतात, त्याकडे दुर्लक्ष करून ढवळाढवळ न करणेच इष्ट असते. आम्हास इतर कामे काही थोडी नसतात, त्यामुळे त्याकडे लक्ष देणे शक्य नसते व इष्टही नसते. दिवसेंदिवस ते या दुष्ट प्रवृत्तीच्या स्पिरिटसच्या जास्त जास्त आहारी जातात व स्वतःचे कायमचे नुकसान करून घेतात. दिवसेंदिवस ते आपली जास्त जास्त अधोगती करून घेतात व सर्वांत उपद्रवकारक असे होऊन बसतात. त्यांना त्याची जाणीवही होत नाही व वर्षानुवर्षे ते या नरकात पिचत राहतात. अनेक वर्षांनी त्यांना त्या जीवनाचा अत्यंत कंटाळा आला म्हणजे ते या मार्गांकडे वळतात व आम्ही मदत करण्यास सदैव तयार असतो.

मला वाटते सर्वसाधारणपणे मृत्यूनंतर काय व कसे असते, यासंबंधी कल्पना यण्यास एवढी उदाहरणे पुरी आहेत. यमाचे दूत येऊन यमापुढे नेतात व चित्रगुप्त

सर्वांचा निवाडा करून स्वर्ग-नरकात रवानगी करतात किंवा सर्व जीवात्मे थडग्यात पडून राहतात व शेवटी एक दिवस असा येतो की, त्या दिवशी सर्वांना जिवंत करून त्यांचा निवाडा करतात. या सर्व कल्पना परंपरेने आपणास कितीही प्रिय असल्या तरी त्या परिस्थितीत सोडून आहेत एवढी निदान यावरून कल्पना येईल. पुष्कळ वेळा या धार्मिक कल्पना आपणात इतक्या दृढमूल होऊन बसलेल्या असतात की, मृत्युसमयी त्याप्रमाणे खरोखरीच तसे भास होतात किंवा तशी दृश्ये दिसतात. ते खरे असले तर मग हिंदू म्हणून त्याला यमाचे दूताने न्यावयाचे व मुसलमान किंवा ख्रिश्चन माणसास थडग्यात तसेच पडून राहू द्यावयाचे असे होणे शक्य नसते, तेथे आम्ही हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन असे काहींच नाही याची जाणीव ठेवावी. आता मृत्यूनंतर काय हे मोठेसे गूढ राहिलेले नाही. मनुष्य जिवंत असताना त्याचे स्थूल शरीर अकार्यक्षम होते, परंतु त्याचे स्पिरिट बॉडीचे अस्तित्व तसेच कायम असते. एवढेच की ते शरीरापासून सुटे होऊन स्वतंत्रपणे कार्य करण्यास समर्थ होते याचा अर्थ मृत्यू म्हणजे आपले स्थूल शरीर अकार्यक्षम होऊन स्पिरिट-शरीर तसेच पुढे काम करीत राहते. त्याची सर्व इंद्रिये, आशाआकांक्षा कायमच असतात. मात्र त्या थोडया निराळ्या स्वरूपात असतात. याचा अर्थ आपण समजतो त्याप्रमाणे मृत्यू हा खरा मृत्यू नव्हे. मी अगोदरच सांगितले आहे की स्पिरिट-जीवनातसुद्धा आपण जन्मभर जे संस्कार जोपाशीत आलो असतो, त्याचा परिणाम होत असतो. त्यामुळे निरनिराळे स्पिरिटस निरनिराळी माहिती सांगत असतात व ती पुष्कळ वेळा परस्परविरोधी पण असते. कारण त्या जीवनात आपले जुने मनच कार्य करीत असते. या संबंधास अजून संशोधनास वाव आहे. परंतु तोपर्यंत एक गोष्ट निश्चित की, मरणानंतर आपणास स्पिरिट जीवन जगावे लागते ते आपले संस्कार व दृढमूल झालेल्या सवयी–विचार यावर सुखी अगर दुःखी असे असते. तेथे काही गोष्टी अगदी सर्वांनी स्पष्टपणे सांगितल्या आहेत त्या खऱ्या धरून चालावयास हरकत नाही. एक तर मृत्यूनंतर स्पिरिट जीवनात कोणी, कोठेही, केव्हाही, क्षणात काहीही अडथळे न येता जाऊ शकतो. त्यास अडचण न येता केवळ विचारसंक्रमणाने एकमेकांची मनोगते कळू शकतात. सर्वांस तंतोतंत असेच अनुभव येतील असे जरी नसले तरी सर्वसाधारणपणे स्पिरिट–जगाच्या अस्तित्वाची कल्पना येण्यास पुरेसे आहे. आपण जी १ ते ५ वर्णने वाचली ती स्पिरिट–गाइडसची होती व ते फक्त पहिल्या भूमिकेपर्यंतचे पोचलेले होते. त्यानंतर आणखी चार भूमिकांची वर्णने माझ्या वाचण्यात आहेत. परंतु ती मला स्वतःला फारच अतिशयोक्तिपूर्ण वाटल्याने त्यांचा निर्देश मी येथे केलेला नाही. एवढे मात्र खरे की, स्पिरिट जगत् अस्तित्वात आहे व त्यासंबंधी संपूर्ण संशोधन होणे अत्यंत अगत्याची बाब आहे. कारण ते नुसतेच ज्ञानक्षेत्र आहे असे नसून आपणास जिवंतपणी व मेल्यावरसुद्धा दैनंदिन जीवनात अत्यंत उपयोगी पडण्यासारखे आहे.

सर्वसाधारण या पुस्तकाचे वाचन करणाराचे वय निदान वीसपेक्षा कमी नसावे म्हणजे त्याचा जास्तीत जास्त या भूतलावर राहण्याचा काळ आणखी फार तर पन्नास वर्षे–हा तसा त्या मानाने कमीच; पन्नास वर्षे म्हटले तरी पृथ्वीच्या इतिहासात तो केवळ नगण्य आहे. मृत्यू हा अटळ आहे, मग तो कोणी राजा असो वा रंक. आपणास –निदान स्वतःस बुद्धिमान म्हणवितो त्याससुद्धा काही दिवसांनी म्हणा की काही वर्षांनी म्हणा, हा देह सोडणे भाग आहे व पुढे निदान साधारणपणे काय आहे ते आता आपणास कळले आहे. पूर्वी म्हणजे काही दशकांपूर्वी मृत्यू म्हणजे एक महान गूढ होते व त्यानंतरचे आपणा सर्वांचे निव्वळ तर्क होते. आता ती परिस्थिती राहिलेली नाही. निदान मृत्यूनंतर काही काळ तरी सत्य परिस्थिती काय आहे व ती कशी असते त्याचे ज्ञान आपणास झाले आहे. मात्र तेथील अस्तित्वाचा काळ व तेथे प्रगती करून घ्यावयाची म्हणजे काय याचे ज्ञान आपणास नाही. संघटित प्रयत्न केला तर होऊं शकेल, असे नाही, तरी पण निदान जे आज निश्चित माहीत आहे त्याचा फायदा का करून घेऊ नये ? निदान आपण त्या दृष्टीने तयारी करून तेथे गेलो तर पुढची प्रगति लवकर व सुगम होऊ शकेल. अलेक्झांडरने जग जिंकले; जग आहे तेथेच राहिले. तो मात्र घरी पोहोचण्यापूर्वीच मरून गेला. काय मिळविले ? खोटी कीर्ती. तेच नेपोलियन. सीझर, हिटलर इत्यादींचे. कोट्यवधी घरेदारे व संसार उद्ध्वस्त करून आता कोठे तरी पिचत पडले असतील. कारण तेथे कोणी ना सीझर, अलेक्झांडर, ना हिटलर. सर्व एकाच भूमिकेवर व असहाय्य. तरी या सर्व परिस्थितीचा विचार करून आपणास काही बुद्धी आहे तिचा उपयोग करून परलोकात आपल्या प्रगतीस काही उपयोगी पडेल असे आतापासून करावे.

मृतं शरीरमुत्सृज्य काष्ठलोष्टसमं क्षितौ ।
विमुखा बांधवा यांति धर्मस्तमनुगच्छति ॥

हे नेहमी ध्यानात असू द्यावे व धर्म म्हणजे काय ते विचारपूर्वक व विज्ञानदृष्टीने ठरवून तयारीत असावे. परलोकातील आपल्या आयुष्याचा काल आपण ज्या भावना, आशा, आकांक्षा आपणांसोबत नेत असतो त्यांच्या तीव्रतेवर असतो.

असो. आता यासंबंधी काही उपयुक्त सूचना देऊन आटोपते घेतो.

काही लोकांच्या अंगात येते; काही घरांत भूत–संचार असतो. दगड येऊन पडतात. सामानाची मोडतोड होते. कापड्यांवरसुद्धा टोचलेले व शेंदूर लावलेले लिंबू येऊन पडतात. अन्नात विष्ठा येऊन पडते; वगैरे अनेक प्रकार होतात. काही कारण नसताना त्रास देणारी स्पिरिटस असतात. त्याला Poltergeist अशी संज्ञा आहे.

प्रथम एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी की, कोणतेही भूत अथवा स्पिरिट हे स्वतः काही करू शकत नाही. त्या त्या करता प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मानवी देहाचा आश्रय अथवा मदत घ्यावीच लागते. कितीही जुनाट अथवा पडलेला वाडा असो. तेथे जोपर्यंत कोणी वस्तीला नाही तोपर्यंत तेथे काही प्रकार होऊ शकत नाहीत.

तेथे कोणी वस्तीला गेले की, त्यांच्यातील Ectoplasm च्या साहाय्याने ही मंडळी त्यांनाच त्रास देतात. ज्या घरात असा काही त्रास होत असेल किंवा पुष्कळ वेळा काही त्रास होतो असे नुसते भास होतात; मात्र ते अगदी खऱ्यासारखे असतात. त्यांनी प्रथम शोध घ्यावा की, त्या घरात कोणी १५ ते २०–२२ च्या वयाची मुले–मुली आहेत काय असेल तर त्या सर्वांना घर सोडून इतरत्र थोडे दिवस राहावयास पाठवावे. बहुतकरून त्रास थांबेल. परंतु ते परत आले तर पुन्हा सुरू होणारच नाही असे मात्र नाही.

कायमचा त्रास नाहीसा होण्याकरिता खालीलपैकी एखादा इलाज करावा.

(१) ॐ नमो नारायणाय नमः या मंत्राचा घरातील सर्व जाणत्या माणसांनी एकंदर तीन ते अकरा लक्ष जप करावा व सायंकाळी श्री नारायणाचे फोटोसमोर धूप उदबत्ती जाळून निदान रोज एक माळ जपत असावे.

(२) श्री रामनाम १३ लक्ष वेळा लिहून काढावे व ते श्रीमारुतीसह रामाचे चित्र असलेल्या तजबिरीखाली प्रतिष्ठापनापूर्वक ठेवावे. नुसत्या श्रीमारुतिरायाचे असले तरी चालेल. नंतर रोज सायंकाळी जेवणाच्या पूर्वी सर्वांनी रामरक्षेचा पाठ करावा. सर्वांना करता येणे शक्य नसेल तर ज्यांना करता येईल त्यांनी करावा. मात्र जप श्रद्धापूर्वक, नियमित व पवित्र अंतःकरणाने केलेला असावा किंवा एखाद्या महात्म्याने स्वतः लिहिलेली रामनामाची वही मग त्यात १०८ रामनाम का असेना. ती आणून पूजेत ठेवावी. इतर देवांबरोबर तिची पूजा अर्चा होत असावी. तरी पण रामरक्षेचा जप मात्र चुकवू नये.

(३) ॐ द्रां श्रीं दत्तात्रेयाय नमः ॥

या मंत्राचा जप नऊ लक्ष करावा. मग श्री दत्तात्रेयाच्या फोटोसमोर धूप-उदबत्ती लावून १०८ जप रोज सायंकाळी करावा. घरातील सर्व भुतेखेते पळून जातील. इतकेच नाही तर ज्याने नऊ लक्ष जप केला असेल त्याने नुसती रक्षा अगर गंडा १०८ वेळा जपून भारून दिला तर दुसऱ्या कोणत्याही घरातील भुतेखेते, दृष्टिदोष, अंगात येणे वगैरे नाहीसे होऊन सर्व त्रास मिटेल.

(४) नवनाथभक्तिसाराची पोथी मिळते. त्या पोथीची स्थापना करावी. निदान २१ पारायणे करावीत व रोज त्या पोथीची धूपदीप–नैवेद्याने पूजा–अर्चा करून नियमाने निदान एकेक अध्याय क्रमाने वाचावा. दत्तात्रेय, नवनाथ यांचा गुरुवारी उपवास करावा. त्यांचे घरात भुतेखेते वगैरेंचे त्रास कधीही होणार नाही. इतकेच नाही तर जपकर्ता जेथे जेथे जाईल तेथून भुतेखेते पळून जातील.

मात्र ही सिद्धी मिळविण्याकरता व टिकविण्याकरता नियमित आहार, पवित्र आचार-विचार, कोणत्याही प्रकारचा आर्थिक मोबदला न घेणे या गोष्टी अवश्य पाळल्या पाहिजेत. तसे केले नाही तर सिद्धी तर मिळणार नाहीच; परंतु मिळालेली सुद्धा नाहीशी होईल.

* * *

२२. उपसंहार

या ग्रंथात विवरण केल्या गेलेल्या एकंदर विषयाची व्याप्ती पाहिली असता अशी पाच पुस्तके त्याच विषयासंबंधी लिहिली असली तरी ती कमीच पडली असती. परंतु एक तर ती किमतीत सर्वसाधारण मध्यम वर्गीयास न घेता येण्याजोगी इतकी महाग पडली असती व त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे लेखकाने आपली सत्तरी गाठली असून हा ग्रंथ अपुरा ठेवला तर दुसरा ग्रंथ लिहावयास आयुर्मर्यादा आहे की कसे याची शंका वाटते. मानवाचे पूर्णायू म्हणजे सत्तर. Three score and ten, याच्यापुढे जगता येणे म्हणजे केवळ अपवाद. त्या जगन्नियंत्याने आयुष्याची अखेरी सुखी व निरोगी अवस्थेत गाठण्याची संधी दिली याबद्दल त्याचे किती आभारी असावे तेच कळत नाही. अर्थात ही आभार मानण्याची भाषासुद्धा मानवीच आहे. माझे वय सत्तर पूर्ण झाले असून यापुढे त्याने किती दिवस या अवनीतलावर वास्तव्य असू देण्याचे ठरविले आहे त्याची कल्पना नाही; काही दिवस असतील, कदाचित् काही महिने; परंतु वर्षे खास नाहीत. मला पण ती नको आहेत.

मी आजपर्यंत शक्यतोवर स्वतःकरता कोणाचेही उपकार घ्यावयाचे टाळले आहे. आणखी आयुष्याची भीक मागून त्यांचे तरी जास्त उपकार का करून घ्या ? अगोदरच आहेत ते काय थोडे आहेत ? अपवादात्मक सुद्धा, मला मिळाले आहे असे सुखी व निरोगी जीवन सहसा इतर कोणाच्या वाट्यास आलेले पाहण्यात येत नाही. त्याचे पूजन–स्मरण–अर्चन याखेरीज त्याच्या उपकाराचे फेडीत तरी आपण काय करणार व त्यास देण्यासारखे आपणाजवळ आहेच काय ? सर्व काही त्याचेच आहे. त्यातून घेऊन त्याला अर्पण करावयाचे व उपकाराचे फेडीचा आभास उत्पन्न करावयाचा म्हणजे आपण आपलीच फसवणूक करून घ्यावयाची. मारुतीस नारळ फोडून फुलांची माळ वाहावयाची. नारळ कोणाचे व फुले तरी कोणाची ? ती काय आपण उत्पन्न केली ? त्याचे घेऊन त्यालाच द्यावयाचे व उपकार केल्याचा आभास निर्माण करावयाचा म्हणजे आपण आपलीच फसवणूक करून घ्यावयाची. मारुतीस नारळ फोडून फुलांची माळ वाहावयाची. नारळ कोणाचे व फुले तरी कोणाची ? ती काय आपण उत्पन्न केली ? त्याचे घेऊन त्यालाच द्यावयाचे व उपकार केल्याचा आभास निर्माण करावयाचा. एखाद्याकडून दहा रुपये उसने घ्यावयाचे व त्यापैकीच पाच त्यास परत करून सांगावयाचे की तुला पाच रुपये दिले आहेत; आता माझे काम कर. असे करू नये. तो कधीच फसत नाही. आपणच आपणास फसवीत असतो. निर्हेतुक भावनेने त्याचे स्मरण–पूजन–अर्चन ही त्याची खरी सेवा. याखेरीज काही करण्यासारखे आपणाजवळ नाहीच. असो. सांगावयाचे काय तर आता आमची येथील

मुदत संपत आली आहे, नव्हे संपलेलीच आहे व म्हणून हा ग्रंथ शेवटचाच असेल. बरेच लिहावयाचे होते. परंतु सर्वच अपुरे राहील म्हणून पुष्कळ ठिकाणी संक्षेप करावा लागला आहे व जरूरीपेक्षाही संक्षेपात लिहिले गेले असल्याने, काही भाग वाचकांस दुर्बोध वाटण्याचा संभव आहे. परंतु त्याला माझा इलाज नाही. मला वाटते की, संदर्भाने व खोल खोल विचार करून वाचले तर लक्षात येणार नाही, असे नाही.

या ग्रंथात काही थोड्या परंतु महत्त्वाच्या अशा अज्ञात विषयांचा व घटनांचा समावेश केलेला आहे. पुष्कळ प्रयत्न करूनही असे का व कसे घडू शकते याचा विज्ञानास अद्याप उकल झालेला नाही. परंतु याचा अर्थ असा नाही की तो होणारच नाही. कारण त्यास निसर्गात कोठे तरी स्थान आहे व ते आपणास हुडकून काढून मानवी प्रगतीस हातभार लावणे आहे. या ग्रंथात विवेचिल्या गेलेल्या विषयांपैकी समजा, अगदी थोड्या व्यक्तींस शास्त्रशुद्ध असा उकल होऊ शकला की, त्यांना ते सामान्यजनांपर्यंत पोचविता येईल. सर्वसामान्य जनता, मग त्यात भाग घेऊ शको वा न शको, तिचा लाभ त्यास मिळण्याशी कारण. सर्वच काही इलेक्ट्रिक इंजिनियर होऊ शकत नाहीत. परंतु निदान थोडे तरी होऊ शकतात व ते आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा सर्वसामान्य जनांस लाभ करून देऊ शकतात. सर्व सामान्य जनांस बटन दाबून उजेड किंवा एंजिन सुरू करून लाभ घेण्याइतके करू शकता आले तरी पुरे. आज पीटर हर्कोससारखा माणूस केवळ एखाद्या वस्तूस स्पर्श करून ती ज्याची असेल त्याबद्दल समग्र माहिती सांगू शकतो—किंवा Jean Dixon अथवा pendragon ही मंडळी भविष्य सांगू शकतात. किंवा स्पिरिट डॉक्टर लँगसारखी स्पिरिटसुद्धा चॅपमनसारख्यांचे साहाय्य घेऊन असाध्य समजली गेलेली ऑपरेशन्स करू शकतात. या किंवा यासारख्या पुष्कळ गोष्टी या ग्रंथात दिलेल्या आहेत की, ज्या आजच्या केवळ अपवादात्मकच व्यक्तींस उपलब्ध आहेत, त्या प्रयत्न करून सर्वसामान्य जनतेच्या आटोक्यात आणून दिल्या तर मी म्हणतो, एक नवीन युग सुरू होईल.

आपणाभोयती सतत हजारो—लाखो जीवात्मे फिरत आहेत. त्यांना आपणास मदत करीत टाहण्याची इच्छा आहे—परंतु त्यांची इच्छा व आपण यात एक मोठी दरी आहे. आपण त्यांच्याशी सहज संपर्क साधू शकत नाही—त्यामुळे हे फार मोठे ज्ञान प्राप्त करून घेण्याचे साधन अज्ञात राहिले आहे व त्याचा आपणास काहीही उपयोग करून घेता येत नाही. ते सर्व जीवात्मे आपलेच आहेत. काही काळापूर्वी ते आपणात जिवंत माणसे म्हणून वावरत होती—त्यांत काही चांगले तसे वाईटही असतील. परंतु त्यातील चांगल्याची निदान आत्यंतिक इच्छा अशी असते की आपणाशी सदैव संपर्क ठेवून आपणास मार्गदर्शन करीत राहावे., आपले कल्याण करावे. परंतु असा संपर्क साधण्याचा राजमार्ग आपणास उपलब्ध नाही. त्यामुळे त्याचा आपणास काहीच उपयोग करून घेता येत नाही, ना इतरांच्या दृष्टीने ना व्यवहाराच्या दृष्टीने.

मंत्रतंत्रादि काही आडमार्ग आहेत, नाहीत असे नाही, परंतु एक तर ते विश्वसनीय नाहीत व त्यांपैकी काही तसे असले तरी त्यांचा उपयोग फक्त काही अपवादात्मक व्यक्तीच करू शकतात. या संदर्भात खूप प्रयत्नपूर्वक संशोधन करून त्यांच्याशी कोणासही संपर्क कसा साधता येईल याचा राजमार्ग शोधून काढता आला पाहिजे. आज मानव चंदावर जाऊ शकतो त्यापेक्षा हे कठीण नाही. खरे म्हणजे हे विषयच उपेक्षित आहे. विचारवंतांनी यात लक्ष घातले व प्रयत्न केला तर मला वाटते, एका दशकातच हे साध्य होऊ शकेल. केवळ ज्ञानोपासना म्हणून करावी- त्यापासून झाला तर फायदाच होईल. कदाचित थोडेफार नुकसानही होईल. परंतु त्याचा विचार शास्त्रज्ञांनी करावयाचा नसतो. अग्नी जाळतोही व अन्नही शिजवतो म्हणून काय त्याचा शोध लावायचा नाही ? अॅटमचे तेच झाले. केवळ ज्ञानोपासना करीत असता त्याचा शोध लागला व तो भस्मासुर होऊन बसला.

हा ग्रंथ मी केवळ कोणाची करमणूक व्हावी या उद्देशाने लिहिलेला नाही किंवा नुसत्या ज्ञानार्जनाकरताही नाही. नुसते कळून किंवा माहिती होऊन काय उपयोग आहे. कळूनसुद्धा आपण आहो तेथेच राहणार असलो तर न कळलेलेच काय वाईट ? आपणास आतापर्यंत काहीच माहिती नव्हते म्हणून काही बिघडले नव्हते. मी म्हणतो प्रत्येक वाचकाने या ग्रंथातील अनुक्रमणिकेवरून नजर फिरवावी सर्व ग्रंथ एकदा तरी काळजीपूर्वक वाचावा व त्यातील कोणत्या विषयात आपण संशोधन करू शकू, तो निवडून काढावा व त्यात चिकाटीने संशोधन सुरू करावे मग ते इतक्या चिकाटीने असावे की शेंडी तुटो वा पारंबी—हाती घेतलेले कार्य पूर्ण झाले पाहिजे. एकच एक ध्यास व त्याचाच अभ्यास. कदाचित त्यात तुम्हास तुमचे आयुष्याचे अखेरीपर्यंत पूर्ण सिद्धी मिळाली नाही तर त्याची खंत करू नये. दुसऱ्या एखाद्या लायक व्यक्तीस झालेल्या कार्यांचा संपूर्ण आढावा समजावून सांगा; तो पुढे संशोधन चालू ठेवील, तुम्हास इतर काही करण्याचे साधन नसेल—पैसा नसेल, उपकरणे नसतील, कोणाची मदत नसेल तर नुसते चिंतन करा— त्यातून तुम्हास प्रकाश दिसेल; मार्गदर्शन मिळेल व सहाय्यकही आपणहून तुमच्याकडे चालत येतील. पुणे—मुंबई- नागपूर व महाराष्ट्रातील आणखी काही प्रमुख ठिकाणी जर असे करणे शक्य झाले की प्रत्येक ठिकाणी दहा पंधरा मंडळींनी मिळून एक चिंतन-मंडळ स्थापन करावयाचे व त्यातील एकाने किंवा दोघा-तिघांनी मिळून त्यांचे आवडीचा असा या ग्रंथातील विषय निवडून काढावयाचा असे सर्वांनी करावयाचे म्हणजे मंडळ निदान पाच-सात विषय तरी एकाच वेळी हाताळू शकेल. त्यातील प्रत्येक व्यक्तीने निवडलेल्या विषयावर जितकी म्हणून पुस्तके मिळतील तितकी वाचून काढावयाची. त्या त्या बिषयासंबंधी जितकी म्हणून मंडळी भेटतील त्यांच्याशी त्यांच्या त्या त्या बिषयाबद्दल किंवा अनुभवाबद्दल चर्चा करावयाची व त्यासंबंधी टिपणे करून ठेवावयाची. मंडळाचा नियम असा असावा की, आठवडयातून एका ठराविक दिवशी,

ठराविक वेळी निदान एक तास व महिन्यातून एक वेळ दोन तीन तास एकत्र आपण काय काय केले व काय अनुभव आला यासंबंधी चर्चा करावयाची व त्या सर्वांतील निष्कर्ष एके ठिकाणी नाववार लिहून ठेवावयाचे व एकंदर कोणत्या विषयात किती कार्य झाले, होत आहे व कितपत प्रगती होत आहे (याची नोंद ठेवावयाची) कोणाकडेही जमणे असेल तर कटाक्षाने असा नियम ठेवावा की त्या बैठकीत कोणाच्याही खर्चाने चहा सुद्धा होऊ नये. कोणास शक्य असते; कोणास नसते; मग ज्यास शक्य नसते तो मंडळात येण्याचे किंवा आपलेकडे बोलावण्याचे टाळण्याचा प्रयत्न करतो. मग ते मंडळ टिकू शकत नाही. काही कारणाने एखाददुसरे वेळी आपल्याकडून काहीच कार्य झाले नाही तरी हजर राहून इतरांचे काय कार्य झाले आहे ते पाहावे व त्यात काही व्यवहार्य सूचना असल्या तर त्या कराव्या. मंडळास फक्त एखादा स्वयंस्फूर्तीने होणारा सेक्रेटरी असावा. व दर तीन किंवा चार महिन्यांनी दुसरा स्वयंस्फूर्तीने होणारा पुढे यावा. त्याने मंडळाच्या सभेचे व टिपणे वगैरे ठेवण्याचे काम स्वयंस्फूर्तीने करावे. अध्यक्ष उपाध्यक्ष कोणी नसावा व कसलाही फंड नसावा. मंडळास एखादी जागा उपलब्ध झालीच तर त्यात सभासदांनी सभासदास वाचण्याकरता अगर मंडळास म्हणून त्या त्या विषयावरील पुस्तके द्यावीत. गावोगावच्या अशा मंडळांशी संपर्क ठेवीत असावे. व त्यात तू, मी असे न करता त्यागबुद्धीने कार्य करीत राहण्याची प्रवृत्ती ठेवावी. म्हणजे एक वर्षाच्या अवधीत पुष्कळ प्रगती झालेली दिसून येईल.

मंडळाची माहिती झाली म्हणजे त्या त्या विषयासंबंधी ज्ञान असलेले तसेच जिज्ञासू भेटी देऊ लागतील व लवकरच मार्गदर्शन वगैरे मिळून कार्य उत्तरोत्तर प्रगत होत आहे असे आढळून येईल. यासंबंधी योग या प्रकारणात बरेच सांगितले आहे ते पुन्हा वाचावे. यापैकी काही भाग जरी आमलात आणला गेला तरी माझी खात्री आहे की, दहा वर्षांत आश्चर्यकारक प्रगती झालेली दिसून येईल. मंडळात जातिभेद, धर्मभेद, अधिकारभेद, वगैरे चुकूनही नसावेत. मंडळ म्हणजे मंडळ. त्यात सर्व सारखे. ना कोणी कनिष्ठ ना वरिष्ठ. ज्यांना तशा भेदाची आवश्यकता वाटत असेल त्यांनी अशा मंडळापासून लांब राहावे हे बरे. अशी झालेली प्रगती पाहावयास मी नसेन, ती गोष्ट निराळी. अक्रोडाचे झाड त्याचे फळ स्वतः खाण्यास मिळावे म्हणून लावावयाचे नसते.

आजपर्यंतचा इतिहास असा आहे की, भारताने जगाला अध्यात्म दिले आहे व ते ऋण जगाने पण मान्य केले आहे. हाही अध्यात्माचाच एक भाग आहे व त्यात विशेष म्हणजे हे विज्ञानमय अध्यात्म आहे. ही नुसती विचार-साधना नाही; तर प्रत्यक्ष दैनंदिन मानवी जीवनात क्रांती करून ते जास्त सुखी व समृद्ध करील असे आहे व ते सर्वसामान्य जनांस त्याचप्रमाणे शास्त्रज्ञांनासुद्धा पटून त्यांना कार्यप्रवण करील असे आहे. खरोखरी म्हणजे हल्ली सरकारसुद्धा आपलेच आहे व

CS CamScanner

सरकार म्हणजे काही वस्तू नाही तर ते तुमच्या—आमच्यासारख्या माणसांनीच चालविलेले आहे. याकरता प्रयत्न करून त्यापैकी कोणास नीट समजावून सांगता आले तर, आज सरकार निरनिराळ्या उपयुक्त कार्यांत कोट्यावधी रुपये खर्ची घालीत आहे. हे कार्य इतर कोणत्याही कार्यापेक्षा खास कमी उपयुक्त नाही. फक्त त्यांचे उपयुक्ततेची खात्री योग्य माणसाकडून योग्य व्यक्तीस पटवून देता आली तर सरकार स्वतःच हे कार्य आपणाकडे घेणार नाही असे नाही. एक गोष्ट मात्र खरी की, सरकारी काम म्हणजे थोडी वशिलेबाजी व विलंब. खरोखरी यंत्रणाच तशी आहे त्यास इलाज नाही. याकरता जनतेनेच मनावर घेऊन काहीतरी कार्य प्रत्यक्ष सुरू करावे व केलेले कार्य व त्याची पुढील दिशा सरकारास दाखवून द्यावी म्हणजे एकंदर कार्य सोपे होईल.

हे सर्व ठीक झाले. परंतु सर्व ठिकाणी काही याप्रमाणे मंडळे स्थापन करता येणार नाहीत. एक तर एका विचाराची इतकी मंडळे एकाच ठिकाणी जमणे कठीण असते व असली तरी त्यांना पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणी एकत्र येऊन विचार-विनिमय करण्यासाठी पुरेशी जागा मिळणे कठीण असते. शिवाय सर्वांस सोयीची वेळही असली पाहिजे. इतके सर्व एकसमयावच्छेदेकरून जमून येणे कठीणच असते. शिवाय पुण्या—मुंबईसारखी ठिकाणे सोडली तर लहान गावांत या विचाराची १०—१५ मंडळी असण्याची शक्यतासुद्धा कमीच. अशा परिस्थितीत जर एखाद्या व्यक्तीस अगदी तळमळीने काही करावेसे वाटले तर त्याने काय करावे ?

आपली नवीन पिढी सुविद्य आहे; विचारवंत आहे; जिज्ञासू आहे. परंतु परिस्थिती दिवसेंदिवस अशी बिकट होत चालली आहे की, त्यांना चांगले व लोकोपयोगी असे काही करा म्हटलें तरी ते जमू शकत नाही. सर्वांचा आपला एकच सूर की, महाराष्ट्रीय म्हटला की, शिक्षण संपले की नोकरी पाहू लागतो व प्रयत्नाने ती मिळाली की, सर्व जीवन त्यातच व्यतीत करण्यात धन्यता मानू लागतो. खरे आहे. परंतु असे का याचा कोणी विचार करीत आहे काय ? इतर काही करावयास मिळाले व त्यात तसा खूप पैसा मिळत असला तर तो त्यास नको असतो काय ? बुद्धिमान व कर्तबगार अशा व्यक्तींची सरासरी पाहिली तर असे आढळून येते की, शेकडा ९० चे वर अशा व्यक्ती मध्यमवर्गांतूनच पुढे आलेल्या असतात. हल्ली एकंदर शिक्षण व सध्यमवर्ग यांची स्थिती काय आहे याचा पण विचार व्हावयास हवा. मला आठवते, मी सन १९१८ साली मॅट्रिक्युलेशनचे परीक्षेस बसलो होतो—त्या वेळी कराचीपासून गुजराथ, महाराष्ट्राचा काही भाग, कन्नड ते थेट गोव्यापर्यंत एकच युनिव्हर्सिटी व एकच परीक्षा होती. केंद्रे फक्त सहा व विद्यार्थी सहा हजार. त्यांपैकी फार तर तीन हजार उत्तीर्ण होणार होते. त्यावेळी सुद्धा सुशिक्षित मंडळींच्या तोंडी भाषा होती की, इतकी मुले पास झाली तर पुढे काय करणार ? त्यांचे कसे व काय होणार ? आता तर काय एकट्या महाराष्ट्रात दीड लक्ष मुले S. S. C. ला बसतात व त्यातील निदान एक लक्ष उत्तीर्ण होतात. त्या वेळेच्या मानाने आजची

परिस्थिती कितीतरी बिकट आहे. सन १९३८ साली सर्वसाधारण नित्योपयोगी वस्तूंचे जे भाव होते त्यात आता कमीत कमी १५ पट वाढ झालेली आहे. शिकुन तयार होणारांची संख्या सुद्धा १५ पटींपेक्षा कमी नाही. त्या मानाने पगार किंवा जागा काही पंधरापटीने वाढलेल्या नाहीत. पोसावयास लागणारे कुटुंब त्या मानाने मोठे व उत्पन्न कमी, त्यामुळे घरातील कर्ती माणसे दोन्ही तोंडे मिळविता मिळविता मेटाकुटीस आलेली असतात व आपला मुलगा शिक्षण संपवून आपल्या जीवनयात्रेस केव्हा हातभार लावतो याची ते वाटच पाहात असतात. मुलांचे शिक्षण पुरे करता करताच मिळत असलेले सर्व तर खर्ची पडतेच; परंतु कारणपरत्वे कर्जभार पण झालेला असतो. त्यामुळे शिक्षण संपताच मध्यमवर्गीतील कुटुंबातील मुलांस उसंत अशी मिळतच नाही. काय वाटेल ते करून त्यास आपल्या कुटुंबाचे खर्चास हातभार लावावाच लागतो. मग त्याचे ध्येय, आकांक्षा काहीही असोत. काही कुटुंबात तर मुलींना याच कारणाकरता आपल्या लग्नावरसुद्धा पाणी सोडून द्यावे लागते. अशा परिस्थितीत नोकरी पाहण्याशिवाय तो करीलच काय ? त्यास दुसरा पर्यायच नसतो. उदात्त तत्त्वे बोलावयास ठीक असतात, परंतु नुसत्या तत्त्वचिंतनाने दुपारी बाराची वेळ भागत नाही हे उपदेशकांनी ध्यानात ठेवावे. ज्यांना प्रत्यक्ष परिस्थितीच्या दिव्यातून जावे लागते तेच जाणू शकतात.

आपल्या देशात सरकार आता आपले आहे व त्यांच्यात आपसातील हेवेदावे कितीही चालू असले तरी त्यातून देशाच्या कल्याणाचे सुद्धा काही पर्याय सुरू आहेत, हे निर्विवाद. हल्ली एक प्रथाच पडली आहे. कोणीही उठावे व सरकारवर टीका करावी. ज्यांना घरातील कटकटी मिटविता येत नाहीत, पत्नी व मुले यांच्याशी असलेले मतभेद मिटविता येत नाहीत, ते सर्व उठून मंत्रिमंडळे व देश आपसातील दुहीने कसे अधोगतीस जात आहे याचे चित्र मोठ्या तावातावाने रंगवीत असतात. बोलणे फार सोपे असते, परंतु कुटुंब–प्रमुख होऊन कुटुंबातील मतभेद ज्यांना मिटविता येत नाहीत त्यांनी देश–परदेशामधील सर्वप्रकारच्या राजकारणाची चर्चा अगदी अधिकारवाणीने करावी हा एक प्रघातच पडून गेला आहे. त्याशिवाय त्यांचा वेळ तरी कसा जावा ? अर्थात याचा अर्थ असा नाही की मी सरकारची तरफदारी करीत आहे. सरकार म्हणजे तरी माणसांचेच बनलेले आहे. मुख्य मंत्री किंवा महामंत्री असला तरी तो मानवच आहे व त्यात सर्व मानवी गुण–दोष असणारच. नुसते गुणदोषच हुडकून काढावयाचे व चांगले काही असले तरी त्याकडे दुर्लक्ष करावयाचे हे बरे नाही. सर्व दोष मान्य करून सुद्धा सरकार आपल्याकरता काही चांगले करीत आहे हे मान्य करावे लागेल. उदाहरणार्थ पंचवार्षिक योजना या तपशिलात गुंतागुंतीच्या व अनिष्ट वळणाच्या आहेत हे मान्य करूनही त्यातून काही चांगले निष्पन्न होत आहे ही गोष्ट खरी आहे. अपेक्षेइतके नसेलही पण निदान पूर्वीच्या राजवटीपेक्षा पुष्कळ चांगले आहे हे कबूल करावयास काय हरकत आहे ? या योजनांनी देशाची परिस्थिती हळूहळू

सुधारत आहे हे मान्य असले तरी त्याचा डांगोरा पिटण्यासारखे निदान अजून तरी काही अनुभवास आलेले नाही व येत नाही. सरकारतर्फे मोठ्या प्रौढीने सांगण्यात येते की, सन १९३८ साली दर माणशी दरसाल उत्पन्न केवळ ३० रु. होते व ते आता रु. ३०० च्या वर आहे. गोष्ट खरी आहे, परंतु उत्पन्नाचा मोठा भाग कोणाच्या वाट्यास जात आहे व त्याची काय वासलात लागत आहे याची काय सरकारला कल्पना नाही. असे आकडे दाखविणे म्हणजे लोकांची दिशाभूल करणे नव्हे काय ?

एकदा काय झाले, एका नदीच्या किनारी एक संख्याशास्त्रज्ञ उभे होते. तेथे एक लहान मुलगा आला. त्यास पलीकडे जावयाचे होते. त्याने शास्त्रज्ञास विचारले की, पाणी किती खोल आहे ते सांगाल काय ? मला पलीकडे जावयाचे आहे. त्यावर त्यांनी एकंदर माप घेतले. किनाऱ्यापाशी सहा इंच; पुढे एक फूट; करीत करीत सहा फूट व व पुन्हा कमी कमी होत होत पलीकडील किनाऱ्यापाशी सहा इंच. एकंदर पात्राची रुंदी व तीतील पाणी यांचा हिशेब करून त्यांनी त्या मुलास सांगितले की पाणी सरासरी दोन फूट खोल आहे व तुझी उंची साडेतीन फूट आहे. तुला पलीकडे जावयास हरकत नाही. त्याच्या सांगण्यावरून तो मुलगा पाण्यात शिरून पलीकडे जाऊ लागला व खोल पाणी येताच बुडू लागला, म्हणून त्याने त्यांना मदतीकरता हाक मारली. त्यावर त्यांना आश्चर्य वाटले व त्यांनी आपले गणित पुन्हा तपासून पाहिले व गणित बरोबर आहे व त्यात काही चूक नाही अशी खात्री पटताच, मुलगा बुडत आहे हे खोटे असून त्याच्या ओरडण्यात काही अर्थ नाही असे ठरवून शास्त्रज्ञ पाठ फिरवून चालू लागले. बराचसा हाच प्रकार आपल्या देशात चालू आहे.

पंचवार्षिक व इतर योजनांनी देश प्रगतिपथावर दिसत असला तरी तपशिलात मात्र असे दिसून येत आहे की श्रीमंत वर्ग गर्भश्रीमंत होत चालला आहे. गरीब गरीबच आहे व मध्यम वर्ग मात्र गरीब होत चालला आहे. हे असेच चालत राहिले तर मध्यमवर्ग साफ नाहीसा होऊन केवळ दोनच वर्ग उरतील—गरीब व श्रीमंत. एक गोष्ट नेहमी ध्यानी असू द्यावी की, मध्यमवर्ग हा गरीब व श्रीमंत यातील दुवा असतो तो दोन्ही वर्ग समतोल ठेवण्यास मदत करतो. तोच नाहीसा झाला की क्रांती वाटचाल चालू लागते. फ्रान्सचा इतिहास फार जुना नाही. सन १७९२ च्या रक्तक्रांतीच्या वेळच्या हकीकती नमूद आहेत, त्यावेळी सरदार सरकारी अधिकारी, राजा व त्याचे नातेवाईक खूप श्रीमंत व सर्व प्रकारचे विलास व ऐश्वर्य भोगणारे असे होते; तर बाकीची प्रजा रोग, उपासमारीने तळमळणारी—दरिद्री व रोगराई व भुकेने पीडित अशी होती. त्यावेळची हकीकत सांगतात. राजे, सरदार किंवा श्रीमंत लोक आपले चार-सहा-आठ असे घोडे लावलेले गाडीतून सहलीला निघत व ते रस्त्याने जाऊ लागले म्हणजे भुकेने पीडलेले लोक रस्त्याने दीनवाणेपणे आडवे पडून अन्न व पैसे यांची याचना करीत. गाडीत बसलेली मंडळी बेदरकारपणे गाड्या हाकीत जात व असे करताना या दीनदुबळ्यांपैकी कोणी गाडीखाली येत व

चिरडून जात अशा वेळी त्यांना गाडया थांबविणे भाग पडत असे, परंतु थांबवून ते करीत काय-तर त्या लोकांच्या हाडांनी त्यांचे घोडयांना काही दुखापती झाल्या की काय यांची पाहणी करीत व गरीब जनतेला चाबकांनी मारून दूर करून आपला रस्ता मोकळा करीत. त्याचा परिणाम काय झाला ते इतिहासविश्रुतच आहे. काळ काळाचे काम करीत असतो; मग परिस्थिती कशीही असो– कोणीही व्यक्तींनी, अगर समाजांनी अगर राजकारणी पुरुषांनी गर्व करू नये. जनता-सेवेचे व्रत अंगीकारले आहे ते सेवाभावी वृत्तीने, निरलसपणे व त्यागबुद्धीने पार पाडीत राहावे व काळास हस्तक्षेप करावयाचा प्रसंग आणू नये. देशातील सर्व मंत्रिमंडळातील बहुसंख्य मंत्री मध्यमवर्गातीलच आहेत. मंत्रीच काय परंतु बहुसंख्य कार्यकर्ते, वकील, डॉक्टर व देशाच्या उन्नतीस हातभार लावणारा सर्व समाज मध्यमवर्गातील आहे. याकरता देशाचा गाडा सुरळीत चालावा असे वाटत असेल तर सत्ताधाऱ्यांनी वाटेल तो प्रयत्न करून मध्यमवर्ग टिकवून धरला पाहिजे. मात्र तसे करताना थोडा कोठे अन्याय करावा लागला तरी तो क्षम्यच ठरेल. येथे हे इतके विस्ताराने सांगण्याचे कारण अध्यात्मातील महान व त्यागी कार्यकर्तेसुद्धा मध्यमवर्गातूनच मिळू शकतात, व यापुढे ते मिळण्याची आवश्यकता आहे. सत्ताधाऱ्यांनी खरी परिस्थिती दाबून न ठेवता जनतेस आपल्या विश्वासात घेऊन सर्व परिस्थिती समजावून सांगितली तर ध्येयमार्गात येणारे अडथळे निर्मूल करण्यास जनता सुद्धा मदत करील.

आज आपले महाराष्ट्रातील मध्यमवर्ग हतबल झाला आहे व असे असले तरी देशाची सर्वांगीण उन्नती करण्यास तोच हातभार लावील.

अशी शक्यता आहे की, हा ग्रंथ वाचून एखाद्यास त्यापैकी काही तळमळीने करावे असे वाटले व त्यास मंडळ वगैरे जमविणे शक्य नसेल तर त्याने काय करावे? कदाचित सामुदायिक रीतीने पद्धतशीर असे जितके कार्य होईल तितके कोणीही एकटा करू शकणार नाही. पण म्हणून निराश होण्याचे कारण नाही. तळमळीने व तीव्र भावनेने एकट्यानेच सुरुवात करावी. एक गोष्ट मात्र हमेशा लक्षात ठेवावी की हा विषय मुळातच थोडा क्लिष्ट—आचरणास कठीण व योग्य व प्रत्यक्ष मार्गदर्शनाखेरीज एखादे कार्य पूर्ण सिद्धीस नेणे कठीण. परंतु म्हणून अडून बसू नये. व अयोग्य माणसांच्या आहारी पण जाऊ नये. त्याने सर्व कार्यनाश होऊन वेळ व पैसा फुकट जाऊन श्रद्धा पण कमी होते. योग्य मार्गदर्शक कसा ओळखावयाचा हे जरा कठीणच आहे. परंतु जो कनककामिनी व कीर्ती यांपैकी कशाच्याही अगदी थोडा का होईना पण आहारी गेला आहे असे दिसून आले तर त्याच्या वाऱ्यासही उभे राहू नका. कारण या सर्वांचा संपूर्ण त्याग हा अध्यात्माचा पाया होय व जेथे पायाच नाही तेथे इमारत कोठची? या सर्वांचा त्याग करणारे असे कोणी आढळले तर निदान ते या मार्गातील आहेत असे समजावयास हरकत नाही व त्याचाही अर्थ ते मार्गदर्शनास योग्य आहेत असे नाही, परंतु हा त्यागच जेथे नाही तेथे काहीच नाही. नुसती वासनांची घाण

आहे असे समजून दूर राहा व मार्गदर्शकाची वाट न पाहता, तळमळीने खटपटीस लागा. तुमची तयारी पूर्ण झाली की, मार्गदर्शक तुमच्याकडे चालत येईल. याकरता जप, ध्यान, त्राटक वगैरेंनी कशी सुरुवात करून वाटचालीस प्रारंभ करून चालू लागावयाचे, यासंबंधी सविस्तर वर्णन ‘ योग ’ व पुढील ‘ पुरवणी ’ या प्रकरणात दिलेले आहे ते वाचकांनी पुन्हा वाचावे. त्यांची पुनरुक्ती येथे करीत नाही. फक्त पुनरुक्ती इतकीच करतो की, कोणतीही अध्यात्मसाधना सुरू करण्यापूर्वी व चालू असताना परिमित व पवित्र आहारविहार यांची अत्यंतिक आवश्यकता असते. ती नसेल तर कोणत्याही साधनेच्या सिद्धीची अपेक्षा करू नये.—त्याचप्रमाणे कोणतीही सिद्धी केवळ स्वार्थाकरता मिळविण्याचा प्रयत्न करू नये. आपणाला मिळालेली सिद्धी इतर सर्वसामान्य जनतेस सुलभतेने कशी मिळू शकेल निदान तिच्या योगाने सामान्य जीवन आहे त्यापेक्षा सुखी व समृद्ध कसे करता येईल हे ध्येय असावे. म्हणजे तुम्ही यशाची वाटचाल लवकर लवकर क्रमू लागाल आणि योग्य व आवश्यक मार्गदर्शनही मिळेलच मिळेल. योग्य चिकाटीने व त्यागभावनेने प्रयत्न केले तर या ग्रंथात दिलेल्या पुष्कळशा गोष्टी आत्मसात करता येतील.

इतिहासाची पुनरावृत्ती होत असते असे म्हणतात. परंतु अलीकडे अशा काही घटना दृष्टोत्पत्तीस येऊ लागल्या आहेत की, ज्या इतिहासाने कधीही अनुभविलेल्या नाहीत. जगातील अण्वस्त्रांचा वाढत असलेला साठा व त्यापेक्षा वरचढ असे मानव—संहाराचे अनेक शोध की, ज्यातील काही थोड्यांनी सुद्धा अखिल मानवजात नष्ट होऊन जाईल. त्याचप्रमाणे ‘ उडत्या तबकड्या ’ या प्रकरणांवरून परग्रहावरूनसुद्धा पृथ्वीवर आक्रमण व्हावयाचा कसा धोका आहे, हे आपण पाहिले आहे. जगावर आतून व बाहेरून दोन्हीकडून असा धोका निर्माण झालेला आहे की, त्याच्या केवळ प्राथमिक स्वरूपाच्या हल्ल्यातसुद्धा सर्व मानव जात केव्हाच नष्ट होऊन जाईल. क्षितिजावर जशी सर्व मानवसंहाराची चिन्हे दाखविणारी वादळे दिसत आहेत, त्याच वेळी त्या संहारापासून वाचविणारी मंगल अशी रुपेरी कडाही क्षितिजाच्या दुसऱ्या बाजूस दिसू लागली आहेत, व ती म्हणजे रशिया, अमेरिका यासारखी राष्ट्रे. उडत्या तबकड्यासंबंधी धोका उमगून त्याच्या प्रतिकारार्थ सर्व जग एकवटले पाहिजे ही उत्पन्न झालेली भावना होय. यापैकी कोण कोणावर मात करते हे भवितव्यताच जाणे. कदाचित कृष्णमेघ लवकर आक्रमण करून धवलरेषा नामशेष करून टाकील. अथवा धवलरेषा सर्वत्र आपली प्रभा फडकवून सर्व काळोख गिळून टाकील. इतिहासाची थोडी पुनरावृत्ती येथेच अपेक्षित आहे की, जग अशा संकटातून वाचत आले आहे व यातूनही ते सुखरूप पार पडेल, प्रश्न एवढाच आहे की अगोदरच सावध होऊन काही एक नुकसान होऊ न देता, ते असे करते की अननुभूत व अभूतपूर्व असा संहार होऊन मग त्याप्रमाणे कृती करते. प्रश्न असा आहे की, यात एक महान स्वतंत्र राष्ट्र म्हणून आपण काय भाग घेणार ?

भारताने जगास अध्यात्माचा वारसा दिलेला आहे. हजार वर्षांच्या पारतंत्र्यानेसुद्धा त्याच्याकडून तो अद्याप हिरावून घेता आलेला नाही. तो आता आपण पूर्ण जोमाने पुढे चालू केला पाहिजे. विद्वान, त्यागी, तळमळीने कार्य करणारे आपणांत अनेक आहेत. परंतु योग्य संघटितपणा—व मार्गदर्शन याच्या अभावी ते वाया जात आहेत. भारत—पाक युद्ध झाले की ज्याची युद्ध या दृष्टीने काहीही फलश्रुती झाली नाही—परंतु रोजचा पाचशे कोटींचा खर्च व अनुभवी असे सात हजार तरुण आपणास गमवावे लागले. राष्ट्रीय प्रतिष्ठा राखली गेली हे काही लहानसहान काम झाले असे मी म्हणत नाही—परंतु याच्यापेक्षा पुष्कळ अल्प खर्चात कमी नुकसानीत आपण फार मोठे जागतिक कार्य करू शकू व आपला आध्यात्मिक वारसा कायम ठेवू शकू. माझे म्हणणे आज कदाचित वाचकांना थोडे वेडेपणाचे वाटेल; परंतु ते प्रत्यक्षात आणले गेले तर भारताने आपले कर्तव्य बजावले असे होऊन त्याची उज्ज्वल परंपरा कायम राहील व सर्व जगात आदर्श म्हणून ठरेल.

समरांगणावरील जीवन म्हणजे हालअपेष्टा, त्याग व मृत्यू यांच्याशी सतत झगडा करीत राहणारे जीवनच असते. त्याचप्रमाणे त्यागमय व कष्टाचे जीवन जगण्याची तयारी असणारे असे सर्व देशांतून सर्व प्रकारच्या शारीरिक व मानसिक परीक्षा घेऊन प्रथम २० ते २५ वयाचे शंभर तरुण निवडावेत. त्यांची परीक्षा घेताना शारीरिक आरोग्यबळ व वाटेल ते कष्ट सोसण्याजोगी शारीरिक व मानसिक तयारी तर असावीच, परंतु त्यास कोणत्याही भाषेचा, प्रांताचा, धर्माचा अथवा देशाचा सुद्धा फाजील अभिमान नसावा. बुद्धिमत्ता असामान्य नसली तरी साधारण सरासरीपेक्षा बरीच वरची असावी. त्यांना ही कल्पना असावी की, कदाचित त्यांना सर्व सांसारिक, राजकीय मोह सोडून निव्वळ मानवतेच्या सेवेत सर्व आयुष्य घालवावे लागेल व असे करताना असीम हालअपेष्टा तर भोगाव्या लागतीलच; परंतु उपेक्षा, अवहेलना, कुचेष्टा या सर्वांतही यशस्वी तोंड द्यावे लागेल. त्या सर्व सहन करून शांतपणे आपले कार्य चालू ठेवावे लागेल. एकदा निवड झाली की, त्यांची सर्व प्रकारची जबाबदारी सरकारने आपणावर घेतली पाहिजे. त्यांचा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांच्या तहाहयात गरजांचा बोजा सरकारने स्वतःवर घेऊन त्यांना तत्संबंधी काळजीतून मुक्त ठेवले पाहिजे. म्हणजे ते निःशंक मनाने कसलेही त्यागमय जीवन जगण्यास तयार होतील. त्यांना निदान पाच वर्षांचा शिक्षणक्रम असावा की, ज्यात त्यांना सर्व प्रकारचे शिक्षण मिळावे. प्रथम म्हणजे लष्करी शिस्त व संपूर्ण त्यागमय जीवनाची मन व शरीर यांची तयारी. नंतर त्यांना Psychometry आत्मप्रक्षेपण किंवा अलौकिक व्याधिनिवारण हे किंवा असे काहीतरी शिकवावे की, ज्यामुळे सर्वसाधारण जनता त्यांच्याकडे एकदम आकृष्ट होऊन त्यांचे म्हणणे काय आहे ते सहानुभूतिपूर्वक ऐकून घेण्यास तयार होईल. त्या शंभरापैकी कमीत कमी दोन व जास्तीत जास्त पाच असे निरनिराळ्या देशात प्रचारक म्हणून पाठविण्यात यावेत.

प्रत्येक प्रचारकाला त्याला ज्या देशात पाठविणे असेल तेथील भाषा, रीतिरिवाज, सांस्कृतिक जीवन यांचा निदान वर्षभर पूर्णपणे परिचय करून देण्यात यावा. नंतर त्याने तेथे राहून कोणते काम करावयाचे याचे शिक्षण द्यावयाचे व ते म्हणजे देश, प्रांत, भाषा, धर्म या सर्वांपेक्षा मानवता श्रेष्ठ आहे व सर्वांनी मिळून मानवतेच्या झेंड्याखाली बंधुभावनेने एकत्र आले पाहिजे.

कोणताही अभिमान सोडणे ही मोठी कठीण गोष्ट असते. कारण लहानपणापासून आपण त्यास तेच शिकवीत आलेला असतो. मी मोठ्या कुळातला—माझी मायबोली म्हणजे सर्वश्रेष्ठ, माझा देश तर विचारूच नका. प्रथम म्हणजे खुद्द प्रचारकालाच हे सर्व सोडून मानवता हाच देश, हाच एक धर्म व हीच एक संस्कृती हे आत्मसात करून घ्यावयास काही वर्षे लागतील. मग इतरास ते पटवून त्यासारखे करण्यास किती श्रम व सायास लागतील याची कल्पनाच केलेली बरी. मानवता म्हणजे काय याची कल्पना मी थोडीशी पुढील ‘ पुरवणी ’ या प्रकरणात दिलेली आहे. श्री बुद्धदेवानंतर असे प्रचारक पाठविण्याची प्रथा पडली होती. परंतु पुढे ती बंद पडली. आता पुन्हा सुरू झाली पाहिजे व ती भारतानेच केली पाहिजे. प्रथम प्रथम सर्वांकडून उपेक्षा होईल; कुचेष्टा होईल; छळसुद्धा होईल. परंतु हळूहळू ते सर्वांस पटू लागेल व एकदा ते वारे सुरू झाले की लवकरच ते वावटळीचे स्वरूप धारण करून सर्व जगास व्यापून टाकील. आज म्हणा की, शंभर वर्षांनी म्हणा असे होणे अटळ आहे. मानव समाज अस्तित्वात राहावयाचा असेल तर त्याला असे करून एकत्र यावेच लागेल. नाही तर नाहीसे व्हावे लागेल. भारताची ती परंपरा आहे व त्याने ती धुरा आपल्या खांद्यावर घ्यावी. सरकारने मदत तर जरूर करावी—नव्हे सरकारनेच ते कार्य हाती घ्यावे; परंतु एकदा का कार्य सुरू झाले व ते चांगले असले की, इतरांचे त्याकडे आपोआप लक्ष वेधते व ते कार्य सुरळीत वाटचाल करू लागते. भारताने ते जर आपल्या शिरावर घ्यायचे टाळले तर दुसरे कोणी ते जरूर करील. काळच एखादा महात्मा उत्पन्न करील किंवा कदाचित केलाही असेल व तो आपल्या कार्याने हजारो नव्हे लाखो लोक आपल्याकडे वळवून घेईल व अपेक्षित कार्य घडवून आणील. हे खोटे होणार नाही. ते ठरलेले आहे. फक्त कोण व किती अवधीत हे करतो एवढे पाहावयाचे आहे.

मी म्हणतो त्याप्रमाणे केवळ शंभर माणसांनी भागेल असे नाही; तर त्यास दरसाल शंभर याप्रमाणे निदान पंचवीस वर्षे पुरवठा करीत राहिले पाहिजे. नंतर मात्र परंपरा सुरू होईल व ते कार्य आपले आपणासच सांभाळून घेईल. असो. खरे म्हणजे या ग्रंथाचा हा विषय नव्हे. परंतु अनुषंगाने आले म्हणून सांगून टाकले इतकेच. काळ काळाचे काम करीत आहे व करीत राहीलही. मी म्हणतो आपले परंपरेप्रमाणे आपण त्यास निमित्त व्हावे. ही एक जागतिक पंचवीस वर्षांची योजनाच समजा. भारत सर्व राष्ट्रे व धर्म यांचे मानवता धर्मात विलीनीकरण करून स्वतः त्यात विलीन होऊन जाईल. यातच त्याचा मोठेपणा सिद्ध होईल.

आता थोडे स्वत:बद्दल सांगून हे बरेच लांबलेले प्रकरण आटोपते घेतो. बरेच दिवसांपासून एकच एक गोष्ट माझ्या मनांत सारखी घर करून राहिली आहे. पुण्यास एका ठिकाणी पूर्वी निश्चित एक शैलोदकाचा झरा होता. शैलोदकाचे पाणी सर्वरोगहारक व आरोग्यकारक असते म्हणून प्रसिद्धच आहे. असा शैलोदकाचा एक चांगला वाहता झरा हृषिकेशजवळ थोडेच अंतरावर आहे. त्रस्त अशा रुग्णांनी किंवा ज्यांची वारंवार प्रकृती बिघडत असते अशांनी तेथे दोन महिने मुक्काम करून त्या पाण्याचा फायदा करून घ्यावा असे मी आग्रहाने सांगतो व त्याच्यात कोणाला काही मार्गदर्शनही लागले तर जरूर करीन. दुर्दैवाने पुण्यातील झरा वेळोवेळी गाळ साचून जमिनीखाली गुप्त झालेला आहे. परंतु त्याचे जमिनीखालील का होईना, अस्तित्व आज दाखविता येते. त्या जागेवर एका पारद शिवलिंगाची स्थापना करून तेथे एक मंदिर बांधावयाचे. तेथे भक्त, रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांनी येऊन निदान एक तास श्रीराम जयराम जयजय राम या त्रयोदशाक्षरी मंत्राचा जप करून त्या शिवलिंगाजवळील आरोग्यदायक पाणी तीर्थ म्हणून घेऊन जावयाचे. शैलोदक, पारद शिवलिंग व नामस्मरण या सर्वांच्या प्रभावाने माझी पूर्ण खात्री झाली आहे की, पीडितांची संकटे, रुग्णांचे असाध्य समजले जाणारे आजार ही सर्व अल्पकाळातच दुरुस्त होतील व एक दोन वर्षांच्या अवधीतच त्या स्थळास पवित्र तीर्थाचे माहात्म्य प्राप्त होईल. हे बरेच खर्चाचे काम आहे. कारण नुसते पारद शिवलिंग केवळ सहा इंच व्यासाचे तयार करावयाचे म्हटले तरी त्यास सहा महिने मेहेनत व २५००० रुपयांचा खर्च आहे. याशिवाय जागा विकत घेऊन मंदिर वगैरे बांधणे इत्यादी. वाचकांपैकी कोणी अगर त्यांचे परिचितांपैकी कोणी दानी पैसेवाला भक्त हे काम अंगावर घेण्यास तयार असला तर जरूर ती सर्व प्रकारची मदत मी करीन.

सर्व वाचकांस माझी एक विनंती आहे की, त्यांनी खालील मजकूर काळजीपूर्वक वाचावा व त्यातील त्यांना किंवा त्यांचे परिचितांपैकी कोणासही काहीही माहिती असेल तर ती जरूर कळवावी. मात्र ती स्वतः अनुभवलेली अगर अत्यंत विश्वसनीय अशा व्यक्तींनी अनुभविलेली अशी असावी. त्यातील अत्यंत उपयुक्त अशी माहिती संकलित करून जनताजनार्दनाचे हितार्थ ती सर्व स्वल्प मूल्यात प्रकाशित करण्यात येईल. प्रकाशित करताना ती कळविणाराचे नाव, गाव, पत्ता वगैरे द्यावयास कोणाची हरकत असल्यास मात्र त्यांनी तसे नमूद करावे.

(१) योग किंवा तत्सम साधना आपण किंवा आपले परिचितांपैकी कोणी करीत आहेत काय व त्यासंबंधी आपले किंवा त्यांचे अनुभव काय आहेत ?

(२) भूत–पिशाच्च इत्यादींचा आपणास स्वत:स काही अनुभव आहे काय ? दगड फेकणे, सुया, विष्ठा टाकणे, कपडे फाटणे, जाळणे वगैरे काही आपण प्रत्यक्ष पाहिले आहे काय ? असेल तर केव्हा व कोठे ?

(३) उपासना अगर प्रार्थना करताना आपणास काही विशेष अनुभव आले

CS CamScanner

आहेत काय ? प्रार्थनेने अथवा एखाद्या मंत्राचे जपाने कोणाची संकटमुक्ती, व्याधिनिवारण वगैरे असे काही आपले अनुभवास आहे काय ? असले तर त्या प्रार्थना कोणत्या व मंत्र कोणते व त्यांचे विधी काय ?

(४) आपणास काही चमत्कार करणारे सत्पुरुष भेटले काय ? कृपा करून आपले अनुभवास आलेले चमत्कार व त्या सत्पुरुषासंबंधी समग्र माहिती नावगावासुद्धा कळवा.

(५) क्रिस्टल बॉल, प्लँचेट, सायकोमेट्री याबद्दल अगर तत्सम काहीबद्दल अगर भूत, भविष्य, वर्तमान यासंबंधी घटनांबद्दल काही विशेष अनुभव असतील तर ते सविस्तर कळवा

(६) मंत्र—तंत्र—जादू—भानामती यांपैकी काही आपणास प्रत्यक्ष माहिती व अनुभव आहे काय ? असे प्रयोग करणारे काही आपल्या परिचयात आहे काय ? प्रत्यक्ष काही मंत्र, तंत्र व त्यांचे विधी याबद्दल आपले अनुभवातील असे काही सांगू शकाल काय ?

(७) मन म्हणजे काय ? त्याची उन्नती कशी करवून घ्यावयाची ? त्यातील सुप्त व अपरिचित शक्ती कशा जागृत करावयाच्या याबद्दल आपणास काही अनुभव आहेत काय ?

(८) काही विशेष जडी-बुटी औषध-रसायन याची आपणास किंवा आपले परिचितापैकी कोणास माहिती आहे काय ? असाध्य रोगावर कोणास काही विशेष इलाज माहीत असतात. ते सांगू शकले तर ठीकच, परंतु त्यांची सांगण्याची इच्छा नसली तर कोणकोणत्या रोगावर हटकून लागू पडणारे असे औषध अथवा मंत्र वगैरे करून दुरुस्त करतात त्यांचे सर्व नाव, गाव व पूर्ण पत्ता.

(९) पारद व किमया याबाबत आपणास स्वतःस काही अनुभव आहेत काय ? असले तर ते सविस्तर लिहा.

(१०) आपणास सूचक स्वप्ने पडतात काय की, ज्यांचा नजीकच्या भविष्यकालात हटकून पडताळा येतो. काही उदाहरणे द्यावीत.

(११) मृतात्मे किंवा सिद्ध पुरुष यांच्याकडून दैनंदिन जीवनात काही हितकर अशा सूचना व मार्गदर्शन आपणास मिळत असते काय ? असले तर काही अनुभव व त्यांची नावे सविस्तर कळवा.

(१२) प्रस्तुत लेखकाजवळ दिव्य अशी पारद-गुटी आहे व तिचेपासून तयार केलेल्या पारदामृताने पुष्कळ असाध्य रोग दुरुस्त होतात, असा अनुभव आहे. असे काही आपणाजवळ आहे काय ?

(१३) वरीलपैकी काही किंवा दुसरे काहीही चमत्कारिक की, जे जनहिताच्या दृष्टीने उपयुक्त परंतु आजपर्यंत उपेक्षित आहे असे जे जे काही आपणाजवळ असेल ते सविस्तर कळवा.

आपणाजवळ याचा अर्थ आपण किंवा आपले परिचितांपैकी विश्वासपात्र असे कोणीही. वाचकांना हे सांगू इच्छितो की, इतरांनी आपले काही अनुभव लिहून ठेवले म्हणून मी ते आज वाचकांसमोर ठेवीत आहे. त्याचप्रमाणे वाचकांनी केले तर लोकांचा तर फायदा होईलच, पण असे सर्व अनुभव प्रसिद्ध करता आले तर कळविणाराचाही फार फायदा होईल. कारण त्याला इतर लोकांचे अनुभव कळतील. याकरता कोणताही संकोच न करता मोकळ्या मनाने सर्व अनुभव व आपले सविस्तर नाव-गाव-पत्त्यासुद्धा लिहावे मात्र काही मोबदल्याची अपेक्षा असेल तर लिहू नये. उगीच कोणाची जाहिरात करण्याची लेखकाची इच्छा नाही.

* * *

२३. पुरवणी

ग्रंथ प्रकाशित होण्यापूर्वी त्यास पुरवणी जोडण्याची आवश्यकता भासावी हा एक योगायोगच म्हटला पाहिजे. पुस्तक संपूर्ण लिहून झाल्यावर असा काही मजकूर दृष्टोत्पत्तीस आला की, तो जर ग्रंथात समाविष्ट झाला नाही तर माझ्या मते त्यात एक त्रुटी राहून जाईल, असे वाटल्यावरून सोबत पुरवणी जोडीत आहे.

गेल्या वीस वर्षांत निरनिराळे वैज्ञानिक तसेच सांस्कृतिक प्रवाह सुरू झाले आहेत. वैज्ञानिक प्रवाहास नेहमी दोन बाजू असतात. चालू युग अणुयुग असे संबोधिता येईल. त्यासंबंधी वैज्ञानिक शोध प्रथम मानवी संहाराकरिता वापरले गेले व नंतर त्यांच्या योगे मानवी जीवन समृद्ध व सुखी कसे करता येईल यासंबंधी विचारप्रवाह सुरू आहे. दुसऱ्या बाजूने म्हणजे मानवी विध्वंसनाच्या वाढीकडील प्रगतीस प्रगती असे न म्हणता अधोगती असे म्हणणेच सयुक्तिक होईल. कारण ज्याप्रमाणे अणुसंशोधन वैद्यकीय तसेच मानवी सुखसमृद्धीवर्धनाकरता चालू असून त्यात नवीन नवीन आश्चर्यकारक शोध लागत आहेत, त्याचप्रमाणे एकाच स्फोटात जास्तीत जास्त मानवी संहार कसा करता येईल हाही प्रयत्न तितक्याच किंबहुना अधिक ईर्षेने चालू आहे व त्यातही आश्चर्यकारक प्रगती सुरू आहे. आणखी काही अगामी वर्षांत वैज्ञानिक प्रगती एका निराळ्या मार्गाने प्रवाहित होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. त्यासंबंधी या प्रकरणात थोडे विवेचन करण्याचे योजीत आहे. यातील एका अंगाचा विचार ‘ हे आहे तरी काय ’ या प्रकरणात थोडा केलेला आहे.

वैज्ञानिक संशोधन आणखी एका उपेक्षित ज्ञानशाखेत सखोल सुरू असून त्याचा अद्याप विशेष गाजावाजा होऊ शकला नाही व होऊ नये असा प्रयत्न पण सुरू आहे व ती म्हणजे मन व त्याच्या सुप्त शक्ती, याचा प्रत्यक्ष सर्वसाधारणपणे उपयोग हे होय. मन हे वैयक्तिक असते. त्याचप्रमाणे ते सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय, जागतिक असेही पण असू शकते, याची आपणास क्वचितच जाणीव असते व असे असले तरी त्या सर्वांचा उगम वैयक्तिक मनापासून होत असतो. त्याच्या अभ्यासात इतर शाखा पण थोड्याफार प्रयासाने समजून येऊ शकतात. किंवा ज्ञात होतात. खरोखरी मन म्हणजे काय व ते कशाचे बनलेले आहे याची आपणास अद्याप कल्पना नाही. त्याचे फक्त ज्ञात व सुप्त Conscious and Sub-Conscious असे दोन भेद माहीत असून त्याची विविध कार्यक्षेत्रे माहीत आहेत.

वीज म्हणजे काय व ती कशाची बनलेली आहे याची आपणास कल्पना नसली तरी ती काय काय कार्ये कशी कशी करू शकते याची आपण माहिती करून घेतली असून, तिचा शक्य तितका जास्तीत जास्त उपयोग करून घेण्यात येत आहे.

CS CamScanner

त्याचप्रमाणे मनाच्या बाबतीतसुद्धा म्हणता येईल. मन म्हणजे काय याची आपणास फारशी कल्पना नसली तरी त्याची कार्ये काय काय आहेत–ती कशी कशी चालत त व त्याचा जास्तीत जास्त उपयोग कसा व कोणीकडे करून घेता येईल याकडे संशोधकांचे विशेष लक्ष वेधलेले दिसत आहे. आतापर्यंत ही ज्ञानशाखा जवळ जवळ उपेक्षितच होती व तिचा उपयोग मानवी सुखसमृद्धीपेक्षा मानवी संहाराकडे कसा करून घेता येईल, इकडे वैज्ञानिकांनी विशेष लक्ष पुरविलेले दिसत असून त्या दृष्टीने त्यांचे विशेष प्रयत्न सुरू आहेत.

पाश्चात्यांनी Conscious and Sub-Conscious असे मनाचे दोन भाग पाडलेले आहेत, तर आपण त्याचे मन, बुद्धी, चित्त व अहंकार असे चार भाग प्रामुख्याने पाडलेले असून प्रत्येक दुसऱ्यापेक्षा विरल विरलतर–तम असे आहेत. त्याची शेवटची अवस्था जी अहंकार, तेथपर्यंत मन पोहोचले म्हणजे ते विश्वमनाशी एकरूप होऊन Conscious व Sub-Conscious मनामार्फत पाश्चात्य जी कार्ये करून घेत आहेत अथवा करून घेण्याच्या प्रयत्नात आहेत त्यापेक्षा कितीतरी जास्त व महत्त्वाची कार्ये मनास बुद्धी, चित्त व अहंकार यात प्रविष्ट केल्यास करवून घेता येतात, किंवा मी म्हणतो ती आपोआपच होऊ लागतात. कारण मन हे अहंकारात विरले की ते विश्वरूप होते व विश्वात कोठे काय चालले आहे हे तर त्यास कळतेच; परंतु कोठे काही करावयाचे असल्यास अथवा घडवून आणणे असल्यास त्याप्रमाणे संवेदना प्रक्षेपित करून करवून घेता येते.

आपण बोलतो ते फार तर एका खोलीत ऐकू जाईल. परंतु आपण रेडिओ अथवा टेलिफोनने जगातील कोणत्याही भागाशी संपर्क जोडू शकतो व टेलिफोनने इच्छित व्यक्तीशी तितक्याच सहजतेने व तितक्याच वेळात संबंध जोडून बोलू शकतो. त्याचप्रमाणे मन चित्त या अवस्थेतून अहंकारात प्रविष्ट झाले की, विश्वमनाशी नुसतेच जोडले जाते असे नसून त्याशी संलग्न किंवा त्याच्याशी एकरूप होते हे म्हणणे जास्त सयुक्तिक ठरेल. त्यामुळे त्यास अशक्य असे काहीच राहात नाही. मग त्यास पाश्चात्यांप्रमाणे Conscious mind किंवा स्थिर inactive ठेवून Sub-Conscious mind जाग्रत करून त्यावरून कार्य करवून घेण्याचे अथवा काही क्रिया करवून घेण्याचे कारणच उरत नाही. पर्यायाने त्याची क्रियासुद्धा तीच होत असते. Conscious mind निर्विचार करून स्तब्ध ठेवावयाचे व Sub-Conscious mind जाग्रत करून त्याजकडून कार्य करवून घ्यावयाचे. याचा अर्थ साधारणपणे तोच होतो, कारण त्यांच्या मते Sub-Conscious mind हे जाग्रत झाल्यावर इतर कोणत्याही Sub-Conscious mind शी तत्काळ संपर्क साधू शकते व आपली संवेदना त्यात स्पंदनरूपाने परिणामकारक करवून घेता येते व नंतर ती अंतर्मनातून बहिर्मनात आणून तो संदेश त्याच्या भाषेत उद्धृत करावयाचा. या करण्यास त्यांच्या मते काल व अवकाश यांच्या मर्यादा असू शकत नाहीत.

आपल्या परिभाषेत सांगावयाचे म्हणजे मन हे बुद्धिचित्तादि तरल–तरलतरादि अवस्थांतून अहंकारात समाविष्ट झाले की, त्याचा विश्वमनाशी संपर्क जोडला जातो. अथवा ते विश्वमनरूपच होऊन जाते. त्यामुळे त्यास मानवी मनेच काय, पशुपक्षी वृक्षादिकांच्या मनाशी सुद्धा संपर्क साधणे शक्य होते व तोसुद्धा काल व अवकाश यांचा अडथळा न येता. अर्थात हे साध्य कसे करावयाचे हा एक मोठा प्रश्न आहे. आपल्या ऋषिमुनींनी हा प्रश्न सोडविला असून त्याकरता त्यांनी मार्गही उपलब्ध करून ठेवले आहेत.

एखाद्या अधिकारसंपन्न व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली त्या मार्गाने प्रयत्न करावयाचे म्हटले तर त्यास फारसे प्रयास न करता ते साध्य होऊ शकेल. पाश्चात्य अजून त्या प्रयत्नात आहेत. परंतु त्यांचा असा विश्वास आहे की, मानवी मनाची तसे करण्याची प्रबळ इच्छा झाली तर या लोकातून नाही तर इतर ग्रहगोलांवरून मदत मिळून ते कार्य सुलभ रीतीने साध्य होईल. हा त्यांचा विश्वाससुद्धा अनाठायी नाही. कारण आता तसे घडून येण्याची आवश्यकता आहे व असा इतिहास आहे की ज्या ज्या वेळी कोणतीही तीव्र आवश्यकता उत्पन्न होते त्या त्या वेळी मार्ग सापडतो अथवा कोणीतरी येऊन दाखवितो. हा निसर्गाचा नियम आहे. पूर्वीच्या एका प्रकारणात अन्य ग्रहगोलांवरून रॉकेटसदृश यानांतून येऊन काहींनी सांस्कृतिक व वैज्ञानिक ज्ञान प्रदान केले ते आपण पाहिले आहेच.

अमेरिकेतील E. S. P. Research Association foundation, Arkanas U. S. A. चे अध्यक्ष Mr. Harold Sherman हे सुप्रसिद्ध Your Mysteries and Powers of E. S P. या पुस्तकाच्या प्रारंभीच म्हणतात की—

It is coming. It will be here for most people in fifty to a hundred years, for some of us in far less time tran this and for a few of us to-day or to-morrow. Mind to mind communication is just a few steps away. Man's exploration of inner space of his own mind will soon march his exploratinn of outer space. त्यांचे असे म्हणणे आहे की ग्रहताऱ्यांशी रॉकेटसारख्या साधनांनी संपर्क साधण्यापूर्वी Mind to mind communication ची सिद्धी प्राप्त करून घेणे जास्त आवश्यक आहे. कारण, समजा त्यांच्या मते उद्या मनुष्य मंगळ अगर शुक्रावर गेला तर त्यास कमीत कमी पृथ्वीपासून पाच ते २४ कोटी मैलांवर असावे लागेल व त्यास पृथ्वीवर काही संदेश पाठविणे असेल तर निदान पाच ते चोवीस मिनिटे लागतील व तितकाच काल परत उत्तर पोचावयास लागेल व ताऱ्यांच्या बाबतीत हा काल काही वर्षांचाच नव्हे काही शेकडो, हजारो वर्षांचासुद्धा असू शकेल. या अवधीत काय काय घटना होऊन जातील याचा नियम नाही व शिवाय कालक्षेप होईल तो निराळाच. असे होऊ लागले तर space travel निरुपयोगीच नव्हे तर अशक्यच होऊन राहील व सर्व प्रगती खुंटेल.

याकरता Mind to Mind संपर्क साधणे शक्य झाल्याखेरीज Spaee Travel चा प्रयोग अयशस्वीच काय परंतु अशक्य ठरेल. या दृष्टीने श्री. Sherman यांनी त्यांचे एक स्नेही Wilking यांच्याबरोबर एकमेकापासून सुमारे तीन हजार मैलांवरून Telepahty चे प्रयोग केले. हे प्रयोग सुमारे साडेपाच महिने चालले होते व या सर्व प्रयोगांवरून त्यांनी असा निष्कर्ष काढला की, तीन हजार मैलांवरून Telepathy ने पाठविलेले संदेश काल व अवकाश यांचा अडथळा न येता केवळ तत्काळ ग्रहण करता येतात व म्हणून त्यांना असे वाटते की, अवकाशयानातील वैमानिक जर Mind to Mind communication मध्ये पारंगत असतील तर ते तसल्याच पृथ्वीवरील व्यक्तीशी तत्काळ संपर्क साधून आपले संदेश पृथ्वीवर पाठवू शकतील व तेथूनही लागलीच मिळवू शकतील.

सकृद्दर्शनी ही विचारसरणी बरोबर वाटते. परंतु माझ्या अल्पमतीस यात थोडा दोष वाटतो. दोन जुळी भावंडे असली तर ते कोठेही एकमेकापासून कितीही अंतरावर असले तरी त्यांपैकी एकास प्रकर्षाने जे वाटते तेच दुसऱ्यास त्याच क्षणी वाटू लागते किंवा त्यापैकी एकास जो आजार होतो तो दुसऱ्यास त्याच वेळी होतो. याचे कारण दोघांचेही पिंड एकाच उदरात एकमेकांचे सान्निध्यात नऊ महिने पोसलेले असतात. त्यांची शरीरे व मनेही उदरात वाढ होत असताना एकमेकांशी संलग्न असतात त्यामुळे एकास उद्‌भवलेला विचार दुसऱ्यास त्याच क्षणी उद्‌भवला, त्यात आश्चर्य करण्यासारखे फारसे नाही.

यासंबंधात एक साधा पण गमतीदार असा प्रयोग करून पाहण्यासारखा आहे. पूर्वी तारायंत्रे नव्हती, त्या वेळी हे प्रयोग बरेच प्रचारात होते. पावसाळ्यात गोगलगाई सापडतात (मृगाचे तांबडे किडे नव्हेत). त्या बावन्न पकडाव्यात व दोन दोन अशा एकंदर सव्वीस डब्यांत ठेवाव्यात व प्रत्येक डबीवर A B C D अशी Z पर्यंत लेबले लावावीत. त्यांना सुमारे १५ दिवस एकत्र ठेवून त्यांची नीट जोपासना करावी. पंधरा दिवसानंतर दुसऱ्या सव्वीस डब्या त्याचप्रमाणे A to Z लेबल लावून तयार कराव्यात व A मधील गोगलगाय A मध्ये तर B मधील B मध्ये अशी एकेक गोगलगाय काढून ठेवावी व त्या सव्वीस डब्या घेऊन कोठेही जावे व नक्की वेळ ठरवून दोघांनी सर्व डब्या उघडून बसावे व जो संदेश पाठविणे असेल त्याचे स्पेलिंगप्रमाणे त्या त्या डबीतील गोगलगाईस टाचणीने हळूच टोचावे म्हणजे त्या दुसऱ्या डबीतील गोगलगाय ती कोठेही असली तरी हालचाल करू लागेल. अशा रीतीने सर्व संदेश घेता येईल.

यातही थोडा दोष आहे व तो हा की, एखादी गोगलगाय कारण नसताही हालचाल करू लागली तर संदेशात घोटाळा होऊ शकेल अथवा एखादी काही कारणाने मरून गेली तर सर्व तारायंत्रच अकार्यक्षम होईल. प्रश्न तो नाही. साधर्म्याने मने व शरीरे अशी कामे करतात व करू शकतात याची उदाहरणे आहेत. यातसुद्धा काळ

व अवकाशाचा प्रतिबंध येऊ शकत नाही. मात्र Telepathy ची गोष्ट थोडी निराळी आहे. प्रथम ते एक केवळ प्रयोगावस्थेतील शास्त्र आहे व त्यात संदेश शब्दशः घेता येत नाहीत. तर सारांशरूपाने घ्यावे लागतात. उद्या शब्दशः ग्रहण करता येऊ लागले तरीसुद्धा त्यात एक मोठी अडचण राहते. जुळे भावंडाप्रमाणे त्यांना विचार स्फुरत नाहीत तर Telepathy मध्ये एकानें ते पाठवावयाचे असतात तर दुसऱ्याने ते ग्रहण करावयाचे असतात.

संदेश पाठविणारा आपल्या विचारांची स्पंदने ग्रहण करणाराकडे प्रक्षेपित करीत असतो व ती दुसरा ग्रहण करून त्याचे आपल्या भाषेत भाषांतर करून समजावून घेत असतो. यात एकाने संदेश प्रदेक्षित करावयाचा असून दुसऱ्याने तो ग्रहण करावयाचा असतो. संदेशाची स्पंदने प्रक्षेपित होऊन वाटचाल करून अपेक्षित व्यक्तीपर्यंत पोचण्यास काही वेळ लागणारच. मग तो किती का सूक्ष्म असेना.

मुंबईहून लंडनला केबल केली तर आपण म्हणू की, त्यास ती तत्क्षणीच मिळाली व तसे म्हणणे फारसे चुकेल असे नाही. कारण मुंबई ते लंडन हे अंतर ५००० मैलाचे धरले तर त्यास सेकंदास १८६०० मैल या प्रमाणात केवळ १|३७ सेकंद लागेल व हा काळ केवळ उपेक्षणीय आहे. त्याचप्रमाणे श्री. Sherman यांनी Mr. Wilking यांच्याशी तीन हजार मैलांवरून telepathy चे प्रयोग केले व ते त्यांना तत्क्षणीच मिळत गेले व त्यावरून त्यांनी Mind to Mind communication तत्क्षणीच होऊ शकते असे विधान केले तर त्यात विशेष चुक झाली असे म्हणता येणार नाही. कारण संक्रमणाचा वेग जर प्रकाशाइतका धरला तर त्यास केवळ १|६० सेकंद लागेल व हा काळ केवळ नगण्य असेल.

प्रक्षेपण म्हणजे गती आली. व कोणतीही गती प्रकाशापेक्षा जास्त वेगवान असू शकत नाही (या संबंधात) या सिद्धांताचे निवेदन अस्थायी ठरेल. त्याचप्रमाणे प्रक्षेपित संदेशाची गतीसुद्धा अधिक असू शकणार नाही. आपला पृथ्वीगोल अत्यंत लहान असल्याने हा प्रक्षेपणास लागणारा काळ मापता येणार नाही किंवा त्याची आवश्यकता वाटणार नाही. पण तोच मंगळ किंवा शुक्रावरून येणे असेल तर काही मिनिटांचा असेल व ताऱ्यावरून येणे असेल तर पांच वर्षांपासून हजारो लाखो वर्षांचा असू शकेल. म्हणून मूळ अडचण यामुळे सुद्धा मुळीच सुटू नाही, हे उघड आहे. कारण Telepathy ची स्पंदने एकाने प्रक्षेपित करावयाची असतात व ती दुसऱ्याने ग्रहण करावयाची असतात. म्हणजे त्यास गती आलीच हे ध्यानात असू द्यावे.

आजच्या प्रस्थापित सिद्धांताप्रमाणे गती आली की तीस नर्मदा आलीच व तिची अंतिम मर्यादा ठरलेली आहे. स्पंदने झाली तरी एकीकडून दुसरीकडे जाण्यास काही वेळ हा लागणारच व असे झाले म्हणजे मूळ प्रश्न व अडचण तशीच कायम राहते. असे काही असले तरी प्रयोग अत्यंत स्तुत्य असून त्याचा अवकाश-प्रवासा-

CS CamScanner

करता उपयोग झाला तरी मानवी जीवन सुखी करण्याकरता निश्चित उपयोगी असतील. आमच्या पद्धतीने त्राटकापासून सुरुवात करून मनास चित्तापर्यंत खेचीत नेणे फार कठीण नसते. तेथून म्हणजे अहंकारापर्यंत नेणे असल्यास मात्र प्रत्यक्ष सद्‌गुरु–मार्गदर्शनाशिवाय होऊ शकेल असे वाटत नाही.

या ठिकाणी अहंकार याचा अर्थ व्यवहारिक घमेंड असा नसून अहं + कार–म्हणजे विश्वस्वरूप असा घ्यावयाचा असतो. सर्व विश्व माझेच स्वरूपाने नटलेले आहे, किंवा ज्याच्या स्वरूपाने सर्व विश्व नटले आहे तो विश्वात्मा मीच अशी जी भावना तोच अहंकार. या विषयाचे विवेचन इतके करण्याची का आवश्यकता वाटली ते आता सांगतो.

प्रत्येक प्रश्नास नेहमी दोन बाजू असतात. एक श्रेष्ठ तर दुसरी कनिष्ठ. अणुविषयक विज्ञानाचा ज्याप्रमाणे प्रथम मानवी संहाराकडे उपयोग करण्यात आला व अजूनही त्यायोगे जास्तीत जास्त मानवी संहार कसा करण्यात येईल याबद्दल प्रयोग करण्यात वैज्ञानिक प्रयत्नशील आहेत–तसेच त्याची दुसरी बाजू म्हणजे त्यायोगे मानवी जीवन जास्तीत जास्त सुखसमृद्धिपूर्ण कसे करता येईल यासंबंधीसुद्धा प्रयोग सुरू असून त्यातही उल्लेखनीय अशी प्रगती होत आहे.

अगदी याचप्रमाणे मानसिक क्षेत्रातही दोहो बाजूंनी प्रयत्न सुरू आहेत. नुसत्या प्रार्थनेने अथवा हस्तस्पर्शानेसुद्धा असाध्य समजले जाणारे आजार दुरुस्त करता येतात–हे अजून सर्वमान्य झाले नसले तरी तसे होऊ शकते याची माहिती यापूर्वीच्या प्रकरणात येऊन गेली आहे. त्याचप्रमाणे नुसत्या विचारसंक्रमणानेसुद्धा काही विशेष कार्ये करून घेता घेतात, हेही आता अपरिचित नाही. मेस्मेरिझम, हिप्नॉटिझम सायकोमेट्री वगैरे याचेच प्रकार आहेत तसेच Mind to Mind communication संबंधी विविध प्रकारचे अनुभव संकलित करण्यास येत असून ते सर्वसाधारण सर्वांस साध्य कसे करून घेता येतील यासंबंधी प्रयोग सुरू आहेत व ते साध्य झाले तर मानव जातीस तो एक महान आशीर्वाद ठरेल यात संशय नाही. परंतु याची दुसरी बाजू–जिची अंधारात जोपासना होऊन गुप्तपणे प्रयोग सुरू आहेत ती पण लक्षात घेणे आवश्यक आहे

माझ्या माहितीप्रमाणे आता असे प्रयोग सुरू आहेत व ते बहुतांशी रशियात असावेत की, सामुदायिक विचारप्रक्षेपण फार मोठ्या प्रमाणात करावयाचे, त्यासंबंधी सर्व तंत्र मला अद्याप अज्ञात असल्याने तपशीलवार निदान आज तरी मी सांगू शकत नाही. आपल्याकडील प्रसिद्ध Rope tric ज्या प्रयोगात सांगितल्याप्रमाणे जमलेला सर्व समाज संमोहित करून त्या सर्वांस आपल्या मनात आहे तेच दिसावे अशी योजना करता येते. त्याचप्रमाणे एखाद्या विशिष्ट विचारावर एखादे प्रभावी मन केंदित करून त्याची स्पंदने हजारो, लाखो पटीने Amplify व Intensity (वृद्धिंगत) करून त्याचा प्रवाह जनसमुदायावर प्रक्षेपित करून त्याच्याकडून अपेक्षित कार्य करवून

घेता यावे असे प्रयोग व प्रयत्न निश्चित सुरू आहेत त्यात त्यांना अजून फारसे यश आले नसले तरी त्यांचे तरी त्यांचे हे प्रयोग वैज्ञानिक–कक्षेत बसत असल्याने लवकरच त्यांना त्यात यश आले नाही तरच नवल व ते प्रयोग यशस्वी झाले म्हणजे अणुविभाजनाने होऊ शकणाऱ्या कार्यापेक्षाही महत्त्वाची व मोठाली कामे त्यास करता येतील. यास एकच उदाहरण पुरेसे आहे.

दारूगोळा, शस्त्रास्त्रे आदी घेऊन लढाईच्या तयारीने समोर सैन्य उभे आहे. त्यावर अशा प्रकाराची वैचारिक स्पंदने प्रक्षेपित करावयाची की, त्यांनी हत्यारे वगैरे टाकून स्तब्ध राहावे किंवा त्याच्याही पुढे जाऊन त्यांच्याच अधिकाऱ्यांविरुद्ध शस्त्रे चालवावीत. ज्याप्रमाणे पूर्वी सैन्यातील एखादा हत्ती जखमी होऊन पिसाळला म्हणजे आपलीच माणसे तुडविण्यास मागेपुढे पाहात नसे त्याप्रमाणे अत्यंत प्रभावी व प्रबल अशा वैचारिक स्पंदनानी सैन्यातील शिपायांचे मेंदू मारून टाकून त्यांच्याकडून आपले अपेक्षित कार्य करून घ्यावयाचे, अर्जुनाने गोग्रहणाच्या वेळी संमोहनास्त्र सोडले होते त्याप्रमाणे. हे एकच उदाहरण झाले. परंतु विचार करून अशा अनेक विध्वंसक घटना घडवून आणता येतील व त्या दोन्ही बाजूंनी शक्य होऊ नयेत म्हणून अत्यंत गुप्ततेची आवश्यकता असते. कोणताही शोध फार काळ गुप्त राहू शकत नाही हे खरे असले तरी ठेवता येईल तितका काळ तसे ठेवणे हें कर्तव्य ठरते. तुम्ही विश्वास ठेवा वा नका ठेवू. पण मी सांगतो की असे प्रयोग सुरू आहेत व त्याचे दुष्परिणाम जगास जाणवू नयेत असे वाटत असेल तर आताच त्याच्या प्रतिकारात्मक प्रयत्नास लागले पाहिजे. कालपर्यंत रेडिओ, टेलिव्हिजन सारख्या अशक्य वाटणाऱ्या गोष्टी आज लहान मुलांच्या हातातील खेळणे होऊन बसल्या आहेत. त्याचप्रमाणे आज अगदी अशक्य वाटणाऱ्या गोष्टी उद्या साध्य होणार नाहीत कशावरून व त्यातल्या त्यात त्या जर विज्ञानाच्या कक्षेत असतील तर त्या निव्वळ अशक्य वाटतात म्हणून त्यांची उपेक्षा करू नये.

एखाद्याचे हाड मोडले तर ते क्षणात केवळ हात फिरविल्याने दुरुस्त होऊ शकते. अथवा नुसते बोटाने पोट कापून वेदनारहित व रक्तस्राव न होता शस्त्रक्रिया होऊ शकते किंवा १९३७ साली वारलेले डॉक्टर आज एखाद्याचे अंगात येऊन असाध्य अशी ऑपरेशन्स केवळ काही मिनिटांत व वेदनारहित अशी करणार असे म्हटले तर त्यास लोक वेड्यात काढतील; परंतु आपण या पूर्वीच्या प्रकरणात पाहिले आहे की अपवादात्मक का होईना परंतु अशा अगदी असाध्य वाटणाऱ्या गोष्टी आज घडत आहेत.

मी सांगतो की, Mind to Mind Projection चे प्रयोग सुरू आहेत व काही ठिकाणी ते बरेच प्रगत पण झालेले आहेत. फक्त ते प्रकट होण्यास थोडा कालावधी आहे इतकेच. ते प्रकार होऊन मानवास त्याचे दुष्परिणाम भोगावे लागण्यापूर्वीच Mind to Mind Communication रेडिओ टेलिव्हिजनप्रमाणे सर्व

साधारण उपयोगाकरता वापरले जाण्याइतके सुलभ करून ठेवले तर हे दुष्परिणाम निश्चित टळू शकतील. हल्ली कोणत्या दिशेने प्रयत्न चालले आहेत याची थोडी कल्पना येण्याकरता एका सुप्रसिद्ध E. S, P. वरील पुस्तकातील एक उतारा देतो. त्याचे भाषांतर इतक्या प्रभावी रीतीने देता येणे शक्य होणार नाही म्हणून मुळातूनच देत आहे त्यावरून साधारण कल्पना येईल.

Science is now experimenting with the effect of Electro Magnetic fields and their influence on human beings. Miniature transisterised devices can be placed in animal and human bodies—bringing about emotional and muscular reactions by remote control or radio waves. Post-hypnotic suggestions can be trigged as desired by radio transmission—once the individual is conditioned to receive and react to certain signals. Men and women under electronic influence can have their memory of whatever they have done or impulsed to be dissolved. The New York Times recently carried a front page story quoting Dr. David K. Krech—a professor of psychology at the University of California as saying that " Mind Control is coming. "

The implications of this announcement are more horrific in any estimation than the constant overhanging threat of the damage that can be done to human lifethrough a tomic warfare. A completely controlled human creature unable to think or feel or act for himself might better be dead.

पूर्वी निदान गुलाम पकडून बळजबरीने आणून वेठीस लावावे लागत असत किंवा त्यांची खुल्या बाजारात खरेदी—विक्री होत असे. आता तसे करावयाचे कारण उरले नाही. वरील थोडे प्रयोग अंमलात आणले गेले की लोक स्वखुशीने येऊन कायमची गुलामगिरी पत्करतील व कायदा त्यासंबंधात काही करू शकणार नाही. अमेरिकेतील बहुतांश जनता अगोदरच L. S. D. किंवा तत्सम औषधांचे सतत सेवन करून मनाने दुर्बल झालेली आहे. तिची मानासिक स्थिती अशी झाली आहे की त्यांना फारशी मानसिक प्रतिकारशक्तीच राहिलेली नाही असे तेथील तज्ञांचे मत आहे.

अशा लोकांच्या बाबतीत तर असले प्रयोग सहज परिणामकारी होऊ शकतील. याचा अर्थ इतरांवर परिणाम होणार नाही असे नाही. थोडी जास्त शक्ती खर्चावी लागेल इतकेच. मी ही दिलेली वैज्ञानिक हकीकत अमेरिकेतील आहे—रशियातील परिस्थिती यापेक्षा पुष्कळ निराळी आहे. मी यापूर्वी लिहिलेली Ampl.fication and intensification ही रशियातील आहेत. मात्र रशियाची प्रथा अशी आहे की त्यांचे कोणतेही संशोधन शंभर टक्के यशस्वी झाल्याशिवाय ते इतर जगास कळू शकत नाही. मात्र जेव्हा कळे त्यावेळी ते सर्व जगास एकदम धक्का देऊन विस्मयचकित करणारे असते. या क्षेत्रात सुद्धा रशियाकडून अशीच काही कामगिरी अपेक्षित आहे. परंतु ती केव्हा प्रकाशात येईल याचे अनुमान आज करणे चुकेल—परंतु ज्यावेळी ते प्रकाशात येईल त्यावेळी ते याहीपेक्षा जास्त भयानक आहे असे अनुभवास येईल. याकरता ही सूचना. साहजिकच यावर असे कोणी विचारील की यावर तोड काय ? यासंबंधी थोडेसे विवेचन मी यापूर्वीच केलेले आहे व प्रत्यक्ष काय करता येणे शक्य आहे याचे माझ्या मताप्रमाणे विवेचन या प्रकरणाच्या शेवटी करीन.

त्याचप्रमाणे हे प्रकरण संपविण्यापूर्वी दुसऱ्या एका तितक्याच महत्त्वाच्या विषयाचा विचार होणे आवश्यक आहे. यापूर्वी व्याधिविमोचन या प्रकरणात व्याधिविमोचनाच्या प्रचलित पद्धतीपेक्षा निराळ्या अशा विविध पद्धतीचा आपण विचार केलेला आहे. औषधाने व्याधिनिवारण करणे हा रोजचा दैनंदिन प्रकार आहे. त्यातही एक विशेष अनुभवास येत आहे की तीच औषधे जर योग्य मंत्रांनी अभिमंत्रून दिली तर ती लवकर व विशेष प्रभावी रीतीने परिणामकारी होतात. मी यापूर्वी निवेदन केले आहे की एखादी हकीकत अथवा घडलेली गोष्ट Super Normal असू शकते. परंतु Super Natural असू शकत नाही. U. N. O. सारख्या संस्थेमुळे म्हणा की अत्यंत जलद गतीच्या वाहनांच्या शोधामुळे म्हणा, जगातील सर्व देश एकमेकांच्या फार जवळ आले—असून त्यांचे आपसातील व्यावहारिक व सांस्कृतिक संबंध वाढीस लागले आहेत. एकमेकांचे विविध क्षेत्रांतील अनुभव एकमेकांस कळू लागले आहेत. त्यामुळे आजपर्यंत अज्ञात असलेल्या पुष्कळ गोष्टी कळू लागल्या आहेत.

Extra Sensroy Perception म्हणजे आपले पंचज्ञानेंद्रियाचे कक्षेबाहेरील व त्याच्या सहाय्यावाचून पुष्कळ गोष्टी घडत असलेल्या आपणास आढळून येत आहेत. परंतु त्यांची कारणमीमांसा शोधण्याचा प्रयत्न होत नाही. त्यांना Super Natural अशी संज्ञा दिली की कारणमीमांसेचा प्रश्नच उद्भवत नाही व त्यामुळे अज्ञात गोष्ट अज्ञातच राहाते. कोणतीही गोष्ट—मग ती किती का अशक्य कोटीतील असेना—Super Natural असूच शकत नाही. फार तर Super Normal असू शकेल. कारण तिचा आपले दैनंदिन व्यवहारात आढळ होत नसून, त्यापासून वैशिष्ट्यपूर्ण रीतीने ती निराळी—निदान आजचे मानवी ज्ञानास आव्हान होणारी असते.

विश्वातील यच्चयावत वस्तुमात्र मग ते सूर्य—चंद्र असोत वा मानव पशु-पक्षी—कीटक दगड-माती काही असो, या सर्व निसर्ग-निर्मित असून निसर्गाच्या नियमांचे उल्लंघन करू न शकणारे असे आहेत. ते त्यांच्याच नियमाप्रमाणे चालणारे आहेत. निसर्गाच्या बाहेर काही नाही व असू पण शकत नाही. केवळ आपणास कळत नाही

म्हणून तीस Super Natural म्हणणे केव्हाही चुकेल. सूर्य, चंद्र तारे, पृथ्वी इत्यादि उत्पन्न होऊन कोणत्याही आधारावाचून सतत फिरत आहेत. हा काय लहान चमत्कार आहे ? परंतु आपण त्यास Super Natural म्हणत नाही. मग एखादी क्षुल्लक घटना आपणास कळली नाही म्हणून तीस Super Natural असे म्हणणे केवळ धाष्टर्याचेच नव्हे काय ? आपल्या कारणमीमांसेत ती आज बसू शकत नाही. म्हणून फार तर ती घटना Super Normal असेल Super Natural नाही.

एखादी क्षुल्लक घटना Super Natural म्हटली की ती कोणत्या तरी एखाद्या अज्ञात महाशक्तीने निसर्गास डावलून घडवून आणली असे म्हणावे लागेल. असे होऊच शकत नाही. प्रत्येक घटना निसर्गातीलच आहे व निसर्गनियमांना धरूनच घडत आहे. फार तर ती आपल्या आजच्या विज्ञानाच्या कक्षेत नाही म्हणून तीस Super Normal म्हणू या व आपल्या विज्ञानाच्या कक्षा वाढवून तिचे निसर्गातलि स्थान शोधून काढूया. एखादी घटना Super Natural म्हटली तर ती कशी घडून आली अगर कशी घडवून आणता येईल, याबद्दल संशोधन करण्याचा उत्साहच राहात नाही. कारण मानव झाला तरी निसर्गातीलच आहे. तो त्याच्या कक्षेबाहेरील घटनांचे संशोधन कसे करू शकणार. याकरता कोणतीही घटना मग ती कितीही चमत्कारिक किंवा अशक्य कोटीतील असो. ती Super Normal आहे असे समजून ती कोणत्या नियमान्वये, कशी घडून येऊ शकते हे कळण्यासाठी प्रयत्न होणे मानवी कल्याणाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

अशक्य वाटणाऱ्या, अशा प्रत्यक्ष घडलेल्या व घडत असणाऱ्या थोड्या घटनांचा विचार करून त्या निसर्गाच्या नियमात कशा बसतात व त्या प्रत्यक्षात कशा घडवून आणता येतील याचा प्रत्येक वाचकाने विचार करून निदान एखाद्या घटनेबाबत जरी वैज्ञानिक खुलासा केला तरी मी केलेल्या श्रमांचा मोबदला मला मिळाला असे मी समजेन. निव्वळ वाचकांची करमणूक व्हावी हा माझा हेतू नाही. माझ्या अपेक्षेस वाचकांकडून प्रतिसाद मिळावा अशी मी इच्छा करतो. मागे बऱ्याच घटना नमूद केल्या आहेत. व आणखी थोड्या प्रत्यक्ष घडलेल्या घटनांचा निर्देश करीत आहे. वाचकांनी त्याबाबत थोडा विचार व संशोधन करावे.

मॉन्ट्रील शहराजवळ मौंट रॉयल या पर्वतावर एक थडगे आहे. ब्रदर ॲन्ड्री नावाचे एक गृहस्थ त्यागपूर्वक सर्व जन्मभर जनता उपयुक्त अशी कार्ये करीत होते. त्यांचा मृत्युसमय आला. त्यावेळी त्यांना स्वतःच्या मृत्युबद्दल विशेष असे काही वाटले नाही. परंतु यापुढे जनसेवा करता येणार नाही याचे वाईट वाटले, व म्हणून त्यांनी आपल्या सहाध्यार्यांना सांगितले की माझ्या मृत्यूनंतर माझे हृदय काढून ते एका काचेच्या पेटीत सुरक्षित असे थडग्याजवळ ठेवावे; ते माझे जनसेवेचे अखंड व्रत चालू ठेवील. त्याप्रमाणे व्यवस्था करण्यात आली. ते एका पर्वताशिखरावर असून त्यात ते सुरक्षित राहावे अशी द्रव्ये ठेवण्यात आली आहेत; व त्या पेटीत विजेचे दिवे

ठेवून सतत दिसत राहील अशी योजना केलेली आहे. तेथे जाण्याचा रस्ता बिकट आहे. तरी पण हजारो रुग्ण तेथे जाऊन व्याधिमुक्त होऊन परत येत आहेत. तेथे येताना स्ट्रेचरवरून अथवा कुबड्या घेऊन येतात व परत जाताना त्या सर्व तेथेच टाकून आपल्या पायाने चालत जातात.

१. मार्गारेट केसमेंट नावाच्या स्त्रीची हकीकत अशी आहे : ही मॉट्रील येथे जन्मलेली असून अत्यंत सुस्वरूप व स्केटिंगमध्ये निष्णात अशी होती. लवकरच ती जगातील स्केटिंगस्पर्धेत पहिले पारितोषिक पटकावील अशी सर्वांची अपेक्षा होती. दुर्दैवाने तिला स्केटिंग करताना अपघात होऊन तिचे दोन्ही पाय निकामी झाले. कमरेखालील भागाची संवेदनाच जवळ जवळ नाहीशी झाली. कोणत्याही डॉक्टरी इलाजांचा उपयोग न होऊन जवळ जवळ वीस वर्षे तिला पंगू अवस्थेत काढावी लागली. तिला हा इलाज सुचविण्यात आला व अगदी शेवटचा इलाज म्हणून ती तेथे गेली. हिवाळा संपत आला होता, तरी थंडी पुष्कळ होती. तिच्या चाकाच्या खुर्चीतून ते हृदय जेथे होते, तेथे तिला नेण्यात आले व चांगले दिसावे म्हणून प्रयत्न करून ती उठून उभी राहिली. तिला असे आढळून आले की; हळू हळू तिच्या पायात ऊब व शक्ती यांचा संचार होत आहे व थोड्याच वेळात ती खडखडीत बरी होऊन ज्या पायांची कित्येक वर्षे हालचालसुद्धा बंद होती, त्याच पायांनी ती परत चालत गेली. पुष्कळ लोक जातात आपणही जाऊन पाहावे या एकाच भावनेने ती गेली होती. बरे होऊ शकू हा तिला विश्वास नव्हता. सन १९६० च्या सुमाराची ही हकीकत आहे.

२. आणखी एक प्रकार हाताने स्पर्श करून व्याधी निवारण करण्याचा आहे. या प्रकारची बरीच उदाहरणे मागे आलेली आहेत. परंतु नवीन व्यक्तीचा परिचय होऊन वाचकांनी जरूर त्याचा फायदा करून घ्यावा या उद्देशाने थोडी पुन्हा देत आहे. हाताने स्पर्श करून व्याधी निवारण करण्यात तत्त्व असे आहे की, त्या व्यक्तीस तत्संबंधी गुप्त शक्ती असते ती हातामधून प्रवाहित होऊन रुग्णावर परिणामकारी होते. यापैकी काही मंडळींची नावे अशी आहेत : 1 Oral Roberts, 2 Kathryin Kulman, 3 Roy Jenkins, 4 Rev. A. A. Allen. ही सर्व मंडळी देशातील कोनाकोपऱ्यातून हिंडून त्यांना असलेल्या सिद्धीचा फायदा जनतेस विनामूल्य करून देत आहेत. पैकी १–२ चा उल्लेख या ग्रंथात इतरत्र आलेला आहे. आता A. A. Allen यासंबंधी थोडी माहिती देणार आहे.

अर्नोल्ड थॉमस नावाचे एक रुग्ण अमेरिकेतील ओहिओ या गावी राहात होते. त्यांना पाठीच्या कण्याचा ज्यातून सतत रक्त वाहात असे असा कॅन्सर होता व त्याने सर्व शरीरावर आक्रमण केले होते. कोणत्या क्षणी तो मुख्य रक्तवाहिनी (Artery) पर्यंत पोचून रुग्णास मृत्यू येईल याचा नियम नव्हता. त्यांनी ॲरीझोना मधील Miracle Valley येथे राहणारे Rev. A. A. Allen व तेथील Pool of

Bertha या झऱ्यासंबंधी ऐकले होते व एक शेवटचा म्हणून तेथे जाऊन प्रयत्न करून पहावा असे त्या पति-पत्नींनी ठरविले. विमानातून उतरून झऱ्यापर्यंत जाता येणे अशक्य व्हावे अशी त्यांची प्रकृती होती त्यांना बसता येणे शक्य नव्हते म्हणून कसे तरी ढकलीत चर्चपर्यंत नेले. त्यांचे शरीर सुजलेले असून वजन २४० पौंड होते. Rev. Allen यांनी त्यांना पाहाताच सांगितले की, मी तर हे प्रत्यक्ष प्रेतच पाहात आहे. तरी पण त्यांच्या अंगावर हात फिरवून त्यांनी सांगितले की, काही हरकत नाही तू बरा होशील. त्यांनी हात फिरविताच स्ट्रेचरवरून उतरून अर्नोल्ड पायाने चालू लागले. त्यांनी तीन महिन्यांत प्रथमच चांगले जेवण केले व केवळ दोन दिवसांत त्यांचे तीस पौंड वजन कमी झाले व हे सर्व होईपर्यंत त्यांनी झऱ्याच्या पाण्यास स्पर्शही केला नव्हता. त्यानंतर ते हळू हळू संपूर्ण बरे झाले.

३. Rev. Allen यांनी एकदा सांगितले की, ईश्वरी शक्ती केवळ हातामधूनच कार्य करते असे नसून, कशातूनही आपले कार्य करू शकते. असे म्हणून त्यांनी आपल्या अंगातील शर्ट काढला व त्याचे फाडून कपटे तयार केले. त्या वेळी त्यांच्यासमोर एक स्त्री चाकाच्या खुर्चीत बसवून आणली होती. तिला तीन वर्षांपूर्वी एका मोटारने धडक देऊन शंभरावर फूट फरफटत नेले होते. ठिकठिकाणची हाडे मोडून तिला हालचाल करणे अशक्य झाले होते. तिचे दोन्ही पाय निकामी झाले होते व यापुढे सुधारणा होणे अशक्य आहे असे डॉक्टरांचे मत होते. Rev. Allen यांनी आपल्या शर्टच्या फाडलेल्या पट्ट्या ज्या ठिकाणी हाडे मांसात रुतली होती त्यावर बांधल्या. थोड्या वेळात ती स्त्री खुर्चीतून उठली व कोणाच्या सहाय्यावाचून पुढे-मागे चालू लागली. तिला प्रथम खरेच वाटेना. परंतु ती संपूर्ण बरी झालेली होती. त्यांनी नंतर उरलेले शर्टचे तुकडे ठिकठिकाणच्या रुग्णांकडे पाठवून दिले. त्याचे काय झाले ते कळले नाही.

४. कॅलिफोर्नियातील आर्कॅडिया येथील मेरी पियर्सन नावाच्या एका स्त्रीशिक्षिकेचा आवाज कमी कमी होत साफ बसला व तिला काहीही बोलणे अशक्य झाले, हा एक प्रकारचा कॅन्सर असून ऑपरेशन अत्यावश्यक होते. परंतु ऑपरेशन करूनही उपयोग होईल असे नाही, असे वैद्यकीय मत पडले व नंतर जीव बचावला तर बचावेल पण आवाज मात्र निश्चित परत येणार नाही, असे निदान ठरल्यावरून ऑपरेशन न करण्याचे तिने ठरविले. सर्व वैद्यकीय व प्रार्थना इत्यादि उपायांनी काहीही फरक वाटेना म्हणून अगदी अखेरचा उपाय म्हणून ती Rev. Allen कडे आली. त्यांनी तिला Pool of Bertha चे थोडे पाणी प्यावयास दिले. प्रथम थोडा वेळ तिला ते प्यावे कसे याचा संकोच वाटला. परंतु नंतर मनाचा हिय्या करून ती ते पाणी प्याली. एक दोन चमचे पाणी पोटात जाताच तिला घशात काही विशेष होत आहे असे वाटू लागले व सर्व पाणी पोटात गेल्यावर काही क्षणांतच तिला चांगले बोलता येऊ लागले. दुसऱ्या दिवशी दुःख अजिबात थांबले व तीन-चार दिवसांत

साफ बरी होऊन ती चांगली बोलू लागली. ती आता पुन्हा शिक्षिकेचे काम करीत आहे.

या पाण्याने डोळ्याचे अशक्य वाटणारे आजार क्षणात दुरुस्त होऊन चांगले दिसू लागल्याची, तसेच पुष्कळ असाध्य समजल्या जाणाऱ्या आजारांवर तत्काळ गुणकारी ठरल्याची उदाहरणे नमूद आहेत. Rev. Allen हे दौऱ्यावर असताना हे पाणी बरोबर घेऊन हिंडत असतात.

५. अमेरिकेत एक विलक्षण दंतवैद्य आहे. त्याचे नाव Rev Williard Fuller असे आहे. त्याच्यासारखी डेन्टीस्ट्री कधी कुणी केलेली नाही व ऐकली पण नाही. जेम्स फॉले या नावाच्या गृहस्थास अनेक वर्षांपासून दातासंबंधी अत्यंत त्रास होता. त्याच्या हिरड्या अत्यंत नाजुक असल्याने त्यास नेहमी काही ना काही त्रास होत असे. सर्व दात काढून त्याऐवजी कवळी बसविली तरी हिरड्या अत्यंत नाजुक असल्याने ती धरू शकणार नाही मत पडले. दातांच्या फटीत चांदी वगैरे भरली तर ती सुद्धा टिकत नसे. अशा परिस्थितीत काय व कसे करावे याचा त्यास मोठा पेच पडला. त्यास सुमारास त्यास Rev. Fuller चे नाव कळले. यांनी नुसता हात फिरविला तरी कार्य घडून येत असे. त्याच्या शब्दांत मूळ उतारा खाली देत आहे :

Rev. Fuller by the simple laying on of his hands caused teeth to be filled with gold, silver and procelin. Stories of crooked teeth being straightened of new teeth growing into gaps.–Where teeth had been pulled and had never grown – of mouth deseases being cured and most for months inside the jaw disappearing. and even false denture plates being Corrected.

या Rev Fuller कडे श्री. फॉले आपली तक्रार घेऊन गेले. या वेळी ते इतके निराश झाले होते की यानेही काही उपयोग झाला नाही तर आत्महत्त्या करावी व या त्रासातून मुक्त व्हावे असे त्यांनी मनोमन ठरविले होते. Rev. Fuller ची प्रार्थना वगैरे आटोपल्यानंतर कोण कोण रुग्ण आहेत त्यांनी पुढे यावे म्हणून त्यांनी पृच्छा केली व प्रत्येक रुग्णाजवळून आपला डेन्टल आरसा घेऊन रोगी तपाशीत व आपला हात फिरवीत त्यांनी आपला आरसा एका स्त्रीच्या तोंडात घालून सांगितले की तुझ्या दातात दोन फटी आहेत तिला फक्त एकीचीच जाणीव होती. ते म्हणाले की दुसरी बाहेरून दिसत नाही परंतु दोहोवर आत्ताच इलाज करू या. तिच्या तोंडाशी एक पांढरा पदार्थ आत जाताना दिसला. तिला बोट घालून पाहण्यास सांगितले. तर तिला धक्काच बसला दातातील फटीत घट्ट असे लुकण बसले होते.

याप्रमाणे प्रत्येक रुग्णाजवळ जाऊन आरशाने पाहून ते हात फिरवीत. रुग्णांना तत्काळ आराम वाटल्याचा अनुभव येत असे. ते चालत चालत फॉले यांच्यासमोर

आले व त्यांनी त्यांना दाताचा प्रथमापासून कसकसा व काय त्रास झाला व होत आहे याचे सर्व वर्णन केले. की जे समजावून घेण्यास त्यांचे आजपर्यंत शेकडो डॉलर्स व काही वर्षे खर्ची पडली होती. नंतर त्यांनी त्यांच्या जबड्यावर हात ठेवला व काही बोलले. परंतु काय बोलले याचा बोध झाला नाही व ते इतर रुग्ण तपासण्याकरता पुढे चालत गेले. श्री. फॉले यांना त्यावेळी काहीच वाटले नाही व विशेष असा काही अनुभव पण आला नाही. त्यांची फट तशीच कायम होती. त्यामुळे त्यांची बरीच निराशा झाली व आपली केवळ फसगत झाली या भावनेने ते परत आले व झोपले. त्यांना सकाळी तीन वाजता जाग आली व काही तरी निराळे घडले आहे असे त्यांना वाटू लागले. म्हणून त्यांनी फटीच्या जागी आपली जीभ फिरविली तर काय आश्चर्य—त्यांना ती फट कशाने तरी भरून आलेली आहे असे आढळून आले. त्या फटीत लुकण तयार होऊन घट्ट बसले होते. त्यांनी तितक्या पहाटेस आपल्या मित्राला फोन करून ही हकीकत सांगितली.

दंतवैद्यकीत दात काढता येतो किंवा फट लुकण तयार करून तीत भरून बंद करता येते. परंतु फटीवरून नुसता हात फिरवून तेथे हवे ते लुकण तयार होऊन आपोआप बसावे हे कसे घडत असावे याचा विचार करावा.

६. डॉ. स्लोन म्हणून एक गृहस्थ कमिशन्ड ऑफिसर म्हणून ब्रिटिश सेनादलात काम करीत होते. १९४७ साली जेव्हा ब्रिटिश भारतातून परत जाऊ लागले त्या वेळी त्यांना कोणी सांगितले की, रामऋषी नावाचे एक संन्यासी काही वर्षांपूर्वी वारले असून त्यांची इच्छा तुमच्यामार्फत जनतेची सेवा करावी अशी आहे. प्रथम त्यांचा त्यावर विश्वासच बसेना. परंतु तयारी असल्यास पुढील मार्ग सांगतो. असे सांगितले गेल्यावरून त्यांनी हो म्हटले. त्यावरून त्यांना एका देवळात नेले व दीक्षा देण्यात आली व तेव्हापासून त्यांच्यात रामऋषी प्रवेश करून ते Psychic Surgery करीत असतात. हल्ली त्यांचा मुक्काम फिलाडेल्फिया येथे आहे. व्याधिविमोचन या प्रकरणात डॉ. लँग यांचे या संबंधात वर्णन आले आहे. त्याप्रमाणे Painless व Bloodless अशी यांचीही ऑपरेशन्स होत असतात. त्यांच्या अंगात ज्या वेळी रामऋषी प्रवेश करतात त्या वेळी डॉ. स्लोन यांचा चेहरा अगदी बदलून जातो व बराचसा भारतीय दिसू लागतो. त्यांनीसुद्धा पुष्कळ असाध्य समजल्या जाणाऱ्या व्याधींवर ऑपरेशन्स केलेली आहेत व करीत आहेत. त्यांची वर्णने द्यावयाची म्हणजे उगाच ग्रंथविस्तार होईल. त्यांची ऑपरेशन करण्याची पद्धत थोडी निराळी आहे इतकेच.

ब्राझीलमध्ये ज्यो पेट्रो किंवा जोस या नावाने माहीत असलेले एक गृहस्थ याच प्रकारची Psychic Operations करीत असतात. त्यांचे वैशिष्ट्य असे आहे की, ऑपरेशन करताना रक्तस्राव सुरू झाला तर त्यांनी थांब म्हटल्याबरोबर तो थांबतो व मग पुढील ऑपरेशन सोपे जाते. डॉ. फिट्झ नावाचे एक स्पिरिट जेम्स

यांचा कंट्रोल घेऊन त्यांचे मार्फत स्पिरिट सर्जरीचे काम करीत असते. डॉ. फिट्झ हे एक बऱ्याच वर्षांपूर्वी दिवंगत झालेले जर्मन सर्जन होत.

फिलिपाइन्समधील मागे वर्णन केलेल्या केवळ हाताने सर्जरी करणाऱ्या डॉ. टोनींचे मदतनीस असा त्यांचा एक शिष्य सुद्धा त्याच पद्धतीने ऑपरेशन करू लागला आहे. डॉ. टेनी यांच्या ऑपरेशनच्या अलीकडे फिल्म्स घेण्यात येऊन त्या अमेरिकेत दाखविण्यात येत आहेत. त्यात असे आढळून आले आहे की, पोटाचे ऑपरेशन करताना त्यांना त्या रुग्णाचे पोटास प्रत्यक्ष असा स्पर्श न करता केवळ काही अंतरावरून तर्जनी फिरवली व त्या ठिकाणचे पोटाचा भाग उघडा झाला—रक्त वाहिले नाही अगर त्या रुग्णास कसलाही त्रास झाला नाही. कोणत्याही प्रकारची भूल दिलेली नव्हती; ही सिद्धी त्यास कशी मिळाली असे त्यास विचारता, केवळ ध्यान व प्रार्थना यांनी मिळाली म्हणून त्याने सांगितले. त्यावरून त्यास विचारले की मग तुम्हास याच प्रकाराने भविष्याचे ज्ञान पण होऊ शकेल. त्यावरून त्यांनी प्रयत्न करून पाहतो म्हणून सांगितले व पुढील सात आठ वर्षांचे जागतिक भविष्य स्थूल मानाने १९६६ साली सांगितले व ते निदान आज १९६९ पर्यंत तरी बरोबर ठरत आहे. त्यात ठिकठिकाणचे भूकंप, जलप्रलय वगैरे आहेत. राजकीय भविष्ये मात्र नाहीत.

अशा प्रकारची आणखी पुष्कळ उदाहरणे देता येतील. परंतु ग्रंथविस्तार अगोदर बराच झालेला आहे व कोठेतरी आटोपते घेतलेच पाहिजे. यानंतर जे जे काही माझ्या अनुभवास अगर वाचनात येईल अगर वाचनाकडून चांगला प्रतिसाद मिळाला तर आणखी एखादा ग्रंथ आयुर्मर्यादा असली तर काढता येईल. वाचकांनी सुद्धा त्याचे अथवा त्यांच्या परिचितांचे असे काही अनुभव असतील तर ते जरूर कळवीत असावे.

या ग्रंथात सर्व प्रकरणे मिळून निदान शंभर एक तरी अशा घटना दिलेल्या आढळतील, की ज्यांचा आज कोणत्याही शास्त्रज्ञास खुलासा देता येत नाही व म्हणून त्यांना सुपर नॅचरल म्हणण्याकडे प्रवृत्ती होते. परंतु वर लिहिल्याप्रमाणे त्या सुपर नॅचरल नसून त्या केवळ अपवादात्मक अशाच काही व्यक्ती करू शकत असल्याने सुपर नॉर्मल मात्र जरूर आहेत. असे असले तरी त्यास निसर्गात कोठे तरी जरूर स्थान आहे व ते जगाच्या कल्याणासाठी प्रयत्नपूर्वक शोधून काढणे किंवा त्याकरता प्रयत्न करणे आपले कर्तव्य ठरते. या घटनांपैकी बहुतेक घटना अशा आहेत की त्या सहजासहजी घडून गेल्या असून त्या पुन्हा घडवून आणू म्हटले तर शक्य नसते. इतर काही अशा आहेत की त्या काही विशिष्ट अपवादात्मक अशाच व्यक्तीस साध्य असून त्यांचा जरी ते सामान्य जनतेस विनामूल्य लाभ करून देत असले तरी त्या सिद्धी निव्वळ व्यक्तिगत असल्याने त्या दुसऱ्यास देता येत नाहीत अगर शिकविता येत नाहीत. त्यामुळे त्यांच्या पश्चात एकदम एक मोठी पोकळी निर्माण होते, की जी कधीच भरून निघत नाही व जग त्यास कायमचे मुकते.

CS CamScanner

श्री. Edgar Kayce १९४५ साली वारले व त्यांची जागा त्यांचा सुविद्य मुलगा Hugh Lyn Kayce याने भरून काढण्याचा पुष्कळ प्रयत्न केला व करीत आहे. परंतु अद्याप ते शक्य झाले नाही व होईल असे वाटत नाही. याकरता प्रत्येक वाचकाने यातील एकादी तरी घटना निवडून काढून तिचे निसर्गातील स्थान प्रयत्नपूर्वक शोधून जनताजनार्दनाचे स्वाधीन करावे. प्रत्येकाने एकेक म्हटले तरी दहा वर्षांत पुष्कळ मोठे कार्य झाल्याचा आढळ होईल. साहजिकच वाचक विचारतील की हे सर्व ठीक आहे. परंतु प्रयत्न करावयाचा म्हणजे तरी कसा ? त्याची दिशा कशी असावी वगैरे. प्रयत्न तसा म्हटला तर अगदी सोपा आहे व एका दृष्टीने अत्यंत कठीण पण आहे. अशा काही व्यक्ती हुडकून काढावयाच्या की जे हिंदू, मुसलमान, पारशी, ज्यू, ख्रिश्चन कोणीही नाहीत. जे फक्त मानव आहेत. मानवता हाच त्यांचा धर्म—हाच त्यांचा देश.

मानवता हा शब्द फार व्यापक अर्थी आहे याच्या मर्यादा मानवापुरत्याच संकुचित नाहीत, तर त्याचा व्याप म्हणजे अखिल प्राणिमात्रावर अकृत्रिम प्रेम, दया, सहानुभूती असा असतो. कोणत्याही प्राणिमात्राचे मांस हे त्याचे अन्न होऊच शकत नाही. परंतु रोजच्या खाण्यात येणारे भाकरीत त्यास मानव बैलावर करीत असलेल्या जुलमाची जाणीव होत असते. बैलाने सक्तीने उन्हातान्हात कष्ट करावयाचे व त्याने काय खावयाचे तर कडबा व माणसाने धान्य. त्यास कडबा तरी काय म्हणून तर त्याने पुन्हा श्रम करावयास जिवंत राहावे म्हणून. तो म्हातारा होऊन काम करीनासा झाला की चालला कसायाकडे ! यावर कदाचित त्यास उपाय करता येत नसेल व भाकरी पण खाणे सोडून देता येत नसेल. परंतु निदान आपण किंवा आपणाकरता त्यावर किती अक्षम्य अन्याय करतो आहे याची जाणीव असेल व जाणीव असली तर पुढेमागे त्यावर उपाय पण सापडेल.परंतु जाणीवच नसली तर उपाय कुठला? त्याचप्रमाणे रोज चहा पिताना त्यातील दुधाकडे पाहून दूध देणाऱ्या गाई किंवा म्हशी व त्यांच्या मुलाबाळांवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव त्यास सतत होत असेल.

आजच्या जगातील बहुतेक धर्म व समाज ही त्यांचे खाण्याकरता होणारी प्राणिहत्या समर्थनीय मानणारे असेच आहेत. यामुळे करीत असलेल्या अगर आपणाकरता होणाऱ्या गुन्ह्याचा परिहार तरी कसा होणार ? त्यास माहीत आहे की, मासे गायी-म्हशी बोकड हे काही आपणावर फिर्याद करीत नाहीत. केलीच तर कोणापुढे ? यांच्यापैकीच कोणाकडे ! त्यांच्याकडून काय न्याय मिळणार ? यांनीच त्यांना खाऊन टाकले नाही म्हणजे मिळवली. अशा प्रकारचा संपूर्ण मानवतावादी मानव हुडकूनही लाखातून एखादा सुद्धा सापडणे कठीण याची मला जाणीव आहे. यातील कठीण असा भाग हाच आहे. असे निदान दहा पाच मानव जरी सापडले तरी त्यांचा पुढील मार्ग सोपा आहे. अशा प्रकारचा मानव स्वतःस बनविणे मात्र कठीण असले तरी अशक्य नाही. असे वागताना कितीही उपहास झाला, कितीही

विरोध झाला कितीही संकटे आली तरी आपली मानवता ज्याने टिकवून ठेवली आहे त्यास निराळी तपश्चर्या करण्याची जरूरी नाही. त्याची तीच सर्वश्रेष्ठ तपश्चर्या आहे.

भगवंत काही स्तुतीने प्रसन्न होतो असे नाही तर चारित्र्याने व वर्तनाने होत असतो. त्याचे अंतःकरण अत्यंत शुद्ध व मलरहित असे असते व ते कोणतीही सूक्ष्मातील सूक्ष्म स्पंदने ग्रहण करण्यात समर्थ असते. मी मागे सांगितलेच आहे की ज्याचे मन अहंकारावस्थेपर्यंत पोचले आहे ते सुद्धा सूक्ष्मातील सूक्ष्म असे काही ग्रहण करण्यास समर्थ असते. ते सर्व शक्तीशी तद्रूपच झालेले असते. त्याकरता अशा मंडळीपैकी कोणीही एखादा असा प्रश्न (problem) सोडवावयास घेतला व त्यावर आपले मन केंद्रित केले की, त्यासंबंधी सर्व प्रकारचा खुलासा निसर्गाकडून त्याच्यात प्रादुर्भूत होतो. आपल्यापूर्वीच्या सर्व ऋषी-मुनींनी याच पद्धतीने विश्वाची कोडी सोडवली आहेत.

न्यूटन, आइन्स्टीनसारख्यांच्या बाबतीत स्वकर्तृत्वाचा भाग निश्चित असला तरी त्यांच्यातील निसर्गातील प्रमेयासंबंधी ग्रहणशक्तीचा भाग निश्चितच सर्वांपेक्षा अधिक होता. त्यांना जास्त मार्गदर्शनाची आवश्यकताच नाही, त्यांनी फक्त एकादे प्रमेय मनांत घेऊन त्याच्याशी तद्रूप व्हावयाचे, कमीअधिक अवधीत त्याचे सविस्तर उत्तर त्यांना स्फुरलेच पाहिजे. श्री महावीर व बुद्ध, कुत्र्याच्या पोटात दुखेल म्हणून त्याचे मागे तुपाची वाटी घेऊन धावणारे श्री नामदेव, तान्हेल्या गाढवास कावडीतील गंगेचे पाणी पाजणारे श्री एकनाथ; सर्व जन्म जनताजनार्दनाचे सेवेत व त्यांचेकरता वेचणारे श्री. काळी कमळीवाले बाबा किंवा आपलेकडे श्री गाडगे महाराज, श्री. साने गुरुजी किंवा आज हयात असलेले श्री. रविशंकर महाराज व भूमिहीनांकरता पदयात्रा करीत सर्व आयुष्य वेचणारे श्री. विनोबा भावे हे खरे मानव होत. इतर कोणी नाहीत असे मी म्हणत नाही. परंतु मला माहीत आहेत त्यांपैकी काही नमुन्यादाखल म्हणून नमूद केले आहेत.

मी अगोदरच सांगितले आहे की अशा व्यक्ती लाखात असल्या तरी फार झाल्या. मला शंकाच आहे की इतक्या अपवादात्मक व्यक्तींना शक्य असलेले, बहुजन समाजाकरता म्हणून काही उपयोग नाही. सर्वसाधारणांपैकी काहींनी मनावर घेऊन काही करावयाचे ठरवले तर त्यांनी काय केले पाहिजे याबद्दल मला काय वाटते ते पण सांगितले पाहिजे. मात्र ते १०० टक्के खरे व लागू पडणारे असेलच असे गृहीत धरू नये. एक मार्ग म्हणून त्यास निश्चित महत्त्व आहे. यापेक्षा जास्त चांगला कोणास सुचला तर तो त्याने अवश्य अवलंबावा. प्रकृती, स्थल, काल याप्रमाणे काही फेरफार पण आवश्यक असतात. तेही विचारात घ्यावेत. कोणाकडून तरी ही आज अज्ञात असलेली प्रमेये विज्ञानाच्या कक्षेत आणून बहुजनसमाजास त्यांचा सदैव लाभ घेता येईल, असे केले म्हणजे झाले.

ज्या कोणास या संबंधात काही प्रत्यक्ष करावे असे वाटत असेल त्याने प्रथम

अयाचित व अपरिग्रह वृत्तीने–निरामिष–परिमित भोजन–परिमित निद्रा, पवित्र आचार, विचार यांनी युक्त होऊन आपल्या इष्ट दैवताचा किंवा ॐ नारायणाय नमः या मंत्राचा जप निदान तीन महिने रोज रात्री १२ ते ३ या काळात निदान एक तास करावा. जप करताना एक गोष्ट नेहमी ध्यानात ठेवावी. वाणी परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी अशी चार प्रकारची असते. त्यातील वैखरीचा म्हणजे मोठ्याने केलेला जप हा वाऱ्याबरोबर वाहून जातो. त्याचे काहीही संस्कार मनावर होत नाहीत व तो कोटींनी केला तरी जवळ जवळ वायाच जातो. त्यानंतर मध्यमा, तोंडातल्या तोंडात परंतु ओठ हालवून व स्वतःस ऐकू येईल या पद्धतीने केला जातो, तो मध्यमेतील जप होय. त्याचाही फारसा उपयोग होत नाही. त्यापुढील पायरी म्हणजे ओठ सुद्धा न हालविता मनातले मनात पण स्वतःला स्पष्ट अंतरंगांत ऐकू येत राहतो, तो जप पश्यंतीचा. हा जप पुष्कळ उपयोगी असतो. या पद्धतीने केलेल्या जपाची स्पंदने परिणामकारी होत असतात.

यापुढील जप म्हणजे परेतील. तो साधारणपणे गुरूच्या सान्निध्यात व त्याच्या मार्गदर्शनाखालीच साध्य होऊ शकतो. हा जप सिद्ध झाला म्हणजे त्या जपाचा शरीरात लय होऊन सर्व शरीर जपमय होऊन जाते. एकदा नारदांनी श्रीकृष्णास विचारले की तुमचे अर्जुनावर एवढे प्रेम का ? त्या वेळी अर्जुन झोपलेला होता. कृष्णांनी त्यास सांगितले की त्याच्या कोणत्याही भागास कान लावून पाहा. नारदांनी तसे करून पाहताच त्यास हात, पाय, पोट, हृदय ह्यापैकी कोठूनही कृष्ण कृष्ण असा नाद ऐकू येत होता. त्याचे मन, शरीर सर्व काही श्रीकृष्णमय झाले होते. या अवस्थेस म्हणतात की “ राम हमारा जप करे. हम बैठे आराम ”–जप असा करावाच लागत नाही. तो सतत होत राहतो तो खरा जप. तरी पण परा जप हा सर्वांकरता नाही. सर्व पथ्ये सांभाळून जर रोज रात्री एक तास पश्यंतीत निद्रा व तंद्रा यांच्या आधीन न होता तीन महिने जप केला तर त्यास निश्चित या भागातील पुढील गोष्टी करण्याची पात्रता येते. त्यानंतर त्राटकापासून सुरवात करून रोज जप झाल्यावर निदान पंधरा मिनिटे त्याच अवस्थेत जप करावा. हळूहळू मनातील विचार कमी होऊन त्यावर आपला ताबा बसू लागेल.

यासंबंधी ‘ योग ’ या प्रकरणात पुष्कळ खुलासेवार लिहिले असल्याने पुनरावृत्ती करीत नाही. विचारावर ताबा येऊ लागला असे झाले म्हणजे एखादे न सुटणारे प्रमेय घेऊन त्यावर तुमचे मन केंद्रित करा. हळूहळू प्रमेय सुटू लागेल व सवयीने लवकर लवकर सुटत जातील. त्राटक संपले की शवासन घालून हात, पाय इत्यादी सर्व इंद्रिये शक्य तर मनसुद्धा Relax करून त्याच स्थितीत निदान पंधरा मिनिटे पडून राहा. लिहिले तितके करणे सोपे नाही. सतत प्रयत्न गेल्यास हे सर्व जमण्यास निदान एक वर्ष तरी सहज लागेल. त्या मानसिक Relaxation च्या कालात किंवा झोपेतसुद्धा तुमच्या प्रश्नांची उत्तरे सुसंबद्ध अशी तुम्हास मिळत आहेत

असे अनुभवास येईल. प्रत्येकाने असे एक जरी प्रमेय विज्ञानाच्या कक्षेत आणून सोडले तरी एक मोठे मानवी हिताचे कार्य केल्याचे श्रेय मिळेल. निव्वळ करमणूक म्हणून हा ग्रंथ वाचून हातावेगळा करू नये अशी वाचकास विनंती.

इतक्या महत्त्वाच्या विषयाकडे आपल्या राष्ट्राचे लक्ष नाही हे खरोखरी आपले दुर्दैव समजले पाहिजे. पूर्वी ऋषी मुनी यांना राजाश्रय असे. त्यांची व त्यांच्या सर्व शिष्यवर्गाची निर्वाहाची काळजी राजे लोक घेत असत व त्यांना जन-सेवेकरता विशिष्ट प्रमेयावर चिंतन-मनन करण्याची सोय करून देत असत. त्यांना आपली अगर आपल्या शिष्यवर्गाची उपजीविका कशी चालेल याची काळजी घ्यावी लागत नसे. आजही कोट्यावधी रुपये केवळ प्रयोगाकरता खर्ची पडत आहेत. अगदी महाराष्ट्रीय म्हटले तरी श्री. चव्हाण-वसंतराव नाईक यासारखे सुविद्य विचारवंत पुढारी व कार्यकर्ते आपणात आहेत व असे असूनही असा महत्त्वाचा विषय आतापर्यंत दुर्लक्षित राहिलेला आहे. श्री. तर्कतीर्थ, म. म. पोतदार यांसारखे या विषयातील तज्ज्ञ आपणात आहेत. त्यांनी या विषयाकडे आपले लक्ष केंद्रित करून लवकरच काहीतरी सुरवात करावी व एखादी अद्ययावत Para Psychology ची संस्था काढावी.

आज इंग्लंड, अमेरिका या देशात हे काम जोराने सुरू आहे व त्यात ते प्रगती पण दिवसेदिवस करीत आहेत. त्यांच्यापेक्षा आपल्याकडे अधिक सुलभ जाणार आहे. त्यास थोडी चालना दिली तर अल्पकालातच त्या दिशेने खूप प्रगती झालेली दिसेल व लवकरच असा अनुभव येईल की, या विषयातील प्रगती ही अणुशास्त्र किंवा अवकाशप्रवासातील प्रगतीपेक्षा खास कमी महत्त्वाची नाही. त्याकरता एक चांगली इमारत-सुसज्ज अद्ययावत अशी लायब्ररी व लॅबोरेटरी व काही निरलस, निरपेक्ष व या विषयात प्रगत असे कार्यकर्ते यांची आवश्यकता आहे व त्यांच्या निर्वाहाची व्यवस्था त्यांना पुरेसे मानधन देऊन सरकारनेच करावी व अगदी कटाक्षाने एका गोष्टीकडे बारीक लक्ष असावे की तेथील सर्व कार्यकर्ते निरलस व निरपेक्षपणे मानवी कल्याणाच्या दृष्टीनेच कार्य करणारे असावेत. केवळ गुणवत्ता व विद्वत्ता पाहून निवड व्हावी. त्यांची निवड करताना कोणत्याही प्रकारचा हेवादावा, वशिला, मानापमान यांना स्थान नसावे. यांचा प्रवेश होत आहे असे दिसताच, कटाक्षाने निपटून काढावे. तसे झाले नाही तर आपल्या अनेक सहकारी संस्था आहेत त्यापैकी ही एक होऊन बसेल. असे होऊ नये याची दक्षता घ्यावी.

याकरता संस्थेच्या मुख्याची निवड करताना त्याची गुणवत्ता व निरपेक्ष वृत्ती-वर निवड व्हावी. त्याला सर्वाधिकार असावेत व काही अगदी विशेष कारणाशिवाय तो करीत असलेल्या कार्यात कोणी ढवळाढवळ करू नये. तसा करण्यास वाव पण ठेवू नये. संस्थेच्या अगर पैशाच्या जागेवर काही करण्यास कोणासही वाव नसावा. त्याकडे एक अत्यंत पवित्र संस्था म्हणून सर्वांनी पाहावे व शक्य ती मदत करीत

असावे. कार्यकर्ते विद्वान तर असावेतच; परंतु ते कौटुंबिक विवंचनेपासून मुक्त असावेत. प्रकृतीने सुदृढ असावेत, म्हणजे ते मोहास बळी पडणार नाहीत व प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे कार्याकडे दुर्लक्ष होणार नाही.

मी सर्व योजतो हे खरे; परंतु वाऱ्यावर न जावो म्हणजे झाले. कारण श्री. पाटसकर हे पुण्यात कुलगुरु असताना त्यांनी त्यात लक्ष घालण्याचे कबूल केले होते. त्यांना तिचे महत्त्व पटले होते व त्यांनी युनिव्हर्सिटीतर्फे काही तरी जरूर करू म्हणून आश्वासन पण दिले होते. परंतु त्यानंतर दोन वर्षे गेली तरी काही झाले नाही. त्यांचे वय व कार्यांचा व्याप यामुळे त्यांना लक्ष देऊन काही करणे शक्य झाले नाही म्हणून मी त्यांना दोष देत नाही. परंतु निष्कर्ष काय तर अद्याप काही झाले नाही. कोणतेही कार्य ठरलेल्या वेळीच होत असते व त्यावेळी ते घडण्यास व घडवून आणण्यात कोणीतरी कारणीभूत होत असतो इतकेच. तशी वेळ आता आली आहे असे मला वाटते. कोणीतरी मनावर घेऊन त्याचे श्रेय घ्यावे अशी इच्छा.

असो. येथे आमची ग्रंथमर्यादा संपलेली आहे. त्याचप्रमाणे आयुष्यमर्यादा पण संपत आली आहे असे वाटते. म्हणून 'आम्ही जातो आमुचे गावा' इतके सांगून सर्वांचा निरोप घेतो. परमेश्वरी इच्छा असेल व त्यास माझेकडून काही कार्य करवून घेणे असेल—म्हणून आयुष्यमर्यादा वाढली तर सांगतो की, बचेंगे तो और भी लढेंगे. परंतु तशी आता फारशी शक्यता दिसत नाही व तसे काही घडावे अशी इच्छा पण नाही.

ता. क.—

मी यापूर्वीचे 'हे आहे तरी काय' या प्रकरणाला साधारण ५० वर्षांनी किंवा त्याचे थोडे पुढे मागे वैज्ञानिकांचे लक्ष जडावरून चेतनाकडे वळले व मन व मानसिक अवस्था त्यातील सुप्त शक्ती वगैरेवर त्यांचे प्रामुख्याने लक्ष वेधले असे अनुमान केले आहे. त्यासंबंधात आताच त्यांचे लक्ष वेधलेले असून त्यांचे प्रयोगही गुप्त स्वरूपात का होईना चालू आहेत. याचा पुरावा मला मिळाला व तो मी या प्रकरणात पण दिला आहे. हा निव्वळ योगायोग नाही. या घटना ठरलेल्या आहेत व त्या काल परिपक्व होत जाईल तशा एकामागून एक घडून येणार आहेतच.

मी जपानी वैज्ञानिकाबद्दल जे विधान केले आहे ते सुद्धा लवकरच प्रकाशात येईल, असे वाटते.

* * *

संदर्भ साहित्य

Bibliography

1) The Super Natural
– By Philr Hırsch,

2) Strange power of prophecy – Brad Steiger.

3) The Miracal Healers
– Ambrose & Worrell

4) The Haunted Mind
– Nandoor fodor.

5) Power that be.
– Beverley Nichols,

6) Strange Horizons.
– Edirors of Borderline.

7) Occult Review.
– Bernhardot J. Hurwood.

8) Pendragon.
– Brad Steiger.

9) Experiences & Ghosts
– Martin–Ebon.

10) Out of body travel.
– Susy Smith.

11) Strange Psychic Experiences
– Editor Fate Magazine.

12) Into the Strange.
– Warrel Smith.

13) Strange Powers of Healing. – Brad-Steiger.

14) Experiences of Exohic E. S. P.

15) Clairvoyant Strangers.
– Robert Tralins.

16) Gift of Prophecy.
– Ruth Montgomery.

17) The unexplained
– Allen Spraggett.

18) Psychic Sciences
– B. and L. Gibson.

19) The Magic of Psychic Powers. – David J. Schwartz

20) Experiences in Prophecy.
– Martin Ebon.

21) True Experiences in Telepathy. – Martin Ebon

22) Psychic Healers,
– Peter Hurkos.

23) The Unknown.
– Brad Steiger.

24) Strange lives.
B. J. Hurwood.

25) Strange Hands of fate.
– P. Gibon.

26) Strange, Stranger, Strangest.
– Editors of Borderline.

27) Strange fate
– Editors Fate Magazine.

28) Strange Women of occult.
– Warrel Smith,

29) Healer's Hands.
– By J. Bernad Hatton.
30) Weird People of the unknown. – Robert Tralins.
31) Out of Body Experience
– Susy Smith.
32) World of Paranormal.
– Walter Mc Graw.
33) True Spirit Stories.
– Stuwart Robb
34) The Unknown.
(Is it nearer ?)
– Dingwal & Davis.
35) Edgar Kayce on Dreams.
– Hermon. H. Bro.
36) Prophecy in our Tune.
– Martin Ebon.
37) The Strange & Super Normal. – Pauline Satizman.
38) Secret of—Tutankhames Tomb. – Leonand Cottrell.
39) Adventures in Super Normal. – Eileen G. Carrett.
40) Jadoo.
– John. Keel
41) Scared of Death
– J. C. Barker,
42) Prediction–fact of Fallacy. – Hans Holyer
43) Stranger from skies
– Brad Stiger
44) Edge of the Unknowu,
– Conon Doyle.
45) Reincarnation
– Susy Smith.
46) Psychic Phenomena.
– Dr. Badllay.
47) Between two worlds,
– Nandoor fodor.
48) Psychic People.
49) Mind Travellers.
– Brad Steiger.
50) The Power Of Healing
– Harry Edwards.
51) On Prophecy
(Edgar Kaycee)
– Mary Ellen Carter.
52) E. S. P. Fore Warnigs
– Robert Tralins.
53) More things.
– Sanderson.
54) Strange facts
– Editors Fate Magazine
55) Jungle Magic,
– Fate Magazine
56) Strange world.
– Frank Edward,
57) Ekankar
– Paul Twitchell.
58) E. S. P.
– Harold Sherman.
59) Miracle Cures,
– Victcr Levesque
60) Experiment with time.
– J. W. Dunne.
61) University of Spiritualism

62) The Third Eye
– Theobard,
63) The Secret India
– Paul Brunton
64) The Cave of The Ancient
– Lobsong Rampa
65) Yogic Powers & God Realisation – V. M. Bhat
66) Faith Power
– Edward E. Beats
67) The Science of Psychic Healing – Yogi Ramcharak
६८) षट्चक्र दर्शन व भेदन
– श्री. म. वैद्य
६९) पातंजल योगशास्त्राचा अभिप्राय
– श्री. नानाभाई रेळे
७०) सांख्यदर्शन
– श्री. विवेकानंद
७१) राजयोग
– श्री. त्रिवेकानंद

* * *

सूचि

अ

अक्कलकोटचे स्वामी ९६, १६३
अंकोलकल्प २९६, २९७
अंजनाचे उपयोग १३१, १३३
अजानवृक्ष २५९, २६८, २६९
अण्वस्त्रे २२, २६
‘अथर्ववेद’ २६, २९३, २९४
अध्यात्म १, ३, ७ १६
‘अमृततुषार’ १, ७, ७१, ९८, १९५
‘अमृतानुभव’ ४१
अलेकझँडर (शिकंदर) ८
अवकाश (युग) ३१, ३२
अष्टांगयोग २६७, २७२
ॲलन रेव्हरंड ३८९, २८९
आइनस्टीन २५, ३१, ३३
आकाशगंगा ३१४, ३१६

आत्मप्रक्षेपण १५३, १७०
  पद्धती १६८–१६९
  धोके १७०
आत्मशक्ति २७०
आत्मसंशोधन ४४, ४५, ५१
आत्मसूचना १८७, १८८
आत्मस्वरूप १६७
आयसेनहोअर २१
आर्मस्ट्रॉंग ७, ८
ऑटोस्कोपी १६१

उ

उडत्या तबकड्या १०, ११, ३११, ३१२, ३२०, ३२१, ३०२, ३०६, ३०८, ३०९, ३७३
उदक शोध (व प्रयोग) १७६, १७७
उपद्रवी स्पिरीटस ३६३, ३६४

ए

एकंकारविद्या १६६, १६७
एकनाथ ३९४
‘एकनाथी भागवत’ २५९
एगर ९५
एडमंड हॅले ३१३
‘एव्हिडन्स ऑफ स्पिरिच्युअल हिलिंग’ २२६

ओ

ओल्गा वॉरलचे प्रयोग २२१, २२३

औ

औषधी शैलोदके (उदके) २५५, २५६, २५७, २५८

क

कन्फ्यूशियस १३८
काजळाची रीत १३३

कार्ले सेगम ३१४, ३२१
काळी कमळेवाले बाबा ४०९
काळी विद्या १३९, २७१
कीर्ति ४९
कुंडलिनी जागृति २७७, २७८–२८४
कुंडलीविज्ञान ९८
कृष्ण ४२, ४९, ७४
केनेडी ४९, ३२२, ३२९
केसी ६९, ९५, १३०
कौरव ७५
क्रिस्टल गेझिंग ८३
क्रिस्टल बॉल १२३, १२४

ख

खरी ठरलेली भविष्ये ७०, ७९
खिस्त ४२, ४९

ग

गटे १६२
गांधीजी २२, २३, ४९
गाडगेमहाराज ४०९
गांधीखुनाचे भविष्य ९५
गायत्रीमंत्र २६
‘ गीता ’ १६४
गुप्तधनशोध १३१, १३२, १३५
गोगलगायीचा प्रयोग ३८१
गोंदवलेवर महाराज ९६
ग्रहताऱ्यांवरील जीवसृष्टि ३१८–३१९
ग्रँड (डॉ.) २००

च

चंद्राविजय ७, ८, १३,
चार्चिल २१, ९९
चव्हाण यशवंतराव ३९५
चॅपमन जॉर्ज २४७
चिंतनमंडळे ३७३–३७५
चित्शक्ति ३३–३६, ५२

ज

जंगलमॅजिक २९१
जन्मरहस्य ३४
जपकारण २७, २८, १९६, १९७
जादुटोणे २९०–२९२
जिव्हालौल्य ५०
जीन डिक्सन ६९, ८२, ९१, ९२
जीवात्मा ११९, १२०, २१३-२१४
जीवात्म्यांचे आवाज १३७–१३८
जीवात्म्याशी संपर्क १०८-११०, १११
ज्योतिषशास्त्र ७१, ७३, १००, १०१

झ

झेटसर व्ही ११

ट

टिळक लोकमान्य १०६
टी लीफ रिडिंग १००, १०१
टेलिपथी १६६–१७०
टेलिपोर्टेशन १६३
टोनी (डॉ.) २०४, २०५

ड

डेन्टन (प्रो.) १४२
डोके (भाग व वैशिष्ट्ये) १८१–१८३
डौझिंग १७६

त

तर्कतीर्थ (जोशी) २९५
तुकाराम ७५, २२९

त्राटक क्रिया ४४, १२३, १२४

थ

थॉट बॉडी १४४

द

दंतोत्पादन १८८,
दिव्यदृष्टीधारक १२३
'दुर्गा सप्तशती' २९५
देहात्मा' १२१, १२२

न

'नवनाथ पोथी' ३०८, ३७८
नाईक वसंतराव ३९५
'नाडीग्रंथ' ७१
नामदेव ३९४
नॉस्टरडुमास ७०, ९५, १३०
नियति ७६, ७८
निसर्गप्राणित घटना ४०१, ४०२
नृसिंहसरस्वति ९६, १६३
नेत्ररोग २३०–२३१
नेपोलियन ८, ८८
नेहरू ४९

प

'पतंजलि योगशास्त्र' १६४, १७१
परग्रहांवरील अंतराळवीर १३–३९५
पॅरा सायकॉलॉजी ४१०
पाटसकर हरिभाऊ ३११
पांडवांचे भोग ७४
पारद (उपयोग व प्रयोग) १८९, १९०
पारद शिवलिंग ३९०
पॉल टिवचेल १६६, १६७
पीटर इकॉसच्या हकीकती १४५-१४६
पुनर्जन्म ७३–७५
पड्रॅगन ७०, ९५
पोतदार म. म. ४११
प्रतिकात्मक दैवते १९५, १९६
प्रार्थना प्रभाव १९९-२००
प्लँचेट १०३–१०७

फ

फाळणीचे भविष्य ९४
फुलर रेव्हरंड ४०५, ४०६
फ्रेंच राज्यक्रांति ३८५

ब

'बायबल' १४
बायलोकेशन १६३
बीज (मंत्र) २७०–२७१
बीजविघटन २८
बुद्ध ८, ४२,
बुवाबाजी ९८
ब्रह्मास्त्र २६, २९
ब्रॅडले डेनिस १३८

भ

भविष्यसिद्धी ८, ९५, ९६
भविष्यसिद्धी–उदाहरणे ८१–९१
भानामति विद्या १६५
भारताचा वारसा ३८८
भावे विनोबा ४०९
भूतेखेते–जादुटोणे १७, ३७७, ३७८
भेदाभेद २१

म

मणिपूरचक्र १९३, २२०, २२१,
मंत्र (सिद्धी, प्रभाव, प्रकार) ३, २६९, ३७८

मंदिरकल्पना ११–१४
मध्यमवर्ग ३८५, ३८६
मध्यस्त (मिडियम) १०७–१२०
मनोव्यापार ३६, ३७, ३९३–३९५
मस्तिकशास्त्र १७९, १८३,
' महाभारत ' ३१२
मॅकआर्थर ३२५, ३२७
मॅडोनाचे अश्रू २०१, २०२
माणिकप्रभू ९६, १६३
माधवनाथ महाराज ९६
मानवाचे भवितव्य ३८७
मानवाचे स्थलांतर ३२७, ३२८
मानवी शरीर ५१, ५२
माळीबाबा ९७
मूर ॲडमिरल १३८
मेंदू ८, ६७–६८
मृत्यू ३०-३२, ३८,३९
मेस्मेरिझम १८७

य

यंत्र २९५, २९९
यज्ञसंस्था ११
' युवर मिस्टरीज ॲंड पॉवर्स ऑफ इ. एस. पी. ' ३९६
योग (मार्ग व शास्त्र) २७, २८, १२७, १२८
योगशास्त्रावरील ग्रंथ २८७

र

रक्तस्राव प्रतिबंध ४०६
रविशंकर महाराज, ३९४
राजयोग २६४, २७७, २७८
राम ७४
रामकृष्ण परमहंस ७५
रामदास (समर्थ) ४७, ४८, ९६
रामानुजाचार्य ३, ४
' रामायण ' १४, २५७, ३१२
रावण ७४
रॉकेटस १२, १३
रॉबर्ट ग्रॅंट ५८
रॉबर्ट रिप्ले ३३२
' रेक ऑफ टिटन ' ९०
ऱ्हाइन जे. बी. १५३

ल

लॅंग (डॉ.) २२९–२४१, २४४
' लिव्हींग पास्ट ' ९
लोहर (डॉ.) १९९

व

वर्चस्वस्पर्धा २२
वर्तमानकाळ स्वरूप ६९
वाचकास आवाहन ३९०
वाजपेयी गिरीजा शंकर ९४
वासनादेह ३५, ३६, ३९–४२
वासनादेहाचे पुरावे ५३–६५, ६६
वासनानिर्मूलन ४४, ४५
विचारक्रिया ३६–३४, ४४
विवेकानंद ४८, ५०, ७५
' विष्णुसहस्रनाम ' ३०८
विज्ञानाचे तोकडेपण ३०
' वैतरणेच्या ऐलतिरी ' १,७,१६,
वैज्ञानिक प्रगति ११, २५, २६
वैज्ञानिक शोध ९, १०, ३९४
व्याधीविमोचन १८७, २०१–२०२

श

शंकराचार्य २५९
' शिवस्वरोदय ' ९८
शिवाजी २२, २३, ६७, ९३
षड्रिपू ४२, ४३

स

संख्याशास्त्र ९७, ९८, १०१, १०२
सच्चिदानंद स्वरूप ३२, ३३
सत्यसृष्टीतील अनाकलनीय हकिकती ३३२–३६८
सत्तालोभ ४६
संदर्भ साहित्य ३९७–४०२
संपत्तीची आसक्ती ४९
‘ समरांगणसूत्र ’ १४
संयममार्ग २७५, ३७७
संसारचक्र १८–२०
सानेगुरुजी ४०९
सामुदायिक विचार प्रक्षेपण ३९६-३९९
सायकोमेट्री ७९--८३, १४३
सिद्धपुरुष ३६, २८७
सिद्धी २६३-२६९, २७२, २७९
स्पिरिच्युअल मिडियमशिप ८३
स्पिरीट (जीवात्मा) १०३,१०५-१२३
स्पिरीट ऑपरेशन २३४,२३५,२३८
सीझर २७२
स्टॅलिन २१
स्वप्नसृष्टि १२२
स्वरोदयशास्त्र १०२

ह

हटयोग २६३–२७६, २७७
हस्तसामुद्रिक ९८
हॅरोल्ड शेरमन ३९६, ३९७
हॅरी एडवर्ड २१७, २२०
हिटलर ८, २१, ९९
हिप्नॉटिझम १८७
हीलिंग सेंटर्स २२९
हुडिनी १६५
हेमिंग्वे १५६

ज्ञ

ज्ञानचक्रे २८२--२८४
ज्ञानाच्या मर्यादा १–९, १४, ७७
ज्ञानेश्वर १२२, १६४, २५९

* * *

अज्ञाताचा शोध व बोध

‘अज्ञाताचा शोध व बोध’ या ग्रंथात, प्लँचेटपासून पुनर्जन्मापर्यंत अनेक गूढ गोष्टींची डोळस चर्चा केलेली आढळून येईल. विज्ञाननिष्ठ-निराग्रही दृष्टीतून लिहिलेला अशा प्रकारचा मराठीतील हा पहिलाच ग्रंथ ठरावा !

आपल्या दैनंदिन व्यवहारात आपल्या अनुभवास येणाऱ्या गोष्टींपेक्षा निरनिराळ्या अशा ज्या कित्येक गोष्टी कधी कधी दृष्टोत्पत्तीस येतात, अनुभवास येतात, परंतु त्या कशा झाल्या असाव्यात, अगर त्या कशा घडत असाव्यात याचे आपणांस पुष्कळ विचार केल्यानंतरही आकलन होत नाही; पुष्कळ प्रयत्न करूनही निदान आजपर्यंत आकलन झालेले नाही. परंतु त्याचे आकलन होऊन, त्याचे वैज्ञानिक स्पष्टीकरण मिळाले तर मानव जातीच्या कल्याणाच्या दृष्टीने पाऊल पुष्कळ पुढे पडेल अशा बाबींचा उल्लेख या ग्रंथात केलेला आहे. हे सर्व विषय मानवी ज्ञानकक्षेच्या थोडे पलिकडील असल्याने, त्यांचे वैज्ञानिक स्पष्टीकरण अद्याप होऊ शकले नसले तरी तसे स्पष्टीकरण मिळू शकणारच नाही असे नाही. अशा बाबी कोणकोणत्या आहेत; तत्संबंधी आपणांस काय काय अनुभव आले आहेत व त्यांचे स्पष्टीकरण काय असावे अगर असण्याचा संभव आहे, याचे विवेचन या ग्रंथात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

BookGanga.com

‘बोध’ हा शब्द ग्रंथाच्या नावात सामील केला आहे. बोध याचा अर्थ एवढाच की, त्या शोधात जे मानवास हानिकारक किंवा त्रासदायक असे आढळेल ते टाळावयाचे कसे व जे उपयुक्त असेल त्याचा जास्तीत जास्त उपयोग योग्य रीतीने कसा करून घ्यावयाचा याबद्दलच्या विचारांना योग्य दिशा मिळविणे. अशा विषयासंबंधी असणारे अपसमज दूर करून भारतीय व पाश्चात्त्य गूढ विद्यांवर प्रखर प्रकाश टाकून त्यांनी एक नवीन दृष्टी या ग्रंथाद्वारे समाजाला दिली आहे, हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

यशवंत
प्रकाशन
ज्ञान-व्यापार नव्हे प्रसार

CS CamScanner